# दिल्लीत गांधीजी - भाग - 1

मनुबहेन गांधी

अनुवाद

ब्रिजमोहन हेडा

# प्रस्तावना

कुमारी मनुबहेन गांधींनी गाधींजींच्या सेवाकाळाच्या दरम्यान ठेवलेल्या विस्तृत रोजनिशीतील हा भाग १९४७च्या सप्टेंबरच्या ९ तारखेपासून तर नोव्हेंबरच्या ३० तारखेपर्यंतचा म्हणजे ८३ दिवसांचा आहे. या दिवसात गांधीजी दिल्लीत होते. या काळात दिल्लीला वेड लागलेले होते आणि देश अशांततेत बुडालेला होता. नोआखाली आणि कलकत्त्यातील दंगली गांधीजींनी आपल्या जीवाची बाजी लावून शमवल्या आणि आणि तेथील लोकांचे गांधीजींनी सांत्वन केल्यानंतर त्यांना दिल्लीला बोलावण्यात आल्यामुळे ते दिल्लीत आले होते. दिल्लीत गांधीजींना जे आढळले आणि त्यांनी जे अनुभवले त्याने त्यांच्या व्यथा किती तरी पटींनी वाढल्या.

या व्यथा यादवस्थळाबद्दल तर होत्याच, परंतु त्याहूनही विशेष गोष्ट म्हणजे आयुष्यभर ज्या सांप्रदायिक ऐक्याकरिता गांधीजी झगडले होते त्या सांप्रदायिक ऐक्याची स्थापना करण्यात त्यांना पुरेसे यश मिळाले नसल्यामुळे तर ते अजूनच व्यथित झालेले होते. सत्य, अहिंसा आणि बंधुत्व अभिव्यक्त व्हावे; बंधुत्व नसले तर सत्य आणि अहिंसा टिकूच शकत नाही अशी गांधीजींची मान्यता होती. यामुळे स्वातंत्र्य आले तेव्हा झालेल्या दंगलीच्या वेळी आपल्या सत्य आणि अहिंसेची कठोर परीक्षा होते आहे असे गांधीजींना जाणवले, आणि या दुःखात जी भर पडली ती त्यांचे देशबांधव या कसोटीत यशस्वी ठरू शकले नाही याची. यामुळे त्यांचे अंतःकरण आक्रंदत होते.

इतिहासात एक महापुरुष, एक युगपुरुष झाला होता आणि तो आपल्या जीवनातील सगळ्यात महान व्यथा जेव्हा अनुभवत होता तेव्हा त्यांच्याजवळ राहून त्यांची सेवा करणाऱ्या एका कुमारिकेला जो अनभव आला तो तिने इथे मांडला आहे. दिवसभर कठोर परिश्रम केल्यानंतर विस्तृत नोंद करण्याचे कार्य अनन्य भक्ती आणि निष्ठा असेल तरच होऊ शकते. ही नोंद आज आपल्याला मिळते आहे आणि हे वाचत असताना

राष्ट्रपित्याच्या अपेक्षेनुरूप आपण वर चढू शकलो नाही आणि आपण त्यांना दुखवले याची जाणीव झाली की आपली मान लाजेने खाली होते. आपल्याला बापूंच्या व्यथांचे दर्शन घडवून देण्याचे काम मनुबहेननी केले याबद्दल आपण त्यांचे सदैव त्यांचे ऋणी राहू.

इंग्रजी साहित्यात जितके दैनंदिनी साहित्य आहे तितके आपल्याकडे नाही. सैनिक, साहसी लोक, कलाकार इत्यादींनी त्यांच्या दैनंदिनीच्या आधारे लिहिलेल्या स्मृतिसाहित्याने इंग्रजी (मेमॉयर्स) साहित्य समृद्ध झाले आहे. आपल्याकडे जर तशा प्रकारचे साहित्य विपुल असते तर आपल्या ऐतिहासिक दृष्टीत थोडाफार फरक पडला असता असे मला वाटते. याचे कारण या साहित्यात अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टी असतात की ज्या खाजगी ठेवलेल्या असतात त्या बाहेर येतात आणि तत्कालीन जीवनातील विविध प्रसंगावर प्रकाश पडतो.

गुजराती भाषेत अशा प्रकारचे साहित्य थोडे आहे. गुजराती साहित्याचा विचार करत असताना सहजपणे नरसिंहराव दिवेटिया यांच्या दैनंदिनीचा उल्लेख होतो. परंतु गुजराती तसेच जागतिक दैनंदिनी साहित्यात जर कोणाचा सर्वाधिक सुंदर वाटा असेल तर तो महादेवभाईंच्या दैनंदिनींचा. महादेवभाईच्या दैनंदिनी साहित्याच्या दृष्टीने तर सुंदर आहेतच परंतु त्यांचे वैशिष्ट्य असे आहे की त्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या तसेच गांधी जीवनदर्शनाच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत. महादेवभाईंनी प्रभावित झालेल्या मनुबहेनने त्यांच्या शैलीची जाणीव ठेवली हे आपले सद्भाग्य आहे.

या दैनंदिनीचा वैशेष हा आहे की तिच्यात नोंदवण्यात आलेल्या घटनाची नोंद त्याच दिवशी करण्यात आली. या गोष्टीतून या दैनंदिनीच्या खरेपणाच्या प्रमाणभूततेचा खणखणाट स्पष्टपणे जाणवतो. यामुळे संशोधकाकरिता या दैनंदिनींचे महत्त्व विशेष आहे.

परंतु या दैनंदिन्यांमध्ये करण्यात आलेल्या नोंदी तात्कालालिक स्वरूपाच्याही असू शकतात. ही या दैनंदिनीची मर्यादासुद्धा दाखवता येऊ शकते. ही दैनंदिनी लिहिणारीची

त्या घटनांविषयीची प्रतिक्रिया आणि त्यांचा त्या व्यक्तीच्या मनावर उमटलेला ठसा तात्कालिक असू शकतो. अनेकदा लिहिणाऱ्या व्यक्तीला घडलेल्या घटनांवर विचार करायलाही वेळ मिळालेला नसतो. यामुळे त्या घटनांसंबंधी दिलेला अभिप्राय कच्चा, अपरिपक्व असू शकतो.

शिवाय अनेक घटना घडतात तेव्हा त्या फार महत्त्वाच्या आहेत असे वाटत असते, परंतु ऐतिहासिक दृष्टीने त्या फार गौण वा महत्त्वहीन असू शकतात. जेव्हा की अनेकदा अशा काही घटना असतात की त्या घडतात तेव्हा त्यांचे विशेष महत्त्व जाणवत नाही, परंतु भविष्यात त्यांच्या महत्त्वाला पारावार नसतो.

अशा प्रकारे या दैनंदिनीच्या मर्यादांकडेसुद्धा वाचकांनी आणि संशोधकांनी लक्ष दिले पाहिजे. दैनंदिनीत भूतकाळातील ज्या घटनांना महत्त्व देण्यात आले आहे आणि त्याबद्दल जो अभिप्राय देण्यात आला आहे त्याची सामंजस्यपूर्वक जर वाचकांनी नोद घेतली तर या दैनंदिन्यांमधून आपल्याला बरेच खाद्य मिळू शकेल. या दैनंदिनीत उल्लेखिण्यात आलेल्या घटना आणि पात्राविंषयीसुद्धा असे म्हणता येईल की त्या त्या वेळी लेखिकेच्या मनावर त्या त्या घटनांविषयी वा व्यक्तिंविषयी जी प्रतिक्रिया झाली होती आज त्याच प्रसंगांची वा व्यक्तींची वाचकांच्या मनावर होणारी त्या प्रसंगाची वा घटनांची प्रतिक्रिया यांच्यात अंतर असू शकते. १९४७च्या धूसर वातावरणात बापूजींना ज्या व्यथा होत होत्या आणि निष्फळता जाणवत होती त्याकडे आज पाहिले तर असे निश्चितच वाटते की बापूंचे जीवनकार्य निष्फळ झालेले नाही. आज बांपूच्या प्रतापामुळे सांप्रदायिक अशांततेच्या दावानलावर आपण बव्हंशी नियंत्रण मिळवले आहे असे म्हणता येऊ शकते. आपल्या विशाल देशात क्वचित सांप्रदायिक दंगली होतात हे खरे आहे. परंतु यांच्या कारणांचा, स्वरूपाचा आणि परिणामांचा विचार केला तर निश्चितच असे वाटते की समग्र राष्ट्रजीवनावर यांचा परिणाम होत नाही. यामुळे बापूंनी आपल्याला जे काही शिकवले त्यात

आपण जरी पूर्णपणे उत्तीर्ण होऊ शकलेलो नाही तरी आपण काही प्रमाणात तरी यश मिळवलेलेच आहे.

हे पुस्तक पुर्ण करत असतानाच एक इच्छा झाली की बापूंच्या जीवनातील अखेरच्या दोन महिन्यातील संपूर्ण रोजनिशी लवकरात लवकर वाचायला मिळाली तर फार चांगले होईल. आपण आशा करू या की मनुबहेन या दोन महिन्याची त्यांची दैनंदिनी लवकर संपादित करून आपल्याला देतील. (या दोन महिन्यांची डायरी संपादित करून मनूबहेननी दिली आहे आणि ती लवकरच प्रकाशित होईल. - प्रकाशक.) (ही दैनंदिनी प्रकाशित झाली असून तिचाही अनुवाद तयार होत आहे. - ब्रिजमोहन हेडा, अनुवादक.)

मोरारजी देसाई

नवी दिल्ली, ऑक्टोबर २६, १९६४

बिरलाभवन, नवी दिल्ली,

९ सप्टेंबर १९४७, मंगळवार

जवळपास सव्वातीन वाजता शादरा जंक्शन आले. आमची गाडी थांबली. स्थानकावर सरदार, मणिबहेन, राजकुमारीबहेन वगैरे आले होते. दिल्ली शहराला आगीने घेरलेले असल्यामुळे सर्वांचे चेहरे साफ उतरलेले दिसत होते. यामुळे बापूजींची तर दयनीय अवस्था झाली होती. जी परिस्थिती कलकत्यात संपली होते ती इतर ठिकाणी तयार झाली होती. बापूंची अतिशय आवडती भंगी कॉलनी तर जळत होती. जिकडेतिकडे निर्वासित पडलेले होते आणि रस्त्यात शव दिसत होते. यामुळे बिरलाभवनमध्ये जायचे ठरले.

आम्ही जसे बिरलाभवनमध्ये पाऊल ठेवले तसेच मागील मोटारीतून जवाहरलालजी उतरले. अगदी वाळून गेले होते. अतिशय दःखी आणि गंभीर होते. सर्वत्र २४ तासांचा कर्फ्यू तर लागलेलाच होता. असे असूनही लूटमार आणि गोळीबार या गोष्टी सुरुच होत्या. हजारो माणसांची कत्तल झाली होती.

जवाहरलालजी आपल्या स्वभावाप्रमाणे संतापलेले होत. म्हणाले, “कंबख्तोने (हा जवाहरलालजींचा खास शब्द होता) यहा तुफान मचाया है. मग आपण पाकिस्तानला काय म्हणू शकतो?”

बापूजी - “पण संतापून काय फायदा?”

जवाहरलालजी, आपल्या स्वभावाप्रमाणे, थोडेसे संतापातच म्हणाले, “चोहोकडे इतके दंगे होताहेत आणि आपल्याला मोठमोठे ‘अंगरक्षक’घेऊन बाहेर पडावे लागते याचा माझा मलाच राग येतो. माझ्याकरिता ही लाजेची गोष्ट आहे. नियंत्रित भावाची दुकाने लुटण्यात आली आहेत, भाज्या, फळे वगैरे काहीही मिळत नाही. अशात गरिबांचे किती हाल होत असतील याची थोडी कल्पना तर करा बापू ! डॉ. जोशी, जे संपूर्ण हिंदुस्थानातील मोठ्यात मोठ्या शल्य चिकित्सकांपैकी एक होते, ज्यांच्याकरिता हिंदू रुग्ण आणि

मुसलमान रुग्ण सारखेच होते, ते रुग्ण तपासायला चालले होते तर त्यांना गोळी मारण्यात आली. डॉ. कुरेशींच्या घरातून ती गोळी आली होती आणि ती त्यांच्या कपाळात शिरल्याने त्यांचा मृत्यू झाला होता. असा अत्याचार सुरू आहे."

सर्वांचे सांत्वन करत बापू म्हणाले,"दिल्लीचे प्रकरण नियंत्रणात येत नाही तोपर्यंत मी दिल्लीत थांबेन. "मला तर करायचे वा मरायचेच आहे."

आंघोळ वगैरे साडेअकरापर्यंत आटोपले. बापू फार गंभीर झाले होते. परंतु ज्याप्रमाणे घरात वडीलधारे आले की मुलाबाळांना हायसे वाटून आपण आपल्या जबाबदारीतून मोकळे झाल्याचा आनंद होतो तसे जवाहरलालजी आणि इतर सर्व पुढाऱ्यांना वाटले. त्यांनी सुटकेचा श्वास घेतला आणि त्यांच्या चेहऱ्यावरील तणाव कमी होऊन तिथे आनंदाची छटा तरळू लागली.

दुपारी बापूजींनी जेवणात भाजी (कलकत्त्यात वाचलेली थोडी भाजी आणली होती. तीच तयार करून बापूजींना वाढली. दिल्लीत भाजीपाला तर मिळतच नव्हता.) आठ अंस दूध आणि खाकरा घेतला.

नंतर काही मुसलमान बंधू आले आणि रडू लागले. जोपर्यंत दिल्लीत शांतता निर्माण होत नाही तोपर्यंत इतर कुठेही जाऊ नका अशी विनंती त्यांनी बापूंना केली. बापू त्यांना एकच गोष्ट समजावून सांगत होते. तुम्ही शूर व्हा. मी तर करेन अथवा मरेन. दीड वाजता आराम घेण्याकरिता बापूंनी पाय लांब केले. परंतु दिल्लीतील परिस्थितीने बापू खूप उदास झाले होते. असे जरी असले तरी अनोळखी माणसाला बापूंची ही उदासावस्था लक्षातच येऊ शकणार नाही अशा प्रकारे बापू दिवसभराचे कार्यक्रम पूर्ण करत होते. एका बंधूला ते गोष्टीगोष्टीत म्हणाले, "मैं भरोसे अपने रामका."

एवढ्यात दुपारी ३ वाजता क्षयरोग रुग्णालयात गोळीबार सुरू असल्याची बातमी आली. रुग्णालयात ४० रुग्ण होते आणि शिखांनी रुग्णालयावर हल्ला केलेला होता.

बापूंनी सुशीलाबहेनला तिथे पाठवले. जवाहरलालजीसुद्धा तिथे गेले. लोक पिशव्या भरभरून लुटीचा माल घेऊन चालले असल्याच्या बातम्या येत होत्या.

जवाहरलालजींचा संताप झाला आणि ते म्हणाले, “मला कल्पनाच नव्हती की पंजाबी इथे चोर आणि डाकू होऊन आले आहेत. आमचे अतिथी असूनही असे करतात? मी तुमच्याबरोबर, प्रेमाने, मोहब्बतीने किती गोष्टी करत असतो? माझ्या अंतःकरणात आगीचा भडका उडालेला आहे. तुमच्यात इतके शौर्य असेल तर या आणि लष्करात भरती व्हा. मला माहीत आहे की तुम्ही दुःखी आहा. पण दुःखी असाल तर इतरांना दुःखी करण्यात सुख मानू नका.”

सव्वाचार वाजता बापूजी महाराज्यपाल माऊंटबॅटन यांना भेटायला गेले. ६ वाजता परतले. झाकीर हुसेनसाहेब जामियातून बापूजींना भेटायला आले. मोठ्या मुश्किलीने त्यांचा जीव वाचला होता. “यातून एकही मुसलमान वाचू शकणार नाही” असे ते बापूजींना म्हणाले. तुम्हाला जेव्हा केव्हा वेळ मिळेल तेव्हा २-४ मिनिटांकरिता जामियात चक्कर मारा असेही ते म्हणाले. तिथे किती तरी निर्वासित स्त्रिया आणि मुले पडलेल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.

रात्री देवदासकाका आणि राजकुमारीबहेन आले. रुग्णालयात रुग्णांचा पूर आलेला आहे, रेशन संपलेले आहे. खिचडी केली होती, तीसुद्धा कागदावर वाढावी लागली असे ते सांगत होते.

रात्री १० वाजता जॉन मथाई, जवाहरलालजी, डॉ. जीवराज महेता आले होते. बापूजींनी एक निवेदन काढले आणि बापूजी ११ वाजता झोपले.

१० सप्टेंबर १९४७

३.३० वाजता प्रार्थना. नंतर पडवी जवळील खोलीत येऊन बापूजींनी काम सुरू केले. ब्रिजकृष्णजींनी त्यांना आधीच दंग्यांची हृदय हेलावणारी माहिती सांगितली होती. पाच वाजता बापूजी फिरण्याकरिता उठले. फिरत असताना एक भाई बापूजींना सांगत होते की संपूर्ण विमान वाहतूक बंद पडली आहे. बापू म्हणाले, “विमान वाहतूक कायमची बंद पडेल तर मी फार खुश होईन. १९०८ साली मी लिहिले होते की सर्व आगगाड्या जरी बंद पडल्या तरी मी रडणार नाही, उलट हसेन. याचप्रमाणे ही विमान वाहतूक बंद पडली तर मला मुळीच दुःख होणार नाही. हवाई जहाज हे युद्धाचे केवळ एक साधन आहे.”

घरात थोडे फिरल्यानंतर बापूजींनी मालीश, आंघोळ वगैरे गोष्टी सव्वाआठ वाजेपर्यंत उरकवल्या आणि जेवता जेवता मौलाना साहेबांशी गोष्टी केल्या. जेवणात २ खाकरे, ८ अंस मोसंबीचा रस आणि ८ अंस दूध घेतले. ९ वाजता आराम करण्याकरिता बापू आडवे झाले आणि त्यांचा थोडासा डोळा लागत नाही तोच गाडगीळसाहेब आणि कृपलानीजी आले. त्याच्याबरोबर जवळपास १ तास बापूजी बोलत होते. सकाळी ११। वाजता आम्ही शहर पाहायला गेलो. आमच्याबरोबर सुचेता कृपलानीजीसुद्धा होत्या. या दंगलीत त्या खूप सेवा करत आहत. आधी आम्ही हुमायून किल्ल्यात गेलो आणि तिथून जामियात. तिथे आश्रयार्थ आलेल्या खूप भगिनी होत्या. एक तर २ महिन्यांचीच बाळांतीण होती. तिचे आईवडील, दोघेही, या दंगलीत मारले गेले होते. त्या बाळांतणीला पाहून आम्हा सर्वांचे डोळे भरून आले. बापू म्हणाले, “लोक किती पागल झाले आहेत?” बापू सर्वांना उद्देशून म्हणाले, “मरायचेच असेल तर खुदाचे नाव घेता घेता शौर्याने मरा.” जामियाच्या कर्मचाऱ्यांच्या किती तरी बेगमा आलेल्या होत्या. त्यांना संबोधत बापू म्हणाले, “या गोष्टीकरिता इतकी सगळी मेहनत केली ही इतकी सुंदर घडवण्यात आली आहे. अशा या

संस्थेतच जर तुमचे दफन झाले तर मला किंचितही दुःख होणार नाही. माणसाला मरायचे तर आहेच, मग मरणाची भीती कशाला?"

तिथून कस्तुरबा बालिकाश्रमात गेलो. तिथून दिल्ली केंद्रीय निर्वासित छावणीत आणि तिथून हरिजन कॉलनीच्या मार्गाने शहरातील आनंद हॉलमध्ये गेलो. तिथे खूप संतापलेले पंजाबी लोक होते. "गांधी तर मुसलमानांचा आहे, त्याचे हृदय दगडाचे आहे" वगैरे म्हणू लागले. "हे लोक मला शिव्या देऊन आपले दुःख हलके करत असल्याचे पाहून मला आनंद होतो" बापू म्हणाले. .

तिथून सुचेताबहेन स्थानकाजवळील छावणीत घेऊन गेल्या. तिथे ५,००० लोक पडलेले होते. एवढ्यात जखमी झालेला एक माणूस आला. पठाण होता. बापूंनी त्याला रुग्णालयात नेण्याची व्यवस्था केली. हे संपूर्ण दृश्य अतिशय भयानक होते. "हिंदुस्थानचे अजून किती पाप शिल्लक आहे? याला मानवसंहार हेच नाव देता येईल!" असे उद्गार बापूंच्या तोंडून बाहेर पडले.

हे सर्व पाहून आम्ही तीन वाजता घरी परतलो. कृपलानीजी आले. ते बापूंना म्हणाले, "कराचीची परिस्थिती फार वाईट आहे. मारवाडी, गुजराती तर मुलाबाळांना घेऊन देशात चालले आहेत. सिंधी कुठे जातील?" माझे ऐकाल तर मी म्हणेन की कोणीही कुठेही पळून जाऊ नये. यातच पाकिस्तानची परीक्षा आहे. नाही तर हे लोक म्हणतील, 'आम्ही काय करू शकतो, हिंदूच पळून जात आहेत!' हा माझा विचार आहे. परंतु हा आदर्श कोणाच्याही गळी उतरून राहिला नाही. यामुळे दोन्ही देशांचे सरकार व्यवस्था तर करून राहिलेच आहे."

४ ते ५ च्या दरम्यान आसफअलीसाहेब, डॉ. पट्टाभी, जवाहरलालजी, लेडी माऊंटबॅटन, जयप्रकाश वगैरे एकामागून एक येतच होते.

६ वाजता बिरलाभवनमध्येच प्रार्थना झाली. आज बापूजींनी प्रवचन केले. त्यात ते म्हणाले,

"आज तर माझा दिल्लीतील दुसराच दिवस आहे. परंतु दिल्ली शहर मला मृतांच्या शहरासारखे दिसते आहे."

बिरलाभवनात का राहावे लागले याचा खुलासा करत ते म्हणाले,

"भंगी कॉलनीत राहणे मला फार आवडते. असे असले तरी तेथील माझा खर्चसुद्धा बिरलाबंधूच करत होते. परंतु भंग्यांमध्ये राहून मी त्या लोकांची काही तर सेवा करू शकतो असे समाधान मला वाटत होते. मी महालात राहण्याकरिता इथे आलेलो नाही. परंतु भंगी कॉलनीत नर्वासित पडलेले आहेत, ते कुठे जातील? मी श्रीमंतांचा मित्र आहे खरा, परंतु मी कधीही त्यांची खुशामत करत नसतो. परंतु त्यांच्या पैशाचा सदुपयोग करण्याचा मी नेहमीच प्रयत्न करत असतो. मी गरिबांचा मित्र आहे. अशा प्रकारे मी दोघांचाही मित्र आहे. माझे पोट भरण्याकरिता यांच्याकडून मी कधीही पैसा घेत नाही. पोट तर ईश्वरच भरत असतो. मी तर ईश्वराचा चाकर आहे. ईश्वर आपल्या चाकराला खायला तर देतच असतो."

मग आलेल्या निर्वासितांना संबोधत बापूजी म्हणाले,

"जे दिल्लीबाहेरून आले आहेत त्यांनी धीर ठेवला पाहिजे. इथे एक असा दीनदलित माणूस अडकून पडला आहे की ज्याच्याकरिता सर्व धर्म समान आहेत ही गोष्ट तुम्ही इथे समजून घेतली पाहिजे. मला तर पंजाबमध्ये जायचे होते आणि अजूनही तिथे जाण्याची माझी इच्छा आहे. पण हे तुमच्या हाती आहे. पाप करण्याची स्पर्धा थोडीच होऊ शकते? एकीकडे कायदेआझम म्हणतात की आम्ही हिंदूंना आधी खाऊ घालू आणि नंतर आम्ही खाऊ. हिंदू आमचे भाऊ आहेत. इतके म्हटल्याने काम कसे भागेल! खरे म्हणजे ही गोष्ट सांगायची आहे की करायची आहे. माझे चालले तर मी असेच म्हणेन की जिथे आहा तिथेच मरा, परंतु पळू नका. पण

माझे कोण ऐकतो? दिल्लीत संचारबंदी कशाकरिता? आज तर दिल्ली मृतांचे शहर झाले आहे. मी विनंती करतो की तुम्ही जसे ऐक्य १५ ऑगस्टला दाखवले होते तसेच ऐक्य जर आता दाखवाल तर त्यामुळे तुमचे, हिंदुस्थानचे आणि पाकिस्तानचेही भले होईल.

आजच्या प्रार्थना प्रवचनाचा हा सार आहे.

प्रार्थनेनंतर बापूजींनी दोनेक तास लिहवून घेण्याचे काम केले. पाऊणेनऊ वाजता बापूजी फिरले. साडेदहा वाजता बापूजी अंथरुणावर पडले. ११ वाजेपर्यंत देवदासकाकांबरोबर गोष्टी केल्या. ११।। वाजता बापूजी झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

११ सप्टेंबर १९४७

आज चुकून आम्ही सर्व दोन वाजता उठलो आणि दररोजप्रमाणे प्रार्थनाक्रमही चालला. प्रार्थनेनंतर लक्षात आले की आता कुठे ३.० वाजले आहेत. यामुळे आम्ही परत झोपलो आणि ५ वाजता उठलो. गरम पाण्यात मध घेऊन बापू कामाला भिडले. टपाल पाहिला. साडेपाच ते सहा फिरले. फिरत असताना हुल्लडीसंबंधीच गोष्टी सुरू होत्या. ६।। ते ६ ७।। स्नानादी नित्यक्रम. ८।। वाजता १२ अंस दूध, दोन खाकरे आणि भाजी घेतली. हुल्लडीसंबंधी मौलानासाहेबांशी गोष्टी. शहरात संचारबंदी फार कडक होती. कोणाचीही जरी मोटार असली तरी पोलीस ती थांबवू शकत होते आणि त्याने जर ती उभी केली नाही अथवा पास दाखवला नाही तर गोळी चालवायचा पोलिसांना सूट होती. या सर्व गोष्टी मौलानासाहेबांनी सांगितल्या. साडेदहा वाजता जवाहरलालजी, राजाजींशी चर्चा. ११ वाजता आराम घेण्याकरिता बापूजी आडवे झाले. १२ वाजता इर्विन रुग्णालय पाहायला गेले. प्रत्येक रुग्णाच्या खाटेजवळ गेले. २ वाजता परतले. येऊन माती घेतली. एवढ्यात शिखांचे प्रतिनिधीमंडळ आले. म्हणाले, “किरपाण ठेवायची सरकारने मनाई केली आहे, परंतु हे तर आमच्या धर्माचे चिन्ह आहे.”

बापू म्हणाले, “धर्मासारखी गोष्ट कुठे राहिली आहे? याच किरपाणाच्या मदतीने तुम्ही आयाबहिणींची अब्रू लुटता. मग तिला धर्माचे चिन्ह कसे म्हणता येईल? सध्या सरकारने ९ इंचांची किरपाण ठेवण्याची परवानगी तर दिलेलीच आहे. ३ फुटांचीच पाहिजे असे कशाकरिता?” असे म्हणून बापूंनी सर्वांना गप्प बसवले.

३।। वाजता पाकिस्तानचे उच्चायुक्त झहीरसाहेब बापूंना भेटायला आले. बापूंना विनंती करत ते म्हणाले, “तुम्ही कलकत्त्यात केले आहे ते पाहिल्यानंतर गांधी मुसलमानांकरिता काहीही करत नाहीत अशी तक्रार करण्याचा मुसलमानांना अधिकारच

राहत नाही. तुम्ही आमच्याकरिता फार फार केले आहे. शांततेकरिता माझा काही उपयोग करता येत असेल तर करा. मी स्वतः पूर्व पश्चिम पंजाबमध्ये जायला तयार आहे." असेच ते भरपूर काही म्हणाले.

सव्वाचार ते ६ पर्यंत महाराज्यपालांना भेटायला गेले. ६ वाजता परत शिखांचे प्रतिनिधीमंडळ आले. खरा शीख कसा असतो ते बापूंनी त्यांना सांगितले.

आज पाऊस असल्यामुळे घरातच प्रार्थना झाली. जवाहरलालजी, राजकुमारीबहेन इत्यादी पुष्कळ होते. त्यानंतर बापूजींनी ढेबरभाई आणि श्यामळदासकाकांबरोबर चर्चा केली. फिरत असताना बापूंनी कृपलानीजींबरोबर चर्चा केली आणि पाऊणेदहा वाजता ते अंथरुणावर पडले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१२ सप्टेंबर १९४७

नेहमीप्रमाणे ३।। वाजता प्रार्थना, प्रार्थनेनंतर 'हरिजनबंधू'चे काम केले. ५ वाजता फिरण्याकरिता उठले. फिरत असताना कृपलानीजींबरोबर गोष्टी केल्या. मग सरदार आले. मालीश सुरू असताना पूर्ण वेळ सरदारशी बोलत होते. सुरू असलेली हुल्लड, शीख, किरपाण, निर्वासित इत्यादींविषयी पुष्कळ गोष्टी केल्या ७ वाजता बापूजी आंघोळीला गेले. ८ वाजता मौलानासाहेब, जवाहरलालजी आले. निर्वासितांकरिता यमुनेच्या काठावर झोपड्या बांधून देण्याच्या योजनेसंबंधी त्यांनी सांगितले. लोकांनी काम करावे आणि राहावे. आता शहराची परिस्थिती नियंत्रणात आली आहे, परंतु ती सर्व सैन्यामुळे.

१० वाजता जीवणजीभाई वगैरे नवजीवन कार्यालयाचे लोक आले. बापूंनी 'हरिजन' बंद करायला सांगितले ('हरिजन' पोहोचू शकत नव्हते म्हणून.). परंतु लोकांना आणि 'नवजीवन'ला हे पटले नाही.

सव्वादहा वाजता आराम घेण्यासाठी बापूजी आडवे झाले. साडेदहा वाजता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक आले आणि ते थोड्या वेळाने गेले. बापू त्यांना म्हणाले की आर.एस.एस.च्या लोकांचाच या दंगलीमध्ये हात आहे आणि तेच हा गोंधळ निर्माण करत आहेत अशा बातम्या माझ्याकडे येत आहेत.

आर.एस.एस.चे गुरू म्हणाले, "हे खोटे आहे. मला स्वतःलाच आता शांतता हवी आहे. इतकेच की ज्या कोणाला फसवण्यात आले आहे त्याला सोडवणे आमचे कर्तव्य आहे. आणि हेच आमचे धोरण आहे."

बापूजी म्हणाले, "जर तुमचे हेच धोरण असेल तर तुम्ही 'आमचे हे धोरण आहे आणि आमच्यावरील हा आरोप खोटा आहे आहे' असे एक निवेदन काढायला पाहिजे."

परंतु गुरुजी म्हणाले, “आर.एस.एस.चे लोक मला भेटायला आले होते आणि त्यांचे हे धोरण आहे असे त्यांनी मला सांगितले असे तुम्हीच सांगा.”

बापू म्हणाले, “मी तर सांगेनच, परंतु तुम्ही जर प्रामाणिक असाल तर तुम्ही हे निवेदन काढायला पाहिजे.”

ते गेल्यानंतर इतर १-२ लोक भेट घेण्याकरिता आले. बापूजी सकाळी ३।। वाजता उठले होते. परंतु अजूनपर्यंत ते आराम घेऊ शकले नव्हते.

११।। वाजता आम्ही मुसलमान निर्वासितांची छावणी पाहायला गेलो. आधी जुम्मामशीद पाहायला गेलो. आज शुक्रवार असल्यामुळे तिथे खूप मुसलमान बंधू होते. जुम्मामशिदीत जाताच लोकांच्या घोळक्याने बापूजींना घेरले. फार घाण होती. उकाडा पण असह्य होता. अशा वातावरणात बापूजी चप्पल काढून फिरले. परंतु खूपच चीड आणि क्रोधाचे वातावरण होते. बापूंना त्याची पर्वा नव्हती. ५,००० निर्वासित होते. बापूजी संपूर्ण जुम्मामशिदीत फिरले. त्यांच्या जीवनात जुम्मा मशीदीत तर ते पहिल्यांदाच आले होते. संपूर्ण इमारत दगडां*ची बनलेली आहे. जवळपास २९० वर्ष जुनी आहे. असे असूनही जशीच्या तशीच आहे. काहीही तुटले नाही.

तेथून निझाम महालात (पॅलेस) गेलो. इथे संपन्न कुटुंबातील लोक होते. परंतु तिथे संपूर्ण नरकच होता असे म्हटले तरी चालेल. भगिनी आधीच तयार केल्याप्रमाणे एकामागून एक येत होत्या. सर्वांच्या तोंडावर लिपस्टिक होती. आणि जणू काय त्यांच्यावर कोणतेही दुःख कोसळले नव्हते असे कृत्रिम वातावरण होते.

हे सर्व पाहून ३ वाजता आम्ही परतलो. आल्याबरोबर बापूजींच्या मुलाखती सुरू झाल्या. परंतु बापू फारच थकलेले होते. यामुळे अर्ध्या मुलाखतीतच ते झोपले. ३।। वाजता लियाकत अलीखानचे भाऊ आणि निझामचे मंत्री सर सुलतान हेही आले. ते म्हणाले,

“तुम्हाला आमची जी मदत पाहिजे ती घ्या. या शहराला वाचवणारे तुम्हीच आहा. आम्हांला असा पाकिस्तान नको.”

४।। वाजता शिखांचे आणि येथील व्यापाऱ्यांचे प्रतिनिधीमंडळ आले. हे लोक अतिशय संतापून सांगत होते की मुसलमानांनी आम्हांला जो त्रास दिला आहे तो आम्ही कधीही विसरू शकणार नाही.

बापूंनी सर्वांना शांत केले आणि म्हणाले, “परंतु आपण वाईट माणसाबरोबर वाईट व्हायला पाहिजे की आपल्याला मिळालेल्या चांगल्या गुणांचा उपयोग करून त्यांच्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे? तुम्हीच सांगा आपल्याला शोभेल अशी कोणती गोष्ट आहे?” सर्व एकदम शांत झाले.

मग प्रार्थना झाली. आज दररोजपेक्षा जास्त संख्या होती. सरहद्द प्रांतातील गिरधारीपुराहून तार आली होती की “काहीही करा, पण बादशाह खानचा प्रदेश वाचवा.”

याबद्दल बापू म्हणाले,

> “देशात फिरत असताना एखाद्या लहान मुलालाही जिथे भिती वाटत नव्हती तिथे असे काय होऊन राहिले आहे की आज सर्व घाबरलेले आहेत? मी माझा राग कोणावर काढू? माझ्याच भावंडांवर ना? माझा भाऊ जर पागलपणा करत असेल तर मी सुद्धा पागल व्हायला पाहिजे काय? माझ्या स्वतःच्या भावाला वेड लागले होते. तो आईवडिलांना मारत होता. असे असले तरी त्याला कोणीही मारले नाही. उलट त्याची कीव करत होते. आपण तर ठीक आहो, पण आपली भावी प्रजा म्हणेल की ‘आमच्या आजोबांना स्वातंत्र्याची गोड भाकरी मिळाली होती पण ते ती पचवू शकले नाही आणि ते एकमेकांचे गळे कापत होते. अशा विचित्र परिस्थितीत आपण आपल्याला टाकू नये. हिंदू धर्माला आणि शीख धर्माला वाचवायचे असेल तर एकच उपाय आहे आणि तो हा आहे की आपण माणुसकी सोडायला नको. हा तर

निसर्गनियम आहे, माझा, तुमचा वा एखाद्या न्यायाधिशाचा नाही. एक ७७-७८ वर्षांचा म्हातारा, ज्याने जग पाहिलेले आहे, भरपूर अनुभव घेतला आहे, २० वर्ष जंगली देशात राहिला आहे, आणि जो रामनामाचे मूल्य विसरलेला नाही तो माणूस जर तुम्हांला सांगतो आहे की वाईटपणाचा बदला चांगुलपणाने घ्या तर त्याला काही मूल्य असेल ना?"

मग जुम्मा मशिदीचे, निझाम पॅलेसचे वर्णन केले. आणि झहीदसाहेब आणि लियाकत अलींचे लहान भाऊ जे सकाळी भेटायला आले होते त्यांनी बापूंना जे सांगितले ते बापूंनी सांगितले. (हे वर आलेले आहे.) बापूंनी प्रार्थनेत ती गोष्ट जाहीर केली.

नंतर मुसलमानांना उद्देशून बापू म्हणाले,

"मुसलमानांच्या घरांत खूप शस्त्रास्त्र असल्याचे मी ऐकले आहे. असे असेल तर मी त्यांना विनंती करतो की तुम्हांला जर मोगल काळातील इमारती (जुम्मा मशीद इत्यादी) सुरक्षित ठेवायच्या असतील तर तुम्ही इमानदार असायला पाहिजे. तुमचे नीट रक्षण होईल हे पाहणे सरकारचे काम आहे, धर्म आहे. परंतु तुम्हांला जर हिंदुस्थानातच राहायचे असेल तर तुम्ही हिंदुस्थानशी निष्ठावंत राहायला पाहिजे. कलकत्त्यात ज्याप्रमाणे सर्वांनी मला आपली शस्त्रे सोपवली होती त्याप्रमाणे इथेही मला शस्त्रे सोपवा. सरकार तुम्हांला शिक्षा करणार नाही. आणि ज्यांना शस्त्रे ठेवायची असतील त्यांनी परवाना घेऊनच ती ठेवायला पाहिजे. तोच त्यांचा धर्म आहे. यामुळे मुसलमान भावंडांना मला सांगायचे आहे की तुम्ही तुमची अंतःकरणे स्वच्छ करा. नाही तर हे इतके सुंदर दिल्ली शहर नष्ट होईल.

"आणि अखेरीस आर.एस. एसचे गरू जे म्हणाले होते तेसुद्धा बापूजींनी जाहीर केले. (हा संदेश वर दिलेला आहे आणि गुरुजींशी जो संवाद झाला होता तोच बापूजींनी जाहीर केला.)

प्रार्थनेनंतर सरळ फिरायला गेले. आज बापूजी ९।। वाजताच अंथरुणावर पडले. लॉर्ड इस्मे कराचीला गेल्याची बातमी बापूंना सायंकाळी मिळाली होती. बापूजी खुश झाले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१३ सप्टेंबर १९४७

साडेतीन वाजता प्रार्थना. प्रार्थनेनंतर तर दररोजप्रमाणे बापूजी आपल्या कामाला लागले. साडेपाच वाजता फिरायला जाण्याकरिता उठले. आतापर्यंत वातावरणाच्याच गोष्टी सुरू होत्या. नंतर मालीश, आंघोळ.

साडेआठ वाजता मौलानासाहेबांबरोबर खाजगीत चर्चा केली. त्यात जवळपास १० वाजले. नंतर दिवाण चमनलाल आले.

जिनासाहेबांनी आज एक निवेदन जाहीर केले आहे. हिंदुस्थान सरकार जे करते आहे त्यासंबंधी ते होते. यामुळे बापू संतापले. बलदेवसिंगजी आणि सी. एच. भाभा भेटायला आले. त्यांना बापूजी म्हणाले, "हे निवेदन तुम्ही कसे काय काढले असे तुम्ही त्यांना विचारायला पाहिजे. त्यांना जर शांतता स्थापित होणे नको असेल तर त्यांनी तसे सांगावे.वगैरे."

पुराणा किल्ल्यात निर्वासितांची जी छावणी होती ती पाहायला आम्ही ११।। वाजता गेलो. परवा इथूनच गोळीबार होत होता. जशी आमची मोटार आत गेली तसे निर्वासित 'गो बॅक' म्हणू लागले. कोणत्या तरी दंगलखोराने मोटारीची दारे उघडून टाकली. ब्रिजकृष्णजींनी ती लगेच बंद केली आणि दिवाण चमनलालना मोटर परत न्यायला सांगितले. बापूजी नाराज होत म्हणाले, "मी अशा प्रकारे कोणालाही घाबरत नाही. मला मारायचे असेल तर मारून टाकू द्या. परंतु मला इथेच उतरायचे आहे." यामुळे परत मोटर आत घेतली. बापू मोटीरीच्या पायरीवर उभे राहून लोकांना म्हणाले, "माझ्याकरिता सर्व धर्म समान आहेत." लोक म्हणाले, "खोटी गोष्ट आहे." लोकांमधील किती तरी सुज्ञ बंधू लोकांना शांत ठेवायचा प्रयत्न करत होते. अखेरीस बापू म्हणाले, "मी तर करायला वा

मरायला आलो आहे. हे तुम्हांला मान्य करायचे असेल तर करा.” (तिथे मुसलमान निर्वासित होते.)

२।। वाजता घरी आलो. माती घेऊन बापूजी आराम करण्याकरिता पडले. एवढ्यात जमियतचे सचिव मौलाना इझबुल रहेमान आले. बापूंशी बोलत असताना ते म्हणाले, “पाकिस्तानमध्ये मुसलमान जरी हिंदूंचा छळ करत असतील तरी त्याचा बदला इथे का?” बापू म्हणाले, “तुम्ही सगळे जे राष्ट्रीय मुसलमान आहा त्यांनी निवेदन काढून सांगायला पाहिजे की आम्ही आजचे जिनासाहेबांचे भाषण वाचले. आणि पुढे जाऊन त्यांना विचारायला पाहिजे की तुम्ही तेथील हिंदूंना सुरक्षित ठेवू शकता काय? तुमच्याकडे त्या हिंदूंकरिता जर जागा नसेल तर पाकिस्तानमध्ये हिंदू राहू शकत नाही असे जाहीर करा. तुम्ही जर तिथे हिंदूंना सुरक्षित ठेवाल तर इथे आम्ही सुरक्षित राहू शकू.”

त्यानंतर प्रार्थनेपर्यंत एकामागून एक मुलाखती सुरू होत्या.

प्रार्थनेत हकीमसाहेब, अनसारीसाहेबांसंबंधी बोलताना बापूजी म्हणाले,

“१९१५ साली मी दिल्लीत आलो तेव्हा आचार्य रुद्रचंद्र प्राचार्य होते. मी तर त्यांना ओळखत नव्हतो. परंतु आमचा परिचय ॲंड्र्यूज आणि श्रद्धानंदजींनी करून दिला. आणि त्यांच्याद्वारे हकीमसाहेबांशी आमची ओळख झाली. त्या वेळी त्यांना दिल्लीचे बादशाह म्हणून संबोधिल्या जात असे. ते कोणत्याही हिंदू-मुसलमानांवर औषधोपचार करायचे. त्यांच्याजवळ जातिभेद नव्हता. आणि गरीब बांधवांना तर ते मोफत औषधोपचार करायचे. त्यांच्या मुलीला, जोहराला जीव वाचवण्याकरिता हॉटेलमध्ये आश्रय घ्यावा लागला आहे. आपल्या हिंदू धर्माकरिता तर ही लाजेची गोष्ट आहे असेच म्हटले जाईल.

“मी आज पुराणा किल्ल्यातसुद्धा गेलो होतो. आणि इतर हिंदू छावण्याही पाहिल्या. अनेक लोक माझ्यावर संतापलेले होते, तसेच बऱ्याच लोकांच्या

चेहऱ्यावर प्रेमाची भावनाही होती. परंतु माझ्या अंतःकरणात मात्र सर्व एकच होते. एका झाडाच्या सर्व फांद्या समान असतात. यात काय उजवे आणि काय डावे हे कसे सांगता येईल? आज आपण कोणाला घाबरायला पाहिजे? मानवजातीला? माझ्या अंतःकरणावर आघात झाला होता. आपली दिल्ली मोठे शहर आहे, इंद्रप्रस्थ आहे. ज्या दिल्लीत पांडवकौरव राहिले, मोगल राजवट होऊन गेली अशी ही ऐतिहासिक दिल्ली ! इथे कोणत्या तरी खुनीने श्रद्धानंदजींचा खून केला होता. दिल्लीला बट्टा लावला. परंतु त्यांनाच मुसलमान जुम्मा मशिदीत घेऊन गेले होते. या दिल्लीची आज बदनामी होते आहे.

“आज जवाहरलालजी-सरदार लाचार झाले आहेत. जे जवाहरलाल आणि सरदार स्वातंत्र्य संघर्षात आघाडीवर उभे असायचे आणि हसतमुखाने वीर पुरुषाप्रमाणे लढत होते त्यांच्या चेहऱ्यावर मी कधीही अशी लाचारी पाहिली नाही जशी मी आजकाल पाहतो आहे. माझ्या डोळ्यासमोर लोकांना वस्तीबदल करायला लावण्याची माझी इच्छा नव्हती. तरीही ईश्वराला ती करायला लावायची असेल तर ईश्वराला मी म्हणेन की असे होण्यापूर्वी मला घेऊन जा.

“दोन्ही सरकारांना लढू द्या. परंतु प्रत्येक जण जर कायदा हातात घेईल तर सरकार राहणारच नाही.”

कायदेआझम म्हणाले की “संघराज्याने तुमचा सर्वनाश केला आहे. यामुळे तुम्हांला जर इथे आणायचे असेल तर निधी गोळा करा आणि तो मला द्या.”

बापू म्हणाले,

“निधीबद्दल मला काहीही म्हणायचे नाही. परंतु पंजाबमध्ये काय झाले? हो, बिहार आणि कलकत्त्यात झाले आहे, परंतु त्यांनी अपराध कबूल करून त्याचे प्रायश्चित्तही घेतले आहे. मी तर जिनासाहेबांना मैत्रीखातर सांगतो आहे की पश्चिम

पंजाबमध्ये आज एक तरी मुलगी खरोखरच सुरक्षित आहे काय? आणि अशी निवेदने काढल्याने तुम्हांला शांतता कशी मिळू शकेल? जर झगडायचेच असेल तर मोकळ्या मैदानात येऊन लढा. जर हिंदूंनी अपराध केला असेल आणि मी जर सही करूनही तिथे गेलो नाही तर मी हिंदूंशी अप्रामाणिकपणे वागलो असे सिद्ध होईल. याप्रमाणे मी जर मुसलमानाची चूक दाखवली नाही तर मी मुसलमानांशी प्रामाणिक नाही असे म्हणावे लागेल. याचे कारण माझ्याजवळ हिंदू-मुसलमान असा कोणताही भेदभाव नाही. मला कोणत्याही धर्माला धोकेबाज होऊ द्यायचे नाही.

यानंतर असफअली साहेबांविषयी कोणत्या तरी 'रिपब्लिक' नावाच्या वर्तमानपत्राने छापले आहे की ते पाकिस्तानची सेवा करत आहेत आणि हिदुस्थानची फसवणूक करत आहेत. त्याबद्दल बापू म्हणाले,

असे लिहिणे हे विष पसरवण्यासारखे आहे. असफअलींनी इतकी वर्षे काँग्रेसची सेवा केली आणि आता जर ते अप्रामाणिक असल्याचे सिद्ध होत असेल तर जरूर त्यांना गोळी मारा, परंतु अशा खोट्या अफवा पसरवणे हा भयंकर अपराध आहे.

बापूजी दहा वाजता झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१४ सप्टेंबर १९४७, रविवार

साडेतीन वाजता प्रार्थनेकरिता उठले. प्रार्थनेनंतर बापूजी आपल्या दररोजच्या कामाला लागले. सव्वापाच वाजता फिरण्याकरिता उठले. फिरत असताना विशेष असा कोणताही विषय निघाला नाही. फिरल्यानंतर पाऊणेसात वाजता सरदार वल्लभभाई आले. बापूजींशी बोलताना ते म्हणाले की, “रात्रभर ‘डॉन’ कायालयातून गोळ्या सुटत होत्या. सैन्याने चारदा आत शिरण्याचा प्रयत्न केला होता. परंतु कोणाचीही हिंमत होत नव्हती. अखेर मोठ्या मुश्किलीने आत शिरले तर ते लोक छतावरून उड्या मारून पळून गेले. परंतु आतून बराच दारुगोळा निघाला. बाकी पुराना किल्ल्यात जे लोक भरलेले आहेत त्या सर्वांना पाकिस्तानमध्ये जायचे आहे. त्याकरिता व्यवस्था करण्यात आली आहे.” काल जिनासाहेबांनी काढलेल्या निवेदनासंबंधीही चर्चा झाली.

मसाज, आंघोळीनंतर जेवता जेवता बापूजींनी मौलानासाहेबांबरोबर खाजगीत चर्चा केली.

थोडा आराम केल्यानंतर १२। वाजता आम्हांला ईदगाह आणि झेंडामैदान पाहायला जायचे होते, परंतु तेवढ्यात परत सरदार वल्लभभाई आले. त्यांनी थोडा हास्यविनोद केला तर बापू म्हणाले, “इतक्या दुःखद वातावरणातही सरदार हास्यविनोद करू शकतात म्हणूनच हे टिकून आहेत.”

या दोन्ही ठिकाणी अतिशय घाण होती. भयंकर वास येत होता. इमारतींचे मोडतोड केलेले सामान पडलेले होते. मी आणि आभाबहेनने चपला घातलेल्या नव्हत्या. यामुळे काही मौलवींनी बापूजींना आत जाऊ दिले नाही. यामुळे किती तरी मुसलमान बांधव बडबडत होते, “जरूर आत न्या, कळेल तर खरे.” बाकी तर यांच्या पद्धतीप्रमाणे

जेव्हापासून बापूंची मोटर उभी राहिली सर्वत्र आक्रंदन सुरू होते. ईदगाहमधून परतायला १।। वाजला होता.

परतत नाही तोच काही मुसलमान बंधू भेटायला आले. बापूजी त्यांना अतिशय कठोर शब्दांत म्हणाले, “तुम्ही जर राष्ट्रवादी मुसलमान आहा तर जिनासाहेबांप्रमाणे निवेदन का काढत नाही?”

यानंतर दुसरे काही मुसलमानबंधू आले, त्यांनासुद्धा हेच सांगितले, “हिंदुस्थानातील मुसलमानांना बळजबरीने पाकिस्तानात पाठवून देण्यात यावे ही गोष्ट माझ्या तोंडून तुम्ही कधीही ऐकणार नाही. तुम्हांला मारत जरी असतील तरी इथेच मरा हेच तुम्ही माझ्या तोंडून ऐकाल.”

मुसलमान बंधूंनी कलकत्त्याप्रमाणे एखाद्या मुसलमानाच्या घरात राहण्याचे निमंत्रण बापूंना दिले. ते म्हणाले, “असफसाहेबांचे घर आहे. तुम्ही आला तर ते घर संकटातून वाचेल.” बापूंनी तिथे जायला होकार दिला. त्या घराची साफसफाई करण्याकरिता ब्रिजकिशनजीबरोबर मी गेले. तिथे घेऊन जायच्या सामानाची बांधाबांध करण्याकरिता आभाबहेनला मागे थांबवले. परंतु असफसाहेबचे घर दरियागंजमध्ये होते. तिथे सारख्या गोळ्या चालत होत्या. शिवाय कलकत्त्यात आणि दिल्लीत फार अंतर होते. या सर्व गोष्टींबद्दल आम्ही स्थानिक मुसलमानांशी विचारविनिमय केला. अखेरीस मी तर म्हणाले की डॉनच्या कार्यालयातून जर गोळी आली आणि त्यामुळे गांधीजींना जर काही झाले तर हिंदुस्थानातील एकही मुसलमान वाचणार नाही. आणि असे करत असताना या मोहल्ल्यातील सैन्य जर काढून घेण्यात आले तर कसे? बरीच चर्चा केल्यानंतर या बांधवांना असे वाटले की हे म्हणणे उचित आहे. “गांधीजींना आम्ही परत असे करायला सांगणार नाही” असे ते म्हणाले.

५ वाजता परतल्यानंतर मी बापूजींना वरील सर्व हकिगत सांगितली. बापूंनी जाणे रद्द केले. ५ वाजता बापूजी माऊंटबॅटनना भेटायला गेले. सव्वासहा वाजता तिथून परतले. साडेसहा वाजता दूध घेऊन प्रार्थनेकरिता गेले. प्रार्थनोत्तर प्रवचनात ईदगाह आणि झेंडामैदानाचे वर्णन करताना बापूजी म्हणाले,

"मी हिंदूंच्या छावणीत गेलो आहे परंतु आपल्या जुन्याच घाणेरड्या सवयींमुळे तिथे खू ुप दुर्गंधी येत होती आणि खूपच घाण होती. माझ्या नाकाला तर वास येत नाही, परंतु माझ्याबरोबर या ज्या पोरी होत्या त्यांनी मला हे सांगितले. आज आपले सैन्य बंदूक घेऊन उभे आहे. परंतु माझे चालले तर मी यांच्या हाती कुदळ देईन. मी अनेक छावण्या चालवल्या आहेत. आपण दुःखातून सुख निर्माण केले पाहिजे. दररोज एकेकाने क्रमवार झाडझूड केली पाहिजे, कामचलाऊ संडास उभे केले पाहिजे, खाण्याकरिता एकाच ठिकाणी स्वयंपाक केला पाहिजे, न्हाणेधुणे एकाच ठिकाणी व्हायला पाहिजे. छावणीत साफसफाई कशी ठेवायची हे मी इंग्रजांपासून शिकलो आहे. आणि सर्वांनी मिळूनमिसळून काम केले तर काम जाणवणारच नाही."

मग हिंदू-मुसलमान ऐक्यासंबंधी दररोजप्रमाणे बोलले.

प्रार्थनेत आलेल्या एका बंधूने प्रश्न केला - "हे सर्व तर सुरूच आहे, पण वस्तीबदल करायचा की नाही यासंबंधी एक निर्णय घेतला पाहिजे."

बापू म्हणाले, "वस्तीबदल जर होणार असेल तर ईश्वराने मला उचलून न्यावे इतकेच मी म्हणेन."

त्यानंतर राजकुमारीबहेन आणि इतर मंत्री आले. ९ वाजता बापूजींनी मौन घेतले. ९।। वाजता अंथरुणावर पडले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१५ सप्टेंबर १९४७, सोमवार

बापूजी ३.३०वाजता प्रार्थनेकरिता उठले. तोंड धुऊन प्रार्थना केली. मौन असल्यामुळे ‘हरिजन’चे आणि टपाल लिहिण्याचे काम सुरू केले. मौन असल्यामुळे मुलाखतीकरिता कोणी विशेष येणारेसुद्धा नव्हते. बाकी तर बापूजींचे आज खूप विचारमंथन सुरू आहे असे वाटत होते.

दररोजप्रमाणे दिनक्रम चालला. पाऊस खूपच जोरात सुरू आहे. निर्वासितांचे कसे सुरू असेल याची बापूजींना काळजी होती. प्रार्थनेतसुद्धा म्हणाले,

“मला पाऊस जितका गोड वाटत असे तितका कालचा पाऊस मला गोड वाटला नाही. माझे लक्ष सारखे निर्वासितांकडे जात होते. तिथे ते उघड्या छावणीत पडले आहेत. भावाभावात जर रक्तपात झाला नसता तर हे हजारो बंधू, भगिनी, मुले अशा दयनीय अवस्थेत इथे का पडले असते? आजचे मौन ही माझ्याकरिता फार चांगली संधी होती. मला खोलवर विचार करायला वेळ मिळाला. दिल्लीवासीयांतसुद्धा माणुसकी राहिली नाही काय? हिंदू आणि शीख बंधू जर मुसलमानांना आपलेसे करतील तर निर्वासितांचा प्रश्न तर आपोआपच सुटेल. माझी प्रार्थना आहे की सर्वांनी आपल्या सरकारवर विश्वास ठेवावा, बाकी मेलेल्याला कोणीही जिवंत करू शकत नाही. परंतु हे सगळे तर मेलेले लोक करत नाहीत? आपले स्वातंत्र्य तर अजून केवळ एक महिन्याचे बाळ आहे. त्या बाळाचे आपण किती हाल करत आहो?

आजचे प्रार्थनाप्रवचन खूपच कारुण्यपूर्ण होते. रात्री जवाहरलालजी वगैरे आले. त्यांच्याबरोबरसुद्धा अशाच गोष्टी केल्या.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१६ सप्टेंबर १९४७, मंगळवार

३.३० वाजता बापूजी उठले. प्रार्थना वगैरे रोजप्रमाणे. प्रार्थनेनंतर बापूजींचे लेखनाचे काम चालले. ५.३० वाजता फिरत होते. तेवढ्यात वल्लभभाई आले. त्यांच्याबरोबर काही खाजगी गोष्टी झाल्या. ८। वाजता परत येतो असे सांगून गेले.

फिरल्यानंतर मालीश, आंघोळ असे कार्यक्रम चालले. ८।। वाजता बापूजींना थोडी सवड मिळाली, आणि ते जेवले. जेवल्यानंतर भंगी कॉलनीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची जी सभा होती तिला गेले. व्यवस्था सुंदर होती. या लोकांनी प्रार्थनासुद्धा फार चांगली आयोजित केली. प्रार्थनेनंतर ५०० सेवकांच्या प्रमुखाने सांगितले की "आमचे धोरण हिंदू धर्माचे रक्षण करणे आणि हिंदूंना पुढे आणणे आहे. आपल्या धर्मात गांधीजींसारखे महापुरुष आहेत आणि ते आज आपल्यामध्ये आहेत हे आपले परम सौभाग्य आहे. ते जो काही आदेश आपल्याला देतील तसे आपण करू."

मग बापूजींचे प्रवचन सुरू झाले. त्याचा सार हा असा आहे -

"तुमच्यावर आरोप आहे की या मारहाणीत आणि कापाकापीत तुमचा हात आहे. जर असे असेल तर या महान संस्थेचा नाश होईल. मी तुमच्या पुढाऱ्यांना भेटलो आहे. त्यांचे म्हणणे आहे की आम्ही हिंदूंचे रक्षण निश्चितच करत असतो. आमचा स्वसंरक्षणावर विश्वास आहे. परंतु इतरांना मारण्यावर नाही. यावर मी त्यांना विचारले, मग ही वस्तुस्थिती मी जाहीर करू? ते हो म्हणाले. जर असे असेल तर मला आनंद होईल. परंतु इतके लक्षात ठेवा की पाकिस्तानमध्ये जर कोणी हिंदू राहू शकत नसेल आणि हिंदुस्थानात कोणी हिंदू राहू शकत नसेल तर मी म्हणेन की या दोन्ही धर्मांचा नाश अटळ आहे. हिंदू धर्माचा तर मी विशेषच अभ्यासू आहे. हिंदू धर्मात सर्व धर्मांचा सार आहे. आज तर मोठ्या मुश्किलीने हिंदुस्थानचे नाव चालते. मला पुष्कळ लोक म्हणतात की तू मुसलमानांचा मित्र आहेस

म्हणजे तू हिंदूंचा आणि शिखांचा शत्रू आहेस. हे कसे काय? पण इतके खरे की मी १२ वर्षांचा होतो तेव्हापासून मी मुसलमानांचा मित्र आहे. परंतु माझ्या रोमारोमात हिंदुत्व भरलेले आहे. माझ्याकरिता सर्व धर्म एक आहेत. आणि अशाच प्रकारे शेवटच्या श्वासापर्यंत देशाची सेवा करत राहण्याची माझी इच्छा आहे.”

नंतर किती तरी बंधूभगिनींनी प्रश्न विचारले -

हिंदू धर्मात पापीला मारण्याची परवानगी आहे की नाही?

बापू - पापीला मारण्याची परवानगी आहेही आणि नाहीही. पापी माणसाला ओळखू शकत असाल तर मारा. परंतु जो माणूस शुद्ध असेल त्यालाच हा हक्क मिळतो. पापी माणूस पाप्याला कसा मारू शकतो?

प्रश्न - गीतेत भगवान कृष्णाने अर्जुनाला कौरवांना मारण्याकरिता का सांगितले होते?

बापू - हा प्रश्न विचारण्यासारखा नाही. वरच्या उत्तरात याचेही उत्तर मिळू शकेल. असे असले तरी मी म्हणेन की कोणी जर पापी असेल तर सरकार ते प्रकरण हाती घेईल. एकेक माणूस मनमानेल त्याप्रमाणे आपल्या हाती कायदा घेऊ शकत नाही. जर तुम्ही मला सरदार कराल आणि जो कोणी पंचमस्तंभीय असेल त्याला गोळी घालून संपवायचा हुकूम मी देईन. यामुळे आपण कायदा हातात घेऊ नये. जे सांगायचे आहे ते सांगून त्याचे उत्तर आपण सरकारला मागायला पाहिजे. नाही तर सरदार आणि जवाहरलाल कशाकरिता आहेत? ते तर तुमचे मूक सेवक आहेत. जर तुम्ही यांना सरकार चालवू द्याल तर हे चालवू शकतील. यांना पैशाची मुळीच भूक नाही, सेवेची भूक आहे. असे सांगतात की त्यांच्यात मतभेद आहेत. असा खोटा प्रचार कशाकरिता करायचा? हे लोक वर्षांपासून सहकारी आहेत. दोघांचेही एकच ध्येय आहे आणि ते म्हणजे देशसेवा करण्याचे.

९।। ते १ वाजेपर्यंत सतत एकामागून एक मुलाखती सुरू होत्या. त्यात काही मुसलमानबंधूही होते. ३ वाजता बापूजी महाराज्यपालांकडे गेले. आम्ही दोघी बापूंना मोटारीपर्यंत सोडायला गेलो. मी म्हणाले, “बापूजी मलाही एक पट्टा द्या म्हणजे पट्टेवाली म्हणून मला तुमच्याबरोबर येण्याची परवानगी मिळेल.”

बापू म्हणाले, “तू तर आधी मवा म्हणत होतीस की पट्टेवाल्याचा वावर नको. आणि मग आता हे कसे? परंतु तुम्हा दोघींना पाहायला घेऊन जाईन.”

कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या सभेकरिता ४ वाजता बापूजी परत आले. कताई करताकरता बापू लोकांशी गोष्टी करत होते, आणि बापूंनी सर्वांना खरा सेवक होण्याकरिता मरण्याकरिता सांगितले.

६ वाजता नुर्वासितांच्या किंग्जवे छावणीत प्रार्थना करायला गेलो. आधी तर खूप आवाज ऐकू येत होता. तो शांत झाला आणि मग प्रार्थना सुरू झाली. कुराश शरीफ जसे सुरू झाले तसेच लोकांनी आरडाओरडीला सुरुवात केली. “हेच कलम आमच्या आयाबहिणींना बळजबरीने म्हणायला लावले होते. इथे तर आम्ही कोणत्याही हालतीत म्हणू देणार नाही,” “गो बॅक गांधी,” “गांधीजी मुर्दाबाद” अशा घोषणा होऊ लागल्या. त्यांना शांत करण्याकरिता सुचेताबहेनने खूप खूप प्रयत्न केला. अखेरीस ना प्रार्थना पूर्ण झाली ना भाषण झाले. मुश्किलीने बापूजींना मोटारीपर्यंत घेऊन जाता आले. मोटारीवरसुद्धा दगड आले. डॉ. दिनशा महेता तर उडी मारूनच मोठ्या मुश्किलीने गाडीत चढू शकले. मोटारीत बापू म्हणाले, ”मी कबूल केले पाहिजे की आजचे दृश्य मला फार आवडले. माणसाला कुठे तरी आपला क्रोध काढायचे स्थान असायलाच पाहिजे. असे झाले तरच क्रोध हलका होऊ शकतो हे याचे कारण आहे. मला फ्रेंच क्रांतीची आठवण येते. तिथेसुद्धा अशाच प्रकारची हाणामारी झाली होती.”

७।।। वाजता घरी आलो. तिथे सरदार वल्लभभाई आले. त्यांच्याबरोबर एकांतात दोन तास गोष्टी केल्या. ६।। वाजता बापूजी झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१७ सप्टेंबर १९४७, बुधवार

३.३० वाजता प्रार्थना. नंतर रोजप्रमाणे क्रम राहिला. भेटायला येणारात मंत्र्यांमधील जवाहरलालजी, सरदार, मौलानासाहेब आले होते. या सर्वांबरोबर खाजगी चर्चा झाली. ४ वाजेपर्यंत जवळपास दररोजप्रमाणे कार्यक्रम सुरू राहिला.

चार वाजता प्रतिनिधीमंडळ आले. शीख फार चिडलेले होते. "सर्वच म्हणतात की इथे मुसलमान राहतील. परंतु इथे शीख राहतील असे कोणी म्हणतो काय? येथील सरकारही दडपण आणत नाही. तुम्हाला विचारून सरकार चालते. तुम्ही मुसलमानांकरिता इतके सगळे केले, परंतु आमच्याकरिता काय केले? पंजाब गेल्यानंतर इथे टेकण्याकरिता कोणती जागा आहे?"

अशा प्रकारे शीख संतापून मध्येच बोलत असल्यामुळ आधी बापूंनी त्यांना शांतपणे बोलू दिले. या लोकांचा राग हलका केला आणि मग बापूंनी उत्तर दिले,

> "तुम्ही मला मला आधी विचारायला पाहिजे होते की मी सरकारचा 'डिक्टेटर' आहे काय? हे खरे आहे की मंत्री माझे मित्र आहेत. ते इथे येत असतात. तासंतास माझ्याशी गोष्टी करत असतात. परंतु माझ्यावर तुम्ही केलेला आरोप साफ खोटा आहे. मी जे तुम्हांला सांगतो आहे तसे जर झाले असते तर तुमची ही अशी अवस्था झाली नसती जशी आज झाली आहे. मी तर सांगत असतो की माझे चालले असते तर मी सैन्यच काढून घेतले असते. मग आतल्याआत कितीही मुसलमान लढले असते आणि मेले असते तरी मी फिकीर केली नसती. आणि नाही तर त्यांनी एकमेकांचे रक्षण केले असते. शिपायांच्या हाती तर कुदळ आणि पावडे दिले असते आणि सैनिकांना शेतात काम करा असे सांगितले असते. हे माझे स्वप्न आहे. हे काय शीख ऐकायला तयार होतील? ईश्वर नेहमी थोड्याफार इच्छाच पूर्ण करत नसतो

काय? यामुळे मी तर श्रद्धापूर्वक ईश्वराचे नाव घेऊन काम करणारा माणूस आहे. आणि तुम्ही जी एकेकाचा बदला घेण्याची मागणी करत आहा ते सरकारचे काम नाही काय? ” लढायचे असेल तर सरकार लढेल. तुम्ही सरकारला मदत करा. आज तर दोघेही सारखेच आहेत. कोणाला काय म्हणू? मला माहीत आहे की पंजाबमध्ये तुमच्यावर खूप जुलूम झाला आहे. शत्रुत्व करण्याची ही पद्धत आहे काय? मला हे सर्व पाहण्याची इच्छा नव्हती. ईश्वराजवळ माझी हीच प्रार्थना आहे की त्याने मला मी चांगला असतानाच घेऊन जावे आणि सध्या तुमच्याशी मी जे बोलतो आहे ते बोलत असतानाच ईश्वराने जर मला उचलले तर मी आनंदाने चालतो जाईन. अरे या पोरी इथे पडलेल्या आहेत, त्याचे काय होईल असे मला वाटत नाही. इतकी सगळी पत्रे पडली आहेत त्यांचे कायॆ? इतक्याने तुम्हांला समजत असेल तर समजून घ्या, आणि नसेल कळत तर न कळो. माझे कर्तव्य मी पार पाडले आहे.”

बापूजी जवळास अर्धा तास असे धाराप्रवाह बोलले. फार थकले होते. नंतर अंगूर आणि साबूदाण्याची कांजी घेतली. जवळपास ६। वाजता येथीलच कापडगिरणीतील मजुरांकरिता आम्ही प्रार्थना करायला गेलो. अंदाजे हजारेक लोक होते. प्रामख्याने मजुरांची उपस्थिती होती. ध्वनिक्षेपक काम करत नव्हता. आणि आतबाहेर हुल्लड करणारे लोक असल्यामुळे कानावर काहीही पडत नव्हते. परंतु एका पंजाबी माणसाचा आवाज मोठा होता. त्याने नंतर बापूजींचे शब्द परत मोठ्या आवाजात सांगायला सुरुवात केली.

बापूजींनी आधीतर शांततेकरिता विनंती केली आणि नंतर म्हणाले,

“प्रार्थना अंतःकरण स्वच्छ करणाऱ्या झाडूसारखी असते. आणि ती ईश्वराकडे आपला निरोप पोहचवण्याचे एक साधन आहे. ईश्वराची अनेक नावे आहेत. जगात जितकी माणसे आहेत त्यांच्यापेक्षाही ईश्वराची जास्त नावे आहेत. या शक्तीची जर आपल्याला ओळख पटली तर मला खात्री आहे की आपल्याला

कोणतीही गोष्ट कधीही करावी लागणार नाही. मला माहीत आहे की पंजाबींवर दुःखाचा फार मोठा वर्षाव झाला आहे. परंतु आता याचा बदला घेण्याची माणूस जर इच्छा करील तर आपण सर्व खाली आणि अजून खाली पडत जाऊ. १५ ऑगस्टला आपण स्वतंत्र झालो हे जरी खरे असले तरी दुःखाची गोष्ट ही आहे की आपल्या देशाची फाळणी झाली आहे. असे जरी असले तरी आपण आपल्या अंतःकरणांची फाळणी होऊ देऊ नये. हीच गोष्ट मी हिंदू-मुसलमान बंधूंना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. मी तर म्हातारा झालो आहे. माझ्याजवळ तर केवळ ईश्वराचेच शस्त्र आहे, दसरे काहीही नाही. तुमचे मन जर जिकू शकत असेन तर मला जगण्यात रस वाटेल. तुम्हांला असे वाटते की मी मुसलमानांचा मित्र आहे, पण खरी गोष्ट तर ही आहे की मी संपूर्ण जगाचा मित्र आहे, आणि अशा परिस्थितीतच मला मरायचे आहे.

"हे सरकार जर तुम्हाला पसंत नसेल तर तुम्ही हे हटवू शकता, पसंत असेल तर ठेवू शकता. पाकिस्तानमध्ये न्याय मिळाला नाही म्हणून तुम्ही न्याय्य सरकारची मागणी करत आहा. आणि जर ते मिळालेच नाही तर युद्ध हाच मार्ग राहील. पण असा न्याय तर तो मागू शकतो जो स्वतः शुद्ध असेल. दिल्लीमधील जितक्या मुसलमानांची जाण्याची मागणी आहे त्यांना आपण शांततापूर्वक जाऊ दिले पाहिजे. परंतु ज्यांना राहायचे आहे त्यांना आपण आदरपूर्वक राहू दिले पाहिजे. असे केले तरच आपली काही किंमत होईल. दगाफटका हा कोणाचाही नातलग असू शकत नाही. बाकी आपण काही लहान अपराध केलेला नाही. तुम्हांला ही गोष्ट जर फेकून द्यायची असेल तर फेकू शकता. मी तर वैद्याप्रमाणे औषधाची पुडी देत असतो. रोग्याला जर रोगमुक्त व्हायचे असेल तर तो ती घेईल, नाही तर मरेल.

अशाच प्रकारे हा म्हातारा ईश्वराला साक्षी ठेवून तुम्हांला हे सर्व सांगतो आहे. पटत असेल तर मान्य करा. बाकी ईश्वर तुम्हा सर्वांचे भले करो.”.

घरी परतेपर्यंत ८ वाजले होते. डेराइस्माईलखानचे बंधू आलेले होते. हे लोक केव्हापासून बसले होते. तुम्ही आता थकलेले असल्यामुळे यांना उद्या यायला सांगू काय असे मी बापूंना विचारले. परंतु बापू म्हणाले, “मला विचारले तर मी म्हणेन की यांना उद्या यायला कसे सांगता येऊ शकते? हे दुःखी लोक आहेत. आपण जर यांना उद्या यायला सांगू तर हे कसे शक्य आहे? मला तरी हे सहन होऊ शकत नाही.” ते सर्व जवळपास ३० ते ३५ मिनिट बसले होते. बापूजींनी त्यांना आश्वस्त केले आणि ते शांत होऊन परत गेले. बापूंनी ११ वाजेपर्यं कामकाज केले आणि नंतर झोपायची तयारी केली.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१८ सप्टेंबर १९४७, गुरुवार

३.३०ला प्रार्थना. मग बापूजींनी दररोजच्या कामकाजाला सुरुवात केली. संयुक्त प्रांतात कदाचित दंगे होऊ शकतील अशी बातमी भटनागरनी दिली होती. बापू म्हणाले, “संयुक्त प्रांतात जर हुल्लड सुरू झाली तर पटणा वाचणे कठीण आहे. आणि मग तर माझ्या जीवनाचासुद्धा अंतकाळ आला असेच समजायचे. मी तर ईश्वराला प्रार्थना करतो आहे की मला लवकर उचलून घे.”

वर्तमानपत्रात बातमी होती की पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे की हिंदुस्थान सरकारला युद्ध करण्याची इच्छा आहे. ते अटी तोडत आहे, जेव्हा की आम्हांला शांतता हवी आहे, वगैरे. ही बातमी वाचून स्मित करत बापू म्हणाले, “असे आहे! माझी तर परीक्षाच आहे म्हणायचे? सत्य तर तेव्हाच कळेल बाकी आपण काळजी करत का बसायला पाहिजे?”

नंतर फिरणे, मालीश, आघोळ वगैरे नित्यकर्म दररोजप्रमाणे चालले. ३.३० वाजता कॉंग्रेस कार्यकारिणीची एक सभा होती.

लोहिया - “तुम्ही आम्हांला आज्ञा करा, तुम्ही म्हणाल तसे आम्ही करू.”

बापू - “मी आज ऐकले आहे की कॉंग्रेसवाले बोलतात पण काम करत नाहीत. कॉंग्रेसवाले जर लोकांना केवळ भडकवत असतील आणि काम करणार नसतील तर कसे चालेल? पाकिस्तानमध्ये काहीही होवो. एक माणूस वाईट झाला तर सर्वांनी वाईट व्हायला पाहिजे काय? दिल्ली शहराबाहेर खुपच घाण झाली आहे. मृतांचे देह पडलेले आहेत. जर असे असेल तर आम्ही भंगी व्हायला पाहिजे. मला किती तरी अधिकारी म्हणाले की मेरठहून भंग्यांना आणावे लागले आणि

याकरिता त्यांना किती तरी लालूच द्यावी लागली. साफसफाई करायला त्यांना पुराणा किल्ल्यात नेण्यात आले. पण ते घाबरू लागले. म्हणू लागले, “माफ करा, कितीही जरी पैसे मिळाले तरी आमच्याकडून हे काम होऊ शकणार नाही. तुम्ही जर तिथे भंगीकाम करायला गेला असता तर तुम्हांला कोण नाही म्हणू शकले असते. तुम्ही जर पुराणा किल्ल्यात जाऊन भंगी काम केले असते आणि तिथे तुमच्यापैकी कोणाला मारून टाकण्यात आले असते तर मी तर आनंदाने नाचलो असतो. आणि मग मी म्हणालो असतो की आता हिंदुस्थानचे स्वातंत्र्य कायम टिकेल. माझी घडण याहून वेगळ्या प्रकारे झालेली नाही. तुम्ही मला आज्ञा मागायला आला आहा तर मी तर म्हणेन की ‘करो या मरो’ या सूत्राशिवाय दुसरे काहीही माझ्याजवळ सांगण्यासारखे नाही.”

या संपूर्ण चर्चेचा हा सार आहे.

सव्वापाच वाजता आम्ही दर्यागंज भागात मुसलमानांचे जे नुकसान झाले ते पाहायला गेलो. आसफच्या घरात आम्ही एक तास बसलो. आधी तर मुसलमानांनी आम्हांला दिल्ली सोडावी लागत आहे असे म्हणून रडायला सुरुवात केली असता बापूंनी एक लहानसे भाषण केले -

“मी पळणार नाही. परत यावे लागले तरी येईन. कोणत्याही पण माणसाने कोणत्याही परिस्थितीत इथून निघून जावे असे असे मी म्हणणार नाही. रडून काम होणार नाही. रडल्याने जर परिस्थितीत सुधारणा झाली असती तर मी सर्वात आधी रडायला सुरुवात केली असती आणि मग माझ्यामागे सर्व रडू लागले असते. मी असेसुद्धा म्हणू शकत नाही की माझ्या डोळ्यातून कधीसुद्धा टिपूसही निघाले नाही. पण ते निघाले की माझी मलाच लाज वाटू लागते. ज्याने आपली सर्व संपत्ती आणि

जीवसुद्धा ईश्वराला अर्पण केला आहे त्याने रडायचे कशासाठी? त्याला ठेवायचे असेल तर देव ठेवील. पोलीस तुमच्यावर जरी गोळ्या चालवत असले तरीसुद्धा आपण हटणार नाही, मरू. दिल्लीची परिस्थिती सैन्याने सुधरणार नाही. दिल्लीला सुधरायचे असेल तर ती सुधारेल. आणि मी तर इथे पडलेलोच आहे. करेन अथवा मरेन. नोआखाली, कलकत्ता आणि बिहारप्रमाणेच. कलकत्त्यात तर तीन दिवसातच माझा उपवास सुटला. आता जर ते परत भांडतील तर ते माझा खून करतील. परंतु मी विष घेऊन आत्महत्त्या करणार नाही, उपवास करून मरेन. माझ्याजवळ हे एकच शस्त्र आहे.

"एक असा माणूस की जो तुमचा सेवक असल्याचा दावा करतो आहे, ज्याने वीस वर्षे दक्षिण आफ्रिकेत काढली आहेत - जो गेला होता पोट भरायला, आणि तेही एका मेमनच्या सांगण्यावरून - परंतु ईश्वराने त्याच्याकडून वेगळेच काम करवून घेतले. आणि जो स्वतःला कोणाचाही शत्रू समजत नाही, त्याच्या जिभेकडून तुम्हांला दुसरे काहीही ऐकायला मिळू शकत नाही.

"सरकारवाले माझे मित्र आहे, त्यांच्यावर माझा प्रभावही आहे, परंतु मी काही सरकारमध्ये नाही.

"तुमचे म्हणणे आहे की सर्व हिंदू काफीर आहेत. म्हणतात एक आणि करतात दुसरेच. असे असेल तर मी तर तुमच्या हातूनच मरण्याची इच्छा करीन.

"तुमचे म्हणणे आहे की तुम्हांला संघराज्यात राहायचे आहे आणि तुम्ही संघराज्याशी प्रामाणिक असाल. आवश्यकता पडली तर संघराज्यातर्फे लढायलासुद्धा तयार आहा. खुदाची शपथ घेऊन तुम्ही हे सांगत आहा. असे असताना मी तुम्हांला धोकेबाज कसा समजू शकतो? तुमच्यावर मी विश्वास

ठेवायलाच पाहिजे. अशाच प्रकारे तुम्ही संघराज्य सरकारवर विश्वास ठेवायला पाहिजे.

"तुम्ही जर खरोखरच संघराज्याशी निष्ठावंत असाल तर मुसलमानांनी ज्या मुलींना उचलून नेले आहे त्या सर्वांना त्यांनी परत करायला पाहिजे असे तुम्ही तुमच्या निवेदनात जाहीर केले पाहिजे.

"आणि असे केल्याने इस्लामची प्रतिष्ठा वाढेल. पाकिस्तान सरकारचे धोरण प्रतिष्ठापूर्ण राहिलेले नाही, परंतु ते विष काढून टाकण्याचा हाच एक मार्ग आहे. नाही तर जाहीर युद्ध केले पाहिजे. परंतु या मार्गाला मी पाशवीपणा म्हणेन. जग यावर थुंकेल. आणि कोण जिंकेल आणि कोणाच्या हाती सत्ता येईल हे कोणाला माहीत आहे? आणि जितके हिंदू आणि शीख पाकिस्तानमधून पळाले आहेत त्या सर्वांना पाकिस्तानने आदरपूर्वक परत बोलावले पाहिजे. तुमच्या निवेदनात हे सर्व स्पष्ट व्हायला पाहिजे.

"पाकिस्तान झाला तर होऊ दे. परंतु तो शुद्ध व्हायला पाहिजे. आणि जिनासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे मुसलमानांना जितके हक्क आहेत तितकेच मुसलमानेतरांना असले पाहिजे. हे झालेले पाहण्याचीच मला तीव्र इच्छा आहे, असे झाले नाही तर युद्धच होईल. अशा परिस्थितीत जगून मला काय करायचे आहे? आणि तुमच्याजवळ जर शस्त्रे असतील तर ती तुम्ही परत केली पाहिजे. असे केले तर हे मोठे काम झाले असे समजले जाईल."

तिथून सरळ प्रार्थनेकरिता गेले. प्रार्थनेत कुराणाबद्दल एका बंधूने विरोध केला. परंतु बापूजींनी या बंधूंना समजावून सांगितले की –

"हे घर एक खाजगी घर आहे. आणि इथे तर त्यांच्या मनात असेल तसेच होईल. परंतु तुम्ही मला अडवू शकत नाही. कुराणात ईश्वराच्या गुणगानाशिवाय दुसरे काहीही नाही."

अखेरीस या बंधूंची समजूत पटली, आणि इतर अनेकांनीसुद्धा प्रार्थना झालीच पाहिजे असे म्हटले. यामुळे प्रार्थना झाली. भाषणसुद्धा झाले -

"मला इतका काही आनंद होतो आहे की मी तो लपवू शकत नाही. तुम्हांला प्रार्थनेचे महत्त्व कळू शकले. प्रार्थना आत्म्याचे अन्न आहे. आत्म्याला जर त्याचे अन्न मिळाले नाही तर तो दुर्बल होत जाईल. शरीराला जर अन्न मिळाले नाही तर शरीर क्षीण होत जाते आणि अखेरीस ते मरतेसुद्धा. हीच गोष्ट आत्म्यासंबंधी आहे.माझी प्रार्थना तर सर्व धर्मांचा सार आहे."

नंतर 'हे गोविंद, हे गोपाल अब तो जीवन हारे' या भजनासंबंधी बापू म्हणाले -

"जगातील करूण साहित्यातील एक साहित्य (भागवतातील) हे भजन आहे. गजराज बुडू लागला होता. आज आपणसुद्धा बुडत आहो. गज पाणी प्यायला जात होता आणि मगराने त्याला पकडले. गजराजाचे काहीही चालत नव्हते. परंतु जेव्हा त्याचे नाक, कान बुडू लागले तेव्हा त्याने ईश्वराचा धावा सुरू केला. 'हे ईश्वरा आता तरी वाचव,' तेव्हा देव गरुडालासुद्धा विसरला होता. गरुडाला घ्यायला जायचे तर भक्ताचा जीव जातो. अखेरीस ईश्वर स्वतः आला आणि त्याने गजराजाला वाचवले. अशाच प्रकारे आज आपल्याला वेड लागले आहे. समजा की हे सर्व मुसलमानांनी सुरू केले आहे. त्यांनी सुरुवात केलीही असेल, परंतु आता तर आपण ईश्वराची आळवणी करतो आहो की तुझा हिंदुस्थान आता बुडू लागला आहे, आज सरकार बुडते आहे. जवाहर पैसे घेण्याकरिता थोडाच प्रधानमंत्री झाला आहे? पन्नास वर्षांचा

हा माणूस आज म्हातारा दिसू लागला आहे. डोक्यावर वळ्या पडल्या आहेत. हीच गोष्ट सरदारचीही आहे.

“समजा की सर्व मुसलमान वाईट आहेत. परंतु यांच्याप्रमाणे आपण परत घाणेरडे व्हायला पाहिजे काय? गंगेचे पाणी किती निर्मळ आहे? यात घाण आली तर तीच स्वच्छ होऊन जाते. समुद्राच्या किनाऱ्यावर गेलो तर तिथे किती घाण असते? परंतु पाणी पाहिले तर ते निर्मळ असते. आपण समुद्रासारखे निर्मळ झालो पाहिजे.”

यानंतर बापूजींनी आसफअलीच्या घरी मुसलमानांना जे सांगितले होते तेच प्रार्थनेत परत सांगितले. शिपायांना संबोधत ते म्हणाले -

“ज्या शिपायांनी रक्षक व्हायला पाहिजे ते आच भक्षक झाले आहेत. माझी त्यांना विनंती आहे की त्यांनी प्रामाणिकपणे काम करावे. तुम्ही कॅनॉट प्लेसमध्ये लूटमार सुरू केली असल्याचे ऐकतो. हे जर खरे असेल तर ही फार दुःखद गोष्ट आहे. इंग्रजांचा काळ आता विसरून जा, आणि तुम्ही हिंदुस्थानचे शिपाई आहा असे समजा. आणि जितक्या स्त्रिया आहेत तितक्यांना तुम्ही तुमच्या मुलीसारखे समजा. तुमच्या बहिणीप्रमाणे अथवा आईप्रमाणे समजा. वाईटपणात कोणतीही स्पर्धा असू शकत नाही. तुम्ही प्रामाणिक सेवक व्हा इतके तर मी अतिशय विनंतीपूर्वक म्हणेन.”

प्रार्थनेनंतर बापूजी दीडेक तास सुऱ्हावर्दीसाहेबांशी बोलत होते, नंतर जवाहरलाल आले. दोघेही सव्वादहा वाजता गेले. प्रार्थनाप्रवचन पाहून बापूजी सव्वा अकरा वाजता झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१९ सप्टेंबर १९४७

साडेतीन वाजता प्रार्थना इत्यादी नित्यकर्म. सव्वापाच वाजता बापूजी फिरण्याकरिता उठले. आज डॉ. सुशीला नाय्यर वर्ध्याला जाणार आहेत. यामुळे “तुम्हाला कोणाला काही निरोप द्यायचा आहे का?” असे त्यांनी बापूजींना विचारले.

बापू म्हणाले, “मी सर्व काही सोडलेले असल्यामुळे कोणाला काही सांगायची इच्छाही होत नाही आणि आनंदही वाटत नाही. लोकांना मी कुठपर्यंत समजावत बसणार आहे? आता तर मी जे देतो ते स्वाभाविकपणे पचवता येत असेल तर पचवायचे. बाकी मी काय करतो आणि लोक काय करतात यात कोणाचेही भले नाही. मी तर ईश्वराला प्रार्थना करतो आहे की मला आता उचलून घे. फार जगलो. जगण्याचा मोह नाही. ज्याला जे करायचे असेल ते त्याने करावे. . . . प्रत्येकाने आपापल्या पायावर उभे राहायला पाहिजे. माझी आशा पूर्णपणे सोडून दिली पाहिजे.”

बापूजी अतिशय व्यथित अंतःकरणाने बोलत होते. त्यानंतर मालीश आंघोळ इत्यादी. नंतर सुऱ्हावर्दीसाहेबांशी गोष्टी केल्या. या गोष्टी करत असतानासुद्धा बापू म्हणाले, “मी तर रात्री ११ वाजता झोपतो आणि ३.३० वाजता उठतो. तरीही मला ताजेतवाने वाटते. यात ईश्वराचा हात आहे. माझा कोणताही पराक्रम नाही. ईश्वराचे गुणगान करत असतो.”

> सुऱ्हावर्दीसाहेबांनी बापूजींना सूचना केली की, “ज्या वस्तीत अल्पसंख्याक राहतात त्या वस्तीतील अल्पसंख्यांकाना आत्मरक्षणाकरिता शस्त्र दिले पाहिजे आणि कोणी आत्मरक्षणापुरते शस्त्र वापरत असेल तर त्याला वापरू दिले पाहिजे. त्यांची झडती घेण्यात येऊ नये.”
>
> बापू, “अशी सूचना मी कधीही मान्य करू शकत नाही. ‘मायनॉरिटीज’ आत्मरक्षणाकरिता खाजगी पोलीस गोळा करतील. यात किती धोका आहे? त्यांच्या

रक्षणाकरिता सरकार पडलेले आहे. आम्ही रक्षण करू शकत नाही असे जर सरकार कबूल करत असेल तर वाटल्यास असे करता येईल."

सुऱ्हावर्दीसाहेब, "सरकार असे कधीही कबूल करणार नाही."

बापू - "करणार नाही तर कुठे जाईल? त्याला कबूल करावेच लागे. जग त्याला कबूल करायला लावील."

एखाद तास अशी चर्चा चालली. १।। वाजता (सुऱ्हावर्दीसाहेब) गेले. बापूंनी एक अंस गुळ खाल्ला. थोडा टपाल वाचला. अर्धा तास झोपले.

आज मुलाखतींची सुरुवात तीन वाजता झाली. पेशावरचे आणि पंजाबचे किती तरी बांधव रडत होते आणि सांगत होते की "आमच्या आयाबहिणींची अब्रू लुटली जात आहे."

बापू म्हणाले, "तुम्ही तुमच्या डोळ्यांनी ते पाहिले?"

ते बंधू म्हणाले, "हो बापूजी, आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिले."

बापूजी - "तुमच्या आईबहिणीची अब्रू लुटली जात असताना तुम्ही पाहत राहिला आणि आता तुम्ही तुमचा जीव वाचवून माझ्याकडे कोणत्या तोंडाने आला? तुमच्या आईची, मुलीची अब्रू वाचवणे तर तुमचे कर्तव्य होते ना? ते पार पाडता पाडता तुम्ही मरायला पाहिजे होते. एक शीख सव्वा लाखाचा म्हणतात ते कशाकरिता?

"माझे चालले तर तर सर्व बहिणींना मी हेच सांगेन की तुम्ही मरा. पंजाबमधील अनेक बहिणी मेल्या आहेत हे मला माहीत आहे. हिंदुस्थानच्या बहिणीमध्ये जर सतीत्व येईल तर हिंदुस्थानचे भलेच होईल."

५ वाजता आम्ही ताराकुचला, जुनी दिल्ली, दर्यागंजमध्ये गेलो. एका गल्लीत खूप हिंदू गोळा झालेले होते. त्या सर्वांसमोर एक तरूण खूप जोमदार भाषण देत होता. बापूंना

या तरुणाचे भाषण आवडले नाही. या ठिकाणी हिंदू राहत होते आणि मुसलमानांची वस्तीही पुष्कळ होती. तिथे हुल्लडीच्या दरम्यान हिंदूंना खूप सहन करावे लागले होते. तिथे श्रद्धानंदजींच्या काळातील अनाथाश्रम होते. आम्ही तिथे गेलो. मुसलमानांच्या गोळीने एक मुलगा मेला होता आणि घाबरून सर्व पळून गेले होते. आणि मग आम्ही हिंदू-मुसलमान वर्षांपासून जिथे सोबत राहत होते ती तिसरी जागा पाहिली.

प्रार्थनेत या तिन्ही जागांसंबंधी बोलताना बापूजी म्हणाले,

> "आपण इतक्या सीमेपर्यंत जाऊन मूर्खपणा करायला नको. हिंदुस्थानात जर हिंदूंशिवाय कोणीही राहू शकत नसेल आणि पाकिस्तानमध्ये मुसलमानांशिवाय कोणीही राहू शकणार नसेल तर दोन्ही देशांचा अधःपातच होईल. गुरुद्वारा पंजासाहेब आपण दिल्लीत कसा आणणार? आणि जुम्मामशीद कराचीत कसे नेणार? की खोदखाद करून यांना जमीनदोस्त करून टाकायचे? यांचा इतिहास आपल्यापासून सुरू झालेला नाही. माझे तर ईश्वराला एकच मागणे आहे की कमीतकमी मला या गोष्टीचा साक्षीदार करू नकोस. असे होण्यापूर्वी मला उचलून घे."

बापूजींना कराचीला जाण्यासंबंधीत सूचना करत सुऱ्हावर्दीसाहेब म्हणाले, "अंतःकरण स्वच्छ असेल तर सर्व काही कुशलच असेल. परंतु मनात जर किंचितसुद्धा आडपडदा वा संकोच ठेवला तर काहीही होणार नाही. आणि पापात पडाल."

बापूंच्या कामकाजांकडे पाहिले तर ते किती प्रचंड आहे याची जाणीव होते. इतके सगळे काम कोणीही करू शकत नाही. येथील मुसलमानांना बापूंनी तर जिंकूनच टाकले आहे. ते दररोज इथे येतात आणि प्रेमाने सर्व प्रकारच्या गोष्टी करतात. हे लोक सुधारले आणि यांनी अतिशयोक्ती करणे थांबवले तर फार मोठे काम होईल. आणि पाकिस्तानमध्ये

जुलूम होत असल्याचेही हे लोक कबूल करतात. अशा प्रकारे तर बापूंजवळ मिनिटामिनिटाला नवनवीन पाठ मिळत असतो.

रात्री साडेदहा वाजता बापू झोपले. अर्ध्या तासानंतर बापू झोपेत काही बोलत होते. थोड्या वेळात त्यांना जाग आली. विचारल्यानंतर म्हणाले, “मला स्वप्न पडले होते की माझ्या खोलीत हिंदू भरलेले आहेत आणि त्यांतील एका तरुण हिंदूने मला त्रास द्यायला सुरुवात केली. मारायला आला आहे असे वाटत होते. मी राम राम म्हणत होतो आणि त्याची समजूत घालायचा प्रयत्न करत होतो.”

थोडा वेळ मी त्यांचे शरीर दाबले आणि मग ते झोपून गेले. यावरून बापूंच्या मनावर किती मोठे ओझे होते हे दिसून येते.

नवी दिल्ली,

२० सप्टेंबर १९४७, शनिवार

प्रार्थना वगैरे दररोजचे कामकाज चालले. नऊ वाजता जेवत असताना मौलाना लोक (दिल्लीतील स्थायी मुसलमान) आले. यांनी थोडीशी शस्त्रे आणली होती. असे वाटत होते की त्यांनी ती शस्त्रे बापूंना खुश करायला आणली होती! पण बापू फसणारे कुठे होते? या लोकांना त्यांनी स्पष्टपणे सांगितले की "ही तर खेळण्यातील शस्त्रे वाटतात. तुम्हांला जे काही करायचे आहे ते स्वच्छ अंतःकरणाने केले पाहिजे. यातून तर मला तुमचे मलीन मन दिसते आहे. अडगळीच्या खोलीतून मिळालेली दिसतात."

ते बंधू म्हणाले, "बापू तुम्ही इथे आल्याने फार फायदा झाला आहे. आता शांतता आहे."

मी आल्यामुळेच ही शांतता झालेली नाही. तुम्ही जर मला शुद्ध अंतःकरणाने मदत केली असती तर ही अशांतता निर्माण झाली नसती.

त्यानंतर जमनादास द्वारकानाथ १०।। वाजता आले. ४ दिवसांपूर्वी बापूजींनी यांना कराचीला पाठवले होते.

जमनादासभाईना कायदे आझम तर भेटले नाही. प्रकृती चांगली नाही म्हणून भेटू शकत नाही असे पत्र त्यांनी लिहिले आहे. परंतु गझनफरअली खान यांना भेटायला सांगितले. त्यांनी रडत खूप काही गोष्टी केल्या. हिंदू जर इथून गेले तर येथील व्यापार बुडूनच जाईल हे त्यांनी कबूल केले. कापड गिरण्या, तांदुळाचे कारखाने वगैरे त्यांच्या हातात आहेत. जिनासाहेबांना तर व्यापार काय याची काहीही माहितीच नाही. पण एक परिषद भरवणार आहेत. त्यात महात्माजी, जवाहरलाल, सरदार, माऊंटबॅटन वगैरे सर्व असणाार आहेत. लाहोरमध्ये भरेल. आणि शीख वगळता हिंदूंना आम्ही आनंदाने ठेवू.

सिंधमध्ये तर हिंदू-मुसलमान भावाभावासारखे आहेत. तिथे मकराणी हिंदूंना मदत करत आहेत. सिंधमध्ये कठोर पावले उचलणार आहेत. इत्यादी गोष्टी झाल्या.

बापू - या सर्व गोष्टींचे मला आश्चर्य वाटते. शिखांना हिंदूंपासून वेगळे करणे म्हणजे तर नवीन भांडण लावण्यासारखे आहे. आणि हे तर मी मुळीच कबूल करू शकत नाही. आणि जर या लोकांना शांततेची इच्छा आहे तर क्वेट्टा, पंजाब, बलुचिस्तान वगैरेंमध्ये आज जे सुरू आहे ते का सुरू आहे? माझ्या निवेदनातील गोष्टी पाहा. पाऊल उचलले पाहिजे, म्हणजे अंमलात आणले पाहिजे. परंतु यात तुमची परीक्षा आहे. तुमचे हृदय शुद्ध असेल तर बरीच कामे सहजपणे होतील.

त्यानंतर एक नवनियुक्त डी.एस.पी. नियुक्तीत यश मिळाल्यामुळे बापूंचे आशीर्वाद घ्यायला आला. बापू म्हणाले, “हे सुद्धा माझेच काम असल्यामुळे आशीर्वाद असणार आहेतच ना?”

डी.एस.पी. - दोन्ही सरकारांना ‘सर्च’ न करण्याचा निर्णय घेतला आहे. तरी पण पाकिस्तानमध्ये ‘सर्च’ सुरू आहे. आम्ही करत नाही.

बापू - ते न करो. यामुळे ते उघडे पडतील. एकाने चूक केली म्हणून दुसऱ्याने चूक केली पाहिजे काय? आणि मग सर्वच अशा प्रकारे चूक करू लागले तर जगाचा विनाश होऊन जाईल.

त्यानंतर बापूंनी अर्धा तास आराम केला. माती घेतली आणि थोडा टपाल पाहिला. तेवढ्यात परत मुलाखतीकरिता लोकांची येण्याची वेळ झाली.

साडेतीन वाजता कताई करत असताना एक अधिवक्ता . . . आला. तो म्हणाला,

“जोपर्यंत मुसलमान आपली शस्त्रे सोपवणार नाही तोपर्यंत ते इथे राहू शकणार नाही असे तुम्ही जाहीर करा.”

बापू - याचा अर्थ तुम्हाला काहीही माहीत नाही असे दिसते. मी तर कधीचेच हे जाहीर केलेले आहे.

वकील - इथे जे निर्वासित येत आहे तेही मारले जात आहेत असेसुद्धा जाहीर केले पाहिजे.

बापू - ही गोष्ट मी जाहीर करू शकणार नाही. कारण दोन्ही जमाती सारख्याच आहेत. मी तर आधीच सांगितले आहे की जो माणूस हिंदुस्थानशी एकनिष्ठ नाही त्याला 'शूट' करा. पण तुम्हाला असे तर म्हणायचे नाही ना की सर्व मुसलमान वाईट आहेत आणि सर्व हिंदू चांगले आहेत. वा सर्वच गुंड आहेत. अथवा जे गुन्हेगार असल्याचे सिद्ध होत नाही त्यांनासुद्धा मारले पाहिजे? हो, इंग्रजांनी असेसुद्धा केले आहे. परंतु आपल्याला तर आपल्याच भावंडांबरोबर काम करायचे आहे. सुऱ्हावर्दी गुंड आहेत असे सर्व सांगतात. असे असूनही कलकत्त्यात जे झाले ते जर मी एकटा असतो आणि त्यांची मदत मिळाली नसती तर कधीही होऊ शकले नसते. हे लोक जर दारू पीत असतील तर आपणही प्यायला पाहिजे काय? यामुळे एक तर आपण हिंदू धर्म शुद्ध केला पाहिजे वा आपण मेलो पाहिजे. दोनच उपाय आहेत. परंतु आपल्याला जर जशास तसे करायचे असेल तर मग आपणही मुसलमान झाल्यासारखेच होईल. आपण हिंदू धर्माचे रक्षक झालो पाहिजे, भक्षक नाही.आपण जर भक्षक बनणार असू तर निदान मी तरी याचा साक्षी राहणार नाही. मी आधीच मरून जाईन. सर्व हिंदूंचे हृदय शुद्ध असले पाहिजे. इतक्या बहिणींनी विहिरीत उड्या घेतल्या. मला ते आवडले. बिहारमध्ये आपण काही कमी केले नाही. परंतु बिहारी तर साधेभोळे आहेत. त्यांनी कबूल केले. पाकिस्तानमध्ये भयंकर झाले यात काही शंका नाही.

वकील - एखाद्या दिवशी साडेचार कोटी मुसलमान बिघडणार नाहीत काय?

बापू - माझा दृढविश्वास आहे की ते कधीही बिघडणार नाहीत; जे मी म्हणतो ते जर हिंदू करतील तर मुलमान हिंदूंची पूजा करतील.

त्यानंतर ४।। वाजता बन्नूचे लोक आले. त्यांनी आपली करुण परिस्थिती सांगितली आणि म्हणाले की भगवान कृष्णानंतर तुम्हीच आहा. तुम्हीच आम्हाला वाचवू शकता. वगैरे,

बापू - सर्व काही करणे देवाच्या हाती आहे. मी तर केवळ माझे कर्तव्य पार पाडतो आहे. बाकी सर्व प्रयत्न सुरू आहेत इतकेच मी तुम्हांला सांगू शकतो.

४.३५ - सरदार वल्लभभाई आले. त्यांच्याबरोबर १० मिनिट हास्यविनोदात गेले.

बापू म्हणाले सरदार तर जेव्हा मरेल तेव्हाही याचा देह हसता हसताच पडेल. इतक्या दुःखात आणि चिंतेच्या वाचावरणातही हा सुंदर विनोद करून आनंद मिळवतो आणि इतरांनाही हसवतो. हेच याचे वैशिष्ट्य आहे. याचा स्वभाव जर असा नसता तर हा कधीचाच निघून गेला असता.

नंतर जवाहरलालजी आले. ६.४५ वाजता बापूजी प्रार्थनेकरिता गेले. प्रार्थनेत 'हरि तुम हरो जनकी भीर' या भजनासंबंधी म्हणाले की हे भजन केवळ गाण्याकरिताच नाही. ते हृदयात उतरले पाहिजे. मग भीती कशाची? ईश्वर स्वतःच सर्व संकटे दूर करील.

बन्नू आणि पेशावरसंबंधी आज झालेल्या मुलाखतीचा उल्लेख करत म्हणाले -

"तिथे बादशाहखानसारखी माणसे पडलेली आहेत. असे असूनही हिंदुस्थानी स्वतःचे रक्षण करू शकत नाहीत कारण त्यांच्या मनात फार भीती भरलेली आहे. मी तर एकच गोष्ट सांगू शकतो की त्यांनी केवळ ईश्वराच्या आधारावर राहावे.

सर्वांना ही गोष्ट कळू शकत नाही. परंतु तो कशी मदत करील हे कोणालाही माहीत असू शकत नाही. उद्या काय होणार हे कोणाला माहीत? किती काळ जगायचे आहे हे मला कसे कळणार? इतके खरे की आपण सर्व नास्ति - नाशिवंत आहो. अस्ति तर केवळ एकच हस्ती आहे, होती आणि राहील जिने आपल्याला निर्मिले आहे. आणि आपल्यावर जर कधीकाळी संकट आले तर ईश्वर आपले नुकसान होऊ देईल काय? निसर्गाच्या या कलेमागे काही हेतू तर असेलच ना?

"तुम्ही लीगमध्ये असूनही हिंदुस्थानचे शत्रू कसे असू शकता असे पाकिस्तान सरकारला मला विचारायचे आहे.

"खिलाफतच्या वेळी, जालियनवाला बागेच्या वेळी किती ऐक्य होते?.आज शीख-मुसलमान भेटू शकत नाही हे पाहून माझ्या हृदयाचा थरकाप होतो. मी जीवंत आहे तो या तिघांना एक करण्याच्या प्रयत्नाकरिता, नाही तर मी ईश्वराजवळ राहीन. माणसाजवळ रडत बसणार नाही.

"कोण मोठा गुन्हा करतो आणि कोण लहान केला याचा हिशेब मी ठेवत नसतो. माझ्याजवळ मुसलमान येतात, म्हणतात की, आम्हांला तर हिंदुस्थानशी निष्ठावंत राहण्याची इच्छा आहे. हे आपण मान्य केले पाहिजे. आणि नंतर जर त्यांच्या निष्ठेत अंतर आले तर त्यांना गोळी घाला. हा कायदा माझा नाही, जगाचा आहे. "ट्रेटर' आढळला तर हो. ऍमरीचा मुलगा जर्मनीत होता तर त्याला पकडले आणि मारले ना? कारण तो आपल्या स्वतःच्या देशाशी प्रामाणिक नव्हता. खरा धोकेबाज तर तोच असतो जो माझी भाकरी खातो आणि माझा गळा कापतो. परंतु माझा कायदा मात्र एकच आहे. जोपर्यंत एखादा माणूस गुंड असल्याचे सिद्ध होत नाही तोपर्यंत त्याला सभ्य गृहस्थ समजायला पाहिजे.

"दिल्लीतून मुसलमान जात असेल तर आम्ही त्याला सांगायला पाहिजे की आम्ही चुकलो, आता तुम्ही इथेच राहा आणि मी तुमचे रक्षण करीन. ही गोष्ट जर तुमच्या अंतःकरणाला भिडत असेल तर करा. गांधी म्हणतो म्हणून नाही. असे झाले तर माझी खात्री आहे की ईश्वर तुम्हांला मदत करील."

८।। वाजता बापूजी थोडा आराम करायला पडले. आज बापूजींचा संपूर्ण दिवस खूपच कामात गेला. खूपच थकलेले दिसत होते.

बिरला भावन, नवी दिल्ली,

२१ सप्टेंबर १९४७

३.३० वाजतापासून प्रार्थना वगैरेंचा नित्यक्रम चालला. दुपारी एक वाजेपर्यंत कोणीही भेटायला येणारा नव्हता. 'हरिजनबंधू'करिता लेख लिहायला सुरुवात केली. १ वाजता थोडेसे मुसलमान बंधू भेटायला आले. त्यांच्याबरोबर बापूजींनी थोड्याशा गोष्टी केल्या. मुसलमानांना त्यांनी सूचीत केले की 'ज्या लोकांना पाकिस्तानात जायचे असेल त्यांच्याकरिता वेगळी छावणी असेल आणि ज्यांना इथेच राहायचे असेल त्यांच्याकरिता वेगळी.'

बापू - तिसरी छावणी कशाकरिता उघडायची? आपण त्यांचे शत्रू होऊ नये. पाकिस्तान होण्याला माझा विरोधच होता. परंतु काँग्रेसला अनिवार्य कारणांमुळे पडते घ्यावे लागले. परंतु आता तिसरी छावणी उघडून लढाईची सामग्री तयार करू नका. तुम्ही सांगू शकता की ज्यांना जायचे आहे वा भीती वाटते त्या सर्वांनी पुराण्या किल्ल्यात जावे, आम्ही इथेच राहू. तुम्ही अहिंसा शिकला आहा असे ऐकतो. परंतु ही शिकवण खरी नव्हती. आज मी निष्फळ ठरलो आहे आणि त्याचे भोग मी भोगतो आहे. माझ्या मनात खूप विचार येतात. आज सरकार आपले आहे. परंतु सरकारला लाचारी सहन करावी लागते आहे! मी तर शासनाला सांगत असतो की जर प्रजा तुमचे ऐकत नसेल तर सोडून द्या, मग हिंदूस्थान जळून जरी जात असेल तर जळू द्या.

मुसलमान भाई - हे तर ठीक आहे, उद्या वाटल्यास तुम्ही जाहीर वक्तव्य करू नका, परंतु तिसरी छावणी तर झालेलीच आहे. मग राष्ट्रवादी मुसलमानांनाच (खाजगीत) हे का सांगत  नाही?

बापू - मी असे सांगू शकत नाही. माझ्या जीवनाची घडण अशी झालेली नाही. कोणी म्हणतो मी राष्ट्रवादी मुसलमान आहे तर कोणी म्हणतो मी लीगी आहे. परंतु मी कोणाला नावाने ओळखतच नाही. मला तर केवळ काम माहीत असते.

यानंतर अलवरचे मेयो लोक बापूजींकडे आले.

बापू - कुठेही जा, पण तुमच्यावर सर्व नाराज असल्यामुळे अलवरवाल्यांना घ्यायची कोणाचीही इच्छा नसते. तुम्ही पाकिस्तानात जाल तर चांगले होईल. आज तर चोहोकडे वादळ घोंघावत आहे. यातून वाचायला पाहिजे. मला हे स्वातंत्र्य वाटत नाही. इंग्रज गेले इतक्या अर्थाने हे स्वातंत्र्य खरे आहे. पण एक काळ असा होता की जेव्हा हिंदुस्थानात माझे चालत होते. आज नाही चालत. मोहल्ल्यात फिरून जरी सांगितले की जाऊ नका तरी माझे कोणीही ऐकत नाही.

मेयो बंधू - तुम्ही म्हणाल तर आम्ही आजच पाकिस्तानात निघून जाऊ,

बापू - माझ्या तोंडातून तुम्ही हे शब्द कधीही बाहेर काढू शकत नाही. तुम्ही सर्व पळत आहा. परंतु मला काही कळत नसल्यामुळे मी लाचार आहे. दिल्लीत मी काहीही करू शकत नाही. माझे पंख कापले गेले आहेत. आज तर आपले घर फुटले आहे. मी तर करेन अथवा मरेन. अशा अवस्थेत आहे. मी तुम्हांला फार काळ जिवंत दिसण्याची शक्यता नाही.

१२.३०ला राजकुमारीबहेन आल्या. त्यांनी पंजाबची करुण कहाणी सांगितली. आणि पाकिस्तानकडून कोणतीही मदत मिळत नाही असेही त्यांनी सांगितले. बापू म्हणाले, “मी तर आताच मेयोंना जे सांगितले आहे तेच तुला सांगतो आहे. लोक जर तुमचे ऐकायलाच तयार नसतील तर राजीनांमा देऊन टाका. प्रजेला मरायचेच असेल तर ती मरेल, अथवा जे करायचे असेल ते करेल.”

एक वाजता माती घेऊन बापू आराम करायला पडले. परंतु आराम कुठे मिळणार होता? जवाहरलाल आणि मौलाना आले. त्यानंतर राम मनोहर लोहिया आले.

५ पाच वाजता श्री इंदिरा गांधीबहेनबरोबर आम्ही किसनगंज पूल भंगा, लायब्ररी रोड, जुनी दिल्ली येथे गेलो. इथे मुसलमानांची वस्ती जास्त होती. जवळपास ५,००० मुसलमान होते. लायब्ररी रोडवर बापूंच्या बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. बापू वर चढताच सर्वांनी जयजयकाराची घोषणा केली. एक वेळ अशी होती की मुसलमान बापूंना शत्रू समजत होते. तेच मुसलमान आज जयजयकार करून बापूंचे स्वागत करत होते. बापू शत्रूंचे अंतःकरण कसे जिंकायचे हेसुद्धा या प्रसंगातून लक्षात येते. आजच्या वातावरणात चौकीपहाऱ्याशिवाय इतक्या मुसलमानांमध्ये जाऊ शकेल अशी एकाही हिंदूची हिंमत नव्हती. तिथे हा म्हातारा उघड्या छातीने जात होता आणि लोकसुद्धा किती प्रेमाने त्यांचा आदरसत्कार करत होते! यात मुसलमानांचा स्वार्थ असू शकेलही, पण इथे (दिल्लीत) हे लोक अल्पसंख्य असल्यामुळे यांना बापूंनाच शरण यावे लागणार होते. असे जरी असले तरी बापूंचे प्रेमाचे शस्त्र अद्भुतरित्या काम करत होते हे तर मान्य करावेच लागेल.

जात असताना हिंदूंचे एक लहानसे टोळके उभे होते. त्यांच्याकरिता व्यवस्थाच नव्हती. बापूंना ते म्हणाले - गांधीजी मुर्दाबाद. बापूजी हसले... मग बापूजींनी एक लहानसे भाषण केले -

> "जर तुम्ही सर्व शांत राहाल तर मी काही सांगू शकेन. माझ्याबद्दल म्हणतात की मी जगातील एक मोठा माणूस आहे. परंतु मी मोठा माणूस आहे असे मी तरी मानत नाही. मी तर सर्वांपेक्षा लहान माणूस आहे.
>
> "कदाचित मी काही सेवा केली असेल म्हणून आज तुम्ही माझा आवाज ऐकत आहा. जवळपासच हिंदू भाई पडलेले आहेत. माझा जयघोष करत आहात.

पण तो ऐकून मला फार बेकार वाटते. एक काळ होता की सर्व सोबत राहत होते. परंतु आज असे काही झाले आहे की त्यामुळे हिंदू आणि शीख यांच्या अतःकरणात अंतर निर्माण झाले आहे. इथून जायला पाहिजे असे मुसलमानांना वाटते. नुकताच मी पहाडगंज पाहून आलो. एक मोहल्ला खाली करा, दुसरा खाली करा असे सुरू आहे. आशा आहे की परत विश्वास निर्माण होईल. माणूस माणसावर विश्वास ठेवू शकत नाही! मी तर सांगितले आहे की जो ज्या ठिकाणी असेल तिथून त्याने हलू नये.त्यांनी कुठपर्यंत धीर धरावा? धीर धरून तिथेच मरा. हा तर माझा मार्ग आहे. जर इथे कोणी हिंदू भाई असतील तर मी त्यांना विनंतीपूर्वक म्हणेन की अशा प्रकारे प्रत्येकाने कायदा हाती घेतल्याने ना तर हिंदू धर्म वाचेल ना हिंदुस्थान वाचेल. १५ ऑगस्टला आपण स्वतंत्र झालो. दोन्ही समाजाच्या लोकांनी किती सुंदर पद्धतीने स्वातंत्र्य दिवस साजरा केला होता! आणि आता ही लढाई? माझे तर डोकेच काम करत नाही. परंतु एका खुदावर विश्वास ठेवून मी जिवंत आहे. मुसलमान खुदा, खुदा करतात, परंतु खुदाचे काम करत नाहीत. हिंदू गायत्री मंत्र जपतात, रामनाम घेतात, पण ईश्वराचे काम करत नाहीत.

"तुम्ही इथे इतके सर्व पडले आहा. जर कोणी मारेल तर मरा, पण कोणालाही मारू नका. असे केले तर तुमच्याद्वारेच इस्लामचा जयजयकार होईल, पाकिस्तानचा जयजयकार होईल. ही तर मी फारच शौर्याची गोष्ट करतो आहे. हे काही रणांगण नाही की जिथे हारायचे वा हरवायचेच असते. हा तर मग एकच मार्ग आहे. परंतु माझी ही गोष्ट मी मेल्यानंतरच तुम्हांला कळेल. मी तर करेन अथवा मरेन. एक तर दिल्ली आधीसारखी होईल वा मी इथेच मरेन. जर दिल्लीत सुधारणा घडवून आणू शकलो नाही तर हिंदुस्थानलाही वाचवू शकणार नाही. जे शहर वर्षांपासून राजधानी म्हणून परिपक्व झाले आज त्याची ही दिवाळखोरी?

"ज्या कोणाला पाकिस्तानमध्ये जायचे असेल तो खुशीने जाऊ शकतो. खुदा तुम्हाला खुश ठेवो. पण घाबरून जर जाणार असाल तर मला तरी ते सहन होणार नाही. जे आहेत त्यांनी छावणीत राहावे. हिंदू-मुसलमानांची अंतःकरणे स्वच्छ होतील अशी आशा आहे. आणि मग सर्व आपापल्या घरी जाऊ शकतील. मी गरीब बिचारा माणूस काय करू शकतो? खुदा तुम्हाला मरण्याचे शौर्य देवो.

"घरे, दुकाने जळत आहेत हे मला माहीत आहे. परंतु किती तरी तर बंद पडलेलीच आहेत. आणि तरीही मी एकच गोष्ट सांगेन - तुम्ही जायला नको.

"तुमच्याजवळ शस्त्रे आहेत अशा तक्रारी आहेत. परंतु तुम्ही लक्षात ठेवा की शस्त्रांनी कोणीही वाचू शकले नाही. वाचू शकणारही नाही. अखेरीस सर्वांना वाचवणारा खुदाच तर आहे.

"रिकाम्या घरात कोणीही घुसू शकत नाही. शासनाबरोबरही मी हीच गोष्ट करतो आहे."

तिथून सरळ बिरलाभवनमधील प्रार्थनेच्या ठिकाणीच गेले. तिथे एका भावाने प्रार्थनेत विघ्न आणले. यामुळे प्रार्थना होऊ शकली नाही, परंतु प्रवचन झाले -

"आधी तर एका भावाने तक्रार केली होती. त्याचा मी आभारी आहे. त्याने त्याच्या अंतःकरणातील गोष्ट सांगितली. त्याने जर तक्रारीकरिता तक्रार केली असेल तर मी लाचार आहे. परंतु माझा धर्म कोणालाही दुःखी करण्याची इच्छा न करणे आहे. पण यातून एक वस्तुपाठही शिकायला मिळतो. सेवा करू इच्छिणाऱ्या माणसात खूप सहिष्णुता असली पाहिजे.

"आज मी इंदिराबहेनबरोबर मुसलमानांमध्ये गेलो होतो. तिथे 'महात्मा गांधी जिंदाबाद' अशा घोषणाही झाल्या. परंतु हा जयघोष करणारांना माहीत नाही की

आजचा प्रसंग जयघोष करण्याचा नाही. यामुळे मी जिवंतसुद्धा राहणार नाही. आपण सोबत राहणारी भावंडे आता सोबत राहू शकत नाही. शक्य असेल तोपर्यंत एक माणूस याकरिता प्रयत्न करतो आहे; यात जर मला यश मिळाले नाही तर मी जिवंत राहणार नाही. परंतु मी काही आत्महत्या करून मरणार नाही. जो सेवेकरिताच जिवंत आहे त्याला वेगळे कोणते फळ पाहिजे? फळाकरिता मी मरणार आहे काय? यामुळे गीतामातेने म्हटल्याप्रमाणे फलाशाविरहित सेवा करतो आहे. हिंदू धर्माप्रमाणे जन्मानंतर जन्म होत असतो. आत्मा कधीही मरत नसतो. यामुळे या जन्मात जरी मी निष्फळ ठरलो तरी पुढील जन्मात मी काम करीन. यामुळे मी मेलो तर माझ्या कामाचे काय होईल याची मी काळजी करत नसतो.

"मुसलमानभाईसुद्धा 'महात्मा गांधी जिंदाबाद' म्हणाले. कोणीही जर असे म्हणत असेल, परंतु त्याचे अंतःकरण वेगळाच काही विचार करत असेल तर त्याचा आवाज मला कठोर वाटेल. मी तर या लोकांनाही असेच म्हणत असतो की ज्यांना जायचे असेल त्यांनी जावे. परंतु मारण्याच्या भीतीमुळे जर कोणी जात असेल तर त्याला जाऊ द्या, आणि मरत असेल तर मरू द्या. तुमच्या भावाच्या हातूनच मराल ना? सैन्याचे वा पोलिसांचे रक्षण कशाकरिता पाहिजे?

"सरकारने काय केले पाहिजे याचा आपण विचार करू नये. ते सरकारवर सोडून दिले पाहिजे. हिंदुस्थानात एकही मुसलमान राहू नये असे जर आपण म्हणणार असू तर हिंदू धर्म बुडवू, आणि परिणामी जग आपल्यावर थुकेल."

आजची प्रार्थना साडेआठ वाजताच्या आत झाली. प्रार्थनेत आमच्याकडून आज भयंकर चूक झाली. अनेक ठिकाणी असे झाल्यामुळे भजन बेसूर झाले आणि आमचे हसे झाले. रामधून तर मोठ्या मुश्किलीने झाली. मीराबहेन प्रार्थनेत होत्या. प्रार्थनेनंतर

मीराबहेनने गोष्टी केल्या. सायंकाळी मी बापूंना माफी मागायला गेले (आभाबहेनने लेखी माफी मागितली.). परंतु बापूंचे मौन असल्यामुळे त्यांनी मला पुढीलप्रमाणे लिहून दिले -

> "माझे डोळे मिटलेले होते, परंतु मला इतक्या वेदना होत होत्या की मी रडतो आहे असे मला वाटले....भजन हा गाण्याचा सराव नसतो. त्याने आपल्याला ईश्वराशी तादात्म्य पावता आले पाहिजे. ही तर ईश्वराची चेष्टा केल्याप्रमाणे होईल. आभा आणि तुझा ईश्वरावर विश्वास नसेल तर प्रार्थना न करणे बरे. मी तुम्हा दोघींवर विसंबून असतो आणि तुम्ही पैसे घेऊन गाण्याकरिता आल्यासारख्या असाल तर ते मला मारून टाकल्याप्रमाणे होईल. तुमच्याकडून ही माझी किमान अपेक्षा होती. तुमच्यांतील लहानसा दोषसुद्धा मला पर्वताइतका मोठा दिसतो. तुमच्यात किंचितही दोष असला तरी मी तो सहन करू शकणार नाही."

वरीलप्रमाणे बापूजी जसजसे ते लिहीत चालले होते तसतसे मी वाचत चालले होते आणि तसतशी मी अधिकाधिक दुःखी होत चालले होते. डोळ्यांमधून अश्रूधारा लागल्या होत्या. ८.३० वाजता बापूजी फिरायला जाण्याकरिता उठले. माझ्या खांद्यावर त्यांचा हात होता. मला फारच दुःख होत होते. बापूजींना आज मी किती दुखवले होते? मी बापूजींच्या लायक नाही. मग मी बापूजींना सोडून जाणे श्रेयस्कर होणार नाही काय? असे किती तरी विचार मनात आले.

आभाबहेनचीसुद्धा माझ्यासारखीच परिस्थिती होती. त्यांनीसुद्धा लेखी माफी मागितलेलीच होती.

१० वाजता बापूजी झोपले. विचारांमुळे रात्रभर मला डोळा लागत नाही तोच जाग येत होती. अखेरीस मुश्किलीने पहाटे पहाटे झोपले. आज जितकी भयंकर रात्र काढली तितकी कधीही काढली नव्हती.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२२ सप्टेंबर १९४७

३ वाजता प्रार्थनेकरिता उठले. बाचा दिवस असल्यामुळे गीतापारायण होते. दीड तासात ते पूर्ण झाले. अजून हृदयातील कालचे दुःख शमले नव्हते. बापूजी रोजच्या कामकाजात गुंतले. फेऱ्यासुद्धा एकट्या एकट्यानेच मारल्या. शेवटी पाय धूत असताना बापूजींना मी विचारले, "अजूनही तुम्ही नाराज आहा काय?" बापूंनी मान वळवली. पण यातून मला काहीही कळले नाही. मालीशकरिता मला बोलावले, पण त्या वेळी मी काही कामात होते. मला कळले की बापू मला बोलावत होते. मी बापूंजवळ जेव्हा गेले तेव्हा त्यांचा डोळा लागला होता. मग मी कागदाच्या एका तुकड्यावर बापूंना चिठ्ठी लिहिली -

"तुमच्याजवळ आले होते, पण तेव्हा तुमचा डोळा लागलेला होता. तुम्ही मला किती तरी उंच चढवण्याचा प्रयत्न केला, परंतु मी निष्फळ ठरले. तुम्ही लिहिले की 'भाडोत्री गाणाऱ्याप्रमाणे तुम्ही गाल तर मला मारून टाकण्यासारखेच होईल.' मी स्वतःहोऊन भाडोत्रीसारखी वागले. मी माझ्यावर नियंत्रण ठेवू शकले नाही. आता अजीजी करत एकच मागणी करते की तुमचे दुःख हलके होईल असा कोणता तरी उपाय मला सांगा. यानंतर मी सावध राहण्याकरिता पूर्ण मेहनत करीनच, परंतु आजच्या तुमच्या दुःखावर उपाय काय? तुमचे दुःख अंशतः तरी कमी करण्याची ईश्वराने मला शक्ति द्यावी, आणि तुम्ही जी कोणती शिक्षा कराल ती मी सहन करीन. अधिक लिहवत नाही. इतकेच.

तुमच्या मनुडीचे प्रणाम"

[बापूंनी आपल्या चिठ्ठीत लिहिले होते –

"तू मला प्रश्न विचारलास परंतु उत्तराकरिता वाट पाहिली नाही. मी तुला बोलावले होते. नाद सोडला. मला कळू शकले नाही. मी नाराज नाही, पण दुःखी आहे. तुला माझे दुःख कळू शकत नसेल तर मी लाचार आहे."]

मग मला बापूंनी लहानशा चिठ्ठीत लिहिले -

"चि. मनूडी

तुला माझे दुःख दूर करायचे असेल तर दोन मार्ग आहेत. एक कबुली लिहून काढणे व ती आजच सर्वांसमोर वाचणे. दुसरा तुझे जीवन ईश्वराशी एकाकार करणे. असे झाले की छचोरपणाचे हसू येणारच नाही . . . जाहीर प्रार्थनेत तुझी कबुली वाच. त्यामुळे अंतःकरण स्वच्छ होईल. कबुली बळजबरीची असू नये, लाज वाटल्यामुळे तसे करण्यात येऊ नये. जाहीर कबुली हा माझा स्वतःचा शोध आहे . . . ला याचे महत्त्व कळू शकत नाही. हा माझा सल्ला आहे. तुझ्या निर्धाराला प्रामाणिकपणे चिकटून राहा. असे होईल तेव्हाच तू प्रगतीपथावर जाशील."

नंतर बापूंनी आपल्या हाताने मला मसुद्याची चिठ्ठी दिली. मी ती चिठ्ठी ठेवली. कोण वाचतो? माझे काम झाले होते. प्रार्थनेत मी ती थरथरत वाचली. प्रार्थनेआधीच बापूंनी ती मला वाचायला सांगितली होती. त्यानंतर प्रार्थना झाली.

रात्री मौन सुटल्यानंतर पाय दाबत असताना बापू म्हणाले, "तुझ्या बोलण्यात जोम नव्हता हे माझ्या लक्षात आले."

मी म्हणाले, "हो, मी खूप उदास झाले होते."

बापू म्हणाले, "मला तुझी परिस्थिती कळू शकत होती. यातून तू असा तर अर्थ काढत नाहीस ना की मी कशातही खुसपट काढत असतो? तू असा समज करून घेऊ नकोस. पण तू इतके बोलू शकलीस मला इतके समजून घेऊ शकलीस याचा अर्थ तू

तुझ्या जीवनात पुढे जाऊ शकशील. अजून तुझ्यात बालबुद्धी आहे. तू गंभीर होणे शिकायला पाहिजे.“

नंतर ब्रिजकिशोरजी म्हणाले, “ही गोष्ट जर प्रकाशित झाली नसेल तर ती पाठवायला पाहिजे.” वर्तमानपत्रवाले म्हणतात, “अशा लहानसहान गोष्टी काय छापायच्या?” परंतु बापूजींचे त्यामुळे समाधान होत नव्हते. यामुळे ही गोष्ट वर्तमानपत्रांमध्येही आली आणि ‘हरिजन;मध्येही. तेव्हा कुठे बापूंना शांत वाटले. असा दिवस परत कधीही दाखवू नकोस अशी मी ईश्वराला प्रार्थना केली. प्रायश्चित्त जाहीर झाल्यानंतर कुठे बापूंचे बरेचसे दुःख हलके झाले.

आज तर बापूजींचा संपूर्ण दिवस मौनातच गेला. यामुळे मुलाखतीकरिता येणारेही विशेष कोणी नव्हते. परंतु मला तर जीवनातील सुंदर वस्तुपाठ मिळाला. आणि ईश्वराची कृपा की बापूजींनी दुसरे कोणतेही पाऊल उचलले नाही. नाही तर इतरांच्या चुकीकरिता बापूजी स्वतः वाटेल ते भयंकर पाऊल उचलायला मागेपुढे पाहत नसतात. माझ्या मनात हीच धास्ती होती.

बापूंनी मसुद्याची जी लहानशी चिठ्ठीची घडी दिली ती अशी होती -

> “कालच्या प्रार्थनेच्या वेळी आम्हा दोन मुलींकडून गंभीर चूक झाली. आमचे अंतःकरण स्वच्छ करण्याकरिता तुम्हा सर्वांसमोर आम्ही कबुली देत आहो. आमचा जेव्हा सूर चुकला तेव्हा आम्हांला एकदम हसू फुटले. ते आम्ही आवरू शकलो नाही ही आमची चूक झाली. आम्हांला माहीत होते की असे करणे चूक होते परंतु आम्ही स्वतःला आवरू शकलो नाही. यातून आम्ही प्रार्थनेत मग्न झालो नव्हतो असे दिसून येते. अशा प्रकारे आम्ही आमच्या निर्मात्याचा अपमान केला आहे. बापू आम्हांला नेहमी सांगत असतात की प्रार्थनेचा तेव्हाच प्रभाव पडत असतो जेव्हा प्रार्थना करत असताना आपण ईश्वराचा विचार करत असतो. आम्हांला माहीत आहे की बांपूंचे

डोळे जरी बंद होते तरी आम्ही हसलो हे त्यांना कळेल व यामुळे ते दुखावतील आणि अजूनही ते दुखावलेले आहेत. आम्हांला आशा आहे की आमच्या या जाहीर कबुलीमुळे ते दुःख काहीसे कमी होईल. आमच्या भविष्यातील वर्तनामुळेच ते दुःख पूर्णपणे शमू शकेल. ईश्वराने आम्हाला सदैव पवित्र ठेवावे असा तुम्ही आम्हांला आशीर्वाद द्यावा अशी तुम्हा सर्वांना आमची विनवणी आहे.”

नवी दिल्ली,

२३ सप्टेंबर १९४७, मंगळवार

रोजप्रमाणे साडेतीन वाजतापासून प्रार्थना वगैरेंचा क्रम चालला. बापूजींचे (लिहिण्याचे) काम वाढत चाललेले असल्यामुळे प्रार्थनेनंतर ते आधी पडवीजवळील खोलीत गेले. तेव्हा ते म्हणाले, “कालच्या माफीपत्रातून तुला किती सुंदर पाठ मिळाला याचा विचार कर. आता तर माझी खात्री आहे की यापुढे तू अशी चूक कधीही करणार नाही. माणूस चुका तर करत असतोच. परंतु तो जर त्यात सुधारणा करत गेला तर तशी चूक तो परत कधीही करू शकणार नाही. मी स्वतःच सोन्याचे कडे चोरले होते ना? परंतु मला ते खुपले आणि त्याबद्दल मी माझ्या बापाजवळ माफी मागितली होती. तेव्हाच माझे दुःख हलके झाले होते. यामुळे तू (जर तू अंतःकरणापासून माफी मागितली असेल तर) याचे दुःख आठवत बसून रडू नकोस. उलट यावर विचारमंथन कर आणि शिकशील तर खूप पुढे जाशील.”

इतके बोलून बापूजी लिहिण्याच्या कामाला भिडले. गरम पाणी आणि मध घेतले आणि थोडे आडवे पडत नाही तोच सहा वाजले. फिरायला उठले. फिरल्यानंतर मालीश, आंघोळ वगैरे. ८ वाजले. ८ वाजता जवाहरलालजी, सरदार आणि मौलानासाहेब आले. ११ वाजेपर्यंत गोष्टी करत होते. नंतर घनश्यादासजी बिरला आले. त्यांच्याबरोबर बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी झाल्या.

१२.३० वाजता माती घेऊन थोडे आडवे झाले. १ वाजता माती काढली.आज मुलाखतकार कमी होते. रावळपिंडीहून थोडेसे लोक आले होते. या लोकांनासुद्धा बापूजींनी एकच गोष्ट सांगितली. “गुंड राहिले तरच देश बुडेल, हिंदुस्थान बुडेल. परंतु आपण सज्जन होणे ही गोष्ट फार चांगली आहे.”

२ वाजता आचार्य कृपलानीजी आले. सिंधच्या भयंकर अवस्थेची हकिगत त्यांनी सांगितली. जीनासाहेबांबरोबर चर्चा झाली तर ते म्हणाले, ''आणि चांगलेच आहे. वर्तमानपत्रातील बातम्या खोट्या आहेत." अशा माणसाला काय सांगायचे? सुचेताबहेनसुद्धा असेच म्हणाल्या होत्या. बापूजी सर्व काही ऐकून घेत होते.

आजच्या वर्तमानपत्रात कालच्या आमच्या माफीबद्दल काहीही आले नव्हते. यामुळे बापूजींनी पुढीलप्रमाणे जाहीर केले -

> "काल मनू आणि आभाने जे माफीपत्र वाचून ऐकवले होते ते तुमच्यापैकी अनेकांनी ऐकले असेल. रविवारच्या सायंकाळच्या प्रार्थनेत या दोघीही भजन गात होत्या. तसे करत असताना या दोघींचाही सूर बेसूर झाला आणि त्यामुळे या दोघींनाही आलेले हसू आवरता येणे शक्य झाले नाही. यामुळे मी खोलवर दुखावलो. नंतर या दोघींनीही आपल्या या चुकीकरिता माझी माफी मागितली होती. खरे म्हणजे मला यांचा राग आलेला नसल्यामुळे यांनी माझी माफी मागण्याची काहीही आवश्यकता नव्हती. प्रार्थना ही काय गोष्ट आहे हे यांना अजून कळले नाही याबद्दल मात्र मला राग आला होता. या दोघींनीही माफी मागितली. पश्चात्तापही व्यक्त केला. यामुळे मला होणारे दु)ख थोडे कमी झाले. मी त्यांना जाहीर माफी मागायचे सुचवले. दोघींनीही आनंदाने माझा सल्ला मान्य केला. माझी अशी मान्यता आहे की जर आपली चूक अंतःकरणापासून कळली असेल तर त्याची जाहीर कबुली दिल्याने चूक करणारा शुद्ध होतो आणि चूक करणारा ती चूक परत करत नाही. तो 'चौकन्ना' होतो म्हणजे सावध राहतो आणि परत ती चूक करत नाही. आणि या गोष्टीची समाजासमोर माफी मागितली तर प्रार्थना किती महान गोष्ट आहे याची समाजालाही जाणीव होईल. या लहान पोरी प्रार्थना करतात तर तुम्ही म्हणता की यांनी कुराण वाचण्याची आवश्यकता काय? अहो, मुसलमानांनी शिखांना

मारले तर त्यात कुराणचा दोष काय? त्यामुळे कुराण थोडाच गुन्हेगार ठरतो. एखादा ईश्वरभक्त असेल आणि नंतर जर का तो पापी झाला तर त्याकरिता आपण काय ईश्वराला दोष देऊ?

"आज कार्यकारिणी होती. यामुळे कुठे बाहेर तर जाऊ शकलो नाही. परंतु रावळपिंडीहून काही थोडेसे लोक आले होते. पिंडीत तर हिंदू, शीख यांच्यावर हल्ले होत आहेत. जुम्मामस्जिद, ताजमहाल बादशाहांनी बनवले तर हे सर्व काय आता भस्मिभूत करून टाकायचे?

"तुम्ही सर्व जर इथे शांत झाला तर मला पाकिस्तानमध्ये जायचे आहे. मी जाण्याकरिता लाहोरच्या वा कराचीच्या पोलिसांची मदत मागायला जाणार नाही. मी तर त्यांना एकच पाठ शिकवीन - मरा, परंतु आपले घर सोडू नका.कोणाच्याही ताब्यात जाऊ नका. भक्त ध्रुवने काय केले? किती लहान बाळ ! बाकी तर एकेक माणूससुद्धा या दावानलात शक्य तितका प्रयत्न करतोच आहे."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरायला गेले. राजकुमारी बहेन आलेल्या आहेत. फिरून आल्यानंतर प्रवचनात सुधारणा केल्या आणि पंडितजींबरोबर एक तास गोष्टी करून १० वाजता झोपी गेले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२४ सप्टेंबर १९४७, मंगळवार

३.३० वाजता रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर थोडा टपाल ऐकला, गरम पाणी आणि मध घतले आणि दररोजप्रमाणे थोडा आराम केला. फिरत असताना लवकर उठण्यासंबंधी गोष्ट निघाली. बापू म्हणाले, “मी जर ३.३० वाजता उठू शकलो नाही तर मी माझे काम उरकवू शकणार नाही. एकेकाळी दिल्लीत इतकी कडाडून थंडी पडली होती की माझ्या अंगठ्याचे बोट काळे पडले होते. डॉ. अनसारींना तर हे बोट कापावेच लागेल असे वाटत होते. फळे, फुलेसुद्धा वाळून गेली होती. असे असूनही मी तर बरोबर चार वाजता उठलो आणि माझे काम केले. दक्षिण आफ्रित तर आम्ही छावणीत राहत होतो. फाईली मोठ्या होत्या. परंतु व्यवस्था इतकी सुंदर होती की प्रत्येकजण आपापले काम करत होता. त्या वेळी एकदा तर थंडीने मी इतका काही गारठलो होतो की मला स्ट्रेचरवर नेऊन एका शेगडीजवळ ठेवले. तेव्हा कुठे माझ्यात जीव आला.”

मालीश, आंघोळीनंतर ८ वाजता प्रफुल्ल घोषबरोबर खाजगी चर्चा केली. ९.५०ला होरॅस अलेक्झँडर आणि इतर काही बंधू आले. नंतर थोडा आराम केला तर दहा मिनिटातच जामसाहेब आले. त्यांनी काठेवाडच्या गोष्टी केल्या. सर्व रियासतींनी एक होण्याची गोष्ट काढली.

बापू - काठेवाडवर जर युद्ध आले तर मी तरी सर्व राजांचाच वकूब पाहीन.

जामसाहेब - पण आमच्या हातात शस्त्र कुठे आहेत. १५ तारखेपूर्वी तर आम्ही सावत्रासारखे होतो ना? (हसाहस)

बापू - राज्यकर्त्यांबरोबर प्रजा असेल तर एकटा जुनागढ (पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा नबाबच्या निर्णयाचा इथे संदर्भ आहे. अखेरीस हे संस्थान भारतात सामील झाले.) काय करू शकतो? आपल्या प्रजेबरोबर विश्वस्त म्हणून काम

करायचे असे एक संस्थानिक जरी ठरवेल तरी तो यावच्चंद्रदिवाकरौ राज्य करू शकेल. संस्थानिक सहजपणे आपली सहमती असल्याचे सांगतात परंतु ते तसे अंतःकरणापासून करतील की नाही याबद्दल मला संशय आहे. तुम्ही जर तुमच्या प्रजेचे अंतःकरण जिंकू शकाल तर खात्री बाळगा की जुनागढ तुमच्याबरोबर राहील. माणूस जर शुद्ध असेल तर त्याच्याजवळ लपवण्यासारखे काहीही नसते. भारतात संस्थानिक हा सर्वांत दुर्बल भाग आहे. परंतु सरदारांचे कौशल्य नसते तर सर्व संस्थानिकांना आत आणता आले नसते. ते काहीही असले तरी काठेवाडच्या सर्व संस्थानिकांमध्ये एकी असली पाहिजे. यामुळे इतक्या वर्षांपासून मी काठेवाडच्या ऐक्याबद्दल बोलत असतो. काठेवाडमधील रेल्वेची वाईट अवस्था आहे. भावनगर, जामनगर, मोरवी, पोरबंदर या सर्वांची स्वतंत्र रेल्वे आहे. तिसऱ्या वर्गात तिथे दिवेसुद्धा नाहीत. यामुळे या रेल्वेला बाबूंची गाडी असे म्हणतात. (काठेवाडच्या सत्ताधाऱ्यांना बाबू असे म्हणतात) मी जेव्हा श्यामलदास कॉलेजमध्ये विद्यार्थी होतो तेव्हाही अशीच परिस्थिती होती. हे केवळ एक उदाहरण आहे. जर तिथे एक प्रशासन असेल, एक चलन असेल आणि लोकांमध्ये जर ऐक्य असेल तर सरदार नाही म्हणणार नाहीत. काठेवाडमध्ये भरपूर क्षमता आहे.

अखेरीस निर्वासितांमुळे वातावरणात तणाव निर्माण झाल्यासंबंधी जामसाहेब बोलू लागले. परंतु एकूण शांतता राखता आली. उठता उठता बापू म्हणाले, "मी म्हणालो होतो त्याची आठवण ठेवा."

जामसाहेब - मी वचन देतो की मला वा माझ्या रियासतीला फायदा होवो की तोटा, आमच्याकरिता जे धोरण ठरेल तेच मी स्वीकारीन.

दुपारी ३ ते ५ कार्यकारिणी चालली. कार्यकारिणीतच बापूजींनी दूध, फळे वगैरे घेतली. आणि नंतर ते प्रार्थनेकरिता गेले.

प्रार्थनेत भजनाचा उल्लेख करत ते म्हणाले -

"आपल्या हिंदुस्थानची नावसुद्धा एक तुटलेली लहानशी होडी आहे. आणि ईश्वराला माझी प्रार्थना आहे की तू तिला पलीकडे पोहोचव. आज 'लडके लिया पाकिस्तान' ही घोषणा पसरवून सांप्रदायिक वैरभाव वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. लढून पाकिस्तान घेतला असे कोण म्हणतो? कॉंग्रसने शुद्धीवर असताना होकार दिला म्हणून पाकिस्तान झाला. आपला लढा निःशस्त्र होता. मुसलमानांना असे वाटले की आता आपले राज्य झाले आहे, कापा, मारा. मग शिखांनी आणि हिंदूंनी बदला घेतला. किती तरी सिंधी सिंधमधून पळाले आहेत. मला जर कोणी कलमा वाचायला लावले तर मी तर काहीही जरी झाले तरी तो वाचणार नाही. कोणी जर म्हणाले की अल फतेहा वाच, नाहीतर मारून टाकेन, तर मी म्हणेन की मारून टाक. माझी हाडे जरी मूठभर असतील तरी माझे हृदय विशाल आहे."

त्यानंतर जुनागढची माहिती सांगत ते म्हणाले,

"जुनागढमध्ये प्रजा हिंदू आहे. शिवाय तिची हिंदुस्थानमध्येच सामील व्हायची इच्छा आहे. मग प्रजेवर बळजबरी करून तिला पाकिस्तानमध्ये कसे नेता येईल?" हं, प्रजा जर म्हणेल की आम्हांला पाकिस्तानमध्ये जायचे आहे तर ते खुशीने जाऊ शकतात. नाही तर १५ ऑगस्टपासून प्रजा स्वतंत्र आहेच. इंग्रजांचीच सत्ता होती ना? पण ही गोष्ट तर आगीतून निघून चुलीत पडल्यासारखी वा एकाच्या हातून सुटून दुसऱ्याच्या हाती पडण्यासारखी होईल! आणि आज जर आपण लढू

तर जगातील इतर शक्ती आपल्याला परत खाऊन टाकतील. मी तर हेच सांगता सांगता मरेन.

“आपण बदला घ्यायची गोष्ट सोडून द्यायला पाहिजे. कोणी मुसलमान जर कृतघ्न निघत असेल तर सरकारला सांगा. सरकार शिक्षा करील.”

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. फिरून राम मनोहर लोहियांसोबत चर्चा केली. सरदारबरोबर चर्चा. प्रवचन तपासले आणि 10 वाजता बापूजी अंथरुणात पडले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२५ सप्टेंबर १९४७, बुधवार

दररोजप्रमाणे बापूजी साडेतीन वाजता उठले. बापूजींना खूपच सर्दी झालेली आहे. तरीही त्यांनी आपल्या दररोजच्या कार्यक्रमात ढील दिलेली नाही. फिरणे, मालीश, आंघोळ वगैरे सर्व साडेआठ वाजतापासून चालले. फिरत असतानासुद्धा एखादा भेटायला येणार नसेल तर बापूजी वर्तमानपत्रे ऐकतात. मालीशच्या वेळी वृत्तपत्रे ऐकतात. बंगाली पाठ केला - आम्ही काहीही सोडले नाही.

सव्वा आठ वाजता स्थानिक मुसलमान आले. त्यानी सोबत जंगलेली दोन शस्त्रे आणली होती. बापूजी म्हणाले, ”छापा मारला तेव्हा तर मुसलमानांजवळ स्टेनगन निघाली हे कसे?”

मौलाना म्हणाले, “आम्ही खात्रीपूर्वक सांगतो की ती शस्त्रे हिंदूच्या आणि मुसलमानांच्या रिकाम्या घरात सापडली असतील. पोलीस अगदी खोटे खोटे रिपोर्ट देतात.”

बापूजी म्हणाले, “एकीकडे तुम्ही असे म्हणता दुसरीकडून वेगळीच गोष्ट कळते. मला तर नवल वाटते. पण तुम्ही मला लिहून द्या.”

सव्वा दहा वाजता कृपलानीजी आले. बापूंनी त्यांच्याजवळ आपल्या हृदयातील व्यथा व्यक्त केल्या. कार्यकारिणीच्या सभेसाठी एक दिवसाकरिता प्रफुल्लबाबू आले होते. यामुळे बापूजी दुःखी झाले. म्हणाले -

> “माझा स्पष्ट सल्ला आहे की जो मंत्री असेल त्याने कार्यकारिणीत येऊ नये. आजच्या वातावरणात प्रफुल्लबाबूंनी एक ताससुद्धा कलकत्ता सोडायला नको. परंतु आज माझे ऐकतो कोण? माझा सल्ला एकाकी झाला आहे. मथाई साहेब म्हणाले की आता यापुढे गाड्या चालवण्याकरिता पाकिस्तान सरकारची परवानगी

घ्यावी लागेल. आता तर पाकिस्तान सरकार  गाड्या बंद करण्याच्या गोष्टी करते आहे. मला तर वस्तीबदल करणे मुळीच पसंत नाही. आपल्याला लढायचे असे तर युद्ध जाहीर करा. आणि त्यात मरायचे असेल तर मरा. परंतु १२-१२ वर्षांच्या मुलीला उचलून नेतात आणि त्यांच्यावर जुलुम करतात हे कसे सांगता येईल?

“कुंझरूंचे आजचे वक्तव्य पाहा. काहीही जरी असले तरी मी तर त्या सर्वांना हाच सल्ला देईन की मला विसरून जा. मी दिल्लीत पडलो आहे. इथे करीन. ही काही खाजगी गोष्ट नाही. मी एकटाच आहे असे मी आज प्रार्थनेत सुद्धा सांगितले आहे.

“राजेंद्रबाबू अन्नधान्याकरिता ऑस्ट्रेलियात जात आहेत हीसुद्धा माझ्याकरिता दुःखद बाब आहे. स्वातंत्र्य मिळाले आहे असे मी समजतच नाही. एकीकडे हिंदुस्थान स्वतःला सुवर्णभूमी म्हणवतो आणि दुसरीकडे तो भीक मागायला जातो? माझे मन तर पेटून उठते. माझे चालेल तर लोकांना मी म्हणेन की मेहनत करा, नाही तर उपाशी मरा. पण एक दाणासुद्धा बाहेरून बोलावणार नाही.

“इथे जर शांतता स्थापित स्थाणार नाही तर संपूर्ण हिंदुस्थानात भडका उडेल, मग मी तो थांबवू शकणार नाही. त्यासमोर मी काय आहे. असा विचार करत असतो. मला दिसते त्याप्रमाणे मी काम करण्याकरिता आलो आहे, काम करतो आहे. परंतु आता माझा काही उपयोग नाही असे वाटते. आज आपल्या हाती सत्ता आली आहे आणि याचा मला अभिमान आहे. मी जर म्हणेन की माझीच बुद्धी खरी तर माझ्यासारखा मूर्ख कोणीही नसेल. परंतु मला असे वाटते की तुमच्यापैकी कोणी माझ्याकडे पाहतसुद्धा नाही, मला विचाररतसुद्धा नाही. घनश्यामदासजी म्हणतात की तू इथून निघून जा,. यातच माझी परीक्षाआहे. मी एका झोपडीत राहू शकतो की नाही ते पाहा. मी माझ्या मर्यादा लक्षात घेऊनच काम करतो आहे.

"कदाचित माझ्या या पोरींना कोणी नासवतील. पण त्या जर बहाद्दूर असतील तर नासवल्या जाणार नाहीत. मरून जातील. तुम्ही पाकिस्तान सरकारला 'नोटीस' द्या की तुम्हांला जर अशीच अराजकता करायची असेल तर आम्हांला पाकिस्तानचा ताबा घ्यावा लागेल. बोअर युद्धात तर बोअर मूठभर होते. त्यांचा विजय झाला कारण मेलो तर काय होईल याची त्यांना फिकीर वाटत नव्हती. मी तर या बहाद्दूर प्रजेबरोबर वीस वर्षे काढलेली आहेत. गुंड आपल्या घरावर बसले तरच आपले डोळे उघडायला पाहिजे काय? माझा तर तुम्हांला सल्ला आहे की तुम्ही आणि चोईथरामने सिंधमध्ये जायला पाहिजे आणि मरावे लागले तर मरायला पाहिजे. मी तर इतका बेकारसारखा झालो आहे की पाकिस्तान सरकारकडून काहीही काम घेऊ शकत नाही. परंतु दिल्ली जर शांत झाली तर तिथे जाऊन मरेन. मला मरण्याची कला माहीत आहे. असे मी अहंकाराने म्हणून राहिलेलो नाही तर धैर्याने म्हणतो आहे. मग तर ईश्वराला माहीत की, माझ्यावर गोळी चालत असेल आणि छर्रे माझ्या शरीरात घुसत असतील आणि कदाचित त्यातून दुरुस्त होऊन गोळी मारणाराचा जर मी राग करत असेन तर मी खोटा महात्मा आहे असे समजा. आणि मलाही माझी परीक्षा होईल. अथवा गोळी चालत असेल, माझ्या शरीरात छर्रे घुसत असतील आणि तरीही मी जर राम राम करत असेन. या दोनमधून कोणताही परिणाम निघू शकतो, आणि काहीही जरी परिणाम आढळून आला तरी फायदाच आहे."

अशा प्रकारे बापू अर्धा तास सततधार प्रवाहाप्रमाणे बोलतच राहिले. आणि हे शब्द हृदयाच्या किती खोलवरून निघून राहिले होते याचे शब्दांत वर्णन करता येणे शक्य नाही.

१०.४५ वाजता बापूजी आडवे झाले. ११ वाजता उठले. मग शूरजी वल्लभदासना कराचीकरिता स्टीमर देण्याकरिता पत्र लिहिले.

१२ वाजता महाराज्यपाल माऊंटबॅटन यांना भेटायला बापू गेले. तिथून पाऊणेदोन वाजता परत आले.

परतल्यानंतर हिंदू-मुसलमान मिळून ५० लोकांना बापूजी भेटले. आधी तर जवळपास आठेकशे लोक येऊन गेले होते. वर्तमानपत्रवाल्यांनी चुकून 'आज जाहीर सभा आहे' असे छापले होते. यामुळे इतके सगळे लोक आले होते. त्यांना पाचेक मिनिटांत सांगितले की, "माझ्याकडून होते ते मी करून राहिलो आहे. परंतु दिल्ली जर स्वतंत्र ठेवायची असेल तर हिंदू, शीख, ख्रिश्चन, पारसी सर्व एक होऊन राहा. तुम्ही दुःखी असाल तर त्याचा सूड तुम्ही तुमच्याच भावावर का काढता? जर बदला घ्यायचाच असेल तर सरकारला सांगा."

अखेरीस बापू म्हणाले, "तुम्हाला जे विचारायचे असेल ते विचारा. मी तुम्हांला कोणतेही भाषण देणार नाही."

एूक बंधू - मी माऊंटगोमरी येथील अधिवक्ता आहे. मी पाहिले की बसमध्ये अनेक मुले आणि स्त्रिया बसलेल्या आहेत आणि त्या बसला घेरण्यात आले. एका म्हाताऱ्याला मारून त्याच्या छातीवर एक जण बसला. तिथून इथे आलो तर इथेही तेच आहे. मी अहिंसेचा पुजारी आहे. दोष हा आहे की मुसलमान हिंदूंबरोबर राहू शकत नाहीत. ही काही आजची गोष्ट नाही. किती तरी वर्षांपासूनची आहे. आता 'हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हिंदुस्थान' हे मुसलमानांचे ध्येय आहे. आता तरी हिंदुस्थानातील हिंदूंनी एका बाजूने व्हायलाच पाहिजे. मुसलमान हिंदुस्थानशी निष्ठावंत कसे काय राहू शकतील?

बापू - प्रश्न ठीक आहे. हा प्रश्न मला अनेक हिंदू, शीख भाई विचारत असतात. एक काळ होता की जेव्हा काँग्रेस लोकप्रिय होती. आज जो कोणी आपल्या धोरणावर कायम राहणार नाही तो मरून जाईल. जर मुसलमान प्रामाणिक राहणार नाहीत तर जगातून इस्लाम धर्मच नष्ट होईल. जो माणूस आपल्या धर्माकरिता मरायला तयार असतो आणि

आणीबाणीची वेळ आली की मरण पत्करतो तो खरा माणूस असतो. बाकी तर पक्षाघाताने वा अशाच अजून कोणत्या तरी आजाराने मरत असतात. याऐवजी बहाद्दुरीने का मरू नये? कल्पना करा की मौलाना साहेब तलवार घेऊन आले आणि मला म्हणाले की कलमा म्हण नाही तर मी मारून टाकीन. असे झाले तर अशा वेळी मी तर मरणेच पसंत करीन. आणि जर अशी वेळ आली तर मी तर नाचेन.

इथे दररोज मुसलमान मला भेटायला येत असतात. किती तरी म्हणाले की हे लोक धोकेबाज आहेत. धोका हा कोणाचाही नातलग नाही. मला धोका देऊन ते काय करतील? काय घेऊन जाणार आहे? माझ्याजवळ तर एक पैसुद्धा नाही. आणि साडेचार कोटी लोकांमधून जर कदाचित कोणाजवळ शस्त्र असेलही तर तोसुद्धा काय करणार आहे? आणि जर तो काही करेलही तर मग आपण राज्य कसे चालवू शकू? तुम्ही तुमच्या भावाला कापाल तर जग सहन करणार नाही. आज जग लहान झाले आहे. लंडनसारखे शहर पाच मिनिटात नष्ट करता येईल असे अण्वस्त्रांचे शोध लागले आहेत.अशा या जगात हिंदू तर बिंदूप्रमाणे आहेत. जो मुसलमान निष्ठावंत नसेल त्याला सरकार शूट करील. तुम्ही जर लपून सुरा भोसकाल तर हा तर जंगलीपणाच होईल.

आज रात्री मी झोपू शकलो नाही. पाऊस पडत होता. निर्वासितांची काय अवस्था असेल असा विचार करत होतो. हिंदुस्थानींना दयेची मूर्ती म्हणतात. ते हे प्रमाणपत्र गमावणार आहेत काय? बाहेरचे पत्रकार, संपादक येतात. आपल्यावर हसतात. आणि हिंदुस्थान दिवाळखोरांसारखा आहे. ना खायला मिळते, ना प्यायला मिळते. आता तरी आपण सावथ होऊन माणूस व्हायला पाहिजे.

मला तर जे सांगायचे होते ते मी थोडक्यात सांगितले आहे. आता तुम्ही तुम्हांला पाहिजे तसे करू शकता.

एक शीख बंधू - माझा व्यापार पाकिस्तानमध्ये आहे. मी पाकिस्तानमधून आलो आहे. पाकिस्तानमध्ये पाच टक्के हिंदू जरी परत वसू शकत असतील, राहू शकत असतील तर आम्ही ८५ टक्के मुसलमानांना सामावून घेऊ शकू.

बापू - पाच टक्क्यांनी माझे समाधान होणार नाही. मला तर तेव्हाच शांत वाटेल जेव्हा ज्यांना पाकिस्तानमध्ये राहायचे आहे ते निर्भय होऊन राहू शकतील. परंतु तुम्ही जर दिल्लीला शांत कराल तर मला पाकिस्तानमध्ये जायचे आहे. जे मेले आहेत त्यांना तर मी परत जिवंत करू शकत नाही.परंतु जे आहेत त्यांना परत वसता आले पाहिजे. पंजासाहेबची मशीद कशी बनू शकते? मी तर मरण्याचाच मार्ग पसंत करीन. तुम्ही सर्व जर मरण्याची कला शिकाल तर तुमचे कुशलच होईल. आणि असे असेल तर तुम्ही सर्व सरळ आपापल्या घरी परत जा. मारले तर आपल्या घरी मेरा. माझा आदेश मागता तर मी म्हणेन की जितक्या मुसलमानांना तुमच्या भीतीने घर रिकामे करावे लागले आहे त्या सर्वांना परत आपल्या घरात वसायला पाहिजे. पाकिस्तान जर पाक झाला नाही तर यांमुळे मरून जाईल. तुम्ही फार संतापून आला आहा.

एक बंधू - काँग्रेसने एक चूक तर आधीच केली आहे. आता ती दुसरी चूक करते आहे. हिंदू-मुसलमान कधीही सोबत राहू शकत नाहीत. आपली लाखो माणसे उपाशीतापाशी आहेत. परंतु हिंदूंकरिता कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली नाही. इतक्यात काही शस्त्रे आली आहेत खरे. पण त्यांचा विश्वास कसा करावा? मुसलमानांची रिकामी घरे आम्हांला मिळाली पाहिजे अशी आम्ही इच्छा करतो. दोन्ही सरकारांमध्ये झडती न घेण्याचा करार असूनही पाकिस्तान सरकार झडती घेत आहे. असे असूनही हिंदुस्थान सरकार काहीही करून राहिलेले नाही. याचा फायदा पाक सरकार घेते आहे. ते हजारोंच्या संख्येने परवाने आणि शस्त्रे देत आहे आणि आम्हांला निशस्त्र करण्यात आले आहे. दिल्लीत मुसलमान वसले तर चांगले असे समजून आम्ही खुश होत आहो. परंतु

तुम्ही आला आणि सर्व काही सर्वसामान्य केले तर आम्हांला एक दिवससुद्धा दिल्लीत राहण्याची इच्छा नाही. तुम्हांला 'जशास तसे' हा न्याय मान्य नाही. एवढ्यामुळे काहीही होणार नाही. आम्ही आज छपराशिवाय बसलेलो आहो. मुलांची आणि स्त्रियांची अवस्था तर भयंकर आहे.

बापू - तुमचा युक्तिवाद वेदनांनी भरलेला आहे. इथे कसे राहायला पाहिजे हे जे तुम्ही विचारता ते बरोबर आहे. पिंडीला जा. येथील सरकार माझे मित्र आहे. तेथील सरकारला मी ओळखत नाही. मग मी काय करू? माझ्यात ताकद आहे, शक्ती आहे असे तुम्हांला वाटते. मी ती सर्व खर्च करतो आहे. आणि तुम्हांला मान्य करायचे असेल तर मान्य करा, इथे तर नवीन शहरेच वसवण्याची गोष्ट सुरू आहे. मी काही मंत्री नाही. एक माणूस म्हणून शक्य तितके करतो आहे. मी तुमच्यासारखाच सामान्य माणूस आहे. बाकी साडेचार कोटी मुसलमानांना काढून टाकण्याची गोष्ट ही हिंदुस्थानला मारून टाकण्यासाखी गोष्ट आहे. मी तर एक व्यावहारिक गोष्ट करतो आहे. माझ्याजवळ सर्व शस्त्रे येत आहेत असे मी म्हणू शकत नाही. परंतु ही फार महत्त्वाची गोष्ट नाही. शस्त्रे कोणाचेही कधीही रक्षण करू शकत नाही इतके समजून घेऊ शकत असाल तर घ्या. माझ्याजवळ दुसरे काहीही सांगण्यासारखे नाही. मी तर म्हणत असतो की 'मारू नका, मरा.'

४ - ५ मिनिट ही सभा चालली. तिथून बापू परत कार्यकारिणीच्या सभेत गेले. तिथे कताई केली. ५ वाजता प्रार्थना.

मग बापूजी फिरायला गेले. दुपारी कार्यकारिणीची जी सभा झाली होती तिची आजच्या प्रार्थनासभेत चर्चा केली. आणि तिथे जे सांगितले होते तेच प्रार्थनासभेत सांगितले. नंतर पोलिसांना संबोधत बापूजी म्हणाले,

"एक बंधू मला सांगत होते की एकदा मी स्थानकावर तिकिट घ्यायला गेलो होतो. परंतु तिथे मला कोण शिरू देतो? मी पाहिले की सर्वांना तिकिट मिळते आहे, पण मला का नाही? कारण पोलिसांना पैसे मिळत होते. परंतु मी तर काही लाच देत नाही. आणि मला तिकिट मिळाले तेव्हा गाडी निघून गेली होती. अशी परिस्थिती आहे, पोलीस कोणीही असो, ते सर्वांची सेवा करण्याकरिता असतात. मला दुःख होते. कोणी जर घाणेरडे काम करत असेल तर आपणही त्याचे अनुकरण केले पाहिजे काय? पाकिस्तानी सैन्य स्त्रियांना नग्न करून तपासत असेल तर आपणही तसेच करायचे? असे केले तर हे स्वातंत्र्य दोन क्षणातच चालले जाईल.

रामायणातील उत्तरकांडात वर्णन आहे - विभिषण म्हणाला, "महाराज, रावणाजवळ तर विमाने आहेत, मोठमोठी शस्त्रास्त्रे आहेत, आणि तुमच्याजवळ तर काहीही नाही. अशा परिस्थितीत तुम्ही सीतेला कसे काय सोडवाल?"

"रामाने एका ओळीत उत्तर दिले की 'माझ्याजवळ तर दैवी शक्ती आहे. तू कशाकरिता घाबरतोस?' आणि त्यांनी विभिषणाला लंकेश बनवले. असा इतिहास पडलेला आहे आणि आपल्याला वारसदार पाहिजे. आपण कोणालाही घाबरायला नको. इतरांची शुद्धिअशुद्धी पाहण्यापेक्षा आपलीच शुद्धिअशुद्धी आपण पाहिली पाहिजे."

प्रार्थनेनंतर बापू फिरले. मग प्रवचनात सुधारणा केल्या. देवदासकाका आणि दुर्गादासभाई भेटायला आले होते. नंतर राजकुमारीबहेन आल्या. डच राजदूत श्री लेंपिंग आले. १०.३० वाजता बापूजी झोपले. बापूंना खोकला खूपच झाला आहे.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२६/२७ सप्टेंबर १९४७, शुक्रवार

३.३० वाजता रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूंनी थोडावेळ 'हरिजन'करिता लिहायला सुरुवात केली. परंतु खोकला आणि सरदीमुळे फारसे काम करू शकले नाही. फार थकवा जाणवत होता. तरीही साडेसहा वाजता फिरायला उठलेच. फिरल्यानंतर मालीश, आघोळ वगैरे आटपत नाही तोच बाहेर भेटायला येणारे लोक येऊन बसलेलेच होते. राजकुमारीबहेन, भंजुराम गांधी सरहद्दीवरून आले होते. खाता खाता सरहद्दीच्या गोष्टी केल्या. डोके दुखत असल्यामुळे साडेनऊ वाजताच बापूं माती लावून झोपले. उठल्यानंतर गरम पाणी आणि मध घेतले.

साडेअकरा वाजता स्थानिक मुसलमान आले. किती तरी प्रकारची शस्त्रे देऊन गेले आणि थोड्याबहुत गोष्टी केल्या. शांतता स्थापित झाली नव्हती.

१२ वाजता बापूजींनी परत माती घेतली. आज बापूजींची प्रकृती चांगली नाही. हृदयनाथ कुंझरू आले. १ ते २ पर्यंत त्यांच्याशी चर्चा केली. बापूंना १०२ डिग्री ताप होता. तरीही भेटीगाठी बंद केल्या नाही. कताईलुद्धा सोडली नाही. डोके दुखत होते. आभा आणि मी आळीपाळीने धावपळ करत होतो. एकामागून एक माणसांचे येणे सुरूच होते. अखेरीस मौन घेऊन बापूंनी मौऊंबॅटनना पत्र लिहिले.

आजच्या प्रार्थनेत त्यांनी स्वतःच्या आजाराचा उल्लेख केला -

> 'दीनदुःखहरण देव' हे भजन मी गायला लावतो आणि त्याप्रमाणे मी चालू शकत नाही हे कसे चालेल? राम वगळतामाझ्यावर औषधोपचार करणारा दुसरा डॉक्टर कोणीही नाही. हं, पाणी, माती वगैरे बाह्योपचार मी करत असतो वा करवून घेत असतो. परंतु हृदयात जर रामनाम असेल तर यांचीसुद्धा काय पर्वा? रामनाम

घेत तरलो तर तरलो नाही तर मेलो. शरीर तर क्षणभंगूर आहे. आणि दोन दिवसांनी जीवन लांबवून काय फायदां?"

नंतर ऐक्यावर आणि दिल्लीच्या शुद्धीवर भर दिला. वर्तमानपत्रांमध्ये पाकिस्तानशी युद्धाविषयीची गोष्ट आली होती. त्यासंबंधी बोलताना बापू म्हणाले,

"माझ्या स्वप्नातही लढाईची गोष्ट येत नाही. माझा धर्म तर अहिंसाधर्म आहे. इतकेच की मी व्यवहाराची गोष्ट सांगितली होती. 'हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हिंदुस्थान' हे जर पाकिस्तानचे धोरण असेल तर मी एक व्यावहारिक गोष्ट सांगितली होती. सतत धुसफूस करत राहण्यापेक्षा दोन्ही सरकारांनी आपसात युद्ध करावे."

प्रार्थनेनंतर बापूजींनी दोनचार फेऱ्या मारल्या. थकले होते. प्रार्थनाप्रवचन पाहिले. तेवढ्यात सुऱ्हावर्दीसाहेब कराचीहून आले. त्यांना पाहून बापूजी म्हणाले, "सिंह होऊन आला की कोल्हा?"

सुऱ्हावर्दीसाहेब - "मी तर उंदिर होऊन आलो आहे. कारण उंदीर फार समंजस प्राणी आहे अशी माझी मान्यता आहे. त्याच्यासारखा दुसरा कोणताही प्राणी नाही."

बापू - "म्हणजे तुम्ही समंजस आहा." अशा प्रकारे बापूजी तापातसुद्धा गोष्टी करू लागले. १०२ डिग्री तापातही आनंद घेत होते. "

गां. - 'आता एक गोष्ट सांगतो. एके काळी एक सिंह होता. तो एका शिकाऱ्याच्या जाळ्यात सापडला. एका घुबडाने वरून आणि एका मुंगसाने खालून पाठलाग केल्यामुळे एक उंदिरही त्या जाळ्यात शिरला. "तू मला वाचव, मी तुझी जाळ्यातून सुटका करीन" उंदराने सिंहासमोर प्रस्ताव मांडला. सिंहाने तो प्रस्ताव मान्य केला. सौदा ठरला. मुंगूस तेथून निसटला परंतु घुबडाचे गोल चमचमणारे डोळे अजूनही आपल्या भक्षावरच टेकलेले

होते. ‘तू कामाला केव्हा सुरुवात करणार आहेस?’ सिंहाने अस्वस्थ होत विचारले. गडबड काय आहे? शिकारी येईल तेव्हा मी तुला मोकळे करीन.’लबाड उंदिर उत्तरला आणि जाळे कुरतडण्याऐवजी तो सिंहाच्या केसात शिरला आणि छानपैकी झोपला! सिंह संतापला होता पण तो काय करू शकत होता? शिकारी आला तेव्हा उंदराने घाईने जाळे कुरतडायला सुरुवात केली आणि छोटेसे छिद्र करून तो तेथून निसटला.’” उंदीर धोकेबाज असल्याचे सांगून बापूजींनी किती टोमणा मारला होता?

सुऱ्हावर्दीसाहेब - तुम्हाला कळले. मी लाचार आहे.

एवढ्यात जवाहरलालजी आले.

८।।। वाजता बापूजी पथारीवर पडले. रात्री एक वाजता बापूजी खूपच अस्वस्थ झाले होते. आम्ही ३ वाजेपर्यंत जागे होतो. थोडा डोळा लागत नाही तोच जाग. असा काही खोकला यायचा की वाटायचे आता जीव जातो की मग? अडीच वाजता माझ्या मांडीवर डोके ठेवून बापूजी म्हणाले, “तुला आठवत असेल ना की आगाखान महालात अशाच प्रकारे बाजववळ मी, तू, सुशीला, प्रभावती, प्यारेलाल आळीपाळीने बसत होतो आणि बाची कशी दयनीय अवस्था झालेली होती? आणि असे करता करताच बा माझ्या मांडीवर चालली गेली. तू मला टेकायला मांडी देऊन झोपवण्याचा प्रयत्न करते आहेस. यावरून सहजच ही आठवण झाली. आता मी तुझ्या मांडीवर असताना निघून गेलो तर किती चांगले होईल! तुझे बाबरोबर जसे नाते होते तसेच माझे आहे ना? नाही तर तू कुठे होतीस? या वेळीसुद्धा तू कुठून कुठे आलीस? मी यावे म्हणून बाचा आत्मा मदत करतो आहे असे दिसते. बा म्हणाली होती की मी शरीराच्या रुपाने तर जिवंत राहू शकत नाही, परंतु मनुडी आहे. यामुळे ही माझ्या मृत्यूतील शेवटची सेविका आहे. बाच्या ठिकाणी तू आहेस. यामुळे बाचा आत्मा नाचत असेल याबद्दल मला शंका नाही. (बापूजी तापात असे बोलत होते असे वाटते.)”

मी म्हणाले, “बापूजी तुम्ही बोलू नका. इतर जागे होतील आणि मग तुमची झोपमोड होईल.”

बापू म्हणाले, “माझ्या स्वप्नात अनेकदा बा येत असते. इतके तुला सांगतो की मी तर झोपणारच होतो, परंतु खोकला कुठे झोपू देतो? माझी परीक्षा सुरू आहे. रामनाम जर माझ्या हृदयावर अंकित झालेले असेल तर हा खोकला काय करू शकला असता?”

अशा प्रकारे झोपतजागत साडेतीन वाजले. आणि साडेतीन वाजल्याबरोबर बापूजी प्रार्थनेकरिता उठलेच.

तोंड धुणे वगैरे करून प्रार्थना केली. प्रार्थनेनंतर एक चमचा एरंडीचे तेल घेतले. नंतर पडल्या पडल्या ‘हरिजन’करिताच्या लेखाचे श्रुतलेखन करवून घेतले. मग थोडे झोपले. आज फिरले नाही. हलकी मालीश करवली. एनिमा घेतला. डॉ. दीनशा महेतांनी पाच गोष्टी करायला सांगितल्या - (१) एनिमा घेऊन पोट साफ करणे (२) आहार हलक्यात हलका (३) पाणी ४ ते ५ पिंट (४) हातपाय गरम ठेवणे (५) पूर्णपणे आराम.

बापू गोष्टी गोष्टीत म्हणाले, “माझा डॉक्टर रामच आहे. तो जर मला बेशुद्ध करत असेल तर मला शुद्धीवर आणण्याकरिता दारूचा वा इंजेक्शनचा उपयोग करण्यात येऊ नये. मी त्यातच निघून गेलो तर फार खुश होईन. मी जर बेशुद्ध झालो तर माझ्या जवळच्यांना रामनाम घेता येणे जर शक्य असेल तर घ्या. मला जगवण्याकरिता इतर काहीही करायचे नाही. केले तर मी आत्महत्या करून मरेन.”

जनतेच्या दोन दिवस भेटीगाठी न घेण्याच्या सल्ल्याला सक्त विरोध करत ते म्हणाले, “ज्या माणसांनी आपली संपत्ती, आपले लोक, पुत्र, पत्नी, पुत्री, माता, बंधू गमावले आहेत त्यांच्या दुःखाने भरलेल्या गोष्टी  पडल्या पडल्या न ऐकता मी कसा झोपू शकतो? अशा प्रकारे जगून मला काय करायचे आहे?”

बिरलाजींनी मुलाखती कमी करण्याचा आग्रह केला होता. बापू म्हणाले, “काम करता करता मेलो तर त्याकरिता इतरांनी रडण्याचे काय कारण? असे झाले तर मला फार आवडेल.”

पंजाबी भाई आले. त्यांच्याशी बापूजींनी गोष्टी केल्या ते गेल्यानंतर बापूजी म्हणाले, “सर्वांना स्वतःचीच पडली आहे, आपण जगलो, आपली मुलेबाळे जगली की जग जगले. पैसेवाले पळून जात आहेत. गरीब एक तर मुसलमान होतात वा मरतात. कलकत्त्यातही वातावरण तापलेले आहे. ठीक आहे, माझ्याकरिता मरण्याचे सामान तयार होऊ राहिले आहे. जर नोआखाली बिघडली, बिहार बिघडला वा कलकत्ता बिघडला तर मला तर मरायचेच आहे! किती चांगले होईल? मी जर मेलो तर मला ते फार आवडेल. किती दयनीय अवस्था आहे की पाकिस्तानमध्ये जाणाऱ्या ट्रेनमध्ये एकही हिंदू मुलगा, म्हातारा की स्त्री बसू शकत नाही आणि हिंदुस्थानात येणाऱ्या ट्रेनमध्ये एकही मुसलमान बसू शकत नाही? असा जंगलीपणा मी कधीही ऐकला नव्हता. ईश्वराला अजून अजून काय काय पाहायला लावायचे आहे?”

९ ते ११ शहीदसाहेबांबरोबर खाजगी चर्चा. साडेबारा वाजता गरम पाण्यात दोन चमचे मध टाकून ते घेतले. नंतर माती लावून थोडा वेळ आराम केला. दीड वाजता श्री कॅम्बेल जॉनसन यांना भेटले. थोडा टपाल लिहिला. ३.४५ ते ४.३० कार्यकारिणी. ६.३० प्रार्थना. आपल्या आजाराबद्दल माहिती दिली. काळजी करू नका असे सांगितले आणि त्या एकावरच आपले ओझे टाकले. मरण्यासंबंधीही बोलले. प्रार्थनेनंतर थोडे फिरले. प्रवचन पाहिले. तेवढ्यात सुऱ्हावर्दीसाहेब आले. मृदुलाबहेन पाच मिनिट भेटून गेल्या. १० वाजता बापूजी अंथरुणावर पडले.

रात्र फार चांगली गेली असे म्हणता येत नाही. दोन वाजता खोकल्याची जोरदार उबळ आली होती. परंतु थोड्या वेळात सर्व ठीक झाले.

बिरलाभवन,

२८ सप्टेंबर १९४७

३.३० ला प्रार्थना. गीता अध्यायाच्या वेळी बापूंचा डोळा लागला. ४.३० ला उठले. गरम पाणी, मध, लिंबू घेतले.

५.३० ला फिरायला उठले. फिरता फिरता दिल्लीविषयी गोष्टी केल्या. आज मालीश करवून घेतली. मालीश, आंघोळ करून बाहेर आल्यानंतर खाता खाता सुऱ्हावर्दीसाहेबांशी गोष्टी केल्या. भाजी, एक खाकरा, भाजीचे पाणी ८ अंस दूध. १० ते १२.३० कार्यकारिणी. १२.३० ते १ जवाहरलाजी आणि सरदारसोबत खाजगीत चर्चा.

आज मुलाखतींकरिता विशेष कोणी येणारे नव्हते. टपालाचे आणि 'हरिजनबंधू'चे काम केले. ४.३० वाजता ढेबरभाई आले. "शस्त्रांशिवाय लढायचे आहे, जुनागढ काठेवाडची आणि तुम्हा सर्वांची परीक्षा घेतो आहे. काठेवाडमध्ये किती पाणी आहे ते पाहतो आहे."

आज बाहेर प्रार्थना झाली नाही. एका बंधूने विरोध केला. प्रार्थनेत चर्चिल साहेबांबद्दल बरेच बोलले -

"आज चर्चिलचे निवेदन वाचून फार दुःख झाले. तुम्हांलासुद्धा दुःख व्हायला पाहिजे. आणि आपल्याकडे होत असलेल्या दंग्याधोप्यामुळे ते फार उल्हसित झालेले आहेत. एक तर हिंदुस्थानचे दोन तुकडे करायला लावले आणि दुसरी गोष्ट म्हणजे शत्रुत्वाची पद्धत शिकवली. ते म्हणतात की हिंदुस्थानला तर आम्ही वाचवले, नाही तर आपसात लढून तो कधीचाच मेला असता. चर्चिलसाहेबांनी इथे स्वतःच येऊन तपासावे म्हणून मी त्यांना आमंत्रित करतो. जगात जिथेकुठे क्रांती झाली तिथे किती रक्त वाहवले गेले. ते पाहता इथे तर रक्ताचा थेंबही न सांडवता इतके सर्व मिळवले. याचा मला अभिमान आहे. चर्चिलसाहेबांना मला सांगायचे आहे की आमचा न्याय आम्ही करू. बाकी आज जे वादळ

उठले आहे त्याकरिता आम्ही त्यांचे आभारी आहो हे मी त्यांना नम्रतापूर्वक सांगू इच्छितो. आणि संपूर्ण हिंदुस्थानात कुठे ही कापाकापी सुरू आहे? मध्यप्रांत, संयुक्त प्रांत इथे ती मुळीच नाही."

नंतर जनतेला संबोधत बापू म्हणाले, "चर्चिलसाहेबांना जर आपल्याला खोटे पाडायचे असेल तर आतापासूनच आपण स्वातंत्र्याच्या लायक असल्याचे आणि नेहमीकरिता राहणार असल्याचे दाखवून देण्याचा निर्धार केला पाहिजे. हे काम माझे एकट्याचे नाही. उलट माझे हे अरण्यरूदन आहे. आपण जर जंगलीपणा सोडला तर चर्चिलला केवळ माफीच मागावी लागणार नाही तर हिंदुस्थान सौजन्यशील लोकांचा देश आहे हेही मान्य करावे लागेल."

प्रार्थनेनंतर थोड्या फेऱ्या मारल्या. प्रवचन लिहून काढले. १०.३० वाजता बापू झोपले.

बिरलाभवन,

२९ सप्टेंबर १९४७, सोमवार

३.३० प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूंनी 'हरिजनबंधु'करिताचे लेखन पाहिले. टपाल पाहिला. ५.३०ला फिरण्याकरिता उठले. मालीश, आंघोळ इत्यादींनंतर एक खाकरा, एक पाऊंड दूध आणि भाजी घेतली. जवाहरलालजी आले. १० वाजता बिरलाजी आले. बापूंना सरदी आणि खोकला आहे. थोडा वेळ बसून गेले. ११ वाजता बापू झोपले. आज मौन असल्यामुळे सुटी घ्यावीच लागत असते. आज बापूंना भेटायला बाहेरचे कोणीही येणार नव्हते. बापूंनी बहुतांश वेळ आरामच केला.

६ वाजता प्रार्थना. प्रार्थनेत युद्धाविषयी बोलले -

"ऐकतो की संघराज्य युद्ध करू शकण्यासंबंधीच्या अफवा पश्चिमेत पसरल्या आहेत. मला कळत नाही की वर्तमानपत्रवाल्यांना बाहेरून कुठून हे अहवाल मिळतात? एखादा त्याच्या भाषेत भाषण करतो आणि त्याचे रुपांतर करत असताना अनेकदा अर्थाचा अनर्थ केला जातो. असेच झाले आहे. अशाच प्रकारे दक्षिण आफ्रिकेत तर एकदा इतका काही अर्थाच्या अनर्थ करण्यात आला होता की त्यामुळे माझा जीव जाण्याची वेळ आली होती. परंतु आपण एका निरपराध माणसाला मारले हे २४ तासांच्या आतच इंग्रजांच्या लक्षात आले.

"मी युद्धाला उत्तेजन देतो आहे असा अर्थ माझ्या कोणत्याही भाषणाचा निघूच शकत नाही. माणसाने युद्धाचे नाव घेणे हा अपराध आहे काय? कोणत्या परिस्थितीत युद्ध होण्याची शक्यता असते इतकेच मी दाखवत होतो. मी तर दोघांचाही सेवक आहे. लूटमार सुरू राहिली, वेडेपणाचे वर्तन सुरू राहिले तर त्याचा अनिवार्य परिणाम युद्ध हाच असतो.

"जो माणूस अहिंसेचा भक्त आहे, जगाने ज्याची परीक्षा घेतली आहे तो माणूस जेव्हा असे म्हणतो तेव्हा त्याचा उद्देश युद्ध थांबवण्याचाच असतो. मी आशा करतो की माझ्या अहिंसेविषयीच्या विचारात मी मरेपर्यंतही फरक पडणार नाही."

प्रार्थनेनंतर थोडे फिरले. किती तरी काम पडून होते, ते पाहिले. कागदपत्र तपासले. ९ वाजता झोपले. बापू आज सर्वात आधी अंथरुणावर पडले.

बिरलाभवन,

३० सप्टेंबर १९४७

३.३० प्रार्थना. नंतर बापूंनी पत्रे लिहिली. थोडा वेळ आराम केला. ५.४५ वाजता फिरण्याकरिता उठले. बापू दररोज जिथे फिरायचे तिथे आज सुशीलाबहेन पै आणि सुशीलाबहेन नाय्यर झोपलेल्या होत्या. यामुळे बापू म्हणाले, “आपण दुसरीकडून फिरू या. माझ्या खडावांचासुद्धा आवाज व्हायला नको. यांची जर पूर्ण झोप झाली नाही तर या आजारी पडतील. माझ्यामुळे यांच्या झोपेत अडथळा यायला नको. ‘दया धरमका मूल है, पापमूल अभिमान; तुलसी दया न छांडिये जब लग घटमें प्रान’ हे महावाक्य आहे.”

बापूजी लहान लहान गोष्टींकडे किती लक्ष देत असतात आणि कोणत्या गोष्टीला कोणत्या गोष्टीपर्यंत घेऊन जातात? नाही तर सुशीलाबहेन झोपल्या आहेत याची कोणाला काय पडलेली असते आणि आवाज तर मुळीच होऊ न देण्याची काळची कोण घेतो? मालीश, आंघोळ वगारे ८ वाजेपर्यंत आटोपले.

आज बापूजींनी खाण्यात हळद टाकलेले दूध घेतले. भाजी आणि भाजीचे पाणीही घेतले. ११ वाजता सुचेताबहेन कृपलानी आल्या. कस्तुरबा स्मारकाकरिता किती तरी प्रतिकात्मक चित्रे आणली. बापूंना एकही पसंत आले नाही, परंतु ते म्हणाले, “या सर्वांपेक्षा जाते ठेवा. कारण हे जातेच आपल्या भगिनींच्या हातात आज आचके घेते आहे. परिणामी भगिनी आळशी झाल्या आहेत. मी दक्षिण आफ्रिकेत दररोज दळत असे. आणि माझ्याकरिता देवदास, बा असे सर्व दळायचे.”

११.३० वाजता स्थानिक मुसलमान आले. शहरातील आणि आजुबाजूच्या गावातील परिस्थिती त्यांनी सांगितली. या लोकांना बापूंनी एक प्रश्न विचारला - मी काय केले नाही हे तुम्ही सांगू शकाल काय? मग आता मी असे कोणते काम केले पाहिजे की त्यावर तुम्हा सर्वांचा विश्वास बसेल? (आलेल्या मुसलमानांच्या कदाचित लक्षात आले नसेल, परंतु

आम्हांला बापूंच्या उपवासाची ही खात्रीपूर्वक पूर्वसूचना वाटली.) मुसलमानभाई म्हणाले, “तुम्ही भरपूर केले आहे, हे दुसरा कोणीही करू शकला नसता. आणि असे काही असेल तर आम्ही तुम्हांला सांगायला येऊ.” इतक्यात राजकुमारीबहेन आल्या. त्यांना म्हणाले, “मशिदीत जर शिवालय असेल तर माझा मृत्यूच समज.”

जवाहरलालजी आले. जुनागढसंबंधी चर्चा करून गेले. माती घेऊन आडवे झाले तर तोपर्यंत २ वाजून गेले. कचरू आले. शेख अब्दुल्लांची सुटका झाली. कचरूसाहेबांवर काश्मीरला जाण्यासंबंधी जे प्रतिबंध लावण्यात आले होते ते उठल्यामुळे उद्या काश्मीरला जाणार आहेत. बापूंनी त्यांच्याबरोबर (शेख अब्दुल्लांना) निरोप पाठवला की “इतक्या वर्षांनंतर सुटका झाली तर कुटुंबाला सोबत घेऊन दोनचार दिवस मजा करू या असा विचार मनात येऊ देऊ नका. याबाबतीत मी फार कठोर आहे हे विशेषेकरून लक्षात ठेवा. बेगमसाहबिबांना सांगा की कामच करा. त्यांनाही माझा शब्दंशब्द सांगा.”

मियावलीचे लोक आले. ते बापूंना म्हणाले, “आम्हाला वाचवायला काही तरी करा.” बापू म्हणाले, “असा भ्याडपणा का दाखवता? मरायला शिकला आहात ना? . . .”

४ वाजता थोड्याशा निर्वासित भगिनी दर्शनार्थ आल्या होत्या. गिरधारी पुरी आणि त्यांची पत्नी आली. सरहद्द प्रांताची अवस्था थरकाप भरवणारी असल्याचे लक्षात आले.

कलकत्त्याच्या मनुभाई भिमाणींनी बातमी दिली की जी मुले गुंड असल्याचे समजले जात होते ते निष्क्रिय झाले आहेत. त्यांना आपण काही काम दिले पाहिजे. बापू याच्यासी सहमत झाले आणि हे ओझे त्यांनी त्यांच्यावरच टाकले.

६ वाजता प्रार्थना. प्रार्थनेत मियावली येथील बंधूंचा उल्लेख करत बापू म्हणाले,

> “मुलांना लहानपणापासूनच धर्माचे पालन करण्याकरिता शिकवले पाहिजे. असे झाले तर ते मरत असतानाही धर्माचे पालन करतील. आपल्या धर्माचे रक्षण दुसरा कोणीही करू शकत नाही. प्रल्हादने, बारा वर्षांच्या मुलाने, वडिलांचा विऱोध

असतानाही रामनाम घेतले होते ना? आपल्या स्त्रियांना अबला का समजण्यात यावे? हिंदुस्थानात करोडो मुसलमान आहेत. ते सर्व काही अरबस्तानातून आलेले नाहीत. मुळात तर सर्व आर्यच आहेत. परंतु आपण अस्पृश्यता आणून वातावरण फार नासवले आहे. मुसलमान जरी वाईट असतील तरी वाईटपणाचा बदला वाईटपणाने घेऊ नये. एखादा माणूस दारू पीत असेल तर आपणसुद्धा प्यायला पाहिजे काय? असे असेल तर चांगल्यात आणि वाईटात अंतर ते काय? इकबाल काय म्हणाले? 'मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना.' आता तरी माणूस व्हा. ईश्वराने सर्वांना सन्मती द्यावी हीच प्रार्थना."

आजच्या प्रार्थनेचा हा सार आहे. बापूजींना खोकला असल्यामुळे फार सावधगिरीने हे सर्व सांगत होते.

बापूंचे झेनीथचे घड्याळ हरवले होते. अगदी तसेच घड्याळ त्यांना भेट म्हणून आले. त्यात गजर, रेडियम सर्व काही होते. बापू फिरले, प्रवचन पाहिले, थोडा वेळ गोष्टी केल्या. जवाहरलालजी आले.

१० वाजता बापू अंथरुणावर पडले. रात्रभर खूप खोकला सुरू होता. राम राम करत होते. "रामाला काम घ्यायचे असेल तर तो जिवंत ठेवील, नाही तर उचलून घेईल. आज जगण्यामरण्याची चिंता का करायची?"

नवी दिल्ली,

१ ऑक्टोबर १९४७

३.३० वाजता रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजींनी बराचसा टपाल स्वतःच पाहिला. गरम पाणी, मध आणि रस दररोजप्रमाणे घेतला.

५.३० वाजता बापू फिरायला निघाले. फिरून आल्यानंतर मालीश, आंघोळ वगैरे चालले. ८। वाजता बापूजींचे नित्यकर्म आटोपले. आंघोळ करून जसे ते बाहेर आले तसेच कामाला भिडले. जेवण करता करता होरेस अलेक्झॅन्डरशी गोष्टी केल्या.

खलिक उझ्झानसाहेब आले होते. त्यांच्याबरोबर १ तास २० मिनिट गोष्टी केल्या....

साडेनऊ वाजता झोपल्या झोपल्या झोपेत काही तरी बोलत होते. थोडा वेळ उभी राहून मी पाहत होते तर बापूजी झोपेतच होते. १०.१५ वाजता बापूजी उठले. उठून गरम पाणी प्याले. अन्नधान्याच्या टंचाईबद्दल चर्चा केली. “धान्याचा एक कणसुद्धा बाहेरून येता कामा नये.” नंतर लक्ष्मीदासभाई आणि नरहरीभाई आले. १२.३० ते १ माती घेतली. सर पुरुषोत्तमदासभाई ठाकोरदासभाई आले. सुऱ्हावर्दीसाहेबसुद्धा आले. बापूजींना विचारले, “तुमची परिषदेकरिता तयारी आहे ना?” बापू म्हणाले, “हो, जिनासाहेब अंतःकरणापासून जर काही करायला तयार असतील तर, नाही तर मी काय करू शकतो?”

आज हिंदू आणि शीख यांची एक सभा आयोजित करण्यात आली होती. आम्ही तिथे गेलो. उद्या २ ऑक्टोबर असल्यामुळे परतत असताना मी त्यांना विचारले, “तुम्ही उपवास करणार आहा?” बापू म्हणाले, “जन्मदिवस खाण्याकरिता असतो काय?” मी म्हणाले, “तुरुगात असताना मी तुम्हाला पुरणपोळी खाऊ घातली होती ना?” बापू म्हणाले, “जाग आली तेव्हाच सकाळ.”

या सभेत जवळपास २०० हिंदू, शीख होते. सुरुवातीला बापूजी म्हणाले,

"प्रार्थनेत मी नेहमीच अंतःकरणातील गोष्टी सांगत असतो. आणि कार्यकारिणीच्या सभेत तर मी चार वाजता पोहोचायला पाहिजे. कोणताही युक्तिवाद न करता मला प्रश्न विचारा. प्रश्न आणि युक्तिवादात तोच तोपणा असतो."

एका बंधूने बोलायला सुरुवात केली. बापूजी त्याला म्हणाले,

"तुमच्या बोलण्यातील एक प्रश्न उचलतो. मला तुम्हाला असे विचारायचे आहे की 'ज्याअर्थी मुसलमानांजवळ शस्त्रे आहेत आणि ते ते परत करत नाहीत त्याअर्थी हिंदुस्थानात हिंदू आणि मुसलमान खरोखरच भाऊभाऊ म्हणून राहू शकतील काय?'"

"मी तर म्हणेन की त्यांना ठेवायचे असतील तर ठेवू द्या. परंतु आपण जर प्रामाणिक आणि शुद्ध हृदयाचे होऊ, आपल्या मनात जर या लोकांबद्दल कोणताही वैरभाव नसेल, तर ते स्वतःहोऊनच आपली शस्त्रे परत करतील याबद्दल मला मुळीच शंका नाही. तुम्ही जर प्रेमाने शत्रूची सेवा कराल तर शत्रू आपला मित्र होऊन जाईल. ही गोष्ट मी अनुभवानंतर सांगतो आहे. समोरचा जर आपली शस्त्रे सोपवील तरच मी त्याला भाऊ मानेन अशा अटींवर आपण भावाभावांमधील ऐक्य कधीही शिकू शकणार नाही. प्रेमात अटींना कोणतेही स्थान नसते. मला असे म्हणायचे नाही की येथील मुसलमान पूर्णपणे निर्दोष आहेत. परंतु एवढ्यामुळे आपण साडेचार कोटी मुसलमानांना तर गुन्हेगार ठरवू शकत नाही ना? जे गुन्हेगार असतील त्यांना शिक्षा करायचे काम सरकारचे आहे, आपले नाही. एखाद्या कुटुंबात दोन भाऊ असतील आणि त्यातील जर एकाला वेड लागले आणि तो शिव्या देऊ लागला तर शहाण्या भावानेही शिव्या दिल्या पाहिजे काय? शहाणासुरता भाऊ जर वेड्या भावाला शिव्या देऊ लागेल तर लोक त्याला काय म्हणतील? परंतु असे न होता चांगला भाऊ जर गप्प राहिला आणि त्याने वेड्या भावाच्या सर्व शिव्या ऐकून घेऊन तो त्याची समजूत घालत असेल . . . भावाने भावाला मारून टाकण्याने, निर्दोष स्त्रियांना आणि मुलांना मारण्याने कोणाचीही उन्नती होऊ शकत नाही हे मी ओरडून ओरडून सांगेन. मग

तो समाज कोणताही का असेना. आणि जर असे अराजक निर्माण झाले तर तुम्ही जिवंत असतानाच गुलामगिरी परत आल्याचे तुम्हांला दिसून पडेल. मी तरी या गोष्टीचा साक्षीदार होणार नाही. याचा अर्थ असा नाही की अशी परिस्थिती जर निर्माण झाली तर मी पळून जाईन. परंतु माझ्या मृत देहाला तुम्हांला जाळावे लागेल. जो असे करील त्याला मी नम्रतापूर्वक सांगेन की आपण आपल्या धर्माचा नायनाट करतो आहो." बापूजींनी या लोकांना अशा प्रकारे चांगल्या पद्धतीने समजावून सांगितले.

मग मी बापूजींना ते स्वप्नात जे काही तरी बोलत होते त्याबद्दल सांगितले. "हो, हे खरे आहे, कारण मी उठलो तेव्हा मला मी स्वप्नात असल्यासारखेच वाटत होते. आणि मी मुसलमानांची समजूत घालत असल्याचे मला स्वप्नात दिसत होते. आजकाल उठताबसता, खातापिताना, गोष्टी करत असताना माझ्या डोक्यात हेच विचार घोळत असतात."

४ ते ५ कार्यकारिणी झाली. बापूजींनी सायंकाळच्या जेवणात ५ वाजता भाजी, सूप आणि दूध घेतले. ६ वाजता प्रार्थना.

प्रार्थना प्रवचनात बापूजींनी सेवेविषयी सांगितले. एका बहिणीने बापूजींना पत्र लिहिले होते की मला सेवा करण्याची इच्छा आहे. बापूजी म्हणाले,

> "सत्तेचे क्षेत्र फार सीमीत आहे. परंतु सेवेचे क्षेत्र मात्र पृथ्वीइतकेच विशाल आहे. परंतु आज तर आपण पंगू झालेलो आहो. दिल्ली शहर किती घाणेरडे आहे? निर्वासितांच्या छावणीतील घाणीचा विचार करणेसुद्धा कठीण होते. आपले स्वतःचे अंगण, घर, पायखाना, मन हे सर्व स्वच्छ आहेत काय? प्रत्येक माणूस हे सर्व स्वच्छ ठेवील तर फार मोठे काम होईल. नाव व्हावे म्हणून तर मुळीच सेवा करू नये. दिल्लीवासीयांचे मन जर साफ झाले तर फार भव्य काम होईल."

आणि यानंतर आज शिखाच्या सभेत बापूजी जे बोलले होते ते त्यांनी सांगितले.

प्रार्थनेतून आल्यानंतर सुऱ्हावर्दीसाहेबांबरोबर फिरता फिरता गोष्टी केल्या. ७.३० ते ८ पंडितजींसोबत गोष्टी. प्रवचनात दुरुस्त्या केल्या. ९.३०ला झोपायला गेले.

बापूजींना खोकला खूपच आहे. सरदीपडसे अजूनही गेलेले नाही. रात्रीसुद्धा खोकला खूपच त्रास देत असतो. बापूजी म्हणतात, "मी तर असेच म्हणेन की असे असेल तर माझे रामनाम कुठे गेले? रामनाम जर खरोखरच माझ्या हृदयावर कोरले गेलेले असेल तर उद्याच माझा खोकला निघून गेला असता. परंतु हा जायला जर तीन आठवडे लागणार असतील तर माझे रामनाम खोटे आहे हे जगाला सांगण्याची माझी तयारी आहे."

बापूजींचे पाय दाबत असताना मी त्यांना म्हणाले होते की, "सुशीलाबहेनचे म्हणणे आहे की औषध घेतल्याशिवाय तीन आठवड्यांच्या आत हा खोकला जाऊच शकत नाही. हा मुदती खोकला आहे. याच्या उत्तरार्थ बापूजी वरीलप्रमाणे म्हणाले होते."

बापूजींचे मन आजकाल रामनामाच्या शोधात असल्यामुळे या उत्तरानंतर एक शब्दसुद्धा बोलण्याचा मला धीर झाला नाही. बापूजींनी जेव्हा हे उत्तर दिले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील गांभिर्य स्पष्ट दिसत होते.

नवी दिल्ली,

२ ऑक्टोबर १९४७

३.३० वाजता दररोजप्रमाणे प्रार्थना. मी उठले तोपर्यंत आजच्या पवित्र दिवशी बापूजींना प्रणाम करण्याकरिता बाहेरचे काही लोक येऊन पोहोचले होते. हाततोंड धुतल्यानंतर आम्ही सर्वांनी बापूजींना एकामागून एकाने प्रणाम केला. नंतर प्रार्थना झाली. बापूजी प्रार्थनेनंतर आत जात असताना मी हसत हसत म्हणाले, ”बापूजी हा काय न्याय की आमचा जन्मदिवस असतो तेव्हा आम्हांला सर्वांच्या पाया पडावे लागते आणि या उलट तुमचा जन्मदिवस असला तरी आम्हा सर्वांना तुम्हाला प्रणाम करावा लागतो?”

बापूजी म्हणाले, ”महात्म्याकरिता नेहमी उलटा नियंम असतो. तुम्ही सर्वांनी मला महात्मा बनवले आहे ना? मग मी खोटा महात्मा असलो तरी त्याचे काय ! महात्मा शब्द असला की तेवढे पुरे ! आपला नियम हा असा आहे.”

सकाळी ज(वाहरलालजी). बापूंना म्हणाले, “तुम्ही पेनिसिलिन घ्या, तुम्हाला आराम वाटेल.” बापूजींनी एकच गोष्ट सांगितली, जी मला त्यांनी काल सांगितली होती - “माझे रामनाम कुठे गेले? रामनाम जर हृदयात बिंबले असेल तर माझा हा खोकला उद्याच निघून जाईल. आणि तुम्ही लोक म्हणता त्याप्रमाणे हा जर तीन आठवडे राहिला तर माझे रामनाम जपणे खोटे आहे हे संपूर्ण जगाला सांगायची माझी तयारी आहे.”

डॉक्टरांचे म्हणणे होते की “हे सर्व ठीक आहे, परंतु विज्ञानाने ही जी इतकी शोधाशोध केली आहे ती खोटी आहे असे कसे म्हणता येऊ शकते? तुम्ही वाटेल तितके रामनाम घेणाराला आणा आम्ही त्याला कॉलऱ्याचा रुग्ण बनवून दाखवू.”

बापूजी - “हा उद्धटपणा आहे. विज्ञानाला अजून बराच शोध लागायचा आहे. ही तर केवळ सुरुवात आहे. परंतु श्रद्धापूर्वक रामनाम घेतले तर कोणी आजारीच पडणार नाही. इतके स्वच्छ आणि निष्पापी लोक जर जगात झाले तर कोणाला काहीही होणार नाही

याबद्दल मी निःशंक आहे. परंतु तुम्ही भ्रमात आहा. उद्या तर तुम्ही मला लिव्हर खायला लावाल वा लिव्हरचा अर्क (एक्सट्रॅक्ट) घ्यायला सांगाल. मग मी काय बाहेर तयार झालेल्या गोष्टी खायला पाहिजे? हिंदुस्थान आळशी आहे. आणि त्याच्यातील आळशांमध्येही आळशी वर्ग कोणता असेल तर तो डॉक्टरांचा आहे. कारण हे लोक इथे काहीही तयार करू इच्छित नाहीत. बाहेर जे तयार झालेले असते तेच विकत घ्यायला लावत असतात. किती दयनीय अवस्था ! हिंदुस्थान हा असा भिकारी देश आहे की ज्याला निसर्गाने भरपूर काही दिले आहे आणि तरीही त्याला भिकेकरिता हात पसरावे लगात असतात !!" माझ्या मनात जेव्हा असे विचार येतात तेव्हा ते मला फारच खुपतात. जेव्हा आपले नशीब जागेल तेव्हा सर्व काही आपोआपच होईल.. . .काय सांगता येऊ शकते? मी भरपूर केले आहे, आता काहीही करण्याची इच्छा नाही. आता तर या जगातून लुप्त होण्याची इच्छा आहे, आणि तेही रामनाम घेत असताना. रामनामात किती रहस्य भरलेले आहे हे मी तुम्हा कोणालाही समजावून सांगू शकत नाही. माझी हौस इतकी तोकडी आहे. आज तर मी कुंभाराच्या भट्टीत बसलो आहे (जसा राम ठेवतो.). चोहोकडून आग पेटलेली आहे. तुम्ही डॉक्टर लोक जसे सायन्स वा विज्ञानात शोध घेत असता तसाच मी रामनामाचा शोध घेणारा आहे. याचा शोध घेऊ शकलो तर ठीक आहे नाही तर हा शोध घेता घेता मी मरून जाईन. तुम्ही सर्व वेगवेगळ्या प्रकारे मला प्रेमाने प्रणाम करायला आला आहा आणि तुम्ही माझी प्रेमाने संमजूत घालत आहा हे तुमच्या प्रेमाचे सुंदर प्रतीक आहे. परंतु आता तर माझी इच्छा आहे की येत्या चरखा जयंतीला एक तर ही आग पाहायला मी जिवंत राहायला नको वा हिंदुस्थानात फेरबदल झाला पाहिजे. यामुळे मला दीर्घायुष्य मिळावे म्हणून तुम्ही जरी इच्छा करत असाल तरी मी प्रार्थना करतो तसे तुम्ही करा.

आज बापूजींच्या मुखातून हृदयाच्या अगदी खोलवरून धाराप्रवाहाप्रणे एकेक वाक्य निघत होते आणि त्यात आज सकाळी बापूजी जे अतिशय गंभीरपणे म्हणाले होते

तेसुद्धा होते. आणि चोहोकडे निरव शांतता पसरलेली होती. प्रार्थनेनंतर फिरायला गेले तेव्हा श्री केली नावाच्या एका इंग्रज बंधूने . . . परवानगी घेऊन बापूंचा फोटो घेण्याचा प्रयत्न केला. अंधार होता, पण फोटोकरिता प्रकाशाची तर आवश्यकता असतेच ना? अवेळी सुरू असलेल्या प्रयत्नाबद्दल बापूजी म्हणाले, 'Please don't take'. ज्या गोष्टींबद्दल बापूजींची नाराजी होती तीच गोष्ट सकाळच्या वेळी समोर आली होती. सामान्यपणे बापूजींना फोटोवाले आधीच आवडत नसायचे. बापू म्हणाले, "आज तर विशेषेकरून ईश्वराचे नाव घ्यायला पाहिजे, त्याऐवजी हे!"

एवढ्यात कृपलानीजी, सुचेताबहेन, शंकररावजी, नंदिताबहेन वगैरे बरेच लोक आले.

फिरून येऊन पाय धूत असताना मी बापूजींना विचारले, "तुम्ही कोणत्या कामाकरिता उपवास करत आहा?"

बापूजी म्हणाले, "आजचा दिवस चरख्याचा जन्मदिवस समजला जातो. हा तर परमार्थी देव आहे. याच्या वाढदिवशी आपण उपावास करून पवित्र होण्याचा प्रयत्न करतो आणि परत परत प्रार्थना करत म्हणतो की हे चरखादेवा! आम्ही तुला शरण आलो आहो. तुझे शरणागत म्हणून आम्हांला ठेव. याकरिता माझा हा उपवास आहे. हा माझा जन्मदिवस आहे म्हणून मी या दिवसाचे महत्त्व वाढवून राहिलेलो आहे असे काहीही नाही."

फिरल्यानंतर मालीश, आंघोळ वगैरे नित्यक्रम. आंघोळ करून ८.३० वाजता बापूजी बाहेर आले. मीराबहेनने बापूजींच्या बैठकीसमोर कलात्मक पद्धतीने फुलांनी 'ॐ' आणि 'हे राम!' हे शब्द तयार केले. तसेच क्रॉसही तयार केला. आम्ही सर्वांनी त्यांना सुताचे हार घातले आणि त्यांच्या पाया पडलो. नंतर लहानशी प्रार्थना केली. प्रार्थनेकरिता पडितजी, इंदिराबहेन, घनश्यामदासजी, बिरलाजींचे संपूर्ण कुटुब होते. सरलाबेन बिरला आजारी असूनही आल्या होत्या. कन्हैय्यालाल मुंशी, सी. एच भाभा, डॉ जीवराज महेता, सरदारदादा

हे सुद्धा आले होते. अशा प्रकारे संपूर्ण खोली भरून गेली होती. सर्व धर्मांची प्रार्थना झाली. सुशीलाबहेन आणि मीराबहेन 'वंडरस क्रॉस' हे गीत गायील्या. आज आगाखान महालातील वाढदिवसाची आठवण येत होती. 'हे गोविंद ! हे गोपाल ! अब तो जीवन हारे' हे भजन म्हटले.

प्रार्थनेनंतर थोडा वेळ जवाहरलालजींबरोबर गोष्टी केल्या. सर्व गेल्यानंतर बापूजींना परत खोकल्याची उबळ आली. . . ते इतकेच म्हणाले, "अजून तुमचा खोकला गेला नाही."

बापूजी म्हणाले, "माझा राम असेल तर मिटेल. नाही तर असाच सुरू राहील असे वाटते. आता मला जिवंत राहण्याचा मुळीच मोह नाही. १२५ वर्ष जगण्याची इच्छा नाही. तम्हीसुद्धा ईश्वराला हीच प्रार्थना केली पाहिजे की हे ईश्वरा ! एक तर तू या म्हाताऱ्याला या दावानलातून उचलून घे आणि नाही तर हिंदुस्थानला सद्बुद्धी तरी दे. ब्रिटिशांशी झालेल्या लढाईत मी कधीही इतका हतबल झालेला नव्हतो. परंतु आज घरातील गोष्ट काय करू? भाऊ भावाला मारायचा प्रयत्न करतो आहे. हे पाहण्याकरिता जगण्याची माझी इच्छा नाही."

. . . मी म्हणाले, "बापूजी, तुम्ही तर १२५ वरून एकदम शून्यावरच आला?"

बापूजी - "असेच आहे, या दावानलातून बाहेर पडू शकलो तरच वाचेन."

सर्व गेल्यानंतर बापूजींनी गरम पाणी, सोडा आणि मध घेतले. सुशीलाबहेन कुरुक्षेत्रला गेल्या. एकामागून एक असे लोकांचे येणे सुरूच होते. त्यात गाडगीळ, देवदासकाका, लक्ष्मीकाकी आणि गोपू, मोहन, तारा, रामूवगैरे मुलेही आली होती. गोपूने तर किती तरी वेळा बापूजींना प्रणाम केला. सर दातारसिंहजी, ऑर्थर मूर, शण्मुखम चेट्टी, आले. ११.४० वाजता सरदारदादा आणि मणिबहेन आले. त्या दोघांनीही बापूजींना प्रणाम केला. नंतर प्रा. अब्दुल मजीद, ब्रह्मदेशाचे (म्यांमार) उच्चायुक्त एच. एल. ए. ऑग, आणि चीनचे उच्चायुक्त डॉ. एम. ऑग सू आले. त्यांनी बापूजींनाकरिता प्रधानमंत्र्यांची पत्रे आणि

फळेही आणली होती. असे सकाळपासून तर दुपारी १२,३०पर्यंत लोकांचे येणे सुरूच होते. १५ मिनिट झोपले, परंतु दर्शनार्थी तर येतच होते.

२ ते ३ एक तास सामूहिक कताई. बापूजींनीसुद्धा त्यात भाग घेतला. ४.१० वाजता लेडी माऊंटबॅटन आल्या. आज अभिनंदनपत्रांचा आणि तारांचा तर मोठा गठ्ठाच आला होता. आणि रुपये आणि दागिनेसुद्धा खूप आले होते. हुमायून कबीर, श्रीधराणीजी, फ्रांसचे एम. लोजिपर आणि त्यांची पत्नी आले होते.

सायंकाळी नियमानुसार प्रार्थना झाली. ऐक्यावर एक भजन होते. त्याबद्दल बोलत असताना बापूजी म्हणाले,

> "सूर्य, चंद्र, नदी, नाले हे सर्व निसर्गाच्या दृष्टीने एकच आहेत. गंगेच्या नीरमधून हिंदू जेव्हा पाणी पितो तेव्हा त्याला ते जितके गोड लागते आणि तुर्की, यहुदी म्हणा की हत्ती, घोडे म्हणा जेव्हा ते पाणी पितात तेव्हा त्यांनासुद्धा ते पाणी तितकेच गोड लागत असते. पाण्याजवळ कोणताही भेदभाव नसतो. सूर्य, चंद्र सर्वांना सारखीच ऊब आणि प्रकाश तसेच गारवा देत असतात. परंतु माणसात हा भेदभाव किती खोलवर शिरला आहे?
>
> "आज माझा वाढदिवस आहे. परंतु मी तर जन्मदिवस मानतच नाही. उपवास करा, प्रभुभजन करा, चरखा चालवा असेच मी म्हणेन. आज चीन, ब्रह्मदेश आणि इतर अनेक देशांचे लोक येऊन गेले. तारा आणि टपालही भरपूर येऊन पडला आहे. सर्व म्हणतात १२५ वर्ष जगा. एके काळी मी असा माणूस होतो की की ज्याचे सर्व लोक ऐकत होते. आज असे नाही. आज आपण पशू झालो आहो. मी ७९ वर्षापर्यंत पोहोचलो आहे आणि आता वाटते की लवकर निघून गेलो तर बरे होईल. जे लोक आपल्या भावाला शत्रू समजतात त्यांच्यात जगून मला काय करायचे आहे? आज आपण पशूपैक्षाही दुष्ट आणि वाईट झालो आहो.

ज्यांच्या मनात माझ्याबद्दल खरोखरच जर काही भावना असतील, जिव्हाळा वाटत असेल ते मला प्रमाण करतात की माझ्या पायाला हात लावून स्पर्श करतात याचे मला काहीही वाटत नाही. परंतु माझ्याबद्दल प्रेम वाटणारांनी आज माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने कोणाबद्दलही आपल्या मनात दुर्भावना ठेवायची नाही, कोणाबद्दलही क्रोधाची भावना ठेवायची नाही असा निर्धार करावा."

प्रार्थनेनंतर बापूजी थोडेसे फिरले. लोकांचे येणे तर सुरूच होते.

रात्री आकाशवाणीवर सुंदर कार्यक्रम होता. मी विनोदात बापूजींना म्हणाले, "आज तुम्ही रेडिओ ऐका." बापूजी म्हणाले, "त्यात काय ऐकायचे आहे? या रेडिओतील भजन ऐकण्यापेक्षा चरख्याचे संगीत का ऐकू नये? त्यामुळे दरिद्रनारायणाची सेवा तरी होते."

साडेनऊ वाजता बापूजी अंथरुणावर पडले. खोकला सतत त्रास देत होता. रात्री बापूजी मोठ्या मुश्किलीने दोनेक तास झोपले असावे.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

३ ऑक्टोबर १९४७

३.३० वाजता नियमानुसार प्रार्थना. काल रात्री बापूजींना रात्रभर झोप आली नव्हती. असे असूनही त्यांनी पत्राचे आणि 'हरिजन'चे काम केले. सुशीलाबहेन पै आलेल्या होत्या. फिरत असताना त्यांच्याबरोबर गोष्टी केल्या.

फिरल्यानंतर मालीश, आंघोळ. एनिमासुद्धा घेतला. दीनशा मेहतांचा उपचार सुरू आहे. आंघोळ घालत असताना डॉ. साहेबांनी विचारले, "या सामान्य आजारात तुमच्यासारख्या श्रद्धाळूला जर रामनाम काम करून राहिलेले नाही असे वाटत असेल तर सामान्य माणसाने काय करावे?"

बापूजी - "करील, करील, रामनाम जर हृदयापर्यंत पोहोचले असेल आणि मी जर इतर कोणत्याही गोष्टीचा आधार घेणार नसेन आणि श्रद्धापूर्वक रामनाम घेत असेन तर रामनामाने रोग मिटल्याशिवाय राहणार नाही. हे कदाचित मी समजावून सांगू शकत नसेन, परंतु ही वेगळी गोष्ट आहे."

आंघोळीनंतर जेवण केले. जेवत असताना बिरलाजी आणि मुंशीजींबरोबर गोष्टी केल्या.

शांतिकुमारभाईसुद्धा याच वेळी आले. हरिजनांना पाकिस्तानमधून हिंदुस्थानात मोफत आणायचे तर कंपनीला भरपूर तोटा येईल. बापूजी म्हणाले, "ज्यांच्याजवळ पैसा असेल त्यांनी पैसे द्यायलाच पाहिजे."

मणिबहेन थोडा वेळ येऊन गेल्या. . . . शहीद सुऱ्हावर्दीसाहेबसुद्धा येऊन गेले.

छातीवर गरम मातीचा लेप लावायला लावला आणि थोडा वेळ झोपले. गरम पाणी आणि मध घेतले. ४.३० वाजता कातले. राधाकांत मालवीय, मणिबहेन, सरदारदाद, डॉ. बसा - वाणिज्य आयुक्त, तुर्कस्तान अशा एकामागून एक मुलाखती सुरू होत्या.

दिवसासुद्धा खोकला चांगलाच त्रास देत होता. अमोनियम क्लोराईड भस्म आणि बनफशा घेतले.

अजूनही वाढदिवसाच्या शुभेच्छा देणाऱ्या तारांचे आणि पत्रांचे गठ्ठे येतच आहेत. पुष्कळ मुसलमान बांधवांच्या पण तारा आणि पत्रे येत आहेत.

आजच्या प्रार्थनासभेत बापूजी म्हणाले,

"किती तरी मित्र म्हणतात की काही संदेश वर्तमानपत्रांमधून प्रकाशित केले तर चांगले होईल. परंतु जनतेत आज अहिंसा आणि सत्य यांच्याबद्दल श्रद्धा राहिलेली आहे की नाही याबद्दल मला शंका वाटत असल्यामुळे इथे जनमताचा कायदा लागू होतो असे मला वाटत नाही.

"जिथे पाहावे तिथे सत्याग्रहाच्या नावाने दुराग्रह सुरू आहे असे दिसते. संप करणारे आपल्या जबाबदारीचे भान विसरले आहेत असे वाटते आणि एक प्रकारचे विष वातावरणात पसरून राहिले आहे. आपला निर्धार पूर्ण करण्याकरिता लोक वाटेल तो तर्क करतात आणि उलट्या रस्त्याने चालतात. यामुळे बिचाऱ्या निर्दोष लोकांना मार खावा लागतो. माझे तर असे मत आहे की वाईट काम करणारे जे कोणी असतील ते सारखेच अपराधी आहेत.

"जे लोक सत्याग्रह करायला निघाले आहेत त्यांना माझा नम्रतापूर्वक सल्ला आहे की आपण खरोखर सत्याच्या मार्गाने चाललो आहो की नाही याबद्दल त्यांनी स्वतःच्या अंतःकरणाला विचारावे. जे अहिंसेचे अनुसरण करत नाहीत त्यांनी केलेल्या सत्याग्रहाला सत्याचा आधार मुळीच असू शकत नाही. अहिंसेशिवाय सत्याचा शोध लागूच शकत नाही."

ट्रेड युनियनच्या एका बांधवाने बापूजींना अभिनंदनपर पत्र पाठवले होते. त्यात त्याने लिहिले होते की “तुमचे ध्येय, कार्य पूर्ण करण्याकरिता तुम्ही १२५ वर्ष जगण्याची इच्छा ठेवायलाच पाहिजे. आजपर्यंत तुम्ही किती मोठी सिद्धी मिळवली आहे!”

याचा उल्लेख करत बापूजी म्हणाले,

“या बंधूंच्या गोष्टींच्या मोहात मी कसा पडू शकतो? मला वाटते की मी माझा भूतकाळ विसरून जायला पाहिजे. मी जर जनतेला माझे म्हणणे समजावून सांगू शकत असेन आणि त्याचे ते अनुसरण करणार असतील तरच मी त्यांची सेवा करू शकेन. मी तर ईश्वराच्या हातात आहे. माझ्या हातून त्याला जे काम घ्यायचे असेल ते तो घेईल. परंतु मी कबूल केले पाहिजे की माझ्या शब्दांचे एकेकाळी जसे वजन पडत होते ते आज पडत नाही. यामुळे प्रभू जर मला बोलावून घेईल तर ते चांगले होईल.”

निर्वासितांच्या छावणीत घाण आहे. मी जर त्या कामाची जबाबजारी घेण्याकरिता समर्थ असतो तर मी सर्वात आधी साफसफाईचे काम हाती घेतले असते. अस्पृश्यतेच्या कलंकामुळे हिंदू धर्माचे नाव किती कलंकित झाले आहे? हा कलंक दूर करण्याचा उपाय सर्वांनी भंगी होऊन स्वतःची साफसफाई स्वतः केली पाहिजे. भंग्याचे काम घाणेरडे काम नाही. या कामामुळेच समाजाची स्वच्छता, आरोग्य टिकून राहते, सर्व काही चांगले राहते.

लोकांनी स्वावलंबी होणे शिकायला पाहिजे. आणि प्रत्येक माणूस जर लहानमोठे काम करून दाखवील तर माझी खात्री आहे की तो आपले दुःखसुद्धा विसरेल. या लोकांवर अपार दुःखाचे डोंगर कोसळले आहेत याची मलाही जाणीव आहे. परंतु खरा मार्ग वाईटाशी वाईटपणा करण्यात नसून चांगूलपणाचे वर्तन

करण्यात आहे. दुष्टपणाचे उत्तर साधूपणाने देण्यातच आपल्या देशाची उन्नती आहे.”

प्रार्थनेनंतर थोडे फिरले. थोडा वेळ बापूजींनी गरम पाण्यात बुडवून ठेवले. प्रवचन पाहिले. ८.१०ला पंडितजी आले. ८.४५ वाजता बापूजी अंथरुणावर पडले.

बारा वाजेपर्यंत मी बापूजींजवळच होते. मोटी बाची (कस्तुरबा) आठवण करत म्हणाले, “बाला खोकला व्हायचा आणि कोणाच्या ना कोणाच्या आधाराची तिला गरज पडायची. बाच्या शेवटच्या दिवसांत तुरुंगात तिचे डोके मांडीवरच ठेवावे लागायचे. सध्या माझे हाल तसेच आहेत.” बापूजींना तापसुद्धा होता. आजारात बापूजींना बाची किती आठवण येत असते हे अशा अवस्थेत असताना बापूजी जे तुटक तुटक वाक्य बोलतात त्यावरून कळते. पूर्ण रात्र अस्वस्थतेच गेली. कफमध्ये रक्तसुद्धा आले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

४ ऑक्टोबर १९४७, शनिवार

अखेरीस बापूजींचा २.४५ वाजता डोळा लागू शकला. प्रार्थनेकरिता ते ४.१२ वाजता उठले. प्रार्थनेनंतर गरम पाणी घेऊन 'हरिजन'करिताचे श्रुतलेखन करवून घ्यायला सुरुवात केली.

५।। वाजता बापूजी फिरले. फिरून आल्यानंतर पाय धुतले. तापामुळे आज मालीश करवून घेतली नाही. कालपासून दूध घेणे बंद केले आहे. अंगागातून अशक्तपणा जाणवतो. एनिमा घेतला आणि आंघोळही केली. आंघोळ करून आल्यानंतर भाजीच्या सूपात थोडेसे सोडियम क्लोराईड टाकले. बनफशाला (एक युनानी आणि आयुर्वेदात सांगतलेली औषधी जडीबूटी) नाही म्हणाले. ९.१०ला माती. छातीवर ऍन्टिप्लॉजेस्टिनऐवजी गरम माती. या भागावर मातीचा लेप लावून त्यावर गरम पाण्याची थैली ठेवायला लावली. एक तास ही माती ठेवली. १०.१०ला माती काढली.

अशा प्रकारे दर ३-३ तासाला गरम माती ठेवायची आहे. त्यानंतर मोठ्या पहाटेपासून तर आतापर्यंत अभिनंदनपर ज्या तारा आल्या होत्या त्या सर्व पाहिल्या. ६ अंस रस आणि ६ अंस गरम पाणी मिसळून घेतले. त्यात थोडा ग्लुकोज टाकला.

११ वाजता बापूजींना गरम माती लावली. साडेबारा वाजता वाफारा घेतला. २ वाजता बापूजींचा परत डोळा लागला. ३ वाजता उठले. किती तरी तारा आणि पत्रे पाहिली. ३ वाजता परत गरम माती. ३ ते ४ माती ठेवली. ३।। वाजता शांतिकुमारजी भेटायला आले. लक्ष्मीदासभाई आले होते. ४.३० वाजता वाफारा घेतला. ५ वाजता कताई. ५।। वाजता सूप घेतला. ६ वाजता प्रार्थना. आजच्या प्रार्थनेत बापूजी म्हणाले,

"सुशीलाबहेन नाय्यर हिंदू-मुसलमान निर्वासितांमध्ये डॉक्टरी औषधोपचार करण्याकरिता जात असतात. दररोज ३-४ तास पुराना किल्ल्यात मुसलमान

निर्वासितांमध्ये घालवत असतात. कुरुक्षेत्राच्या छावणीत काल होरॅस अलेक्झँडर आणि रिचर्ड सायमंड्सना घेऊन त्या गेल्या होत्या. तेथील निर्वासितांची संख्या २५,००० आहे. त्यांची परिस्थिती करुण आहे. निर्वासितांकरिता पुरेसे तंबूसुद्धा नाहीत. खाऊ घालायला पुरेसे अन्न नाही. अशक्तपणामुळे खूप रोगराई पसरली आहे. कपडेसुद्धा नाहीत. हे सर्व दुःख पाहिल्यानंतर मी सांगितल्याशिवाय राहू शकत नाही की एक पक्ष जर थोडा शांत राहून धैर्याने सरकारला जर शांततापूर्वक काम करू देईल आणि जनता जर कायदा हातात घेणार नाही तर या संकटाची गणना एका लहानशा संकटात होईल याबद्दल मला शंका नाही. या संकटापासून आता जरी आपण काही शिकू शकलो तर नवीन संकटापासून आपण वाचू. परंतु आज तर घातपाताच्या स्पर्धेत कोणती जात वा जमात उतरलेली नाही? एक काळ असा होता की माझे शब्द जनता प्रेमाने झेलत होती. आजही कदाचित माझ्यावरील जनतेचे प्रेम कमी झालेले नसेलही. असे तर नाही की गुलामगिरीत जनता माझा जप करत होती, परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तिला माझा जप करण्याची आवश्यकता वाटत नसावी. की मानवता आणि संस्कृतीला फेकून देऊन स्वच्छंदतेप्रमाणे वागणे हाच स्वातंत्र्याचा अर्थ आहे? परंतु इतक्या वर्षांपासून माझ्याकडून तुम्हांला सत्य आणि अहिंसेचा जो संदेश मिळाला आणि त्याच्या परिणामामुळे आज जगात आपले जे नाव झाले आहे त्याला जर तुम्ही लज्जित कराल तर मला आता जगण्याची इच्छा नाही. या भूमीत रामराज्याचा अंमल सुरू होण्याच्या आशेने मी तर १२५ वर्ष जगण्याची इच्छा ठेवत होतो आणि त्याकरिता ईश्वराला प्रार्थना करत होतो. परंतु आज जगण्याची इच्छाच राहिलेली नाही. लाचार होऊन या करूण घटना पाहत राहाण्यात काय अर्थ आहे? मी ईश्वराला प्रार्थना करत

असतो की हे प्रभू ! एक तर या माझ्या लोकांना त्याची चूक दाखवून त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याची शक्ती मला दे अथवा मला उचलून घे."

हिवाळा जवळ येत असल्यामुळे निर्वासित बंधूभगिनींकरिता कांबळी आणि गरम कपडे पाठवण्याची त्यांनी विनंती केली. त्याचबरोबर हे कपडे कोणाला द्यायचे यासंबंधी कोणतीही अट नसावी असेही त्यांनी सांगितले.

प्रार्थनेनंतर प्रवचन तपासले. भाषण करत असतानासुद्धा त्यांना एकदा खोकल्याची उबळ आली होती. ६.५० वाजता पंडितजी आले. आज गरम पाण्यात मोहरीचा पूड टाकली आणि त्यात पाय बुडवून ठेवले. डॉ. जीवराजभाई महेता बापूजींकडे ७.३० वाजता आले. बापूजींजवळ येऊन ते उभे राहिले. बापूजी म्हणाले, "डॉक्टर!. मी एक नवीन डॉक्टर ठरवला आहे, डॉ. रामजी !" सर्व खळखळून हसले.

डॉ. जीवराजभाईंनी छाती, पोट सर्व तपासले. खोकल्यामुळे सर्वत्र पोट दुखत होते. कापराचे तेल चोळायला सांगितले.

९ वाजता परत खोकल्याची जोरदार उबळ आली. डॉ. . . . ने मध घालून अडुळसा घ्यायला सांगितले.

बापूजी म्हणाले, "आज जास्त फिरलो. आता काहीही करायचे नाही. या जगातून माझा लोप झाला पाहिजे, आणि तोही रामनाम घेता घेता असेच मला वाटते. यात किती रहस्य भरलेले आहे हे मी कोणालाही समजावून सांगू शकत नाही. माझ्यात हे कौशल्य नाही."

डॉ. . . . म्हणतात, "रामनामाबरोबर उपचारही करून घ्याल तर चांगले व्हाल. हा आजार असा काही भयंकर आजार नाही की ज्याकरिता तुम्ही तुमचा जीव धोक्यात टाकला पाहिजे."

बापूजी - “मी कुठे म्हणतो की हा आजार भयंकर आहे? माझे तर म्हणणे आहे की हा भयंकर होण्यापूर्वीच मी इथून निघून जायला पाहिजे. सध्या तर कसे तरी करून जीवन जगतो आहे. मला तर आता मृत्यूच प्रिय आहे. दुसरे काहीही नाही . . . “

बापूजींजवळ जागे राहण्याकरिता आता सुशीलाबहेनने क्रम ठरवून दिला आहे.

रात्री २ ते ४ माझी वेळ आहे. मी २ वाजता त्यांच्याजवळ गेले तर म्हणाले, “आलीस, बाजवळसुद्धा तू रात्री २ त ४ वाजताच जागी असायची. नाही काय?” बापूजींना सर्व काही आठवत असते! पू. मोटीबाच्या आजार, आगाखान महालातील घटना कालपरवाच अगदी ताज्या घडल्या असाव्या त्याप्रमाणे त्यांना आठवत असतात आणि त्याबद्दल बोलत असतात.

माझ्या पाळीत  बापूजींना दोनदा उबळ आली होती. परंतु एकंदरित रात्र बरी गेली. ३.३० वाजता प्रार्थनेच्या वेळी बापूजी गाढ झोपेत होते. उठवले, पण उठले नाही. मी म्हणाले, “चांगले आहे, झोपू द्या.” परंतु बापूजी ४ वाजता जागे झाल्यामुळे प्रार्थना उशिरा झाली. हे त्यांना आवडले नाही. म्हणाले,

> “प्रार्थनेच्या वेळीच प्रार्थना झाली पाहिजे. याता आजाराचे निमित्त चालू शकत नाही. रामनाम घेत असताना जर मृत्यू झाला तर त्याहून अधिक चांगला मृत्यू कोणता? मला विश्वास वाटत असतो की मला जरी झोप आली नाही तरी मला जागवणारे आहेत. पण याला तर विश्वासघातच म्हणावे लागेल. मला हे आवडले नाही. प्रभूची प्रार्थना करण्याकरिता मला जागवण्यात दया कशाची? मी याला दया समजत नाही. कमीतकमी मी तुझ्याकडून तरी अशी अपेक्षा केली नव्हती.”

नवी दिल्ली,

५ ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना झाली. फिरायला जाण्यापूर्वी बापूजींनी मोसंबीचा रस आणि ग्लुकोज घेतला.

साडेआठ वाजता भाजीचे सूप घेतले. त्यात थोडे सोडियम क्लोराईड टाकायला लावले. ९.३५ वाजता होरॅस अलेक्झँडर आले. त्यांच्याबरोबर पडल्या पडल्या गोष्टी केल्या आणि ते गेल्यानंतर झोपले. ९.४५ ला जागे झाले. १०.३० वाजता कृपलानीजी आणि सुचेताबहेन आले. त्यांनी अतिशय दुःखाने काँग्रेसमधील सडणीसंबंधीच्या गोष्टी केल्या. वाफारा घेता घेता बापूजींनी उत्तर दिले, “मी अभ्यास करतो आहे. यामुळे मी सर्व काही दाबून बसलो आहे. केव्हा काय करायचे हे मला माहीत नाही.” ११ वाजता बापूजींनी माती घेतली. १२ वाजता काढली.

‘हरिजन’करिताच्या लेखाचे आज श्रुतलेखन करवून घेतले. लेख इंग्रजीत होता. (या लेखाकरिता पाहा १२ ऑक्टोबर १९४७च्या हरिजनबंधूत “दुःखाचे कारण नाही”.)

साडेबारा वाजता संत्र्याच्या ८ अंस रसात ग्लुकोज टाकून ते घेतले. २.३० वाजता द्राक्षे घेतली. राघवनजी दांपत्य भेटायला आले. सुभाषबाबूंच्या गोष्टी करता असताना त्यांचे डोळे पाण्याने भरून आले.

३.१५ला कॅनडाचे उच्चायुक्त आले. ४ वाजता छातीवर आणि गळ्यावर माती घेतली. ५ वाजता काढली. एक संत्रे आणि सूप ५ वाजल्यानंतर घेतले. कातले. नंतर थोडेसे लिहिले. ताप तर होताच. ६ वाजता प्रार्थनेकरिता गेले.

आज १२ नवीन कांबळी आली आहेत. वर्तमानपत्रात बापूजींच्या प्रकृतीची बातमी आलेली असल्यामुळे त्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्याकरिता ताराही आल्या. त्यासंबंधी बोलताना बापूजी म्हणाले,

"मला थोडेसे सर्दीपडसे, खोकला आणि ताप आहे. परंतु काळजी करण्यासारखे काहीही नाही. वर्तमानपत्रांना ही बातमी कोणी दिली हे माहीत नाही. परंतु अशा बातम्या छापून कोणाचाही काहीही फायदा नाही ही गोष्ट मी वर्तमानपत्रवाल्यांना सांगू इच्छितो."

नंतर बापूजी म्हणाले,

"एका भाईची एक तार आली आहे. आता इथे येण्यापूर्वीच मी ती वाचली. तिच्यात लिहिले आहे, 'हिंदू आणि शिखांनी जे केले ते जर केले नसते, त्यांनी जर अशा प्रकारे बदला घेतला नसता तर तुम्ही जिवंत राहिला नसता. तुम्ही भोळे आहा. तुम्हाला मूर्ख बनवण्यात येत आहे." वगैरे. मला हे विधान मान्य नाही. समजा की मुसलमान कदाचित धोकाही देतील. पण धोका देण्यावर काही कोणाचा एकाधिकार नाही. घाबरून आपण जर साडेचार कोटी मुसलमानांना इथून हलवले तर ही भ्याडपणाची गोष्ट होईल.

"माझे जीवन तर ईश्वराच्या हाती आहे. त्याच्या इच्छेशिवाय पानही हलू शकत नाही. ईश्वराशिवाय इतर कोणीही कोणाचेही जीवन वाचवायला समर्थ नाही.

"गावखेड्यात असंख्य मुसलमानांची वस्ती आहे. ते सर्व जर धोकेबाज असतील तर इस्लाम धर्माचा आपोआपच नाश होईल.

"मी इंग्रजांचा वर्षांपासूनचा मित्र असल्यामुळे चर्चिलसाहेबांचे आजचे भाषण मला खुपले. राष्ट्रहिताच्या नावाने आपल्या पक्षाला पुढे आणण्याचा चर्चिलसाहेबांचा सुप्त हेतू आहे. हिंदुस्थान त्याच्या सात लाख गावांमध्ये वसलेला आहे हे त्यांना कुठे माहीत आहे? सज्जन आणि चांगल्या लोकांनाच स्वातंत्र्याचा हक्क आहे काय?

"दोन्ही पक्षांच्या इच्छेप्रमाणे हिंदुस्थानमधील ब्रिटिश सत्तेचा अंत घडवून आणला गेला आहे. हे भव्य काम आहे. आता इतक्या दिवसांनंतर याबद्दल तक्रार करणे चर्चिलसाहेबांना शोभत नाही.

"ब्रह्मदेशाला ब्रिटिश साम्राज्यातून काढून टाकण्याच्या मूर्खपणाच्या कामाचा चर्चिलसाहेबांनी विचार केला आहे आहे काय? हिंदुस्थानला कशा प्रकारे गुलाम करण्यात आले होते याचा काही विचार त्यांनी केला काय? परंतु या काळ्या कथेची मला अशीच आठवण होऊन राहिलेली नाही. सात लाख गावांना कदाचित वेड जरी लागले असेल तरी ते स्वतंत्र आहेत याचे मला समाधान आहे. आता इंग्रज येऊच शकणार नाहीत. जग त्यांना येऊ देणार नाही. 'युनो' आहे खरे, परंतु मी जरी एकटा असलो तरी मी दृढपणे म्हणेन की, खबरदार! आता आम्हांला कोणीही गुलाम करू शकणार नाही, नाश करू शकेल. ही माझी प्रतिज्ञा आहे. मी तर आज आहे आणि उद्या नाही. आपण परत परत विचार केला पाहिजे आणि आपले पशुत्व सोडले पाहिजे. प्रभू तुमच्याकडून माझ्या प्रतिज्ञेचे पूर्णपणे पालन करवून घेवो. आणि चर्चिलसाहेबांची अमंगल पूर्वसूचना खोटी ठरवो."

प्रार्थनेनंतर बापूजी आतच फिरले. गोपूबरोबर थोडा वेळ खेळले. मुलांबरोबर बापूजी खूप ताजेतवाने होऊन जातात. नंतर गरम पाण्यात ५ मिनिट पाय ठेवून ते धुतले. पंडितजी आले. पाऊण तास बसले. 'हरिजन'करिताचे लेखन तपासले. ९ वाजता अंथरुणावर पडले, परंतु खोकला जोरात होता.१० वाजेपर्यंत बसूनच होते. रात्र बरीच चांगली गेली.

नवी दिल्ली,

६ ऑक्टोबर १९४७

३.३० वाजता बापूजी प्रार्थनेकरिता उठले. आज सुशीलाबहेनलासुद्धा १०४ डिग्री ताप होता. बापुजींचा खोकलासुद्धा सुरूच आहे. आजारपणाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रार्थनेनंतर गरम पाणी, मध आणि बनफशा घेतले. ठरल्याप्रमाणे गरम पाण्यात ५ मिनिट पाय बुडवून ठेवले. मालीश, बस्ती, कॉम्प्रेसड आंघोळ वगैरे दोन तास चालले. आंघोळीनंतर लसूण, सोडियम क्लोराईड, टाकून भाजीचे सूप घेतले. १२ वाजता जमनादासभाई द्वारकादास आले. मौनवार असल्यामुळे सर्व काही शांत आहे. मुसलमानभाईसुद्धा भेटून गेले.

११ वाजता गरम माती घेतली. १२ वाजता ती काढली. १२।। वाजता ८ अंस संत्र्याच्या रसात ८ अंस गरम पाणी टाकून ते घेतले. बाहेरच्या मुलाखती बंद आहेत.

गोविंद वल्लभ पंतजी, सर पुरुषोत्तभाई, मणिबहेन, गाडगीळजी, अनुग्रहबाबू हे सर्व भेटायला आले होते. बापूजींनी ४।। वाजता अंगूर आणि १ संत्रे घेतले. नंतर कातले. परत गरम माती पोटावर आणि घशावर घेतली. सायंकाळी ५। वाजता काढली. नंतर बापूजींनी प्रार्थनाप्रवचन लिहिले. बारीक ताप तर आहेच. सुशीलाबहेनलासुद्धा आज दिवसभर खूप ताप होता. बापूजींच्या खोकल्यात अजून कोणतीही विशेष सुधारणा नाही.

आजच्या प्रार्थप्रवचनात बापूजी प्रामुख्याने अन्नधान्याविषयीच बोलले. ते असे म्हणाले,

> "आपण जर श्रम करायला शिकलो आणि आपल्यामध्ये जर आत्मश्रद्धा असली तर आपल्याला विदेशातून अन्नधान्य मागवायची आवश्यकताच पडणार नाही. आपल्याकडे विशाल जमीन आहे. मोठमोठ्या नद्या आहेत. आणि

आपल्याजवळ तितकेच पशुधन आहे. आपण जर थोडासा विचार केला तर मी म्हणेन की आपण जर आपला आळस कमी करून काम करत गेलो आणि आपसात भांडलो नाही तर आपण बाहेरच्या जगात आज जिथे खाद्यान्नाचा तुटवडा आहे तिथे विदेशांनाही अन्नधान्याच्या बाबतीत आपण मदत करू शकू. हे काही मी अहंकारात वा अविचाराने सांगून राहिलेलो नाही. आज तर परिस्थिती अगदी या विचारांच्या उलट आहे. इतरांना मदत करायची गोष्ट तर बाजूला राहिली, परंतु आपल्यालाच इतर देशांना अन्नधान्याची वा कापडाची मदत मागावी लागते आहे ही आपल्याकरिता लाजेची गोष्ट आहे. आणि विदेशांकडून आपल्याला ३% मदत मिळू शकते. यामुळे आपण जर विदेशांना मदत मागू लागलो तर आपण उलट्या दिशेने चालू लागू. एकाच केंद्राकडे संपूर्ण अन्नधान्याच्यी व्यवस्थेची जबाबदारी असणे ही विषम परिस्थिती आहे. एकेका इंचात खाद्यपदार्थांचे उत्पादन करणे आवश्यक आहे. आपल्या गावखेड्यातील लोक कठीण अशी अन्नधान्याची शेती चांगल्या प्रकारे करू शकतात.

“याशिवाय खाण्यात जर आपण संयम पाळला तर हिंदुस्थानात बऱ्याच अन्नधान्याची बचत होऊ शकते. परंतु आपल्याला इतका संयम पाळण्याची इच्छा नाही.

“जे गावकरी अन्नधान्य उत्पन्न करतात त्यांना जर त्यांचा वाटा विकायची सूट दिली तर मला वाटते की काळ्याबाजाराचा अंत होईल. सर्वांना धान्य मिळेल आणि कोणीही संग्रह करणार नाही.

“अध्यक्ष ट्रुमनने अमेरिकी लोकांना ब्रेड कमी खाण्याचा सल्ला दिला आहे. मानवसेवा करण्याकरिता त्यांनी आपल्या प्रजेला हा सुंदर सल्ला दिला आहे.

याकरिता ते अभिनंदनाकरिता पात्र आहेत. आणि विशेष म्हणजे हा सल्ला त्यांनी आपल्या युरोपमधील बांधवांकरिता दिला आहे हे विशेष.

"इथे तर आपल्या स्वतःच्या हिताकरिताच आपल्याला हा संयम पाळायचा आहे. यामुळे सध्या आपल्या राष्ट्रात जी अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली आहे ती दूर करण्याकरिता प्रत्येक हिंदुस्थानी तन, मन आणि धनाने शक्य तितकी मदत करून यशाची ही संधी गमावणार नाही अशी मी आशा करतो."

प्रार्थनेनंतर समाजवादी पक्षाच्या सदस्यांबरोबर चर्चा केली. चर्चा एकांतात झाली. नंतर गोपूसोबत आजही खूपच खेळले.

८।। वाजता डॉ. भार्गव आणि डॉ. पी. जी. ढांढा आले. पेनिसिलिन घेण्याकरिता बापूजींची समजूत घालू लागले. बापूजींनी एकच गोष्ट सांगितली आणि ती म्हणजे रामनामाची. "माझ्या अंतःकरणात जर रामनाम उतरले तर मी दोन दिवसातच दुरुस्त होईन. परंतु अजून असे नाही. यामुळे माझी ढिलाई आहे, परंतु पेनिसिलीन तर घेऊच शकत नाही. तुम्ही जसे विज्ञानाचा शोध घेणारे आहा तसाच मी रामनामाचा शोध घेणारा आहे. जर मी त्याचा शोध लावू शकलो तर ठीक आहे, नाही तर त्याचा शोध घेता घेता चाललो जाईन. याकरिता तीन आठवडे जरी लागणार असतील तर लागू दे. यात मी काय आहे याचीही परीक्षा होईल."

साडेनऊ वाजता बापूजी अंथरुणावर पडले. झोपताना परत बनफशा घेतला. झोपत असताना तर खूपच मोठी खोकल्याची उबळ आली होती. परंतु एखाद तासानंतर ती आपोआपच शमली. रात्र बरीच शांततेत गेली.

नवी दिल्ली,

७ ऑक्टोबर १९४७

रोजप्रमाणे ३.३०वाजता उठले. हाततोंड वगैरे धुऊन प्रार्थना केली आणि नंतर बापूजींनी काही काम केले.

बापूजी थोडा वेळ आडवे पडले. आराम घेतला. ६ वाजता फिरत असताना आजाराबद्दलच्या गोष्टी निघाल्या. मी बापूजींना म्हणाले, "समजा की कोणाचे हाड मोडले असेल आणि तो माणूस जर रामनाम घेत असेल तर त्याचे हाड आपोआप जुळेल काय?"

बापूजी - "रामनाम जर हृदयस्थ झाले असेल तर हाड जरी जुळले नाही तरी तो त्याची काळजी कशाला करील? तो तर जसा राम ठेवील तसाच राहील. रामनाम खोटे नाहीच. त्याची उपासना करणारा खोटा असू शकतो."

फिरून आल्यानंतर बापूजींनी आजारी सुशीलाबहेनला पाहिले. नेहमीप्रमाणे गरम पाण्यात ५ मिनिट पाय बुडवून ठेवले. मालीश, एनिमा, आंघोळ इत्यादींकरिता एक तास. ८.५३ला मौलानासाहेब आले.

मौलानासाहेब सिगारेट ओढत असतात. ते येतात तेव्हा राख टाकण्याकरिता एक लहानशी ताटली त्यांच्याजवळ ठेवायची असते. ती ठेवायला मी विसरले. परंतु बरे नसूनही बापूजी उठले आणि एक लहानशी ताटली त्यांच्यासमोर ठेवली. मी समोरील न्हाणीघरातून निघाले आणि हे दृश्य पाहिले. मला खूपच लाजिरवाणे झाले. मौलानासाहेब तर थक्कच झाले आणि काही वेळ ते काहीही बोलू शकले नाही. मग बापूंना म्हणाले, "तुम्ही का त्रास घेतला? तुम्ही सेवा करण्याऐवजी आम्हीच तुमची सेवा करायला पाहिजे."

हसत हसत बापूजी म्हणाले, "कधी कधी मला तुमची सेवा करायची संधी मिळाली तर मला ते फार आवडते हे तुम्हाला माहीत आहे काय?"

आजपासून बापूजींना दूधवटी सुरू केली आहे. दर दोन तासांनी ४-४ अंस दूध घ्यायचे आहे. १०-१२-२-४पर्यंत आणि संध्याकाली ५ वाजता वाफाळलेली भाजी, सूप आणि ३ संत्री. आजपासून असा आहार राहणार आहे. शिवाय १ वाजता छातीवर आणि गळ्यावर गरम माती, पोटावर थंड माती. २ वाजता माती काढून कताई केली. जवाहरलालजी आले. ५।। वाजता नरहरीभाई आणि लक्ष्मिदासभाई आले.

नियमानुसार ६ वाजता प्रार्थना झाली. आमचे आजार सुरूच आहेत. यामुळे मुलाखती पूर्णपणे बंद आहेत. बापूजींच्या सेवेत सर्व वेळ जात असतो. यामुळे दररोजच्या माणसांशिवाय बाहेरील मुलाखती, टपालाचे कामकाज हे सर्व कमी करून टाकले आहे.

बापूजींना ज्या शुभकामना मिळाल्या आहेत त्याबद्दल आजच्या प्रार्थनासभेत त्यांनी आभार मानले, नंतर प्रत्येक काँग्रेसीने अंतःकरणापासून शूर राहिले पाहिजे, धीर ठेवला पाहिजे हे सांगत बापूजी म्हणाले,

> "पाकिस्तानमध्ये राहणारे हिंदू सुरक्षित नाहीत तसेच हिंदुस्थानात राहणारे मुसलमान सुरक्षित नाहीत. दोन चुकीच्या कामाची बेरीज एक चांगले काम थोडेच होऊ शकते? आणि जर बदलाच घ्यायचा असेल तर कायद्याप्रमाणे सरकार बदला घेईल. तुम्ही व्यक्तिगत बदला घेऊ नका. माझा तुम्हाला सल्ला आहे आहे की तुम्ही तुमच्या धर्माशी, देशाशी निष्ठावंत राहा. गत साठ वर्षांपासून मी काँग्रेसची सेवा केली आहे. तुमचे जे मंत्री आहेत ते जर तुम्हांला पसंत नसतील तर तुम्ही त्यांना हटवू शकता. परंतु तुम्ही असे वाह्यातपणाचे काम करू नका. अन्नधान्याबद्दल मी काल तुम्हांला सांगितले होते, त्यावर मी कायम आहे. समितीच्या तज्ज्ञांना जर ती मान्य नसेल तर वेगळी गोष्ट आहे. परंतु माझे स्पष्ट मत आहे की तसे केल्याने चोवीस तासात अन्नधान्याची समस्या सुटेल.*

"पुष्कळ लोकांची माझ्याजवळ तक्रार आली आहे की मंत्री लोक ब्रिटिश शासनाप्रमाणे हुकुमशाहीचे वर्तन करतात. असे जरी असेल तरी मंत्र्यांची यासंबंधात माझ्याशी कोणत्याही प्रकारची सल्लामसलत झालेली नाही. परंतु मी इतकी सावधगिरीची सूचना देईन की ही हकिगत कोणत्याही मंत्र्याबद्दल जर खरी असेल तर त्याने सावध होऊन आपली चूक सुधारली पाहिजे. आणि ज्या ब्रिटिश अंमलावर तुम्ही टीका करत होता त्यात तुम्ही फसू नका. याबद्दल खूप सावधगिरी बाळगा. ही गोष्ट मला वेगवेगळ्या प्रांतातील वेगवेगळ्या पत्रांमधून कळली आहे. त्यावरूनच मी हे सांगतो आहे.

"परंतु लोकांना मात्र माझे सांगणे आहे की तुम्ही सरकारबद्दल निष्ठावंत राहा आणि सरकारला मजबूत करा. जवाहरलाल तर खरोखरच आपला खराखुरा अमूल्य जवाहर आहे. माझा धर्म मला सर्व धर्मांचा आदर करायला शिकवत असल्यामुळे मी सनातनी हिंदू म्हणवला जातो. आणि हे रामराज्याचे रहस्य आहे. परंतु हिंदुस्थान केवळ हिंदूंकरिताच असावा अशी अपेक्षा तुम्ही जवाहर वा सरदारकडून जर ठेवाल तर ही रोगट अपेक्षा होईल. आणि या मार्गाने हिंदूंचा खरोखरच विनाश होईल."

प्रार्थनेनंतर डॉ. राम मनोहर लोहिया आणि अच्युत पटवर्धनबरोबर गोष्टी केल्या. प्रवचन तपासले. ९ ९.०५ला बनफशा घेऊन झोपायची तयारी.

नवी दिल्ली,

८ ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थनेकरिता ३ ३० वाजता उठले. बापूजींजवळ रात्री जागावे लागले होते. हाततोंड धुऊन प्रार्थना. प्रार्थनेनंतर गरम पाणी पिऊन एकदोन पत्रे पाहत असतानांचा बापूजींचा डोळा लागला.४.३० ते ६.३० झोपले. ६.30 वाजता फळांचा रस घेतला. बनफशा पण घेतला. मोठ्या पहाटेसच बापूजी फिरले. बापूजींची मालीशसुद्धा मोठ्या पहाटेसच झाली. मालीश करत असताना बराच खोकला येत होता. बस्ती पण घेतली.

आंघोळ सुरू असतानाच वर्तमानपत्रातील बातम्या ऐकल्या. आघोळ करत असताना फारसा खोकला आला नाही. "पूर्व पंजाबमध्ये जे निर्वासित आहेत त्यांना आम्ही परत घ्यायला तयार आहो, जे हिंदुस्थानात इतर ठिकाणी गेले असतील त्यांना आम्ही घेणार नाही" असे लियाकत अली खान म्हणाल्याचे वृत्त वर्तमानपत्रात होते.

बापूजी म्हणाले, "याचे नाव, 'विनाशकाले विपरीत बुद्धी'". इतके म्हणून ते मौन राहिले. आणि यामुळे त्यांना झालेल्या खोलवर दुःखाची व्यथा त्यांच्या चेहऱ्यावरील गांभिर्यावरून स्पष्टपणे दिसून पडत होती. ८.३० वाजता आंघोळ उरकली. बिरलाजी आले. त्याच्याबरोबर तर प्रकृतीसंबंधीच गोष्टी झाल्या. आराम घेतला. लाहोरचे मुकुंदलालजी आले. १० वाजता दूध सुरू झाले. ६ अंसापासून सुरुवात केली. ११। वाजता गळ्यावर आणि छातीवर गरम माती घेतली. पोटावर थंड माती. १२ वाजता माती काढत असताना सहजपणे कुठे मातीचा डाग तर लागला नाही ना असे बापूजी विचारायचे. बापूजी म्हणाले, "कपड्यांवर थोडीशी मातीसुद्धा कशी वाटेल? परिचारिकेने केलेली लहानशी चूकसुद्धा कशी चालेल? असे कळते की रुग्णाची जबाबदारी डॉक्टरपेक्षाही परिचारिकेवर अनेक पटींनी जास्त असते. परिचारिकेची थोडीशीही चूक कशी सहन करता येईल? उद्या दुधात

चुकून सोमल पडला आणि मी ते प्यालो तर 'लहानशी तर चूक होती' असे तू म्हणशील काय?"

बेफिकीरपणामुळे कपड्यांना चिकटलेली माती त्यांनी खरडायला लावली. साबण आणि पाणीही भरपूर वापरायला लावला. बापूजींची वृत्ती पाहता ही फार मोठी गोष्ट आहे.

मीराबहेनलासुद्धा ताप आला आहे. दुपारी मी त्यांच्या शुश्रूषेकरिता थांबले.

दुपारी येणारात सरदारदादा, सर पुरुषोत्तमदास, राजकुमारीबहेन होते. अजून विशेष असे कोणी आले नव्हते.

संपूर्ण दिवसात २४ अंस दूध घेतले. सायंकाळी भाजी, सूप, दूध आणि फळात संत्री घेतली.

नंतर नियमानुसार प्रार्थनासभेत गेले. एका बंधूने रस्त्यात बापूजींना कांबळी विकत घेण्याकरिता ५०० रुपये दिले.

बापूजी प्रार्थनासभेत म्हणाले,

> "आजही काही कांबळी आली आहेत. आणि पैसेसुद्धा येत आहेत. परंतु पैशाऐवजी कांबळी पाठवाल तर माझ्याकरिता ते सोयीस्कर होईल.
>
> "आज एका बंधूने मला एक गोष्ट सांगितली. तो डेहराडूनहून आगगाडीत येत होता. त्याच्या डब्यात भरपूर प्रमाणात हिंदू आणि शीख होते. परंतु त्यांच्यात एक नवीन माणूस आला. आणि त्या डब्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्याच्याबद्दल शंका आल्यामुळे त्यांनी त्याला विचारपूस करायला सुरुवात केली. तो नवा माणूस म्हणाला, "मी चांभार आहे." परंतु त्याच्या हातावर गोंदवलेल्या नावावरून तो मुसलमान असल्याचे लक्षात आले. लगेच त्याच्यावर हल्ला झाला आणि त्याला उचलून यमुना नदीत फेकून देण्यात आले.

"एका गृहस्थाने माझ्याजवळ हे वर्णन केले. आणि त्याने माझ्याजवळ असेसुद्धा कबूल केले की हे भयंकर दृश्य माझ्याकडून पाहवत नव्हते, परंतु मी एकटा काय करू शकत होतो?

"बापूजी म्हणाले - एका निरपराध माणसाला आपण सर्वांनी मिळून का मारायला पाहिजे असे मध्येपडून तुम्ही समजावण्याचा प्रयत्न करायला पाहिजे होता. तुम्ही जीवाचा धोका पत्करूनसुद्धा या माणसाला वाचवायला पाहिजे होते. डब्यात जे कोणी प्रवासी होते ते सर्वच्या सर्व या निरपराध माणसाला मारून टाकण्याच्या बाजूने होते हे मी मान्य करूच शकत नाही. तुम्ही त्या माणसाला वाचवण्याचा थोडासा जरी प्रयत्न केला असता तरी तुम्हाला निश्चितच मदत मिळाली असती. आणि मिळाली नसती तरी काय? अशा कामात ईश्वरी मदत मिळतच असते. आणि अखेरीस तर मृत्यूच आपला खरा मित्र आहे. त्या मित्राला भेटण्याचे सौभाग्य तुम्हाला प्राप्त झाले असते ना? ५०-६० माणसात एका माणसाला मारण्यात कोणते शौर्य आहे? परंतु आता मी कबूल केले पाहिजे की ब्रिटिशांबरोबर आपण जो लढा देत होतो तो शूरांच्या अहिंसेच्या आधारावर उभारण्यात आलेला नव्हता. आज आपण त्याचेच परिणाम भोगत आहो. परंतु आता असे वाटते की ईश्वराने जर मला करू दिले असते तर मी माझ्या गत जीवनात शूराच्या अहिंसेने मरण पत्करण्यातील रहस्य समजावून सांगितले असते आणि त्याचा प्रचार केला असता. मी कबूल करतो की पाकिस्तानमध्ये जे काही सुरू आहे ते चांगले नाही. परंतु इथेसुद्धा जे होत आहे ते अतिशय वाईट आणि लज्जास्पद आहे. कोणाचा अपराध आहे आणि कोण अन्याय करतो आहे याचा शोध घेण्याची ही वेळ नाही. दोघांना (हिंदूमुसलमानांना) मित्र व्हायचे असेल तर भूतकाळ विसरावा लागेल. त्यातून सुटका नाही.

"वर्तमानपत्रवालेसुद्धा आपले कर्तव्य बजावण्यात चुकत आहेत. मोठमोठ्या अक्षरांत मथळे छापून ते चिथावणी देणारी भाषा वापरतात आणि समाजाची कुसेवा करण्याचे पाप करतात. खोट्या अहवालाकडे लक्ष वेधणे संचालकांचे काम आहे. आजच एका वर्तमानपत्रात वाचले की मेयो लोकांनी रेवाडी येथील हिंदूंवर हल्ला केला आहे. ही बातमी वाचून मला फार दुःख झाले. परंतु एका वेगळ्या वर्तमानपत्रात ही बातमी खोटी असल्याचे वाचले.

"वर्तमानपत्रांच्या मालकांनी सत्याचरणाद्वारे लोकसेवा केली पाहिजे. स्वतंत्र देशातील वृत्तपत्रीय सृष्टी ही देशाच्या घडणीच्या दृष्टीने फार मोठी शक्ती असते हे त्यांनी विसरायला नको.

"अशाच प्रकारे लष्कराला आणि पोलिसांनाही हाच नियम लागू होत असतो. माझी तर इच्छा ही आहे की देशात पोलीस वा सैन्य असूच नये. परंतु ते जर असेलच तर त्यांनी कर्तव्य बजावत असताना कोण कोणत्या जातीचा आहे हे पाहत बसू नये.

"पोलिसातील आणि लष्करातील माणसांनी पूर्णपणे प्रामाणिक असायला पाहिजे आणि त्या दृष्टीने त्यांनी आपले चारित्र्य विकसित केले पाहिजे.

"रक्ताचा टिपूससुद्धा न सांडवता आपण स्वातंत्र्य मिळवून दाखवले आहे. त्याचा जगावर जो ठसा उमटला आहे त्याला बट्टा लागायला नको. याकरिता योग्य मार्ग कोणता हे मी दाखवण्याचा प्रयत्न करतो आहे. मी सागत असलेली गोष्ट ऐकायची जर तुमची इच्छा नसेल तर तुम्हांला पश्चात्ताप होईल, तुम्ही रडाल हे मी तुम्हांला सांगून ठेवतो आहे. मी तर बोंब मारत मारत निघून जाईन. परंतु सरळ मार्गाने जर तुम्ही चालणार नाही तर ना तर श्रेय हिंदुस्थानला मिळेल, ना पाकिस्तानला."

प्रार्थनेनंतर बापूजी घरातच फिरले. डॉ. जीवराजभाई आले. गुजरानवालामध्ये ५,००० माणसे जखमी झाल्याचे वृत्त आहे. कदाचित दिल्लीत भडका उडणारही नाही. रात्री शहीद सुऱ्हावर्दीसाहेब आले. यासंबंधी चर्चा झाली. बापूजी त्यांना स्पष्टपणे म्हणाले की, “तुम्हाला संघराज्याची सेवा करायची आहे असे जर तुमचे म्हणणे असेल तर आज गुजरानवालामध्ये जे ५००० लोक जखमी झाल्याचे वृत्त आले आहे आणि पाकिस्तानमध्ये ज्या अघटित घटना घडत आहेत त्यासंबंधात तुम्ही तुमचे निवेदन काढायला पाहिजे, आणि खरी हकिगत समजावून सांगून त्या आधारावर या घटनेच्या आधारावर दंगली पसरू नये म्हणून तुमच्या बांधवांना आणि सरकारला सावधगिरी बाळगायला आणि गुंडगिरी करणाऱ्या तत्त्वांचे समूळ उच्चाटन करायला सांगायला पाहिजे. तुम्ही जर इतके करून दाखवू शकला तर मी अथवा जगच काय, प्रत्यक्ष खुदासुद्धा तुमच्यावर पुष्पवृष्टी करील याबद्दल मला मुळीच शंका नाही.”

त्यांच्याबरोबर झालेल्या गोष्टीचा हा सार आहे. नंतर बापूजी मीराबहेनना पाहायला गेले. परतून पाय धुतले. व्यायाम करून ९.३० नंतर झोपायची तयारी.

नवी दिल्ली,

९ ऑक्टोबर १९४७, गुरुवार

आज रात्री २ वाजता बापूजींना खूपच जोराची खोकल्याची उबळ आली. अर्ध्या तासात ती थांबली आणि नंतर ते परत शांतपणे झोपले. ३.३०वाजता नियमानुसार प्रार्थना. प्रार्थनेनंतर टपाल ऐकता ऐकता झोपले. ५२० ला जाग आली आणि परत झोपले. ६.४५ वाजता फिरण्याकरिता उठले. फिरून येऊन पाय धुतले आणि मग मालीशकरिता गेले. मालीश सुरू असताना कालप्रमाणेच खोकल्याची उबळ आली होती.

डॉक्टरसाहेबांना बापूजींनी विचारले, "दुधाची मात्रा बरोबर आहे की वाढवायला पाहिजे?"

डॉक्टर साहेब म्हणाले "आज ८अंसापर्यंत घेऊ शकला तर ते चांगलेच होईल."

डॉक्टरसाहेब म्हणाले, "दुधाने चांगले वाटते असा माझा अनुभव आहे. परंतु उद्यापर्यंत इतके पुरे होईल असे वाटते."

अशा प्रकारे बरेच मिनिट रुग्ण आणि डॉक्टरचा वेगवेगळ्या दिशेने संवाद सुरू होता. अखेरीस अर्धे पाणी आणि अर्धे दूध वा जास्तीतजास्त सहा अंस पाणी आणि सहा अंस दूध असे ठरले.

बस्ती घेत असताना बापूजींना खूपच त्रास झाला. परंतु कचरा खूपच निघाला. आंघोळ करत असताना हजामतही केली.

आंघोळीनंतर शहीदसाहेब आले. आज किती तरी नवीन गोष्टी बापूजींना सांगत असताना सुऱ्हावर्दी म्हणाले, "- आज मी तुम्हाला कटू सत्य सांगणार आहे.

गांधीजी - (हसत) ठीक आहे. हे तर मला आवडतच असते.

सुऱ्हावर्दी - . . .तुम्ही जे लिहिता त्याचा जिनासाहेब वेगळाच अर्थ काढत आहेत . त्यांचे म्हणणे आहे की मी तुमच्या भूलथापांना बळी पडतो आहे.

गांधीजी - मी कोणाची फसवणूक करतो आहे असे जर कोणाला वाटत असेल तर यापेक्षा माझ्याकरिता दुसरी कोणतीही मोठी शिवी नाही. परंतु त्याकरिताही हरकत नाही. तुमचा जर माझ्यावर किंचितही विश्वास असेल तर मी तुमची सेवा करण्याच्या हेतूनेच जिवंत आहे. मी तर म्हणेन की माझ्या मनात कोणाची फसवणूक करण्याची वा कोणाचे वाईटपण दाखवण्याची भावना कशाकरिता असेल? परंतु आपले दुर्दैव हे आहे की स्वातंत्र्यानंतर आपण पतनाच्या मार्गाने चालल्रो आहो.

सुऱ्हावर्दी - जिनासाहेब जवाहरलालजींची फार वाखाणणी करत असतात.

गांधीजी - शक्य आहे. पण जाहीरपणे ते असे काहीही म्हणाले नाहीत. परंतु कोणी आपली वाखाणणी करतो की निंदा याची जवाहरलालला वा सरदारना काय करायचे आहे. ज्यांनी देशाकरिता इतका सगळा त्याग केला आणि आपले सर्वस्व देशाला वाहिले ते आता देशसेवा, देशाचे स्वातंत्र्य यांशिवाय इतर कशाचाही विचार कशाला करतील? इतके तर तुम्हाला कळते. जिनासाहेब जर योग्य वर्तन करतील तर आजच शांतता स्थापित होऊ शकते, आजच आपण सुखी होऊ शकतो.

सुऱ्हावर्दी - पाकिस्तानमधून हिंदूंनी निघून जावे असे आपण कधीही म्हणालो नसल्याचे जिना सांगतात.

गांधीजी - तुमच्या बोलण्याचे मला नवल वाटते. सिंधची परिस्थिती अशी कशामुळे झाली आहे? आणि वरून सांगता की पाकिस्तानमधून हिंदूंनी निघून जावे असे आपण कधीही म्हणालो नाही असे जिनासाहेबांचे म्हणणे आहे. ही किती बालीशपणाची गोष्ट आहे?

गुजरानवालामध्ये ५,००० लोक जखमी झाले याबद्दल जिनासाहेब वा प्रधानमंत्री (लियाकत अली खान) काहीच का बोलत नाहीत?

तुम्ही 'पीस मिशन' म्हणून जर काम करत असाल तर तटस्थ भूमिकेने काम करणे तुमचे कर्तव्य आहे.

सुऱ्हावर्दी - तुम्हाला माहीत नसेल की तेथील लोकसुद्धा सुखी नाहीत. (पाकिस्तान) सरकार किती बदनाम झाले आहे? मुसलमान तर जिना आणि लियाकत अलींना शिव्या देत आहेत!

गांधीजी - हे ऐकून माझे मुळीच समाधान होऊन राहिलेले नाही. त्यांनी जरी आश्वासन दिले तरीही नाही. कोणी बदनाम व्हावे अशी तर माझी मुळीच इच्छा नाही. आणि ते राज्यकारभार कशा प्रकारे चालवतात हे जाणून घेण्याचीसुद्धा इच्छा नाही. परंतु ज्या कराराप्रमाणे फाळणी झाली आहे त्याचा जनतेला कोणताही त्रास सहन करावा लागू नये. पाकिस्तानमध्ये जे लोक राहत होते ते तिथेच राहिले पाहिजे आणि त्यांना रक्षण मिळाले पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदुस्थानात जे लोक राहतात त्यांनी तिथेच शांततापूर्वक राहायला पाहिजे आणि सर्वांनी या कराराचे पालन केले पाहिजे. दोन्ही पक्षांकडून मी हीच अपेक्षा करतो. आज गरीब बिचाऱ्या निर्दोष प्रजेला किती त्रास सहन करावा लागतो आहे? हीच खरी दुःखाची गोष्ट आहे. आणि बोलल्याप्रमाणे, प्रतिज्ञा घेतल्याप्रमाणे ते कराराचे पालन करत नाहीत ही हकिगत आहे. यामुळे कोण जिनासाहेबांना वा जवाहरलालला शिव्या देतो याचा शोध घेण्याकरिता वा कोण काम करत नाही याचा अहवाल आणण्याकरितासुद्धा मी तुम्हाला कराचीला पाठवले नव्हते असे जिनासाहेबांना पत्र लिहा आणि ते जे करतील वा जे करायची त्यांची इच्छा असेल तीच हकिगत समजली जाईल हे त्यांना समजावून सांगा...

अशा प्रकारे एक तास चर्चा चालली. अखेरीस बापूजींना थकवा आला आहे असे सांगून ही चर्चा बंद करण्याची सूचना सुशीलाबहेनने केल्यामुळे ही चर्चा थांबली. खरे म्हणजे बापूजी खूपच थकलेसुद्धा होते. १० वाजले आहेत.

बापूजी आराम करण्याकरिता झोपले. ११ वाजता उठले. उठल्यानंतर शहीदसाहेबांनी लिहिलेला कागद पाहिला आणि त्यात काही सुधारणा केल्या.

१ वाजता छातीवर आणि गळ्यावर गरम माती घेतली. पोटावर थंड माती घेतली. २ वाजता माती काढली. २ वाजता वैद्य शिव शर्माजी आले. (आगाखान महालात कस्तुरबा गांधी आजारी असताना हे त्यांच्या औषधोपचाराकरिता आले होते.)

ते लाहोरमध्ये अखेरपर्यंत राहिले होते आणि तेथील परिस्थिती कळवत होते. बहिणींवर अत्याचार होण्याची वेळ आली तर तो होऊ नये म्हणून बहिणींनी मागणी केल्यामुळे त्यांनी त्यांना जहराच्या पुड्या तयार करून दिल्या होत्या. किती तरी बलुचींनी हिंदूंना वाचवले होते. बलुचींबद्दल सांगण्यात येत असे की की "बलुचींना जर पैसा दिला आणि सांगितले की तुझ्या बापाला गोळी मार तर ते त्याला गोळी मारतील. अशा बलुचींना पैसा देऊन जीव वाचवून आम्ही हिंदुस्थानात आलो".

२। वाजता पंडितजी आले. ३ वाचता ते गेले. यानंतर येथीलच ज्या डॉ. जोशींवर रुग्णालयात गोळी चालवण्यात आली होती, त्यांची मुलगी आली. बापूजी तिला आश्वासत म्हणाले, "तुझ्या वडिलांच्या मृत्यूचा तर मला हेवा वाटतो. त्यांनी अनेक हिंदू, मुसलमान गरीब आणि पीडीत रुग्णांची सेवा केली होती. आणि काम करत असतानाच एका मुसलमानाची गोळी लागून त्यांचा मृत्यू झाला. याहून उत्तम मृत्यू काय असू शकतो?"

कातता कातता त्यांच्याबरोबर गोष्टी केल्या. आज अर्धे दूध - ६ अंस आणि अर्धे पाणी घेऊन ते उकळत ठेवायचे होते आणि पाणी आटल्यानंतर दुधात थोडीशी पीपणीमूळ टाकून ते घेतले. ५ वाजता सूप, भाजी आणि फळे घेतली.

सायंकाळी खात असतानाच कचरूसाहेब आले. काश्मीरची अवस्था सांगितली. "शेखसाहेब सुटल्यानंतर त्यांनी प्रजेसमोर तीन गोष्टी मांडल्या - १. काश्मीर पूर्णपणे स्वतंत्र राहील, २. पाकिस्तानमध्ये सामील होई. ३. हिंदुस्थानात सामील होईल.

"स्वतंत्र राहणे कठीण आहे. पाकिस्तानचे धोरण फार वाईट आहे. यामुळे काश्मीर पाकिस्तानमध्ये तर सामील होऊच शकत नाही. ते हिंदुस्थानातच सामील होऊ शकते. महाराजसाहेबांनीसुद्धा शेखसाहेबांकडे सर्व काही सोपवायचे ठरवले आहे.

"अशा प्रकारच्या प्रचारामुळे लीगवाल्यांनी त्यांच्या मार्गाने जे पेट्रोल आणि खाण्यापिण्याचे साहित्य येत असायचे ते बंद केले. परिणामी काश्मीरमध्ये पेट्रोलची आणि खाण्यापिण्याच्या वस्तूंची टंचाई निर्माण झाली होती. परंतु काल आणि परवा हिंदुस्थानने काश्मीरमध्ये विमानाने पेट्रोल पोहोचवले. दुसरीकडे महाराजांनी लियाकत अलींना सावधगिरीचा इशारा देत एक पत्र लिहिले की 'काँग्रेस तर तुमच्या विरुद्ध आहे. तुम्ही जर तिथे गेला तर मराल. आम्ही तुमच्या पाकिस्तानमध्ये सामील होऊ शकत नाही. आम्ही हिंदुस्थानातही सामील होणार नाही. आम्हांला स्वतंत्र राहू द्या. आम्ही तुम्हांला मदत करू.' अशा प्रकारचे पत्र त्यांनी लिहिले. काश्मीरची परिस्थिती ही अशी आहे."

कचरूजी गेल्यानंतर अन्नदाबाबू आले. बंगालची परिस्थिती साांगत असताना ते म्हणाले की पूर्व बंगालमधून सर्व धावपळ करत पळून येत आहेत. असे असले तरी सरकार त्यांच्याबद्दल काहीही करून राहिलेले नाही.

आज सायंकाळपर्यंत अशाच दुःखाने भरलेल्या हकिगती ऐकायला येत होत्या. प्रार्थनेच्या वेळेपर्यंत अशा प्रकारची तीस पत्रे आली.

प्रार्थनेनंतरच्या भाषणात बापूजी म्हणाले,

> "ज्या कोणाला कांबळी द्यायची असतील त्यांनी ती लवकर दिली तर चांगले होईल. जे दान वेळेवर देण्यात येते तेच खरे दान असते. नंतर त्याचा काहीही उपयोग नसतो. आता दिवसेंदिवस हिवाळ्याची थंडी वाढत जाणार आहे.

“तुम्ही सर्व इथे येऊन तुमच्या इतक्या दुःखातसुद्धा धैर्याने मला सर्व काही सांगता याकरिता मी तुमचा आभारी आहे. परंतु जे ऐकतो त्यावर काही करता आले तर समाधान होते.

“पाकिस्तानमध्ये हिंदू आणि शिखांना किती हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत आणि किती कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे यासंबंधीच्या बातम्या दिवसभर खूप खूप येत असतात. येथील छावणीतही निर्वासितांना असह्य हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत याची मला जाणीव आहे. त्यांच्या देशात ज्या कारणामुळे दुःख येऊन कोसळले आहे त्या कारणामुळे त्यांना वाटते की आपले इथे बहुमत असते तर चांगले झाले असते आणि आपण सुखी झालो असतो. परंतु हा विचार चुकीचा आहे. सरकार कितीही जरी चांगले असले तरी आणि सर्वांना सुखी करण्याची जरी सरकारची इच्छा असली तरीही जेव्हा अनपेक्षितपणे इतक्या मोठ्या संख्येतील निर्वासितांची व्यवस्था करण्याची जबाबदारी येऊन पडते तेव्हा ते तरी काय करू शकते? मी तर येथील लोकांना इतकेच सांगेन की तुम्ही तुमच्या देशात आणि तुमच्या घरात पडून राहा आणि केवळ ईश्वराकडेच दयेची याचना करा. त्या एकाशिवाय तुम्हांला वाचवू शकेल असा कोणीही नाही. आणि असे असूनही कोणी तुम्हांला मारायला येत असेल तर आपल्या भावाच्या हाताने धैर्याने मरण पत्करा. अशा प्रकारे जुलूम सहन करण्यापेक्षा तर मरणे चांगले.

“दोन्ही सरकारांनी आता तरी सावध व्हायला पाहिजे आणि सहकार्याकरिता योग्य करार करून त्याचे जर ते पालन करत नसतील तर युद्धाशिवाय तिसरा कोणताही मार्ग राहणार नाही. मी तर युद्धाविरुद्ध आहे. परंतु त्याचबरोबर मला हेही माहीत आहे की लष्कर आणि शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले सरकार इतर कोणत्याही मार्गाने चालू शकत नाही. आणि हेसुद्धा तितकेच खरे आहे की हा मार्ग अखेरीस

विनाशाकडेच नेतो. वस्तीत फेरबदल केल्याने म्हणजे लोकसंख्येची अदलाबदल केल्याने एकाही पक्षाचा लाभ तर होऊच शकत नाही. परंतु वस्तीबदल केलेल्या या लोकांना परत वसवण्यात किती मोठ्या समस्या निर्माण होतात याचा तर विचार केला तर चांगले होईल."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. मी मीराबहेनच्या सेवेकरिता थांबले. मीराबहेनच्या सेवेकरिता एक बाहेरची परिचारिका आली होती. परंतु बाहेरील परिचारिकेचा खर्च बिरलाजींवर पडू नये म्हणून बापूजींनी सायंकाळपासून मलाच त्या कामाकरिता थांबायला सांगितले.

७।। वाजता पंडितजी आले. सध्याच्या वातावरणामुळे पंडितजी अतिशय अस्वस्थ असल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होते. प्रवचन पाहून ९ वाजता मीबहेनला पाहायला बापूजी गेले. नतर पाय धुऊन व्यायाम केला आणि मग बापूजी झोपले.

नवी दिल्ली,

१० ऑक्टोबर १९४७

रात्री मी मीराबहेनजवळच झोपले होते. प्रार्थनेच्या वेळी उठले. प्रार्थनेनंतर परत मीराबहेनजवळ गेले. त्यांच्या तापाच्या नोदीचा आलेख ठेवणे, त्यांची शुश्रूषा आणि साफसफाईकडे लक्ष ठेवण्याबद्दल बापूजींनी मला सूचना दिल्या होत्या. त्यांना विषमज्वर असण्याची भीती वाटत होती. सुशीलाबहेनचे मत तर त्यांना हिवताप आहे असेच होते. आपल्याला दर तासाला मीराबहेनच्या प्रकृतीची माहिती कळवावी असेही बापूजींनी सांगितले.

मीराबहेन ५। वाजता उठल्या. त्यांना हाततोंड धुवायला मदत केली. त्यांचे अंथरूण साफ केले आणि त्यांना स्पंज केला. तुळशीचा चहा पाजला. ज्याप्रमाणे रुग्णालयात परिचारिका रुग्णाला तयार करतात त्याप्रमाणे त्यांना तयार करायचे होते. साडेसहा वाजता बापूजी मीराबहेनना पाहायला आले. तेव्हा त्या नुकताच तयार झाल्या होत्या. बापूजी मला म्हणाले, “बाची सेवा करण्याचे सुशीलाने तुला जे प्रशिक्षण दिले होते ते तू विसरलीस की ताजे आहे याची परीक्षा घ्यायची होती बरं. ही तुझी आणि सुशीलाची, दोघींचीही परीक्षा आहे.”

मी म्हणाले, “परिचर्या तर तुम्हीच मला शिकवली आहे. यामुळे ही तुमचीही परीक्षा आहे हे खरे नाही काय?”

बापूजी हसत हसत म्हणाले,”अरे हो, शेवटी ही माझीच परीक्षा नाही काय? परंतु ‘समरथ को नही दोष गुसाई.’”

बापूजी आज मोठ्या प्रमाणात हरिजनच्याच कामाला लागले होते. सायंकाळी सरदारदादा आणि मणिबहेन हे दोघेही आले.

माझा सगळा वेळ तर मीराबहेनच्या सेवेत, त्यांचे खाणेपिणे, झोप, ताप या सर्वांची नोंद करून हे सर्व बापूजींना कळवण्यात आणि बापूजींनी वेळोवेळी केलेल्या सूचना अंमलात आणण्यातच गेला. मी हसत हसत मीराबहेनला म्हणाले, “बापूजीसुद्धा पदवीशिवायचे चांगलेच डॉक्टर आहेत” परंतु मीराबहेनचीसुद्धा भल्या भल्या डॉक्टरांपेक्षा बापूजींवर जास्त श्रद्धा आहे. आणि कोणा डॉक्टरने जरी तपासले आणि त्यांना औषधाच्या वा आहाराच्या काही सूचना केल्या तरी बापूजींनी हो म्हटल्याशिवाय त्या त्यावर अंमल करणार नाहीत.

मी प्रवचनाची नोंद घेत असल्यामुळे त्यात अडचण येऊ नये म्हणून मीराबहेनने मला आग्रहपूर्वक सायंकाळच्या प्रार्थनासभेत जायला सांगितले. मीराबहेनकडे हौरॅस अलेक्झॅन्डर आणि इतर काही बंधू आले होते.

दररोजप्रमाणे बापूजींनी प्रार्थनेत कांबळ्यांकरिता जाहिरात केली. बडोद्याहून ८०० कांबळी येतील तेव्हा खरे. बापूजींच्या आवाहनाचे प्रजेने जोरदार स्वागत केल्यामुळे बापूजींना खूप समाधान वाटले. आज बापूजी अन्नधान्यावर बोलले -

> “अन्नधान्याची आणि कापडाची टंचाई तर गुलामगिरीपेक्षाही स्वातंत्र्यात जास्त वाढली. आपले स्वातंत्र्य चोहोकडे नावाजले जात आहे. परंतु मी याला खरे स्वातंत्र्य समजत नाही. मला वाटते की दरनियंत्रणाची आणि मापबंदीची पद्धत चांगली नाही. आपल्याकडे भरपूर सुपीक जमीन आहे. पाणीसुद्धा मुबलक आहे. आणि काम करणारांची उणीवही नाही. लोकसंख्या इतकी जास्त आहे. असा अनुकूल संयोग असताना अन्नधान्याची टंचाई का जाणवावी? परंतु आता प्रजेला स्वावलंबी होणे आपल्याला शिकवावे लागेल. प्रत्येकाला आपल्या स्वतःच्या पायांच्या आधारावरच उडी मारावी लागत असते ही गोष्ट समजावून सांगावीच लागेल. तरच लोक सुखी होतील.

"कापडाची टंचाई निर्माण होण्याचे इतर कोणतेही कारण माझ्या आकलनशक्तीपलीकडील गोष्ट आहे. आपल्याकडे कापसाचे किती मोठे उत्पादन होते? प्रत्येक माणूस नियमितपणे जर दररोज अर्धा तास कताई करील, आपल्याकरिता कापडाची विणाई करील, शिवेल तर त्याला सहजपणे आवश्यक तितके कपडे मिळतील. यामुळे कांबळ्याच्या टंचाईबद्दल तर मी समजूच शकत नाही.

"लोक आवश्यकतेपेक्षा जास्त साठा करतात. यामुळेसुद्धा भाववाढ होते. मी तर म्हणेन की प्रत्येक लहानमोठा माणूस केवळ सहा महिने कापड विकत घ्यायचे नाही असे ठरवील तर भाव खाली आल्याशिवाय राहणार नाहीत. आणि हे अन्नवस्त्र आपण स्वतः निर्माण केले तर आपल्याला आपोआपच आर्थिक स्वातंत्र्य मिळेल आणि मग लोकांना आपसात भांडायलाही वेळ मिळणार नाही. आणि शिवाय अशा कामात गुंतलो की जुगार, दारू वगैरे व्यसनही निघून जातील."

प्रार्थनेनंतर बापूजी म्हणाले, "चल आता तुझ्या रुग्णाला पाहून येऊ." असे म्हणून आम्ही मीराबहेनकडे गेलो. नंतर फिरलो. श्री होरॅस अलेक्झॅन्डरबरोबर गोष्टी केल्या. आम्ही फिरत असताना फोजेतील लोक जसे कवायत करताना 'एक दो, एक दो' करत वेगात चालतात तसे आम्हा तिघांनाही बापूजींनी खूप वेगात चालायला लावले.

आज दुपारी अन्नधान्यसमितीची बैठक होती. परंतु मी मीराबहेनबरोबर असल्यामुळे त्यांच्या गोष्टी ऐकू शकले नाही.

बापूजींनी प्रवचन पाहिले. 'हरिजन'करिताचे लेखन पाहिले आणि साडेनऊ वाजता झोपायची तयारी केली.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

११ ऑक्टोबर १९४७

७९वी चरखाद्वादशी

रात्री मीराबहेनची प्रकृती पाहिली तेव्हा ती चांगली नव्हती. आज चरखाद्वादशी असल्यामुळे बिसेनभाई मला बोलवायला आले. यामुळे प्रार्थनेकरिता जा असे मीराबहेनने मला म्हणाल्या. प्रार्थनेकरिता जाताच बापूजींना मी प्रणाम केला. प्रार्थनेनंतर ठरल्याप्रमाणे मी परत मीराबहेनच्या सेवेत गेले, बापूजी लेखनाच्या कामाला लागले. साडेनऊ वाजता बापूजींचे नित्यकर्म आटोपले. आज चरखा जयंती असल्यामुळे विशेषतः गुजराती लोक प्रणाम करायला येत असतात. बापूजींनीसुद्धा सकाळी केवळ द्रव पदार्थच घेतले. ३.३० वाजता सरदारदादा आले. आज दिल्लीत गुजराती लोकांची सभा होती. यामुळे बापूजींबरोबर विनोद केला,"इतका जोराचा खोकला सुरू असताना गुजराती लोकांच्या सभेत जाण्याकरिता कबूल करण्याची काय आवश्यकता होती? परंतु तुम्ही इतके काही लालची आहा की एखाद्या विशिष्ट जागी पैसा मिळेल असे जर तुम्हाला कळले तर मरत असला तरी तुम्ही जाल. अशा प्रकारे निधी गोळा करत राहाल. अशा प्रकारे खो खो करत खोकलत जाण्याची काय आवश्यकता होती? परंतु मी तुम्हाला जे काही सांगतो त्याचे तुम्हाला काय महत्त्व?" हास्याची खूप खसखस पिकली.

सभेत शंभरेक गुजराती होते. बापूजी म्हणाले, "नंदलालभाईंनी जेव्हा मला विचारले की गुजराती लोकांची मला भेटण्याची इच्छा आहे आणि पैसेसुद्धा देण्याची इच्छा आहे आणि मी पैशाचा लालची असल्यामुळे मीसुद्धा त्यांच्यासमोर झुकलो. पण मला व्याख्यान द्यावे लागेल हे तेव्हा मला माहीतच नव्हते.

"दक्षिण आफ्रिकेत मी होतो तेव्हा माझ्या वाढदिवसाला काही महत्त्व आहे हे मला माहीतच नव्हते. इथे आल्यानंतर ही भानगड कळली. परंतु त्याबरोबर चरखा असल्यामुळे

मी त्याच्याशी सहमत झालो. चरखा आहे म्हणून ही ‘चरखाद्वादशी’ झाली. आज तर चरखा जीर्णशीर्ण झाला आहे असे वाटते. चरखा तर अहिंसेचे प्रतीक आहे. परंतु आजकाल तर अहिंसेचे दर्शन दुर्लभ झाले आहे. आणि यामुळे आता चरख्याला उजवून काय उपयोग असेही वाटते. परंतु मनुष्य स्वभाव आहे नाही? उपासमार होत असेल तरीही म्हणेल की उजवून टाकू या. यामुळे आशा करतो की गुजराती कुठेही जरी पडलेले असले तरी ते अहिंसेचे पालन करतील. परंतु ते कताई करतील की नाही याबद्दल मोठीच शंका आहे. गुजरातींनी खादी आपलीशी करावी म्हणूनच किती प्रयत्न करावे लागेले होते. माझी तर इच्छा आहे की गुजरातमध्ये विदेशी कापड मुळीच असू नये. इतकेच नाही तर गिरणीकापडसुद्धा असू नये. परंतु यांच्या वैशिष्ट्याबद्दल किती सांगू? आणि गुजरातींना असे पाषणहृदयी झालेले पाहिले की त्यांनी चरख्याचे जरी जतन केले तरी ते पुरेसे वाटते.

“आज काल तर धर्माच्या नावाने धाड टाकणे सुरू झाले आहे. माझ्या दृष्टीने ही अतिशय दुःखद गोष्ट आहे. आता तर आपण स्वतंत्र झालो आहो, आपले पारतंत्र्य गेले आहे तर आपण आपल्या स्वातंत्र्याचा असा उपयोग करणार काय? आणि इतकी स्वच्छंदता?

“इथे मला सांगण्यात आले आहे की गुजराती मुलांनी हिंदीसुद्धा शिकायला पाहिजे. हिंदीमुळे गुजराती मुलांची प्रगती होईल. गुजराती लोक अनेक परीक्षासुद्धा देत असतात. हिंदी म्हणजे हिंदुस्थानी, नागरी अधिक उर्दू. या भाषा सहजपणे समजू शकतात. पंजाबी केवळ उर्दूच बोलतात, आणि ज्यांना उर्दू आवडत नाही ते संस्कृत बोलतात. या इतक्या सगळ्यांमधून मी जो मार्ग दाखवला आहे तो ‘हिंदुस्तानी’चा. या दोन्ही लिप्या शिका. आणि गावखेड्यातील हजारो लोकांना केवळ संस्कृतप्रचूर भाषा वा केवळ अरबीप्रचूर भाषा समजू शकत नाही हा दृष्टिकोन लक्षात ठेवा. असे करण्यात पाप तर नाहीच नाही.

"पैशाकरिता आभार. उपकार. कांबळ्यांची फार आवश्यकता आहे. ही गरज केवळ तुम्हीच पूर्ण केली पाहिजे. हे काम सरकार करू शकत नाही. आपण जर हे ताबडतोब केले तर सरकारकरिताही सोपे होईल."

बाकी किती तरी लोकांनी सरदारदादांना बोलायची विनंती केली. यामुळे ते म्हणाले, "आज माझा थोडाच वाढदिवस आहे? पैसै गोळा करून तुम्ही तो या महात्म्याला देता आणि मला फुकट बोलायला सांगता. परंतु बापू तर बनिया आहेत ना? बनिया लोभी असतात. इतका भयंकर खोकला आणि अशक्तपणा असूनही तुम्हाला धूऊन टाकण्याकरिता यांच्यात शक्ती आली आहे! (खूपच हशा पिकला.) परंतु आता यांना आराम करू द्या अशी माझी विनंती आहे."

ही सभा प्रार्थनास्थळी झाली होती.

तिथून आल्यानंतर बापूजींनी उपवास सोडला. भाजी, दूध आणि सूप घेतले. दुपारी भेटीला येणारांत घनश्यामदासजी, डॉ. जीवराजभाई, कमलनयनजी, अच्युत पटवर्धन होते. नंतर जवाहरलालजी आणि इंदिराबहेनही आले. आज १३८ तार कताई केली.

प्रार्थनेत बापूजी म्हणाले,

> "आज चरखाद्वादशी आहे. कच्छ काठेवाडमध्ये आजचा दिवस रेंटिया जयंती म्हणून ओळखला जातो. चरखा अहिंसेचे प्रतीक आहे. हे प्रतीक आज लोकांच्या मनातून पुसले गेले आहे असे वाटते. असे नसते तर आज भावाभावात मारामारी कशी चालली असती? मला अनेकदा वाटत असते की असे वातावरण असताना आता चरखाजयंतीचे उद्यापन बंद का करण्यात येऊ नये? परंतु अजूनही मला आशा वाटते की चरख्याशी प्रामाणिक असलेले लोक संपूर्ण देशाच्या कानाकोपऱ्यात पडलेले आहेत आणि त्यांच्याकरिता मी हे उद्यापन सुरू ठेवले आहे.

"काल पाकिस्तान सरकारच्या मांडलसाहेबांनी एक निवेदन काढले आहे. त्यानुसार आपण अस्पृश्य आहो हे कळावे म्हणून हरिजनांनी बिल्ला लावला पाहिजे आणि त्या बिल्ल्यावर चंद्र आणि तारकांचे चिन्ह असावे असा आदेश देण्यात आला आहे.

"या आदेशामागील उद्देश अस्पृश्यांना स्पृश्यापासून दूर ठेवणे हा असून यामुळे सर्व हरिजन अखेरीस इस्लामचा स्वीकार करतील असे अपेक्षित आहे. आध्यात्मिक प्रेरणेमुळे आणि अंतरीच्या आवाजामुळे जर कोणी धर्मपरिवर्तन करत असेल तर त्याबद्दल मला काहीही म्हणायचे नाही. परंतु मी स्वतः हरिजन झालेलो असल्यामुळे हरिजनांच्या अंतःकरणात काय आहे याची मला कल्पना आहे. त्यांना इस्लाम काय आहे याच्या आगापिछाचीसुद्धा कल्पना नाही. आणि आपण हिंदू का आहो हेसुद्धा त्यांना पुरेसे माहीत नाही. आणि शिवाय आजच्या अशा कृत्रिम वातावरणात कोणी सहजपणे आपला धर्म स्वेच्छेने बदलत असेल हे सहजपणाने मान्य करता येऊ शकत नाही. खरी गोष्ट तर ही आहे की माणसाला आपला धर्म प्राणापेक्षाही प्रिय असतो.

"थोड्याच दिवसात दसरा आणि बकरी ईद हे सण येणार आहेत. त्या दिवसात कोणाचेही मन दुखवले आणार नाही अशा प्रकारे सर्वांचे वर्तन असावे अशी माझ्याकडे मागणी करण्यात आली आहे. यामुळे हिंदू-मुसलमान बंधूंनी खूप जागृत राहावे अशी माझी विनंती आहे.

"उद्या दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह सुरू होणार आहे. दोन्ही संप्रदायांचे हिंदुस्थानी त्यात सामील होणार आहेत. माझा त्यांना सल्ला आहे की त्यांनी याकरिता दोन्ही संघराज्यांची मदत मिळवावी. आणि या कामात शक्य तितकी मदत करणे आणि प्रोत्साहन देणे हे दोन्ही सरकारांचे कर्तव्य आहे. त्यांचा हेतू पूर्णपणे

न्याय्य असेल आणि त्यांचे आंदोलन पूणर्पणे अहिंसक असेल तर दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्थानींना या लढतीत यश मिळाल्याशिवाय राहणारच नाही.”

प्रार्थनेनंतर बापूजींनी भाषण लिहिले. आणि आम्ही बिरला मंदिरात दर्शन घ्यायला गेलो. नऊ वाजता जवाहरलालजी आले. ते दररोज रात्री ठरल्याप्रमाणे येत असतात आणि बापूजींजवळ आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी करत असतात. नवीन सूचना घेत असतात आणि ताजेतवाने होऊन परतत असतात. साडेनऊ वाजता नियमानुसार बापूजींनी व्यायाम केला. आणि झोपायची तयारी. झोपण्यापूर्वी मीराबहेनना पाहायला गेलो.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१२ ऑक्टोबर १९४७

आज मीराबहेनजवळ जवळपास रात्रभर जागावे लागले. प्रार्थनेच्या वेळी बिसेनभाई उठवायला आहे. तेव्हा मीराबहेनचा सहजपणे थोडा डोळा लागला होता. परंतु बिसेनभाईंच्या आवाजाने त्यांना जाग आली. प्रार्थनेनंतरचा माझा सगळा वेळ मीराबहेनच्या सेवेत गेला. सकाळी त्यांना ताप नव्हता. ६.४५ वाजता बापूजींबरोबर फिरायला निघाले. थोड्याच वेळात शहीदसाहेब आले. ते बापूजींचे पत्र घेऊन लाहोर आणि कराचीला जाणार आहेत. हे ते कसे करू शकतील हेच काही कळत नाही.

फिरल्यानंतर मी मीराबहेनचा स्पंज केला आणि त्यांची इतर कामे करू लागले. कोणत्या तरी कामाच्या निमित्ताने मी बापूजींच्या खोलीत गेले तर बापूजी कशाची तरी शोधाशोध करत असल्याचे मला आढळले. मी त्यांना विचारले - तुम्ही काय शोधत आहा?

बापूजी म्हणाले, “काल शंकररावांनी धोतरे (त्यांनी स्वतः कातलेल्या सुताची) दिली होती. ती कुठे आहेत?”

मी म्हणाले, “ती तर मी धोब्याला धुवायला दिली आहेत.”

बापूजी म्हणाले, “धोब्याला का दिले? धोब्याला दिल्याने त्यांचे आयुष्य घटते. आणि तू तर सध्या मीराच्या सेवेत लागलेली आहेस ना? यामुळे मी तुला दोष देत नाही, तुझा दोषही नाही. पण यात आळस भरलेला आहे. ते अधिक पांढरे दिसले तर मी अधिक रूपवान दिसेन काय? कोणी जर एखादी गोष्ट प्रेमाने दिली असेल आणि त्याच्या मनाचे समाधान होईल अशा प्रकारे जर आपण त्या गोष्टीचा उपयोग करू शकत नसू तर त्याला कसे वाटेल? परंतु मी तर माझाच दोष काढतो आहे. माझ्या सांगण्याचा अर्थ हा आहे की या धोतरांमध्ये काहीही वाईट नाही.”

बाकी मुलाखतीकरिता तर लोक येतच असतात. साडेतीन वाजता डॉ. होम्स आले. त्यांच्याबरोबर त्यांचा मुलगासुद्धा होता. दिल्लीतील अशांततेबद्दल त्यांनी चर्चा केली.

बापूजी म्हणाले, “इंग्रज जर अंतःकरणापासून स्वातंत्र्य देणार असतील आणि हिंदुस्थानींना जर आपले भवितव्य उज्ज्वल करायचे असेल तर शांतता स्थापित झालीच पाहिजे.”

बाकी बापूजींचा नित्यक्रम सुरू आहे. सध्या प्रकृती चांगली आहे. प्रार्थना नियमितपणे झाली. प्रार्थनेत बापूजी म्हणाले,

> ”ज्या लोकांना आपले घरदार गमावले आहे ते लोक आज फार संतापलेले आहेत. अशा प्रकारच्या संतापामुळे काहीही होणार नाही. जे लोक ईश्वराला शरण गेले आहेत तेच या संकाटाचा बहाद्दुरीने सामना करू शकतील. जोपर्यंत मान, आदर आणि सुरक्षिततेची खात्री मिळत नाही तोपर्यंत त्यांनी आणि त्यांच्या मुलाबाळांनी या छावणीत सुखदुखात राहून उपयोगी होईल असे वर्तन करून काळ व्यतीत करत राहायला पाहिजे. पाकिस्तामधून येणारांत ७५% व्यापारी वर्ग आहे. इथे त्या सर्वांना आपला स्वतःचा व्यापार सुरू करता येईल अशी आशा तर करता येऊ शकणार नाही. असे केले तर हिंदुस्थानची संपूर्ण अर्थव्यवस्थाच कोलमडून पडेल. यामुळे हातपाय हालवून मजुरी करण्याची कला शिकण्याशिवाय सुटका नाही. हं, ज्याच्यात डॉक्टर, परिचारिका वा अशाच प्रकारची इतर कामे करण्याची कला आहे त्यांच्याकरिता फारशी अडचण नाही. आणि त्याचबरोबर त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की त्यांना वाटेल त्या प्रांतात जाऊन वास्तव्य करण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु दुधात ज्याप्रमाणे साखर मिसळते त्याप्रमाणे त्यांनी मिसळून जायला पाहिजे आणि व्यवहारात प्रामाणिक राहायला पाहिजे. याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की आपण हिंदुस्थानची जर सेवा केली तर त्यामुळे आपल्या

गौरवात वाढ होणार आहे. आपसात भांडण्यात वा दारू पिण्यात वा जुगार खेळण्यात कोणीही आपला वेळ वाया घालवू नये. कोणत्याही प्रांताचे लोक आपले स्वागतच करतील अशा प्रकारचे वर्तन जर आपण शिकलो तर हे दुःखी म्हणवणारे लोकही एक अमूल्य रूप धारण करतील."

आजचे प्रवचन निर्वासितांसंबंधी होते. प्रार्थनेनंतर लगेच पंडितजी भेटायला आल्यामुळे बापूची त्याआधी फिरू शकले नाही. मौन सुरू झाले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१३ ऑक्टोबर -१९४७

आज तर सोमवार आहे. यामुळे आज जवळपास सुटीप्रमाणे वाटते. विशेष अशी कोणतीही बातमी नाही. मीराबहेनमध्ये अशक्तपणा आहे, परंतु एकूण पाहता प्रकृतीत सुधारणा सुरू आहे. यामुळे आज दुपारी त्यांना आंघोळ घातली. दिवसभर बहुधा मीराबहेनबरोबरच होते. त्याच्याजवळसुद्धा खूप काही शिकायला मिळत असते. मीराबहेनकडून जोपर्यंत सुटी मिळत नाही तोपर्यंत बापूजींनी त्यांच्याकडे यायला मनाई केली आहे. यामुळे बापूजींशी कोण काय बोलला याबद्दल मला काही माहीत नाही.

प्रार्थनेच्या लेखी प्रवचनात बापूजींनी लिहिले होते,

"काल माझ्या प्रवचनात मी निर्वासितांबद्दल चार गोष्टी सांगितल्या होत्या. जिला आपण छावणी म्हणतो तिच्यात कशा प्रकारे राहिले पाहिजे हे त्यात सांगितले होते. आपल्या लोकांना याबद्दलचे फार कमी ज्ञान आहे. आपल्याला ज्या समुदायात राहायचे असते त्या समुदायातील साफसफाईकडे आपण फार लक्ष ठेवायला पाहिजे, परंतु ते भान ठेवले जात नाही. जन्मसिद्ध अधिकार असल्याप्रमाणे लोक कुठेही संडास करायला बसतात, लघ्वी करतात, वाटेल तिथे थुंकतात! आणि छावणीत अशाच प्रकारे गोंगाट आणि कोलाहल असतो. यामुळे किती शारीरिक आणि मानसिक नुकसान होते हे सहजपणे कळू शकते. पद्धतशीर बंदोबस्त, योजना आणि हातोहात सफाई यांच्याबाबतीतीत लष्करी छावणीचा अनुभव घेण्यासारखा असतो. समान पद्धतीच्या जीवनात तर लष्कराची आवश्यकता कधीही पडायला नको. परंतु याचा अर्थ असा नाही की तिथे काहीही चांगले होत नाही. लष्करी तालिमीत शिस्त, समूहजीवन, सुंदर साफसफाई आणि प्रत्येक

प्रकारच्या आवश्यक तसेच उपयोगी कामकाजाची व्यवस्था आणि तरतूद असलेल्या विशेष वेळापत्रकातून ही सर्व सुंदर शिकवण मिळत असते. अशी शिकवणूक असलेल्या छावणीत सुई पडली तरी आवाज व्हावा इतकी शांतता असते. आणि थोड्याशाच वेळात जणू तंबूंचे एक शहरच वसवले जाते. आपल्या निर्वासित छावण्यांमध्ये हा आदर्श दृष्टीसमोर ठेवायला पाहिजे आणि तोपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे अशी माझी इच्छा आहे.

“याचबरोबर छावणीतील भंगीकाम, साफसफाईकाम, खोदकाम, धोबीकाम वगैरे वेगवेगळी कामे निर्वासित जर स्वतःच करतील तर त्यांच्यावर नाममात्र खर्चसुद्धा करावा लागणार नाही. कोणतेही काम हलके समजण्यात येऊ नये. जीवनाशी संबंधित सर्व लहानमोठ्या कामांना सारखेच महत्त्व आहे. केवळ नशिबावर विसंबून राहून काहीही होणार नाही. परंतु सुज्ञ माणसांच्या, पुढाऱ्यांच्या देखरेखीखाली आणि मार्गदर्शनाखाली जर आपण काम केले तर आपल्यालाही तसेच श्रेय मिळू शकेल.”

दररोजप्रमाणे पंडितजी रात्री आले होते. 9.15नंतर बापूजी झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१४ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजींनी थोडेसे लिहिले आणि ४.४० वाजता झोपले. ५.२५ वाजता जागे झाले. आणि थोड्याच वेळात सरदारदादा आणि मणिबहेन आले. बापूजी फिरले तेवढ्या वेळात मी मीराबहेनला दातण करायला लावले, स्पंज केला आणि त्या चहा घेतच होत्या तेवढ्यात त्यांना पाहायला बापूजी आले. बाकी सर्व नित्यक्रम सुरू होता. सकाळी भेट घेण्याकरिता येणारात प्रभावतीबहेन, सुचेताबहेन, धीरुभाई देसाई यांचा समावेश होता. दुपारनंतर मौलानासाहेब, कालकाप्रसादजी आले. ३.३० वाजता इराणचे प्रतिनिधी मोटॅमेडी आणि त्यांची पत्नी आले. त्यांनी भेट म्हणून भरपूर कांबळी दिली. त्यानंतर राजाबझार आर्यसमाज महाविद्यालयाच्या विद्यार्थी भगिनींनी गोळा केलेली भेट घेऊन विद्यालयाच्या शिक्षक भगिनी आल्या. त्यांनी सांगितले की पू, बापूजीं ंनी आठवड्यात एक दिवस उपवास करण्याची जी सूचना केली होती त्या सूचनेनुसार शिक्षिका विद्यार्थी दर गुरुवारी उपवास करत असतात आणि बागेत खाद्यपदार्थ उगवत असतात.

सव्वाचार वाजता शीखभाई भेटायला आले. एका प्रश्नात लिहिले होते की हिंदुस्थान सरकारचे निर्वासितांना येऊ न देण्याचे धोरण आहे, आणि जर कोणी आलेच तर त्यांच्याशी असे वर्तन करायचे की त्यांनी परत निघून जावे. आणि ही माहिती अतिशय विश्वसनीय ठिकाणावरून मिळाली आहे. असे असेल तर आम्ही काय करावे?

बापूजी - पहिली गोष्ट तर यांतील मला काहीही माहीत नाही हेच मी सांगेन. आणि तुम्हीसुद्धा ऐकोऐकी लिहिले असल्याबद्दल मला खेद होतो. असे धोरण आहे की नाही हे जवाहरलालला विचारा. आणि जर सरकार ही गोष्ट करत असेल तर हे सरकार चालू शकणार नाही हे मी तुम्हांला ठामपणे सांगतो. मी तर यावर विश्वास ठेवत नाही, पण

सिद्धांत हा आहे की अशा गोष्टी ऐकल्याबरोबर त्यासंबंधात तर्कवितर्क करत बसू नये. अशा गोष्टी ऐकायलाच नको. माझ्या गुरूकडे पाहा (बाजूचे तीन वानर गुरू). कोणी चकीचे बोलत असेल तर ते कान बंद करायला सांगतात.

शीखभाई - परंतु आम्हांला प्रत्येक ठिकाणी जाऊ देत नाहीत. हरिद्वार यात्राधाम आहे. आम्ही यात्रेकरू आहो. आम्हांला तिथे जायचे आहे.

प्रत्येक हिंदुस्थानीला हव्या त्या ठिकाणी जाण्याचा अधिकार आहे. परंतु दुधात जशी साखर मिसळते तसे तुम्ही ज्या गावात जाल त्या गावात मिसळत असाल तर. परंतु तुम्ही जाऊन तिथे जर गोंधळ घालणार असाल, मारकाटीसारखे वातावरण निर्माण करणार असाल तर मात्र तुम्हांला तो हक्क नाही. कोणालाही नाही. मला जितका बिहार आणि बंगालमध्ये जाण्याचा वा दिल्लीत राहण्याचा हक्क आहे तितकाच हक्क लाहोर वा कराची शहरात राहण्याचा आहे. मला कोणाचेही शत्रुत्व करण्याकरिता तिथे जायचे नाही हे याचे कारण आहे. मी तर स्वतःला सर्वांचा मित्रच समजत असतो. इंग्रजसुद्धा माझे मित्रच आहेत.

हं, तुम्हा ३७ लाख शिखांची वस्ती जर आम्हांला पोरबंदरला जायचे आहे असे म्हणत असेल तर पोरबंदर तर एक लहानसे गाव आहे. तिथे जर तुम्ही सर्व जाल तर फिरूही शकणार नाही. तुम्ही जर असे काही काम करणार असाल तर निश्चितच तुम्हांला अडवणे हे सरकारचे कर्तव्य असेल.

माझ्यावर शिव्यांचा वर्षाव होत असतो याकडे तर तुम्ही पाहा. पाकिस्तानचे मंत्रीसुद्धा म्हणतात की गांधी धोकेबाज आहे. मी जर त्यांचा राग करीन तर मी तुम्हांला काय मार्गदर्शन करू शकेन? मी कोणत्या मार्गावर आहे हे माझे कामच सांगेल. आज तर काँग्रेसचा अधःपात सुरू आहे हे मला कबूल करावे लागत आहे. आज काँग्रेस हक्काची गोष्ट करते आहे. आपले कर्तव्य काय आहे हे ती विसरून गेली आहे. मी तर शिकवण्यात पूर्ण जन्म घालवला आहे, पण पूर्ण यश मिळू शकले नाही.

दुसरे एक प्रतिनिधीमंडळ आले, त्याबरोबर झालेली चर्चा -

किरपाण ठेवण्यासंबंधी जो आदेश काढण्यात आला आहे त्यातील विसंगतीची तर मला कल्पना नाही. धार्मिक गोष्टीत कोणीही अडथळा आणू शकत नाही. बाबा खडकसिंहचे मंत्री आले होते, किरपाण का ठेवले पाहिजे यासंबंधात त्यांनी माझ्याशी दीर्घ चर्चा केली.

सरकारने किरपाणचा जो आकार ठरवला आहे त्यात मला तरी काही वाद घालण्यासारखे वाटत नाही.

सरदार पटेलवर तुम्ही जो आक्षेप घेत आहा तो बरोबर नाही. मी त्यांना वर्षांपासून ओळखतो. ते कधीही कोणाचेही लांगुलचालन करत नाहीत. ते कदाचित तुमच्याशी दोन कठोर शब्द बोलले असतील. परंतु त्यात तुमचे हित सामावलेले असेल आणि त्यामुळे तुमचे अंतःकरण शुद्ध आणि स्वच्छ होईल. रंधावा एका शीख कुटुंबातील आहेत. आणि आज ते सरदारांच्या खास विश्वासातील माणूस आहेत. असे असूनही सरदार तुमच्याकरिता काहीही करून राहिले नाहीत असे तुम्ही कसे म्हणू शकता? उलट रंधावांना पोलीस अधीक्षक बनवल्याबद्दल त्यांच्यावर किती आक्षेप घेण्यात आले होते हे मला माहीत आहे.

परंतु मी मूळ गोष्टीवर येतो. सर्वांच्या धर्मात चोहोकडे भ्रष्टाचार का आहे? हो, मुसलमानांच्यासुद्धा. पाकिस्तानमध्ये तर याला सीमा राहिलेली नाही. परंतु तेथील एक भाऊ मूर्खपणा करत असेल तर दुसऱ्यानेही केला पाहिजे काय? बिहारमध्ये स्त्रियांना विहिरीत टाकण्यात आले. त्या शीख नव्हत्या तर हिंदू होत्या हे याचे कारण आहे. मसूरीत शीख स्त्रियांचा नाचगाण्यापासून फुरसत मिळत नाही हे वाचून तर मी थक्क झालो. चारित्र्य तर पूर्णपण लोप पावले आहे. आणि अशा अनेक उणिवा मी तुम्हांला दाखवू शकतो. यात सरकार काय करू शकणार आहे? आपण जर आपल्या दोषांकडे पहाडाप्रमाणे पाहू शकलो आणि ते दुरुस्त करण्याचा प्रयत्न जर आपण करू शकलो तर

आपण उंच चढू. आज तर आपणा सर्वांचे लक्ष मारणे, कापणे, दंगेधोपे इकडेच केंद्रित झाले आहे. यामुळे कोणाचे भले होणार आहे? असे असले तरी ज्यांना अटक करण्यात आली आहे त्यांची मी चौकशी करीन. माझ्याजवळ सत्ता तर नाहीच. मी तर सेवक आहे. माझे जो कोणी ऐकतो त्याला सांगण्याचा मी प्रयत्न करत असतो.

सहा वाजता सर्व आटोपले आणि बापूजी प्रार्थनेकरिता गेले. प्रार्थनेत त्यांनी इराणच्या प्रतिनिधीचे आणि कन्याविद्यालयाच्या भगिनींचे आभार मानले. तसेच शीख प्रतिनिधीमंडलाशी झालेल्या चर्चेचा सारांशही सांगितला (जो वर दिला आहे).

प्रार्थनेनंतर बापूजी थोडेसे फिरले. मी मीराबहेनच्या सेवेकरिता थांबले. आजपासून त्यांना थोडेसे अन्न द्यायला सुरुवात केली आहे.

बापूजी नियमाप्रमाणे साडेनऊ वाजता झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१५ ऑक्टोबर १९४७

आज मी प्रार्थनेकरिता पोहोचू शकले नाही. मला कोणी उठवायला आले नाही आणि वेळेचे भान मला राहिले नव्हते. मीराबहेनने उठवले तेव्हा पाऊणेपाच वाजले होते. रात्री दोनतीन वेळा मीराबहेनचे डोके आणि पाय दाबून देण्याकरिता उठले होते. यामुळे वेळेची कल्पना राहिली नाही. थोडा वेळ मनातून वाईट वाटत राहिले, परंतु मग मी एकटीनेच प्रार्थना केली. बापूजी म्हणाले, “तू आजाऱ्याची सेवा करत होतीस. हीच खरी प्रार्थना आहे. मीराचे पाय चेपण्याचे सौभाग्य हा तर मी ईश्वरी प्रसादच समजतो. मीरा ही खरोखर मीरा आहे. आणि हिच्या सेवेत तू आहेस तर तुलासुद्धा अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळतील. तू शिकते आहेस. शिवाय मीरालासुद्धा तुझ्या सेवेमुळे खूप समाधान मिळते आहे. मीराची सेवाकरणे ही प्रभूची प्रार्थना करण्यासारखेच आहे. तुझ्यावरील तिच्या खुशीला पारावारच नाही. आणि तिचे पाय चेपत असताना मनात रामनामाचा जप सुरू राहू दे. यामुळे आपली प्रार्थनासुद्धा होऊन जाते. आणि म्हणून तू प्रार्थनेकरिता आली नाहीस याबद्दल मला मुळीच वाईट वाटले नाही.”

दुपारी सरहद्द प्रांतातील गिरधारीलालजी बापूजींना भेटायला आले. त्यांनी तेथील करुण अवस्थेचे वर्णन केले. तेथील लोकांना निघण्याकरिता हवाईजहाजसुद्धा मिळत नाही. आणि पाकिस्तानचे हल्ले सुरूच आहेत. हुमायून कबीरजीसुद्धा आले होते. दिल्लीत सध्या बापूजींचे वास्तव्य आहे म्हणून परिस्थिती पुष्कळच चांगली आहे असे ते म्हणाले.

पूर्व बंगावमधील कृष्णकुमार आणि इतर काही लोकही आले आहेत. अल्पसंख्याकांना अजूनही फार भीती आहे आणि या समुदायाला घाबरवण्यातसुद्धा येते आहे. या लोकांची भीतीने धावपळ सुरूच आहे.

सायंकाळी नियमानुसार प्रार्थना झाली. प्रार्थनेत सुरुवातीला तर माईक सुरू होता परंतु नंतर तो अडकल्यामुळे लोकांना बापूजींचे प्रवचन चांगल्या प्रकारे ऐकता आले नाही. प्रार्थनासभेत मुलांचा आवाजही खूप होता.

प्रवचनाच्या सुरुवातीला भेट म्हणून मिळालेल्या कांबळ्यांची तसेच एका भगिनीने जे २,००० रु. भेट देण्याकरिता आणले होते. याची जाहीर घोषणा करत बापूजी म्हणाले,

> "भेट देऊन गेलेल्या मुसलमान भाईंना मी म्हणालो होतो की हा पैसा तुमच्याजवळच राहू द्या आणि तुमची इच्छा असेल त्या व्यक्तींना कांबळी द्या. परंतु त्या लोकांनी हिंदू आणि शीख निर्वासितांनाच कांबळी देण्याचा निश्चय केला होता. यामुळे त्यांनी मला हा पैसा दिला आणि म्हणाले की, "तुम्ही कोणाचेही शत्रू नाही, सर्वांचे मित्र आहा याबद्दल आमची खात्री पटली आहे. इथे जसे चांगले मुसलमान आहेत तसेच चांगले हिंदूसुद्धा आहेत. वर्तमानपत्रवाले जर प्रत्येक प्रांतातील लोकांनी जनहिताची जी कामे केली आहेत त्यांच्या खरेपणाची पावती देऊन जाहिरात करतील तर किती चांगले होईल! परंतु आज तर लोक चिथावणीखोर बातम्याच देत असतात, आणि केव्हा केव्हा या बातम्या तर स्पष्टपणे खोटेपणाने भरलेल्या असतात."
>
> "आजच्या वर्तमानपत्रात होते की संयुक्त प्रांतात कामकाजाकरिता देवनागरी भाषाच वापरणार आहे. ही बातमी जर खरी असेल तर असे करणे बरोबर नाही. यामुळे मला दुःख झाले. हिंदुस्थानातील मुसलमानांचा चौथा भाग तर केवळ संयुक्त प्रांतातच राहत असतो. इतकेच नाही तर किती तरी हिंदू उर्दूचे प्रकांड पंडित आहेत. उदाहरणार्थ सर तेजबहादूर सप्रूच घ्या. त्यांनी आपले उर्दूचे ज्ञान टाकून द्यायचे काय? यामुळे खरा मार्ग हाच आहे की या दोन्ही लिप्यांचे आपण जतन केले

पाहिजे. अशा प्रकारे दोन्ही लिप्यांमधून मिळवलेले ज्ञान वाया जाणार नाही. उलट जनतेचा विकास होईल, संस्कृतीची संपन्नता वाढेल.

"पाकिस्तानमध्ये काय होते आहे वा त्यांचा काय करण्याचा प्रयत्न आहे याचा विचार न करता आपला धर्म काय आहे, काय योग्य आहे असा विचार करून त्याप्रमाणे आपण चालायला पाहिजे."

प्रार्थनेच्या वेळी आज बापूजींना फार खोकला येत होता. प्रार्थना प्रवचन लिहिणे पूर्ण होत नाही तेवढ्यात पंडितजी आले आणि सव्वानऊ वाजल्यानंतर बापूजी झोपले.

मीराबहेनच्या प्रकृतीत सुधारणा होते आहे.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१६ ऑक्टोबर १९४७

आज रात्री मीराबहेनजवळ झोपायची आवश्यकता नव्हती. आज मी प्रार्थनेला ठरलेल्या वेळी उपस्थित राहू शकले. आजच्या प्रार्थनेत भाईसाहेब ब्रिजकृष्णजी चांदिवाला आणि मी असे दोघेजणच होतो. बापूजींना अशक्तपणा असल्यामुळे घरातच आम्ही थोड्याश्या चकरा मारल्या. परंतु आम्ही अधिक फिरायला पाहिजे असे बापूजींचे म्हणणे होते. यामुळे आम्ही बाहेर फिरायला गेलो. आम्ही सचिवालयापर्यंत गेलो.

बापूजींचे कामकाज दररोजप्रमाणे सुरू आहे. सकाळी राम मनोहर लोहिया भेटायला आले होते. त्यांच्याबरोबर लांब चर्चा झाली. त्याचा सार हा होता की आपल्याला जर देशाचे भले करण्याची इच्छा असेल तर ‘वादाला’ चिकटून न राहता सर्वांनी एकमताने काम केले पाहिजे. स्वराज्य मिळवणे सोपे आहे पण ते शोभेल अशा प्रकारे टिकवणे कठीण काम आहे. सध्या मोठा प्रश्न निर्वासितांचा आहे. त्याकरिता तरुणांनी व्यर्थ चर्चेत न पडता निःस्वार्थ भावनेने काम करायला पाहिजे. तरुणांची मानसिकता केवळ रचनात्मक कार्य करण्याची असली पाहिजे, सेवा करण्याची असली पाहिजे. स्वातंत्र्य मिळून आता कुठे चारपाच महिनेच झाले आहेत. तेवढ्यात जर आपण ‘पक्षात’ आणि ‘वादात’ पडून सत्तेकरिता मारामारी करू लागलो तर त्याचे चांगले परिणाम होऊणार नाहीत. यामुळेच मी काँग्रेसचे विसर्जन करण्याकरिता सांगत होतो. पण आज माझे ऐकतो कोण? यामुळे इतकेच सांगतो की एक दिवस असा येईल की जेव्हा तुम्हांला ‘हा म्हातारा जे म्हणत होता तेच बरोबर होते’ असे वाटू लागेल. हे काही मी भविष्यवेत्ता होऊन मोठ्या अभिमानाने सांगून राहिलेलो नाही, हे मी अनुभवाच्या आधारे सांगतो आहे. माझे म्हणणे जर तुमच्या गळी उतरत असेल तर तुम्ही सेवेच्या कामाला लागा. संघर्षाच्या वेळी ज्याप्रमाणे आपण जनतेला शिकवले होते त्याचप्रमाणे आपण आता जनतेला शिस्त, शांतता, साफसफाई

इत्यादी अतिशय महत्त्वाच्या गोष्टी शिकवून तिला तयार करण्याची हीच खरी वेळ आहे. सत्याग्रहाच्या लढा लढण्याकरिता तीस वर्षे लागली होती. तर आता याच प्रजेला स्वराज्य काय आहे आणि स्वराज्यात आपण कसे वर्तन करायला पाहिजे हे शिकवायला साठ वा त्याहूनही अधिक वर्षे लागतील. एकशेपन्नास वर्षांच्या गुलामगिरीमुळे आपले जीवन तन, मन आणि धनाने इतके काही भयंकर सडून गेले आहे की यात जेव्हा आपण आमूलाग्र बदल करू तेव्हाच आपण सुखी होऊ शकू आणि तेच खरे स्वराज्य असेल. यामुळे तुम्हांला जर आदर्श सेवक व्हायचे असेल तर सेवा करायची वेळ आताच आली आहे. तुलनात्मक दृष्टीने पाहिले तर इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशात शिकलीसवरलेली समंजस माणसे मूठभरच आहेत. हेच लोक जर रागद्वेषाने प्रेरित होऊन 'आक्षेपांच्या; आणि 'वादांच्या' भरीस पडले तर जनतेची उन्नती कधीही होऊ शकणार नाही. यामुळे माझी इच्छा आहे की तुम्ही जनतेचे नैतिक धोरण उच्च प्रतीचे करण्याकरिता पायाभरणीच्या कामात पूर्णपणे बुडून जावे. असे केले तर आपोआपच हे समाजवादाचे रूप धारण करील.

ते गेल्यानंतर स्वर्गीय किडवाईंचे कुटुंबीय आले. त्यांना आश्वासत आणि स्व. किडवाईंचे अपूर्ण राहिलेले काम करण्याच्या प्रयत्नाला लागणे ही त्यांना खरी श्रद्धांजली आहे असे बापूजी म्हणाले.

अडीच वाजता शेखसाहेब, कचरू आणि काश्मीरमधील इतर बंधू आले. अब्दुल्लासाहेब तर स्पष्टपणे म्हणाले की आम्हांला हिंदुस्थानी म्हणूनच जगायचे आहे आणि हिंदुस्थानी म्हणूनच मरायचे आहे. पाकिस्तानचे हल्ले सुरूच असल्याचेही त्यांनी सांगितले. युनोमध्ये काश्मीरचा प्रश्न नेण्यासंबंधात बापूजींनी सांगितले की "आपण गोष्टीगोष्टीत युनोकडे जाणे मला पटत नाही. आणि माझे तर मत आहे की आपण स्पष्टपणे सांगितले पाहिजे की तुम्ही आमची फाळणी केली, आता तुम्ही काळजी करण्याचे कारण नाही." यानंतर बापूजींनी एक गोष्ट सांगितली. दोन मांजरी होत्या आणि एक भाकरी होती. त्या

भाकरीचे समान तुकडे करण्याकरिता भांडण सुरू होते. अखेरीस एका माकडाला न्यायाधीश नेमायचे त्यांनी ठरवले. त्याने तराजू आणला आणि मोजण्याकरिता भाकरीचे दोन तुकडे केले. ज्या पारड्यातील भाकरीचे वजन जास्त असायचे त्या भाकरीतील तो लचका आपल्या तोंडात टाकायचा. अखेरीस याचा परिणाम असा झाला की त्या माकडाने संपूर्ण भाकरी खाल्ली आणि तो निघून गेला.आपले असे हाल होणार नसतील तर चांगले होईल. परंतु असेच सुरू राहिले तर आपली अवस्था या मांजरीसारखीच होईल. असे काही होण्यापूर्वी ईश्वराने मला उचलून घ्यावे अशीच माझी इच्छा आहे. मी तर इतके म्हणत निघून जाईन, पण कधी तरी तुम्ही माझी आठवण करत म्हणाल की "'हा गरीब माणूस' जे सांगत होता तेच खरे होते."

या गोष्टी सुरू असतानाच पंडितजी आणि इंदिराबहेन पण येऊन पोहोचले. नंतर आचार्य नरेंद्र देव आले. त्यांच्याशी सद्यस्थितीबद्दल चर्चा झाली. बापूजी म्हणाले की आजही दिल्लीकडे पाहिले तर शांतता स्थापित झाल्याचे आढळत नाही. आणि मग अशा परिस्थितीत आपले कर्तव्य काय आहे यासंबंधात चर्चा सुरू झाली. लोहियाजींशी बोलताना बापूजींनी जे विचार मांडले होते जवळपास तेच विचार या वेळीही त्यांनी मांडले होते.

सायंकाळी नरहरीभाई, लक्ष्मीदासभाई आले. नियमानुसार प्रार्थना झाली. प्रार्थनेत म्हैसूरमध्ये जबाबदार शासनव्यस्था स्थापण्याचा जो निर्णय घेण्यात आला होता त्यासंबंधीच आधी बापूजी म्हणाले,

> "म्हैसूर हिंदुस्थानी संघराज्यात सामील झाला आणि तेथील सत्याग्रहाचा यशस्वी अंत झाला. म्हैसूर राज्याचे दिवाण सर रामस्वामी मुदलीयारनी तेथील काँग्रेस सदस्यांबरोबर वाटाघाटी करून सन्माननीय तडजोड केली. यामुळे मी

महाराजांचे, दिवाणचे आणि प्रजेचे अभिनंदन करतो आणि त्यांना तसा संदेश पाठवतो आहे. आणि आता सर्व रियासतींनी म्हैसूरचे अनुसरण करावे असा सल्ला मी देतो आहे. संस्थानिकाने आणि संस्थानाच्या प्रजेने सुखी राहायचे असेल तर माझा असा सल्ला आहे की युरोपमधील राजाप्रमाणे त्यांनी केवळ घटनात्मक राजा राहायला पाहिजे.

"ही इमारत एक खाजगी इमारत आहे, आणि बिरलाबंधूंनी केवळ माझ्या प्रार्थनेकरिता तुम्हांला इथे येण्याची परवानगी दिली आहे. यामुळे त्यांच्या विवेकाचा आपण आदर ठेवला पाहिजे. मला असे कळले आहे की बागेतील फळाफुलांचे नुकसान करण्यात येत आहे. अशा प्रकारचे तुमचे वर्तन नसावे.

"माझ्याकडे अशीही तक्रार आली आहे की मी सरकारी नोकरांचे त्यांच्या लायकीपेक्षा जास्त कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. परंतु मी असे काही केले आहे हे मला मान्य नाही. परंतु मी तर देशाची सेवा करण्याकरिता भरती करण्यात आलेल्या अंमलदारांकडून आणि सरकारी माणसांकडून जी अपेक्षा करत असतो त्याबद्दल बोललो होतो. मग सरकारी अंमलदार जरी ब्रिटिश असले तरी ते पोलिसांचे लोक म्हणून हिंदुस्थानी प्रजेचे सेवक म्हणून इथे राहू शकतील. इथे आधी जे विदेशी पगारदार नोकर राहत होते ते प्रजेचे मालक असल्याप्रमाणे वर्तन करत होते.आता ते दिवस तर पूर्णपणे गेले. आता तर त्यांनी हिंदुस्थानचे निष्ठावंत सेवक म्हणूनच काम केले पाहिजे आणि तशा प्रकारेच राहायला पाहिजे. आणि कामकाजासंबंधीचे हुकूम मंत्र्याकडून घ्यायला पाहिजे. यात जसे लाचलुचपतीला स्थान असूच शकत नाही तसेच पक्षपातालाही स्थान असू शकत नाही..

"पूर्व बंगालमधून अल्पसंख्याक जमातींनी देशत्याग करायचे ठरवले आहे आणि त्या दृष्टीने एक भाई मला भेटायला आले होते. मी त्यांना सल्ला दिला की

तुम्ही जर बहाद्दूर असाल तर तुम्ही ईश्वराशिवाय इतर कोणालाही घाबरणार नाही. तुमच्या जीवाला, धर्माला, अब्रूला, आणि शहरी पद्धतीच्या तुमच्या अधिकारांना जो धोका आहे त्यापासून तोच तुमचे रक्षण करील. असे असूनही ज्यांच्यात तिथे राहण्याचे धैर्य नसेल त्यांनी हवे असेल तर तिथून निघून यावे. परंतु जसे शिकल्यासवरलेल्या वर्गाचे, डॉक्टरांचे, वकिलांचे कर्तव्य आहे की ते जर तिथून निघून येण्याचे ठरवत असतील तर त्यांनी तशीच व्यवस्था आधी गोरगरिबांकरिता करणे हे त्यांचे कर्तव्य आहे आणि त्या कर्तव्याची त्यांनी पूर्ती आधी करावी असा माझा त्यांना सल्ला आहे.

"पाकिस्तान केवळ मुसलमानांचेच राज्य असावे आणि हिंदुस्थानात केवळ हिंदूंच वास्तव्य करू शकत असतील आणि दोन्ही देशांत अल्पसंख्याकांना कोणतेही अधिकार दिले जाणार नसतील तर दोन्ही देशांचा विनाशच आहे. मी तर ईश्वराला प्रार्थना करतो आहे की त्याने सर्वांना सन्मती द्यावी आणि आपल्याला या धोक्यापासून वाचवावे."

प्रार्थनेनंतर राजकुमारीबहेन आल्या होत्या. आजच्या प्रवचनाचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. यामुळे बापूजी फिरू शकले. जॉन मथाईसुद्धा आले होते.

साडेआठनंतर झोपायची तयारी.

मीराबहेनची प्रकृती चांगली आहे.

बिरलाभवनन, नवी दिल्ली,

१७ ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थनाकरून बापूजी ‘हरिजन’करिता लिहायला बसले. ५.२० पासून तर ५.४५ पर्यंत मजकूर सांगता सांगता बापूजी झोपून गेले. नियमानुसार मालीश, आंघोळ वगैरे.

बापूजींनी माझ्याशी काही गोष्टी केल्या . . . (अ) ला असे वाटते की बापूजी . . . यांच्यात पक्षपात करत आहेत. बापूजी म्हणाले, “माणूस कधी डाव्या आणि उजव्या डोळ्यात पक्षपात करू शकतो काय? समज की उजवा हात आपल्याकरिता फार उपयोगाचा आहे आणि डाव्या हाताचे बोट भाजले असेल तरी दुःख तर उजव्या हाताचे बोट भाजल्याने जसे होईल तसेच होणार ना? अशाच प्रकारे माझ्या मनात . . . ना सारखेच स्थान आहे. यामुळे आपली जितकी संकुचित वृत्ती असेल तितकीच आपली उन्नती होणार नाही. आपण तर उदार असलो पाहिजे. आणि असे झाले तर देशावरही याचा प्रभाव पडेल.”

दुपारी मुलाखतीकरिता थोडेसे गुजराती आले. त्यांनी विदेशात राहणाऱ्या गुजरात्यांबद्दल किती तरी प्रश्न विचारले.

प्रश्न - दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या हिंदुस्थानींना जर युनो न्याय देऊ शकत नसेल तर हिंदुस्थानींनी काय करावे?

बापूजी - पहिली गोष्ट तर ही आहे की सत्याग्रह कधीही निष्फळ ठरू शकत नाही.आणि तो जर निष्फळ ठरत असेल तर तसे का होते हे माझ्या आकलनाबाहेर आहे. हिंदुस्थानींनी आपले तेज दाखवायला पाहिजे.

प्रश्न - असे समजा की युनो हिंदुस्थानींच्या प्रश्नाची न्याय्य सोडवणूक करू शकला नाही तर त्याचा आपल्या संस्थांवर काय परिणाम होईल?

बापूजी - युनो जर न्याय करू शकणार नसेल तर युनो त्याची लाजच गमावेल.

प्रश्न - जगावर त्याचा काय परिणाम होईल?

बापूजी - जगावर त्याचा काय परिणाम होईल हे कोणाला माहीत? मलासुद्धा हे माहीत नाही.

प्रश्न - जगात शांतता स्थापन करण्याकरिता जर रंगभेद वा जातिभेद नाहीसे करणे आवश्यक आहे हा सिद्धांत मान्य असूनही हे वाईटपण दूर करण्याकरिता ते काहीही करत नाहीत. यासंबंधात तुम्ही कोणता सल्ला द्याल?

बापूजी - या सिद्धांतावर विश्वास असूनही जे लोक याकरिता काहीही करत नाहीत ते ढोंगी आहेत. त्यांच्याबद्दल काहीही बोलण्यासारखेच नाही. हे लोक दुर्बल आहेत. आणि जगात जर शांततेची स्थापना करायची असेल तर रंगभेद वा जातिभेदाचे निर्मूलन करणे आवश्यक आहे.

प्रश्न - मानव समाजातील रंगभेद वा जातिभेद दूर करण्यासंबंधात तुम्ही कोणती सूचना कराल?

हिंदुस्थानींच्या हातात बरेच काही आहे. हिंदुस्थानने जर असे काही केले तर फार चांगले होईल.

प्रश्न - विदेशात राहणाऱ्या हिंदुस्थानींना तुम्ही कोणता सल्ला द्याल?

उत्तर - जिथेकुठे हिंदुस्थानी राहतात तिथे त्यांनी आपले तेज, गुण आणि शक्ती दाखवली पाहिजे.देशाभिमान असला पाहिजे. देशाचे नुकसान होईल असे कोणतेही काम त्यांनी करायला नको. आणि तन, मन आणि धनाने आपल्या देशाची किर्ती होईल आणि ती उत्तरोत्तर वाढत जाईल याकरिता कार्य केले पाहिजे.

दुपारी कृपलानीजी आले. बापूजींनी त्यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या. “खादीवाल्यांची मनेसुद्धा मलीन झाली आहेत. अशा प्रकारे आपल्याला जे अनमोल स्वातंत्र्य मिळाले आहे त्याची फळे ते वाया घालवत आहेत.” त्यांनी नियंत्रणे काढण्यावर भर दिला. “असे केले तरच साठेबाजी आणि काळ्याबाजाराचा आळा बसेल. आपल्या देशात नियंत्रणांची आवश्यकताच नाही ज्यांच्याजवळ पैसा आहे ते लपूनछपून का होईना पूर्वी जितकी साखर खात होते तितकीच नियंत्रणे असतानाही काळ्या बाजारातून खातील. मला तर स्पष्टपणे असे जाणवते की आपण लोकांना काळाबाजार करण्याचे शिक्षण देत आहो. जखमेवर मीठ चोळण्यासारखी आपली परिस्थिती आहे. कोणाला माहीत कसे पण आज माझ्यात अशा काही उणिवा निर्माण झाल्या आहेत की त्यामुळे माझे म्हणणे कोणच्याही गळी उतरून राहिले नाही. परिस्थिती ही अशी आहे.”

बापूजींचा खोकला अजूनही पूर्णपणे गेला नाही. या आजारासंबंधात बापूजींना किती तरी पत्रेसुद्धा येत असतात.

नियमानुसार प्रार्थना झाली. प्रवचनात सगळ्यात आधी सरळ या आजारासंबंधीच बोलले -

“प्रकृतीची चौकशी करण्याकरिता मला असंख्य पत्रे आणि तारा येत असतात. आणि इतक्यात तर रेडिओवरसुद्धा माझ्या खोकल्याचा आवाज ऐकू येत असतो. परंतु गेल्या चारपाच दिवसात खोकला कमी झाला आहे. पेनिसिलीन घेतले तर खोकला तीनच दिवसात जाईल असे मला सांगण्यात येत असते. याबद्दल मलाही शंका नाही. परंतु माझ्या दृष्टीत तर सर्व दुःखांवरील इलाज रामनामच आहे. आज मी भट्टीत जळतो आहे. यामुळे ईश्वरावरील माझी श्रद्धा अधिकाधिक प्रबळ होत चालली आहे. हा दावाग्नी विझवण्याकरिता केवळ तोच समर्थ आहे. मी केवळ ईश्वरालाच शरण आलो आहे.

"डॉ. राजेंद्रप्रसाद समितीने आता आपला विचारविनिमय पूर्ण केला आहे. ताबडतोब अन्नधान्यावरून आणि कापडावरून नियंत्रण उठवले पाहिजे या बाबतीत मी तर माझ्या मनातून दिवसेंदिवस दृढ होत चाललो आहे. युद्धाकाळात अन्न आणि कापडाची विदेशात निर्यात करावी लागत असल्यामुळे त्या काळापुरती या नियंत्रणांची आवश्यकता होती. आज देशात अन्नधान्य आणि कापड हे दोन्ही पुरेशा प्रमाणात आहेत. यामुळे ते लोकांना मिळू शकत नाहीत ही गोष्ट मी समजूच शकत नाही. नियंत्रण लावल्यामुळे लोक उलट पांगळे झाले आहेत. बिचाऱ्या गावकऱ्यांना सरकारी कारकुनांचा अनुभव नव्हता. ते तर केवळ कचेरीतील कागदपत्रांच्या कामातच व्यग्र असतात. त्यांना माझी नम्र सूचना आहे की त्यांनी आता जनतेला शिक्षित करण्याचा आणि तिच्या बदललेल्या मानसिकतेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आतापर्यंत प्रत्येकाने स्वतःवर विश्वास ठेवून परिश्रमी होण्याचा जर प्रयत्न केला असता तर त्यामुळे अनेक समस्यांचे उत्तर मिळाले असते आणि आपसात भांडणे करायला वेळच राहिला नसता.

"दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाबद्दल मी जे म्हणालो होतो त्याबद्दल आभार मानण्याकरिता एक तार आली आहे. आभार मानण्याकरिता असे करणे आवश्यक होते काय? मला तर दिव्याप्रमाणे स्पष्ट दिसते की सत्याग्रहीचा कधीही पराजय होऊच शकत नाही. अट इतकीच आहे की त्यांची मागणी वाजवी आणि न्याय्य असली पाहिजे. असे असले तर थोडेसे दीनदुबळे सत्याग्रहीसुद्धा स्वतःची अब्रू टिकवून ठेवू शकतात. हिंदुस्थानींपेक्षा गरीब नसूनही माझ्याकडे त्यांनी पैशाचीसुद्धा मदत मागितली आहे. आणि सध्या तर देशात निर्णायक वेळ आलेली आहे. यामुळे जर कोणी यांना मदत करू शकत असेल तर मला फार आनंद होईल.

“हिंदुस्थानच्या अब्रुरक्षणाकरिता आपले भाऊ तिथे आपल्या ‘हक्का’करिता संघर्ष करत आहेत. त्यांना निश्चितच मदत मिळेल अशी आशा आहे. सत्याग्रहीना काही मौजमजा करायची नाही. केवळ त्यांना जीवननिर्वाहाकरिताच पैशीची आवश्यकता आहे. आणि त्यांना मदत करणे प्रत्येक हिंदुस्थानीचे कर्तव्य आहे अशी माझी मान्यता आहे.”

प्रार्थनेनंतर बापूजी गोपूबरोबर खेळले. गोपूसुद्धा पळत होता आणि आजोबांच्या चालण्याची नक्कल करत होता. गोपू एक दिवस जरी आला नाही तरी ‘आज माझा मित्र आला नाही’ असे म्हणून बापूजी त्याची आठवण करायचे. त्याच्याबरोबर खेळण्यात बापूजींचा थकवा कुठल्याकुठे पळून जायचा.

प्रार्थनेनंतर पंडितजी, शेखसाहेब आणि मृदुलाबहेन हे सर्व आले. शेखसाहेब तर फारच दृढ आहेत आणि त्यांना भारतीय संघराज्यातच सामील होण्याची इच्छा आहे. पंडित काक खूपच कावेबाजपणा करत आहेत आणि राजासुद्धा मार्गदर्शनाखाली चालतो आहे असे वाटते. हे लोक नऊ वाजता गेले. बापूजींना काश्मीरच्या परिस्थितीसंबंधी असेच वाटते की, “काश्मीरने देशाला युद्धात होमले तर नवल वाटायला नको. आणि तिसऱ्या पक्षाचाही हाच उद्देश असणे हे याचे कारण आहे. यामुळे छाताडावर मारून रडत बसण्याचे कारण नाही.”

साडेनऊ वाजता व्यायाम करून बापूजी अंथरुणावर पडले. आता मीराबहेनच्या प्रकृतीत भरपूर सुधारणा होऊ लागली आहे. यामुळे त्यांच्या लेवेत दोनतीन तासच राहावे लागते.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१८ ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना. प्रार्थनेनंतर . . . चे जे पत्र आले होते त्याबद्दल मजकूर सांगून माझ्याकडून हरिजनकरिता लेख लिहवून घेतला (पाहा 'एक समस्या' 'हरिजन' २६ ऑक्टोबर १९४७). दुसरा एक लेख हिंदीत लिहवून घेतला (पाहा 'प्रौढ शिक्षणाचा नमुना' हरिजनबंधु २६ ऑक्टोबर १९४७).

हे दोन लेख लिहवून घेऊन बापूजी २० मिनिट झोपले. उठून फिरायला गेले. नंतर नेहमीप्रमाणे मालीश, आंघोळ वगैरे दैनंदिन कामे चालली. मालीश सुरू असताना बंगाली पाठ केला आणि वर्तमानपत्रे पाहिली. सध्या तर जुनागढच्या तात्पुरत्या शासनाच्या आणि काठेवाडच्या गोष्टी खूप आवेशात सुरू असतात. मी बापूजींना विचारले, "तात्पुरते शासन हिंसेने लढून राहिले आहे की अहिंसेने?" बापूजी म्हणाले, "अरे ! तू पाहा तर खरे, . . . ने जी . . . तलवार . . . भेट दिली आहे त्यातून काय सुचवले जाते?" आणि हे तर सांगून ठेवतो की तुमची शस्त्रे आमच्या उपयोगाची नाहीत. माफ कर, . . . आणि सामान्यपणे माणूस ज्याप्रकारे आणि जे बोलतो त्यावरून काय सुचवले जाते? मी तर सांगून ठेवले आहे की असे का? ज्याला जे योग्य वाटते ते तो करू शकतो. परंतु हे लोक जर सत्याग्रहाच्या मार्गाने लढतील तर फार चांगले होईल. आणि आपण जे सिद्धांत अनुसरण करतो त्यांची लाज राहील.

"जुनागढचे लोक निर्धार करून बसले आहेत की आम्ही पाकिस्तान मानत नाही, तुम्हांला जे करायचे असेल ते करा. यात कदाचित थोडेसे लोक मरतीलही. परंतु सत्याग्रहाच्या लढाईत आपल्या किती तरी युवकांनी, स्त्रियांनी आपले बलिदान दिले आहे. इतके सांगून ठेवतो की आम्ही तर बसलो आहो, पाकिस्तान आम्हांला मान्य नाही, मारायचे असेल तर मारून टाका. असे झाले तर माझी खात्री आहे की जुनागढ मान्य केल्याशिवाय

सुटका नाही. आणि याचे प्रतिबिंब काश्मीरवरही पडेल. काश्मीरची जी समस्या आहे, जी आता आंतराष्ट्रीय झाली आहे, तिचे उत्तर जुनागढच्या माध्यमातून अहिंसेद्वारे आपोआपच मिळेल. परंतु . . . परंतु माझे म्हणणे ऐकायला कोणीही तयार नाही.”

बापूना होणारे दुःख हे असे होते, आणि भेटीत मिळालेली तलवार उगारण्याचे चित्र तर बापूंना मुळीच रुचले नाही. मग ते विचारात पडले, विचारमंथन करू लागले.

आज भेटायला येणारात सुन्हावर्दीसाहेब, जमनादास द्वारकादास, . . . मुसलमान, पंडितजी, मृदुलाबहेन, जयप्रकाशजी, शेखसाहेब आणि श्रीनंगरमधील इतर काही बंधू होते. पाकिस्तानी माणसे काश्मीरमध्ये ग्रामविकासाच्या कामात त्रास देत असल्याच्या बातम्या मिळाल्या. पंडित काक फार घाणेरडा खेळ खेळत आहेत असे वाटते. प्रवचनात कुरुक्षेज्ञात ज्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या त्याविषयी बोलले, आणि त्या लोकांनी बापूजींनी केलेल्या विनंतीचे चांगल्या प्रकारे स्वागत केले असल्याचे कळल्यामुळे बापूजींनी आनंदही व्यक्त केला.

आजच्या प्रवचनात विशेषतः हिंदुस्तानी भाषेविषयी बापूजी म्हणाले की,

> “हिंदुस्थानी लोकांनी प्रांताप्रांतात व्यवहार करण्याकरिता हिंदुस्तानी भाषाच अनुकूल राहील या मतावर मी दृढ आहे. संस्कृतप्रचूर हिंदी वा फारसीप्रचूर उर्दू आपल्या जनतेला समजू शकणार नाही. आणि आता तर आपण इंग्रजीला प्रमुख स्थान मुळीच द्यायला नको. एक भाषा म्हणून इंग्रजीबद्दल जरी माझ्या अंतःकरणात सन्मानाची भावना आहे आणि ही भाषा शिकण्याची ज्यांना हौस आहे ते ती शिकू शकतात. परंतु ‘राष्ट्रभाषा’ म्हणून तिला एक क्षणसुद्धा स्थान असू शकत नाही. आणि दोन लिप्या शिकण्यात ज्या अडचणी आहेत त्याबद्दल अनेक प्रकारचे युक्तिवाद माझ्याकडे येत आहेत, परंतु त्यातील एकही युक्तिवाद माझ्या गळ्याखाली उतरत नाही. आपण जर दोन लिप्या शिकू शकत नसू आणि त्यामुळे

इंग्रजीचे वर्चस्व कायम राहत असेल तर मी म्हणेन की आपल्यामध्ये देशहिताची भावना मुळीच नाही. आपल्याला जर आपल्या देशाबद्दल प्रेम वाटत असेल तर आपल्याला या दोन्ही लिप्या शिकण्यात आनंत वाटला असता आणि प्रेमाच्या या उमाळ्यात आम्ही दोन्ही लिप्या सहजपणे शिकून घेतल्या असत्या. याकरिता कोणाला सांगावे लागले नसते. आजच शेख अब्दुल्लासाहेब सांगत होते की ते जेव्हा काश्मीरमध्ये तुरुंगात होते तेव्हा ते या दोन्ही लिप्या सहजपणे शिकले होते. शेखसाहेब जर इतके करू शकत असतील तर इतर राष्ट्रप्रेमी बांधवांकरिता तर ही गोष्ट अजूनच सुलभ असायला पाहिजे."

प्रार्थनेमधून आल्यानंतर नेहमीप्रमाणे बापूजी फिरले.गोपूबरोबर खुष होते. प्रवचन लिहिले आणि व्यायाम करून दहा वाजता झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

१९ऑक्टोबर १९४७

साडेतीन वाजता प्रार्थनेकरिता उठले. प्रार्थनेनंतर गरम पाणी आणि मध घेतल्यानंतर बापूजींनी टपाल लिहिला. सरदारांनी सुऱ्हावर्दी साहेबांना सडेतोड उत्तर दिले. ते कराचीला जाणार होते. बापूजी सुऱ्हावर्दीसाहेबांना म्हणाले, “तुम्ही प्रामाणिक आहा हे जर तुम्हांला सिद्ध करायचे असेल तर तसे तुमच्या प्रत्यक्ष कार्यातून दिसून आले पाहिजे. तुमच्यावरील सर्वांचा विश्वास उडाला आहे. परंतु मी तर आशावादी माणूस आहे. माझ्याजवळ निराशेला स्थान नाही. परंतु संपूर्ण जगाचा विश्वास संपादन करण्याकरिता तुम्ही जाहीर निवेदन काढावे म्हणून मी तुमची समजूत घालतो आहे. आणि जी काही सत्य हकिगत असेल ती तुम्ही सांगायला पाहिजे. पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांना जे सहन करावे लागत आहे त्याच्या करुण घटनांच्या कथा माझ्याकडे येत आहेत. ही गोष्ट जर खरी असेल आणि तुम्ही स्वतःला खरोखरच हिंदुस्थानचे प्रामाणिक सेवक समजत असाल तर तुम्ही जिनासाहेबांना यासंबंधात सरळसरळ प्रश्न विचारला पाहिजे आणि त्यांच्याकडून उत्तर मिळवले पाहिजे.”

फिरून आल्यानंतर आंघोळ वगैरे सर्व नित्यकर्म चालले. थंडीमुळे बापूजी बाहेर बसले होते. अजूनही आहारात तीन वेळा दहा अंस दूध आणि सायंकाळी सायंकाळी भाजी, संत्रे, सूप आणि दूध. अजून धान्य सुरू केले नाही.

१२ वाजता लॉर्ड हेन्डिस आणि त्यांची पत्नी भेटायला आले. खरे म्हणजे ही मुलाखत उद्याकरिता ठरली होती. परंतु उद्याऐवजी ही मुलाखत आजच झाली. हेन्डिसच्या पत्नीने मौनासंबंधीच चर्चा केली -

**लेडी हेंड्स - तुम्ही जेव्हा मौन ठेवता तेव्हा तुमच्या मनात प्रामुख्याने कोणते विचार येतात? किंवा मौन पाळत असताना तुम्ही कोणता विचार करता?**

गांधीजी - मी ईश्वराचा विचार करतो.

**लेडी हेंड्स - तुम्ही ईश्वराजवळ तुमच्या देशवासीयांकरिता कोणती प्रार्थना करता?**

त्यांनी चांगले आणि सदाचारी व्हावे इतकीच. ही मनू माझी नात आहे. ही एकमेव अशी व्यक्ती आहे की जी नोआखालीच्या संपूर्ण दौऱ्यात माझ्याबरोबर होती. त्या यात्रेदरम्यान तिने एक सुंदर धून शोधून काढली. अर्थातच तिने ती धून स्वतः बसवली नव्हती. ईश्वरानेच तिला ती म्हणायला लावली असे म्हणणे अधिक उचित होईल. "ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मती दे भगवान." परंतु मी ईश्वराची प्रार्थना काही मागण्याकरिता करत नसतो. ईश्वर सर्वशक्तिमान आहे, सर्वव्यापी आहे, सर्वज्ञ आहे. तो प्रत्येकाच्या अंतःकरणात राहतो. त्याचे मार्ग अपूर्ण माणसाच्या मार्गाप्रमाणे नसतात. असे काही नाही की आपण मागतो तेव्हाच तो आपल्याला काही देतो. आपल्याला कशाची गरज आहे आणि आपल्याकरिता काय चांगले आहे हे त्यालाच जास्त चांगले माहीत असते.

आपण न मागताही आपल्याकरिता जे चांगले असेल ते तो आपल्याला देतो. तो इतका उदार आणि कृपाळू आहे की गरिबांकरिता त्याचे हृदय विरघळते. त्याला काही मागण्याची गरजच कुठे असते?

**लेडी हेंड्स - केवळ सोमवारीच नाही तर तुम्ही इतरही अनेक वेळा मौन पाळता. या दररोजच्या मौनामागील उद्देश काय?**

शरीराला विश्रांती देणे. सोमवारचे मौन ही अगदी वेगळी गोष्ट आहे. त्याचे आध्यात्मिक महत्त्व आहे. ज्या माणसाला मौनाची कला कळते त्याच्याकरिता ते अंतर्मुख होण्याचे साधन होते. मौनपालन हा माझ्या जीवनाचा भाग झाला आहे. त्याकरिता मला प्रयत्न करावे लागत नाही.

**लेडी हेंड्स - तुमचा कार्यक्रम काय आहे आणि दिल्लीत राहण्याचे तुमचे नेहमीसाठी कोणते ठिकाण असेल असे शेवटी लेडी हेंड्सनी गांधीजींना विचारले.**

बापूजी म्हणाले - मला इथेच करायचे वा मरायचे आहे. यामुळे तोपर्यंत मी इथे आहे. एक तर मी चिरनिद्रा घेईन आणि नाही तर इथे चिरशांती प्रस्थापित करीन. सध्या तरी माझ्यासमोर हेच दोन कार्यक्रम आहेत.

साडेबारा वाजता हे लोक गेले. नंतर बापूजींनी माती घेतली. बापूजींचे पाय चेपले. अडीच वाजता मौलानासाहेब आले. त्यांनी पूर्व पंजाबसंबंधी गोष्टी केल्या. बापूजींनी या गोष्टी लिहून मागितल्या. असे असूनही बापूजींनी सुचवले की "राष्ट्रीय मुसलमानांच्या जिवाला अल्पसंख्यांकाडून धोका असल्यामुळे जीव वाचवण्याकरिता सध्या तरी पळून जाणेच त्यांचे कर्तव्य आहे. असे केले नाही तर सर्वच राष्ट्रीय मुसलमानाची अवस्था वाईट होईल."

बापूजी ३ वाजता माऊंटबॅटनना भेटायला गेले. ४.५५ वाजता परतले. जुनागढ आणि काश्मीरच्या गोष्टी केल्या. ५ वाजता दूध, फळे, सूप वगैरे घेऊन प्रार्थनासभेत गेले.

आज "अजहु न निकसै प्राण कठोर" हे भजन म्हटले होते. त्यावरूनच बापूजींनी प्रवचन सुरू केले -

"या भजनामागे किती करुण इतिहास भरलेला आहे? अनेक आठवणी ताज्या होतात. 'आश्रमभजनावली'मधील अनेक भजनांमागे इतिहास तर भरलेला आहेच. मगनलाल गांधी हे भजन किती तरी वेळा म्हणायचे. दक्षिण आफ्रिकेत ते माझ्याबरोबर राहत होते आणि देशसेवेकरिता त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले होते. त्यांची अंगकाठी मजबूत होती. परंतु इथे आल्यानंतर त्यांना कामाचे इतके मोठे ओझे उचलले होते की जे त्यांना पेलवले नाही. रचनात्मक कार्य आणि

स्वराज्याचा संदेश चाळीस कोटी लोकांपर्यंत पोहोचवणे हे काही सोपे काम नव्हते. यामुळे ते हे भजन अतिशय करुण स्वरात गात असत. या भजनात कवी ईश्वराच्या साक्षात्काराकरिता आतुरलेला आहे. आणि साक्षात्कार होत नसल्यामुळे त्यांना एक रात्र एका युगाप्रमाणे वाटते. यामुळे मगनलालचा ईश्वर स्वराज्याचे स्वप्न होते आणि ते रचनात्मक कार्याद्वारेच सिद्ध होऊ शकणार होते. या रचनात्मक कार्याच्या अंमलाचा परिणाम काय होतो ते लोकांना आजसुद्धा माहीत नाही, मग त्या वेळी कसे कळणार होते. १५ ऑगस्टला जरी स्वराज्य आलेले असले तरी मी ते स्वराज्य आहे असे समजतच नाही. स्वराज्यात भाऊ भावाचा खून करत असतो काय? स्वतंत्र हिंदुस्थान तर सर्वांनी मैत्र भावाने जगायचे स्थान असेल. त्यात तर कोणीही कोणाचा शत्रू नसायला पाहिजे. परंतु आज तर ही गोष्ट आकाशकुसुमासारखी वाटते. परंतु दुःख या गोष्टीचे आहे की हिंदुस्थानची जी मुले हिंदुस्थानचे अन्नपाणी खाऊनपिऊन मोठी झालेली आहेत हिंदू, मुसलमान, शीख असे सर्व आपल्याच भावांची कत्तल करणयाकरिता तयार झाले आहेत. असे केले तर दोन्ही धर्मांचा विनाशच होणार आहे. तुम्हांला खऱ्या स्वराज्याचे स्वप्न साकार करायचे असेल तर मगनलालप्रमाणे तुम्ही स्वराज्याकरिता आतुरलेला असायला पाहिजे. इतर काय करतात याच्या भानगडीत पडायचे कारण नाही. आपले पोळत असलेले पाय पाहा, आपले वर्तन अतिशुद्ध आहे की नाही हे तपासा. माझ्या प्रार्थनेत आज जर मुसलमान आले तर ते सुरक्षित राहतील की नाही हीच मला काळजी राहील. कदाचित त्यांच्या शरीराला इजा केली जाणारही नाही, परंतु त्यांचा अपमान जरी झाला तरी मला लाजल्यासारखे होईल. स्वराज्यात सर्वांना येता आले पाहिजे. स्वराज्यात भीतीचे काय काम?

> "आज संपूर्ण जगाचे डोळे आपल्याकडे लागलेले आहेत. आशांनी भरलेले अनेक डोळे हिंदुस्थानकडे पाहत आहेत. जगाच्या या अपेक्षांची परिपूर्ती हिंदुस्थानला जर करायची असेल तर या रक्तरंजित दंगली आपण थांबवल्या पाहिजे आणि शुद्ध अंतःकरणाने परस्पराशी जेव्हा आपण भाऊभाऊ म्हणून व्यवहार करू तेव्हाच आपण स्वराज्याचे सुख अनुभवू शकू आणि सर्वांना शांततेचा पाठ शिकवू शकू."

रात्री राजकुमारीबहेन आल्या. एका मुसलमान आरोग्याधिकाऱ्यावर कोणी तरी गोळी झाडली आणि त्यात तो मेला असल्याची बातमी त्यांनी आणली. हा अधिकारी हिंदूंची, शिखांची - सर्वांची प्रामाणिकपणे सेवा करत होता.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२० ऑक्टोबर १९४७

नित्याप्रमाणे प्रार्थना. नंतर खूप पत्रे लिहिली आणि अर्धा तास आराम केला. नेहमीप्रमाणे ६।। वाजता फिरायला निघाले. आज मौन असल्यामुळे विशेष कोणी आला नव्हता. मौनाच्या दिवशी जवळपास सुटी असल्यासारखेच असते. सकाळी हिरालाल शास्त्री आले होते. राजस्थानसंबंधी गोष्टी करून गेले. राजस्थानमधील संस्थानिकांमध्ये ऐक्य घडवून आणा असे ते बापूजींना म्हणाले. परंतु "जनता जर तयार असेल तर संस्थानिकसुद्धा काळवेळ पाहून समजून घेऊ शकतील. याकरिता कोणत्याही राजाला अपमानित करण्यात येऊ नये. चातुर्याने, समजावून सांगण्याच्या कौशल्याने काम घेतले पाहिजे." चिठ्यावर लिहून त्यांनी गोष्टी केल्या होत्या.

साडेअकरा वाजता सुचेताबहेन आल्या. निर्वासितांच्या छावणीसंबंधी त्या बोलल्या. एकदा या छावणीत बापूजींना नेण्याची त्यांची इच्छा होती. सुचेताबहेन तर दिवसरात्र या छावण्यांमधील लोकांच्या आणि भगिनींच्या सेवेत लागलेल्या असतात. नोआखालीतसुद्धा त्यांनी खूप मेहनत घेऊन काम केले होते.

बापूजींना आज टपालही भरपूर आला होता. सामान्यपणे बापूजींना जो तीन वेळा टपाल येत असतो त्यातील लिफाफे आणि पोस्टकार्ड मिळून १००० पेक्षाही अधिक पत्रे येत असतील.

आज एक पत्र असे आले होते की जे केवळ शिव्यांनीच भरलेले होते. त्याचे उत्तर लिहिण्याची बापूजींनी मला सूचना केली.

मी म्हणाले, ". . . ज्या माणसाने तुम्हाला इतक्या सगळ्या शिव्या दिल्या आहेत त्याला उत्तर का द्यायचे?"

बापूजी चिठ्ठीवर लिहून म्हणाले, “तुला माहीत नाही की मला जे शिव्या देतात ते लोक मला फार चांगले वाटतात. (शिव्या - रागाच्या भरात मनात येईल तसे या गृहस्थाने लिहिले होते आणि त्यात लिहिलेल्या गोष्टींना मी ‘शिवी’ हे नाव ठेवले होते.) कारण असे करून ते आपला राग शमवत असतात आणि सर्व घाण वाहून जात असते. जे माझी पूजा करतात, माझ्या नावाने ‘जयघोष’ करतात आणि कत्तल करतात, माझ्या म्हणण्याप्रमाणे वागत नाहीत. त्यांच्यापेक्षा मला शिव्या देणारा हा माणूस हजारपट चांगला आहे असे वाटत असते कारण हा शिव्या देणारा माणूस त्याला काय वाटते ते मला स्पष्टपणे समजावून सांगत असतो आणि मला काय वाटते हे मी त्याला समजावून सांगू शकतो. आणि जर त्याची समजूत पटली तर तो अद्भुत कार्य करू शकतो. माझ्या जीवनात असे अनेक वेळा घडत आले आहे.”

बापूजींनी प्रवचन इंग्रजीत लिहिले. त्याचा हिंदीत अनुवादही त्यांनीच केला. विशेष येणारात जयप्रकाशजी, शेखसाहेब, सरदारदादा होते. आजच्या प्रवचनाचा सार हा असा होता. (काल मारून टाकलेल्या मुसलमान अंमलदारासंबंधी प्रवचन होते.)

> “रात्री राजकुमारीबहेनने मला एका भल्या मुसलमान अंमलदाराला मारून टाकण्यात आल्याचे सांगितले. तो आपले कर्तव्य बजावत होता. आणि त्याची विधवा जोरदार आक्रंदन करत ‘आता मी जगून काय करू, मलासुद्धा मारून टाका’ असे म्हणत होती. अशा एकदोन करूण घटना दिल्लीत दररोज घडत असतात. शिवाय माझ्या असेही ऐकण्यात येते की त्याचे दफन करण्याकरिता यायलासुद्धा मुसलमान बंधू घाबरतात. या गोष्टीमुळे तर माझा अतिशयच थरकाप उडतो. हे नामर्दपणाचे लक्षण आहे. दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चाललेली असल्यामुळे आता तरी दिल्लीवासीयांनी सावध व्हायला पाहिजे.

"एका ब्रिटिश मित्राचे अनावृत पत्र आले आहे. त्याचा सार याप्रमाणे आहे - तुम्ही वर्षांपासून एका भाडखोर आणि मारामारी सुरू असलेल्या प्रांतात राहता; आणि तिथून असे कळते आहे की आता हिंदुस्थानमध्ये जितके काही ब्रिटिश आहेत त्यांतील एकेकाला निवडून त्याची कत्तल करायचा, मारून टाकायचा विचार आहे. यासंबंधात बापूजी म्हणाले -

"मी मान्य करतो की यात मुळीच वास्तवता नाही. परंतु आजच्या विपरीत परिस्थितीत खरे रक्षण तर आपल्या अंतःकरणाकडून वा ईश्वराकडून मिळवायचे असते. तोच एकमेव वाचवणारा आहे. आणि दुसरे रक्षण आजूबाजूच्या वस्तीची सेवा करून त्यामुळे मिळणाऱ्या शुभेच्छांद्वारा मिळवायला पाहिजे. आणि तरीही जर भीती वाटत असेल तर सर्वांकरिता सरळ मार्ग तर वेळ वाया न घालवता हिंदुस्थानचा किनारा सोडून जाणेच असेल. परंतु हिंदुस्थानींना माझी विनंती आहे की जो कोणी हिंदुस्थानचा निष्ठावंत सेवक होऊन राहील त्याला छातीशी लावून त्याच्याशी मायाळूपणे वागणे आपले कर्तव्य आहे."

प्रार्थनेनंतर बापूजींचे मौन सुटले. रात्री राजकुमारीबहेन आल्या होत्या. आज बापूजींनी २५४ तार कातले. जवळपास पाऊतास कातत होते. अंदाजे १० नंतर झोपायची तयारी.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

21 ऑक्टोबर 1947

नेहमीप्रमाणे ३.३० वाजता उठले. प्रार्थनेनंतर टपालातून आलेली पत्रे पाहिली. फिरत असताना गोकुळभाई भट्ट आणि हीरालाल शास्त्री आले होते. त्यांच्याशीसुद्धा बापूजींनी नियंत्रणे काढून टाकण्याबद्दल चर्चा केली. बापूजी म्हणाले, “आताही जर नियंत्रणे काढून टाकण्याचे आपल्यामध्ये धैर्य नसेल तर आपण स्वातंत्र्याकरिता पात्रच नाही असे मी समजेन.” . . . राजस्थानबद्दल विविध विषयांवर चर्चा झाली. बापूजी म्हणाले, “. . . सत्तेत इतके काय पडले आहे तेच मला कळू शकत नाही. सगळे जर सत्तेमागे पळणार असतील तर शासन कोणावर करणार आहे? माझी तर मान्यता आहे की सत्तेवर एखादी अशिक्षित भगिनी जरी बसली तरी हरकत नाही. आणि शासनव्यवस्था पाहणारी एखादी जबाबदार व्यक्ती असावी. सत्तेवर आल्यानंतर त्यांना विशिष्ट नियम पाळावेच लागतील. आणि येथील प्रजेचे सुखदुःख त्यांना ऐकू जाणारच नाहीत. हे सिद्ध होईल अशी गोष्ट तुम्हाला सांगतो. आणि . . . तुमच्यासारखा माणूस जर रचनात्मक कार्याला मुख्य कार्य समजून राजकारण करतो तो माणूस जर सत्तेबाहेर राहिला नाही तर काँग्रेस मृतवत होईल असा माझा दावा आहे. या गोष्टीची तुम्ही नोंद करून ठेवा. मला अशी किती पत्रे आली आहेत. आणि ज्यांची आपण विद्वानात गणना करतो त्यांची पण मला पत्रे आलेली आहेत. एक पत्र तर शिकल्यासवरलेल्या भगिनीचेसुद्धा आले आहे. ती लिहिते, “माझ्या नवऱ्याने देशाची अमुक अमुक सेवा केली आहे त्यांच्यात अमुक अमुक पात्रता आहे.” यांना मी चांगला ओळखतो. असे त्यांच्या अनेक कार्याचे पृथक्करण करणारे दहा पानांचे पत्र आले आहे. आणि शेवटी “यांना अमुक अमुक पद मिळाले पाहिजे” अशी शिफारस करण्यात आली आहे.”

हे सर्व पाहता मला तर ही परिस्थिती खरोखरच दयनीय वाटते. हे पत्र गुजरातीत होते. आणि त्यावरून मी या पोरीला लिहिले, "तुला मी शिकवले नाही हे मी किती शहाणपणाचे काम केले आहे हे या पत्रावरून जाणवते. पत्नीने अशा प्रकारे पतीची शिफारस का केली पाहिजे? हे या विदुषीला मुळीच शोभत नाही. आणि माझी अशी मान्यता आहे की सध्या तुझा नवरा बाहेर राहून हिंदुस्थानची जी सेवा बजावतो आहे तशी सेवा मंत्रिमंडळात येऊन बजावू शकणार नाही. तुरुंगात जाऊन आलेल्यांची अशा प्रकारची पत्रे येतच असतात. परंतु मी जर असे लिहिले की बाहेर राहून हे सुंदर काम करत आहेत तर त्यांचे मन घृणेने भरून जाईल. हे माहीत असूनही मी तर मला जे खरे वाटते तेच लिहीन. मग मी एकटा पडलो तरी हरकत नाही. आणि अशी स्थिती निर्माण झाली तर मी तर नाचेनच. आणि यातच माझी खरी कसोटी आहे."

आज बापूजी ही गोष्ट . . . ला अतिशय दुःखाने आणि गंभीरपणे सांगत होते. सध्याचे देशाचे वातावरण किती खदखदते आहे? त्याचे बापूजींनी किती हुबेहूब चित्र रेखाटले होते? बापूजींनी . . . अशासारख्यांना खऱ्याखुऱ्या गोष्टी ऐकवल्यामुळेच बापूजींना देशाने 'राष्ट्रपिता' हे बिरूद लावले आहे आणि त्यांचे दर्शनसुद्धा तशाच स्वरूपात होत असते.

बाकी नेहमीप्रमाणे स्नान, जेवण वगैरे चालले. १०.२० वाजता ख्वाजासाहेब अब्दुलमजीद भेटायला आले. बापूजींनी त्यांनासुद्धा स्पष्टपणे सांगितले की "अजूनही माझ्याकडे तक्रारी येत आहेत की मुसलमान भाईंजवळ बरीच शस्त्रे आणि इतर गोष्टींची तयारी आहे. तुम्ही या सर्व गोष्टींचा शोध घ्यायला पाहिजे. आणि ज्यांच्याजवळ शस्त्रे असतील त्यांची समजूत घालून ती मला अथवा सरकारला सोपवली पाहिजे. आणि हे काम राष्ट्रीय मुसलमानच करू शकतात. गुजरातीत (पुढील आशयाचा) एक सुंदर वाक्प्रचार आहे - "मी माझ्या बापाला मारीन आणि तारेन माझ्या सहकाऱ्याला". या वाक्प्रचाराप्रमामे जर मुसलमान वागणार असतील तर हिंदुस्थानात एकही मुसलमान राहू शकणार नाही,

आणि इतकेच नाही तर इस्लाम धर्माचाही समूळ नाश होईल हे मी तुम्हांला सांगून ठेवतो. तुम्ही निवेदने काढायला पाहिजे. हिंदस्थानशी निष्ठावंत असण्याची भावना जागवली पाहिजे. अंतःकरणापासून प्रतिज्ञा घेऊन त्यावर सही करायला लावली पाहिजे. अशा प्रकारचे काम न चुकता करा. परंतु हे सर्व मी सांगतो म्हणून करू नका. एक आणि एक मिळून दोन होतात इतक्या स्पष्टपणे जर तुम्हांला हा म्हातारा सांगत असलेली गोष्ट बरोबर आहे असे वाटत असेल तरच ही गोष्ट करा. मी म्हणतो म्हणून वा मला खुश करण्याकरिता खुदाकरिता तरी असे करू नका."

२ वाजता देवदासकाका, मौलानासाहेब आले. सकाळी ११ वाजता राष्ट्रीय मुसलमानांच्या कर्तव्याविषयी बापूजींनी ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्या गोष्टीच मौलानासाहेबांनीही केल्या. आणि मग सध्याच्या मंत्रिमंडळाविषयी चर्चा झाली. नियंत्रणे काढून टाकण्यासंबंधी बापूजी खूपच दृढ आहेत. कराचीहून श्री लालजीभाई आले आहेत. त्यांनी कराचीबद्दल बऱ्याच गोष्टी केल्या आणि म्हणाले की कराचीच्या रस्त्यावर पांढरी टोपीवाला माणूस चुकूनही दिसत नाही. कराचीतील काँग्रेस पुढारी आपल्या मुलाबाळांना घेऊन निघून आलेले आहेत. पुढारी असल्यामुळे आणि जवळ पैसा असल्यामुळे इथेसुद्धा त्यांनी सहजपणे आपले दैनंदिन व्यवहार सुरू केले आहेत. ही गोष्ट . . . ने बापूजींना खूपच हृदय हेलावणाऱ्या शब्दांत सांगितली. ही गोष्ट ऐकत असताना बापूजींच्या हृदयाची होणारी कालवाकालव आम्ही स्पष्टपणे पाहू शकत होतो. ही कालवाकालव व्यक्त करणाऱ्या शब्दांनी माझे डोळे तर पाणावलेच. त्यांच्या आवाजात इतके कारुण्य होते की, "तुम्ही तुमची जन्मभूमी सोडू नका असे आता मी कोणाला सांगू शकतो? पुढारी इतक्या सहजपणे आपले कुटुंब आणि पैसाअडका सोबत आणू शकले, पण गरीब बिचाऱ्या निराधार ग्रामीण प्रजेची आता किती हलाखीची परिस्थिती असेल ! तुमच्यापैकी एक जण जरी तिथे मेला असता तरी मी नाचलो असतो. मला किंचितही दुःख झाले नसते. शारदा मंदिरासारख्या

राष्ट्रीय संस्थेतील शिक्षक आणि तुमच्यासारखे पुढारी मरण पत्करण्याऐवजी भीतीपोटी तुर्की टोपी धारण करतात हे काय सुचवते? आणि अशा प्रकारे जिनासाहेब म्हणतात की आम्हांला जरी सर्वांचे रक्षण करायचे असले तरी लोक पळत आहेत. परंतु तुमच्यामधील एखाद्या माणसाने खादीची टोपी आणि नेहमी घालतात तसे हिंदू कपडे घातले असते आणि जशा प्रकारे तो व्यवसाय करत होता तशा प्रकारे करत राहिला असता आणि यामुळे जर तुम्हांला कोणी मारून टाकले असते तर तुमच्या आश्वासनाचे काय झाले असे मी जिनासाहेबांना विचारले असते. परंतु आज मी काणाला काय म्हणू शकतो?" लोक सामान्यपणे घाबरलेले आहेत. मी हे जे सर्व तुम्हांला सांगतो आहे कारण यात मला तुमचा दोष दिसत नाही, हा माझाच दोष आहे. माझ्या अहिंसेत निश्चितच काही उणीव राहिलेली आहे. त्यामुळे लोक प्रभावित होत आहेत. इतक्या वेळेनंतर तुम्ही अकस्मात त्यागशक्ती कशी गमावली याचे विश्लेषण केल्यानंतरच माझी सुटका होऊ शकते. याकरिता अजून तपश्चर्या करणे शिल्लक आहे असे मला वाटते. अशा प्रकारे तुमच्यासारखे लोक देशांतर करून जेव्हा येतात तेव्हा तुमचे ठिकाण सोडू नका, वा तिथेच मरा वा तुमच्या ठिकाणी परत जा असे मी त्यांना कोणत्या तोंडाने सांगू?"

एका उर्दू वर्तमानपत्रात अशी बातमी आली आहे की हिंदुस्थानातील एकूणएक मुसलमानाला हाकलून लावायचे वा त्यांना इथेच मारून टाकायचे असा निश्चय हिंदुस्थान सरकारने केला आहे. भाईसाहेबांनी बापूजींना ही बातमी वाचून दाखवली. बापूजी म्हणाले, "वर्तमानपत्रे जनतेची जी कुसेवा करत आहेत आणि जे पाप गोळा करतात तितके पाप कोणीही करत नसेल."

प्रार्थनेमधून आल्यानंतर बापूजी थोडे फिरले. भेटायला आलेले मुलाखतकार बसलेले होते. सिमल्याहून दुसरे विद्यार्थीमंडळ आलेले होते. त्यांना बापूजी म्हणाले, "लोकमान्य टिळक म्हणाले आहेत की जे लोक आपल्या शिक्षणाचा उपयोग

देशसेवेकरिता करतात तेच खरे सुशिक्षित. बाकीचे तर पोथीला भार असलेले मूर्ख असतात. आज विद्यार्थी कोणत्या मार्गाने जात आहेत? तुम्हांला माहीतच असेल की श्रीकृष्ण भगवान गुरूच्या आदेशाप्रमाणे जंगलात लाकडे तोडण्याकरिता गेले होते. परंतु आज विद्यार्थ्यांना गुरूचे काम करण्याची कुठे काय पडली आहे? इतकेच नाही तर गुरुचा अपमान करण्यातही ते मागेपुढे पाहत नाहीत. मला मान्य आहे की विद्यार्थ्यांना राजकारणात रस घेतला पाहिजे. पण केव्हा? यालाही मर्यादा आहेत. विवेकाचा थेंबही नसलेल्या, बिड्या पीत असलेल्या, व्यसनात बुडालेल्या, भगनींचा विनयभंग करत असलेल्या विद्यार्थ्यांच्या हाती सत्ता कशी सोपवता येईल? आणि या विद्यार्थ्यांच्या हाती जर देशाचे सुकाणू सोपवण्यात आले तर ते वाहन भरसमुद्रातच बुडणार नाही काय?" हे तर तुम्हीसुद्धा कबूल कराल. विद्यार्थ्यांमध्ये जशी अमोघ शक्ती पडली आहे तशी शक्ती देशात इतर कशातही नाही. विद्यार्थी अवस्थेत विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासाबरोबर रचनात्मक कार्यही केले पाहिजे. देशातील विद्यार्थीवर्ग जर रचनात्मक कार्याची अंमलबजावणी करतील तर ते करत असताना त्यांना शिक्षणही मिळेल आणि देशाच्या आर्थिक परिस्थितीतही मदत होईल. माझे चालले तर स्वराज्य आल्याबरोबरच मी संपूर्ण शिक्षणव्यवस्थेत फेरबदल केला असता. परंतु आज तर स्वराज्य जणू काय नाहीच, स्वराज्याबरोबर स्वातंत्र्य येण्याच्या शुभ चिन्हाऐवजी आज देश विनाशाकडे चालला आहे. तुमच्याबरोबर शिकणारे बंधुभगिनी, जातिजमातीचा भेदभाव विसरून जर सर्वांशी मैत्रभावाने वागतील तर त्याचा प्रभाव तुमच्या वर्गावर, वर्गाद्वारे गावावर, आणि शाळेद्वारा शहरावर शहराद्वारे जिल्ह्यावर, जिल्ह्याद्वारे प्रांतावर आणि प्रांताद्वारे देशावर पडल्याशिवाय राहणार नाही. हे तर मी तुम्हांला केवळ एक उदाहरण दिले आहे. परंतु मी तर इथपर्यंत म्हणेन की मी जो रचनात्मक कार्याचा मुद्दा मांडला आहे त्यावर तुम्ही सर्वांनी जर अंमल करायचे ठरवले तर तो कार्यक्रम एकटा विद्यार्थीवर्गच पार पाडू शकतो. विद्यार्थी अवस्थेत

आणि विद्यार्थी जीवनात इतकी भव्य शक्ती आहे. आता वेळ संपली आहे. मला जे सांगायचे होते ते मी सांगितले आहे. यावर विचार करा आणि कळले नाही तर मला विचारा. परंतु माझे म्हणणे पूर्णपणे टाकून देऊ नका."

हे लोक गेल्यानंतर पंडितजी आले. आणि नंतर बापूजींनी प्रवचन पाहिले. १० वाजल्यानंतर त्याच्या झोपण्याची तयारी केली.

नियंत्रणे काढून टाकण्याविषयीची बापूजींचे विचार फार दृढ होऊ लागले आहेत. पण काही लोकांवर पश्चिमेचा प्रभाव आहे आणि ते नियंत्रणे ठेवण्याच्या बाजूने आहेत. बापूजींचे तर म्हणणे आहे की - "नियंत्रणे काढल्यामुळे कोणी मरणारच नाही, परंतु काळ्याबाजाराचे अस्तित्व हा नियंत्रणांचाच प्रभाव आहे."

अजूनही बापूजींची प्रकृती पूर्णपणे चांगली झालेली नाही. खूप कामामुळे थकूनसुद्धा जातात.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२२ ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना. प्रार्थनेनंतर पत्रे लिहिली. मग थोडा वेळ बापूजींनी आराम केला. फिरत असताना शांततावादासंबंधी काही ख्रिश्चन बंधूंशी चर्चा झाली. एक बंधू म्हणाले,

**प्रश्न - अहिंसेच्या पालनाकरिता आवश्यक असलेल्या अटींचे आयुष्यभर पालन केले नाही तर संकटाच्या वेळी अहिंसेच्या पालनाकरिता आपल्याला शक्ती कशी मिळेल? तुम्ही म्हणता की आपण शांतता टिकवली पाहिजे परंतु शांतता कशी टिकवायची?**

बापूजी - मी म्हणालो होतो की आपली अहिसा अर्धकच्ची होती. शक्य आहे की ईश्वराने माझ्या डोळ्यांवर पडदा टाकला असेल. ते काहीही असले तरी माझी खात्री पटत चालली आहे की आपल्याला सुखी व्हायचे असेल म्हणजे प्रत्येक जण सुखी व्हायचा असेल व इतरांना सुखात पाहायचे असेल तर याशिवाय दुसरा मार्ग नाही. आपण चूक केली असल्याचे जेव्हा माणसाच्या लक्षात येते आणि क्षणाचाही विलंब न करता तो ती दुरुस्त करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो माणूस फार उंचावर चढतो. परंतु माणूस जर आपली चूक लपवण्याचा प्रयत्न करत असेल, विविध मार्गांनी तिच्यावर मुलामा चढवण्याचा प्रयत्न करत असेल तर माणसाच्या चारित्र्याचे स्खलन होते व तो आपल्या धर्माला धोका देतो. याहून कोणताही अपराध मोठा असू शकत नाही.

जे लोक शांततावादी आहेत ते इतरांपासून वेगळे का राहत नाहीत? वेगळे राहून ते आपले जीवन वेगळ्या प्रकारे घडवू शकतील. असे झाले तर त्यांची स्थिती मजबूत होईल. यामुळे त्यांच्या श्रद्धेचीही परीक्षा होईल. परंतु त्यांनी निष्क्रिय होऊन

बसू नये. माझ्याबद्दल बोलायचे तर मला जरी एकट्यालाच ठेवण्यात आले तरी मी माझ्या तत्त्वांना धरून राहीन. कारण आपल्याला भेडसावत असलेल्या भयानक हिंसेला तोंड देण्याचा हाच मार्ग आहे. शक्य आहे की आपले देशबांधव याच्याशी सहमत होणार नाहीत. परंतु त्यामुळे अहिंसा प्रभावी नाही असे समजण्याचे काही कारण नाही. त्याचे कारण माझी स्वतःची अपूर्णता असू शकेल. सत्याग्रहावरील श्रद्धा एखाद्या पर्वताप्रमाणे अढळ असेल तर हाच एकमेव मार्ग खरा असल्याचे सत्याग्रहाने सिद्ध होईल.

हिंदू-मुसलमान ऐक्यासंबंधी एका मुसलमानबंधूंशी चर्चा करत असताना बापूजी म्हणाले -

"काळ आपले काम करत जात असतो. केव्हा केव्हा तो आपल्याला अनुकूल असतो. काही वेळा तो आपला शत्रू होतो. आज तो तसा आहे असे दिसते. हिंदू-मुसलमान ऐक्य ही माझ्या लहानपणापासूनची आकांक्षा राहिली आहे. मुसलमान मला नेहमीच आपला खरा मित्र आणि मार्गदर्शक समजत असत. मुसलमानांच्या बोलावण्यामुळेच मी दक्षिण आफ्रिकेत गेलो नव्हतो काय? मग आज मी मुसलमानांचा शत्रू कसा काय झालो? तुम्हांला माहीत आहे की आज तुमच्यामुळेच मी प्रत्येकाच्या डोळ्यात खुपतो आहे. हिंदू माझ्यावर अतिशय चिडलेले आहेत. तुम्हांला माहीत नसेल तर तुम्ही लक्षात घ्या की हिंदू माझ्यावर किती संतप्त आहेत. त्यांच्या रागाला एक दिवस मी बळी पडलो तर मला आश्चर्य वाटणार नाही. असे केवळ माझ्या बाबतीतच नाही तर या मुलींच्या बाबतीतही आहे. मागील वेळी मी जेव्हा दिल्लीला आलो होतो तेव्हा मनूलासुद्धा मारून टाकण्याच्या धमकीने भरलेले पत्र मिळाले होते. इथे भंगी कॉलनीतही टेलिफोनवर काही विशिष्ट हिंदू तिला सतत

धमक्या देत असत. परंतु ती मरण्याच्या तयारीने आली आहे व यामुळे ती घाबरत नाही.

"मला माहीत आहे की तिसरा एक असा पक्ष आहे की ज्याला ही एकी होऊ द्यायची नाही. तुम्ही तुमच्या डोळ्यांनी हिंसेचे वैय्यर्थ्य पाहिले आहे. या भयानक आणि निरर्थक कत्तली सुरू राहिल्या तर मानवतेच्या भवितव्यतेत काय लिहिले असेल ते खरोखरच मला कळत नाही. परंतु या वास्तवानंतरही मी आशावादी आहे. मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत माझे कार्य करत राहणार आहे."

आज फिरत असताना बापूजींनी मुसलमान बांधवांना बरेच काही सांगितले.

मालीश, आंघोळीनंतर राजेंद्रबाबू आले. त्यांच्याशी बापूजींनी नियंत्रणाबद्दल चर्चा केली. आणि सकाळी मुसलमान बांधवांना जे सांगितले होते तेसुद्धा त्यांना सांगितले. आणि पुढे जाऊन बापूजी म्हणाले, "राष्ट्रीय मुसलमानांची जर अशी मान्यता असेल की त्यांच्या जातीच्या लोकांनी चुकीचे काम केले आहे आणि हिंदुस्थानातील मुसलमानांचे भले व्हावे असे जर त्यांना वाटत असेल तर मी म्हणतो म्हणून नाही तर त्यांचा आत्मा म्हणतो म्हणून त्यांनी पाकिस्तानमधील मुसलमानांप्रमाणे एक निवेदन काढायला पाहिजे. तसेच पाकिस्तानमधून जे हजारो हिंदू पलायन करत आहेत त्यांना त्यांनी अडवले पाहिजे." मौलाना सईदसाहेब, मेरठचे बशीर अहमदसाहेब वगैरेसुद्धा आले होते.

३.२२ला भीमसेन सच्चर आले. पंजाबमध्ये अजूनही शांतता नाही. आणि तेथील मंत्रिमंडळसुद्धा गुंडगिरी करणारे आहे. ४.३० वाजता कस्तुरभाई लालभाई आले. त्यांच्याशी कापडाच्या नियंत्रणाविषयी आणि देशातील सामान्य परिस्थितीसंबंधी चर्चा केली.

बाकी बापूजींचे काम वक्तशीरपणे सुरू असते. कातत असताना भाईसाहेबांनी उर्दू वर्तमानपत्रात आलेल्या काही अफवा वाचून ऐकवल्या. जशा की - हिंदुस्थानातील सर्व मुसलमानांना हाकलून लावायचा हिंदुस्थान सरकारने निश्चय केला आहे आणि ते जर गेले नाही तर त्यांना मारून टाकण्याचे ठरवण्यात आले आहे. हे वर्तमानपत्र लीगतर्फे चालवण्यात येत असते. तोंड धुताधुता बापूजी खूप दुःखाने म्हणाले, "आजकाल वर्तमानपत्रांनी धार्मिक पुस्तकांचे स्थान घेतले आहे. अशा घाणेरड्या वर्तमानपत्रांचा खप वाढत चालला आहे. आणि ज्याप्रमाणे लोक गीता, कुराण वा बायबल वाचत असत तसे ते आजकाल घाणेरडी वर्तमानपत्रे वाचण्याकरिता ठेवत असतात."

प्रार्थनासभेत आज चांगलीच गर्दी होती. आजच्या प्रार्थनाप्रवचनात बापूजी या वर्तमानपत्राची गोष्ट सांगत म्हणाले,

> "लोकांच्या जीवनात धार्मिक पुस्तकांना जे स्थान मिळू शकत नाही ते आज वर्तमानपत्रांना मिळाले आहे. जनतेला खोटी चिथावणी देणे आणि भीतीचे वातावरण पसरवणे याहून दुसरे मोठे पाप कोणते असू शकते? लोकांना वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या बातम्या ब्रह्मवाक्याप्रमाणे वाटत असतात. या हकिगतींबद्दल वर्तमानपत्रांच्या व्यवस्थापकांवर आणि बातमीदारांवर फार मोठी जबाबदारी असते. जी गोष्ट खोटी असेल आणि जी वाचून जनता उत्तेजित होईल आणि भीतीचे वातावरण निर्माण होईल ती छापण्याची परवानगीच नसली पाहिजे.
>
> "माझ्या असे ऐकण्यात आले आहे की देशी रियासतींमध्ये आजकाल खूप अंधेरनगरी माजली आहे. मी स्वतः एका देशी रियासतीची रयत आहे आणि त्यांचा मित्र आहे. माझा आवाज जर त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत असेल तर या अधिकारामुळे माझी अशी एक नम्र सूचना आहे की ब्रिटिश राज्य तर आता निघून गेले आहे, आणि आतापर्यंत तुम्ही हुकुमशाही पद्धतीने वाटेल तसे शासन चालवले

आहे, परंतु यापुढे क्षणभरसुद्धा हुकूमशाही चालू शकणार नाही. जर तुम्हांला रियासतदारांना वाचवायचे असेल तर तुम्ही रयतीचे विश्वस्त होऊन राहायला पाहिजे. रंडीबाजी, दारू पिण्याचे व्यसन आणि ऐशौआराम यामुळे तुमचा सर्वनाशच होईल.

"दसरा आणि बकरी ईद येत आहे. नवरात्रीनंतरचे भरतभेटीचे आहेत. नवरात्रीत दूर्गापूजा वा शक्तीपूजा करण्यात येत असते. माझी आईसुद्धा उपासना, प्रार्थनाआणि पूजा करत असे, आणि आमच्याकडून करवून घेत असे. यामुळे या दिवसात जितका संयम ठेवता येईल तितका ठेवायला पाहिजे. अशा या पुण्यप्रसंगी आपल्याच बांधवांचा सर्वत्र तिरस्कार करू लागलो, त्यांना शिव्या देऊ लागलो, त्यांची कत्तल करू लागलो तर आपला विनाश जवळ आला आहे असे समजा.

"उत्सवांच्या या दिवसात आपण अनेक गोष्टी विसरून जीवनात नवचैतन्य आणायला पाहिजे."

फिरत असताना राजकुमारीबहेनबरोबर सद्यस्थितीसंबंधी चर्चा केली. अजूनही दिल्लीत पूर्ण शांतता नाही. राजकुमारीबहेननेच बापूजींच्या प्रार्थना प्रवचनाचा अनुवाद केला. आणि बापूजी आत आले तेव्हाच पंडितजीसुद्धा आले. पंडितजी तर निर्वासितांच्या वर्तनाने खूप व्यथित झालेले आहेत. तसेच पंजाबमधील वातावरणामुळेही ते फार चिंतित आहेत.

बाकी सर्व वेळच्या वेळी सुरू आहे. गोपू थोडा वेळ खेळून गेला. बापूजींनी व्यायाम केला आणि साडेनऊ वाजता ते झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२३ ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना. आधी दातण करता करता बापूजींनी माझ्याशी काही गोष्टी केल्या.

प्रार्थनेनंतर बापूंजींनी माझ्याकडून ‘हरिजन’संबंधीचे काही काम करवून घेतले. कलकत्त्याहून गुरुदेवांचे वचनामृत आले आहे. त्याचा अनुवाद करायला लावला. वचनामृताबद्दल सांगण्यासारखे काय आहे?

“ते युद्ध असते ईश्वरविरोधी
ज्यांत मारतो भाऊ भावाला,
करतो जो संचित धर्माच्या नावाने विद्वेष,
करतो जो ईश्वराला अर्ध्यापासून वंचित
ज्या अंधारात दिसत नाहीत पाय भावाचे,
त्या अंधारात पाहू शकत नाही आंधळा स्वतःलाही.
ज्या प्रकाशात पाहू शकतो भाऊ
भावावाचे पाय,
त्यातच होऊ शकते दर्शन,
हास्याने सुशोभित झालेल्या ईश्वराच्या मुखमंडलाचे.
तेव्हा झालेले असते हृदय एकरूप,
भावाच्या प्रेमाने,
तेव्हाच ईश्वराला,
करतो आपण प्रणाम हात जोडून.”

मूळ बंगाली असे आहे -

“से लडाई ईश्वरेर विरुद्धे लडाई,
जे युद्धे भाई के मारे भाई.
जे करे धर्मेर नामे विद्वेष संचित,
ईश्वरके अर्ध्य हते से करे वंचित.
जे आंधारे भाई के देखिते नाहि पाय,
से आंधारे अंध नहि देखे आपनाय.
ईश्वरेर हास्यमुख देखिबारे पाय,
जे आलोके भाई के देखिते पाय भाई,
ईश्वर प्रणामे तबे हाथ जोड हय,
भजन भाईएर प्रेमे मिलाई हृदय.”

इतके लिहवून घेऊन बापूजी थोडा वेळ झोपले. ६.४० वाजता उठले. उठल्यानंतर थोडी पत्रे वाचली. एवढ्यात काठेवाडमधून खूप पत्रे येत असतात. जुनागढच्या चोहोबाजूला काठेवाड पसरलेले आहे. यामुळे बापूजी म्हणत असतात की “काठेवाडला ओळखायला फार कौशल्य पाहिजे असते. वाक्प्रचार आहे की ‘जितके वळण काठेवाडीच्या पगडीला असतात तितकाच गुंता त्याच्या स्वभावात असतो’. यामुळे हे लोक जर ठरवतील तर बरेच काही करू शकतील. काठेवाडमध्ये इतिहास भरलेला आहे, तेज भरलेले आहे. गावकऱ्यांमध्ये गुण, भक्ती आणि प्रामाणिकपणा आहे. जनता भोळी आहे. शहरांची हवा त्यांना लागलेली आहे. असे असले तरी या अडाणी जनतेत कला, सौंदर्य भरपूर भरलेले आहे. राजकारणातसुद्धा ते फार चतुर आहेत. या साहित्याची शोधाशोध केल्यानंतर मेघाणी मूर्ख ठरतात. गांडा ठरतात. त्यांच्यापेक्षा तर रायचुरा बरे. परंतु

मेघाणींची इच्छाशक्ती काही वेगळीच असते. वातावरण जर असे ढवळलेले असेल आणि मेघाणींसारखे या प्रदेशात जर लोकसाहित्याचे वीर असतील तर ते संपूर्ण शहरातील वातावरण पळभरात ढवळून काढू शकतात. हे तर कृष्णाच्या बासरीसारखे अद्भुत आहे आणि कृष्णाच्या बासरीच्या या निनादाने गायीच काय गोपीच्या टोळ्यासुद्धा कृष्णाच्या मागे असतात, असेच या साहित्याबद्दलही आहे. परंतु दुर्भाग्य की अशा साहित्यिकांची किंमत होत नाही. आपल्याला त्यांच्याबद्दल कळूच शकत नाही. परिणामी त्यांची जी आकांक्षा असते ती अपूर्ण राहते आणि अकालीच ते या जगातून लुप्त होतात."

साहित्यिकांच्या सेवेची बापूजींना इतकी अधिक किंमत आहे. काठेवाडहून आलेल्या पत्रांच्या निमित्ताने बापूजींनी झवेरचंद मेघाणींची अगदी योग्य वेळी आठवण केली होती.

ठरलेल्या वेळी फिरायला निघाले. फिरत असताना मी बापूजींना म्हणाले की आज माझ्या वाचण्यात आले की काकाजीसुद्धा (जमनालालजी बजाज) मानत होते की संपत्ती कमावण्याकरिता पाप तर करावे लागतेच वा असे म्हणता येईल की संपत्ती कमावत असताना नकळत पाप होतेच. आणि किती तरी लोक आवश्यकता नसताना पैसा खर्च करत असतात. असे असताना तुम्ही विश्वस्त होण्याबद्दल जे बोलत असता त्याऐवजी श्रीमंत व्हा असेच तुम्ही का सांगत नाही?

बापूजी - असा प्रश्न अनेकांनी अनेकदा विचारला आहे. आणि त्याचे लेखी उत्तरसुद्धा मी दिलेले आहे. परंतु इतके सगळे कोण वाचतो? तुझी ही जिज्ञासा अशाच प्रकारची आहे असे वाटते. संपत्ती गोळा करण्यात पाप तर आहेच. परंतु गीतेच्या अर्थाने ही सुरुवातच दोषपूर्ण आहे. परंतु पाप केल्याशिवाय धन कमावता येऊच शकत नाही ही गोष्ट बरोबर नाही. उदाहरणार्थ माझ्या जमिनीत खोदता खोडता सोन्याने भरलेला एक माठ निघाला आणि मी श्रीमंत झालो तर त्यात काही पाप नाही. परंतु मी तर धनवान न होण्याकरिताच

सांगतो आहे. श्रीमंत होऊ नये म्हणूनच तर मी वकिली सोडली होती ना? असे जरी असले तरी माझ्याप्रमाणे सर्व करू शकत नाहीत. यामुळेच सांगत असतो की पैसा जर कमावला असेल तर त्याचा उपयोग चांगल्या मार्गाने करा. उदाहरणार्थ मी जर श्रीमंतांना व्यापार सोडा असे म्हणत असेन, म्हणजे घनश्यादासला म्हणत असेन तर कदाचित तो माझे ऐकेलही, परंतु शक्य आहे की जुगलकिशोरच्या गळी ही गोष्ट उतरणार नाही. परंतु मी जर म्हणालो की तुम्ही तुमचा इतका पैसा पूण्यकर्मात खर्च करा तर चार भावांमधून कोणीही याकरिता नाही म्हणेल असे मला वाटत नाही. ही संस्काराची गोष्ट आहे हे याचे कारण आहे. आणि हे संस्कार आपल्या रक्तात भिनलेले आहेत. आणि माझ्याजवळ तर असे अनेक धनिक पडलेले की जे आपल्या जवळील पै पै चा हिशेब ठेवतात आणि कमीतकमी खर्च करण्याचा प्रयत्न करतात.

“वारसाबद्दलसुद्धा माझे म्हणणे आहे की आईवडील मुलांचे पालनपोषण करतात, त्यांच्यावर सुसंस्कार करतात, त्यांची मजबूत शरीरयष्टी घडवतात, शिकवतात आणि ते त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहू शकतील इतके शक्तिसंपन्न करतात. हाच फार मोठा वारसा आहे. परंतु आज तसे नाही. मुलाकरिता पैसा ठेवला तरच बापाला वाटते की माझ्या बापाने माझ्याकरिता वारसा ठेवला. आणि या वारशातील वाट्याकरिता सख्खे भाऊ, सख्ख्या बहिणी, सख्खेभाऊबहिणी वा साळ्या हे सर्व भांडत असतात. कुटुंबातील भावंडांचे संबंध विसरले जातात आणि शत्रुत्वाचे संबंध निर्माण होतात. यामुळे या जगात जर भांडणे होऊ द्यायची नसतील तर एकच उपाय आहे, आणि तो म्हणजे ज्या व्यक्तीने पुरुषार्थ करून धन कमावले असेल त्याने ते धन आपल्या पुत्रप्रपौत्रांच्या निर्वाहापुरते वा कुटुंबातील भावडांच्या निर्वाहापुरते द्यावे आणि बाकीचे धन विश्वस्त म्हणून अशा सेवाकार्यत उपयोगात आणावे की ज्यामुळे जगाचे भले होईल, आपल्या नातवांचे भले होईल आणि कुटुंबात भांडणे होण्याची कारणे राहणार नाहीत.”

दोन वाजता पाकिस्तानचे उच्चायुक्त झहीद हुसेन आले. बापूजींना ते म्हणाले, “माझ्या लायक करण्यासारखी काही सेवा असेल तर मला आदेश द्या.”

बापूजी - तुमच्यालायक सेवा तर इथे किती तरी आहे. आणि तुमच्या नजरेला जी स्थिती दिसते ती तुम्ही पाकिस्तानमध्ये कळवली पाहिजे. आणि लियाकत अली साहेबांना हेसुद्धा सांगा की तुम्हांला जर तुमचे भले व्हावे असे वाटत असेल तर तुम्ही हिंदूंचेसुद्धा रक्षण केले पाहिजे. हिंदूंमध्ये विश्वास निर्माण करा आणि त्यांना देशांतरापासून अडवा.

तीन वाजता अमेरिकी काँग्रेसचे सदस्य आणि इतर काही प्रवासी आले होते. अहिंसा आणि सध्याची परिस्थिती याबद्दल चर्चा करताना बापूजी म्हणाले, “अहिंसेद्वारेच आम्ही गुलामगिरीचा प्रतिकार केला आहे. माझी तर इथपर्यंत तयारी होती की ”त्यांनी माझ्यावर जुलूम जरी केला वा मला मारून जरी टाकले तरी हरकत नाही, परंतु मी जर त्यांच्या ताब्यात गेलो नाही तर विजय माझाच होईल, त्यांचा नाही. ही गोष्ट प्रत्येकाच्या डोक्यात बिंबवण्याचा माझा प्रयत्न होता. आज तर आम्हांला चोहोकडून वादळाने घेरले आहे. याचा परिणाम काय होईल हे आपल्याला माहीत नाही. परंतु जीवाचा, संपत्तीचा नाश करणे करणे हा एकच उद्देश साध्य करण्याचा समोरच्या पक्षाचा प्रयत्न आहे. हिटलरच्या शक्तीने जर्मनीने काय मिळवले? हे आपण पाहिले आहे ना? मला तर गावकऱ्यांना बलशाली करायचे आहे. खेड्यातील लोकांची, मजुरांची संघटना व्हावी अशी माझी इच्छा आहे. आणि आमची काँग्रेस याच उद्देशाने काम करते आहे. तीस वर्षांपासून मी ज्या शक्तीची आराधना केली तिच्याकडे मी कसा दुर्लक्ष करू शकतो? असे जरी असले तरी तिच्यात काही तरी उणीव तर असलीच पाहिजे. असे नसते तर लोकांच्या मनात प्रकाश पडल्याशिवाय कसा राहिला असता? देश स्वतंत्र झाला आहे खरा, परंतु याबद्दल मला किंचितही उत्साह वाटत नाही. याचा आनंदसुद्धा होत नाही. ज्या गोष्टीकरिता मी प्रार्थना आणि तयारी करत होतो त्यात कदाचित मला यश मिळणारही नाही. कदाचित असेसुद्धा होऊ शकेल की आमच्या

आजूबाजूला जी आग भडकली आहे (हिंदू-मुसलमान दंग्यांची) त्यात कदाचीत मी जळून खाकही होईन. परंतु मी इतके म्हणू शकतो की माझ्या अंतःकरणाच्या कानाकोपऱ्यातसुद्धा हिंसेंचा लवलेश आढळू शकणार नाही. साठ वर्षांची माझी साधना आहे. आणि या अतिशय कठीण परिस्थितीत अहिंसा मला धोका देणार नाही अशी मला खात्री वाटते. माझी अहिंसा निश्चितच जनतेकरिता सहाय्यकारक ठरेल. असे जरी असले तरी वाणी हे विचाराच्या अभिव्यक्तीचे मजबूत साधन नसल्यामुळे माझे जे विचार आहेत ते सर्व कदाचित मी व्यक्त करू शकत नसेन. यामुळे माझे विचार तुम्हांला समजावून सांगण्याचे सामर्थ्यही माझ्याजवळ नसू शकेल. परंतु तुम्ही जर शांतपणे हिंदुस्थानचा अभ्यास कराल तर मला जे सांगायचे आहे ते तुम्हाला कळू शकेल.

नवी दिल्ली,

२४ ऑक्टोबर १९४७

सायंकाळच्या प्रार्थनेत “साधो मनका मान त्यागो” या भजनाचे विवेचन करताना बापूजी म्हणाले -

“या भजनाप्रमाणे मी प्रयत्नशीृल आहे. मला माहीत आहे की मी जे सांगतो आहे ते सर्वांना आवडेलच असे नाही. असे असले तरी जे खऱे आहे ते जर मी सांगितले नाही तर मी तुमचा, देशाचा आणि ईश्वराचा अपराधी ठरेन.

“इथेच आशियातील मजुरांची परिषद भरणार आहे आणि मी तिचे उद्घाटन करणार आहे असे मी वर्तमानपत्रांमध्ये वाचले. वर्तमानपत्रे हा सगळा शोध कुठून लावत असतात? परंतु ही गोष्ट पूर्णपणे खोटी आहे. मी तर आजकाल ऐक्याचा यज्ञ मांडून बसलो आहे. एक तर हा यज्ञ यथासांग पार पडेल आणि त्यात पूर्वीसारखीच सिद्धी मिळेल आणि नाही तर त्या यज्ञात मी स्वतःच होमून जाईन.”

निर्वासित बंधूभगिनींवर आलेल्या या संकटाच्या वेळी त्यांना धीर यावा म्हणून ते थोडे बोलले.

रक्तपित्ती झालेल्या रोग्यांसंबंधात ‘पतियु (पतित)’ हा शब्द वापरण्यासंबंधी ते म्हणाले -

“या संबोधनातून घृणेची आणि तुच्छतेची भावना व्यक्त होते. या रोगाचे मूळ कारण तर मलीन मनच आहे. आपण अशा माणसाचा तिरस्कार करणे योग्य नाही. आणि खरे म्हणजे त्यांचा तिरस्कार करणारातच मानसिक विकृती असते. आणि हा रोग ‘पतियु’च्या अगदी उलट आहे अशी माझी मान्यता आहे.”

येथील तुरुंगातील कैद्यांची बापूजींचे दर्शन करण्याची खूप इच्छा आहे. यामुळे बापूजींचे उद्या सायंकाळी तिथे जाण्याचे निश्चित झाले आहे.

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. फिरत असताना डोळ्यांना विश्रांती मिळावी म्हणून त्यांनी डोळे बंद केलेले होते. प्रवचन पाहिले. टपाल पाहिला. दादा (मावळणकरदादा) आले. पंडितजी आले. ९.४० वाजता झोपायची तयारी.

नवी दिल्ली,

२५ ऑक्टोबर १९४७

ठरलेल्या वेळी प्रार्थना. प्रार्थनेनंतर दोन मार्मिक लेख लिहिले, आणि नंतर थकवा वाटू लागल्यामुळे थोडे माझ्याकडून परत लिहवून घेतले. काठेवाडहून आलेल्या पत्रामुळे शेवटचा लेख लिहिला. आता सहा वाजले आहेत. थकल्यामुळे लिहवून घेत असतानाच बापूजींचा डोळा लागला, आणि आता या वेळी बापूजींजवळ बसून माझ्या डायरीत मी या लेखांची नक्कल उतरवून घेते आहे. (हे लेखन कदाचित 'हरिजनबंधु'करिता असू शकेल. यासंबंधात बापूजी असे काही म्हणाले नव्हते. कदाचित हा लेख मगनभाई देसाईंकरिताही असू शकेल.) (यातील पहिला लेख २-११-१९४७च्या 'हरिजन'मध्ये 'नवीन विद्यापीठे' या शीर्षकांतर्गत प्रकाशित झाला होता. दुसरा लेख २-११-१९४७च्या 'हरिजनबंधू'मध्ये 'कुठे अहिंसा, कुठे खादी' या शीर्षकांतर्गत प्रकाशित झाला होता.)

७ वाजता बापूजी उठले. उठल्यानंतर फिरत असताना बऱ्याच गोष्टी सुरू होत्या. त्या सुरू असतानाच बापूजी म्हणाले, "परमेश्वरच सत्य आहे. आपण पामर त्याची निर्मिती कसे करू शकू? यामुळेच तो नीती आणि नीतिकार दोन्ही आहे. माणूस लाकडाचे फर्निचर बनवू शकतो, पण लाकूड बनवू शकत नाही."

एक बंधू आणि दोन भगिनी अनेकदा तुरुंगात जाऊन आले होते. आता आमची किंमत झाली पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. बापूजी म्हणाले, "पहिली गोष्ट तर ही आहे की आपण जेव्हाकेव्हा लढे उभारले तेव्हातेव्हा त्यात तरुणांनी, वृद्धांनी, स्त्रियांनी, पुरुषांनी भाग घेतला होता. त्यावेळी तर त्यांना कदाचित कल्पनाही नसेल की इतक्या लवकर स्वातंत्र्य मिळेल आणि आपण केलेल्या त्यागाच्या मोबदल्यात आपल्याला बरेच काही मिळू शकेल अशी लालूचही त्यांच्या मनात निर्माण झाली नव्हती. परंतु आज तर अगदी याउलट सुरू आहे. हे अगदी लज्जाजनक आहे. शासनयंत्रणेत थोडीशी जरी आपल्याला

जागा मिळाली तर आपण ते सद्भाग्य समजतो. मंत्रिपदासाठी तर आपण अधीर झालेले असतो. अथवा जे मंत्री झालेले असतात त्यांचा ते हेवाही करत असतात. मी हेसुद्धा कबूल केले पाहिजे की इग्रजांचे शासन असताना त्याच्या राज्यकारभारातील किती गोष्टीवर आपण टीका करत होतो, परंतु आज आपण त्यांची नक्कल करत आहो. खरे म्हणजे आपण स्वतःहोऊन जो त्याग केला होता, जे तप केले होते ते सर्व या अमूल्य स्वातंत्र्याच्या आध्यात्मिक सिद्धीचा पाया म्हणूनच रचला होता हे आपण विसरायला नको. हे जर आपण विसरलो तर आपले काय होईल हे सांगता येत नाही."

विलायतेत जाण्यासंबंधी . . . ना बापूजी म्हणाले, "मला मध्ये पडायची इच्छा नाही.नियमानुसार जे असेल तेच केले पाहिजे."

काश्मीरचे प्रकरणसुद्धा खूप बिघडले आहे. पतियाळाहून लष्कर पाठवण्याच्या गोष्टी सुरू आहेत. जुनागढसुद्धा चोवीस तासात हातात येऊ शकते, परंतु आता काय होते ते खरे.

जिनासाहेबांचे आजचे 'ईद मुबारक'संबंधीचे निवेदन अतिशय वाईट आहे.

"उद्या ईद असल्यामुळे मुसलमानांना इदगाहमध्ये बेधडक जाता येईल अशी व्यवस्था असली पाहिजे. नाही तर जगात आपली बदनामी होईल."

. . . ला बापूजी म्हणाले,

आजकाल कॉँग्रेसमध्ये असंतोष गोळा होतांना दिसतो आहे, आणि त्याचा शासनयंत्रणेवरही प्रभाव पडतो आहे. बापूजी म्हणाले, "ईश्वराने प्रत्येक माणसाला समानबुद्धी दिलेली नाही. परंतु दांभिकपणा किती तरी वाढला आहे. ही गोष्ट मला बोचते. . . .ची ही एकच गोष्ट मला खुपते. वृथाभिमान नसावा. माझे म्हणणे आहे की माणूस जर तलवारीची पूजा करणारा असेल तर त्याने तसे उघड उघड सांगायला पाहिजे. परंतु मनातून तलवारीची पूजा करायची आणि बाहेरून अहिंसेचा देखावा करणारी अहिंसा ही दुबळ्यांची

अहिंसा असते. परंतु आज तर मी माझा पराभव कबूल करायलाच पाहिजे. मला हेसुद्धा माहीत आहे की आज माझा आवाज कोणालाही ऐकू येत नाही. आज मी कोणालाही आवडत नाही. परंतु मी एकटा जरी असलो तरी मी दृढपणे म्हणेन की हिंदू-मुसलमान ऐक्यातच देशहित आहे. आणि एखाद्या जमातीतील काही थोड्याशा लोकांनी जर अपकृत्य केले असेल तर तेवढ्याकरिता त्या संपूर्ण जमातीकडे तुच्छतेने पाहणे योग्य नसते. मुस्लिम लीगने आज मला, हिंदुस्थानींना आणि शासन करणारांना शिव्या देण्यात काहीही शिल्लक ठेवलेले नाही. असे असतानासुद्धा जर आपण त्यांचे खरे मित्र झालो आणि प्रेमाने त्यांची सेवा केली आणि त्यांनी जरी एकेका हिंदूला मारले तरीही आपण जर आपल्या मनात किंचितही वैरभावना ठेवली नाही - शेकडोत असा एखादा जरी हिंदू निघाला तर पाकिस्तान केवळ पाकच होणार नाही तर त्याचे आपोआप दफन होईल. काँग्रेसने तीस वर्षे अहिंसेकरिता जी तपश्चर्या केली ती जर आपण अकस्मात लुप्त होऊ दिली तर ते आज दगडावर पाणी टाकण्यासारखे होईल."

सकाळपासून बापूजींच्या लेखनातून म्हणा की बोलण्यातून हा एकच ध्वनी ऐकू येतो. आणि आज ते एकाकी असल्यामुळे तर अजूनच दृढ आहेत. आणि आतापर्यंतची अहिंसा ही भेकडांची होती असे त्यांना वाटते.

तीन वाजता साम्यवादी भेटायला आले. त्यांच्याबरोबर झालेली चर्चासुद्धा आजचे बापूजींचे लेखन आणि त्यासंबंधी बापूजी जे बोलत होते त्याच्या सारासारखीच होती. परंतु साम्यवादी थोडे काही म्हणत नाहीत तोच बापूजी म्हणाले,

> "साम्यवाद्यांच्या हातात एक धंदा आला आहे. दैनंदिन जीवनात साम्यवादाप्रमाणे चालत असेल असा माणूस मोठ्या मुश्किलीने हजारात एखादाच सापडेल. जिथे कुठे भांडणतंटा शोधायचा आणि लोकांना उत्तेजित करायचे, त्यांना संप करायला लावणे याला साम्यवादी आपला धर्म आणि सर्वोच्च कर्तव्य

समजतात. परंतु या संपांमुळे आणि उत्तेजनांमुळे अखेरीस कोणाचे नुकसान होते हे ते पाहत नाहीत. अर्धवट ज्ञान फार वाईट गोष्ट आहे. एक तर व्यक्तीला पूर्ण ज्ञान असले पाहिजे वा मुळीच नसावे. यामुळेच आज 'वादांचे' भाडण सुरू आहे आणि मी अमुक 'वादी' आहे याचा आपल्याला अभिमान वाटत असतो आणि असे असणे ही फॅशन झाली आहे. आणि त्यातही हे लोक रशियाकडून ज्ञान व मार्गदर्शन घेत आहेत. मला तरी आमच्या या साम्यवाद्यांची परिस्थिती दयनीय वाटते. मी लाजिरवाणी म्हणत नाही तर दयनीय म्हणतो आहे कारण माझ्या मते ते लोक 'बिचारे' आहेत. यात त्यांचा काही दोष नाही कारण गुलामगिरीमुळे आम्ही त्यांना पूर्ण ज्ञान मिळवण्याची संधीच दिली नाही. आणि जसे स्वातंत्र्य मिळाले तशी प्रत्येकाला पुढे जाण्याची संधी मिळाली आणि तिही इतकी की आज १६ वर्षांचा मुलगा अथवा मुलगीही 'वादी' बनून पुढारी होऊन जातात व मग इंग्रजांनी फुटीचा जो वारसा आपल्याकरिता सोडला त्याला हे 'वादी' फुंकर घालू लागतात. अखेरीस ही आग त्यांच्याही नियंत्रणात राहत नाही. वास्तविक पाहता देशातील अडाणी जनतेकरिता काय चांगले आहे याचा विचार करून आपण कामाला लागलो पाहिजे. उदाहरणार्थ आपल्याला अन्नधान्याची गरज असल्यामुळे देशातील नवयुवक शेतीचे ज्ञान घेऊन अधिक धान्योत्पादनाच्या सेवाकार्यात लागले तर कोणाला भांडण करण्याकरिता वेळच उरणार नाही आणि देशही समृद्ध होईल."

बाकी तर बापूजींचे नित्यकर्म तर ठरल्याप्रमाणे नियमितपणे सुरू आहेत. आजची प्रार्थना येथील तुरुंगात झाली.

येथील तुरुंगात तीन हजारच्या वर कैदी आहेत. यामुळे कैदीसुद्धा खूप खुश झाले. कैद्यांना पाहून बापूजीसुद्धा खूप खुश झाले.

बापूजी तर अशा तुरुंगात किती तरी वेळा जाऊन आलेले आहेत. परंतु स्वातंत्र्यानंतर आणि हिंदुस्थानच्या राजधानीच्या शहरातील तुरुंगात अशा प्रकारे जाण्याच्या बापूंचा हा पहिलाच प्रसंग होता. या प्रसंगाचे हे वैशिष्ट्य होते.

प्रवचनात बापूजी म्हणाले,

"तुमच्याबरोबर प्रार्थना करण्याची मला संधी मिळाली याचा मला फार आनंद होतो. मी स्वतःसुद्धा एक जुनापुराणा कैदी आहे. दक्षिण आफ्रिकेत आणि इथेही मी अनेकदा तुरुंगात गेलो आहे. दक्षिण आफ्रिकेत तर तीन जमातींचे कैदी होते. हिंदुस्थानी, हबशी आणि युरोपीय. आणि या तिघांनाही वेगवेगळ्या ठिकाणी ठेवत असत. परंतु जी गर्दी असायची ती हिंदुस्थानी आणि हब्शी कैद्यांची. तुरुंगातील नियमसुद्धा फार कडक होते. तिथे राजकीय आणि बिगर राजकीय असा भेद नव्हता. ते सर्व शासनाचे गुन्हेगार तर होतेच ना? परंतु इथे असा भेद करण्यात येतो. इथे अ, ब, आणि क असे वर्ग करण्यात आले आहेत. आणि त्यातील जे उच्च वर्गातील असतील त्यांना अ वर्गात ठेवण्यात येते. आणि त्यापेक्षा खालच्यांना ब वर्गात आणि त्याहून खालच्यांना क वर्गात ठेवण्यात येते. परंतु मला असा वर्गभेद मान्य नाही.

"परंतु गुन्हा करणे हा एक प्रकारचा मानसिक रोगच असल्यामुळे आता स्वतंत्र हिंदुस्थानात आपल्या तुरुंगांना रुग्णालयाचे रूप आले पाहिजे. गुन्हा करण्याची कोणाला हौस नसते. इथे असलेल्या कैद्यांसबंधी अधिकाऱ्यांचे आणि मोठ्या अधिकाऱ्यांचे हेच धोरण असले पाहिजे. अशा प्रकारे रुग्णालयात ज्याप्रमाणे आजाऱ्यांकरिता परिचारिका आणि डॉक्टर असतात त्याचप्रमाणे. कैद्यांना असेच वाटायला पाहिजे की येथील अंमलदार मित्र वा वडील वा आमच्याबद्दल शुभेच्छा ठेवणारे आमचे हितचिंतक आहेत. आणि ज्या कैद्याने जो अपराध केला असेल

त्याला त्या प्रकारचे शिक्षण देऊन आणि संस्कार करून त्याला असा माणूस बनवायला पाहिजे की तुरुंगाबाहेर  आल्यानंतर हा नवीन जन्म घेऊन तर आला नाही ना असे बाहेरील लोकांना वाटायला पाहिजे. अशा प्रकारे मानवतेची भावना रुजवण्याचे शिक्षण आपण द्यायला पाहिजे.

“एक जुन्या कैदी म्हणून आलेल्या अनुभवामुळे माझ्या कैदी बंधुभगिनींना माझा सल्ला आहे की तुम्ही तुरुंगाच्या नियमकायद्याचे समजून उमजून पालन करणारे आदर्श कैदी व्हा. जे कोणते काम तुमच्यावर सोपवण्यात येईल ते प्रामाणिकपणे करा. उदाहरणार्थ तुम्ही स्वतःच तुमचा स्वयंपाक करत असता. याकरिता तुमच्यावर जेव्हा डाळ वा एखादे दुसरे धान्य सोपवण्यात येते तेव्हा तुम्ही ते इतके चांगले निवडा की त्यात एक लहानसा खडासुद्धा राहायला नको. आणि मी तर असे समजतो की हा तुमचा तुरुंग तुमच्याकरिता तुरुंग नसून शाळाच आहे. इथे जर तुम्ही सगळे शिकाल तर तुम्ही जेव्हा बाहेर जाल तेव्हा उत्तम माणूस व्हाल.

“इथे तुमच्या या तुरुंगात हिंदू, मुसलमान, शीख वगैरे सगळ्या जातिधर्मांची माणसे आहेत. यामुळे इथे माझी जी मुसलमान भावंडे आहेत त्यांना मी ‘ईद मुबारक’ देऊ इच्छितो आणि खुदा तुम्हांला सत्याच्या मार्गावर नेवो अशी मी त्याला प्रार्थना करतो. तुम्ही सर्वांनी परस्पराशी अशा प्रकारे ऐक्य स्थापित करा की तुम्ही जर बाहेर गेला आणि तिथे जर सांप्रदायिक उन्मादाच्या रोगाचा स्फोट झालेला दिसला तर तो तुम्हालाच नियंत्रणात आणता आला पाहिजे. इथे जर मुसलमानेतर बंधू असतील तर त्यांनी मुसलमानांना उद्या ‘ईद मुबारक’चा सलाम पाठवावा अशी मी त्यांना विनंती करतो.”

तुरुंगात बापूजींनी एक आंब्याचे रोप लावले. तिथून आम्ही ६.२० वाजता परत आलो. आल्यानंतर कृपलानीजींबरोबर चर्चा झाली. पाचेक मिनिटांकरिता सर

दातारसिंगजी आले आणि काश्मीरविषयी चर्चा करून गेले. माऊंटबॅटनसाहेब कौशल्याने आणि एकनिष्ठेने काम करत असूनही काश्मीर प्रकरणाने आजकाल सर्वांना काळजीत टाकले आहे. जिनासाहेब कोणतीही चूक कबूल करायला तयार नाहीत. रात्री गोपू आला. बापूजी गोपूबरोबर पाचेक मिनिट खेळले. ९.१५ ला व्यायाम करून बापूजींची झोपायची तयारी.

झोपण्यापूर्वी शहीदसाहेब आले. बापूजींनी त्यांना काश्मीबद्दल समजावून सांगितले. बापूजी म्हणाले, “तुम्हाला जर खरोखर संघराज्याची सेवा करायची असेल तर जिनासाहेबांनी तुम्ही सांगितल्याप्रमाणे वर्तमानपत्रांमधून लेखी निवेदन काढून पाकिस्तानचे धोरण जाहीर केले पाहिजे.” परंतु सुऱ्हावर्दीसाहेब तर चलाख माणूस आहेत. यामुळे ते ‘हो’ तर म्हणतील, परंतु काही करतील असे वाटत नाही. आणि बापूजींनी त्यांना असेसुद्धा स्पष्टपणे सांगितले की ”इथे तुमच्यावर एकाही पुढाऱ्याचा विश्वास बसत नव्हता. असे असले तरी तुम्ही माझ्या प्रामाणिक मित्राप्रमाणे राहायला पाहिजे.”

डॉ. जीवराजभाई महेता आले. यामुळे सुऱ्हावर्दीसाहेबांनी मोठ्या मुश्किलीने आपले बोलणे संपवले. तसे झाले नसते अजून १२ वाजेपर्यंत उठले नसते. परंतु आज बापूजींनी त्यांना सर्व काही स्पष्टपणे सांगितले.

आज बापूजी फार गंभीर आहेत. दिल्लीतसुद्धा परत अशांतता निर्माण होण्याची चाहूल लागू लागली आहे. काय होते ते खरे . . .

नवी दिल्ली,

२६ ऑक्टोबर १९४७

साडेतीन वाजता बापूजी झोपले. बापूजींना आधीच जाग आली. प्रार्थनेआधी सुऱ्हावर्दीसाहेबांसंबंधी बोलताना बापूजी म्हणाले,

"आता यांना झटकून सोडून देणे मला योग्य वाटत नाही. मला माहीत आहे की हे ना तर पाकिस्तानकरिता उपयोगी आहेत ना हिंदुस्थानकरिता. चलाख माणूस आहेत. त्यांनी ठरवले तर ते हिंदुस्थानकरिता उपयोगी होऊ शकतात. परंतु अशी यांची वृत्ती दिसत नाही. परंतु मी तर गुणांचा पुजारी आहे. मग एकदम मी ही पूजा कसा सोडून देऊ? यामुळे मी तर ही पूजा शेवटपर्यंत करत राहीन."

डॉ. महेतासुद्धा लियाकतअलीसाहेबांना भेटून आले होते. त्यांच्या बोलण्यावरून पाकिस्तान काही करील अशी शक्यता वाट नाही. फिरत असताना डॉ. दिनशांबरोबर गोष्टी झाल्या. बापूजी फिरत असताना काही गोष्टींसंबंधात म्हणाले -

"सत्याचा आवाज कोणी अवरुद्ध करू शकणार नाही. ज्या माणसाच्या रंध्रारंध्रामधून सत्यरुपी रक्त वाहत असेल तर त्याला कोणी काळोख्या रात्री अडवू शकेल असे मला वाटत नाही. आज तर वातावरण विषारी झाले आहे. वर्तमानपत्रांमध्ये तर तऱ्हेतऱ्हेच्या अफवा प्रकाशित होत असतात. आणि लोकही वर्तमानपत्रांना वेदवाक्य समजून चालत असतात. यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे आणि हिंदू आणि मुसलमान माणुसकी विसरून एकमेकांशी जंगली जनावरांप्रमाणे क्रूरपणाचे वर्तन करत असतात. माणूस जर माणसाला शोभेल असे वर्तन करील तरच यातून त्याचा उद्धार होऊ शकेल. हिंदू अथवा मुसलमान यातून कोणताही एक पक्ष जर माझा आवाज ऐकेल तर आजच शांततेचा चमत्कार होऊ शकतो. वैराचा बदला घेतला नाही तर वैरी थकून जातो आणि ईश्वर त्याचा मदतनीस होतो."

मालीश सुरू असताना बापूजी ठरल्याप्रमाणे बंगालीचा पाठ करत असतात. बंगालीचा पाठ करता करता थोडा वेळ त्यांचा डोळा लागला. आंघोळ झाल्यानंतर आज ईद असल्यामुळे मौलवी आले होते. बापूजींनी सर्वांना ईद मुबारकच्या शुभेच्छा देऊन त्यांना सलाम केला. त्या बांधवांना बापूजी म्हणाले,

"अहिंसेची परीक्षा नेहमीच हिंसेच्या माध्यमातून होत असते. दयेची परीक्षा निर्दयतेतून होते. सत्याची परीक्षा असत्यासमोर होत असते. प्रेमाची परीक्षा शत्रुत्वाच्या आणि द्वेषाच्या वातावरणात होत असते. हा माझा लिद्धांत नाही. अनादी काळापासूनचा वैदिक सिद्धांत आहे. एक आणि एक यांची बेरीज दोन होते हे जर तुम्हांला कळू शकत असेल तर आजच्या पवित्र दिवशी मी तुम्हांला सांगेन की खुनाचा बदल खून करून नाही तर आपले स्वतःचे बलीदान करून जर घेतला तर संपूर्ण इतिहासच बदलून जाईल. येशू ख्रिस्त मरता मरताही म्हणाला होता की हे ईश्वरा, जे मला सूळावर चढवत आहेत त्यांना तू क्षमा करशील. या सीमेपर्यंत आपली अहिंसा पोहोचलेली नाही हे मला माहीत आहे. परंतु मी माझ्यापर्यंत जरी ही अहिंसा नेऊ शकलो तरी मी ती ईश्वराची असीम कृपा समजेन. मला कोणी मारायला आला तर दररोजप्रमाणे मी हीच प्रार्थना करेन की 'ईश्वर, अल्ला तेरो नाम, सबको सन्मती दे भगवान.' या धूनचा इतिहाससुद्धा चांगल्या प्रकारे समजून घेतला पाहिजे. नोआखालीत मी जेव्हा पदयात्रा करत होतो तेव्हा माझ्याबरोबर एकटी मनूच होती. आणि हिने एका गावात अकल्पितपणे ही धून सुरू केली. ही पोरगी कवी झाली की काय असे वाटून मलाही नवल वाटले. पण विचारल्यानंतर कळले की पोरबंदरमध्ये ही पोरगी सुदामपुरीच्या मंदिरात कथा ऐकायला जात असे. त्या वेळी हिचे वय आठदहा वर्ष होते. कथा संपल्यानंतर जो कथाकार ब्राह्मण होता तो ही धून गायला लावत असे. आणि तेव्हा तर या हरिकथेत हिंदू, मुसलमान, पारसी

सगळेच येत असत. ते दिवस कसे होते आणि आजचे दिवस कसे आहेत? परंतु इतक्या वर्षांनंतर ईश्वराने या पोरीला त्या धूनची आठवण करून दिली आणि मला ती फार आवडली. शब्द अतिशय गोड आणि भावाभिव्यक्ती करणारे आहेत. इथे दररोज हीच धून म्हणायला सांगितले आहे. परंतु ही केवळ पोपटपंची होऊ नये असे प्रभूला माझे सांगणे आहे. परंतु मी एकटा जरी हे आचरणात उतरवू शकलो तरी ते माझ्याकरिता पुरेसे असेल. यामुळे ईश्वराला तर माझी एकच प्रार्थना आहे की कोणी मला मारायला जरी आला तरीसुद्धा तू त्याला सन्मती दे. गांधी तुमचा खरा सेवक आहे असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्हांलासुद्धा मी हीच प्रार्थना करतो आणि ईश्वराने मला माफ करावे आणि उदार होण्याची शक्ती द्यावी."

१२ वाजता लेडी माऊंटबॅटन आल्या आणि थोडा वेळ बसून गेल्या. काश्मीरचा प्रश्न चर्चेत होता. परंतु लेडी माऊंटबॅटन तर निर्वासित भगिनींमध्ये खूप काम करत आहेत. १.२० वाजता पडल्या पडल्या बापूजींनी सुऱ्हावर्दीसाहेबांबरोबर गोष्टी केल्या आणि १० मिनिट एक डुलकी घेतली. १.५५ वाजता जागे झाले. २.४५ ला मौलानासाहेब आले. बापूजींनी त्यांना ईद मुबारक देऊन सलाम केला. मौलाना साहेबांनीसुद्धा सलाम केला आणि शुभेच्छांचा स्वीकार केला. स्वामी अव्यक्तानंदांबरोबर दोन परदेशी बंधू आले होते. आणि त्यांच्याबरोबर रामकृष्ण मिशनचे लोकही आले होते. त्यांच्याशी बोलत असताना बापूजी म्हणाले,

"इतक्या वर्षांच्या मेहनतीवर पाणी तर फिरणारच नाही. अहिंसेत अप्रगट शक्ती तर भरलेली आहेच. परंतु तिच्या संपूर्ण सौंदर्याचे दर्शन अजून घडलेले नाही. आज लोकांसमोर कोणताही कार्यक्रम नसल्यामुळे ते तिथेच थांबले आहेत. यामुळे अहिंसेचे संपूर्ण दर्शन करायचे असेल तर रचनात्मक कार्यातील १८ मुद्द्यांचा अवलंब केला पाहिजे. परंतु

रचनात्मक कार्यक्रमासंबंधीचा उत्साह ओसरला आहे. यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. भगिनींची अब्रू घेतली जाईल अशा स्वराज्याची कल्पना मी केली नव्हती.

प्रश्न - भगिनीच्या अब्रूचे रक्षण कशा प्रकारे करता येईल? तुम्ही तर शस्त्र चालवायला मनाई केली आहे?

बापूजी - भगिनींना जर कोणी त्रास देत असेल आणि तुम्ही जर ते पाहत असाल तर तुम्ही मरण जरी आले तरी त्याचे रक्षण केले पाहिजे. असे करणे तुमचे कर्तव्य आहे.

एक गोष्ट सांगत बापूजी म्हणाले, “शिबी राजाची अतिशय दयाळू माणूस होते. त्यांची परीक्षा घेण्याची परमेश्वराची इच्छा झाली. एकाने पारव्याचे रूप घेतले आणि एकाने पारध्याचे. पारवा उडता उडता शिबी राज्याच्या मांडीवर पडला. पारधी आला आणि म्हणाला, ‘हा पारवा माझा आहे. तो मला परत करा.’ राजा म्हणाला, ‘हा मला शरण आला आहे, मी तो तुला कसा देऊ?’ अखेरीस तो पारधी म्हणाला, ‘असे असेल तर मग तुम्ही याच्याऐवजी याच्या वजनाइतके तुमच्या शरीराचे मांस मला द्या.’ राजाने पारव्याला एका पारड्यात ठेवले आणि आपल्या मांडीचे मांस कापून ते दुसऱ्या पारड्यात ठेवले. पण पारवा असलेले पारडे काही वर जाईना. अखीस राजाने पूर्ण पाय कापून त्या पारड्यात टाकला. तरी पण ते पारव्याच्या वजनाइतके काही भरेना. अखेरीस राजा स्वतःच त्या पारड्यात बसला. अशा प्रकारच्या अहिंसेचे दाखले तर पुराणात किती तरी पडले आहेत. इतक्या पराकोटीला जेव्हा आपली अहिंसा पोहोचेल तेव्हाच भगिनींचे रक्षण होऊ शकेल. परंतु तुम्ही असे म्हणू शकाल की आम्ही अहिंसेचे व्रत घेतलेले असल्यामुळे आम्ही भगिनींची अब्रू वाचवू शकलो नाही. तर मग अशा दुर्बलांच्या अहिंसेपेक्षा मी तर हिंसा पसंत करीन असेच मी म्हणेन. अहिंसा कधीही भित्र्या माणसाची नसते. परंतु तुम्ही जर हिंसेच्या आधाराने का होईना भगिनींची अब्रू वाचवू शकत असाल तर मी त्यावर आक्षेप घेणार नाही.”

रतलामच्या हरिजन सेवासंघाच्या सचिवाची तार आली आहे की “तेथील महाराजांनी जबाबदार शासनपद्धती सुरू करायचे ठरवले आहे. तेथील राजा रयतेचा विश्वस्त होऊन राहणार आहे आणि तेथील मंदिरे सर्वांकरिता उघडण्यात आली आहेत. तसेच राजा, सर्वसामान्य रयत आणि हरिजन हे सर्व मिळून मंदिरात गेले होते.”

ही तार प्रार्थनेत जाहीर करण्याकरिता बापूजींनी सोबत घेतली.

एका मुसलमानबंधूने पत्र लिहिले होते की दसऱ्याच्या दिवशी राम आणि रावणाचे पुतळे तयार करून त्यांचा नाश करण्याचा विधी करण्यात येत असतो. असे करणारे तुमचे अनुयायी आहेत असेही त्यांनी लिहिले होते.

बापूजी म्हणाले -

“मी स्वतःच माझा अनुयायी असेन तर वेगळी गोष्ट आहे. पण इतरही कोणी माझा अनुयायी आहे असा दावा मी कधीही केलेला नाही. आणि माझा अनुयायी कोण आहे तेसुद्धा मला माहीत नाही. माणसाचे मन ओळखणारा तर एक ईश्वरच आहे. आणि केवळ त्यालाच माहीत असते की कोण रावण आहे आणि कोण नाही. प्रत्येक माणूस जर राम होऊन बसेल तर रावण कोण राहील? यामुळे जो पूर्ण नाही त्याने इतर कोणीही पूर्ण नाही असे समजू नये. यामुळे हिंदूंनी मुसलमानांना आणि मुसलमानांनी हिंदूंना पापी समजून त्यांना शिक्षा करण्याकरिता त्यांच्यावर हात उगारणे हा तर अधर्मही आहे आणि भ्याडपणाही आहे. आणि असे केल्याने दोन्ही धर्मांचा समूळ नाश होईल. काश्मीरमधील बातम्या दुःखद आहेत. काश्मीरला बळजबरीने पाकिस्तानशी जोडण्यात येऊ नये. अरे! काश्मीर तर काय हैदराबादला वा काठेवाडमधील लहानशा जुनागढलासुद्धा बळजबरीने कोणत्याही राज्याला जोडता येणार नाही. ना पाकिस्तानशी ना हिंदुस्थानशी. मग तुम्ही विचारू शकाल की ही समस्या का निर्माण झाली? अतिशय नम्रपणे मी राजांना दोन शब्द

सांगू इच्छितो. हिंदुस्थानमधून आता ब्रिटिश सत्ता निघून गेलेली असल्यामुळे खरे म्हणजे आता कोणीही राजा राहिलेला नाही. यामुळे प्रजा स्वेच्छेने ज्याला ठरवील तोच या पदाचा अधिकारी होईल. हा नियम सगळ्याच रजवाड्यांना लागू आहे.

"कलकत्त्यात बकरी ईदचा सण अगदी शांतपणे पार पडला असे वृत्त आले आहे. मी तिथे असताना ज्या शांतिसेनेची स्थापना करण्यात आली होती तिनेच हे सर्व काम केले आहे.

"आज ईद असल्यामुळे माझ्याकडे पुष्कळ मुसलमान बंधू आले. परंतु अजूनही एकदुसऱ्याबद्दल अविश्वासाची भावना आढळून येत असल्यामुळे मी त्यांना अतिशय जड अंतःकरणाने 'ईद मुबारक' देऊ शकलो.

"इथे येण्यापूर्वी रतलामहून आलेली एक आनंदाची तार माझ्या हाती पडली. तेथील महाराजांनी प्रजेचे विश्वस्त म्हणूनच जगायचे ठरवले आहे. आणि महाराजांबरोबर सर्व हरिजन आणि हरिजनेतरही मंदिरात गेले.

"माझी तर दृढ मान्यता आहे की हिंदू धर्माला जर जिवंत ठेवायचे असेल तर आता आपण आपल्या रंध्रारंध्रात जी अस्पृश्यता रुजलेली आहे ती काढून टाकली पाहिजे. ईश्वरासमोर तर आपण सर्व सारखेच आहो. आपण जो धर्म मानतो तो जर दुसरा कोणी मानत नसेल म्हणून आपण जर त्याचा तिरस्कार करणार असू तर तो ईश्वरासमोरील आणि मानवतेसमोरील अपराध होईल."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. लीलावतीबहेन मुंशींबरोबर पाचेक मिनिट असतील तेवढ्यात सुऱ्हावर्दीसाहेब आले. पाऊणेक तास बसले. त्यांच्याबरोबर बापूजी इतका वेळ बसले ही तर त्यांच्या उदारपणाची पराकाष्ठाच झाली. परंतु सुशीलाबहेनने त्यांना उठवले. त्या म्हणाल्या की बापूजींना खूप काम आहे आणि गोष्टी करायलासुद्धा काही मर्यादा असली पाहिजे. झाड गोड आहे म्हणून त्याची मुळे कापू नये. ते मोठ्या मुश्किलीने उठले.

त्याच्या बोलण्याला पूर्णविरामच येत नव्हता, आणि बापूजी मध्येच काही बोलायला जायचे तर ते दुसराच विषय काढायचे. त्यामुळे पहिला मुद्दा अर्धवट राहून जायचा. असा चाणक्ष माणूस आहे. आज तर बापूजींना झोपता झोपता दहा वाजून गेले. 'हरिजन'चे काम बरेच खोळंबून राहिले आहे.

थंडीसुद्धा वाढत चालली आहे. बापूजीने पाय दुखत आहेत. यामुळे गरम पाण्यात थोडीशी मोहरी टाकून त्यात बुडवून ठेवले. बाकी बापूजींचे जेवण, कताई, मालीश, माती वगैरे नित्यक्रम ठरल्याप्रमाणे सुरू असतो.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२७ ऑक्टोबर १९४७

नियमाप्रमाणे प्रार्थना वगैरे सर्व कार्यक्रम झाले. आज मौनवार आहे. यामुळे सर्व काही शांत शांत वाटते आहे. बापूजींनी प्रार्थनेनंतर टपाल पाहिला. फिरत असताना शहीदसाहेब बरोबर होते. ते कराची आणि लाहोर येथे गेले होते. तेथील हकिगत सांगत होते. बापजींनी चिठ्ठीवर उत्तर देत लिहिले,

"अखेरीस पाकिस्तानला काय करायचे आहे हेच मला कळत नाही. हिंदूंना त्याला वसू द्यायचे आहे की नाही? जोपर्यंत आचरणातून हे स्पष्टपणे दिसत नाही तोपर्यंत सर्व बेकार आहे असे समजा. कागदावरील ज्या योजना कागदावरच पडून राहत असतात त्यांना कौडीचीही किंमत नसते. विद्वत्तेने भरलेल्या अनेक वाक्यांनी योजना लिहून घेता येऊ शकते. योजना म्हणजे काही साहित्यातील एखादे पुस्तक नाही. ती तर निर्दोष मानवतेच्या जीवनमरणाची समस्या असते. यात जर तुम्ही काही करू शकत असाल तर तुम्ही मुसलमानांची फार मोठी सेवा केली असे म्हणता येईल. सरहद्दीवर किती भयंकरता सुरू आहे ! बंगाल, पंजाब आणि सिंधमध्ये हिंदू सुरक्षित नाहीत. तुमच्या वचनांना तेव्हाच किंमत असेल जेव्हा तुम्ही त्यांचे पालन कराल. माझा तर दावा आहे की हिंदुस्थान जरी मुसलमानांनी भरून गेला तरी येथील सरकारने मुसलमानांच्या रक्षणाकरिता जे काही केले आहे ते नोंद घेण्यासारखे आहे. सरकार गाफील तर मुळीच नाही. आपण जर पाहिले तर नेहरू सरकार एका लहान मुलालासुद्धा संरक्षण देण्याकरिता तयार असल्याचे आपल्याला आढळेल. आज सरदार म्हणा की नेहरू अकाली वृद्ध झाले आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याबद्दल, झोपण्याबद्दल काहीही सांगता येत नाही. सरदार किती भयंकर आजाराने ग्रस्त आहेत हे तुम्हांला माहीत आहे? ते मलाच माहीत आहे. परंतु तुमचा आत्मा जड झालेला असल्यामुळे तुमच्याजवळ तर त्याची मोजदादही नाही. पाकिस्तान

सरकारच्या कोणत्या योजना आहेत ते तर मला माहीत नाही आणि त्यांची वाट तरी कशाकरिता पाहायची? मी तर श्रद्धाळू माणूस आहे. आणि ईश्वरावर विसंबून असल्यामुळे शांत आहे? आज मौनवार असल्यामुळे शांततापूर्वक विचार करून मी काय आणि कुठे आहे यासंबंधी विचारमंथन करण्याचा हा दिवस आहे. 'એક ડગલૂ પુરા થાય' (एक पाऊल पुरे)' या गुजराती वाक्यातून आवश्यक ते आश्वासन मिळते. पाकिस्तानमध्ये म्हणा की हिंदुस्थानात म्हणा ईश्वराला जर मला सेवा करू द्यायची नसेल तर काय सांगता येते? परंतु या दोन भावांमध्ये रक्तपात होण्याआधी ईश्वर मला उचलून घेईल अशी माझी श्रद्धा उत्तरोत्तर दृढतर होत चालली आहे. बाकी माझे मौन सुटेल तेव्हा. मला आता मालीश, आंघोळ वगैरे आटपायचे आहेत. मी व्यक्त केलेल्या विचारावर चांगला विचार करा. बंगाली लिहिण्याची इच्छा तर फार आहे, पण तुम्ही गुजरातीत लिहीत राहा. तोपर्यंत मी बेगालीत लिहिणे शिकून घेईन. तुमच्या खाण्यापिण्याची काही अडचण तर नाही ना? ही पोरगी तुमची नीट काळजी घेते की नाही? जमले तर रात्री गोष्टी करू."

बापूजींनी इशाऱ्याने शहीद साहेबांकरिता चहा, न्याहरी आणि इतर व्यवस्था करण्याची सूचना केली. पाय धूत असताना मी बापूजींना म्हणाले, "आज तुम्ही शहीद साहेबांना फार जोरदार सुनावले. परंतु हे काहीही करू शकण्यासारखे नाहीत. आणि मला तर शंका आहे की इथे आजूबाजूला जे काही सुरू आहे ते ते पाकिस्तानमध्ये कळवत असावे. तुमच्या खोलीत विविध प्रकारची जी चर्चा होते तिचा वास संपूर्ण बिरलाभवनात पसरल्याशिवाय राहू शकत नाही हे याचे कारण आहे."

बापूजींनी लिहिले -

"आपण किंचित जरी खोटेपणा करत असू तर आपल्याला काही लपवावेसे वाटेल. सत्याग्रहीला सर्वांचीच सेवा करायची असल्यामुळे त्याच्या मनात लपवण्यासारखे काहीही नसते. तो लपवणार तरी काय? मला माहीत आहे की हे काही करण्यासारखे नाहीत. परंतु

माझा संदेश जिनासाहेबांपर्यंत पोहोचवतील तर खरे? आणि मी तर मन, वचन आणि कर्माने जितके हिंदूंवर प्रेम करतो तितकेच प्रेम मी मुसलमान, पारसी, यहुदी वा असे समज की संपूर्ण मानवजातीवर करत असल्यामुळे माझी फसवणूक करून ते काय मिळवतील?"

बापूजींचे कार्य दिवसेंदिवस जसजसे कठीण होत चालले आहे तसतसे ते स्वतः अधिकाधिक ईश्वराधीन होऊ लागले आहेत, दररौजच्या व्यवहारात ही गोष्ट भाग्यानेच लक्षात येते, पण मौनाच्या दिवशी बापूजी जेव्हा अशा प्रकारे लिहून गोष्टी करतात तेव्हा बापूजींच्या खऱ्या स्वरूपाचे दर्शन होते. बापूजींचे जेवण, कताई वगैरे सर्व नियमितपणे सुरू आहेत. भेटीकरिता येणारात विशेष असे कोणीही नाही. स्थानिक मुसलमानबंधूच होते. आणि हेच लोक तक्रार करत होते की मुसलमानांनी थकून पाकिस्तानमध्ये पळून जावे अशा प्रकारचे वर्तन सरकारी नोकर करत आहेत. सरकारचे असे धोरण मुळीच नाही असे बापूजींनी आज प्रार्थनाप्रवचनात सांगायचे ठरवले. आणि त्या दृष्टिकोनातून लगेच प्रार्थनाप्रवचन लिहूनही काढले.

> "माझ्याकडे वारंवार अशा तक्रारी येत असतात की मुसलमान आपले घर सोडून निर्वासित छावणीत जातात आणि मग तिथून पायीपायी वा रेल्वेमार्गाने पाकिस्तानमध्ये पळून जातात. असे करताना ते अनेक युक्त्याप्रयुक्त्यांचा अवलंब करत असतात. आणि मी याचा विरोध करतो असे तक्रार करणारे सांगतात. तुम्हांला खऱ्या बातम्या मिळतच नाहीत. ते काहीही असले तरी सरकारचे हे धोरण नाही आणि तसे असूही शकत नाही याची मला पूर्णपणे खात्री आहे. असे असेल तरी कर्मचारी शासनाचे हुकूम पाळत नसल्याची शक्यता मात्र असू शकते खरे. लष्करी 'अधिकारी' वा त्या त्या खात्यातील 'अधिकारी' - हे शब्द आता काढून टाकले पाहिजे आणि त्यांना सेवक म्हणायला पाहिजे - हे सर्व असे लोक आहेत की

ज्यांच्यावर देशातील शांतता, सामजस्य आणि आणि देशाचा उत्कर्ष घडवून आणण्याची जबाबदारी आहे. तेच जर सांप्रदायिक रंगाने रंगलेले असतील तर अंदाधुंदी पसरेल आणि समाज छिन्नविछिन्न होईल. तुम्ही जर असे कराल तर ईश्वर तुम्हांला कधीही माफ करणार नाही हे पक्के लक्षात ठेवा.

“मुसलमानांनी स्वतःचे घर सोडावे असा कोणताही लेखी हुकूम काढण्यात आलेला नाही. परंतु अनेकदा अंमलदारच आपल्या पोषाखात सज्ज होऊन जर तोंडी हुकूम देत असतील तर त्यामुळे घाबरून जाऊ नये. जनतेने लेखी हुकुमाची मागणी करावी. असे केल्याने असा काही कायदा अस्तित्वात आहे की नाही हे कळेल. असे मी एकाच देशाकरिता सांगून राहिलेलो नाही. पाकिस्तानमध्येही जर असे असेल आणि तोपर्यंत जर माझा आवाज पोहोचू शकत असेल तर तो पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात यावा अशी माझी इच्छा आहे.

“असा कायदा नसतानाही बहुसंख्याक जमात असा कायदा असल्याप्रमाणे वागून जर अल्पसंख्याकांवर तो लादत असेल तर मी म्हणेन की असे वागणे म्हणजे ज्या फांदीवर आपण बसलो आहो तीच फांदी वरच्या बाजूने कापण्यासारखे होईल. अशाने आपली परिस्थिती काय होईल हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. याच्या परिणामांची कल्पना करणेच चांगले. तुमचा समाज जर संयमाने वागणे शिकला नसेल आणि तुम्ही स्वतःवर नियंत्रण ठेवू शकत नसाल तर होणाऱ्या पतनातून परत उठणे अतिशय कठीण असेल.”

फिरत असताना राजकुमारीबहेनबरोबर गोष्टी केल्या. तेवढ्यात पंडितजी आले.

आज वादळसुद्धा होते. थोडीशी थेंबाथेंबी झाली, परंतु पाऊस काही आला नाही. पाऊस जर आला तर उघड्या आकाशाखाली असलेल्या निर्वासितांचे काय होईल अशी चिंता बापूजी आणि पंडितजी दोघेही करत होते.

'हरिजन'करिताचे लेखन पाहिले. शहीदसाहेब आले आणि त्यांच्याबरोबरही गोष्टी झाल्या. बापूजींनी तर त्यांना एकच गोष्ट सांगितली - "कल्पना करा की आम्ही इथे जे धोरण अवलंबिण्याकरिता सांगतो परंतु त्यावर जरी आम्ही अंमल करत नसू तरी पाकिस्तानाने जे धोरण अवलंबिले आहे त्या धोरणावर त्याने अंमल करून दाखवावे! आमच्या दोषांशी पाकिस्तानने स्पर्धा का करावी? असे असले तरी माझा दावा आहे की आमच्या नकळत वाटेल तितका गोंधळ जरी झालेला असेल तरी आमच्या डोळ्यासमोर आम्ही मुसलमानांचे कोणतेही नुकसान होऊ दिलेले नाही, आणि होऊ देणारही नाही असे मंत्र्यांनी मला खात्रीपूर्वक सांगितले आहे हे मी तुम्हाला सांगू इच्छितो, अर्थात माझ्या प्रामाणिकपणावर तुमचा विश्वास असेल तर."

शहींद साहेबांचे बोलणे मोठ्या मुश्किलीने थांबले. ९.१५ नंतर बापूजींनी झोपायची तयारी केली.

नवी दिल्ली,

२८ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना. प्रार्थनेनंतर बंगाली पाठ केला. आता बापूजी (बंगाली) वाक्य तयार करून लिहीत होते. फिरत असताना निर्वासिताच्या छावणीत काम करणाऱ्या भगिनी आल्या. त्या भगिनींनी हिंसा, अहिंसेसंबंधी प्रश्न केला. बापूजी म्हणाले -

"हिंसेच्या वातावरणात अहिंसेचे अनुसरण करणाऱ्या माणसाला अडचणी तर सहन कराव्या लागणारच आहेत. आणि हिंसेच्या वातावरणात अहिंसक वर्तन करायचे असेल तर त्याकरिता किती तरी बहाद्दुरीची आवश्यकता असते. अजून आपण तशा प्रकारच्या अहिंसेपर्यंत पोहोचू शकलेलो नाही. इंग्रज सरकारसमोर आपल्याला लढायचे होते आणि (अहिंसेशिवाय) इतर प्रकारे लढू शकण्याची परिस्थितीच नव्हती. यामुळे लोक मी दाखवलेल्या मार्गाने चालू लागले होते. परंतु लोक समजूनउमजून या मार्गाने चालून राहिलेले नव्हते. या अनुभवाची जाणीव मला आताच होऊ लागली आहे. यामुळेच मी म्हणत असतो की ती लाचारीची अहिंसा होती. यामुळेच आज मी हिला दुर्बलांचे शस्त्र म्हणून ओळखतो. अजून आपली मरायची तयारी नाही. मी स्वतःमध्ये तरी अशा प्रकारचे बहाद्दुरीपूर्वक मरण स्वीकारू शकेल अशी अहिंसा विकसित करू शकलो आहे काय असा प्रश्न माझ्या मनात उभा राहत असतो. परंतु इतकी श्रद्धा मात्र कायम आहे की ईश्वर मला तावूनसुलाखून अतिशुद्ध करतो आहे. माझ्या अहिंसेचा मार्ग स्पष्ट आणि खरा आहे. बाकी तर गुजराती कवीने अगदी खरे सांगितले आहे की, 'હરિનો મારગ છે શૂરાનો, નહીં કાયરનૂં કામ જોને.' ईश्वरी मार्ग शूरांकरिता आहे, भित्र्यांचा तिथे काहीही उपयोग नाही. तुम्ही ज्या छावणीत काम करत आहा ती क्रोधाने आणि चिडीने

भरलेली आहे. आपल्या मातृभूमीची आठवण होणे ही गोष्ट प्रत्येक बांधवाकरिता, बहिणीकरिता, मुलाकरिता स्वाभाविक आहे. तुमच्या मायाळू वर्तनाने त्यांच्यात तुम्ही ऐक्याचा संदेश जितका अधिक पसरवू शकत असाल तितका पसरवा. आणि ज्याला काम करायचे आहे, सेवा करायची आहे त्याच्याकरिता दिल्ली काय की मेऱठ काय की काठेवाडमधील एखादे गाव काय सर्व सारखेच असले पाहिजे. त्याच्या मनात संपूर्ण हिंदुस्थान एकच असला पाहिजे. आणि सेवाकार्य केल्यानंतर त्याचे फळ मिळाले पाहिजे अशी आशा कशाकरिता? कोणाकडे? जो खरा सेवक असेल त्याने फळ मिळवण्याकरिता ईश्वराचीच प्रार्थना केली पाहिजे. आजकाल मला अशी अनेक पत्रे येतात की 'आम्ही अमुक अमुक आंदोलनात तुरुंगात गेलो होतो, आम्ही लाठीमार सहन केला होता. असे असूनही आमची काहीही किंमत नाही!' मी जेव्हा अशी पत्रे वाचतो तेव्हा एक देशवासी म्हणून मला लाज वाटते, आणि दुःखही होते. तेव्हा अशी पत्रे लिहिणारांनी आंदोलनात जो भाग घेतला होता तो माझ्यावर उपकार करण्याकरिता घेतला होता काय? अथवा आपला काही फायदा होईल अशा लालचीमुळे आंदोलनात भाग घेतला होता? आणि त्यांनी केलेल्या भव्य सेवेचा मोबदला काय मिळावा अशी त्यांची अपेक्षा असते? एखादे मोठे पद, हारतुरे, मानपान, मोटर, बंगला? हाच यांचा मोबदला!! आपला माणूस हा असा आहे. आणि आज इथे आपण पराकोटीच्या शत्रुत्वाच्या भावनेचे कठीण वातावरणात येऊन पडलो आहो. गरीब बिचारा पामर माणूस मूल्यवान सेवेचा मोबदला कसा काय देऊ शकेल? असा विचार केला तर या संघर्षातून आपण आपली सुटका करून घेतली पाहिजे. आज आपण चरखा विसरलो आहो. आवश्यकता पडली तर आपण दाखवण्यापुरते कातततो. खादी घातली नाही तर कोणी प्रतिसाद देणार नाही असे वाटल्यामुळे अनिच्छेनेच दाखवण्यापुरते खादी

वापरावी लागत असते, ती भक्तिपूर्वक वापरायची नसते. अशा प्रकारे आपण जितका देखावा करू तितके आपण पाप करतो आहो असे समजा. आणि निसर्ग ते सहन करू शकत नाही. सध्या तर आपण ब्रिटिशांना अनुकूल होईल तेच करतो आहो. आपल्या स्वतंत्र बुद्धीने कोणताही नवीन मार्ग आपण शोधून काढत नाही. माझे चालले तर या दुःखी लोकांकरिता मोठमोठ्या राजभवनात ज्या मेजवान्या दिल्या जात आहेत त्या सर्व मी ताबडतोब बंद करून टाकीन. माझे चालले तर राज्यपालांच्या राहण्याकरिता मी सर्व सोयी असलेले एक साधेसुधे लहानसे घर देईन. परंतु अहिंसक मंत्र्यांच्या वा राज्यपालांच्या रक्षणाकरिता पोलीस पहाऱ्याची तरतूद मी कधीही करणार नाही. उदाहरणार्थ राजाजी महाराज्यपाल आहेत आणि त्यांच्या कुटुंबात पाचसात माणसे आहेत. यामुळे त्यांच्याकरिता मी तीनचार खोल्या, स्वयंपाकघर, स्नानघर, संडास, अंगण इतकी सगळी व्यवस्था असलेले घर देईन. परंतु प्रत्येक माणसाकरिता वेगवेगळ्या खोल्या घेण्याचा अधिकार तर तेव्हाच मिळेल जेव्हा हिंदुस्थानात आलेल्या निर्वासितांकरिता ही सगळी व्यवस्था असेल. स्वयंपाक आणि इतर कामकाजाकरिता जे भरपूर नोकरचाकर असतात ते मी बंद करीन. एखाददुसऱ्या नोकराची कदाचित आवश्यकता असू शकेल, परंतु बाकी घरातील लोकांनी आपल्या हाताने काम केले पाहिजे. अशा माणसाला फार दूर दूर जावे लागत असल्यामुळे एखादी मोटारही त्याला देता येईल. मी असे समजतो की हिंदुस्थानातील प्रत्येक मुख्यमंत्री अशा प्रकारच्या साधेपणाचा जर स्वेच्छेने स्वीकार करील, एक पवित्र कर्तव्य आणि धर्म म्हणून जर स्वीकार करील तर त्याचा प्रभाव संपूर्ण जगावर पडल्याशिवाय राहणार नाही आणि जनतेत अविचल विश्वासाची भावना निर्माण होईल. पण माझे ऐकतो कोण? आज माझ्या विचारांचा मी एकटा आहे. आणि म्हणून मी अशा गोष्टी करत असतो हे पुष्कळ लोकांना माहीत आहे.

म्हातारा झालो म्हणून बुद्धीही म्हातारी झाली. परंतु देशाचे आधारस्तंभ असलेल्या महाराज्यपालांनी वा मुख्यमंत्र्यांनी आलेशान बंगल्यातच राहायला पाहिजे, पहारेकरी असायलाच पाहिजे, निष्क्रिय का असेना सलाम करायला पट्टेवाला हजर असायलाच पाहिजे. आणि वाढपी असल्याशिवाय कसे चालेल? मला कळतच नाही की करोडो लोक घरदाराशिवाय आहेत, त्यांना अन्नवस्त्र मिळत नाही, त्यांच्यामुळे देशाची अब्रू जाते की महाराज्यपाल आणि मुख्यमंत्री साध्या घरात राहिल्यामुळे देशाची अब्रू जाते?”

जेवण ठराविक वेळी झाले. साडेदहा वाजता उन्हात गेले. थंडी खूप आहे. शहीद साहेब आले. त्यांच्याबरोबर आणि सुधीरभाईंबरोबर बापूजींनी गोष्टी केल्या. आतापर्यंत प्रश्नांची चाळणी करणेच सुरू होते. १.२५वाजता माती घेऊन आराम केला. दुपारी २ वाजता अलिगढ विद्यापीठ विद्यार्थी संघाचे विद्यार्थी आणि सचिव इबादतयारखां आले होते. अलिगढ आणि इतरत्र सांप्रदायिक ऐक्याकरिता त्यांनी जे काही काम केले होते त्यासंबंधी चर्चा केली आणि हिंदूंच्या छावणीत जाण्याची परवानगी मागितली. तिथे जाऊन हिंदू बंधुभगिनींची सेवा करण्याची त्यांची इच्छा होती. ते म्हणाले की यासंबंधात तुम्ही आम्हांला मार्गदर्शन करा आणि आधी कोणत्या छावणीत जायचे ते सांगा.

बापूजी म्हणाले,”हिंदू आणि शीख बंधुभगिनींची सेवा करण्याची तुमची इच्छा आहे ही गोष्ट मला फार आवडली. परंतु सध्या तुम्ही पैसा, वस्तूंच्या आधारे त्यांची सेवा करू शकत नाही. तुमची जर सेवा करण्याची इच्छा असेल आणि तुमची जर अशी मान्यता असेल की राज्याच्या फेरबदलात जमातीला वा धर्माला मध्ये आणू नये आणि निर्दोष जनतेवर अत्याचार करणे ही गोष्ट खुदाचा फार मोठा अपराध आहे तर माझा तुम्हांला सल्ला आहे की तुम्ही पाकिस्तानमध्ये जा आणि तेथील तुमच्या पुढाऱ्यांना विचारा की हिंदू आणि शिखांना पाकिस्तानमधून का जावे लागत आहे? आणि करार काय आहे? कराराचे

पालन होते की नाही? ते जर पालन करत नसतील तर त्याचे पालन होईल याकरिता प्रयत्न करा. तुमच्यामधील प्रेमाच्या आधाराने निर्वासितांना परत बोलावा आणि विश्वासाची भावना निर्माण करा. असे कराल तर अलिगढ विद्यापीठीची ख्याती इतिहासात सुवर्णाक्षरात कोरली जाईल आणि विद्यार्थीसंघाची जग पूजा करील. शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची आणि तुम्ही तिथे जाऊन जी सेवा करू शकाल ती हिंदू छावणीत जाऊन करू शकणार नाही आणि तसा प्रभावही तिथे जाऊन पाडू शकणार नाही."

दुपारनंतर ब्रह्मदेशाचे उच्चायुक्त आले. दहाएक मिनिट थांबले आणि बापूजींबद्दल ब्रह्मदेशातील जनतेला किती भक्ती वाटते ते सांगितले आणि आलेले स्वातंत्र्य आणि सद्यस्थिती यांबद्दल थोडक्यात चर्चा केली. बापूजी म्हणाले, "ब्रह्मदेशसुद्धा हिंदुस्थानसारखाच आहे. आणि रंगून शहराची तर मी हिंदुस्थानातील मद्रास, दिल्ली, कलकत्ता, कराची वगैरे शहरातच गणना करतो. एके काळी हे सर्व एक होते. तुमचा धर्मसुद्धा बौद्ध धर्म आहे. तोसुद्धा हिंदुस्थानातून गेला आहे. आणि एक अहिंसक सत्यनिष्ठ संत बुद्धदेवाचा संदेश ब्रह्मदेशातील ज्या जनतेला मिळाला आहे ती जनता हिंदुस्थानपासून वेगळी कशी राहू शकते ही गोष्टच मला कळू शकत नाही."

ब्रह्मदेशाचे उच्चायुक्तसुद्धा खूप खुश झाले आणि बिरलाजींबरोबर चहा घेऊन गेले.

गणेशदत्तजी आले होते. बापूजींना ते म्हणाले की आजकाल विनातिकीट रेल्वेने प्रवास करण्याचा जणू प्रघात खूप पडला आहे. यासंबंधी प्रार्थनाप्रवचनात काही बोलाल तर बरे होईल,

> "स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आता करण्यासारखे काहीही राहिले नाही असे जनतेला वाटू लागले आहे. आणि जिथे कुठे ज्या कोणत्या वस्तुचा जो कोणता उपयोग करता येईल तो करावा, त्या वस्तूची तोडफोड करावी, सरकारी बाग साफ करून टाकावी आणि बसगाड्या तर मोफत प्रवासाकरिताच असतात - अशा

प्रकारची स्वच्छंदता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्यामध्ये आली आहे. तिकीट न काढता प्रवास केल्यामुळे सरकारचे इतक्याच दिवसात दीड कोटीचे नुकसान झाले आहे.

"या तोट्याचा परिणाम कोणाला भोगावे लागणार आहे? याशिवाय लाखोंच्या संख्येत लोक देश सोडून इथे आले आहेत. त्यांच्या रक्षणाची, त्यांना खाऊपिऊ घालण्याची जबाबदारी सरकारवर येऊन पडली आहे. परंतु या सर्व गोष्टींची पूर्तता करता येईल आणि हे इतकी मोठी जबाबदारी उचलता येऊ शकेल इतका पैसा सरकारजवळ नाही. जर तुम्ही असे कराल आणि प्रत्येक स्त्री, पुरुष वा बालक जर प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पाडू शकणार नसेल तर हिंदुस्थानचा विनाश होईल.

"रेल्वेचे डबे खराब करणे, त्यात थुंकणे, कचरा टाकणे हे अवगुण तर आपला जन्मसिद्ध अधिकार आहेत!! तुम्ही जिथे बसता, जिथे तुमचे पाय असतात त्या ठिकाणी कचरा टाकण्याने आजूबाजीची जी हवा विषारी होते ती कोणाचे नुकसान करते याचा तर विचार करा! जर मी रेल्वेखात्याचा प्रमुख असतो तर मी जनतेला स्पष्टपणे सांगितले असते की हक्काप्रमाणे जर रेल्वेला भाडे मिळणार नसेल, स्वच्छतेच्या नियमांचे जर पालन होत नसेल तर मी ही गाडी बंद करून टाकीन. आता रेल्वे आपल्याच मालकीची आहे, इंग्रज सरकारच्या नाही. आणि इंग्रज सरकारच्या मालकीची जरी असली तरी काय? विनातिकिट प्रवास करायचा, डबा घाणेरडा करायचा यामुळे हिंदुस्थानच्या अब्रूचे काय होईल?"

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. प्रवचन तपासले. पंडितजी आले होते. त्यांना ताप होता आणि जोरदार पडसे झाले आहे. बापूजींनी त्यांना गरम पाणी आणि मध पाजला. सरदारदादा आणि मणिबहेनसुद्धा रात्री आले होते. १० वाजता झोपायची तयारी.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२९ ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना. बापूजींनी टपाल पाहिला. ‘हरिजन’करिताचे लेखन पाहिले. ६.१० वाजता सरदारदादा आणि मणिबहेन आले. काश्मीर हिंदुस्थानात सामील झाल्याची बातमी काल रात्री कळली होती. त्यासंबंधीच गोष्टी झाल्या. मालीश सुरू असताना बापूजींनी बंगालीची पाठ केला आणि थोडा वेळ झोपले. मी मीराबहेनच्या जेवणाकरिता तयारी करायला गेले, बापूजींकरिता खाकरेही तयार केले. बापूजींनी . . . ना पाकिस्तानचे प्रधानमंत्री श्री लियाकत अली खान यांची भेट घेण्याकरिता पाठवले होते. आणि . . . ने त्यांना खूप चांगले समजावून सांगितले की पूर्व पंजाबमध्ये (भारतात राहिलेला पंजाबचा भाग) जितके अत्याचार झाले त्याच्या तुलनेत पश्चिम पंजाबमध्ये (पाकिस्तानमध्ये गेलेला पंजाबचा भाग) काहीच अत्याचार झालेले नाहीत. पाठवण्यात आलेले बंधू बापूंजींना सांगू लागले की लियाकत अलीखान पुराव्यानिशी बोलत असल्यामुळे ते जे म्हणतात ते खरे असले पाहिजे.

बापूजी म्हणाले, “पण तुम्ही तर सिंधमधून हिंदू पळून का येत आहेत हा एकच प्रश्न विचारायला पाहिजे होता. कोणी रक्तरंजित हात जर माझ्यासमोर करत असेल तर ‘आधी तुम्ही तुमचे रक्तरंजित हात धुऊन या, मग तुम्हाला जे काही सांगायचे असेल ते सांगा’ इतके म्हणायची तर माझ्यात हिंमत असायला पाहिजे ना? परंतु पुष्कळ लोक उलटेच चालत असताना मला आढळतात, आणि एका गोष्टीत ते अनेक गोष्टी मिसळत असल्यामुळे त्या चिघळतात. तुम्हांला पसंत नसेल तर सांगू नका. राजकारणात पडायचे असेल तर अशा तलवारीच्या धारेवरच चालावे लागत असते. तुमच्याकडून जाणता अजाणता एक शब्द जरी बाहेर पडला तरी हिंदुस्थानचे काम धोक्यात येईल.”

मौलानासाहेब आले. जिनासाहेबांनी पंडितजींना लाहोरमध्ये भेटण्याचे निमंत्रण दिले असल्याचेही वृत्त मिळाले. परंतु जिनासाहेबांच्या योजना कागदावरच राहत असतात. आचरणात शून्य. यामुळे लाहोरची भेट स्थगित ठेवली.

१०.३०ला दिलिपकुमार रॉय आले होते. त्यांना भेटून बापूजी खूप खुश झाले. त्यांनी ‘सारे जहासे अच्छा हिंदोस्ताँ हमारा’ आणि ‘वंदेमातरम’ गाऊन ऐकवले होते. “गळ्यातील गोडवा आणि त्यात हृदयातील भावभक्ती आणि शिवाय संगिताचे ज्ञान यामुळे त्यांनी गायीलेले गीत ऐकायला मिळणे हा एक अपूर्व असा आनंद सोहळाच आहे.” असे म्हणून बापूजींनी त्यांना सायंकाळच्या प्रार्थनेत रामधून आणि भजन गायचे निमंत्रणसुद्धा दिले.

११.५५ला बापूजी माऊंटबॅटनसाहेबांना भेटायला गेले. दीड वाजता परतले. काश्मीरमध्ये आपल्या सैन्याला थोडी माघार घ्यावी लागली आहे. परंतु बापूजींनी सांगून टाकले की, “तिथे जे १५०० सैनिक पाठवले आहेत ते सर्व तिथे मेले तरी हरकत नाही. अबदुल्ला आणि त्यांचे कुटुंबसुद्धा, जर त्यांचे धोरण प्रामाणिकपणाचे असेल तर त्यांनी स्वतःचेही बलिदान केले पाहिजे. कोणीही घाबरून इथे परतु नये. अशा प्रकारे लढता लढता मरू तर आपला विजयच आहे. आपले वा जगाचे डोळे तेव्हाच उघडतील आणि सोनेरी युग अवतरेल.”

“शेखसाहेब अद्भुत माणूस आहेत. जे म्हणतात त्यावर जर ते अखेरपर्यंत कायम राहतील तर जगात त्यांचे फार उच्च स्थान असेल. आपल्या भगिनींनीसुद्धा असेच निर्भय व्हायला पाहिजे. त्या सहजपणे घाबरतात वा पळून जातात वा गुंडांच्या स्वाधीन होतात. त्यांच्या स्वमानाला वा प्रामायमिकपयणाला धक्का लागायची वा भ्रष्ट व्हायची वेळ आली तर त्यांनी स्वतःचा अंत करून घेतला पाहिजे असा सल्ला मी अनेकदा दिला आहे. आणि काश्मीरच्या भगिनी जर असे रूप दाखवतील तर आपल्या इतिहासात होऊन गेलेल्या स्त्रियांचे जिवंत चित्र साकार केल्याचा बहुमान सौभाग्याने काश्मीरच्या रमणींच्या

वाट्याला येईल. परंतु माझ्या सल्ल्याचा पुष्कळ लोक उलटा अर्थ करतात आणि मग गैरसमज करून घेतात. भित्रे होण्यापेक्षा स्त्रियांनी जर शस्त्र ठेवले तरीही माझा आक्षेप नाही. परंतु शेकडो गुंड जर समोर असतील तर बिचारा लहानसा खंजीर काय करू शकेल? यामुळेच शीलभ्रष्ट होणे टाळण्याच्या दृष्टीने मी विष पिण्याचा सल्ला दिला आहे. स्त्रियांनी आपले मन इतके पराकोटीचे बलवान केले पाहिजे की तिच्यासमोर कोणालाही उभे होण्याचे धैर्य नसले पाहिजे." तिने मृत्यूची भीती सोडली असेल तरच हे शक्य आहे. यामुळे मी तर स्त्रियांना एकच मार्ग शिकवत असतो. तो म्हणजे कोणलाही मारण्याची भावना वा विचार त्यांनी स्वप्नातही मनात येऊ देऊ नये. त्याऐवजी वेळ आली तर त्यांनी शौर्याने मरण पत्करले पाहिजे. हा सर्वोत्तम मार्ग आहे. आर्यसंस्कृतीला हेच शोभते. आणि असे करायचे नसेल आणि शस्त्र ठेवायचे असेल तर निश्चितच त्या तसे करू शकतात. परंतु भित्रेपणासारखे दुसरे कोणतेही पाप नाही." डॉ. किचलू आणि त्यांच्याबरोबर ज्या दोन भगिनी आल्या होत्या (काश्मीरमध्ये सक्रिय सामाजिक कार्यात भाग घेणाऱ्या भगिनी) त्यांना बापूजी वरीलप्रमाणे म्हणाले.

सायकाळी भजनाचे आणि रामधुनीचे संचालन दिलिपकुमार रॉय यांनी केले. आज या भजनामुळे आणि रामधुनीमुळे प्रार्थनेच वातावरण मनाला खूप प्रभावित करणारे झाले होते. प्रार्थनेनंतर बापूजींनी दिलिपकुमार रॉयची ओळख करून दिली आणि त्यांची सर्व प्रकारे प्रशंसा करत बापूजी म्हणाले,

"दिलीपकुमारांचे भजन मी वर्षांनंतर ऐकले आहे. मी तुरुंगात जेव्हा आजारी होतो आणि पुण्याच्या ससून रुग्णालयात अपेन्डिक्सची शस्त्रक्रिया करवून घेतली होती तेव्हा सर्वात आधी मी त्यांचे गायन ऐकले होते. मी संगीतकलेत निष्णात नसलो तरी मला जे आठवते त्याप्रमाणे सांगतो की त्या वेळेची तुलना करता आता त्यांच्या गोड गळ्यातून निघालेले स्वरमाधुर्य आणि भावनांनी भरलेले भजन ऐकले

असता यांची संगीत कला अजूनच फुलली आहे असे वाटते. यांच्याइतका गोड गळा जगातील फार कमी लोकांना मिळाला असेल. यांच्या गळ्यातील गोडवा स्वाभाविक आहे आणि ती निसर्गाने दिलेली देणगी आहे. ते बहुतांश पांदिचेरी येथील महर्षी श्री अरविंद बाबूंच्या आश्रमात राहत असतात. आणि या आश्रमात धर्म, जात, वंश असा कोणताही भेदभाव केला जात नाही. स्व. श्री अफ्जल हैदरीसुद्धा एकदा या आश्रमाला भेट देण्याकरिता गेले होते. दिलिपकुमारमध्ये महर्षी अरविंदांचे गुण उतरलेले आहेत, आणि ते दिसून पडतात. आजच्या यांच्या भजनाचा सार असा आहे की ज्याप्रमाणे श्रीमंतांचे उत्पन्न त्यांच्या घरगुती साजसामानात आणि महालामध्ये गुंतलेले असते त्याचप्रमाणे भक्ताची संपूर्ण मिळकत, समृद्धी राम, कृष्ण, हरी, मुरारी वगैरे अनेक नावांंनी ओळखल्या जाणाऱ्या ईश्वरामध्ये सामावलेली असते. आपण सर्व जर हा बोध घेऊ तर आपले सर्व पूर्वग्रह दूर होतील.

"आज मला तुम्हांला एक वेगळीच गोष्ट सांगायची आहे. तुमच्यामधील पुष्कळांना माहीत आहे की काश्मीरच्या महाराजावर फार मोठे संकट येऊन कोसळले होते. यामुळे त्यांनी भारतात सामील व्हायचे ठरवले आहे. त्यांच्याजवळ महाराज्यपालासमोर शरण येण्याशिवाय दुसरा तरणोपाय का राहिला नाही? इतक्या सगळ्या विमानांद्वारे संघराज्य सरकारने काश्मीरला लष्करी मदत पुरवली आहे, आणि आता अंतिम निर्णय काश्मीरच्या जनतेचा असेल या अटीला मान्यता देण्याचे संघराज्य सरकारने कबूल केले आहे. शेखसाहेबांना आपले प्रधानमंत्री नेमण्यातून महाराजांचा सुज्ञपणा दिसून येतो. शेखसाहेबांनीसुद्धा खूप औदार्य दाखवून ही जबाबदारी उत्साहाने स्वीकारल्याबद्दल मला आनंद होतो. याबद्दल शेखसाहेबांचे आभार.

"काश्मीरमध्ये आज किती भयंकरता सुरू आहे हे पाहिले तर आपला थरकाप उडतो. कबिल्याच्या अधिकाऱ्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालील आफ्रिडी आणि इतर लोकांचे लष्कर गावकऱ्यांना लुटत आहे, कारखाने जाळत आहे आणि श्रीनगर शहराला भयग्रस्त ते करण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि माझी मान्यता आहे की पाकिस्तान सरकारच्या प्रोत्साहनाशिवाय इतकी मोठी जोखीम कोणी कसा पत्करू शकेल? इतर कोणत्याही गुणदोषात पडायची सध्याच माझी इच्छा नाही. परंतु भारत सरकारने ताबडतोब लष्कर पाठवले ही अभिनंदनीय गोष्ट आहे. यामुळे काश्मिरींमध्ये आणि शेरे काश्मीरसारख्या लाडक्या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या शेखसाहेबांमध्ये खूप हिंमत येईल. अर्थात अखेरीस तर परिणाम ईश्वराच्याच हाती आहे. परंतु माणसाचे कर्तव्य आहे की जोपर्यंत करता येईल, केले पाहिजे, ते टाळायला नको. काश्मीरचा बचाव करण्याकरिता गेलेले हे लहानसे लष्कर नष्ट होऊ शकते. परंतु अरे! हे सैन्यच काय, शेखसाहेब आणि स्त्रीपुरुष काश्मिरी जरी आपले कर्तव्य बजावताना मृत्यूमुखी पडले तरी मी डोळ्यातून अश्रूसुद्धा गाळणार नाही. परंतु या जगात बहाद्दूर लोक आहेत याचा मला अतिशय अभिमान आहे, आणि हिंदू, मुलमान, शीख हे कधीही शत्रू नव्हते असा एक गौरवशाली दाखला संपूर्ण हिंदुस्थानला मिळेल. हवे त्या नावाने ओळखा, पण आपण सर्व तर एकाच शक्तीची मुले आहो."

प्रार्थनेनंतर राजकुमारीबहेनबरोबर काश्मीरसंबंधीच गोष्टी झाल्या. तिथे हिंदुस्थानी संघराज्य अन्न, पाणी वगैरे विमानाद्वारे पोहोचवण्याची तयारी करते आहे. सिंधमध्येसुद्धा परिस्थिती अधिकाधिक वाईट होत चालली आहे. आणि या सर्वांचा परिणाम दिल्ली, बिहार आणि बंगालवर होतो आहे. जेव्हा की तेथील कार्यकर्त्यांना योग्य असे मार्गदर्शन मिळाले आहे अथवा त्यांनी अमूक एका मार्गाने जाऊऩ अमुक काम करायचे ठरवले आहे. आता

तेथील सरकारनेसुद्धा खूप सावध राहायला पाहिजे.  यामुळे बापूजींची मान्यता आहे की "हे सर्व पेटत्या निखाऱ्याप्रमाणे आहे." आणि त्यांचे हे म्हणणे खरेसुद्धा आहे. बापूजींच्या उपवासाच्या भीतीने बंगाल आणि बिहारमध्ये शांतता आहे. परंतु सर्वांची मने तर भडकलेलीच आहेत.

९.३० वाजता राजकुमारीबहेन गेल्या. बापूजींनी दहाएक मिनिट गरम पाण्यात पाय बुडवून ठेवले. व्यायाम केला. मग झोपायची तयारी. खूप थंडी पडली आहे. पाऊस येईल असे वाटते आहे. आणि पाऊस आला तर निर्वासितांचे काय होईल याची काळजी बापूजी करत आहेत.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

३० ऑक्टोबर १९४७

नियमानुसार प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजींनी टपाल ऐकला. ६.१०ला बापूजींचा डोळा लागला. ७.१२ला उठले. फिरत असताना शहीदसाहेबांबरोबर गोष्टी केल्या. त्या बहुतेक काश्मीरसंबंधीच होत्या. बापूजी म्हणाले, “काश्मीरमध्ये इतके मोठे लष्कर येऊन पडले आहे आणि तुम्ही म्हणता की यात पाकिस्तानचा हात नाही. मग कोणाचा हात आहे याचा विचार तुम्ही का करत नाही? तुम्ही याचा तपास करावा अशी तुम्हाला माझी सूचना आहे. माझी इच्छा आहे की माझे मत खोटे ठरावे, आणि तसे झाले तर मी खुशसुद्धा होईन. आणि तुम्ही जर याबाबतीत खरे ठरला तर सर्वात जास्त आनंद मलाच होईल.”

फिरून आल्यानंतर नेहमीप्रमाणे पाय धुऊन बापूजी मालीशकरिता गेले. . . . टेबल हालवत असताना त्यावरील पाण्याची बाटली आणि ताटली या दोन्ही गोष्टी खाली पडल्या आणि फुटल्या. . . . म्हणाले, दुसरी बाटली घेऊन या. बापू म्हणाले, “हो, इथे बाटल्यांचा काय तोटा? तुझ्या मनात असेल की करोडपतीच्या घरी पडलो आहो. मला दुःख होते की मला इतरांकडून काम घ्यावे लागते. इतर लोक काम करत असल्यामुळे मी बेजबाबदार आणि अपंगासारखा झालो आहे. असे नसते तर बाटली तर काय एक लहानशी कुपी वा लहानशी गोष्ट जरी चुकून फुटली असती तरी ते कसे सहन करता येऊ शकले असते? ही बाटली आणि ताटली जर आधी खाली ठेवली असती आणि मग टेबल हलवला असता तर हे नुकसान झाले नसते.”

बापूजींचे मालीश संपेपर्यंतच्या वेळात मी मीराबहेनकरिता जेवण तयार केले. त्यांची खोली साफ केली आणि त्यांना जेवण दिले. बापूजींचे कपडे व्यवस्थित ठेवले. एका विशिष्ट गोष्टीची बारकाईने चौकशी करत असताना बापूजी म्हणाले, “मी तर आशावादी माणूस आहे, आणि तितकाच श्रद्धाळूसुद्धा.” विशिष्ट कार्य आज जर पार पडले नाही तर

उद्या पडेल या आशेने आणि श्रद्धेने आपण आपले काम सुरू ठेवले तरच या जगात मानवजात आपली प्रगती करू शकते. जो श्रद्धा आणि आशा हरवून बसलेला असतो त्याचे जीवन घृणास्पद होत असते. आणि अखंड प्रयत्न केल्यानंतरही आपले ठरवलेले कार्य जरी पार पडू शकले नाही तरी आपण घाबरून जाण्याचे कारण नाही. माणसाने ठरवलेले प्रत्येकच कार्य पार पडते असे या जगात होत नसते, परंतु ही निष्फळतासुद्धा प्रेरणादायक होऊ शकते. आणि आपल्या या विफलतेमागे कोणती चूक कारणीभूत आहे याचा शोध घेतला आणि ती चूक दुरुस्त केली तर साफल्य मिळण्याइतकी शक्ती आपल्याला मिळाल्याशिवाय राहूच शकत नाही. आणि जो माणूस प्रामाणिकपणे कर्तव्यशील राहतो तो कधीही नशिबावर विसंबून राहत नसतो. जो निराशेला बळी पडतो त्याचा विकास अडून पडत असतो हे तू निश्चितच लक्षात ठेव."

आंघोळ करून बापूजी बाहेर आले तेवढ्यातच बेगम अब्दुल्ला, त्यांचा मुलगा आणि इंदिराबहेन आले. बेगमसाहेबांनी काश्मीरला येण्याकरिता निमंत्रण दिले. माझ्याबरोबर त्या बोलत असतानाच बापूजी मध्येच म्हणाले, "हो, हे ठीक आहे. या पोरीला लढाईत घेऊन जा. आणि तुम्ही सर्व एक तर अहिंसक लढा देत असताना मेलात तरी आणि विजयी होऊन आलात तरी मला आवडेल. माझी खात्री आहे की तुम्ही जे पाच लोक इथे उभे आहा केवळ तितकेच लोक पाकिस्तानच्या सेनेसमोर कापले जाऊन शौर्याने मेला तर मी आनंदाने नाचू लागेन, आणि चोहोकडे आपलाच विजय झाला असे समजले जाईल."

१२.१०ला लेडी माऊंटबॅटन बापूजींना भेटायला आल्या. त्यांनी काश्मीर आणि अनेक निर्वासित छावण्यांसबंधी गोष्टी केल्या. १२.५५ला गेल्या. १.१५ला माती घेतली आणि आराम केला. २.२०ला बापूजी उठले. काश्मीरचे डॉ. किचलू आले आणि त्यांनी काश्मीरसंबंधीची अद्यावत माहिती बापूजींना दिली. हिंदुस्थान सरकारने लष्कर

पाठवल्याचा काश्मिरी लोकांवर फार चांगला प्रभाव पडला आहे. आज गोष्टी करत असताना बापूजींनी जवळपास पाऊणेक तास कताई केली.

३.३० वाजता सिंधचे पुढारी आले. ते आपले कुटुंब घेऊन आले आहेत. आणि त्यांना दिल्लीसारखा शहरात कायम वास्तव्य करायचे आहे. बापूजींना दुःख झाले आणि त्यांनी त्यांच्यासमोर ते अशा प्रकारे अभिव्यक्त केले, -

> "तुमच्यासारख्या प्रमुख पुढाऱ्यांवरसुद्धा, जे ३०-३५ वर्षांपासून माझे सहकारी राहिले आहेत, मी सांगितलेल्या गोष्टींचा प्रभाव राहिला नसेल तर अखेरीस मी कुठे आहे याचा मला विचार करावा लागतो. आम्ही अशा कोणत्या शहरात राहू शकू की जिथे आमच्या मुलांना शिक्षण मिळू शकेल आणि आम्ही शांतपणे राहू शकू असा सल्ला मागण्याकरिता आज तुम्ही माझ्याकडे आला आहा. आज तुमची अशी असहाय अवस्था आहे. मला तुमची दया येते आणि इतके दिवस मी आंधळा का होतो असा प्रश्नही मला पडतो व मला स्वतःबद्दलच दुःख होते. जिला मी शूराची अहिंसक सेना समजत होतो तो खरे पाहता दुर्बलांचा अहिंसक प्रतिकार होता ! आज आपल्या मातृभूमीच्या हजारो भावाबहिणींना तिथेच सोडून तुम्ही तुमच्या मुलाबाळांसह इथे निघून आला कारण तुम्हांला तशी संधी मिळाली वा तुम्हा लोकांचे जे संबंध होते त्याच्या बळावर तिथून सुटका करून घेण्याची ही संधी तुम्ही निर्माण केली. ज्या जनतेने तुमच्यावर विश्वास टाकला होता आणि तुमच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाच्या लढ्यात उडी घेतली होती तिलाच तुम्ही सोडून दिले? यात मी तुम्हांला दोष देत नाही. परंतु तुमचे जे खरे रूप आहे ते तुम्हांला दाखवले आहे आणि मी चुकीच्या मार्गावर होतो याची मला स्वतःला जाणीव करून दिली आहे. परंतु मी आशावादी आहे. आज सकाळीच या मुलीशी (मनू गांधी) मी श्रद्धा आणि आशा यांसंबंधी बोलत होतो. अशा प्रकारे ईश्वर माझी परीक्षा घेत आहे. आणि

'करू वा मरू' या मंत्राप्रमाणे आचरण करण्याच्या माझ्या प्रयत्नात प्रामाणिकपणा आणि खरेपणा असेल तर आणि त्याचबरोबर रामनामावर माझी अढळ श्रद्धा असेल तर या ऐक्याच्या यज्ञाच्या ज्वाला कितीही भयानक असल्या तरी मी त्यापासून दूर पळणार नाही, आणि माझ्याकडून काहीच झाले नाही तर कमीतकमी हसत हसत निराकार निरंजन रामाला भजत त्या यज्ञात स्वतःला होमून घेण्याची शक्ती तरी ईश्वर मला देईल. माझ्याबाबतीत मी इतके सिद्ध करू शकलो तरी ते पुरेसे आहे.

"तुम्ही तर माझ्या मुलासारखे आहा. आता तुम्ही माझा सल्ला मागण्याकरिता आला आहा तर मी तुम्हांला सल्ला देईन की तुम्ही शहरात वसण्याचा मोह सोडून द्या. सिंधमध्ये परतण्याचे तुमच्यात धैर्य नसेल तर तुमच्या कुटुंबाबरोबर एखाद्या खेड्यात जा आणि काही रचनात्मक कार्य करा. एकदा तुम्ही (शहराचा) मोह सोडला की तुमचा वा तुमच्या कुटुंबियांचा किती उत्कर्ष झाला ते तुम्हांला दिसू येईल. मी माझे मत तुम्हांला सांगतो आहे परंतु मला खुष करण्याकरिता तुम्ही काहीही करू नका. तुमचे मत, तुमचा आत्मा जे सांगेल तेच करा. यातच तुमची शोभा आहे. बापूला काय पसंत आहे, काय नापसंत आहे, कशामुळे ते नाराज होतील, कशाने खुश या सर्वांचा विचार करत बसाल तर गोंधळात पडाल आणि मलाही खरे काय ते कळणार नाही. मग वातावरण कृत्रिम होईल आणि कृत्रिमपणामुळे किती हानी होते हे तुम्हांला माहीत आहे काय?"

आधी आलेले बंधू बापूजींचे म्हणणे कान लावून एकत होते. बापूजी अतिशय करुणापूर्ण आवाजात हे सर्व सांगत होते. ते गेल्यानंतर बापूजी मला म्हणाले, "तू पाहिलेस ना की माझे कसे हाल होताहेत? कोणाला माहीत ईश्वर या डोळ्यांनी कायकाय पाहायला लावणार आहे? हे लोक पळून आल्यानंतर मी कितीही जरी लिहिले की लोकांनी 'घरदार

सोडून आपल्या ठिकाणावरून घाबरून पळून येऊ नये, हल्ला झाला तर कुटुंबासह तिथेच मरून जावे' हे कोण मान्य करील? आणि हे स्वीकारा असे मी तरी कोणत्या तोंडाने सांगू?"

माहीत नाही आजचा दिवस कसा उगवला, परंतु आज दिवसभर असेच गंभीर वातावरण होते. ५.३० वाजता बापूजी प्रार्थनासभेत गेले तर तिथे एका बंधूने विरोध केला. यामुळे बापूजी प्रार्थनासभेत गेले नाही आणि निरोप पाठवला की, "जर असा विरोध असेल तर माझ्याकडून प्रार्थना होणार नाही आणि प्रार्थनेनंतरचे प्रवचनही मी करणार नाही."

परंतु उर्वरित विशाल जनसमुदायाचे म्हणणे होते की, "एकाने जरी विरोध केलेला असला तरी आम्ही सर्वांनी काय अपराध केला? आम्ही गांधीजींच्या दर्शनाकरिता आलो आहो. गांधीजींना बोलावा."

यामुळे बापूजी आले. ते म्हणाले,

"इथे जी प्रार्थना होत असते ती एका खाजगी माणसाच्या घराच्या अंगणात होत असते. हे काही सार्वजनिक मैदान नाही. यामुळे विरोधकांनी इथे येण्याची आवश्यकता नाही. आणि इथे येऊन प्रार्थनेला विरोध करणे हा अविवेक होईल. यामुळे मी तर म्हणेन की हा अविवेक करण्यापेक्षा प्रार्थनेत न येणे हे जास्त सुज्ञपणाचे होईल. परंतु मला प्रार्थना करण्यापासून कोणीही अडवू शकत नाही. मी असे करत नाही कारण माझे सत्य आणि अहिंसा मला शिकवतात की जेव्हा विरोध करणारी एकच व्यक्ती असेल आणि बहुसंख्य आपल्या संख्याबळाच्या आधारावर जर त्या व्यक्तीला दाबून ठेवायचा प्रयत्न करत असतील तर त्या एका माणसाच्या बाजूने उभा राहणे माझे कर्तव्य आहे. समूहाने जर मला विरोध केला असता तर कितीही जरी धोका पत्करावा लागला असता तरी मी प्रार्थना केलीच असती. परंतु या गोष्टीची दुसरी बाजूही समजून घेतली पाहिजे. एका माणसासाठी मला संपूर्ण

समाजाला निराश करावे लागत आहे. यामुळे प्रार्थनाविरोधी नसलेले जे बाकीचे लोक आहेत त्यांना मी विनंती करतो की त्यांनी मन, वचन आणि कर्मानेसुद्धा या विरोधक बंधूवर रागावू नये. मी ज्या सत्य आणि अहिंसेच्या नियमांचे वर्णन करत असतो ते जर माणूस दृढ संकल्प करून आचरणात उतरवू इच्छित असेल तर कठीण काहीही नाही. परंतु हिंसेचा प्रतिकार हिंसेने कराल तर या चक्रातून बाहेर पडणे फार कठीण होईल. सत्य आणि अहिंसेचा मार्ग अनुसरणे फार कठीण आहे.

"माणूस एक प्रगतीशील प्राणी आहे. या जगात एका ठिकाणी स्थिर उभा राहणारा कोणताही प्राणी नाही. ईश्वर म्हणा की अल्ला म्हणा की गॉड म्हणा, हाच केवळ गतिरहित, स्थिर आणि अचल आहे. ईश्वर तर काल जसा होता तसाच आज आहे आणि उद्याही राहील. परंतु माणूस असा राहू शकत नाही. आपण आईच्या पोटात असतो, जन्म घेतो, मोठे होतो आणि माझ्याप्रमाणे ८० वर्षांचे म्हातारपण येते.जन्मल्यापासून पुढे जाण्याकरिताच आपला जन्म झाला आहे. आणि दिवसेंदिवस माझी तर खात्री होत चालली आहे की मानवजातीला जर या जगात जिवंत राहायचे असेल तर सत्य आणि अहिंसा अवलंबिल्याशिवाय सुटका नाही. यामुळे आचरणाचे हे दोन सिद्धांत नजरेसमोर ठेवूनच आपण सर्वांनी जगायचे आहे, काम करायचे आहे."

प्रार्थनेनंतर बातमी कळली की काश्मीरमध्ये पाकिस्तानी सैन्याची पिछेहाट झाली आहे. बापूजींनी प्रवचन तपासले आणि नंतर थोडा वेळ गोपूबरोबर खेळले. राजकुमारीबहेन आणि डॉ. किचलूंसोबत गोष्टी केल्या. ९.३५ला झोपायची तयारी. झोपाण्यापूर्वी नेहमीप्रमाणे व्यायाम केला.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

३१ ऑक्टोबर १९४७

आजपासून बापूजींनी खाली लाकडाच्या फळीवर झोपायला सुरुवात केली आहे.

रात्री थंडीमुळे डोक्यावर पांघरूण घेऊन आणि शरीराची वेटोळी करून मी झोपले होते. यामुळे दातण करता करता बापूजी मला म्हणाले, “थंडी फार वाजली तर एक पांघरूण जास्त घ्यायचे. परंतु डोक्यावर पांघरूण घेऊन झोपू नये. पांघरुणात श्वासोच्छावास केल्याने शरीराचे नुकसान होते. ईश्वराने इतकी शुद्ध हवा दिली आहे. हिचा जर तू सदुपयोग करणार नाहीस तर याला मी पाप समजेन. हवा, प्रकाश आणि पाणी या गोष्टींची निर्मिती ईश्वराने माणसाकरिता, पशुपक्ष्यांकरिता आणि झाडपाल्यासाठी केली आहे. प्रभू यांचा कोणताही मोबदला मागत नाही. असे असतानाही आपण जर यांचा सदुपयोग केला नाही तर हे पाप नाही तर अजून काय असू शकेल? असे असतानाही माणसाला किती अहंकार असतो? ईश्वराच्या सृष्टीचा जसजसा विचार करत जाऊ तसतसे समजू लागते की आपण तर एखाद्या चिलटासारखे आहो. असे अता नाही. आपण जर एखादे काम केले तर ते ‘मी केले’ असे आपण म्हणतो. किती हा आपला अभिमान? याला माणसाचे दारिद्र्य समजायचे काय? की याकरिता माणासाची कीव केली पाहिजे? हा पामर माणूस किती अहंकारी आहे हे पाहून प्रभूला आपली कीव येत असेल. अजून काय सांगू? काल शहीदसाहेबांबरोबर मी हेच बोलत होतो की भाडून भांडून आपण काय मिळवणार आहो? आणि माणूस असा कोण आहे की तो काही देऊ शकेल? देणारा आणि घेणारा तर ईश्वरच बसला आहे. नास्तिकवादाला सुद्धा मान्य करावे लागते की या सृष्टीचा निर्मिक ना तर एखादी विद्युतशक्ती आहे ना एखादी रासायनिक शक्ती. ही एकच अशी शक्ती आहे की जिला कधीही प्रयोगातून निर्माण करता येऊ शकत नाही आणि अखेरीस आपण या शक्तिला ईश्वर, अल्लाह, वा गॉड वा एखाद्या ईष्टदेवतेचे नाव दिल्याशिवाय आपले भागूच

शकत नाही. या शक्तीकडे दुर्लक्ष करायचे आणि आपल्या बुद्धिशक्तीचा उपयोग हाणामारी करण्याकरिता कशासाठी करायचा? परंतु हे जे मी सांगतो आहे ते आज कदाचित कोणाच्या गळी उतरणारसुद्धा नाही असे वाटते."

आज सरदारदादांचा वाढदिवस असल्यामुळे ते बापूजींना प्रणाम करण्याकरिता ५.३० वाजताच आले. ते इतक्या लवकर आल्यामुळे खूप नवलसुद्धा वाटले. काही सांगितल्याशिवायच त्यांनी बापूजींना प्रणाम केला. बापूजींना वाटले इतक्या सकाळी सकाळी आले आहेत आणि झुंजूमुजू होत आहे. यामुळे प्रणाम करत आहेत. त्यांच्याशी काश्मीरबद्दल चर्चा केली. परंतु आज रात्री उशिरा कळले की आज त्यांचा वाढदिवस असल्यामुळे ते प्रणाम करायला आले होते.

६.५ ला बापूजी झोपले. ६.३५ ला उठले. 'हरिजन'करिता लिहायची तयारी केली. रेहानाबहेनचे जे पत्र आले होते ते मी वाचून ऐकवले. आणि संपूर्ण 'हरिजनबंधू'मधून प्रकाशित करण्याकरिता ते बाजूला ठेवले. मुसलमानांच्या मागणीमुळे पाकिस्तान होऊन फाळणी झालेली असल्यामुळे आता दोन लिप्यांचा आग्रह धरण्याचे कारण नाही असे सकारण पत्र त्यांनी लिहिले होते. (या लेखाकरिता पाहा म. गा. सं. सा. खंड ९७ विषय क्र. १७९)

दुसरे पत्र ठाकुरदार बंग यांचे होते आणि ब्रिटिशांच्या काळात ज्या प्रकारे राज्यकारभार चालत होता त्याच प्रकारे आताही चालतो आहे अशी टीका त्यातून करण्यात आली होती. हे पत्रसुद्धा वेगळे ठेवले. इतर २-४ पत्रांचे व्यक्तिगत उत्तर दिले.

फिरणे वगैरे वेळेनुसार चालले.

बापूजी २० मिनिट झोपले. नंतर परत बंगाली बाराखडी लिहिली. आता तर बापूजी बंगालीत मोठी मोठी वाक्येसुद्धा लिहितात. असे असूनही दररोज बाराखडी लिहिण्याचा नियम ठेवला आहे. आंघोळ करत असताना माझ्याबरोबर थोड्याशा कोटुंबिक गोष्टी

केल्या. ९.३० वाजता बापूजी जेवले. ११.३० वाजता श्री गिरिजाशंकर वाजपेयींशी काश्मीरबद्दल गोष्टी केल्या.

बापूजींनी दुपारी आराम घेतला. आजकाल . . . आणि . . . मध्ये थोड्याशा कटकटी सरू आहेत. जुनागढ आणि काश्मीरचे प्रश्न उग्र झाले आहेत. आणि शिवाय आपले पुढारी गोष्टीगोष्टीत युनोकडे जाण्यासंबंधी बोलत आहेत. ही गोष्ट बापूजींना अगदीच रुचत नाही. यामुळेच इतर गोष्टींच्या आधारे बापूजी म्हणतात,

> "जगात किती तरी गोष्टी बुद्धीपलीकडील आहेत. अशा वेळी श्रद्धेचेच मार्गदर्शन घ्यावे लागते. खरी गोष्ट कबूल करणे आणि गोष्ट खरी वाटल्यानंतर तिचा स्वीकार केला पाहिजे. आपण जर दोषच पाहायला बसलो तर आपल्याला या जगात पूर्णपणे निर्दोष असा एकही माणूस सापडणार नाही. खोट्या गोष्टीतूनही श्रद्धा आणि प्रामाणिक उदार बुद्धी चांगला सार घेते, आणि अशाच प्रकारे आपले जीवन उन्नत करते. आपण जर संकुचित मन ठेवले तर चांगली आणि आपल्या हिताची गोष्ट जरी कोणी दाखवली तरी आपला त्यावर विश्वास बसत नाही. आणि असे करण्यात समोरच्या माणसाचे नुकसान नसते तर आपलेच नुकसान असते. ज्या माणसात माफी मागण्याचा गुण असतो तो ईश्वराच्या जवळ असतो. इंग्रजीत अशा प्रकारचे किती तरी प्रयोग आहेत. Forgive and Forget. माफ करा आणि विसरा. परंतु इतक्यात तर आभाळच फाटले आहे. त्याला कुठवर ठिगळ लावू? आपण नदीसारखी सहनशीलता शिकायला पाहिजे. सागरासारखे आपले मन असायला पाहिजे, आणि सूर्यासारखी उदारता आपल्यामध्ये असली पाहिजे. असे झाले तर ईश्वराची खूप कृपा आहे असे आपण समजावे. हे जग खूप परिवर्तनशील आहे. हवे तर आपल्याला अनुकूल होईल असा फेरबदल आपण त्यात करू शकतो. परंतु असे करताना त्यात आपला स्वतःचा स्वार्थ नसावा. अनेकदा चुकीचे वा वाईट

काम केल्यानंतर त्याबद्दल पश्चात्ताप करण्याऐवजी इतरांना आपले चातुर्य दाखवणे, आपण जणू काय मोठाच पराक्रम केला आहे असे जर आपण इतरांना दाखवणार असू तर आपला विकास होण्याऐवजी आपण विलासी होऊ. परंतु एकदा जरी पश्चात्ताप व्यक्त केला तर त्यामुळे आपली अनेक पटींनी प्रगती होते. असमाधान, ईर्षा, लोभ या सर्वांच्या मुळाशी स्वार्थ आहे. गुलाब वाटेल तिथे ठेवा, वाटेल तिथे लपवा, पण जर तो खरोखरी गुलाब असेल तर तिथे मधमाशा असायलाच पाहिजे. बाकी तर या जगात मतभेद असणारच आहेत. एकच शरीर असूनही ईश्वराने आपल्याला पाचही बोटे सारखी दिलेली नाहीत. याच्या कारणाचा कधी विचार केला आहे काय? हे दाखवतात की पाचही बोटे जरी सारखी नसली तरी प्रत्येक हाताला इतक्याशाच बोटांची गरज असते, आणि हाताकरिता प्रत्येक बोटाचे सारखेच मूल्य असते. यावरून धडा घ्यायचा की जगात एकच विचार असणारी माणसे नाहीत. आणि तरीही जगाला त्या सगळ्यांची सारखीच गरज आहे. इतके एका हाताच्या बोटापुरते. यामुळे लपूनछपून टीका करणे सोडले तर ही गोष्ट सर्वांकरिता तसेच तुमच्या स्वतःकरिताही लाभदायक होईल."

गोष्टी सुरू असताना बापूजी असे म्हणाले होते. बोटांचे उदाहरण देत असताना बापूजींनी किती सुंदर सांस्कृतिक गोष्टी सांगितल्या ! सायंकाळी सत्यनारायण सिंह आले. ते विशिष्ट काँग्रेसीबद्दल असमाधान व्यक्त करत होते. बापूजी म्हणाले, "गोष्ट अशी आहे की स्वराज्य आल्याबरोबर सर्वांना वाटू लागले आहे की आता आपल्याला खूप सुख मिळेल. यामुळे यात शिरा. परंतु ज्याप्रमाणे लाखो रुपयात एक खोटा रुपया जरी मिसळण्यात आलेला असला तरी व्यापारी जेव्हा ते पैसे मोजायला बसतो तेव्हा त्याच्या नजरेत त्या लाखो रुपयांबरोबरच तो एक रुपयाही येतो आणि तो व्यापारी तो खोटा रुपया परत करतो. यामुळे जेव्हा खोटे, कोणताही सिद्धांत नसलेले संधिसाधू लोक आत शिरतात तेव्हा प्रजा

त्यांना फेकून देते. परंतु खऱ्या काँग्रेसींना, जे सतत त्याग करत असतात आणि सेवापरायण असतात त्यांची आधी दिलेल्या उदाहरणातील व्यापाऱ्यासारखी तीक्ष्ण नजर असेल तर जनता त्यांचा स्वीकार करत असते."

आज सायंकाळी प्रार्थनेला विरोध झाला होता, परंतु प्रार्थना सुरू ठेवण्यात आली होती. आणि दिलिपकुमार रॉयनासुद्धा दिवसा थांबवून ठेवण्यात आल्यामुळे भजन ऐकवायला लोक आले होते. सुरुवातीला विरोध झाल्यामुळे बापूजी म्हणाले,

"प्रार्थना जर ऐकायची असेल तर एकच मार्ग आहे. तो म्हणजे विरोध करणाऱ्या बंधूवरसुद्धा कोणीही रागावू नये, आणि पोलिसांनीसुद्धा मध्ये पडू नये."

लोकांनी ही गोष्ट कबूल केल्यानंतरच प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतरच्या प्रवचनात बापूजी म्हणाले,

"आज आपल्याला भाईश्री दिलिपकुमारनी जे भजन ऐकवले त्यातील शब्द आणि भाई दिलिपकुमारचा गोड गळा यांचा मेळ झाल्यामुळे आजचे भजन आगळेवेगळेच काही कर्णप्रिय रसायन झाले होते. त्यात भक्ताच्या मनाचे कवीने पूजेचे एक मंदिर म्हणून वर्णन केले आहे. आणि भक्ताच्या हृदयमंदिरातील हे प्रेम सहजपणे अभिव्यक्त झाले आहे, मन ईश्वरात लीन होत नसल्यामुळे ते इतस्ततः भटकत होते. त्याचे मन ईश्वराची भक्ती करण्यालायक मंदिर होऊ शकत नव्हते. अहिंसेच्या पुजाऱ्यालासुद्धा हाच आदर्श लागू पडतो.

"निर्वासितांमध्येसुद्धा श्रीमंत आणि गरीब असा संघर्ष सुरू असतोच. मला असे आढळले आहे की श्रीमंत लोक सोयीस्कर होईल त्या साधनांनी संपत्ती मिळवतात आणि मग जीव वाचवण्याकरिता देश सोडून निघून जातात, गरीब मात्र मागे राहतात. एक देशवासी म्हणून सोबत राहावे आणि सोबत बुडावे या नियमाचे पालन केले पाहिजे, आणि

संकटाच्या काळात उच्चनीच हा भेद जर आपण विसरलो तर आलेल्या संकटातही आपण पुण्यरुपी मोठी संपत्ती - संस्कार आणि मी तर पूनर्जन्म मानत असल्यामुळे पुढील जन्म चांगले व्हावे म्हणून त्याकरिता आतापासून तयारी म्हणून आपण सर्व भेदभाव टाळले पाहिजे. आपण जर असे वर्तन केले तर निर्वासितांची ही छावणी उत्तम साफसफाईचे आणि प्रेमपूर्ण सहकार्याचे मंदिर होईल.

"आज थोडेसे मुसलमान भाई भेटायला आले होते, आणि आम्हांला बळजबरीने शीख बनवण्यात येत आहे अशी त्यांची तक्रार होती. अशाच प्रकारे हिंदूंना मुसलमान केल्याची उदाहरणेसुद्धा आहेत. परंतु कोणावरही कोणताही धर्म बळजबरीने लादणे यासारखे दुसरे कोणतेही पाप नाही असे मी समजतो. जर असे करू तर हिंदू, शीख आणि मुसलमान या तिन्ही धर्मांचा विनाश होईल. जर कोणी कोणावरही बळजबरी करत असेल तर त्याला माझा संपूर्ण विरोध आहे. आजसारखी विषम आणि निर्लज्जपणाची अवस्था यापुढेही कायम राहणार असेल तर ते पाहण्याकरिता ईश्वराने मला जिवंत ठेवू नये हीच प्रार्थना मी करीन. अशा प्रकारे जगण्याची माझी मुळीच इच्छा नाही."

प्रार्थनेनंतर राजकुमारीबहेनआल्या. तसेच राजेंद्रबाबू आणि काठेवाडचे . . . भाई आले. अन्नधान्यासंबंधी आणि नियंत्रणांविषयी गोष्ट निघाली. बापूजी तर नियंत्रणांच्या विरोधातच आहेत. ते मला म्हणाले, "तुझ्याजवळ कागदांची नक्कल असेल तर तुझ्या भावाला दाखव." बापूजींनी त्यात लिहिले होते की "नियंत्रणे आणि अन्नधान्याच्या वितरणात फार मोठा गोंधळ आहे याबद्दल मला शंका नाही. ईश्वराला जे करायचे असेल ते होईल. मी तर मेहनत करतो आहे."

हे वाचायला लावल्यानंतर बापूजी म्हणाले, "मी माझ्या विचारात उत्तरोत्तर दृढ होत चाललो आहे."

१० वाजता बापूजींनी पाय धुतले, व्यायाम केला आणि झोपले.

बिरलाभवन,

१ नोव्हेंबर १९४७

नियमानुसार प्रार्थना; नंतर बापूजींनी सरदादांना पत्र लिहिले -

चि. वल्लभभाई,

काल तुम्ही मला भेटायला आला तेव्हा तो तुमचा वाढदिवस असल्याचे मी अगदीच विसरून गेलो होतो. (वल्लभभाई ३१ ऑक्टोबरला ७२ वर्षांचे झाले होते.) यामुळे मी तुम्हाला व्यक्तिशः आशीर्वाद देऊ शकलो नाही. आज माझी अवस्था ही अशी आहे. मी हे विशेष कारणाकरिता लिहीत आहे -

१) बिर्लाभवनजवळ निर्वासितांची गर्दी होत आहे. इथे इतक्या सगळ्या लोकांनी राहणे शक्य नाही तरीही कसे तरी करून ते इथे पडलेले आहेत. त्यांना छावणीत हलवण्यात आलेच पाहिजे आणि तेही जलद.

२) मशिदीसंबंधीचे पत्र मी सोबत जोडत आहे. अशा अनेक पत्रांमधील हे एक आहे. सर्व मशिदींना संरक्षण दिले जाईल आणि मशिदींचे जे काही नुकसान झाले असेल त्याची भरपाई सरकारी खर्चाने केली जाईल अशी घोषणा करण्यात आली पाहिजे.

३) ज्या लोकांचे बळजबरीने हिंदू वा शीख धर्मात धर्मांतर करण्यात आले आहे त्यांनी धर्म बदललेलाच नाही असे सरकार गृहीत धरील असे घोषित करण्यात आले पाहिजे व त्यांना आवश्यक संरक्षण देण्यात आले पाहिजे.

४) एकाही मुसलमानावर संघराज्य सोडण्याची सक्ती केली जाणार नाही.

५) ज्यांना आपली घरे रिकामी करावी लागली वा ज्यांच्या घरात बेकायदेशीरपणे इतर लोक राहत आहेत त्यांचे तेथील वास्तव्य बेकायदेशीर समजले जाईल असे आश्वासन त्यांना देण्यात यावे व ती घरे मूळ मालकाकरिता राखून ठेवण्यात यावी.

असे वक्तव्य काढणे आवश्यक आहे असे मला वाटते. (शासकीय धोरण स्पष्ट करताना वल्लभभाई पटेल यांनी नोव्हेंबर ६ला वक्तव्य काढले की जे मुसलमान भारतीय संघराज्याशी प्रामाणिक आहेत त्यांना पूर्ण संरक्षण दिले जाईल.)

आशीर्वाद,

बापू

बापूजींनी हरिजनकरिता लिहवून घेण्याची तयारी केली आणि थोडा वेळ आराम केला. पाऊणेसात वाजता फिरायला निघाले. फिरत असताना राजेंद्रबाबूजी आणि इतर दोन लोक सोबत होते. बापूजींनी नियंत्रणे बंद करण्याविषयी ठामपणे प्रतिपादन केले.

राजेंद्रबाबूजी म्हणाले, प्रत्येक प्रांतातील मुख्यमंत्री नियंत्रणे उठवण्याशी सहमत नाहीत.

बापूजी - तर त्यांची समजूत घालण्याची माझी इच्छा आहे. तुम्ही मुख्यमंत्र्यांची इथे एक सभा बोलावा.  या वर्षी धान्याचे पीक तर भरपूर आले आहे. आणि तरीसुद्धा लोकांना आपण खराब आणि सडके अन्न खायला लावतो. हे स्वतंत्र हिंदुस्थान सरकारला शोभत नाही. लोकांनी स्वतःच यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे. परंतु नियंत्रणे तर जायलाच पाहिजे.

६ तारखेला बिरलाभवनमध्ये एक सभा घेण्याचे ठरले आहे.

एक मुसलमान बहेन बापूजींच्या मुली सारखी (अमतुलसलाम - अनु.) आहे, आणि तिचे भाऊ जीव वाचवण्याकरिता पळून गेले होते. यामुळे या भगिनीने आपल्या या भावाबद्दल खूप संतापून पत्र लिहिले होते. त्याच्या उत्तरात बापूजींनी लिहिले,

> "तुझे भाऊ जीव वाचवण्याकरिता पळाले अशी तू निंदा करायला नको होती. आपण स्वतःचे ऐकायला पाहिजे. इतरांची निंदा करायचा आपल्याला अधिकार नाही. प्राण कोणाला प्रिय नसतात?

नियमानुसार मालीश, आंघोळ वगैरे झाले. बापूजींचे धोतर थोडे लांब होते. ते बापूजींनी कापायला लावले आणि त्याचे लहान लहान हातरुमाल करायची सूचना करत ते म्हणाले, “एक तर इतक्या लांब कपड्यांची गरज नसतानाही ते नेसायचे तर त्यामुळे शरीरावर अनावश्यक ओझे पडते. शिवाय ते धुवायला साबणही लागतो. आणि ते कपडे धुवायलासुद्धा भारी होतात. आणि अशा लहान लहान हातरुमालांची तर आवश्यकता असतेच.”

मी म्हणाले, “तुमचे डोकेसुद्धा कुणीकडच्या कुणीकडेच धावते.”

हिंदुस्थानातील प्रत्येक माणूस जर ही गोष्ट शिकेल तरच हिंदुस्थानचा उद्धार होईल याबद्दल मला मुळीच शंका नाही.

बापूजी आंघोळ करून बाहेर आले. किती तरी मुसलमान भाई त्यांना भेटायला आलेले होते. त्यांच्याबाबतीत घडलेली हकिगत त्यांनी सांगितली. त्यात किती तरी अतिशयोक्तिने भरलेला भाग होता. यामुळे बापूजी म्हणाले,

“आपल्याला जे सांगायचे असेल ते विचारपूर्वक सांगितले पाहिजे. आणि तुमच्या मनात या हकिगतीची स्पष्टता असल्यामुळे तुम्ही ती थोडक्यात सांगायला पाहिजे होती. एकदा अतिशयोक्तीची सवय लागली की ती आयुष्यभर सहन करावी लागत असते. आणि माझ्याकरिता तर फार बोलणे आणि अतिशयोक्ति करणे यांत अंतरच नाही. उलट हा खोटेपणाचा एक प्रकारच आहे. आणि यामुळेच आपल्यामध्ये भांडणे होतात, बेबनाव होतो. आणि सरदारसारख्या तीक्ष्ण बुद्धीच्या माणसाजवळ तुमच्या शब्दांची काहीही किंमत राहणार नाही. आणि सरकारची तुम्ही जर थोडीशीही फसवणूक करायचा प्रयत्न कराल तर तुमचेच नुकसान होईल ही गोष्ट लक्षात ठेवा.”

३.४५ वाजता सरदारदादा आणि मणिबहेन बापूजींना भेटायला आले. निर्वासितांबद्दल गोष्टी झाल्या.

जुनागढच्या प्रकरणासंबंधात श्री पंड्या भेटायला आले. बापूजींनी त्यांना सांगितले की जुनागढसंबंधी सरदारच सर्व काही करत आहेत.

प्रार्थनासभेत आजसुद्धा कालप्रमाणेच विरोध झाला. प्रार्थनेच्या आधी बापूजी म्हणाले, "आजसुद्धा प्रार्थनेला विरोध करणारे कालचे बंधू आहेत. विरोध करणे मला चांगलेही वाटते आणि त्याचे मला दुःखही होते. चांगले याकरिता की या भाईंच्या मनात जे काही आहे ते ते सगळे स्पष्टपणे सांगून टाकतात. आणि दुःख याकरिता की मी यांना इतके समजावून सांगयचा प्रयत्न करूनही यांची समजूत पटू शकली नाही. परंतु आपण आपली प्रार्थना सुरूच ठेवू या आणि विरोधक बंधूंचा कोणीही किंचितही राग करू नये."

आजचे भजन दिलीपकुमार रॉयनी 'हम ऐसे देश के वासी है जहां क्रोध नही और आह नही' आपल्या गोड गळ्यातून गाईले आणि बापूंनी आपले प्रवचन याच अनुषंगाने केले-

> "आजच्या या भजनाचा अर्थ दोन दृष्टींनी होतो. एक अर्थ तर असा आहे की भक्त अशा देशाचा वासी आहे की जिथे शोक, ग्लानी, दुःख, दारिद्र्य नाही. हिंदुस्थान असा सुंदर देश आहे की जिथे क्रोध वा हायहाय नाही. परंतु मला तर असा काळ आठवत नाही की जेव्हा हिंदुस्थानात शोक वा क्रोध नव्हता. दुसरा अर्थ असा आहे की या भजनात शरीर आणि शरीरात वसणाऱ्या आत्म्याला संबोधण्यात आले आहे. आपल्या शरीरात आत्म्याचा वास असतो आणि गीतीमातेच्या भाषेत शरीर हे धर्मक्षेत्र आहे आणि धर्मक्षेत्ररुपी या देहात पवित्र आत्मा विराजमान असतो. आणि इथे हा आत्मा शरीराचा मालक असून तो काम, क्रोध, मोहाच्या जाळ्यापासून शरीराला वाचण्याचा प्रयत्न करत असतो. प्रत्येक व्यक्ती जर याकरिता प्रयत्नशील

राहील तर या मोहजालातून मुक्ती मिळवून ती सर्वोच्च सुख प्राप्त करू शकेल आणि कवीचे हे स्वप्न साकार करू शकेल. परंतु आज तर हिंदुस्थान शोक आणि दुःखाच्या अवस्थेत पडलेला आहे.

“कुरुक्षेत्राच्या छावणीतून आज एक भगिनी मला भेटायला आली होती. तिची हकिगत ऐकून माझे हृदय रडू लागले. त्यांच्या छावणीत अजून डॉक्टरांची, औषधपाण्याची आणि पांघरुणाची खूपच जास्त आवश्यकता आहे. अनेक भगिनींना या थंडीत कोणत्याही पांघरुणाशिवाय उघड्या आकाशाखाली असह्य परिस्थितीत झोपावे लागते. कपडे बदलायला त्यांच्याजवळ दुसरी जोडीसुद्धा नसते. . . . आज चोहोकडे जे वेडाचे वातावरण पसरले आहे त्याचाच हा परिणाम आहे. अतिशय दुःखाने, शोकाने भरलेल्या या संकटातून मुक्त होण्याचा एकच मार्ग आहे. मनातील वैराची, शत्रुत्वाची भावना काढून टाकून बंधूभावाची भावना पसरवणे हा तो मार्ग आहे.

“आता मला तुम्हांला काश्मीरसंबंधी काही गोष्टी सांगायच्या आहेत. असे म्हणतात की तेथील परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत चालली आहे. तुम्हा सर्वांना माहीत आहे की काश्मीरकरिता सर्व आवश्यक गोष्टी विमानाद्वारेच पाठवता येऊ शकतात. इतर कोणत्याही मार्गाने तिथे मदत पोहोचू शकत नाही. आता थंडीचे दिवस असल्यामुळे मी या बिरलाभवनमध्ये सूर्यदेवाची कृपा असली तर उघड्यावरच बसत असतो आणि डोक्यावरून काश्मीरकडे मदत घेऊन विमाने उडत जात असतात. त्या वेळी माझ्या दृष्टीसमोर काश्मीरचे मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला आणि त्यांच्या प्रजेचे करुण चित्र तरळू लागत असते. आणि त्यांच्याकरिता माझे अंतःकरण भरून येते आणि काळजीही वाटते.

"शेखसाहेब बहाद्दूर आणि साफ मनाचे गृहस्थ आहेत. त्यांच्याजवळ कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही. ते अन्यायाशी ताठ मानेने लढणारे गृहस्थ आहेत. आणि मला खात्री आहे की जोपर्यंत काश्मीरमधील एक लहान मूलसुद्धा असुरक्षित आहे तोपर्यंत ते शांत बसणार नाहीत. आणि असे करत असताना ते मरणेही पसंत करतील.

"अशा प्रकारे पृथ्वीवरील स्वर्गाची उपमा असलेल्या सुंदर काश्मीरचे सुकाणू शेख अब्दुल्लासारख्या अद्भुत माणसाच्या हाती असल्यामुळे तेथील जनतेला माझा सल्ला आहे की त्यांनी काश्मीरसंबंधात निराशेला स्थान देऊ नये. उलट त्यांनी आपली मातृभूमी आणि घरदार वाचवण्याकरिता मृत्यू जरी येत असेल तरी ती अहोभाग्याची गोष्ट मानायला पाहिजे. असे झाले तर त्याचा प्रभाव संपूर्ण जगावर पडेल. आफ्रिदी तसेच इतर लुटारू काश्मीरपासून दूर राहिले तर किती चांगले होईल!"

प्रार्थनेनंतर बापूजी सरळ फिरायला गेले. फिरत असताना प्रार्थनेला विरोध करणारे बंधू आणि इतर काही लोक सोबत होते. त्यांना बापूजी म्हणाले -

"मी स्वतःला कट्टर सनातनी समजतो. माझा धर्म विशाल आहे. माझा धर्म केवळ चार वेदांपर्यंत सीमीत नाही. मी तर विश्वातील सर्व धर्मग्रंथांचे रहस्य समजून घेत असतो आणि यामुळेच मी कट्टर हिंदू आहे. तुम्ही आपल्या गीतेचा अभ्यास करा ! या सातशे श्लोकात सर्व धर्मग्रंथाचाच नाही तर सर्व ग्रंथांचा सार आहे. त्यात कुठेही कोणत्याही धर्मग्रंथावर टीका नाही. परंतु आपण आपल्या धर्माला संकुचित करू नये. आपण एकांतात केवळ एकच विचार केला पाहिजे आणि तो म्हणजे 'मी कोण आहे?, मी काय करतो?' हा. असे झाले तर आपल्याला आपल्या उणिवा आणि आपली तुच्छता कळल्याशिवाय

राहणार नाही असे मी समजतो. इतके जरी आपण करू शकलो तरी आपल्या स्वतःचा, आपल्या कुटुंबाचा, आपल्या समाजाचा उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही आणि शेवटी तर हे जगसुद्धा तरल्याशिवाय राहणार नाही."

फिरून आल्यानंतर बापूजींनी प्रवचन लिहिले. नेहमीप्रमाणे पंडितजी आले. त्यांच्याबरोबर दीडेक तास गोष्टी केल्या. सुधीरदा आणि होरेस अलेक्झँडर आले. पाय धुतले, व्यायाम केला. ९.४५ वाजता झोपायची तयारी केली. पडल्या पडल्या बापूजी म्हणाले,

"खूप थकवा आला आहे. हृदयाच्या प्रत्येक स्पंदनाबरोबर जर रामनाम कोरले गेलेले असेल तर हवे तितके काम केले तरी थकवा येणार नाही. पण त्याचबरोबर त्याचे पूर्ण ज्ञानही असायला पाहिजे. माणसाच्या अंतःकरणात जर ईश्वराचे नाव अंकित असेल तर मन आपोआपच निर्मळ होते. आणि मग तर केवळ शुद्ध विचारच येतात. यामुळे रोग आपोआप नाहीसे होतात. याच दिशेने जाण्याकरिता मी प्रयत्नशील आहे. यामुळेच आजचा थकवा आणि चोहोकडे पेटलेला दावाग्नी कायम आहे असे मी समजतो."

बिरलाभवन, नवी दिल्ली,

२ नोव्हेंबर १९४७

काल रात्री बापूजी झोपल्यानंतर १०.३० वाजता मी जेव्हा झोपायला गेले तेव्हा बापूजी झोपेत बोलत असलेले मी ऐकले. “एक रियासत दुसरे रियासत को मजबूर नही कर सकती” असे शब्द त्यांच्या तोंडून निघत असलेले मी ऐकले. यामुळे मी बापूजींना विचारले असता ते म्हणाले -

“खरे आहे. आजकाल जुनागढ, काश्मीर, निर्वासितांची दुर्दशा आणि सर्वसामान्य जनतेचे होणारे हाल इत्यादी प्रश्नांमळे तसेच दिल्लीत सुरू असलेल्या राजकारणात आतल्याआत सुरू असलेल्या किती तरी महत्त्वाच्या गोष्टींनी माझे डोके नेहमीच भरलेले असते. यामुळे मला वाटते की मी नकळत अंदाज करू लागलो आहे. नाही तर मनावर काळज्यांचे कितीही जरी ओझे असले तरी रामनामाला शरण गेलेल्या या माणसाच्या झोपेत मानसिक वा शारीरिक कारणांमुळे अडथळा का यावा?”

सकाळी तोंड धूत असतानासुद्धा ते ही गोष्ट सांगू लागले. त्यावर मी म्हणाले “परंतु तुम्ही तर सर्व काही ईश्वरावर सोडलेले आहे. परंतु मनावर या समस्येंच्या शक्तीचे ओझे जर जास्त असेल तर असे होणारच आणि शिवाय यातून सर्वसामान्य जनतेला होत असलेली पीडा दूर करण्याकरिता हा माणूस काही केवळ पोपटपंची करून राहिलेला नाही हेसुद्धा दिसून पडत नाही काय? निद्रावस्थेत जर तुम्ही कोणाला मारण्याची गोष्ट केली असती तर ‘तुम्ही कदाचित ईश्वराच्या जवळ नाही  असे तुम्ही निश्चितच म्हणू शकला असता. परंतु नरसी महेतांनी म्हटले आहे की, ‘पीड परायी जाणे रे . . .(दुसऱ्याचे दुःख, व्यथा समजून घेतल्या पाहिजे . . .)’ आणि जागे असताना तर ठीक, परंतु जागे नसतानासुद्धा तुम्ही नरसी महेतांचे हे म्हणणे साकार करत आहा. असे असल्यामुळे ‘मी ईश्वराच्या जवळ नाही’ असे तुम्ही कसे काय म्हणू शकता?”

बापू - तुझा प्रश्न बरोबर आहे. परंतु तू माझी मुलगी असल्यामुळे माझी उणीव शोधण्याची शक्ती तुझ्यात नसूही शकते. कितीही का प्रिय व्यक्ती असेना तिच्याकडे तटस्थ भावनेने पाहणे म्हणजे साधूत्व. तुझ्यात जर ही दृष्टी आली तर तुझी 'साधूत' गणना होईल. हा गुण आत्मसात करणे फार कठीण आहे. परंतु गीता रटणारा मी गीतेच्या दृष्टीने ईश्वराच्या फार जवळ नाही. परंतु अशा प्रकारे ईश्वराने सांगितले आहे की, ईश्वराकडून सोपवलेल्या कामाला शोभेल अशा प्रामाणिकपणाने फळाची चिंता न करता आपण ते काम केले पाहिजे. मग विरुद्ध परिणाम जरी मिळाले तरी माणसाने समाधान मानायला पाहिजे, दुःख करू नये. आणि आपल्या बाजूने जरी परिणाम आले तरी तसेच परिणाम प्रत्येक ठिकाणी येणार नाहीत. यामुळे मी जर दिवसभर पूर्ण प्रामामिकपणे ईश्वराचे काम करत असेन तर रात्री झोपेत असताना मला त्याची काळजी का वाटावी?"

बापूजी इतके बोलत नाही तोच प्रार्थनेची वेळ झाली. प्रार्थनेनंतर बापूजी टपालाच्या आणि 'हरिजन'च्या कामाला लागले. ते फिरत असताना ७.३० वाजता राजेंद्रबाबू आले. जुनागढसंबंधी गोष्टी करत असताना शामळदासकाका आणि मगनलालकाका या दोघांच्याही पुतण्यांच्या सख्खेपणाची गोष्ट निघाली. रक्ताच्या नात्याने बापूजींच्या जास्त जवळ कोण आहे? बापूजी म्हणाले, "कोण जवळचा हा भेद माझ्या मनातून कधीचाच निघून गेलेला असल्यामुळे कोण जास्त जवळचा आहे हे तर मी विसरूनच गेलो आहे. जे माझे काम करतात आणि माझ्या विचारानी ओतप्रोत झालेले असतात ते माझ्या जवळचे. मी बिहारमध्ये जेव्हा आलो तेव्हा तुमचा आणि माझा संबंध शुक्लांद्वारे आला. आणि आता हे संबंध इतके दृढ झालेले आहेत की जितके सख्ख्या पितापुत्राचे असावे."

बापूजींना थोडासा खोकला यायला सुरुवात झाली आहे. यामुळे फळांचा रस घेतला नाही.

आझाद हिंद फौजेच्या लोकांनी खूप गुंडगिरी सुरू केल्याची बातमी बापूजींना दुपारी मिळाली. याबद्दल बोलताना बापूजी म्हणाले, आज सायंकाळी मी ही गोष्ट प्रार्थनेत सांगेन. सुभाषबाबूंनी जगाला आश्चर्यचकित करणारे सैन्य उभे केले होते. आणि आता तेच जर हे असे काम करणार असतील तर ते नेताजींचे नाव कलंकित करतील.

बापूजींचा बाकी सगळा कार्यक्रम ठरलेल्या वेळेप्रमाणे चालला. सरदारदादा आले होते. पंडित सुंदरलालजी आणि स्थानिक मुसलमान बंधूसुद्धा ठरल्याप्रमाणे आले होते. या लोकांनी शांतता स्थापित व्हावी म्हणून किती तरी कार्ड छापले होते. त्यांनी आपल्या पत्रांची सुरुवात 'मि. महात्मा गांधी' अशी केली होती आणि कार्ड इंग्रजीत छापले होते. त्यावर टीका करताना बापूजी म्हणाले -

"पहिली गोष्ट तर ही आहे की असे दंगेधोपे करणारात किती लोक शिकलेसवरलेले आहेत? आणि त्यातही किती शिकलेल्या लोकांचा या गुंडगिरीशी संबंध आहे? . . . गावांमध्ये रक्तपात सुरू आहे. आणि तुम्ही प्रकाशित केलेले हे आवाहन गावातील किती टक्के लोक वाचू शकतील? आणि शिवाय अशी घाणेरडी इंग्रजी लिहून फायदा काय? आपल्याला जरी इंग्रजी आवडत नसली तरी इंग्रजीच्या मोहजालातून आपण अजून सुटू शकलेलो नाही. शिवाय या कार्डांकरिता तुम्ही मुबलक खर्चसुद्धा केला आहे. आज तर परिस्थिती अशी आहे की जे लाखांचे धनी म्हणवले जात होते त्यांची मुलेबाळेसुद्धा उपाशी आहेत. तुम्ही त्यांचा विचार कसा करत नाही? तुम्ही हे जे सर्व काही करत आहा ते पाहून तर उलट मला दुःखच होते."

२.३० वाजता श्रीमती कुरेशी, ज्यांच्या पतीने डॉ. जोशींना .येथील नागरी रुग्णालयातच गोळी मारली होती आणि परिणामी ते मेले होते, भेटायला आल्या. त्या कराचीला जात आहेत. त्या आपल्या नवऱ्याचा बचाव करत सांगत होत्या की डॉ. जोशी आणि डॉ. कुरेशी यांच्यात तर गाढ मैत्री होती. आणि मित्र आपल्या मित्राला कसा मारू

शकतो? परंतु आम्ही मुसलमान असल्यामुळे हे सरकार आमच्याशी शत्रुत्वाने वागत आहे, वगैरे.

बापूजी म्हणाले, "न्यायालयात जर यासंबंधी पुरावे मिळाले नाही तर ते सुटतीलच ना? तुम्हांला जर ते निर्दोष आहेत असे वाटत असेल तर तुम्ही इतक्या अधिक दुःखी का होता? आणि शंका आली तर सरकार मलासुद्धा पकडू शकते. आणि तुमच्या नवऱ्याच्या हाती रिव्हाल्व्हर आढळले - आणि इतरही साहित्य सापडले की ज्यामुळे सरकार सरकारी पद्धतीने काम करत आहे." . . . त्यांना बापूजींनी अर्धा तास दिला.

कातत असताना मौलाना साहेब आले होते. ४.१५ वाजता कृपलानीजी आणि सुचेतादिदी आल्या. सिंधची अवस्था फार वाईट झाल्याची सांगत होते. आज प्रार्थनेत खूप गर्दी होती. आणि प्रार्थनासभेत कोणी विरोधक आलेले आहेत की काय हे भाईसाहेब (ब्रिजकृष्ण चांदीवाला) आधी जाऊन पाहून आले. दहाहून अधिक विरोधक होते. परंतु ते शांत बसलेले होते. प्रार्थनेआधी बापूजी त्यांना म्हणाले,

"तुम्ही प्रार्थनेला धैर्याने स्पष्टपणे विरोध करत आहा आला हे मला निश्चितच आवडले आहे. परंतु तुम्ही तेवढ्याकरिता इथे आला आहा की मी महात्मा म्हणवतो आणि देशाची सेवा करतो आहे तर देशाच्या सध्याच्या बदलत्या परिस्थितीत मी काही नवीन सांगतो काय हे पाहायला तुम्ही आला आहा? हे कळल्याने मला वाईट वाटले. शिवाय मी असेसुद्धा ऐकतो की लोक माझ्या दर्शनाकरिता येत असतात. याचे तर मला अजूनच दुःख होते. ईश्वर तर अनेक नावांनी ओळखला जात असतो. जगात चेतन वा जड वस्तूंना जितकी नावे आहेत तितकी ईश्वराची नावे आहेत. माणूस जर धर्मशास्त्राप्रमाणे चालत नसेल तर तो माणसाचा दोष असतो, शास्त्रांचा नसतो. कुराणशरीफमधील ईश्वराची स्तुती करणारा सर्व आणि खरा भाग मी ईश्वराचे गुणगान करण्याकरिता घेतला आहे. आणि असे समजा की त्याप्रमाणे मुसलमान चालत नसतील तर तो कुराणचा अपराध आहे काय? ईश्वर तर

नेहमीच प्रत्येक गोष्टीत वसलेला असतो. यामुळे आपला कोणीही शत्रू नाही. आणि सामुदायिक प्रार्थनेत जर एकत्र यायचे असेल तर अंतःकरणापासून एकत्र यायला पाहिजे. आणि असे झाले तर निश्चितच त्याचा प्रभाव पडेल. आणि असे नसेल तर न येणे हेच अधिक श्रेयस्कर होईल. आता सांगा की तुमच्यापैकी कोणाला विरोध करायचा आहे?

बोट उंच करून सर्व म्हणाले, “आम्हांला प्रार्थना करायची आहे. आणि कोणी जर विरोध केलाच तर आम्ही त्याचा राग करणार नाही असे आश्वासन आम्ही तुम्हांला देतो.”

आजच्या प्रार्थनेत नंदिताबहेन भजन म्हणाल्या होत्या. प्रार्थनेनंतर बापूजी आपल्या प्रवचनात म्हणाले,

> “काश्मीरची परिस्थिती चिंताजनक आहे. मला असे वृत्त कळले आहे की स्वर्गीय सुभाषबाबूसारख्या प्रखर पुढाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली जी आझाद हिंद सेना तयार करण्यात आली होती त्या फौजेतील माजी लष्करी अधिकारी आजकाल लुटारूंचे अधिकारी होऊन काम करत आहेत. हे ऐकून मला अतोनात दुःख झाले. आझाद हिंद सैन्यात तर हिंदू, मुसलमान, शीख इत्यादी सर्व समुदायाचे लोक होते आणि असे असूनही प्रत्येकजण आपापल्या धर्माचे पालनही करत होता. एखाद्या साखळीप्रमाणे सर्व एकमेकांशी भाऊभाऊ म्हणून जोडले गेले होते. आणि प्रत्येकाला आपण हिंदुस्थानी आहो म्हणून गौरव वाटत होता. याच अधिकाऱ्यांची नावे माझ्याकडे आली आहेत. हे जर तेच असतील तर मी त्यांना ओळखतो. ते दिल्लीच्या या लाल किल्ल्यात होते. त्यांना मी भेटलो आहे आणि त्यांची सुटका झाल्यानंतरही मी त्यांना भेटलो आहे. हे दोन्ही भाऊ लुटारूंचे पुढारी का झाले आहेत, तसेच निर्दोष स्त्रियांची आणि मुलांची हत्या करण्यात ते कसे काय सामील झाले आहेत हेच मला कळू शकत नाही. आफ्रिडी आणि इतर जमातीच्या लोकांना प्रोत्साहन देऊन ते आपल्या जमातीचे नुकसान करत आहेत. शेख

अब्दुल्लासाहेबांनी जे केले ते योग्य नाही असे वाटून जर हे दोन भाऊ या वाटेने वळले असतील तर त्यांना माझा सल्ला आहे की त्यांनी शेखसाहेबांना भेटून वाटाघाटी कराव्या आणि त्यांना पापाचरणातून मुक्त करावे.

"आणि मला दुःखाने सांगावे लागत आहे की पाकिस्तान सरकारसुद्धा या हल्ल्यात सरळसरळ वा आडपडद्याने मदत करत आहे. सरहद्द प्रांताच्या मुख्यमंत्र्यांनी तर उघडपणे संपूर्ण मुस्लिम जगताला मदत करण्याकरिता आवाहन केले आहे. याशिवाय पाकिस्तान सरकारने भारत सरकारवर असा आक्षेप घेतला आहे की पंडित नेहरूनी जीवनावश्यक वस्तू काश्मीरला पुरवून काश्मीरने हिंदुस्थानमध्ये सामील व्हावे म्हणून प्रयत्न केले आहेत. आणि अशाच प्रकारचे बेफाम आरोप पाकिस्तानच्या मंत्र्याच्या दर्जाच्या एका व्यक्तीने केले आहेत याचे मला दुःखही होते आणि आश्चर्यही वाटते.

"आज दिवसा लाहोर आणि कराचीहून जे बंधू मला भेटायला आले होते त्यांनी सांगितले की इथे हिंदू निर्वासितांची जी परस्थिती आहे तशीच वा त्याहूनही जास्त वाईट परिस्थिती पाकिस्तानमधील मुसलमानांची आहे. हा विनाश थांबण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे आपणा सर्वांच्या मनातील द्वेषभावना पूर्णपणे काढून टाकून भ्रातृभावना निर्माण करणे. शेवटी तुम्हा सर्वांना हीच विनंती करतो की तुम्हीसुद्धा माझ्याबरोबर प्रार्थना करा की दोन्ही देशांची विवेकबुद्धी जागृत होईल अशा प्रकारे त्यांना मार्गदर्शन कर."

प्रार्थनेनंतर बापूजी ३० मिनिट फिरले आणि फिरत असताना गोपूबरोबर खेळलेही. गोपू पळत असायचा आणि बापूजी त्याला पकडत असायचे. गोपूला पकडता येईल इतक्या वेगात बापूजी चालत जायचे आणि गोपू पळत असताना बापूजी त्याला पकडत असत. खूप मजा वाटली.

८.३० वाजता पंडितजी आले. जवळपास दिडेक तास बसले. त्यानंतर प्रवचन तपासले. ९.४५ वाजता बापूजींचे काम आटोपले. पाय धुतले, व्यायाम केला आणि झोपायची तयारी केली.

बापूजी सांगत होते की पंडितजींनासुद्धा काश्मीरची फार काळजी वाटते. . . . खूप मतभेद आहेत. बापूजींचे म्हणणे आहे की या दोघांनी शांतपणे आणि मनमोकळेपणाने चर्चा केली पाहिजे. बाहेर उडत असलेल्या गोष्टी ऐकून एकमेकांबद्दस पूर्वग्रह करून घेऊ नये. १० वाजता झोपायची तयारी.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

३ नोव्हेंबर १९४७

आज तर बापूजींचा मौनदिवस आहे. नियमानुसार प्रार्थना. नंतर आलेला टपाल पाहिला. एका पत्रात बापूजींनी आपल्या हृदयातील व्यथा व्यक्त करताना लिहिले -

"'लज्जा मारी राखो श्याम हरी' (पाहा आश्रम भजनावली - ११२, ऑगस्ट १८, १९३०) हे द्रौपदीच्या प्रार्थनेचे गोड आवाजातील दुःखद भजन ऐकल्यानंतर मी आताच तुझे पत्र पाहिले. आज माझीसुद्धा अशीच अवस्था आहे. द्रोपदीला भीम आणि अर्जून, यांच्यासारखे बलवान आणि युधिष्ठिरासारखे सत्यवचनी पती होते. ती द्रोणाचार्य, भीष्म आणि विदुर यांची सून होती. आणि तरीही भरसभेत तिची दुर्दशा होऊ लागली. त्या वेळीही ती हिंमत हारली नव्हती आणि अंतःकरणपूर्वक ईश्वराचा धावा करू लागली तेव्हा ईश्वराने तिची लाज राखली. हे भजन अतिशय गूढ आहे. यावर हवे तितके भाष्य करता येऊ शकते. आज अनेक प्रिय सहकाऱ्यांमध्ये या विशाल भवनात बसूनही मी कठीण परिस्थितीत आहे. परंतु दिवसेंदिवस ईश्वराची मदत मिळत असल्याचा मला अनुभव येतो. अखेरीस दिल्लीवरच तर संपूर्ण देशाचे भवितव्य अवलंबून आहे. परंतु आमच्यातही फार विष भिनले आहे. ते काढून फेकण्याचा मी प्रयत्न करतो आहे. त्यात जर अपयश आले तर मला जिवंत राहण्याची इच्छा नाही. १२५ वर्ष जगण्याच्या कामनेचा मी त्याग केला आहे. ईश्वराने सर्वांना सन्मती द्यावी."

दुसऱ्या एका पत्रात –

"तुम्ही जेव्हा इंग्रजीत लिहिता तेव्हा मला माझा, तुमचा आणि संपूर्ण देशाचा अपमान वाटतो. तुम्हांला माहीत आहे काय की 'नवविवाहिता घरात जो पहिला ठसा

उमटवते आणि राजा जनतेवर जो पहिला ठसा उमटवतो तो कायम टिकत असतो'? अशाच प्रकारे आता आपल्याला स्वराज्य मिळालेले आहे आणि तरीही आपण हिंदुस्तानीऐवजी इंग्रजीचा वापर करू तर मी कोणाला काय म्हणू? सागरालाच आग लागली आहे. इतकेच पुरे. अधिक लिहिण्याकरिता मला वेळही नाही आणि उत्साहही नाही..."

५.२५ सरदारदादा आणि मणिबहेन आले. ६.२५ वाजता बापूजी थोडा वेळ झोपले. ते ७.१० ला उठले आणि फिरायला गेले. मौन असल्यामुळे डोळे बंद करूनच फिरले. थंडी खूप असल्यामुळे शरीरात गरमी यावी म्हणून सुरुवातीला झपाट्याने चालले. मालीश, आंघोळीनंतर होरॅस अलेक्झॅंडर आले. त्यांनी किती तरी गोष्टी सांगितल्या. आज मौन असल्यामुळे या सर्व गोष्टींचे उत्तर उद्या देईन असे बापूजींनी सांगितले.

बापूजींना आज आलेल्या टपालातील एका पत्राच्या कव्हरवर 'श्रीकृष्ण भगवान, बिरला हाऊस, नयी दिल्ली' असे लिहिलेले होते तर दुसऱ्या एका पत्रावर पत्ता होता, 'महमद गांधी.' आणि दोन्ही पत्रे हिंदूंनी लिहिलेली होती. एका पत्रात गांधीजी भगवान श्रीकृष्णाचे साक्षात अवतार आहेत असे होते तर दुसऱ्यात होते - "तुम्ही हिंदू असूनही हिंदूंचा नाश करत आहा आणि तुमचा एक मुलगा ज्याप्रमाणे मुसलमान झाला आहे त्याप्रमाणे तुम्हीसुद्धा करा."

अशी पत्र बापूजींना अधूनमधून येत असतात आणि त्यांचे उत्तरही बापूजी अधूनमधून देत असतात. पण आजच्या या पत्त्यामुळे गंमत वाटली.

बापूजींनी मला लिहिले, "या दोन पत्रांमधून आपल्याला धडा शिकायला मिळतो. आपण सुखदुःखाकडे समभावनेने पाहिले पाहिजे."

४.४० मुंशीजी आले. ते अन्नधान्याच्या परिस्थितीविषयी बोलले. बापूजींनी लिहिले, "तुम्ही कंट्रोलच्या बाजूने केलेला एकही युक्तिवाद माझ्या पचनी पडू शकला नाही. कंट्रोल असू नये हा विचार माझ्या मनात दिवसेंदिवस ठाम होत चालला आहे."

एका आश्रमवासी भगनीला पत्रात लिहिले,

"माझ्या राजकीय सहकाऱ्यांमध्ये मतभेद निर्माण झाल्याचे मला आढळते. अर्थात त्याला अपवाद आहेत परंतु मी सर्वसाधारण वातावरणाबद्दल बोलत आहे. मी वर्षभरापासून आश्रमाबाहेर आहे यामुळे आतील तर रामजीलाच माहीत. परंतु तिथेही हृदयाचे पावित्र्य कायम राहिले नाही असे मला आढळते. तरीही मी जगतो आहे कारण माझ्याकरिता जीवन एक महान सत्य आहे. जीवन ईश्वराचा अंश आहे असे मी समजतो आणि त्यामुळे त्याची ही देणगी प्रयत्नपूर्वक सांभाळण्याचा मी प्रयत्न करतो आहे."

माती घेऊन आराम केला. वर्तमानपत्रे ऐकली. साठलेली पत्र फाईलमधून काढली. प्रवचन लिहिले. आजच्या प्रवचनात म्हणाले,

"दोन्ही भागात विष पसरलेले असताना विष कुठून आले आणि कोणी जास्त विष दिले आणि कोणी कमी वापरले याबद्दल अंदाज करत बसणे हा मूर्खपणा आहे. पाकिस्तानने जास्त विष पसरवले की हिंदुस्थानने याचा निर्णय कोण करू शकेल? आणि दोन्ही ठिकाणी एकाच प्रकारचे अमानुष वर्तन सुरू असताना याबद्दलचा निर्णय घेऊन उपयोग तरी काय? इतके मात्र मी सांगायला पाहिजे की पश्चिम पाकिस्तानच्या बऱ्याचशा भागात हे विष फार जास्त पसरले आहे. ईश्वर करो आणि या दोघांमध्ये शांतता स्थापित होवो.

"इतक्यातच डॉ. राजेंद्रप्रसादनी सगळ्या प्रांतांच्या मुख्यमंत्र्याची एक सभा 'नियंत्रणा'च्या समस्येसंबंधी सल्लामसलतीकरिता बोलावली आहे. यामुळे या

महत्त्वाच्या विषयावरील माझे विचार काय आहेत ते तुम्हांला मी सांगितले पाहिजे. सुरुवातीपासून मी नियंत्रणे रद्द करण्याच्या मताचा आहे. त्यात अजूनही तसुभरसुद्धा फरक पडलेला नाही.

"मला असे आढळले आहे की नियंत्रणांमुळे आपल्यावरील सुसंस्कार आपण विसरून गेलो आहो. आपल्यामधील वैदिक संस्कृतीचा - वाटून खाण्याच्या वृत्तीचा पूर्णपणे लोप झाला आहे. नियंत्रणांच्या परिणामी दगाफटका, खोटेपणा आणि काळाबाजाराची प्रवृत्ती वेगात वाढू लागली आहे. आणि सर्वात जास्त दुःखाची गोष्ट तर ही आहे की लोकांचे धैर्य कमी होत चालले आहे. एखादा परका माणूस आला आणि आपल्या तोंडात त्याने घास भरवला तर किती चांगले होईल असे आपल्याला वाटते. आपली प्रवृत्ती ही अशी झाली आहे. कोणालाही श्रम करणे आवडत नाही.

"गेल्या विश्वयुद्धाने तर आपले सर्व काही लुटले गेले आहे. परंतु अन्नधान्यावरील नियंत्रणाच्या रूपाने तर जगाला वाईटात वाईट वारसा दिला आहे असे माझे म्हणणे आहे. युद्धाच्या वेळी आलेली नियंत्रणे कदाचित आवश्यकही असतील कारण त्या वेळी अन्नधान्याची निर्यात करावी लागत होती. या अनैसर्गिक निर्यातीमुळे जर मापबंदी करण्यात आली नसती तर तेव्हा खाद्यपदार्थांची दुकाने बंद पडल्याशिवाय राहिली नसती. पण आता काय करायचे? आता ज्या प्रकाराच्या अन्नाची आपल्याला गरज असेल आणि आपल्याला निर्यात करायची इच्छा नसेल तर आपल्याला कोणीही काहीही म्हणू शकत नाही.

"अन्नधान्यासंबंधी बाहेरील देशांकडून आशा करणे आपण सोडायला पाहिजे. असे करून उपासमार होत असलेल्या इतर देशांची आपण मदत करू.

"माझ्या दोन पिढ्यांइतक्या जीवनात मी दोन दुष्काळ पाहिले आहेत. परंतु ते तर नैसर्गिक दुष्काळ होते. निसर्गाच्या हातीच जेव्हा संसाधने असतात तेव्हा

माणूस काय करू शकेल? तरी पण खाद्यपदार्थ आणि अन्नधान्यावरील मापबंदीचे उदाहरण मी पाहिले नाही.

"ईश्वराची कृपा की या वर्षी पावसाळा ऋतू चांगला गेला. आणि यामुळे इथे अन्नधान्याची टंचाई जाणवणार नाही. हिंदुस्थानच्या गावांमध्ये धान्य, डाळी आणि तेलबिया पुष्कळ प्रमाणात आहेत. धान्यासारख्या खाद्यपदार्थांच्या भावांची अनैसर्गिक आणि कृत्रिम नियंत्रणे बिचाऱ्या खेडुताला काय कळतील? यामुळे उघड्या बाजारात त्याच्या मालाला जो भाव मिळतो त्याने त्याचे समाधान होत नाही. देशात धान्याची टंचाई आहे हे सिद्ध करणारे भरपूर आकडेवारीने भरलेली जी पत्रके सरकारी नोकर तयार करतात त्यांनी ते फारसे उत्तेजित झालेले मी पाहिले नाही. आपले मंत्री आपल्या जनतेतर्फे निवडलेले गेलेले आहेत. परंतु त्यांना या सर्व गोष्टींचा अनुभव नाही. जे अनुभवी लोक आहेत परंतु जे मंत्रिमंडळात नाहीत त्यांचे ऐकायचे की नियत्रणे काढून टाकले जाण्यापूर्वीच नष्ट होऊन जायचे? यामुळे अशा अनुभवी माणसांच्या सल्लाचासुद्धा मंत्र्यांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे. आपल्याला जास्त ज्ञान आहे वा आपल्याला जास्त कळते अशा अहंकारात मंत्र्यांनी राहू नये.

"एका डॉक्टरने मला पत्र लिहिले आहे. ते लिहितात की मापबंदी मिळणाऱ्या सडक्या धान्यामुळे अनेक रोगांचे पेव फुटले आहे. आणि लोकांना रोगराई सहन करावी लागते.

"खाद्यपदार्थांचे भाव निश्चित करून मापबंदीच्या दुकानातून सरकार जर सार्वजनिक बाजारातून चांगले धान्य विकत घेऊन त्याचे वितरण करू शकेल तर सरकारला भाव नियंत्रित ठेवण्यात यश मिळू शकेल. धान्याच्या व्यापाऱ्यांवर तसेच खेडुतांवर सरकार विश्वास का ठेवत नाही? लोकशाही राज्याचा आधार विश्वास

असतो. लहान मुलाला आईने जर काहीही करू दिले नाही तर ते जसे पांगळे होईल तसेच जर जनतेला बोट धरून पांगुळगाड्याने चालायला लावले तर अखेरीस जनता पांगळी होईल. लोक जर एकमेकांची फसवणूक करत असतील वा मन लावून पूर्ण मजुरी न करता उपाशी मरत असतील तर ही गोष्ट स्वागतार्हच असेल, आणि यामुळे इतर लोकांमध्ये खरा समंजसपणा येऊन ते क्रूरपणाच्या पातळीवर जाईल इतके स्वार्थी होणार नाहीत."

प्रार्थना झाल्यानंतर बापूजी फिरले. राजा हाथीसिंग सोबत होते. अब्दुल घनीसाहेबसुद्धा आले होते. सरहद्दीवरील परिस्थिती अतिशयच विषम होत चालली होती.

(. . . ने विचारले) आपल्या देशात साम्यवाद्यांचा समूहसुद्धा खूप वाढत चालला आहे. असे असतानाही तुम्ही अहिंसेची तरफदारी का करता?

बापूजी - मी म्हणतो म्हणून तुला असे वाटते की तू कुठे वाचले? परंतु तू यावर विचार केला नाही म्हणून तुू असे म्हणतोस? जगाला जर शांतता हवी असेल, सामाजिक समता हवी असेल तर ही गोष्ट अहिंसेशिवाय दुर्लभच असेल हे तुम्ही लिहून ठेवा. आपल्या देशात धनिक वर्गसुद्धा किती वाढून राहिला आहे? जे आहे ते जर तुम्हांला जपून ठेवायचे असेल तर तुम्ही तुमच्या संपत्तीचा, तुमच्या कौशल्याचा उपयोग देशात परोपकारी संस्थांच्या स्थापनेकरिता केला पाहिजे आणि यां गोष्टी देशाकरिता वापरल्या पाहिजे. आपल्याला जर बंदुकीच्या धाकावर लुटले तर त्या संपत्तीचा काय फायदा? आणि मी तर अनुभवाच्या आधारावर ही हकिगत सांगतो आहे. जमनालाल, पंडित मोतीलाल, घनश्यामदास वगैरेंचा तर मी खूप पैसा उडवू शकलो."

बापूजींचे मौन असले की घरात कोणीच नाही असे वाटते. आणि सुटले की वातावरणात वाजागाजा सुरू होतो.

सायंकाळी गोपूसुद्धा आला होता. बापूजींना म्हणाला, "दादा, तुम दौडो, मै पकडूंगा." दादा पळू लागले आणि गोपू त्यांना पकडण्याकरिता त्यांच्या मागे धावू लागला होता. थोड्याच वेळात बापू पकडले गेले. अशा प्रकारे बापूंवर डाव आला. गोपू पळू लागला आणि बापू पकडू लागले. गोपूने बापूजींना चांगलेच पळवले. या दृश्याने तर सर्व हसून हसून ५ वर्षांचा नातू आणि ७५ वर्षांचे आजोबा!!

फिरल्यानंतर राजकुमारी बहेन आल्या. विशेष काही गोष्टी तर झाल्या नाही. ९.१५ वाजता व्यायाम करून बापूजी झोपले.

बिरलाभवन, नवी दिल्ली,

४ नोव्हेंबर १९४७

प्रार्थनेआधी एका तरुण बंधूंविषयी बापूजींनी काही गोष्टी केल्या. ते म्हणाले, ”या लग्नाकरिता माझा आशीर्वाद असू शकत नाही कारण यात सांगितलेली भावना तुझ्यात नाही. आणि सध्या मी माझ्या सभोवती दावाग्नी पेटलेला असताना याला हे काय सुचते आहे? आश्रमात शिक्षण घेतलेल्या मुलाकडून मी काही तर अपेक्षा ठेवीन ना? आणि तो...शी लग्न करून राहिलेला नाही, पैशाशी लग्न करून राहिलेला आहे. आज देशावर हे जे संकट आलेले आहे ते दूर करण्याकरिता सत्य, अहिंसा, प्रेम, आणि सेवा यांच्या माध्यमातून प्रत्येक आश्रमवासीने आपल्या कौशल्याचा उपयोग करून देशात ऐक्य स्थापित करण्याची इच्छा असली पाहिजे इतकी अपेक्षा तर मी प्रत्येक आश्रमवासीकडून करू शकतो ना? परंतु मी कालच लिहिले आहे आता मी एकटाच आहे. आणि त्याचे मला लवलेशही दुःख नाही. यातही मला ईश्वराचा शुभ हेतूच दिसतो. अशा प्रकारे माझ्या विचारात किंचितही माघार न घेता ‘करेंगे या मरेंगे’चा संकल्प, ‘एकला जानेरे . . .’ या गुरुदेवांच्या कथनानुसार पूर्ण होईलच हा विश्वास माझ्या मनात दिवसेंदिवस दृढ होत चालला आहे. . . .”

सकाळी ३.३० वाजता बापूजींनी वरील गोष्ट अतिशय गंभीरपणे सांगितली. प्रार्थनेनंतर टपाल पाहिला आणि लिहवूनही घेतला. एका पत्रात लिहिले,

> “मला तुझे लांब पत्र मिळाले. आज प्रार्थनेत मी त्याचे उत्तर देईन. मला लांब पत्र वाचण्याकरितासुद्धा वेळ नाही, आणि लिहिण्याकरिता तर अजूनच नाही. परंतु मी तुझा संपूर्ण युक्तिवाद वाचला. तू जर मनाला लावून घेणार नसशील तर त्यांतील काही सांगतो. तू मला मुलापेक्षाही जास्त असल्यामुळे काय योग्य आहे हे सांगणे माझे कर्तव्य आहे. अनेक लोक वाद घालण्यात स्वतःची हुशारी समजतात व

स्वतःला बुद्धिमान मानतात. परंतु वाद घालणारांना वेळ, काळ, स्थान आणि परिस्थितीचे भान राहत नाही आणि त्याला अखेरीस समाजात स्थान राहत नाही. ही गोष्ट तू लक्षात ठेव. माझी प्रकृती चांगली आहे. अग्निज्वालेत पडलो आहे. तसे तर भारताच्या प्रचंड शहरातील प्रासादात मी राहतो आहे. परंतु या थंडीच्या दिवसात निरागस मुले आणि हजारोच्या संख्येत आलेल्या भगिनी यांचे काय हाल होत असेल? अंतःकरण जळते परंतु रडत नाही. अखेरीस इथेच करायचे वा मरायचे आहे. ईश्वराने कमीतकमी माझी ही प्रार्थना तरी ऐकावी!

"माझी सेवा करण्याकरिता तुझी इथे येण्याची इच्छा आहे. परंतु तू काय करशील? ज्या व्यक्तीला माझी सेवा करण्याची इच्छा असेल तिने माझ्या या प्रार्थनेत सामील व्हावे आणि ती जिथे कुठे असेल तिथे ही भातृभावना पसरवण्याचा प्रयत्न करावा. सकाळच्या प्रार्थनेनंतर लगेच मनूकडून हे पत्र लिहून घेण्याला मी सुरुवात केली आहे. माझे बंगाली पाठ व्यवस्थित सुरू आहेत."

*     *     *

दुसऱ्या एका पत्रात लिहायला लावले,

"माझी खात्री आहे, माझा विश्वास आहे की माझ्या संकल्पनेप्रमाणे निसर्गोपचाराचा उपयोग केला तर खेड्यापाड्यातील करोडो लोकांना त्याचा फार मोठा लाभ होईल. उदाहरणार्थ एखादा ग्रामीण क्ष-किरण चिकित्सा करण्याकरिता गेला तर त्या गरीब माणसाला शहराकडे वा जिथेकुठे वीज आहे तिथे धाव घ्यावी लागेल. आणि यात त्याचा आणि त्याच्या कुटुंबाचा पैसा खर्च होईल. याऐवजी दररोज सकाळी त्याच्या गावात उगवणाऱ्या सूर्यदेवाच्या असीम कृपेची मदत त्याने का घेऊ नये? याला पाणी, आहार, माती आणि आजूबाजूच्या वातावरणाची व

कुलदेवतेच्या जपाची जोड द्या. या सर्व गोष्टींचा असाध्य रोगावरसुद्धा चिकाटीने उपचार केला तर एक पैसाही खर्च न करता तो आजार निघून जाईल याबद्दल मला शंका नाही.”

* * *

एका भगिनीला - . . . तीन मुली झाल्यानंतर एक मुलगा झाल्यामुळे ती खूप खुश झाली आणि रुग्णालयातूनच पत्र लिहून ‘बाबा’करिता (बाळाकरिता) आशीर्वाद मागितले. तिला उत्तरात लिहिले,

“तुझ्यासारख्या एका स्त्रीनेसुद्धा पुत्र आणि पुत्री यांच्यांत भेद केला पाहिजे काय? माझा अनुभव असा आहे की आईवडिलांची सेवा करण्याकरिता मुली जितक्या तत्पर असतात तितकी तत्परता भाग्यानेच मुलांमध्ये आढळते. तुझ्यासारख्या समंजस स्त्रीमध्येसुद्धा स्त्रीजातीबद्दल इतका तिटकारा? तुझ्या सर्व मुलांना अर्थातच माझे आशीर्वाद आहेत. तुझी चारही मुले आपली सर्व शक्ती देशाच्या प्रगतीकरिता लावो.”

५.२५ वाजता झोप येऊ लागल्यामुळे बापूजींचा तोल जाऊ लागला. यामुळे ते झोपले. फिरत असताना सोबत राजंद्रबाबूजी होते. ते रोज सकाळी फिरायच्या वेळी येतच असतात. काश्मीसंबंधीची चर्चा करून गेले. आम्हांला तर हिंदुस्थानबरोबरच राहायचे आहे असे शेख अब्दुल्ला तर गाजावाजा करत सांगत आहेत. सरदारदादाना यात फारसे काही विश्वासार्ह आहे असे वाटत नाही. संपूर्ण मंत्रिमंडळाचे या मुद्द्यावर दोन भाग पडले आहेत. वगैरे.

मालीश, आंघोळ वगैरे नियमानुसार. न्हाणीघरात हजामत सुरू होती आणि बापूजींना गाढ झोप लागली होती. हजामत संपेपर्यंत त्यांना जाग आलीच नाही. जवळपास १५ मिनिट असे चालले. जाग आल्यानंतर बापूजीं म्हणाले,

“हजामत कधी पूर्ण झाली ते तर मला कळलेच नाही. भेटायला आलेल्या बाहेर वाट पाहत बसलेल्या लोकांना ताटकळत बसावे लागू नये म्हणून तू मला ताबडतोब जागे करायला पाहिजे होते.”

मी म्हणाले, “तुम्हाला ज्या प्रमाणे अंथरुणात झोप लागल्यानंतर तुमचे नाक वाजू लागते त्याप्रमाणे नाक वाजत होते. तुम्ही इतके काही थकलेले होता की मला तुम्हाला उठवण्याची हिंमतच झाली नाही.”

बापूजी म्हणाले, ”खरे सांगायचे तर अशा प्रकारच्या झोपेमुळेच मी जिवंत राहिलो आहे ही गोष्ट अगदी खरी आहे. माझ्या झोपेत जेव्हापासून व्यत्यय येऊ लागले आहेत तेव्हापासून वाटते की माझे दिवस संपत आले आहेत.”

आंघोळीनंतर होरॅस अलेक्झांडर आले. थोड्याच वेळात ते गेले. १०.५५ला लोहिया आणि नेपाळमधील काँग्रेसी आले. त्यांच्याबरोबर बोलत असताना बापूजी म्हणाले, “आपले लक्ष केवळ देशहिताकडे असले पाहिजे. भाऊभाऊ अशा प्रकारे जर आपसात मारामाऱ्या करणार असतील तर असे वातावरण नियंत्रणात ठेवणे प्रत्येक समंजस पुढाऱ्याचे कर्तव्य आहे. अर्थात तुमच्या ‘वादामुळे’ म्हणा की ’पक्षांमुळे’ म्हणा माझे किती हाल होतात हे मी सांगू शकत नाही. परंतु माझे थोडे जर ऐकणार असाल तर मी इतके सांगायची हिंमत करीन की, किमान दिल्लीत तरी सर्वांमध्ये अंतःकरणापासूनचे मैत्रीचे वातावरण असले पाहिजे. आणि तुमच्यात ते निर्माण करण्याचे कौशल्य आहे म्हणूनच इतके सांगायचे मी धैर्य करतो आहे. राजकीय विचारात तुमच्यात आणि काँग्रेसमध्ये जे मतभेद आहेत ते मी समजू शकतो. परंतु मारामाऱ्या थांबवण्यात आणि सामाजिक सेवा

करण्यात तर मतभेद असूच शकत नाहीत. यामुळे आपण व्यक्तिगत टीका करणे तरी बद करायला पाहिजे.”

लोहियाजींनी बापूजींचा सल्ला सहर्ष स्वीकारला आणि आजपासून त्या सर्वांनी शांततेच्या कार्यात स्वतःला झोकून द्यायचे ठरवले. कलकत्त्याच्या सांप्रदायिक भांडणातही त्यांनी खूप काम केले होते. जाता जाता लोहियाजी मला म्हणाले, “बापूजींकडे कोणताही जरी माणूस आला आणि बापूजींनी प्रेमाने त्याला काही काम सोपवले तर त्याच्या हृदयाला पाझर फुटल्याशिवाय राहत नाही.”

१.५५ला माती घेत असताना श्री आणि श्रीमती अहमद, हिंदुस्तान टाईम्सचे व्यंगचित्रकार आणि इतर काही बंधू आले. श्री अहमदला बापूजी म्हणाले, “तुमच्याबरोबर यांची (व्यंगचित्रकारांची) भेट कुठे ठरली होती? मी तर या वर्तमानपत्रवाल्यापासून दूरच राहाणे पसंत करत असतो.”

पहिले व्यंगचित्रकार लगेच प्रत्युत्तर देत म्हणाले, “तुम्हीसुद्धा तर एक वर्तमानपत्रवालेच आहा ना? अशा प्रकारे तर तुम्ही आम्हा सर्वांचे वडीलधारे आहा.”

बापूजी विनोद करत म्हणाले, “वाद इथेच आहे, वडील तर सर्व मानतात, पण वडिलांचे ऐकायला कोणीही तयार नाही.”

भेटीकरिता आलेल्याने बापूंनी केलेल्या सेवेबद्दल कृतार्थता व्यक्त केली आणि या स्वराज्याचे परिवर्तन सुराज्यात करण्याकरिता ईश्वर तुम्हाला दीर्घायुष्य देवो असेही तो म्हणाला.

बापूजी म्हणाले, “स्वराज्य आणणारा मी कोण? करोडो लोकांच्या मेहनतीने आणि हजारोंच्या बलिदानाने हे स्वराज्य आले आहे. आणि या देहाकडून ईश्वराला जे काम घ्यायचे असेल ते तो घेईल.”

३.१० वाजता पंडितजी आणि गनीभाई आले. दीडेक तास बसले. हे गेल्यानंतर भेटायाला येणारांचे येणे सुरूच होते. विशेष महत्त्वाचे असे काहीही झाले नाही.

प्रार्थनासभेत कुराणमधील एका आयतीबद्दल एका बंधूने आक्षेप घेतला. यामुळे बापूजी म्हणाले,

"एका निर्वासिताचे मला दुःखाने भरलेले एक पत्र आले आहे. हे पत्र क्रोधाने भरलेले आहे. हे पत्रलेखक बंधू इथे हजर आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. या गृहस्थांवर संकट कोसळले आहे इतके मात्र निश्चित दिसते. परंतु मी कोणावर चिडू? आणि त्याचा फायदा तरी काय? आजकाय मी दररोज हिंदूंच्या तसेच मुसलमानांच्या दुःखाने भरलेल्या कहाण्या ऐकत असतो आणि त्यामुळे मी खूप व्यथित होत असतो. त्याचा आघात मी अनुभवत असतो. परंतु इथेच जर मी डोक्याला हात लावून बसलो तर माझी अहिंसा लाजिरवाणी होईल. दिवसभर जर मी रडत बसलो तर माझ्याकडून कोणतेही काम होणार नाही. आणि संस्कृतमधील एका वाक्प्रचारानुसार मी माझे हृदय कुसुमापेक्षाही कोमल आणि वज्राहूनही कठोर करण्याचा प्रयत्न करत असतो. 'जर कोणी प्रार्थनेवर आक्षेप घेतला तर मी प्रार्थना करणार नाही' असे जे मी आश्वासन दिले होते त्याचा मी भंग केला आहे असा आक्षेप हे पत्र लिहिणाऱ्या भाईंनी माझ्यावर घेतला आहे. हे एक अर्धसत्य आहे. पूर्ण असत्यापेक्षाही अर्धसत्य वाईट असते असे म्हणतात. महिन्यांपूर्वी मी जेव्हा भंगीनिवासात राहत होतो तेव्हा प्रार्थनेसंबंधी वाद उपस्थित करून एक जण मौठ्या श्रोतृसमुदायाला त्रास देतो आहे असे मी म्हणालो होतो. परंतु आता श्रोतृसमुदायात एक प्रकारची शिस्त आलेली आहे. श्रोत्यांनी मला खात्रीपूर्वक आश्वासत सांगितले की वाद उपस्थित करणारावर आम्ही मुळीच चिडणार नाही. यामुळे मी प्रार्थना सुरू ठेवली पाहिजे. शिवाय इथे येणे कोणाचेही कर्तव्य नाही. ज्यांना प्रार्थना पसंत नसेल

त्यांनी येऊ नये. परंतु अशा प्रकारे एखाद्या सभेत जाऊन तिथे गोंधळ घालणे योग्य समजले जाऊ शकत नाही."

इतके सांगितल्यानंतर आधीच्या बंधूने आपली चूक कबूल केली. यामुळे प्रार्थना सुरू करण्यात आली. प्रार्थनेनंतर या बंधूंचे आभार मानत बापूजीं म्हणाले,

"जो माणूस आपली चूक दुरुस्त करतो तो आपल्या स्वतःच्या जीवनात नेहमीच पुढे जात असतो. या भाईला माझे म्हणणे पटले याचा मला आनंद होतो आणि त्यांनी शांततापूर्वक प्रार्थना होऊ दिली याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजे.

"मला पत्र लिहिणाऱ्या एका बंधूने मला टोमणा मारत मी पाकिस्तानमध्ये का जात नाही असे मला विचारले आहे. हिंदूंना आणि शिखांना मदत करण्याऐवजी येथील मुसलमानांना मदत करण्याकरिता मी इथे थांबलो आहे असा त्यांनी आरोप केला आहे.

"या बंधूंना माहीत नाही की मी जोपर्यंत दिल्लीला लागलेली आग विझवण्याचे कर्तव्य पूर्ण करणे सोडून पाकिस्तानमध्ये धावपळ करत कसा जाऊ शकतो? मी जसा हिंदूंचा आणि शिखांचा मित्र आहे तसाच मुसलमानांचासुद्धा मित्र आहे. मी कोणत्याही एकाच जमातीची सेवा केली पाहिजे असे माझे मत नाही. मी संपूर्ण मानवची सेवा करतो व मी मानवतेचा मित्र आहे असा माझा दावा आहे. दिल्लीतून मला जर पाकिस्तानमध्ये पाठवायचे असेल ते पाठवणे हिंदू, शीख आणि इथे आलेले निर्वासित या सगळ्यावर अवलंबून आहे. हे सर्व जर मैत्रभावना ठेवतील तर माझी आजच पाकिस्तानमध्ये जाण्याची तयारी आहे, आणि असे असेल तरच पाकिस्तानमध्ये जाण्याला काही अर्थ आहे.

"याशिवाय या बंधूंना कस्तुरबा निधीतून निर्वासितांकरिता किती निधी उपयोगात आणला गेला हे जाणून घेण्याची इच्छा आहे. पहिली गोष्ट तर ही आहे की

या निधीची उभारणी हिंदुस्थानातील गावखेड्यांमधील स्त्रियांची आणि मुलांची काळजीपूर्वक सेवा करण्याकरिता करण्यात आली आहे. आणि या निधीकरिता एक विश्वस्तमंडळ असून ते खूप सावधगिरीने काम करत असते. त्याचे सचिव ठक्करबापा आहेत. ज्याला या निधीचा हिशेब हवा असेल तो या निधीच्या कार्यलयात जाऊन ते पाहू शकतो. निर्वासितांकरिता देशांमधून कांबळी आणि पैसा येत असल्यामुळे त्यांच्याकरिता हा निधी वापरण्याची आवश्यकता नाही.

"पाकिस्तानमध्ये डुक्कर मारायला मनाई आहे तर हिंदुस्थानातही गोवधबंदी व्हायला पाहिजे अशी शेवटची तक्रार आहे. पाकिस्तानमध्ये कायद्याने जर डुक्करवधबंदी केली असेल तर ही गोष्ट भयंकर समजायला पाहिजे. इस्लाम धर्माप्रमाणे त्यांना डुकराचे मांस खाण्याची मनाई आहे. परंतु मुसलमनेतरांकरिता वा जे जे मांसाहारी आहेत त्यांच्यावर डुकारच्या मांसाबद्ल कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नाही. यामुळे ते सरकार जर कोणत्याही प्रकारचा मनाईहुकूम लादणार असेल तर तो अन्यायी असेल. यामुळे हिंदुस्थान सरकारसुद्धा बळजबरीने हिंदू नसलेल्या लोकांवर आपला धर्म लादू शकत नाही. असे होणार नाही अशी आशा मी करतो. हिंदुस्थानकडून जग किती मोठ्या अपेक्षा करते आहे? जगात चोहोकडे घनघोर काळोखाचे आणि अशांततेचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यातून प्रकाश आणि खरा मार्ग अशी अपेक्षा हिंदुस्थानकडून सर्व लोक करत आहेत.

"गोभक्त म्हणून वा गोपुजारी म्हणून मी कोणापेक्षाही कमी नाही असा माझा दावा आहे. गोभक्ती कायद्याने थोडीच निर्माण करता येऊ शकते? बंधुभाव आणि प्रेमभाव विकसित करूनच भक्तीचे वातावरण निर्माण करता येऊ शकते. गुजराती आणि मारवाडी स्वतःला गोभक्त समजतात हे खरे असले तरी ते गायीबैलांना किती क्रूरपणाने वागवत असतात हे मी पाहिलेले आहे. संपूर्ण जगातील गायींपेक्षा

हिंदुस्थानातील गायी कमी दूध देतात. बैलांपासून जिवापलीकडचे काम घेतात. याला मी एक प्रकारची कत्तलच समजतो. हिंदुस्थानातील मुसलमानांबद्दल बंधुभावाची भावना निर्माण केली आणि मुसलमानांना जर गायीची उपयोगिता समजावून सांगितली तर मुसलमान गोवध करणार नाही याबद्दल माझी खात्री आहे."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. फिरत असताना विशेष कोणी बरोबर नव्हता. आम्ही सर्व मुलेच होतो. अशा प्रकारे बापूजींच्या अवतिभवती जर मुलेमुली असले तर त्यांचा संपूर्ण दिवसाचा थकवा बराचसा कमी होतो. फिरल्यानंतर त्यांनी प्रवचन लिहिले. औंधच्या महाराणीसाहेब आल्या आहेत. बापूजींना भेटायलाच आल्या आहेत. ८.४५वाजता सुधीरबाबू. त्यांच्याबद्दल आलेल्या तक्रारी बापूजींनी त्यांना सांगितल्या. त्यांनी विशेष असे कोणतेही उत्तर दिले नाही. ९.३०नंतर व्यायाम केला आणि झोपले.

* * * * *

# १. वृत्तपत्रांना वक्तव्य

नवी दिल्ली,

सप्टेंबर ९, १९४७

माणूस योजतो एक आणि देव घडवतो वेगळेच याचा इतरांप्रमाणेच मलाही अनुभव आलेला आहे. गेल्या रविवारी मी कलकत्ता सोडले तेव्हा दिल्लीतील घटनांची मला काहीही माहिती नव्हती. परंतु इथे आल्यानंतर मी दिवसभर दिल्लीच्या दुःखद हकिगती ऐकतो आहे. मला अनेक मुसलमान मित्र भेटले आणि त्यांनी मला त्यांच्या करुण कहाण्या सांगितल्या. जोवर दिल्ली शांत होत नाही तोवर मी पंजाबला जाऊ नये हे मी दिवसभर ऐकत आहे.

येथील तापलेले वातावरण शांत करण्याकरिता शक्य ते अल्पसे का होईना मी प्रयत्न केले पाहिजे. भारताच्या राजधानीतही करा वा मरा या माझ्या जुन्याच सूत्राचा मी अवलंब करणार आहे. दिल्लीवासीयांना सुरू असलेला मूर्खपणाचा हा विध्वंस नको आहे हे जाहीर करणे शक्य होत असल्याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. पश्चिम पंजाबमधून दुर्दैवाने ज्यांना बाहेर पडणे भाग पडले त्या शरणार्थ्यांचा राग समजून घेण्याची माझी तयारी आहे. परंतु राग म्हणजे वेडाचा लहानसा प्रकारच असतो. बदला हा उपाय नसतो. त्यामुळे मुळातील विकार अजून बळावतो. याकरिता निरर्थक खून जाळपोळ आणि लूटमार करण्यात जे लोक गुंतले आहेत त्या सर्वांनी हे प्रकार थांबवावे असे माझे त्यांना सांगणे आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीची घोषणा होऊन कारभार सांभाळायला केंद्रीय सरकारला उणापुरा एक महिनाच झालेला असला तरी त्यात संघराज्यातील अतिशय कार्यक्षम, धैर्यशाली आणि स्वार्थत्यागी लोक आहेत. त्यांना आपले घर स्थिरस्थावर करून लावण्याकरिता वेळ न देणे हे आत्महत्या करण्यासारखे आहे. अन्नधान्याच्या टंचाईची मला पूर्ण जाणीव आहे.

जमावशाही प्रत्येक गोष्ट विस्कळीत करत आहे आणि त्यामुळे अन्यधान्याचे वाटप अजूनच अशक्यप्राय होत आहे. भांबावलेल्या दिल्लीत ईश्वर परत शांतता प्रस्थापित करो.

मी कलकत्ता सोडत असताना त्याने मला दिलेल्या अभिवचनाची तो परिपूर्ती करील ही आशाच मला अवतीभवतीच्या वेडातही टिकवून ठेवते आहे हे सांगून मी हे वक्तव्य संपवतो.

हरिजन, सप्टेंबर २१, १९४७

--------------------

# २. पी. सी. जोशी यांच्याशी चर्चा

(सप्टेंबर ९, १९४७नंतर)

(गांधीजी दिल्लीत सप्टेंबर ९, १९४७ला आले होते.तिथे ही मुलाखत झाली होती.)

पी. सी जोशींच्या (भारतीय साम्यवादी पक्षाचे महासचिव) प्रश्नाचे उत्तर देत गांधीजी म्हणाले -

पहिली गोष्ट म्हणजे या संभाषणाचा वृत्तांत कोणत्याही वृत्तपत्राला देऊ नये. मला काही लपवायचे आहे म्हणून नाही तर आपल्या उद्दिष्टाला त्याची मदत होणार नाही म्हणून. माझ्याकरिता परिस्थिती गोंधळाची आहे. मला माझ्या जीवनात असा प्रसंग आठवत नाही - आणि हे जीवन पूर्णपणे संघर्षमय होते - की जेव्हा मला इतके गोंधळल्यासारखे वाटत होते. आपण खालच्या जातीचे आहो असे संघराज्यातील मुसलमानांना वाटावे ही गोष्ट आपल्याकरिता लाजिरवाणी आहे. इथे कोणत्याही माणसाला आपण खालच्या जातीचे आहो असे वाटता कामा नये. आजच असे आहे काय? नाही. डॉ. किचलूंना (डॉ. सैफुद्दिन किचलू) आपले घर सोडावे लागले असे मी आजच ऐकले. त्यांना स्वतःच्या घरात राहता येऊ नये आणि काश्मीरला निघून जावे लागावे ही भयावह परस्थिती आहे. आम्ही हे बदल्याच्या भावनेने करतो आहे आणि तेही पशूप्रमाणे असे संघराज्यातील कोणीही म्हणणे आपल्याला परवडणारे नाही हे तुमचे म्हणणे मला पूर्णपणे मान्य आहे. पाकिस्तानच्या मार्गाचे अनुसरण करून आपण स्वतःचे अधःपतन करून घेऊ नये. कोणत्या का प्रकाराने होईना मला इतके असहाय वाटले नव्हते जसे मला आज वाटते आहे. तुम्ही म्हणता की सर्व लोकशाहीवादी शक्तींना गतिमान करा व त्यांना कूच करण्याचा आदेश द्या. परंतु मला सैन्य नसलेल्या सेनापतीप्रमाणे वाटते. मी आगेकूच करायचा आदेश कुणाला देऊ?

**जोशी - हे खरे नाही. सेनापतीमध्येच आत्मविश्वास नाही. ते सैन्याला पाचारणच करत नाहीत. दिल्लीपेक्षा कलकत्त्याची परिस्थिती शंभर पटीने वाईट होती.**

गां. - तुम्हाला कलकत्त्याची गोष्ट माहीत नाही. असे वाटते की तिथे एका रात्रीतून परिवर्तन झाले. तुम्हाला माहीत असल्याप्रमाणे त्या रात्री तो प्रसंग घडला नसता तर असे घडले नसते. तुम्हाला माझ्यावरील हल्ल्याची सविस्तर माहिती आहेच. त्यांनी आपल्या डोळ्यांनी माझे वर्तन पाहिले. त्याने वाऱ्याची दिशा बदलली. मुसलमान मन तयार होते. व्यापारी मन दंगलीला थकलेले होते आणि आपण काहीही केले तरी त्याचा परिणाम उलटाच होतो असे खोडसाळपणा करणारांच्या लक्षात आले होते. तशा कृत्यापासून परावृत्त होणे त्यांना भाग होते.

दक्षिण आफ्रिकेत युरापीय लोकांच्या मनात एकाएकी जसे परिवर्तन झाले होते तसेच हे होते. विनाचौकशी मला मारण्याकरिता हल्ला करण्यात आला होता. मी त्या दिवशी मारलाच गेलो असतो परंतु पोलीस अधीक्षकांच्या समयसूचकतेमुळे मी वाचलो होतो. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांना मी दिलेल्या मुलाखतीबरोबर जेव्हा सर्व काही बाहेर आले तेव्हा युरोपीय लोकांना लाज वाटू लागली आणि वातावरण बदलले. (पाहा वसाहत मंत्र्यांना निवेदन, मार्च, १५, १९८७) इथेही असे काही घडले तर माझ्या कार्यात यश येईल. परंतु असे घडणार नाही अशी मला भीती वाटते.

**जोशी - नाही. ते धडा शिकले आहेत. म्हाताऱ्याने निघून जावे असे त्यांना वाटते आणि मग ते दुसरी पाळी खेळू शकतील.**

गां. - हो, तुम्हाला हे माहीत आहे. म्हणूनच दिल्लीत मी 'करा वा मरा'ची शपथ घेतली आहे.

**जोशी - तुम्ही राष्ट्र घडवले आहे. तुम्ही त्याला पुढे न्यायला पाहिजे. आदेश द्या.**

गां. - मी ते घडवले आणि मी ते मोडलेसुद्धा. मी अजून तुमचे कौशल्य आत्मसात केलेले नाही. माझ्यात तुमच्यासारखा आश्चर्यकारक आत्मविश्वास नाही आणि मला त्याचा खेदही नाही. ज्याकरिता माझी पात्रता आहे त्याकरिता मला घ्या हे माझे साधे म्हणणे आहे. मला कोणीही शत्रू नाही. यामुळेच माझ्याशी मतभेद असूनही साम्यवादी माझ्याकडे येतात.

ते नोआखालीतसुद्धा आले होते. मी त्यांना ५ मिनिटे दिली होती. परंतु मग मी त्यांना एक तास दिला आणि परत येण्याकरिता सांगितले. तुम्ही कोणत्या धातूपासून बनलेला आहा हे मला माहीत आहे. तुमच्यापैकी बहुतेक तरुण आहेत. तुमच्याकडून जे घेणे शक्य असेल ते मी घेईन.

**जोशी - असे म्हणू नका.**

गां. - मी जे बोलतो तोच माझा अर्थ असतो. मी योग्य वेळेची वाट पाहतो आहे. मी अतीशय धीराचा माणूस आहे. माझ्या धैर्याची पराकोटीची परीक्षा होत आहे. माझ्या संपर्कात राहा. कुमारमंगलम मला अनेकदा भेटतात. तसेच डॉ. महमूदचा मुलगा हबीबही. तो फार चांगला तरुण गृहस्थ आहे. आपल्या आईवडिलांना संकोच वाटेल असे तो काहीही करत नाही. तो त्यांच्या मार्गात कधीही आडवा येत नाही, परंतु आपले काम करत राहतो. आणि तो किती शूर आहे? माझ्याकडे जे येतात त्यांच्या संपर्कात मी नेहमी राहतो. मला माहीत आहे की तुमच्याजवळ काही फार चांगले लोक आहेत. तुमच्याजवळ स्वतःचा स्वार्थ साधण्याची इच्छा असणारे अगदी कमी प्रतीचे लोक असतील तर तुम्ही अशा पक्षाचे नेतृत्व करू शकत नाही.

मसुद्याच्या टिपणांवरून, प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशिला नाय्यर

-----------------

# ३. प्रार्थनाप्रवचन

(गांधीजी हिंदुस्तानीत ३५ मिनिट बोलले व हे भाषण ध्वनिमुद्रित करून रात्री १० वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात आले.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर १०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी जेव्हा शहादराला पोहोचलो तेव्हा माझे स्वागत करण्याकरिता सरदार पटेल, राजकुमारी अमृत कौर आणि इतर लोक तिथे हजर होते. परंतु सरदारांच्या ओठांवर मला नेहमीचे स्मित दिसले नाही. त्यांचा विनोदी स्वभाव हरवला होता. गाडीतून उतरल्यानंतर मला पोलीस दलातील काही लोक आणि इतर लोकही तसेच दुःखी दिसले. नेहमी हर्षोल्हासात असलेल्या दिल्ली शहराचे रूपांतर एकदम मृतांच्या शहरात कसे झाले? दुसरेही आश्चर्य माझी वाट पाहत होते. मी नेहमी ज्या हरिजन कॉलनीत राहत असतो व जिथे राहण्याचा मला आनंद होत असतो तिथे मला न नेता प्रासादतुल्य बिर्ला भवनात नेण्यात आले. याचे कारण ऐकून मला फार दुःख झाले. असे असले तरी ज्या घरात मी आधी अनेकदा राहिलो होतो तिथे राहणार असल्याबद्दल मला आनंदच झाला. हरिजन कॉलनीतील वाल्मिकी मित्रांबरोबर मी राहो की बिर्ला भवनात राहो मी बिर्ला बंधूंचा पाहुणा असतो. मी जरी हरिजन कॉलनीत असलो तरी त्यांचे लोक भक्तिभावाने माझी परिपूर्ण काळजी घेतात. हे काम सरदारांकडे नसते. भंगी कॉलनीत माझी काळजी घ्यावी लागावी इतके दुर्बल ते कधीही नव्हते. नवी दिल्ली कमेटीच्या दुर्लक्षामुळे एखाद्या टोपलीत मासे भरावे तसे भंग्यांना त्यांच्या घरात कोंबण्यात आले आहे. ते राहतात तशाच घरात मी राहू शकत नसलो तरी हरिजनांमध्ये राहत असताना मी नेहमी खुश असतो.

मला बिर्ला भवनात आणण्यात आले कारण भंगी कॉलनीत निर्वासितांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांची गरज माझ्यापेक्षा किती तरी मोठी आहे. परंतु या देशात निर्वासितांची समस्या निर्माण व्हावी ही गोष्ट एक राष्ट्र म्हणून आपल्याकरिता लाजिरवाणी नाही काय? पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांच्यासह कायदे आझम जिना आणि इतर पाकिस्तानी पुढारी या सर्वांनी घोषित केले होते की भारतीय संघराज्यात तसेच पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याक समुदायांना तीच वागणूक मिळेल जी बहुसंख्याकांना मिळते. या सार्वभौम राष्ट्रांमधील पुढाऱ्यांनी केलेली घोषणा जागतिक लोकमत खुष करण्याकरिता होती की त्यांच्या शब्दांत आणि वर्तनात कोणतेही अंतर नाही व आपल्या वचनाची परिपूर्ती करण्याकरिता प्रसंगी आपल्या प्राणांचीही आहुती देण्याची तयारी असण्याचा त्यांचा हेतू होता? असे असेल तर मी विचारेन की हिंदू, शीख आणि स्वाभिमानी अमिल व त्यांच्या मित्रांना पाकिस्तान सोडणे का भाग पडले? क्वेट्टा, नबाबशाह आणि कराचीत काय झाले? पश्चिम पंजाबमधून शोककारक घटनांचे आलेले वृत्तांत हृदयविदारक आहेत. भारतीय संघराज्य आणि पाकिस्तानचे पुढारी निराशेने मान हालवून हे सर्व गुंडांचे काम आहे असे म्हणू शकत नाहीत. आपल्या देशातील लोकांच्या प्रत्येक कृत्याची जबाबदारी स्वीकारणे हे सार्वभौम राष्ट्रांचे कर्तव्य असते - कारण सांगत बसणे नाही तर करणे अथवा मरणे असते. साम्राज्यशाहीचे चिरडणारे ओझे निघून गेलेले असल्यामुळे आता त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर कोणीही कशाचीही बळजबरी करू शकत नाही. आज ते हवे तसे करू शकतात. परंतु त्यांना प्रामाणिकपणे जगाला तोंड द्यायचे असेल तर या दोन्ही सार्वभौम राष्ट्रांमध्ये 'स्वातंत्र्य म्हणजे अराजक' असे समजले जाऊ नये. दिल्लीच्या लोकांची आणि इथे राहणाऱ्या निर्वासितांची या देशाच्या कायद्याचे स्वच्छेने पालन करण्याची इच्छा नाही संघराज्याचे मंत्री आपली दिवाळखोरी घोषित करून निर्लज्जपणे असे म्हणतील काय की दिल्लीच्या लोकांची आणि इथे राहणाऱ्या

निर्वासितांची स्वच्छेने या देशाच्या कायद्याचे पालन करण्याची इच्छा नाही? माझ्याबद्दल बोलायचे तर या वेडासमोर शरणागती पत्करण्यापेक्षा मंत्र्यांनी त्याच्याशी लढण्यात आपले प्राण पणाला लावले पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे.

इतकेच नाही तर ज्या घरात मी राहत आहे तिथे फळे आणि भाज्या उपलब्ध नाहीत. काही मुसलमानांनी काही गोळीबार केल्यामुळे भाजी बाजारात भाज्यांचा पुरवठा होणे बंद झाले ही लाजरवाणी गोष्ट नाही काय? शहराचा मी दौरा करत असताना निर्वासितांना त्यांचे रेशन मिळत नसल्याची तक्रार मी ऐकली. आणि जे काही त्यांना पुरवण्यात येते ते माणसाने खाण्यासारखे नाही. याची जबाबदारी जर सरकारवर असेल तर ती तितकीच निर्वासितांवरही आहे कारण त्यांनी आवश्यक सेवासुद्धा बंद पाडल्या आहेत. अशा प्रकारचे वर्तन करून ते स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहेत हे त्यांच्या का लक्षात येत नाही? आपल्या सर्व समस्या सरकार सोडवील अशा विश्वास जर त्यांनी सरकारवर ठेवला असता व कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांप्रमाणे ते वागले असते तर त्यांच्या बहुतेक समस्या सुटल्या असत्या हे मला माहीत आहे आणि त्यांनाही माहीत असायला पाहिजे होते.

मी हुमायून कबरीजवळील मिओच्या छावणीला भेट दिली होती. मला सांगण्यात आले की त्यांना अलवर आणि भरतपूर या संस्थानांमधून बाहेर काढण्यात आले आहे. ते म्हणाले की मुसलमान मित्रांनी आमच्याकरिता जे पाठवले ते वगळता आमच्याजवळ खाण्याकरिता काहीही नाही. मला माहीत आहे की मिओ हे सहज भडकणारे लोक आहेत व ते भरपूर उपद्रव करू शकतात. परंतु त्यांना त्यांच्या मनाविरुद्ध पाकिस्तानमध्ये हाकलणे हा त्यावरील उपाय नाही. खरा उपाय त्यांना माणूस म्हणून वागणूक देणे आहे व इतर विकारांवर आपण उपाययोजना करतो त्याप्रमाणे त्यांच्यातील दोषांवर उपाययोजना केली पाहिजे.

नंतर मी जामिया मिलियात गेलो. ती संस्था उभारण्याकरिता मी भरपूर हातभार लावला होता. डॉ. झाकीर हुसेन हे माझे प्रिय मित्र आहेत. त्यांनी अतिशय दुःखी अंतःकरणाने आपले अनुभव सांगितले. परंतु त्यांच्या अंतःकरणात कटुता नाही. नुकताच त्यांना जालंदरला भेट द्यावी लागली होती. शीख कॅप्टन आणि हिंदू रेल्वे अधिकारी हे त्यांच्या मदतीला वेळीच धावून गेले नसते तर ते मुसलमान असल्यामुळे शिखांनी रागाच्या भरात त्यांना मारून टाकले असते. आपले अनुभव मला सांगत असताना डॉ. झाकीर हुसेन यांनी त्या लोकांचे आभार मानले. ज्या राष्ट्रीय संस्थेत अनेक हिंदू शिकले त्या संस्थेवर हल्ला होण्याची आज त्यांना भीती वाटते. जामिया मिलीयाच्या कंपौंडमध्ये कसा तरी आश्रय मिळालेल्या निर्वासितांना मी भेटलो. त्यानंतर मी दिवाण हॉल, वेव्हेल कॅन्टीन आणि किंग्ज वे येथे गेलो. तिथे मी शीख आणि हिंदू निर्वासितांना भेटलो. पंजाबची मी मागे जी सेवा केली होती ते ती विसरले नव्हते. परंतु या सर्व छावण्यांमध्ये मला काही संतप्त चेहरे दिसत होते. त्या लोकांना क्षमा करता येऊ शकते. हिंदूंशी कठोरपणे वागल्याबद्दल ते माझ्याशी चिडून धारदार आवाजात बोलत होते. ते म्हणाले की त्यांना जशा प्रकारच्या हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले तसे मला लागलेले नाही आणि मला माझ्या जवळच्या नातेवाईकांना गमावावे लागले नाही. ते म्हणाले की मला दारोदारी भीक मागावी लागली नाही. देशातील राजधानीत शांतता प्रस्थापित करण्याकरिता मी थांबलो आहे असे म्हणून तुम्ही समाधानात कसे बसू शकता असा प्रश्न त्यांनी मला विचारला. हे खरे आहे की मरण पावलेल्यांना मी परत आणू शकत नाही. परंतु मृत्यू ही सर्व जिवंत प्राणिमात्रांना - माणसे आणि पशूपक्षी - ईश्वराने दिलेली देणगी आहे. अंतर केवळ वेळ आणि पद्धतीत आहे. यामुळे ज्या मार्गामुळे जीवन सुंदर आणि जगण्यालायक होईल अशा योग्य वर्तनाच्या मार्गाचे अनुसरण करणे हाच खरा मार्ग आहे. आज एक शीख मित्र मला म्हणाला की मी जन्माने शीख आहे खरा परंतु गुरूग्रंथसाहेबाच्या दृष्टिकोनातून खरा शीख असल्याचा दावा मी करू शकत नाही.

तुम्हांला खरा शीख माहीत आहे काय असे मी त्यांना विचारले. त्यांना तसा एकही दाखवता आला नाही. त्यानंतर नम्रपणाने मी त्यांना म्हणालो की खरा शीख असल्याचा माझा दावा आहे. ग्रंथसाहेबमध्ये सांगितलेले असल्याप्रमाणे मी जगण्याचा प्रयत्न करतो आहे. एक वेळ अशी होती की नानकाना साहेबमध्ये माझे वर्णन शिखांचा खरा मित्र असे करण्यात आले होते. गुरू नानक यांनी हिंदू आणि मुसलमान यांच्यात भेद केला नव्हता. त्यांच्याकरिता संपूर्ण विश्व एक होते. माझा सनातन धर्मही असाच आहे. खरा हिंदू असल्यामुळे मी खरा मुसलमान असल्याचाही माझा दावा आहे. मी नेहमीच मुसलमानांची महान प्रार्थना म्हणत असतो जिच्यात ईश्वर एक आहे आणि तो रात्रंदिवस या संपूर्ण विश्वाचे रक्षण करतो असे म्हटलेले आहे.

मला निर्वासितांना सांगायचे आहे की तुम्ही सत्याचरण करा आणि निर्भय होऊन राहा. तुम्ही बदल्याच्या वा तिरस्काराच्या भावनेला थारा देऊ नका. तुम्ही रागाच्या भरात अविचाराने, आवेगाने कृती करून अतिशय कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याचे सोन्याचे सफरचंद फेकून देऊ नका.

प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २९४-९८

-----------------

## ४. सावधान

सरकारने आणि त्याच्या सचिवालयांनी काळजी घेतली नाही तर इंग्रजी भाषा हिंदुस्तानीची जागा बळकावण्याची शक्यता आहे. यामुळे करोडो भारतीयांची हानी होणार आहे कारण त्यांना इंग्रजी कधीही कळू शकणार नाही. प्रांतिक सरकारांना असा कर्मचारी वर्ग मिळणे निश्चितच सोपे होऊ शकेल जो त्या प्रांताच्या भाषेत आणि आंतर प्रांतीय भाषेत सर्व प्रकारचे कामकाज करू शकेल. अशी आंतरप्रांतीय भाषा माझ्या मते केवळ नागरी वा उर्दू लिपीत लिहिली जाणारी हिंदुस्तानीच असू शकते.

हा आवश्यक बदल करण्यात एकेका दिवसाचा जरी उशीर झाला तरी त्यामुळे किती तरी सांस्कृतिक हानी होणार आहे. पहिली आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारताला वरदानाच्या स्वरूपात मिळालेल्या या प्रांतिक भाषांना आपण पुनर्जिवित केले पाहिजे. आपल्या न्यायालयांमध्ये, शाळांमध्ये आणि इतकेच नाही तर सचिवालयात हा बदल घडवून आणण्याकरिता काही वेळ, शक्य आहे की काही वर्षे लागतील असा युक्तिवाद करणे हे मानसिक शैथिल्याच्या लक्षणाशिवाय इतर काहीही नाही. यात काही संशय नाही की जोपर्यंत भाषेच्या आधारावर प्रांतांची पुनर्रचना होत नाही तोपर्यंत मुंबई, मद्राससारख्या बहुभाषिक प्रांतांमध्ये थोडीशी अडचण जाणवेल. प्रांतिक सरकारे अशी पद्धत विकसित करू शकतात की ज्यामुळे त्या प्रांतातील लोकांना आपण खरोखरच स्वतंत्र आहो असे वाटले पाहिजे. केंद्राने हा प्रश्न सोडवण्याची वाट न पाहता प्रांतिक सरकार आंतरप्रांतीय बोलण्याची भाषा म्हणून नागरी वा उर्दू लिपीत लिहिल्या जाणाऱ्या हिंदुस्तानीचा वा नागरी लिपीत लिहिल्या जाणाऱ्या केवळ हिंदीचा उपयोग करू शकतात. यामुळे आवश्यक सुधारणा करण्याकरिता प्रांतिक सरकारांनी थांबण्याची आवश्यकता नाही. यामुळे आवश्यक सुधारणा करण्याकरिता त्यांनी वेळ लावू नये. भाषेसंबंधी एक अनावश्यक वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा भारतात घुसू शकते. असे झाले

तर ती कायमची लाजिरवाणी गोष्ट होईल. सर्व सरकारी कार्यालयात प्रांतिक भाषांमध्ये कारभार सुरू करणे हा त्याकरिता करावयाचा पहिला उपाय आहे. असे झाले तर लगेच आंतरप्रांतीय व्यवहाराकरिता आंतरप्रांतीय भाषा उपयोगात येऊ लागतील. प्रांतांना केंद्रांशी व्यवहार करावा लागतो. त्यांनी हे काम इंग्रजीतून करण्याचे साहस करू नये. केंद्र जर पुरेसे सुज्ञ असेल तर त्याच्या लगेच लक्षात येईल की हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या भारतीयांच्या सोयीकरिता, जे संपूर्ण भारताकरिता सहजसाध्य असलेली भाषा आपल्या आळशीपणामुळे शिकू इच्छित नाहीत, संपूर्ण राष्ट्रावर सांस्कृतिक ओझे टाकू नये. कोणत्याही पक्षाला वा भागाला न डिवचता ही गोष्ट करता येऊ शकते. ज्याप्रमाणे आपण येथील सत्ता बळकावणाऱ्या इंग्रजांची सत्ता हद्दपार केली त्याचप्रमाणे येथील संस्कृती बळकावणाऱ्या इंग्रजी भाषेला हद्दपार करावे असे माझे आवाहन आहे. संपन्न इंग्रजी भाषेचे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि मुत्सद्दीपणाचे व्यवहार याकरिता कायम स्थान राहील.

------------------

# ५. शीख प्रतिनिधीमंडळाला मुलाखत

(सुरक्षिततेच्या कारणाकरिता भारत सरकारने नऊ इंचांपेक्षा मोठी किरपाण बाळगण्यावर प्रतिबंध घातला होता. शिखांच्या प्रतिनिधींनी तक्रार केली की अशा प्रकारच्या प्रतिबंधामुळे आमच्या धर्मात हस्तक्षेप होतो व याचा आधार म्हणून त्यांनी प्रिव्ही कौन्सिलचा निकाल उद्धृत केला. निकालात कितीही मोठ्या आकाराची किरपाण असली तरी किरपाणच असते असे म्हटलेले होते.)

(सप्टेंबर ११, १९४७)

('वृत्तपत्रांना वक्तव्य' या पुढील विषयात शीख मित्रांचा उल्लेख आहे तो पाहा.)

परंतु आज तर धर्माचे दर्शन मला कुठेही होत नाही. आणि ते धर्माचे प्रतीकच असेल तर त्याचा कोणताही आकार असला तरी त्यामुळे धर्मावर काहीही परिणाम होत नाही.

**गांधीजी नंतर म्हणाले की स्वतंत्र वातावरणात समाजाचा विकास होऊ शकावा म्हणून टाकलेल्या निर्बंधाविरुद्ध अशा प्रकारचे निवाडे उद्धृत करणे हे अप्रस्तुतच नाही तर अनहितकारकही असतात. शुद्धता आणि आत्मनिग्रह यांचे प्रतीक किरपाण असल्यामुळे शीख धर्माने किरपाण सोबत बाळगायला सांगितले होते. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत स्त्रिया, मुले, म्हातारे आणि अपंग यांचे रक्षण करता यावे म्हणून शीख धर्माने किरपाण वापरण्याची परवानगी दिली होती. या शस्त्राचा उपयोग स्वतःचे संरक्षण न करू शकणाऱ्या स्त्रियांविरुद्ध आणि मुलाविरुद्ध करण्याची अनुमती धर्मानुसार नाही. एवढेच नाही तर मुसलमानांविरुद्ध चालू असणाऱ्या युद्धातही दोन्ही बाजूंच्या जखमींची काळजी घेण्याचा धर्मात आदेश आहे. परंतु नंतर किरपाणचा उपयोग असमर्थनीय कारणांसाठी करण्यात आला आणि त्यामुळे तसे करणारे किरपाण धारण करण्याचा अधिकार गमावून बसले होते.**

महात्मा गांधी - अखेरचे पर्व, खंड ४, पृष्ठ १३.

-----------------

## ६. वृत्तपत्रांना वक्तव्य

नवी दिल्ली,

सप्टेंबर ११, १९४७

आज दिवसाच्या वेळी राजकुमारी अमृत कौर यांनी मला आणि डॉ. सुशिला नाय्यर यांना इर्विन रुग्णालयात नेले. तिथे त्या आपली सर्व शक्ती जातिधर्माचा विचार न करता जखमी लोकांच्या शुश्रूषेकरिता लावत आहेत. रुग्णांमध्ये मोठ्या मुश्किलीने पाचेक वर्षांचा एक मुलगा होता. तो बंदुकीच्या गोळीने जखमी झाला होता. डॉक्टर आणि परिचारिका हे सर्व अतिशय तणावाच्या वातावरणात काम करत होते. बहुतांश रुग्ण मुसलमान होते कारण हिंदू आणि शिखांना दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले होते.

राजकुमारीकडून मला कळले की निर्वासितांच्या छावणीत संडासाच्या व इतर साफसफाईच्या कामाकरिता भंगी पाठवणे जवळपास अशक्यप्राय होत आहे. कॉलरासराख्या संसर्गजन्य रोगाची साथ केव्हाही पसरू शकते. अशा प्रकारे जी काही परिस्थिती असेल तिच्यात निर्वासितांनी आपल्या स्वतःच्या शिबिरात स्वतःच संडासासहित सर्व प्रकारच्या साफसफाईचे काम केले पाहिजे तसेच रुग्णालयाच्या अधीक्षकाच्या संमतीने इतरही कामे केली पाहिजे याबद्दल माझ्या मनात संशय नाही. शारीरिक कष्टाचे काम होऊ शकत नाही अशा लोकांचा अपवाद वगळता या नियमाला कोणताही अपवाद असू शकत नाही. प्रत्येक शिबीर स्वच्छता, साधेपणा आणि मेहनत यांचा नमुना असला पाहिजे.

आज दिवसाच्या वेळी पाकिस्तानचे उच्चायुक्त मला भेटले होते. सांप्रदायिक शांततेवर मैत्रीभावावर त्यांचा अतिशय विश्वास आहे. आज शीख मित्रसुद्धा मला दोनदा भेटण्याकरिता आले होते. (पाहा यापूर्वीचा विषय) भारत सरकारने किरपाणसंबंधी काढलेल्या आदेशामुळे ते चिडलेले होते. ते पुढे म्हणाले की आमच्याविरुद्ध करण्यात

आलेले आरोप विकृत आहेत. संघराज्यात राहणाऱ्या मुसलमानांशी वा अन्य कोणाशी आमचे काहीही भांडण नाही. कायदेपालन करणारे नागरिक म्हणून आपली ओळख व्हावी म्हणून ते उत्सुक होते.

हरिजन, सप्टेंबर २१, १९४७

--------------------

# ७. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज सरहद्द प्रांतातून मला फार दुःखद बातमी (मला आणि माझ्या बायकोला संतप्त मुसलमानांपासून वाचवा अशी तार माजी मंत्री गिरधारी लाल पुरी यांच्याकडून आली होती.) कळली आहे. ही बातमी ऐकून अर्थातच मला फार वेदना झाल्या. सरहद्द प्रांतात मी भरपूर वेळ घालवलेला आहे. बादशाह खान माझ्याबरोबर होते. तिथे मी डॉ. खानसाहेबांबरोबर राहिलो होतो. मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांबरोबर माझ्या मैत्रीपूर्ण भेटीगाठी झाल्या होत्या. आणि आता हिंदू आणि शीख तिथे शांततापूर्वक राहू शकत नाहीत हे पाहून मला आश्चर्य वाटत होते. तिथे हिंदू आणि शिखांची भरपूर वस्ती आहे परंतु मुसलमानांच्या तुलनेत त्यांची संख्या कमी आहे. ते काहीही असले तरी संख्येला महत्त्व नसते. एखाद्या निरागस मुलालासुद्धा तिथे सुरक्षितपणे राहता आले पाहिजे.

मी स्वतःकरिता जसा विचार करतो तसेच मी तुम्हांला सांगत असतो की आपण संतापू नये. आपल्याला अर्थातच वेदना होतील. संकटात असलेल्या आपल्या भावंडाबद्दल आपल्याला सहानुभूती वाटली पाहिजे आणि काळजीही वाटली पाहिजे. 'माझी भावंडे मारली गेली म्हणून मीही मुसलमानांना का मारू नये' असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु माझ्याबद्दल म्हणाल तर माझ्या भावाचा खून करणाराचासुद्धा मी खून करणार नाही. असे असताना मी इतर निष्पाप लोकांचा खून केला पाहिजे काय? वाईटाशी वाईट या तत्त्वज्ञानावर माझा विश्वास नाही. जो कोणी वाईट शब्दांचा आणि वर्तनाचा उपयोग करतो तो पशू होतो, तो भानावर राहत नाही. माझ्या लहानपणाचा एक प्रसंग मी तुम्हांला सांगेन. मला वाटते की मी त्या वेळी दहाएक वर्षांचा असेन. माझा मोठा भाऊ आजारी पडला होता.

तो जवळपास वेड लागल्यासारखा झाला होता. प्रत्येकाला त्याची कीव वाटत होती. आम्ही अनेक डॉक्टरांना बोलावले परंतु तुरुंगाधिकाऱ्याला नाही आणि आम्ही त्याला तुरुंगातही पाठवले नाही. त्याला वेड लागल्यासारखे झालेले असल्यामुळे आम्ही सैनिकांनाही बोलावले नाही. माझे वडील अशा पदावर होते की त्यांची इच्छा असती तर त्याप्रमाणे ते करू शकत होते. परंतु त्यांनी असे काही करण्याचे का टाळले? अखेरीस तो त्यांचा मुलगा होता. आणि माझे वडील स्वतःच्याच मुलाला कसे मारू शकत होते? तर हे सर्व लोक माझ्या मुलाप्रमाणे आहेत, माझ्या स्वतःच्या भावाप्रमाणे आहेत. माझी तुम्हांला विनंती आहे की तुम्ही मुसमानांना शत्रू समजू नका. माझे मित्र असलेले किती तरी मुसलमान मी तुम्हांला दाखवून देऊ शकेन. आपला देश भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागला गेला आहे. केवळ इतक्याकरिता मागे राहिलेल्या मुसलमानांची कत्तल करून आपल्याला काहीही मिळणार नाही. पाकिस्तान सरकार आपले कर्तव्य विसरले आहे. पाकिस्तानचे महाराज्यपाल कायदे आझम जिनांनी अशा धोरणापासून दूर राहावे अशी मी त्यांना विनंती करीन. वृत्तपत्रांमधील वृत्तांत जर खरा असेल तर मी त्यांना सांगेन की हिंदू आणि शीख तुमची सेवा करण्याकरिता पाकिस्तानमध्ये राहिलेले आहेत. आता हिंदू आणि शिखांनी घाबरण्याचे काय कारण? ते घाबरलेले आहेत कारण त्यांना आणि त्यांच्या बायकांना मारले जाईल वा त्यांच्या बायकांचे अपहरण केले जाईल अशी भीती त्यांना वाटते. आपल्याला धोका आहे अशी भीती त्यांना वाटते म्हणून ते पळत आहेत. त्या सरकारमध्ये असे का व्हावे? लोकांना मला सांगावेसे वाटते की तुम्ही असे दानव होऊ नका. हिंदू आणि मुसलमान म्हणत असतील की पाकिस्तानमधील हिंदू आणि शीख संकटात असल्यामुळे, त्यांचा तिथे विनाश करण्यात आलेला असल्यामुळे व लक्षावधी रुपयांची मालमत्ता तिथे ठेवून त्यांना पळून यावे लागले म्हणून आम्ही स्थानिक मुसलमानांवर त्याचा वचपा काढू तर असे म्हणणे शुद्ध पशुत्वाचे होईल. पाकिस्तानच्या हिंदूंची आणि शिखाची भयानक अवस्था मी पाहिली आहे. मी

लाहोरमध्ये राहिलो आहे. तुम्हांला असे वाटते काय की मला वेदना झाल्या नाहीत? पंजाबी लोकांना झालेल्या वेदनांपेक्षा माझ्या वेदना कमी नाहीत असा माझा दावा आहे. पंजाबमधील कोणी हिंदू वा शीख आला आणि मला म्हणाला की तुमच्यापेक्षा मला होणाऱ्या वेदना अधिक तीव्र आहेत कारण मी माझा भाऊ वा मुलगी वा वडील गमावले आहे तर मी म्हणेन की तुझा भाऊ माझा भाऊ आहे, तुझी आई माझी आई आहे आणि तुझ्या अंतःकरणात जशा वेदना आहेत तशाच माझ्याही अंतःकरणात आहेत. मीसुद्धा माणूस आहे व माझा संताप होत असतो. परंतु मी माझा राग गिळतो. ते मला शक्ती देते. त्या शक्तीने मी कोणता बदला घेऊ शकतो? मी कशा प्रकारे बदला घेतला तर त्यांना आपल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप होईल व आपण भयानक अपराध केल्याची ते कबुली देतील? मुसलमानांनी पश्चिम पंजाबमध्ये काय केले ते तुम्हा सर्वांना माहीत. आहे. मुसलमान जर त्यांच्या धर्माचा विनाश करत असतील तर आपण काय करू शकतो? आपण त्यासंबंधी काय करणार आहो? मुसलमानांनी रानटीपणाचे वर्तन केले म्हणून दिल्लीतील हिंदूंनी शिखांनी आणि जे बाहेरून आले आहेत त्या सर्वांनी मुसलमानांशी रानटीपणाचे वर्तन केले पाहिजे काय?

आज मी जामा मशिदीत गेलो होतो. त्या भागात राहणारांना मी भेटलो. त्या भागातील स्त्रियांनाही मी भेटलो. तेथील काही बाया रडल्या आणि काहींनी आपली दुरावस्था दाखवण्याकरिता आपल्या मुलांनाही बाहेर आणले. मी त्यांना पश्चिम पंजाबमधील आणि सरहद्द प्रांतातील हिंदू आणि शिखांच्या व्यथा सांगितल्या पाहिजे काय? असे केल्यामुळे पंजाबच्या हिंदूंचे आणि शिखांचे दुःख किंचित तरी दूर होईल काय? पाकिस्तानमधील लोकांनी दानवीपणाचा मार्ग स्वीकारला म्हणून हिंदू आणि शिखांनीही तसेच केले. यामुळे एक दानव दुसऱ्या दानवातील दोष कसे काय पाहू शकतो? यामुळेच तुम्हा सर्वांना मला विनवणी करायची आहे की भारत आणि पाकिस्तानला वाचवा आणि

अशा प्रकारे संपूर्ण देशाला वाचवा. आपण जर अखेरपर्यंत चांगले राहिलो तर पाकिस्तानमधील मुसलमानांनाही चांगले व्हावे लागेल? हाच जगाचा नियम आहे. तो कोणीही बदलू शकत नाही. ज्या म्हाताऱ्याने धर्माचा भरपूर अभ्यास केला आहे आणि प्रत्येकाची सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे तो तुम्हांला हे सांगत आहे. माझ्या ७८-७९ वर्षांच्या आयुष्यात मला भरपूर अनुभव आला आहे. मी भारताबाहेर २० वर्षे राहिलो आहे. मी निग्रोंच्या भूमीत म्हणजे दक्षिण आफ्रिकेत राहिलो आहे परंतु मी रामायणचा त्याग कधीही केला नाही. माझ्या स्वतःच्या अनुभवाच्या प्रकाशात मी सांगतो की कोणाच्याही अपराधाची शिक्षा देण्याचे काम आपले नाही. जो आपले हित करतो त्याचे आपण हित करणे ही केवळ बनियागिरी आहे आणि असे करणारा नकली बनिया असतो. मी म्हणतो की मी स्वतःही बनिया आहे आणि मी खरा बनिया आहे. तुम्ही नकली बनिया होऊ नका. खरा माणूस तो असतो जो इतरांच्या वाईटपणाला चांगुलपणाने उत्तर देतो. हे मी माझ्या बालपणी शिकलो. मी वाईटपणाला चांगुलपणाने उत्तर देईन.

ते लोक मशिदीत अतिशय दयनीय अवस्थेत पडलेले होते. शुक्रवारी मोठ्या संख्येत मजा करण्याकरिता ते जसे गोळा होत असतात तसे ते गोळा झाले नव्हते. कलकत्ता आणि बिहार येथील मुसलमानांकरिता आणि नोआखालीतील हिंदूंकरिता मी काही तरी केले असल्याचे त्यांनी ऐकले होते. मी त्यांना भेटायला गेलो हे पाहून त्यांना बरे वाटले. स्वतःला सनातनी हिंदू म्हणवणारा आणि त्यामुळे मुसलमान, शीख, पारसी, ख्रिश्चन असण्याचाही दावा करणारा मी त्यांच्याकरिता काय करू शकेन असा विचार त्यांना पडला होता. एक आई म्हणाली की माझे मूल मरण पावले आहे आणि आता काय करावे ते मला कळत नाही. मी तिला सांगितले, “बाई ग, मी तुला काय सांगू? शक्यतो ईश्वराचे स्मरण कर. तो तुझ्यावर कृपा करील. तुझे मूल मेले म्हणून काय? प्रत्येक जण मेला तरी काय? चाकूने जरी नाही तरी शक्य आहे की कॉलराने तूसुद्धा त्याच मार्गाने जाशील. तू कायम

जगण्याकरिता आलेली नाहीस, आलेली आहेस काय? यामुळे ईश्वराचे स्मरण कर. यावर रडून तू काय मिळवणार आहेस?'

आपण आपला स्वतःचा धर्म समजून घेऊ या. आपल्या धर्माच्या प्रकाशात मी लोकांना सांगेन की हिंदूंनी उन्मादात काही करू नये हे पाहणे आपले कर्तव्य आहे आणि शिखांनी वेडाच्या भरात काही करू नये हे पाहणे आपले सगळ्यात मोठे कर्तव्य आहे. मला तुम्हांला सांगायचे आहे की ज्या सर्व मुसलमानांनी आपली घरे सोडलेली आहेत त्यांना त्यांच्या घरी परत पाठवण्यात यावे. त्यांना आताच्या आता परत पाठवण्याचे धैर्य माझ्यात नाही. परंतु या लोकांना परत त्यांच्या घरी पाठवायचे आहे हे आपल्या मनात असले पाहिजे. मुसलमानांना ज्या घरातून पळून यावे लागले तिथे त्यांना परत पाठवले जात नाही तोपर्यंत आपल्याला मनःशांती मिळू शकत नाही. एक मुद्दा मात्र विचार करण्यासारखा आहे. आज मला लोक सांगत होते की मुसलमान घरात शस्त्र ठेवतात, दारुगोळा ठेवतात, आणि मी कधीही न पाहिलेल्या मशीनगन आणि स्टेनगन ठेवतात. उदाहरणार्थ हे प्रकरण सब्जीमंडीतील आहे. प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवण्याची माझी तयारी आहे. परंतु या गोष्टीला आपण का घाबरावे? मी मुसलमानांना सांगेन आणि दिल्लीतील प्रत्येकाला सांगेन की ईश्वरसाक्षीने तुम्ही घोषित करा की पाकिस्तानमधील अपराधांकरिता इथे आम्ही कोणालाही मारण्याचे काहीही कारण नाही. आम्ही तुमचे मित्र आहो आणि आम्ही भारताचे आहो आणि अखेरपर्यंत भारताचे राहू. दिल्ली काही लहान ठिकाण नाही. ही देशाची राजधानी आहे. इथे आमची फार मोठी जामा मशीद आहे तसेच किल्लाही आहेत. हे तुम्हीही बांधले नाही आणि आम्हीही बांधले नाही. आमच्यावर राज्य करणाऱ्या मोगलांनी ते बांधले. हे भारताचे भाग झाले आहेत. आज मुसलमानांना देश सोडून निघून जाण्याकरिता सांगण्याचा अर्थ हा आहे काय की तुम्ही जामा मशिदीचा ताबा घ्याल? आणि तुमचा जर तो हेतू असेल तर त्याच्या परिणामांची तुम्हाला कल्पना आहे काय? याचा थोडा विचार करा.

आपण जामा मशिदीत राहणार आहो काय? अशा कोणत्याही प्रस्तावाशी मी सहमत होऊ शकत नाही. मुसलमानांना त्या ठिकाणाला भेट देण्याचा अधिकार असलाच पाहिजे. ती त्यांची आहे. आपल्यालासुद्धा तिचा अभिमान वाटतो. ती कलाकौशल्याने परिपूर्ण आहे. आपण ती जमीनदोस्त करणार आहो काय? असे कधीही करता येणार नाही. माझे मुसलमानांना आवाहन आहे की आम्ही भारताचे आहो व भारतीय संघराज्याशी आम्ही प्रामाणिक राहू असे मोकळेपणाने त्यांनी घोषित करावे. ते जर ईश्वरनिष्ठ असतील व भारतीय संघराज्यात राहण्याची त्यांची इच्छा असेल तर त्यांना हिंदूंशी वैर करता येणार नाही. आणि माझी इच्छा आहे की इथल्या मुसलमानांनी हिंदूंचे शत्रू झालेल्या पाकिस्तानमधील मुसलमानांना वेडेपणाचा मार्ग धरू नका असे सांगावे. 'तुम्ही जर अशा वेडेपणाच्या मार्गाने जाल तर आम्ही तुमच्याशी सहकार्य करू शकणार नाही, आम्ही संघराज्याशी निष्ठेने राहू व तिरंग्याला वंदन करू, आम्हाला सरकारच्या आदेशाचे पालन करावे लागेल' असे सांगावे. या मुसलमानांनी इतर सर्व मुसलमानांना आपली शस्त्रे परत करण्याकरिता सांगावे. शस्त्र ठेवल्याबद्दल कोणालाही शिक्षा न करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. कलकत्त्यात मी नेमके हेच केले. तिथे लोकांनी शस्त्रास्त्रांचा भरपूर साठा माझ्या स्वाधीन केला. त्यांतील बहुतेक लोक हिंदू होते. इथे मुसलमानांजवळ जर शस्त्रे असतील तर मग हिंदू काही शस्त्रे ठेवणार नाहीत काय? हिंदूंना मी सांगत आहे की तुम्ही मुळीच शस्त्र ठेवू नका. तुम्हाला जर शस्त्र ठेवायचे असेल तर तुम्ही परवाना घ्या. असे सांगतात की पंजाबमध्ये प्रत्येकाला शस्त्र ठेवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. यामुळे पंजाबचे काही भले होणार नाही. प्रत्येकाला शस्त्रे ठेवण्याचा जर अधिकार देण्यात आला तर लोक एकमेकाशी भांडून परस्परांना मारतील. सरकारला शस्त्रांची गरज असते, नागरिकांना त्यांचा काय उपयोग? शहरातील कोणीही शस्त्र ठेवू नये. मुसलमानांनी आपल्याजवळची सर्व शस्त्रे सरकारच्या सुपूर्द करावी अशी माझी इच्छा आहे. परस्परांबददलची भीती

नसावी. आपण त्यांना सांगितले पाहिजे की बाहेर काहीही झाले तरी दिल्लीतील आपण लोक भावाभावाप्रमाणे राहू. हीच गोष्ट कलकत्त्यात घडली होती आणि हिंदू-मुसलमानांनी भावाभावाप्रमाणे राहण्याकरिता सुरुवात केली होती. बिहारमधील हिंदूंनी हीच वृत्ती धारण केली होती. दिल्लीत तुम्ही अशीच परिस्थिती लगेच निर्माण केली पाहिजे. तसे झाले तर मला लगेच पंजाबमध्ये जाता येईल व दिल्लीतील मुसलमान शांततापूर्वक राहत आहेत असे तेथील लोकांना सांगता येईल. तिथे मी याचे बक्षीस मागेन. ममदोतच्या नबाबांकडून मी याचे बक्षीस मागेन. मी पूर्व पंजाबलाही जाईन. मी सर्व भागांचा असल्यामुळे मी सर्वांना सांगेन की तुम्ही वेडेपणाला शरण जायला नको.

मुसलमानांना पाकिस्तान पाहिजे होता आणि तो त्यांना मिळाला. आता ते का भांडत आहेत आणि कोणाशी भांडत आहेत? पाकिस्तान मिळाल्यामुळे आता त्यांना संपूर्ण भारतसुद्धा हवा आहे काय? असे कधीही घडणार नाही. दुर्बल हिंदूंना आणि शिखांना ते का मारत आहेत? मला त्यांना या सर्व गोष्टी सांगायच्या आहेत. मी एकटा आहे. तुम्हांला संपूर्ण सरकार मिळाले आहे. आपापल्या देशात अल्पसंख्याकांचे आम्ही संरक्षण करू असा करार दोन्ही सरकारांनी करावा. आपल्याला आपल्या देशातील अल्पसंख्याकांचे संरक्षण करावे लागेल. नाही तर आम्ही अल्पसंख्याकांचे संरक्षण करत आहो आणि इथे लहानशा मुसलमान मुलालासुद्धा कोणी इजा करू शकणार नाही वा आपल्या रक्ताळलेल्या डोळ्यांनी त्याला घाबरवू शकणार नाही असे जवाहरलाल आणि सरदार पटेल कसे सांगू शकतील? जर एखादा मुसलमान असा असेल की ज्याने आपल्या घरात चोरून मशिनगन ठेवली असेल तर त्याला आम्ही शिक्षा करू. परंतु देशाबद्दल निष्ठा ठेवणाऱ्या मुसलमानांना कोणीही स्पर्श करू शकत नाही. तुम्ही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण केली पाहिजे की जवाहरलाल आणि सरदार पटेल यांना अभिमानाने म्हणता आले पाहिजे की दिल्लीने काही दिवसांकरिता जरी आपले भान हरवलेले होते तरी आता ती भानावर आली आहे. माझ्या

सर्व मुसलमान बांधवांना मी सांगू इच्छितो की त्यांनी योग्य वक्तव्य दिले पाहिजे. त्यांनी आपली अंतःकरणे अगदी आतून स्वच्छ केली पाहिजे. शिखांनी काही वक्तव्ये प्रसिद्ध केली आहेत. तसेच हिंदूंनीही. जर मन आणि अंतःकरण शुद्ध झालेले असेल तर आपण मैत्रीपूर्ण वातावरणात एकत्र राहू शकतो. अखेरीस दिल्लीतील किती तरी व्यापार, इतक्या सुंदर इमारती, येथील संस्कृती हे सर्व हिंदू आणि मुसलमानांचे आहे, कोणा एकाचे नाही.

(यानंतरचा मजकूर सप्टेंबर २१, १९४७च्या हरिजनमधून घेतला आहे.)

**थोडक्यात सांगायचे तर गांधीजी आणि डॉ. दिनशा मेहता यांच्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुरूजींशी (मा. स. गोवळलकर) झालेल्या संभाषणाचा गांधीजींनी उल्लेख केला. गांधीजींनी त्यांना सांगितले की या संघटनेचे हात रक्ताने भिजलेले आहेत. गांधीजींना आश्वस्त करत गुरुजी म्हणाले की हे खरे नाही. आमची संघटना कोणाचीही शत्रू नाही. मुसलमानांना मारण्याकरिता ती उभारलेली नाही. हिंदुस्थानचे आपल्या सर्वशक्तिनिशी रक्षण करणे इतकीच तिची इच्छा आहे. ती शांततेकरिता उभी आहे आणि तुम्ही हे प्रकाशित करा.**

(पाहा आर. एस. एसच्या मेळाव्यातील भाषण, सप्टेंबर १६, १९४७.)

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ २९८-३०५

--------------------

# ८. माझा पुतळा

(हे 'टिपणे' या शीर्षकांतर्गत.मूळ गुजरातीत हरिजनबंधूत, सप्टेंबर २१, १९४७लाप्रकाशित झाले होते.)

१० लाख रुपये खर्च करून सार्वजनिक जागेवर माझा पुतळा उभारण्याची चर्चा मुंबईत सुरू आहे. जणू काय या उधळपट्टी करणाऱ्या प्रस्तावाकरिता मी जबाबदार आहे अशा प्रकारे या प्रस्तावावर टीका करणारी आणि काही तर अतिशय कठोरपणे टीका करणारी पत्रे मला आली आहेत ! तिळाचा ताड करणे हा माणसाचा बहुधा स्वभावच आहे. केवळ सुज्ञच कुटारातून दाणे वेगळे काढतात. सध्याच्या परिस्थितीत टीकेकरिता आधार आहे असे दिसते. मी सांगितलेच पाहिजे की मला फोटो काढण्याचासुद्धा तिटकारा आहे आणि तरीही माझे फोटो घेतले जातात. कलाकारांना मी कितीदा तरी मला मॉडेल बनवू दिले आहे. ही विसंगती जरी सोडली तरी लोकांना विशेषेकरून जेव्हा पुरेसे अन्नवस्त्र मिळू शकत नाही तेव्हा माझा पुतळा तयार करण्याकरिता खर्च केला जाण्याच्या प्रस्तावाला मी जोरदार विरोध केला पाहिजे. सुंदर मुंबईत भरपूर अस्वच्छतेचे राज्य आहे. तिथे किती तरी गर्दी झालेली आहे. टोपलीत मासे गच्च भरावे तसे लोक भरलेले आहेत. काही सार्वजनिक उपयोगितेची गोष्ट करण्याकरिता या दहा लाख रुपयांचा उपयोग केला जाऊ शकतो. तो माझा सर्वोत्तम पुतळा होईल. अशा प्रकारे सुज्ञपणाने खर्च केलेल्या पैशाचा चांगला परतावा मिळू शकेल. कल्पना करा की हा पैसा अधिक धान्य पिकवण्याकरिता खर्च करण्यात आला तर आपल्याला किती तोंडांत घास भरता येईल!

नवी दिल्ली, सप्टेंबर १३, १९४७.

हरिजन सप्टेंबर १९४७

----------------

## ९. वालजी गो. देसाई यांना पत्र

सप्टेंबर १३, १९४७

चि. वालजी,

प्राचार्य थडाणी हे नियमित भेट देणारांपैकी आहेत. माझ्या सूचनेनुसार महाभारताच्या अर्थाविषयी त्यांनी तुला एक दीर्घ पत्र रजिस्टर्ड पोस्टाने पाठवले आहे. त्याला बरेच दिवस झाले. ते तुला मिळाले असेल तर कृपाकरून त्याचे उत्तर दे. माझी गाडी जंगलात अडकली आहे.

आशीर्वाद

बापू

प्रा. वालजी गो. देसाई,

गणेशवाडी, पुणे ४.

गुजराती फोटोप्रतीवरून, सी. डब्ल्यू. ७५०४, सौजन्य वालजी जी. देसाई.

---------------

# १०. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर १३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

खूप दिवसांपूर्वी, बहुधा १९१५मध्ये मी जेव्हा दिल्लीत आलो होतो तेव्हा वडीलधारे म्हणून मी हकीम साहेब (अजमल खान) आणि डॉ. अन्सारी यांना भेटलो होतो. दिल्लीवर इंग्रजांची सत्ता नाही तर हकीम साहेबांची सत्ता आहे असे तेव्हा मला सांगण्यात आले होते. डॉ. अन्सारी हे वडीलधारे गृहस्थ होते तसेच ते फार चांगले शल्यचिकित्सक आणि डॉक्टर होते. ते हकीम साहेबांनाही ओळखत होते व त्यांच्याबद्दल त्यांना फार आदर वाटत होता. हकीम साहेबसुद्धा मुसलमान होते आणि ते मोठे विद्वान व हकीमही होते. ते युनानी हकीम होते परंतु त्यांनी आयुर्वेदाचाही चांगला अभ्यास केला होता. हजारो मुसलमान आणि हजारो गरीब हिंदू त्यांच्याकडे औषधोपचाराकरिता जात असत. हकीम साहेबांशी माझी जी काही ओळख होती त्यावरून मी सांगू शकतो की ते पैशाची फिकीर करत नव्हते. ज्या कोणाला गरज असेल त्याची सेवा करण्यात त्यांना रस होता. आणि ते एखाद्या राजाप्रमाणे होते. त्यांचे पूर्वज चीनमध्ये राहत होते. ते चीनमधील मुसलमान होते आणि अंतर्बाह्य सद्गृहस्थ होते. शहरात तुमचा नेता कोण आहे असे मी माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक हिंदूला विचारले. ते श्रद्धानंदजी (महात्मा मुंशीराम. ते या नावाने ओळखले जात असत.) होते काय? श्रद्धानंदजी त्यांच्यात भरपूर काम करत असत. परंतु नाही, त्यांचे नेते हकीम साहेब होते. का? कारण ते हिंदू आणि मुसलमान या दोघांचीही सेवा करत होते. असो, १९१५ साली जशी परिस्थिती होती तशी मी सांगितली आहे. परंतु नंतर आमच्या संबंधात जवळीक निर्माण झाली व मी त्यांना अधिक जवळून ओळखू लागलो. अन्सारींनासुद्धा मी अधिक चांगला ओळखू

लागलो. अन्सारींबरोबर मी बरेचदा राहिलो आहे. मी त्यांची मुलगी झोअरा आणि जावई शौकत खान (डॉ. शौकतउल्ला खान) या दोघांनाही ओळखतो. ते सर्व फार चांगले लोक आहेत आणि ते इथे दिल्लीतच राहतात. परंतु काही हिंदू आपल्याला मारून टाकतील की काय अशी भीती त्यांना वाटते. ते स्वतःच्या घरात राहत नाहीत. ते हॉटेलमध्ये राहायला गेले आहेत. ते वाचले हा केवळ योगायोग आहे. त्यांचा पहारेकरी हिंदू होता. त्याने दंगलखोरांना हाकलले. मुसलमानांनी घाबरावे इतका हिंदू आणि शिखांमध्ये उन्मत्तपणा का यावा? मागे वळून माझ्यावर लालभडक डोळे वटारत अनेक हिंदू संतप्त होऊन मला म्हणत असतात की 'तुम्ही बंगाल आणि बिहारमध्ये दूर होता. एकदा पंजाबमध्ये या आणि हिंदूंची आणि शिखांची झालेली दुरावस्था पाहा आणि तेथील मुलींची अवस्था पाहा.' परंतु या दोन्ही गोष्टी मी एकाच पातळीवर ठेवू इच्छितो. काहीही झाले तरी तिथे अत्याचार घडलेले आहेत. परंतु एक भाऊ जर वेडाच्या भरात लोकांना मारू लागला तर त्याच्याप्रमाणे मीही लोकांना मारायला पाहिजे काय? ते कसे शक्य आहे? मी खरा हिंदू आणि सनातनी हिंदू असल्याचा माझा दावा आहे. नेमके याच कारणामुळे मी मुसलमानही आहे, पारसी आहे, ख्रिश्चन आहे आणि ज्यूसुद्धा आहे. माझ्याकरिता या सर्व एकाच झाडाच्या शाखा आहेत. या शाखांमधील कोणत्या शाखा मी राहू द्याव्या आणि कोणत्या तोडून टाकाव्या? मी कोणत्या फांदीची पाने तोडावी आणि कोणत्या फांदीकडे दुर्लक्ष करावे? माझ्याकरिता सर्व समान आहेत. मी हा असा घडलो आहे. याबद्दल मी काय करू शकतो? प्रत्येकजण जर माझ्यासारखा विचार करू लागला तर जगात पूर्णपणे शांतता नांदेल.

आज मी पुराना किल्ल्यात गेलो होतो. तिथे मी हजारो मुसलमानांना पाहिले. मुसलमानांनी भरलेले दुसरे काही ट्रक किल्ल्याकडे येत होते. ते सर्व मुसलमान शरणार्थी होते. त्यांना किल्ल्यात आश्रय का घ्यावा लागला? ते कोणाला घाबरलेले होते? ते तुम्हांला घाबरलेले होते की मला? मला माहीत आहे की मी कोणालाही घाबरवत नाही. परंतु माझी

भावंडे, जे स्वतःला हिंदू आणि शीख म्हणवतात, त्यांना घाबरवत आहेत. परंतु त्यांनी त्यांना घाबरवले याचा अर्थ मी त्यांना घाबरवले, तुम्ही त्यांना घाबरवले. अशा प्रकारे घाबरून पाकिस्तानमध्ये त्यांना पळून जावे लागावे हे मी पाहू शकत नाही. पाकिस्तानमध्ये स्वर्ग आहे आणि इथे नरक आहे असे काही नाही. आपण अशा नरकात का साप़डलो आहो? मला माहीत आहे की ना तर पाकिस्तान नरक आहे आणि ना भारत. आपली इच्छा असली तर आपण त्यांचे स्वर्गात रूपांतर करू शकतो वा आपल्या कृत्यामुळे ते नरकही होऊ शकतात. आणि दोन्ही देश जर नरक झाले तर स्वतंत्र माणसाला तिथे कोणतेही स्थान नसेल. यानंतर आपल्या नशिबी केवळ गुलामगिरी असेल. हा विचार माझ्या अंतःकरणाला व्यथित करत आहे. माझे हृदय थरथरत आहे आणि एखाद्या हिंदूला वा मुसलमानाला वा शिखाला मी हे सर्व कसे समजावून सांगू असा मला प्रश्न पडतो. किल्ल्यातील फार थोडे मुसलमान संतापलेले होते परंतु इतरांनी त्यांना थांबवले. त्यांच्या अंतःकरणात प्रेम होते. आपल्या संतप्त भावांना ते सांगत होते, ‘हा म्हातारा आपली सेवा करण्याकरिता आला आहे, आपले अश्रू पुसण्याकरिता आला आहे. आपण उपाशी आहो आणि आपल्याकरिता कुठे भाकरी मिळते काय हे पाहण्याकरिता हा आला आहे. आपण पाण्याशिवाय आहो आणि आपल्याकरिता कुठून पाणी मिळू शकते काय हे पाहण्याकरिता हा आला आहे.’ तिथे त्यांना अन्नपाणी मिळेल की नाही हे मला माहीत नाही. काहींनी मला सांगतले की आमच्याकरिता इथे अन्नपाणी काहीही नाही. मी ते शोधण्याकरिता तिथे गेलो. तिथे काही लोक माझ्याशी अतिशय प्रेमाने बोलले. मला बरे वाटले. कोणालाही आपले घर वा संपत्ती माघारी टाकून देऊन जावेसे वाटत नसते. हिंदू निर्वासितांचीही अशीच अवस्था आहे. तेही आपले घर आणि संपत्ती माघारी टाकून आले आहेत. काही मरण पावले, ही काही सुखद परिस्थिती नाही. प्रत्येकाकरिता ही लाजिरवाणी परिस्थिती आहे. मी त्यांचीही समजून घालण्याचा प्रयत्न करत होतो. तुमच्या माध्यमातून सर्वांशी बोलण्याची माझी इच्छा असली

तरी माझे ऐकतो कोण? असे म्हणतात की महाभारत काळात पांडवांना पुराना किल्ल्यात राहावे लागले होते. याला तुम्ही इंद्रप्रस्थ म्हणा की दिल्ली म्हणा इथेच हिंदू आणि मुसलमान सोबतसोबत वाढले आहेत. ही मोगलांची राजधानी होती. आता ही भारताची राजधानी आहे. मोगल राजघराण्याचा आता कोणीही वारस शिल्लक नाही. मोगल बाहेरून आले होते. परंतु दिल्लीचे रीतीरिवाज आणि परंपरा यांच्याशी ते एकरून झाले होते. त्यांच्यातीलच काही अन्सारी साहेब झाले, काही हकीम साहेब झाले आणि काही हिंदूही झाले. हिंदूसुद्धा त्यांच्याकडे नोकरी करू लागले. अशा या तुमच्या दिल्लीत हिंदूमुसलमान शांततपूर्वक राहत होते. अधूनमधून ते भांडतही होते. परंतु ते थोड्या दिवसांकरिता भांडायचे आणि नंतर परत एक व्हायचे. एका प्रसंगी कोणा माथेफिरूने श्रद्धानंदजींवर प्राणघातक हल्ला केला. परंतु त्याआधी मुसलमानांनी अतिशय प्रेमाने श्रद्धानंदजींना जुम्मा मशिदीत नेले होते व तिथे मुसलमानांना त्यांनी संबोधित केले होते. तुमची दिल्ली ही अशी आहे.

परंतु आज काय सुरू आहे? सरदार नेहमी ताठ मानेने चालत असत परंतु मी तुम्हांला सांगतो की आता त्यांना खाली मान घालून चालावे लागते. आणि जवाहरलाल, तो शूर आणि धाडसी जवाहरलाल हवेतून उडत होता तो आज असहाय होऊन बसला आहे. एक व्यक्ती वेड लागल्याप्रमाणे वागत असेल तर तिला दुरुस्त करता येऊ शकते. परंतु सर्वच जेव्हा अशा प्रकारे वागू लागतात तेव्हा त्यांना कोण दुरुस्त करू शकेल? अखेरीस जवाहरलाल काही देव नाही. आणि सरदारसुद्धा देव नाही. आणि त्यांच्या इतर मंत्र्यांमध्येही दैवी शक्ती नाही. त्यांना बाहेरून कुठून मदतही मिळत नाही.

मी हीच गोष्ट प्रत्येकाला सांगत असतो. अनेक हिंदू आणि मुसलमान माझ्याकडे येतात. माझी त्यांच्याशी बरीच चर्चा झाली आहे. परंतु अखेरीस माझा आवाज ईश्वराला शरण जातो. त्याने मला या जगातून घेऊन जावे वा दिल्लीतील लोकांना समंजसपणा द्यावा

म्हणून मी त्याला प्रार्थत असतो. एकाही हिंदूच्या वा शिखाच्या मनात मुसलमानांबद्दल रागाचे विचार नसावे. लोक मला सांगतात की मुसलमान पंचमस्तंभीय म्हणजे देशद्रोही आहेत, सध्याच्या सरकारविषयी त्यांच्या मनात निष्ठा नाही. भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत. जर साडेचार कोटी मुसलमान देशद्रोही असतील तर कोणाची हानी होणार आहे? त्यांची स्वतःचीच हानी होईल. अशा प्रकारे वागून ते इस्लामचे दफन करतील. परंतु हिंदू आणि शिखांचे ते नुकसान करू शकणार नाहीत. परंतु त्या साडेचार कोटी मुसलमानांना तुम्ही त्रास देऊ नये. एक तर तुम्ही मरण्याकरिता तयार व्हा वा पाकिस्तानमध्ये जा असे तुम्ही त्यांना सांगणे योग्य नाही. त्यांनी का जावे? आणि कोणाच्या संरक्षणाखाली? मी तुम्हांला सांगतो की ते तुमच्या आणि माझ्या संरक्षणाखाली आहेत. किमान माझी तरी ते दृश्य पाहण्याची तयारी नाही. मी ईश्वराला प्रार्थना करीन की तसे होण्यापूर्वी त्याने मला घेऊन जावे. त्याने मला भरपूर दिवस जिवंत ठेवले आहे. ७८-७९ वर्षांचे जीवन काही लहान नाही. मी पूर्ण समाधानी आहे. माझ्या सर्व क्षमतेनुसार मी सेवा केली आहे. ईश्वराला जर मला जिवंत ठेवायचे असेल तर त्याने माझ्याकडून मला आवडेल तसे काम करून घ्यावे. दोन्ही संप्रदायांचा मी मित्र आहे असे मला त्यांनी सागायला पाहिजे. यामुळेच ते माझे ऐकतात व पुढेही ऐकत राहतील. मी फार कमी मुसलमानांना भेटलेलो आहे. मग सर्व मुसलमान देशद्रोही आहेत व ते माझा विश्वासघात करत आहेत असे मी कसे म्हणू शकतो? मी तुम्हांला सांगतो की ते जरी माझा विश्वासघात करत असतील तरी त्यामुळे त्यांना काहीही मदत होणार नाही. मला मान्य आहे की मुसलमानांजवळ भरपूर शस्त्रे आहेत. त्यांच्याजवळील काही शस्त्रे मी परत घेतली आहेत आणि काही अजूनही त्यांच्याजवळ आहेत. परंतु त्यांच्याजवळील शस्त्राने ते काय करतील? ते मला मारणार आहेत काय? ते तुम्हांला मारणार आहेत काय? जर ते तसे करतील तर ते पाहण्याकरिता सरकार आहे. मी तुम्हांला सांगून ठेवतो की आपण जर चांगले झालो व आपण चांगले

वर्तन केले तर आपल्याला न्याय मिळेल हे सरकार निश्चितच पाहील. सरकारांना परस्परांशी भांडू द्या. आपण मित्र राहू या. ते आपल्याला मारून टाकतील अशी भीती आपण बाळगू नये. माणूस कितीही शक्तिशाली असला तरी ईश्वर जर आपल्याला वाचवणार असेल तर तो आपल्याला मारू शकणार नाही. यामुळेच हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही मला सांगायचे आहे की तुम्ही भीती टाकून द्या. कायदे आझमनी केलेले विधान मला आवडले नाही. ते म्हणाले की मुसलमानांना पाकिस्तानमध्ये आश्रय देण्यात आला कारण संघ राज्यात त्यांचा छळ होत होता. त्यांचे म्हणणे आहे की तिथे त्यांच्याकरिता अन्न आणि राहण्याकरिता जमीन असली पाहिजे. ते म्हणतात की पाकिस्तान गरीब देश आहे व यामुळे ज्यांच्याजवळ पैसा असेल त्यांनी तो तिथे पाठवावा. (या अधिकृत मुलाखतीकरिता पाहा पुरवणी “मौऊंटबॅटन यांना मुलाखत, सप्टेंबर १४ आणि १६, १९४७”) मला त्याबद्दल मुळीच तक्रार करायची नाही. परंतु त्याचबरोबर पश्चिम पंजाबमध्ये हिंदूंचे काय झाले हे ते का सांगत नाहीत? बिहारने काही वाईट काम केले आहे हे खरे असले तरी त्याने त्याबद्दल पश्चात्तापही व्यक्त केला आहे. कलकत्त्यात हिंदू माझ्याकडे आले आणि त्यांनी पश्चात्ताप व्यक्त केला. मुसलमानांनीही जर असेच केले व आम्ही चुकलो अशी ते कबुली देत असतील तर ते फार चांगले होईल. मी माझ्या डोळ्यांनी सर्व काही पाहिले आहे आणि त्याच्याकडे मी डोळेझाक कसा काय करू शकतो? आणि हिंदूंनी केलेले अपराधही मी झाकू शकत नाही. मला सर्व धर्मांशी प्रामाणिक राहायचे आहे. मी ना तर ईश्वराचा विश्वासघात करू शकतो ना माणसाचा. मी सर्वांशी निष्ठावंत राहू इच्छितो.

आमच्यातील सर्व माणसे इतके वाईट नाहीत असे घोषित करणे हे मुसलमानांच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे असे मी काल म्हणालो होतो. (पाहा प्रार्थना प्रवचन सप्टेंबर १, १९४७) आम्ही भारताशी एकनिष्ठ राहू आणि भारताकरिता सर्व जगाशी लढण्याची आमची तयारी असेल असे त्यांनी म्हणायला पाहिजे. तसे केले तरच ते खरे मुसलमान ठरतील. भारतात असे

वाईट मुसलमान नाहीत अशी मी आशा करतो. आणि जर असे काही असतील तर त्यांना चांगले करण्याकरिता आपल्याला चांगले व्हावे लागेल, वाईट नाही.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३०५-१०

------------------

## ११. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कालप्रमाणेच आजही मी आपल्या मुसलमान शरणार्थी बांधवांना भेटायला गेलो होतो. शिबिरात पाहिली तशा प्रकारची घाण मी इतरत्र कुठेही पाहिली नाही. मी हिंदूंच्या (निर्वासित) छावण्यात गेलो आहे आणि मुसलमानांच्याही छावण्यात गेलो आहे. हिंदूंची छावणी वेगळ्या ठिकाणी आहे. मुसलमानांच्या छावणीत इतका घाणेरडा वास येत होता की ते ते ठिकाण स्वच्छ का करत नाहीत याचे मला आश्चर्य वाटू लागले. माझ्याकडे जर या शिबिराची जबाबदारी असती तर मी हे सहन केले नसते. मी छावण्यांमध्ये राहिलेलो आहे आणि अनेक छावण्या वा शिबिरे मी पाहिलेली आहेत. आपण आपल्या छावण्या इतक्या घाणेरड्या ठेवू नये. मला अतिशय दुःख झाले. तिथे पोलिसांची आणि सैन्याची किती तरी व्यवस्था आहे आणि ते इतकी घाण आणि वास का सहन करतात? ते म्हणतील की हे ठिकाण स्वच्छ करण्याची आमची जबाबदारी नाही, आवश्यकता पडली तर शिबिरात शांतता राखण्याकरिता आणि सुव्यवस्था ठेवण्याकरिता आम्हांला केवळ गोळीबार करण्याचा आदेश आहे. ते म्हणतात की निर्वासित आपसात भांडले तर आम्ही आमच्या बंदुकांच्या मदतीने त्यांना येथून काढून टाकू. त्यांना इतकाच आदेश होता आणि आदेशात जे सांगितले होते त्याच्या पलीकडे ते जाऊ शकत नव्हते. हे सर्व ठीक आहे. परंतु ते आता आपले सैनिक आणि आपले पोलीस आहेत. माझ्या दृष्टिकोनातून त्यांच्याजवळ कुदळ आणि फावडेही असले पाहिजे. जिथे कुठे घाण आढळेल तेथील घाण त्यांनी दूर केली पाहिजे. त्यांचे मुख्य काम ठिकाणे स्वच्छ ठेवण्याचे असले पाहिजे. छावण्या चांगल्या

अवस्थेत ठेवण्याकरिता हिंदू आणि मुसलमान मित्रांनी त्या स्वतःच स्वच्छ केल्या पाहिजे. हे जर आपण त्यांना सांगितले नाही तर आपण त्यांचे शत्रू ठरू. आपण जर त्यांचे मित्र आणि सेवक असू तर आपण त्यांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे की तुम्ही इथे आला आहात म्हणून तुम्ही असहाय माणसाप्रमाणे वागला पाहिजे असे नाही. पाकिस्तानमधून हिंदू निर्वासित आले तर आपण काय त्यांना विहिरीत ढकलणार आहो? आपण त्यांना इथे ठेवून त्यांची काळजी घ्यायला नको काय? आपण त्यांना सांगितले पाहिजे की आम्ही तुम्हांला अन्नपाणी देऊ परंतु भंगी देणार नाही. मी फार कठोर हृदयी माणूस आहे.

हरिद्वारच्या कुंभमेळ्यात कुदळफावडे घेऊन मी काम केले आहे. आमच्याकडे छावणीतील स्वच्छतेसह सर्व कामे होती. तशा कामाकरिता सर्व प्रशिक्षित होते. यामुळे मी म्हणेन की  या छावण्यांचा कोणी जर व्यवस्थापक असेल, मग तो हिंदू आहे की मुसलमान याची मला फिकीर नाही, तर त्याचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे काम ही छावणी एकदम स्वच्छ ठेवणे हे असले पाहिजे. याकरिता पैसा लागत नाही. छावणीत फावडे नसतील तर सरकारने ते पुरवणे हे सरकारचे कर्तव्य आहे. सरकार जर फावडे पुरवत नसेल, सरकारला जर फावडे पुरवण्याइतका वेळ नसेल तर छावणीप्रमुखाने ते पुरवले पाहिजे. ज्याप्रमाणे छावणीतील लोकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणे सरकारचे कर्तव्य आहे त्याचप्रमाणे छावणीतील साफसफाईकडे लक्ष देणे व पिण्याचे पाणी, धुणी धुण्याकरिता पाणी पुरवणेही सरकारचे काम आहे. तिथे सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नसल्यामुळे कॉलरा पसरतो. छावणीतील साफसफाईत कधीही कमतरता असता कामा नये. ही गोष्ट मी ब्रिटिशांकडून शिकलो हे मी कबूल केलेच पाहिजे. छावणीतील साफसफाईकडे कसे लक्ष द्यावे हे मला माहीत नव्हते. हजारो लोक एकत्रित राहतात व त्यांच्यावर अशा प्रकारे कामाची जबाबदारी सोपण्यात येते की ते एकत्रितपणे साफसफाईचे वा सांगितलेले इतर कोणतेही काम करू शकतात हे मला माहीत नव्हते. सैनिक हे सर्व करू शकतात. काही

मिनिटात संपूर्ण शहर उभे राहते, राहुट्या उभ्या राहतात. सर्वात आधी जे येतात त्यांचे पहिले काम पाणी कुठे मिळेल आणि त्याच्या उपयोगाची व्यवस्था कशी करायची हे पाहायचे असते. लघ्वी व संडासातील घाण पाणी बाहेर वाहू नये म्हणून येणाऱ्या दुसऱ्या तुकडीकडे खंदक खणण्याचे काम असते. अशा व्यवस्थेमुळे तिथे कॉलरा वा आमांशाची भीती नसते. सर्व लोक आरामात राहू शकतात. मी इतर गोष्टींकडे वळणार नाही.

इथे लोक संपूर्ण गोंधळाच्या परिस्थितीत राहतात. ते सर्व इकडेतिकडे पडलेले असतात. छावणी स्वच्छ ठेवण्याची कोणालाही फिकीर नसते. मी कोणाला दोष देऊ शकतो? मुसलमानांच्या छावणीचा प्रमुख मुसलमान आहे. तो त्यांच्या लोकांना सांगू शकतो आणि त्यांच्याकडून कोणते काम अपेक्षित आहे  हे त्यांना समजावून सांगू शकतो. त्याला लोकांना समजून सांगता आले पाहिजे. त्यांना सांगितले पाहिजे की तुम्ही जर घाणीत राहाल तर तुम्ही मराल. तुमची मुलेही घाणेरडी राहू शकत नाहीत. यामुळे छावणी स्वच्छ ठेवणे ही किती तरी चांगली गोष्ट आहे. या लोकांना स्वच्छतेविषयक प्रशिक्षण दिले तर आपण किती तरी करू शकतो. तुम्ही जर हिंदूंची छावणी पाहाल तर तिथेही तुम्हांला घाण दिसेल. परंतु तरीही तिथे थोडे अंतर आहे. तिथे मी अनवाणी फिरू शकत नाही. तलावात तिथे अगदीच पाणी नव्हते. ते पूर्णपणे कोरडे होते. तिथे गटारांची व्यवस्था नव्हती. अखेरीस ना तर मुसलमान पशू आहेत, ना हिंदू. परंतु आज आपले पशूत रूपांतर झाले आहे. हिंदू आणि शीख पाकिस्तानमधून घाबरून का पळत आहेत? हिंदूनी जरी इथे अतिशय वाईट वर्तन केले असले तरी तिथे त्यांनी काहीही केले नाही. जर तिथे कोणी अपराध केला असेल तर त्याला शिक्षा करा. ही सरकारची जबाबदारी आहे. याचबरोबर मी विचारेन की येथून कुणाला पळून जाणे का भाग पडावे? ते जर मुसलमान असतील तर मुसलमान असल्यामुळे त्यांना दोष दिला पाहिजे काय? मुसलमानसुद्धा आपले आहेत आणि ते आपल्या सरकारच्या अंतर्गत आहेत. जर ते निर्वासित असतील तर दिल्लीकरता

ही गोष्ट अतिशय लाजिरवाणी आहे हे स्पष्ट आहे. इथे असलेले मुसलमान बाहेरून आलेले नाहीत. त्यांच्यातील जवळपास सर्व दिल्लीमधील विविध वस्त्यांमधून आलेले आहेत. त्यांच्यातील फारच थोडे बाहेरून आले असतील. आम्ही त्यांना दिल्लीबाहेर घालवले आहे. काल मी सांगितले होते त्याप्रमाणे मी तुम्हांला आजही सांगेन की ही गोष्ट अतिशय लज्जास्पद आहे. पाकिस्तानमधून अल्पसंख्याकांना पळून यावे लागावे हे पाकिस्तान सरकारचे अपयश आहे. तुम्ही पाकिस्तानमध्येच राहिले पाहिजे असे तिथल्या सरकारने त्यांना सांगितले पाहिजे. परंतु पाकिस्तानमधील आज परिस्थिती अशी आहे की चांगल्या लोकांनाही तिथून पळून यावे लागते. लाहोर जवळपास रिकामे झाले आहे. हिंदूंनी हे शहर बांधले आहे आणि हिंदूंनी बाधलेल्या किती तरी हवेल्या तिथे आहेत. तिथे किती तरी शैक्षणिक संस्था आहेत. इतकी महाविद्यालये अजून कुठे आढळतील? मला नेहमीच प्रत्येक चांगल्या गोष्टीचे कौतुक वाटत असते. आज ही महाविद्यालये कोणाच्या ताब्यात आहेत? या सर्व गोष्टींचे मला दुःख होते. आणि पाकिस्तान सरकार इतक्या खालच्या पाळीवर गेले याची मला लाज वाटते. आणि जेव्हा मी येथील परिस्थिती पाहतो तेव्हा मला अजूनच लाजिरवाणे होऊ लागते. आपले सरकार असूनही दिल्लीतील परिस्थिती इतकी का चिघळावी. सिंहासारखे जवाहरलाल आणि गृहमंत्री सरदार पटेलसारखे लोक असूनही परिस्थिती इतकी चिघळावी? त्यांचा अधिकार मान्य का करण्यात येऊ नये? त्यानी जर एखाद्या मुलाला वाचवण्याचा आदेश दिला असेल तर ते मूल वाचवले गेलेच पाहिजे. असे झाले तरच आपण आपले सरकार चालवू शकतो. परंतु आता त्यांच्याजवळ पोलीस आणि सैन्य आहे व यांच्या मदतीने ते शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु अखेरीस हे सरकार कोणाचे आहे? हे तुमचे सरकार आहे. तुम्ही ते घडवले आहे.

प्रत्येकजण जर आपल्या सरकारच्या आदेशांचे पालन करील तर प्रत्येक गोष्ट करता येऊ शकते. असे झाले नाही तर सध्याच्या अवस्थेकरिता जग दिल्लीची चेष्टा करील. आणि

मग युरोपीय सत्ता, मग ती सत्ता रशियाची असो, फ्रान्सची असो की ब्रिटनची असो वा अमेरिकेची असो आपल्याला हसतील आणि आपण आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकरिता असमर्थ आहो, आपण केवळ गुलाम म्हणूनच जगू शकतो असे म्हणतील. असे व्हायला नको. यामुळेच मुसलमानांना मला सांगायचे आहे की तुम्ही तुमच्याजवळील सर्व शस्त्रे भीतीमुळे नाही तर स्वतः होऊन सुपूर्द करा. तुम्हांला जर भावाभावाप्रमाणे राहायचे असेल तर तुम्ही असे करा. असे केले तरच भारताबद्दलची तुमची निष्ठा सिद्ध होईल व तुम्ही भारताचा कधीही विश्वासघात करणार नाही हे दाखवून द्याल. हिंदू असो की मुसलमान आपण सर्व भारताचे आहो. मला मुसलमानांनासुद्धा सांगायचे आहे की पश्चिम पंजाब, सरहद्द प्रांत, बलुचिस्तान आणि सिंध येथील मुसलमानांना जर वेड लागले व हिंदू आणि शीख यांना तिथे शांततेत राहणे शक्य झाले नाही तर तुमच्याकरिता इथे परिस्थिती कठीण होणार आहे. अखेरीस आपण सर्व माणूस आहो. यामुळे तुम्ही मानवता समजून घ्या. आपण किती काळ समजूत घालू शकू? माणसाला वेड लागू शकते आणि तो चांगलाही असू शकतो. तो जर नीट वागत असेल तर त्याला शांत राहू द्या. एखाद्या माणसाला वेड लागल्यामुळे तो जर श्वापद होत असेल तर मी दिल्लीच्या हिंदूंना सांगेन की तुम्ही काळजीपूर्वक राहा आणि शूर व्हा, भ्याड होऊ नका. मुसलमानांजवळ काही शस्त्रे जरी असतील तरी त्यांना घाबरणे हा भ्याडपणा आहे. कुठे तरी काही मुसलमान जरी शस्त्र बाळगत असतील तरी आपण त्याची काळजी का करायची? त्यांना निःशस्त्र करणे सरकारचे काम आहे. त्यांच्याकडील शस्त्र काढून घेणे हे सैन्याचे काम आहे. त्यांना जर हिंदूंबरोबर एकोप्याने भारतात राहायचे असेल तर त्यांनी आपल्याजवळील शस्त्रे सुपूर्द केली पाहिजे. आणि मुसलमानांनी आपली चूक कबूल केली पाहिजे. त्यांनी म्हणायला पाहिजे की आमची इच्छा दिल्ली जिंकून संपूर्ण भारताचा पाकिस्तान करण्याची होती परंतु भारताचा पाकिस्तान करणे शक्य नाही हे आता आमच्या लक्षात आले आहे. त्यांना आधीच

पाकिस्तान मिळालेला आहे व यावर त्यांनी समाधान मानायला पाहिजे. आम्ही पाकिस्तानमधील हिंदूंना वाचवू व त्यांना समाधानात ठेवू असे त्यांनी म्हणायला पाहिजे. असे झाले तर भारत आणि पाकिस्तानमध्ये चांगुलपणाकरिता स्पर्धा सुरू होईल व अधिक प्रामाणिकपणाने मानवतेला अनुसरण्याचा ते प्रयत्न करतील. आपण मक्केकडे पाहो की पूर्वेकडे सत्य आपल्या स्वतःच्या अंतःकरणातच वसत असते आणि आपले अंतःकरण निष्पाप असणे याला खरे महत्त्व आहे. आपण जर परस्परांशी चांगुलपणात स्पर्धा केली तर आपण सर्व प्रगती करून एकत्रित काम करू शकतो.

मी तुम्हांला सांगू इच्छितो की आता मी इथे आलेलो असल्यामुळे इथेच मरण्याची माझी इच्छा आहे. आपण जर वेड लागल्याप्रमाणे वागू लागलो आणि रागाच्या भरात मुसलमानांना मारू लागलो तर मला तुमच्याशी काहीही घेणेदेणे नसेल. मला अशा गोष्टींचा साक्षी व्हायचे नाही. मुसलमानांना जर असे वाटत असेल की हिंदू आणि शीख दोषी आहेत आणि हिंदू आणि शिखांना वाटत असेल की मुसलमानांचा दोष आहे तर या दोघांचाही दोष आहे. माझ्याकरिता हे सर्व समान आहेत. माझ्या दृष्टीने हिंदू आणि मुसलमान एकच आहेत. तुमच्यातील जे खरे असतील त्यांनाच ईश्वर ओळखेल. दुष्टांच्या दुर्वर्तनाकरिता शिक्षा करणारे तुम्ही कोण? ते स्वतःलाच शिक्षा करतील. मला याबद्दल काहीही संशय नाही. सर्व धर्माचा मला कळलेला सार हाच आहे. यामुळेच मी म्हणेन की मुसलमानांनी कितीही चुकीचे वर्तन केले तरी तुम्ही चांगुलपणाने वागला पाहिजे. कमीतकमी तुम्ही असे केलेले पाहण्याची मला इच्छा आहे. आपण इतके जर केले तर आपण आपल्या सरकारला चांगल्या स्वरूपात ठेवू शकतो. आणि असे झाले नाही तर आपण सर्व काही गमावू.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३११-१६

---------------------

# १२. गोरूर रामस्वामी अय्यंगार यांना पत्र

नवी दिल्ली, (सप्टेंबर १४, १४७नंतर)

(१४ तारखेला तुमकूर येथे जबाबदार शासनाच्या स्थापनेकरिता म्हैसूर कॉंग्रेस कमेटीने आयोजिलेल्या विद्यार्थ्यांच्या मिरवणुकीवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात रामचंद्र नावाचा १७ वर्षांचा मुलगा मरण पावला. )

प्रिय रामस्वामी,

तुमचा मुलगा हुतात्मा झाला आहे. (वरीलप्रमाणे) शूर मुलगा. शोक करू नका. आपल्या देशात अशा बलिदानांची गरज आहे. आपण त्यांचे अनुसरण करू या. जो जीवन अर्पण करतो तोच जगतो. हो, मला तुम्ही चांगले आठवता.

तुमचा

बापू

इंग्रजी प्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५८०. सौजन्य गोरुर रामस्वामी अय्यंगार

-----------------

# १३. प्रार्थनाप्रवचन

(गांधीजींचा आज मौनवार असल्यामुळे हे भाषण सभेत वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर १५, १९४७

रात्री मी जसजसा मनाला शांत करणाऱ्या आणि जीवनदायी वाटणाऱ्या पावसाचा आवाज ऐकत जात होतो तसतसा माझ्या मनात दिल्लीतील उघड्या छावण्यामध्ये पडून असलेल्या हजारो शरणार्थ्यांचे विचार  येत होते. पावसापासून चोहोकडून रक्षण होईल अशा ओसरीत मी झोपलो होतो. परंतु माणसाचे क्रूर हात त्याच्याच भावाविरुद्ध उठले नसते तर या हजारो माणसांना - पुरुष, स्त्रिया आणि मुलांना निवाऱ्याशिवाय उघड्यावर पडून राहावे लागले नसते आणि अनेकांना तर उपाशीपोटीही राहावे लागले नसते. काही ठिकाणी तर गुडघाभर पाणी साचले होते. त्यांना दुसरा कोणताही पर्याय नव्हता. (ही वाक्ये प्रार्थनाप्रवचन - १ पृष्ठ ३१५ वरून भाषांतरित केली आहेत.) हे सर्व अपरिहार्य होते काय? आतून जोरात आलेले उत्तर होते 'नाही'. अगदी एक महिन्याचे नवजात मूल असलेल्या स्वातंत्र्याचे हेच पहिले फळ आहे काय? या विचारांनी गत वीस तासात मला झपाटून टाकले आहे. माझे मौन हे मला मिळालेल्या वरदानासारखे आहे. यामुळे मला माझ्या अंतर्मनाचा शोध घेता आला. दिल्लीच्या नागरिकांना वेड लागले आहे काय? त्यांच्यात काहीच माणुसकी उरलेली नाही काय? देशप्रेम आणि देशाचे स्वातंत्र्य यांना त्यांच्या हृदयात काहीच स्थान उरलेले नाही काय? आधी हिंदूंवर आणि नंतर शिखांवर दोषारोप केल्याबद्दल मला क्षमा करण्यात यावी. द्वेषाच्या लोंढ्याला बांध घालण्याचे पुरसे सामर्थ्य इथल्या पुरुषांमध्ये नाही काय? मी इथल्या मुसलमानांना विनंती करीन की त्यांनी भीतीचा पूर्णपणे त्याग करावा आणि ईश्वरावर विश्वास ठेवावा व त्यांच्याजवळील ज्या शस्त्रांची हिंदूंना आणि शिखांना भीती वाटते ती सर्व शस्त्रे त्यांनी जाहीर करावी. याचा अर्थ असा नाही की हिंदू आणि शिखांजवळ शस्त्रे नाहीत. अंतर केवळ प्रमाणाचे आहे. काहींजवळ जास्त आहेत काहींजवळ कमी.

(गांधीजींचे मौन सुरू झाल्यामुळे हे वाचून दाखवण्यात आले.) अल्पसंख्याकांनी एक तर ईश्वरावर व त्याने निर्माण केलेला माणूस योग्य वर्तन करील यावर भरवसा ठेवावा आणि नाही तर ज्यांच्यावर तुमचा विश्वास नाही त्यांच्यापासून संरक्षण व्हावे म्हणून तुम्ही शस्त्रांवर विश्वास ठेवला पाहिजे.

माझा तुम्हांला लहानसा परंतु खंबीरपणाचा सल्ला आहे. त्याची अचूकता स्पष्ट आहे. तुमचे सरकार प्रत्येक नागरिकाचे गुन्हेगारापासून, मग ते कितीही शस्त्रसिद्ध असो, रक्षण करील यावर विश्वास ठेवा. यापुढे जाऊन मी म्हणेन की घरादारांना आणि संपत्तीला मुकावे लागल्यामुळे अल्पसंख्याकांचे जे नकसान झाले असेल त्या प्रत्येक प्रकरणी अल्पसंख्याकांना नुकसानभरपाई मागण्याचा अधिकार आहे. दोनपैकी एकही सरकार हे सर्व करू शकत नाही असे म्हणणे म्हणजे मृताला जिवंत करण्यासारखे होईल. दिल्लीच्या लोकांनी कायदा हातात घेतला तर पाकिस्तान सरकारकडून न्यायाची मागणी करणे कठीण होईल. न्याय मागणाराने न्याय केला पाहिजे. त्याचे हात स्वच्छ असले पाहिजे. ज्या मुसलमानांना आपले घर सोडण्याकरिता बाध्य करण्यात आले आहे त्यांना हिंदू आणि शिखांनी परत त्यांच्या घरात राहण्याकरिता बोलावले पाहिजे. तुम्ही जर हे साहसी पाऊल उचलले तर त्यामुळे निर्वासितांच्या समस्येची तीव्रता आणि जटिलता कमी होईल. आणि मग त्या गोष्टीची दखल पाकिस्तानलाच नाही तर संपूर्ण जगाला घ्यावी लागेल. तुम्ही दिल्ली आणि भारताला अपमानित होण्यापासून आणि विनाशापासून वाचवाल. करोडो हिंदू, शीख आणि मुसलमानांची अदलाबदल करण्याची कल्पनाही करवत नाही. ते चूक आहे. अदलाबदल करण्याचे खंबिरपणाने नाकारून आपण पाकिस्तानने केलेली चूक दुरुस्त करू शकतो. या बाबतीत माझा आवाज एकटा जरी पडला तरी हे बोलण्याचे धैर्य माझ्यात राहील अशी आशा आहे.

हरिजन, सप्टेंबर २८, १९४७

# १४. अमृत कौर यांना चिठ्ठी

(अमृत कौर यांच्या कागदपत्रांत हे ऑगस्ट २९, १९४७च्या तारखेत ठेवलेले होते. पाहा अमृत कौर यांना पत्र, ऑगस्ट २९, १९४७, अमृत कौर ९ सप्टेंबरला नवी दिल्लीत होत्या आणि त्या कलकत्त्यात गांधीजींना भेटू शकल्या नव्हत्या. गांधीजी ९ सप्टेंबरला दिल्लीला पोहोचले होते व त्यानंतर मौनवार १५ सप्टेंबरला येत होता.)

(सप्टेंबर १५ वा त्यानंतर) (वरीलप्रमाणे)

विद्वद्भिः सेवितः सद्भिःनित्यंद्वेषंरागिभिः

हृदयेनाभ्यनुज्ञातो यो धर्मस्तं नोबोधत ।

लक्षात ठेव की जे लोक सुज्ञ आणि चांगले असतात व जे वासना आणि द्वेषापासून मुक्त झालेले असतात ते ज्या धर्माचे पालन करतात व जो अंतःकरणाला रुचतो तो खरा धर्म असतो.

मुळावरून, सी. डब्ल्यू. ३७१०, सौजन्य अमृत कौर. शिवाय जी. एन. ६५१९.

------------------------

# १५. झहीद हुसेन यांना पत्र

सप्टेंबर १६, १९४७

प्रिय मित्र,

मला तुमचे पत्र मिळाले. तुमची सर्व शक्ती तुमच्या कर्तव्याच्या ठिकाणी लावली जाण्याची जेव्हा आवश्यकता आहे तेव्हा तुम्ही आजारी पडावे हा किती दुष्टपणा आहे? (झहीद हुसेन हे पाकिस्तानचे भारतातील उच्चायुक्त होते.) ईश्वर तुमची प्रकृती परत ठणठणीत करो. कबूल केल्याप्रमाणे त्याच दिवशी सायंकाळी मी आवाहन केले. परंतु त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

झहीद हुसेन साहेब

कॅम्प, कराची,

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

---------------------

# १६. डोरा यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर १६, ९४७

प्रिय डोरा,

वातावरण तुला मानवत नाही याबद्दल खेद होतो. मी साधा माणूस आहे. मी छपराखाली जी काही जागा देऊ शकत होतो ती मी तुला दिली होती. आता तूच तुझा मुक्काम हलवला पाहिजे. हिमालय म्हणजे भारत नाही. तो भारतात आहे. आश्रममार्ग तुझा मार्ग नाही हे माझ्या लक्षात आले. आता तुला जे योग्य वाटते ते तू केले पाहिजे. व्यवस्थापकाचा सल्ला घे आणि त्याच्यावर खटला भर. मला माफ कर.

तुझा

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

-----------------

# १७. चोईथराम गिडवाणी यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर १६, १९४७

भाई चोईथराम,

तुम्ही हे काय करताहात? लोक जर पळत असतील तर त्या सर्वांनी मुंबईतच का धाव घ्यावी? भांडण्याचासुद्धा मार्ग असतो. तुम्ही सिंधचीच बाजू का घेत आहा? विचार करा. काळ अतिशय नाजूक आहे. करा अथवा मरा ही काही केवळ घोषणा नाही, तिच्याप्रमाणे वर्तन करायचे असते.

आशीर्वाद

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

--------------------

# १८. श्री प्रकाश यांना पत्र

सप्टेंबर १६, १९४७

भाई श्री प्रकाश,

(वार्ताहर आणि शिक्षणशास्त्रज्ञ, अ. भा. कॉ. क. सदस्य १९१८-४५, पाकिस्तानमध्ये भारताचे उच्चायुक्त १९४७-४९)

सोबत मी दोन पत्रे पाठवत आहे. तुमचे काम फार कठीण आहे, याचा अर्थ आहे कृती, केवळ बोलणे नाही. सर्वात चांगल्याची आशा करणे हे तुमचे काम नसून मृत्यूपर्यंत चांगले काम करणे हे तुमचे काम आहे. सर्व मुसलमानेतर तुमच्याकडे पाहत आहेत. दोन पत्रे जोडली आहेत.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

----------------------

# १९. रा. स्व. संघाच्या मेळाव्यात भाषण

(हा मेळावा भंगी कॉलनीत भरला होता.)

गांधीजी म्हणाले की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक हेगडेवार जिवंत असताना मी वर्धा येथील संघाच्या शिबिराला भेट दिली होती. स्वर्गीय श्री जमनालालजी बजाज यांनी मला त्या शिबिरात नेले होते आणि तेथील शिस्त, अस्पृश्यतेचा संपूर्ण अभाव आणि पराकोटीचा साधेपणा पाहून मी फार प्रभावित झालो होतो. त्यानंतर संघ वाढला. कोणतीही संस्था सेवाभाव आणि स्वार्थत्यागाने प्रेरित झालेली असेल तर तिची वाढ होणे अपरिहार्य असते याबद्दल माझी खात्री आहे. परंतु खरोखर उपयोगी व्हायचे असेल तर स्वार्थत्यागाबरोबर पवित्र उद्देश आणि खरे ज्ञानही असले पाहिजे. या दोघांशिवाय केलेला स्वार्थत्याग समाजाकरिता विनाशकारक ठरतो.

सुरुवातीला म्हणण्यात आलेली प्रार्थना भारतमाता, हिंदू संस्कृती आणि हिंदू धर्म यांचे स्तवन करणारी होती. मी सनातनी हिंदू असल्याचा माझा दावा आहे. ‘सनातन’ या शब्दाचा मी धात्वर्थ घेतो. ‘हिंदू’ या शब्दाचा नेमका अर्थ कोणालाही माहीत नाही. आपल्याला हे नाव देण्यात आले आणि आपण ते स्वाभाविकपणे स्वीकारले. जगातील सर्व धर्मांमध्ये जे काही चांगले आहे ते हिंदू धर्माने आपलेसे केले आहे आणि या अर्थाने हा धर्म वगळणारा धर्म नाही. यामुळे आज दिसते त्याप्रमाणे त्याचे इस्लामशी वा त्याच्या अनुयायांशी भांडण असू शकत नाही. हिंदू धर्मात अस्पृश्यतेच्या विषाचा जेव्हा प्रवेश झाला तेव्हा त्याच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. अस्पृश्यता राहिली तर हिंदू धर्म मेला ही एक गोष्ट निश्चित आहे आणि मी हे दवंडी पिटून जाहीरपणे सांगत असतो. त्याचप्रमाणे हिंदूंशिवाय हिदू नसलेल्यांना विशेषतः मुसलमानांना भारतात कोणतेच स्थान नसेल व जर त्यांना इथे राहायचे असेल तर त्यांनी हिंदूंच्या गुलामाप्रमाणे राहिले पाहिजे असे तुम्ही म्हणाल तर तुम्ही हिंदू धर्माला मारून टाकाल. याचप्रमाणे पाकिस्तानवर केवळ मुसलमानांचा

अधिकार आहे असा जर पाकिस्तानचा विश्वास असेल आणि मुसलमानेतरांना तिथे अपमानास्पद गुलामगिरीचे जीवन जगावे लागणार असेल तर तसे करणे म्हणजे भारतातील इस्लामच्या मृत्यूची ती घोषणा असेल.

भारताची दोन भागात फाळणी झाली हे दुर्दैवी सत्य आहे. एका भागाला जर वेड लागले व तो अपकृत्ये करू लागला तर दुसऱ्या भागानेही तसेच केले पाहिजे काय? वाईटाचे वाईटाने उत्तर दिल्यामुळे कोणताही लाभ होऊ शकत नाही. धर्म वाईटाची चांगुलपणाने परतफेड करणे शिकवतो.

मी तुमच्या गुरुजींना काही दिवसांपूर्वी भेटलो होतो. तेव्हा कलकत्ता आणि दिल्लीत संघाविषयी माझ्याकडे आलेल्या अनेक तक्रारी मी त्यांना सांगितल्या. तेव्हा गुरुजी म्हणाले होते की प्रत्येक सदस्याच्या वर्तनाबद्दल मी खात्री देऊ शकत नसलो तरी संघाचे संपूर्ण उद्दिष्ट हिंदूंची आणि हिंदू धर्माची सेवा करणे आहे आणि तीही इतर कोणाला कोणत्यादी प्रकारची तसदी न देता. संघाचा आक्रमकतेवर विश्वास नाही. त्याचा अहिंसेवरही विश्वास नाही. तो आत्मरक्षणाची कला शिकवतो. तो बदला घेणे कधीही शिकवत नाही. (पाहा प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १२, १९४७)

आज भारताचे जहाज खवळलेल्या समुद्रातून जात आहे. सरकार चालवण्याची जबाबदारी असलेले नेते हे भारतातील सर्वोत्कृष्ट व्यक्तींपैकी आहेत. काही लोकांना त्यांच्याबद्दल समाधान नाही. मी त्यांना म्हणेन की तुम्ही यापेक्षा चांगले लोक आणा आणि त्यांच्यापेक्षा अधिक चागले असलेल्या लोकांच्या हाती शासनाची सुत्रे सोपवण्याकरिता मी जुन्या पुढाऱ्यांना सांगेन. अखेरीस सरदार वृद्ध गृहस्थ आहेत आणि पंडित जवाहरलाल जरी वयाने वृद्ध नसले तरी त्यांना जे ओझे वाहावे लागत आहे त्यामुळे ते म्हातारे आणि थकलेले दिसू लागले आहेत. लोकांची सेवा करण्याकरिता ते जिवापाड प्रयत्न करत आहेत, परंतु त्यांना दिसत असलेल्या प्रकाशाप्रमाणेच ते वागणार. हिंदूंचा फार मोठा वर्ग एका विशेष

दिशेने, मग ती चुकीची का असेना, जाऊ इच्छित असेल तर तसे करण्यापासून त्यांना कोणीही अडवू शकत नाही. परंतु एकट्या माणसालासुद्धा त्याविरुद्ध आवाज उठवण्याचा व त्याना सावधगिरीचा इशारा देण्याचा अधिकार आहे. मी हेच करतो आहे. मी हिंदू आणि शिखांचा मित्र आहे तसेच मुसलमान, पारसी आणि इतरांचाही मी मित्र आहे. हे खरे आहे की मी मुसलमानांचा तसेच पारसी आणि इतरांचाही मित्र आहे. या दृष्टीने मी जसा बारा वर्षांचा होतो तसाच आताही आहे. परंतु जे लोक मला हिंदूंचा आणि शिखांचा शत्रू समजतात ते मला ओळखत नाहीत. माझे कोणाशीही शत्रुत्व असू शकत नाही आणि हिंदू आणि शिखांचे तर त्याहूनही नाही.

पाकिस्तान जर आपली अपकृत्ये करणे सुरू ठेवील तर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध होणे अपरिहार्य ठरेल. माझे जर चालले तर सैन्य तर सोडाच पण मी पोलीसही ठेवणार नाही. परंतु हे सर्व बोलणे आहे. मी सरकार नाही. आम्ही तुमच्या सुरक्षिततेची पूर्ण खात्री देतो असे हिंदू आणि शिखांना सांगून त्यांनी आपली घरे सोडून पाकिस्तानमधून निघून जाऊ नये अशी हिंदू आणि शिखांची पाकिस्तान का समजूत घालत नाही? आणि भारतीय संघराज्यात प्रत्येक मुसलमानाला सुरक्षिततेची ग्वाही का देण्यात येत नाही? असे दिसते की आज दोन्ही पक्ष झपाटले गेले आहेत. विनाश आणि विपत्ती याशिवाय इतर कोणताही परिणाम यामुळे होणार नाही.

आज संघ अतिशय सुसंघटित आणि शिस्तबद्ध होता. त्याच्या शक्तीचा उपयोग भारताकरिता वा भारताच्या विरोधात केला जाऊ शकतो. संघाविरुद्ध करण्यात आलेल्या या आरोपात काही तथ्य आहे की नाही हे मला माहीत नाही.

भाषणाचा समारोप करत असताना कोणाचे काही प्रश्न असतील तर ते विचारण्याकरिता गांधीजींनी सांगितले. [यानंतरचा भाग लास्ट फेजमधून (पाहा महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ १५-१६) घेतला आहे.] हिंदू धर्म पाप करणारांना मारायची अनुमती देत नाही काय आणि देत

नसल्यास कौरवांना मारण्याबद्दल गीतेच्या दुसऱ्या अध्यायात पांडवांना करण्यात आलेल्या उपदेशाचे आपण कसे स्पष्टीकरण कराल असा प्रश्न गांधीजींना विचारण्यात आला. उत्तर देताना गांधीजी म्हणाले, पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'होय' आणि 'नाही' असे दोन्ही आहे. मारण्याच्या प्रश्नाचा निर्णय करण्याआधी पातकी कोण हे स्खलनशील नसलेला माणूसच ठरवू शकतो. वेगळ्या शब्दांत एक पातकी दुसऱ्या पातक्याचा न्याय कसा करू शकतो? वा त्याला शिक्षा कसा काय ठोठावू शकतो? दुसऱ्यासंबंधी बोलायचे तर गीतेने पातक्याला पापाची शिक्षा करण्याचा अधिकार दिलेला आहे हे मान्य केले तरी त्या अधिकाराचा योग्य उपयोग शासनच करू शकते. न्याय करायचा आणि शिक्षा करण्याचा असे दोन्ही अधिकार तुम्ही तुमच्या हातात घेतले तर सरदार आणि पंडित नेहरू यांच्याजवळ कोणतीच सत्ता राहणार नाही. ते राष्ट्राचे विश्वासू सेवक आहेत. तुमची सेवा करायला त्यांना संधी द्या. स्वतःच्या हातात कायदा घेऊन त्यांच्या प्रयत्नात खीळ घालू नका.

हरिजन, सप्टेंबर २८, १९४७ आणि महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ १५-१६

-----------------

# २०. प्यारेलाल यांना पाठवलेल्या पत्रातील अंश

सप्टेंबर १७, १९४७

माझे नोआखालीला येणे अनिश्चित आहे. येथील काम अतिशय कठीण आहे. परंतु अडचणींमध्येच माणसाची खरी परीक्षा होत असते... जे लोक स्वतःला ईश्वराच्या हातात सोपवतात त्यांचे सदैव कल्याणच होते. तो इच्छा करील तसे होईल. (प्यारेलाल यांना सुशीला नाय्यर यांनी पाठवलेल्या पत्रात लिहिले, बापूंकरिता इथे फार कठीण काळ आहे. काल ते म्हणत होते की फ्रेंच राज्यक्रांतीतील पुढाऱ्यांना ज्या मार्गाने जावे लागले होते त्या मार्गाने आपल्यातील काही लोकांना जावे लागले तर मला आश्चर्य वाटणार नाही. आपल्याला कितीही आवडत नसले तरी लोकांची अदलाबदल होत आहे. पश्चिम पाकिस्तानच्याच पद्धतीने पूर्व पाकिस्तानमधून हिंदूंचे सामूहिक निष्कासन होणार आहे काय?)

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ ११८

-----------------

# २१. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर १७, १९४७

काल संध्याकाळच्या माझ्या अनुभवानंतर मी ठरवले होते की तोपर्यंत प्रार्थना सभा घ्यायच्या नाही जोपर्यंत श्रोत्यांमधील उपस्थित प्रत्येक माणूस त्याकरिता तय़ार होत नाही. (१६ सप्टेंबरच्या प्रार्थना सभेत कुराणमधील आयती म्हणायला सुरुवात झाल्याबरोबर जमावातील कोणी तरी ओरडले, या आयती म्हणता म्हणताच आमच्या आयाबहिणींवर अत्याचार करण्यात आले, आमचे प्रिय स्वजन मारले गेले. इथे आम्ही तुम्हाला या आयती म्हणू देणार नाही. काही लोक घोषणा देऊ लागले, गांधी मुर्दाबाद. सभेतील गोंधळ थांबवण्यात अपयश आल्यानंतर प्रार्थना थांबवण्यात आली.) मी कधीही कोणावरही काहीही लादले नाही मग प्रार्थनेसारखी अतिशय आध्यात्मिक गोष्ट मी कोणावर कसा काय लादू शकतो. प्रार्थना करायची की नाही याची सूचना आतून यायला पाहिजे. मला खुश करण्याचा हा प्रश्नच नाही.

माझ्या प्रार्थनासभा खरोखरच लोकप्रिय झाल्या आहेत. या सभांमुळे लक्षावधी लोक लाभान्वित झाले आहेत असे दिसते. परंतु लोकांना सहन कराव्या लागलेल्या आपदांमुळे त्यांना राग येणे स्वाभाविक आहे व दोन्ही समुदाय तणावाच्या मनःस्थितीत आहेत हे मी चांगल्या प्रकारे समजू शकतो. प्रार्थना घेत असताना प्रार्थनेतील काही भाग वगळावा अशी जी अपेक्षा करण्यात येत आहे ती करण्यात येऊ नये इतकीच सभा घेण्याविषयीची माझी अट आहे. एक तर संपूर्ण प्रार्थना मनःपूर्वक मान्य केली पाहिजे वा ती फेटाळली पाहिजे. कुराणमधील जो भाग मी प्रार्थनेत म्हणतो तो म्हणणे मी थांबवू शकत नाही.

तुमची चीड आणि त्यातून निर्माण होणारा अधीरपणा मी समजू शकतो. परंतु तुम्हांला मिळालेल्या स्वातंत्र्याकरिता पात्र ठरण्याची तुमची इच्छा असेल तर तुम्हांला तुमच्या रागावर नियंत्रण मिळवावे लागेल आणि न्याय मिळवण्याकरिता तुम्हांला तुमच्या

सरकारवर अवलंबून राहावे लागेल. मला जरी माझी अहिंसक पद्धती आवडत असली तरी मी तुम्हांला ती सुचवत नाही कारण मला माहीत आहे की अहिंसेसंबंधीचे माझे बोलणे आज कोणीही ऐकणार नाही. यामुळे मी तुम्हांला लोकशाहीवादी राष्ट्रे जो मार्ग अवंलंबितात तोच सुचवत आहे. लोकशाहीत प्रत्येक माणसाला प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे म्हणजे सरकारच्या आदेशाप्रमाणे वागावे लागत असते व आपल्या स्वतःच्या इच्छांना त्याप्रमाणे वळण लावावे लागत असते. प्रत्येक माणूस जर आपल्या हातात कायदा घेईल तर सरकार काम करू शकणार नाही. त्याचा अर्थ होईल अराजक. म्हणजे सामाजिक व्यवस्थेचा अंत, म्हणजे राज्य अस्तित्वात राहणार नाही. स्वातंत्र्य गमावण्याचा हा मार्ग आहे. तुम्ही जर सरकारला आपले काम करू दिले तर प्रत्येक हिंदू आणि शीख निर्वासित आपापल्या घरी सन्मानपूर्वक आणि आदरानिशी परतेल. परंतु तुम्ही जर तुमच्या मुसलमान देशबांधवांना भारतातून घालवून देऊ पाहाल तर असे घडण्याची शक्यता नाही. अशी कोणतीही गोष्ट मला भयानक वाटते. मुसलमानांवर अन्याय करून तुम्ही न्याय मिळवू शकत नाही. ही गोष्ट सोडली तरी अल्पसंख्याक म्हणजे हिंदू आणि शीख यांना पाकिस्तानमध्ये फार वाईट वागणूक मिळते हे खरे असेल तर हेही खरे आहे की पूर्व पंजाबमध्ये अल्पसंख्याकांना म्हणजे मुसलमानांना फार वाईट वर्तणूक दिली जात आहे. दोन्ही देशांमध्ये करार होण्याचा योग्य मार्ग हाच आहे की त्यांनी शुद्ध अंतःकरणाने आपापल्या चुका कबूल करून सामंजस्य करार करावा. जर अशी एकवाक्यता होणे शक्य नसेल तर त्यांनी लवाद कबूल करावा व लवादाचा निवाडा मान्य करावा. दुसरा मार्ग आहे युद्धाचा असंस्कृत मार्ग. मला युद्धाच्या कल्पनेचीसुद्धा घृणा आहे. परंतु परस्परात एकमत होऊन करार होत नसेल आणि लवादही मान्य होत नसेल तर युद्धाशिवाय पर्याय राहणार नाही. यामुळे मी आशा करतो की अशा परिस्थितीत लोक आपला वेडेपणा टाकून देतील व भानावर येतील व आपले जे मुसलमान शेजारी पाकिस्तानमध्ये जायचे नाही असे ठरवतील व आपल्या

संसारात परतत असतील तर त्यांना सुरक्षिततेचे आश्वासन देतील. ही गोष्ट सैन्याच्या मदतीने साध्य करता येऊ शकत नाही. लोक जेव्हा भानावर येतील तेव्हाच ही गोष्ट साध्य करता येईल. यादवीमुळे देशाचा विध्वंस झालेला पाहण्याकरिता जगायचे नाही असे मी ठरवले आहे. आपल्या या पवित्र आणि सुंदर भूमीवर काही आपत्ती येण्यापूर्वी त्याने मला घेऊन जावे. माझ्या या प्रार्थनेत तुम्ही सर्वांनी सहभागी व्हावे अशी माझी इच्छा आहे.

हिंदू आणि मुसलमान कामगारांनी (दिल्ली कापड गिरणीतील कामगारांच्या प्रचंड सभेत याआधी गांधीजी हजर राहिले होते.) एकोप्याने काम केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तुम्ही जर संपूर्ण एकोप्याने काम कराल तर तुम्ही देशासमोर चांगला आदर्श ठेवाल. कामगारवर्गाने आपल्या जवळपासही सांप्रदायिकतेला भटकू देऊ नये. तुम्हांला जर तुमची शक्ती माहीत असेल व तुम्ही समजून घेऊन रचनात्मक कार्य कराल तर तुम्ही खरे मालक व सत्ताधारी व्हाल व तुम्हांला कामावर लावणारे तुमच्या अडीअडचणीत मदत करणारे तुमचे विश्वस्त व मित्र होतील हे मी तुम्हांला सांगितले नव्हते काय? कामगार हे सोने आणि चांदीपेक्षा मूल्यवान आहेत कारण जमिनीच्या पोटातून केवळ कामगारच ते सोनेचांदी वर काढू शकतात हे जेव्हा त्यांना कळेल तेव्हाच खरे आनंदाचे दिवस येतील.

प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३१८-२०

--------------------

# २२. एस. ए. ब्रेल्वी याना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर १८, १९४७

भाई ब्रेल्वी,

मला तुमची तार मिळाली. हा संपूर्ण इंग्रजी अहवाल आहे. याहून अधिक लिहिण्याकरिता वेळ नाही. दिल्लीत अखेरीस काय होईल हे सांगता येणे कठीण आहे. पाकिस्तान सरकार जर परिस्थितीत काही सुधारणा घडवून आणू शकेल तर येथील लोक सुज्ञपणा धारण करू शकतील. माझ्याबद्दल सांगायचे तर करायची अथवा मरायची मी तयारी केली आहे.

आशीर्वाद

बापू

हिंदी प्रतीवरून, प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल.

---------------

# २३. मुसलमानांच्या सभेत भाषण

(ही सभा दर्यागंज येथील मशिदीत भरली होती. शहरातील काही मुसलमान वस्त्यांना भेट देण्याची काही मुसलमानांनी गांधीजींना विनंती केली. यामुळे अजूनही तिथे राहत असलेले मुसलमान घाबरून आपले घर सोडणार नाही असे त्यांचे म्हणणे होते.. गांधीजींनी ताबडतोब ती गोष्ट कबूल केली व दर्यागंज भागाला त्यांनी भेट दिली.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर १८, १९४७

**मुसलमानांना संबोधत गांधीजी म्हणाले की तुम्ही शूर असला पाहिजे आणि काहीही झाले तरी आम्ही आमचे घर सोडणार नाही असे तुम्ही साफ जाहीर केले पाहिजे. संरक्षणाकरिता तुम्ही इतर कोणावरही नाही तर केवळ ईश्वरावर अवलंबून राहायला पाहिजे. माझ्याकडून शक्य होईल ते करण्याकरिता मी इथे आलो आहे. नोआखाली, बिहार, कलकत्ता आणि आता नवी दिल्लीकरिता 'करा वा मरा' ही निर्धार मी केलेला आहे. तसेच जे लोक आपले घर सोडून गेले त्यांना खरी शांतता प्रस्थापित होईपर्यंत मी परत यायला सांगणार नाही.**

**मी मुसलमान आणि हिंदूंचा मित्र आणि सेवक आहे. संघराज्यात निष्ठावंत नागरिकाप्रमाणे राहण्याची इच्छा असलेला प्रत्येक मुसलमान जोपर्यंत आपल्या घरी परतत नाही व त्याचप्रमाणे हिंदू आणि शीख आपल्या घरी परतणार नाही व सुरक्षितपणे शांततेत राहू शकणार नाही तोपर्यंत मी विश्रांती घेणार नाही. मी दक्षिण आफ्रिकेत आणि भारतात मुसलमानांची दीर्घ काळ सेवा केलेली आहे. खिलाफतीच्या काळातील एकोप्याचे दिवस मला अजूनही आठवतात. तो एकोपा टिकला नाही, परंतु त्यातून टिकाऊ एकोप्याची शक्यता दिसून आली. याकरिताच मी जगलो आणि काम केले. पाकिस्तानमधून निष्कासित करण्यात आलेल्या हिंदूंना आणि शिखांना आपल्या घरी परतता यावे आणि आपल्या घरी परतून सुरक्षितपणे शांततेत राहता यावे म्हणून मी पंजाबकडे जात होतो. परंतु मध्येच मी दिल्लीमध्ये अडकलो आणि राजधानीत खरी शांतता प्रस्थापित होणार नाही तोपर्यंत मी येथून निघणार नाही असे म्हणणारा मी जरी एकटाच राहिलो तरी मुसलमानांनी आपले घर सोडून जावे असे मी कधीही म्हणणार नाही. ते जर भारताच्या कायद्याचे पालन करणारे, प्रामाणिक आणि निष्ठावंत नागरिक राहिले तर त्यांना कोणीही धक्का लावू शकणार नाही. मी सरकार नाही परंतु सरकारमध्ये असलेल्या लोकांवर माझा प्रभाव आहे. माझी त्यांच्याशी दीर्घ चर्चा**

झाली आहे. मुसलमानांना भारतात कोणतेही स्थान नाही वा मुसलमानांना भारतात राहायचे असेल तर त्यांनी हिंदूंचे गुलाम म्हणूनच राहिले पाहिजे यावर त्यांचा विश्वास नाही. काही लोक म्हणतात की मुसलमानांनी पाकिस्तानमध्ये जावे या कल्पनेला सरदार पटेल प्रोत्साहन देत आहेत. असे सरदारांना सांगताच ते संतापले होते. त्यांनी मला सांगितले की भारतातील मुसलमानांमधील बहुसंख्य लोक भारताशी निष्ठावंत नाहीत असे वाटण्याकरिता माझ्याजवळ कारणे आहेत व अशा लोकांनी पाकिस्तानमध्ये जाणे चांगले. परंतु सरदार आपल्या संशयाचा प्रभाव आपल्या कृतीवर पडू देत नाहीत. जे मुसलमान भारतीय संघराज्याचे नागरिक राहू इच्छितात त्यांची संघराज्याशी सर्वप्रथम बांधिलकी असली पाहिजे आणि आपल्या देशाकरिता संपूर्ण जगाशी लढण्याची त्यांची तयारी असली पाहिजे. ज्या मुसलमानांना पाकिस्तानमध्ये जायचे आहे ते तसे करण्याकरिता स्वतंत्र आहेत. हिंदू आणि शीख यांच्या केवळ भीतीमुळे मुसलमानांनी संघराज्य सोडून जाऊ नये इतकीच माझी इच्छा आहे. दिल्लीतील मुसलमानांनी मला लेखी आश्वासन दिले आहे की आम्ही संघराज्याचे निष्ठावंत नागरिक राहू. माझ्या शब्दांवर इतरांनी विश्वास ठेवावा असे जसे मला वाटले तसेच मी त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवला पाहिजे. असे असल्यामुळे त्याचे रक्षण करणे सरकारचे कर्तव्य आहे. हे जर करणे शक्य नसेल तर मला जागावेसे वाटणार नाही. कुठेही जरी अन्याय असेल तरी तो दूर केला पाहिजे. अपहृत स्त्रियांना परत केले पाहिजे, बळजबरीने करण्यात आलेले धर्मांतर रद्द करण्यात आले पाहिजे. पाकिस्तानमधील हिंदू आणि शिखांना व पूर्व पंजाबमधील मुसलमानांना परत त्यांच्या त्यांच्या घरात पुनःस्थापित केले पाहिजे. पाकिस्तान आणि संघराज्यात अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली पाहिजे की एखाद्या लहानशा मुलीलाही, मग तिचा धर्म कोणताही असो, सुरक्षित वाटले पाहिजे. खलिकुझ-झमान साहेब आणि मुझफ्फरनगरचे इतर मुसलमान यांचे वक्तव्य वाचून मला आनंद झाला. परंतु पाकिस्तानला जाण्यापूर्वी मला दिल्लीतील आग विझवण्याकरिता तुम्ही मदत केली पाहिजे. भारत आणि पाकिस्तान कायम शत्रू राहणार असतील व परस्परांविरुद्ध युद्ध करणार असतील तर त्यामुळे दोन्ही सार्वभौम राष्ट्रांचा विनाश होईल आणि इतक्या कष्टाने मिळवलेले आपले स्वातंत्र्य आपण गमावून बसू. हा दिवस पाहण्याकरिता जगण्याची माझी इच्छा नाही.

**समारोप करत गांधीजी म्हणाले की भारतीय संघराज्याशी तुम्ही व्यक्त केलेल्या निष्ठेचे चिन्ह म्हणून ज्या हिंदू स्त्रियांचे पाकिस्तानमध्ये मुसलमानांनी अपहरण केले आहे त्या सर्व स्त्रियांना आपापल्या घरी परत पाठवण्यात यावे असे वक्तव्य काढले पाहिजे. पाकिस्तान सरकार जिथेकुठे सुसंस्कृत वर्तन करण्यापासून चुकले असेल तिथेतिथे तुम्ही पाकिस्तान सरकारचा स्पष्ट शब्दांत निषेध केला पाहिजे आणि ज्या कोणा हिंदूंना आणि शिखांना आपली घरे सोडून निघून येणे भाग पाडण्यात आले असेल त्यांना सुरक्षितता आणि सन्मानाच्या संपूर्ण आश्वासनासह परतण्याकरिता निमंत्रिले जावे असा सल्ला गांधीजींनी त्यांना दिला.** (हा परिच्छेद महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ २७वरून घेतला आहे.)

हरिजन, सप्टेंबर २८, १९४७

-------------------

# २४. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांच्याशी चर्चा

[सप्टेंबर १८, १९४७] (देल्हीमॅन गांधीजीमधून)

**दोन राष्ट्रांत सामंजस्य निर्माण करण्याची जबाबदारी शहीदनी आपण होऊन आपल्या शिरावर घेतली. दोन्ही राष्ट्रांनी आपल्या चुकांची आणि अपयशाची कबुली देणे यांतच या समस्येची उकल आहे असे गांधीजींनी आधीच शहीदच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न केला होता. सुरक्षिततेच्या आणि समतेच्या वागणुकीच्या शाश्वतीसह निर्वासितांना आपापल्या घरी परतता येईल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न दोन्ही शासनांनी आपापल्या राज्यात प्रामाणिकपणे करावा. परंतु आज मात्र वास्तवात दोन्ही राष्ट्रांतील अल्पसंख्याकांना कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई न देता त्यांच्या घरातून बळजबरीने हुसकावून लावण्यात येत आहे. परस्परांच्या सहमतीने योजनाबद्ध रीतीने लोकसंख्येची अदलाबदल करताना मिळणाऱ्या नुकसानभरपाईची वा त्यासोबत असणाऱ्या अन्य सुविधेची शाश्वतीही निर्वासितांना मिळालेली नव्हती. परिणामी निर्वासितांनी कायदा आपल्या हातात घेऊन अल्पसंख्याकांची पिळवणूक करून त्यांना त्या त्या राष्ट्रातून हुसकून लावायला सुरुवात केली. भारतीय मुसलमानांसंबंधीही तसेच धोरण अवंलंबिण्यात यावे असे दडपण भारत सरकारवर येऊ लागले. यामुळे या देशांत युद्ध होण्याची परिस्थिती स्वाभाविकपणेच निर्माण झाली होती. पाकिस्तान सरकारने आधीच जाहीर केले होते की आपण पूर्व पंजाबमधील निर्वासितांना परत येऊ देऊ परंतु भारतामधील इतर भागातील मुसलमानांच्या पाकिस्तानमधील प्रवेशाला विरोध करू.**

**पाकिस्तानमधील पुढाऱ्यांशी शहीदचे जुने संबंध होते व त्यामुळे त्यांना विशिष्ट प्रकारची अनुकूलता असल्यामुळे खऱ्या अंतःकरणाने आणि योग्य पद्धतीने त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली तर काही चांगले निष्पन्न करण्याची त्यांच्यात क्षमता होती. गांधीजी त्यांना म्हणाले की तुमचे मन पूर्णपणे पूर्वग्रहांपासून मुक्त असेल तरच तुम्ही कराचीला जा. कायदे आझम यांनी स्वतःच अल्पसंख्याकांसंबंधी घोषणा केली त्याप्रमाणे वागण्याऐवजी त्या घोषणेचा उपयोग तिचा भंग करण्याकरिताच झाला आहे. या घोषणेची पाकिस्तानमध्ये अमलबजावणी करण्यात यावी असे तुम्ही धैर्याने सांगू शकण्यावरच तुमच्या पाकिस्तानमधील दौऱ्याची यशस्विता अवलंबून आहे. जर**

**तुमच्या मनात याबद्दल काही संभ्रम असेल वा पुरेसा विश्वास नसेल तर तुमच्या भेटीतून काही चांगले निष्पन्न होण्याऐवजी वाईटच निर्माण होईल.**

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ ५९.

---------------------

## २५. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर १८, १९४७

आज आपण आपला सर्व शहाणपणा गमावला आहे, आपण मूर्ख झालो आहो. केवळ शिखांनाच वेड लागले आहे वा हिंदू आणि मुसलमानच वेडाने झपाटले गेले आहेत असे नाही. सर्व गोष्टींची सुरुवात मुसलमानांकडून झाली असे मला सांगण्यात आले. हे खरे आहे. त्यांच्या बाजूने दंगलीना सुरुवात झाली याबद्दल काही संशय नाही असे मला वाटते. परंतु याबद्दल सतत गदारोळ करत राहण्यात काय फायदा? आज काय करणे गरजेचे आहे हे मी पाहिले पाहिजे. गजेंद्राप्रमाणे आज भारताची अवस्था झाली आहे. (गांधीजी इथे गजेंद्राच्या पुराणकथेचे उदाहरण देत आहेत) मला शक्य असेल तर मी त्याला वाचवण्याचा प्रयत्न करीन. मी काय केले पाहिजे? मी ईश्वराचीच मदत मागितली पाहिजे. माझ्या प्रयत्नाचे काही फळ मिळाले तर मला आनंद होईल. परंतु मी तर केवळ हाडबंडल आहे. असा माणूस काय करू शकतो? परंतु ईश्वर सर्व काही करू शकतो. मी त्याच्याकडे वळतो आणि म्हणतो, “हे देवा ये, गजराज बुडत आहे, भारत बुडत आहे, त्याला वाचव.”

इथे केवळ हिंदूंनी राहिले पाहिजे आणि मुसलमानांना इथे राहायचे असेल तर त्यांनी गुलामाप्रमाणेच राहिले पाहिजे हे शक्य नाही. जवाहरलाल काय म्हणतात ते जरा ऐका - “आम्ही फार मोठ्या संकटात आहो. आम्हांला इतर कामाकडे लक्ष देता येत नाही. केवळ याच समस्येत आम्ही गुंतलेलो आहो.” पाकिस्तानमधील प्रत्येकजण भ्रष्ट झालेला असेल तर त्याचे काय? इतर लोक वाईट गोष्टी करतात म्हणून आपणही तसेच करू शकत नाही आज मी दर्यागंजमध्ये गेलो होतो. काही मुसलमान मित्रसुद्धा माझ्याकडे आले होते. मी त्यांच्याशी चर्चा केली, त्यांना प्रेम दिले आणि तुम्ही घाबरू नका असे मी त्यांना सांगितले.

तुम्ही मजबूत असला पाहिजे. मी त्यांना सांगितले की तुम्ही तुमच्या घराला चिकटून राहा. तुम्हांला इथे कोणताही खोडसाळपणा करता येणार नाही. यामुळे सर्व हिंदूंनी सुज्ञपणा धारण करावा, सर्व शिखांनी चांगले व्हावे असे मी म्हणत असतो. हिंदू आणि शिखांनी पाकिस्तानमध्ये जाण्याची इच्छा नसलेल्या मुसलमानांना 'तुम्ही तुमच्या घराला चिकटून राहा' असे सांगावे. आपल्याला जामा मशीद मिळाली आहे. ती जगातील सर्वात मोठी मशीद आहे. बहुतांश मुलमानांना आपण मारून टाकले वा ते पाकिस्तानमध्ये निघून गेले तर त्या मशिदीचे काय होईल? तुम्ही पाकिस्तानमध्ये मशीद स्थलांतरित करणार आहा काय? वा ती मशीद तोडून तिथे शिवमंदिर बांधणार आहा? कल्पना करा की काही हिंदूंना अहंकारात तिथे शिवमंदिर बांधायचे आहे वा शिखांना तिचे रूपांतर गुरुद्वारात करायचे आहे तर असे करणे हे हिंदू आणि शीख धर्माला मूठमाती दिल्याप्रमाणे होईल. कोणत्याही धर्माची अशा प्रकारे उभारणी करता येऊ शकत नाही.

ज्यांना पाकिस्तानात जायचे असेल ते तिथे जाऊ शकतात. परंतु हिंदूंच्या भीतीमुळे त्यांनी पुराना किल्ल्यात वा हुमायूनच्या कबरीत का लपावे? मी त्यांना सांगितले आहे की जे मुसलमान अजूनही आपल्या घरात आहेत त्यांनी आपल्या घरांना चिकटून राहावे. त्यांच्याकरिता मीसुद्धा मरण पत्करेन. त्यांना थोडासा धीर आला आणि आम्ही परतू, आमचे घर सोडून आम्ही पळून जाणार नाही असे ते म्हणाले. तिथे ते किती तरी काळापासून राहत आहेत. आज आपण त्यांना बाहेर काढून टाकले पाहिजे काय? परंतु असे करता येऊ शकत नाही. जे आधीच निघून गेले आहेत त्यांच्यासंबंधी काय करावे? मी सांगितले की आपण त्यांना लगेच परत आणू शकत नाही. पोलिसांच्या आणि सैन्याच्या मदतीने आपण त्यांना नक्कीच परत आणणार नाही. आपण त्यांना तेव्हाच परत आणू जेव्हा तुम्ही आमचे मित्र आहा व तुम्ही तुमच्या घरात परत या असे हिंदू आणि शीख त्यांना आश्वासन देतील. तुम्ही त्या मुसलमानांना असेही सांगितले पाहिजे की तुमच्या संरक्षणाकरिता पोलिसांची वा

सैन्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही, उलट आम्हीच तुमचे पोलीस, तुमचे सैन्य आहो आणि आपण भावाभावाप्रमाणे राहू. आपण जर दिल्लीत असे केले तर तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो की पाकिस्तानमधील मार्ग आपल्याकरिता मोकळा असेल. आणि ती नवजीवनाची सुरुवात असेल. मी जेव्हा पाकिस्तानमध्ये जाईन तेव्हा मी त्यांना सोडणार नाही. मी तिथे हिंदू आणि शिखांकरिता मरण पत्करीन. तिथे मरावे लागण्यात मला खरोखर आनंद होईल. इथेही मरण्यात मला आनंद होईल. मला जे इथे करायचे आहे ते मला करता आले नाही तर मला मरावेच लागेल. माझा संतापसुद्धा होतो. मी असे ऐकले आहे की ज्या अनेक स्त्रियांना आपली अब्रू वाचवायची होती त्यांनी मरण पत्करले. अनेक पुरुषांनी त्यांच्या बायकांना मारून टाकले. मला वाटते की ही महान गोष्ट आहे कारण अशाच गोष्टींमुळे भारत शूर ठरतो. अखेरीस जीवन आणि मृत्यू हा क्षणभंगूर खेळ आहे. जे कोणी मेले ते मेले आणि गेले, परंतु निदान ते धैर्याने तरी गेले. त्यांनी आपली अब्रू विकली नाही. असे नाही की त्यांचे त्यांच्या जीवावर प्रेम नव्हते. परंतु त्यांना वाटले की मुसलमानांच्या बळजबरीमुळे धर्मपरिवर्तन करून इस्लाममध्ये जाण्यापेक्षा आणि त्यांना आपल्या शरिरावर प्राणघातक हल्ला करू देण्याऐवजी धीराने मरण पत्करणे बरे. आणि हीच गोष्ट त्या स्त्रियांचीही आहे. त्या केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या नव्हत्या, परंतु फार थोड्या होत्या. मी जेव्हा या सर्व गोष्टी ऐकतो तेव्हा भारतात इतक्या शूर स्त्रिया असल्याचे पाहून मी आनंदाने नाचू लागतो. परंतु जे लोक आधीच पळून गेले आहेत त्यांच्याकरिताही जागा आहे. त्यांनी परतायला पाहिजे आणि अब्रूनिशी परतायला पाहिजे. निदान आपल्या बाजूने तरी न्याय व्हायला पाहिजे. आपण आपली अंतःकरणे आणि हात स्वच्छ ठेवू या. मग आपण सर्व जगासमोर न्यायाची मागणी करू शकतो. मी आधीच सांगितले आहे की ज्या मुसलमानांजवळ शस्त्रे असतील त्यांनी ती सुपूर्द करावी. मी परवाच सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाने आपली शस्त्रे समर्पित केली पाहिजे. मला वाटते की या प्रक्रियेला थोडा वेळ

लागेल, परंतु आता ती सुरू झालेली असल्यामुळे शस्त्रास्त्रे समर्पित केली पाहिजे. आपण आपले संरक्षण शस्त्रांनी करू शकत नाही.

आपल्या पोलीसदलात आणि सैन्यात हिंदू, शीख शिवाय ख्रिश्चन व गुरखा आहेत. ते आपले संरक्षक आहेत असे गृहीत धरले जाते. परंतु तेच विध्वंसक झाले आहेत. ही माझ्याकडे येणारी दुसरी मोठी तक्रार आहे. हे कितपत खरे आहे हे मला माहीत नाही. परंतु मला स्वतःला पोलिसांना विनंती करायची आहे की त्यांनी योग्य प्रकारे वर्तन करावे. मी असे ऐकले आहे की कॅनॉट प्लेसमध्ये आज काही दंगल झाली. पोलिसांनी लूटपाटीला सुरुवात केली. शक्य आहे की हे वृत्त खोटे असेल. परंतु यात किंचित जरी सत्य असेल तर मी पोलिसांना आणि सैनिकांना सांगेन की ब्रिटिशकालीन दिवस आता संपले. त्या काळात त्यांना हवे तसे ते करू शकत होते. परंतु आता ते भारताचे आहेत. मुसलमानांचे शत्रू असल्याप्रमाणे त्यांनी आता वागू नये. मुसलमानांच्या संरक्षणाचा जेव्हा त्यांना आदेश देण्यात येतो तेव्हा त्यांनी त्यांचे संरक्षण केलेच पाहिजे.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३२१-३.

-----------------

# २६. रामेश्वरी नेहरू यांना पत्र

सप्टेंबर १९, १९४७

चि. रामेश्वरी,

मला काल तुमचे पत्र मिळाले.

मी जर इथे काही करू शकलो नाही तर तिथेही मी काही करू शकणार नाही हे स्पष्ट आहे. ईश्वराला समर्पित करून तुम्हाला शक्य असेल ते करा. सर्व काही ठीक होईल.

जवाहरलालने सांगितले की तुम्ही इथे येणार आहा. बाप्पांनीसुद्धा (ए. व्ही. ठक्कर) हेच सांगितले. तुम्हाला तिथे जे करणे शक्य असेल ते तुम्ही संपूर्ण मनःशांती कायम ठेवून करावे असे माझे मत आहे. तुम्ही काहीही करू शकत नसाल आणि तुमचे मनही अस्वस्थ असेल तर गोष्ट वेगळी. अखेरीस तुमच्या हृदयाची हाक ऐका. तुम्ही दोघेही चांगले राहा.

येथील काम कठीण आहे. सुऱ्हावर्दी काल आले. ते माझ्याबरोबर राहत आहेत.

ब्रिजलाल (रामेश्वरी नेहरू यांचे पती) तुम्हाला फार मदत करत असतात असे जेव्हाकेव्हा मी ऐकतो तेव्हा मला बरे वाटते. असेच व्हायला पाहिजे. मला त्यांची पत्रे येतात. ते मी जवाहरलालला दाखवले. मी त्यांना वेगळे लिहीत नाही.

आशीर्वाद

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ८०१२, शिवाय सी. डब्ल्यू. ३११२, सौजन्य रामेश्वरी नेहरू

------------------

# २७. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर १९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो.

मला एक चिठ्ठी मिळाली. मी आधी सरदारांकडे गेलो. त्या चिठ्ठीत लिहिण्यात आले होते की हिंदूंना मुसलमानांबरोबर राहावे लागणार असेल तर ते गप्प बसणार नाहीत. हिंदूंना पाकिस्तानमधून पळून यावे लागले. कूचा तारा चांदमध्ये त्यांच्या चोहोबाजूला मुसलमान आहेत. मुसलमानांनी काही गोळीबार केला तर काय अशी त्यांना भीती वाटते. यामुळे तेथून सर्व मुसलमान निघून गेले तर बरे होईल असे तेथील हिंदूंना वाटते. त्यांच्यातील अनेक आधीच गेलेले आहेत, परंतु काही थोडेसे मागे राहिलेले आहेत. मी तुम्हाला सांगितले की मी काल जेव्हा त्यांना भेटायला गेलो होतो तेव्हा मी त्यांना याविरुद्ध सांगितले होते. यामुळे जे इथे आहेत त्यांच्या स्थलांतराचा प्रश्नच उपस्थित होत नाही. जे लोक गेलेले आहेत त्यांना परतण्याकरिता मी सांगेन. परतण्याकरिता त्यांच्यांवर ही बळजबरी नाही. आज आपण ज्या पंचायत राजमध्ये राहतो त्यात बळजबरीला कोणतेच स्थान नाही. आपण लोकांची समजूत घातली पाहिजे. आपण मुसलमानांना इतके का घाबरावे? ज्या मुसलमानांबरोबर आपण इतक्या वर्षांपासून राहत होतो ते आता एकाएकी इतके वाईट झाले आहेत काय की त्यांच्याबरोबर आपल्याला इथे एकत्र राहता येणे कठीण व्हावे? ते वाईट होऊ शकत नाहीत असे मला म्हणायचे नाही. परंतु चांगले असणे पुरेसे नसते. आपण शूरसुद्धा असायला पाहिजे आणि आपल्यात सुज्ञपणाही असायला हवा. असे झाले तर आपल्या सहवासाने वाईट लोकही चांगले होतील. हा माझा नियम नाही, जगाचा नियम आहे. काल मी तुम्हांला सांगितल्याप्रमाणे हे मी माझ्या बालपणापासून शिकलो

आहे. आता कोणताही नवीन धडा शिकण्याची माझ्यात क्षमता नाही. आणि अजून मी किती काळ जगणार आहे? तुम्ही मला हे सर्व सांगत आहा परंतु हे मला सहन होत नाही हे मी तुम्हांला सांगेन. असे काही नाही की मी कोणाला तरी मारून टाकेन. हं, हे शक्य आहे की मी स्वतःच मरून जाईन.

मला दुसरी एक चिठ्ठी मिळाली. रस्त्यात कोणी तरी मला ती दिली. ज्या कोणत्या चिठ्ठ्या मला रस्त्यात मिळतात त्या मी गाडीतच वाचायचा प्रयत्न करतो. पश्चिम पंजाबमध्ये इतके अत्याचार होऊनही तुम्ही अजूनसुद्धा भानावर कसे येत नाही असे मला त्या चिठ्ठीत विचारण्यात आले आहे. अजून एक चिठ्ठी आहे. तिच्यावर नाव वा सही नाही. ती मुस्लिम लीगच्या सदस्यांना अनुलक्षून आहे. तिच्यात अनेक घाणेरडे आरोप करण्यात आले आहेत. मुस्लिम लीगचे सदस्य अशा प्रकारचेच वर्तन करत राहतील तर पाकिस्तान आणि भारताचे काय होईल हे सांगता येणे कठीण आहे. आपणसुद्धा अशा घाणेरड्या साधनांचा उपयोग केला पाहिजे काय? माझ्या मते हे बरोबर नाही.

इथे आजूबाजूला मुसलमान राहतात. काही मुसलमान कार्यकर्त्यांनी इथे राहण्याचे ठरवले आहे. त्यांना मुसलमानांची सेवा करायची आहे. ते म्हणतात की कोणाची इच्छा असेल तर त्याने येऊन आम्हांला मारून टाकावे. ते इथे राहत आहोत कारण ते शूर आहेत. ते माझ्याकडे आले होते. असे मुसलमान फार कमी आहेत. त्यांचे म्हणणे आहे की मोठ्या संख्येत मुसलमान आपले घर सोडून निघून गेले आहेत. असे असले तरी तिथे भरपूर संख्येत मुसलमान असल्याचे मी पाहिले आहे. तिथे फार कमी हिंदू होते. तिथे वाचलेल्या हिंदूंना मी सांगितले की मी माझ्या लहानपणापासून एक गोष्ट शिकलो आहे. राजकारणात शिरण्याआधीच हिंदू आणि मुसलमानांनी एकोप्याने राहिले पाहिजे यावर माझा विश्वास बसला होता. भारताची घडण ही अशी झाली आहे आणि भारताने असेच राहायला पाहिजे. जो माणूस वयाच्या १२व्या वर्षापासून हेच काम करत आहे तो आज कोणतीही वेगळी गोष्ट

सांगू शकत नाही. प्रत्येक माणसाने आपल्या ठिकाणी ठामपणे उभे राहिलेले आणि तिथेच मेलेले मला आवडेल. हीच गोष्ट मी मुसलमानांना आणि हिंदूनाही सांगत असतो.

हिंदू सांगतात की मुसलमानांजवळ शस्त्र आहेत. त्यांनी जर ती समर्पित केली नाही तर नंतर ते कशावरून हल्ला करणार नाहीत? मी हिंदूंना म्हणेन की तुम्ही याची काळजी करायला नको. हे सरकारचे काम आहे. त्याच्याजवळ जर परवाने नसतील तर ते आत्मरक्षणाकरितासुद्धा शस्त्र ठेवू शकत नाहीत. परंतु ते शस्त्रांनी स्वतःचे रक्षण कसे काय करणार आहेत? जर तिथे पाच मुसलमान असतील तर हिंदू आणि शीख मिळून पाचशे असतील. तुलना कुठे आहे? हिंदू आणि शीख जरी त्यांची कत्तल करणार असतील तरी त्यांनी इथे राहिले पाहिजे. हे पाच, जर स्वतःला मारू देण्याकरिता तयार होतील आणि शस्त्र न उचलता ईश्वराचे नाव ओठावर असताना या जगातून जातील तर ते खरोखरच शूर असतील. हिंदू आणि शीख आमचे भाऊ आहेत आणि त्यांना हवे असेल तर ते आम्हांला मारू शकतात असेच त्यांनी म्हणायला हवे. हाच सल्ला मी सर्वांना देत असतो. आज पाकिस्तानमधून आलेले हिंदू मोठ्या संख्येत मला भेटायला आले होते व त्यांनी त्यांच्या दुःखद कहाण्या मला सांगितल्या. काहींनी आपली हकिगत हसतहसत सांगितली तर काही स्त्रिया रडू लागल्या. मी त्यांना सांगितले आणि तुमच्या माध्यमातून मी सर्वांना सांगू इच्छितो की आपण भ्याड असू नये. पाकिस्तानमधील मुसलमानांनी अत्याचार केले म्हणून इथल्या मुसलमानांना आपण घाबरण्याचे कारण नाही. आणि आपण त्यांनासुद्धा भीती दाखवू नये. असेही काही मुसलमान आहेत की जे पाकिस्तानमध्ये राहू शकत नाहीत.

असो, मला मिळालेली चिठ्ठी म्हणते की मुसलमानेतर जर पाकिस्तानमध्ये राहणार नाहीत तर मग मुसलमानांनी भारतात का राहावे? परंतु मी म्हणेन की एक माणूस जर काही चुकीचे काम करत असेल तर आपण त्याची नक्कल करू नये व स्वतःही तसे काम करू नये. पाकिस्तान वा इस्लाम याचा अर्थ असा नाही की मुसलमानेतर तिथे राहू शकत

नाहीत. मुसलमानी साम्राज्य फार मोठ्या क्षेत्रात पसरले होते. परंतु असे कुठेही म्हटलेले नव्हते की मुसलमानेतर तिथे राहू शकत नाहीत. मुसलमानेतर तिथे राहत होते आणि शांततापूर्वक राहत होते. त्यांच्याजवळ पैसाही होता. आता इस्लाम नवीनच काही गुण घेऊन येत आहे काय? इस्लाम गत तेराशे वर्षांपासून अस्तित्वात आहे. त्याच्याकरिता लोकांनी फार मोठा त्याग आणि बलिदान केले आहे. जर अजून कोणत्या प्रकारच्या इस्लामचा उदय होत असेल तर तो खरा इस्लाम नसेल आणि सर्व मुसलमानांना तो मान्यही नसेल. यावर विचार करा. याचा अर्थ असा आहे की खरा भारत तो असू शकणार नाही ज्यात हिंदूंशिवाय दुसरा कोणीही राहू शकणार नाही. खरा ख्रिश्चन धर्म तो नसेल जो ख्रिश्चनेतरांना आपल्या कवेत घेणार नाही. तो धर्म नसतो तर अधर्म असतो. जग या मार्गाचे अनुसरण करत नसते, सध्याही करत नाही आणि भविष्यातही करणार नाही. मग आपण नवीन इतिहास लिहिण्याचा प्रयत्न का करायचा? आपण भारताचा विनाश करू नये आणि पाकिस्तानचा विनाश होऊ देऊ नये. भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत. ते सर्व कुठे जाणार आहेत? आणि त्यांनी स्वतःबरोबर जामा मशीद, अलिगढ विद्यापीठ आणि मुसलमानांच्या त्या सर्व कबरी पाकिस्तानमध्ये न्याव्या काय? आणि पश्चिम पंजाबमधील सर्व गुरुद्वारा पूर्व पंजाबमध्ये आणावे काय? याचा अर्थ होईल प्रत्येकाने स्वतःचा विनाश करावा आणि धर्माचा विध्वंस करावा. याचा साक्षीदार होण्याची माझी इच्छा नाही. यापूर्वीच ईश्वराने मला घेऊन जावे. आणि मी म्हणेन की सर्व तरुणांनी आपले कर्तव्य करत मरण पत्करावे. जोपर्यंत तुम्ही जिवंत आहा तोपर्यंत भारताचा विनाश होऊ देऊ नका. मला देशाचा विनाश झालेला पाहण्याची इच्छा नाही. असे होणार नसेल तर देशातील वाईटपण घालवण्याच्या प्रयत्नात आपण मरण पावलो पाहिजे अशी माझी इच्छा आहे.

प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३२४-७

----------------

# २८. बलवंतसिंह यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर २०, १९४७

**आदरणीय बलवंतसिंहजी,**

**बापूंना तुमचे पत्र मिळाले परंतु बापूंना क्षणाचीही सवड नसल्यामुळे ते तुमच्या पत्राचे उत्तर देऊ शकत नाहीत. बापूंच्या सूचनेनुसार मी हे लिहीत आहे.**

**गोशाळेबद्दल** (गोशाळा तालिमी संघाकडे सोपवण्यात आल्यामुळे आणि दूध मिळणे कठीण झाल्यामुळे बलवंतसिंह दूध सोडण्याबद्दल विचार करत होते.) **तुम्हांला वाईट वाटायचे कारण नाही. झाले गेले विसरून जा. इशावस्य स्तोत्र काय म्हणते? (या जगात) असे काहीही नाही की ज्याला आपण आपले म्हणू शकतो, सर्व काही ईश्वराचे आहे. गाईचे दूध पिणे तुम्ही थांबवू नये. गाईच्या दुधाऐवजी आपण जर शेळीचे दूध पिणे सुरू केले तर तसे करणे गोसेवा होणार नाही. गावातून तुम्हांला गायीचे दूध मिळू शकते ही चांगली गोष्ट आहे. शेजारीपाजारी गायींची संख्या व चारा कसा वाढू शकेल ते पाहा. चांगले दूध मिळण्यासाठी याच गोष्टीवर आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे. हीच खरी गोसेवा आहे.**

**तुम्ही इतरत्र कुठेही जाण्याची गरज नाही. तुम्हाला जर काही झाले तर तुमच्या कर्तव्याच्या ठिकाणी मरण पत्करा. तुम्हाला जे काही करता येईल ते तिथेच करा.**

**मनूकडून शुभचिंतन**

हिंदी फोटोप्रतीवरून, जी. एन. १९८४

-------------------

## २९. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे व त्याच्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. यावर प्रत्येकाचा विश्वास नाही. लोक विचारतात - 'देव कुठे आहे? देव जर आहे तर जगात इतके दुःख का असावे?' मुसलमान जर संकटात असले तर ते अल्ला आणि कुराणच्या सत्याबद्दल प्रश्न करतात. अनेक लोक या शब्दांत बोलतात, परंतु ते सर्व चूक आहेत. ही वेळ खुदा, अल्ला, ईश्वर आणि राम यांना स्मरण करण्याची आहे. न चुकता तो आपल्याला मदत करतो. आपण त्याला ओळखतो की नाही हे तो आपल्याला नक्कीच विचारत नसतो. आपण त्याला हातात धरू शकत नाही आणि डोळ्यांनी पाहू शकत नाही वा कानांनी ऐकू शकत नाही. यामुळेच म्हणतात की तो आपल्या भौतिक इंद्रियांच्या पलीकडे आहे. तो सत्य आहे बाकी सगळे मिथ्या. आपण सर्व मिथ्या आहो. आपण जिवंत असताना आपण मिथ्या कसे असे आपण विचारू शकतो. आज मी जिवंत आहे. परंतु उद्या मी जिवंत राहीन की नाही हे मला कोणीही सांगू शकत नाही. अशा प्रकारे मी ७८ वर्षे जगलो आहे आणि उद्याकडे आश्चर्याने पाहतो आहे. मी अजून कदाचित काही दिवस जगेन वा मी अजून एखाद वर्ष जगेन. परंतु आपल्याला हे कसे कळेल? परंतु जो माणूस आता जिवंत आहे तो पुढील मिनिटातही जिवंत राहील हे आपण कसे सांगू शकतो? हे कोणीही सांगू शकत नाही म्हणूनच मी म्हणतो की आपण सर्व असत्य आहो आणि येत्या क्षणात आपले काय होणार आहे याबद्दल आपण खात्रीपूर्वक काहीही सांगू शकत नाही. आपण अमर होऊ शकत नाही. तोच केवळ सत्य आहे. हस्ती हा शब्द अस्तीपासून व्युत्पन्न झाला आहे. 'अस्ती'चा अर्थ आहे 'असणे'. ते होते, ते आहे आणि ते चिरंतन असेल. जे चिरंतन असते ते हे सत्य (ईश्वर), त्याने

आपल्याला निर्मिले आहे आणि तो आपल्याला नष्टही करू शकतो म्हणजे या जगापासून आपल्याला दूर नेऊ शकतो. माझ्या दृष्टिकोनातून तो आपल्याला कधीही नष्ट करत नाही, तो केवळ आपल्याला मदत करतो. त्याचा साक्षात्कार होऊ शकत नाही असा जर आज आपल्याला संशय आला व म्हणून आपला संताप झाला तर तो मुर्खपणा असेल. परंतु तो आहे आणि सर्व काही करण्याची त्याच्यात क्षमता आहे. तो रहीम (दयाळू) आहे व त्याच्या नजरेत सर्व समान आहेत. तो कोणालाही दुखवू शकत नाही. ना तो मारू शकतो ना शाप देऊ शकतो. हा त्याचा नियम आहे.

मुसलमानही माझ्याकडे येतात. ते मला आपली दुरावस्था सांगतात. ते म्हणतात की आम्ही दिल्लीत राहतो परंतु आता तसे करणे शक्य होईल असे वाटत नाही. मी त्यांना सांगत असतो की मी जिवंत असेपर्यंत तरी तुम्ही राहा. खिलाफतीच्या दिवसात हिंदू, मुसलमान, शीख हे सर्व एकत्र राहायचे. मुसलमानांना सोबत घेऊन मी गुरुद्वारांमध्ये गेलो आहे. नानकाना प्रकरणाच्या प्रसंगी (पाहा श्री येथील शीख परिषदेतील भाषण, फेब्रुवारी २, १९२१ आणि नानकाना साहेब येथील भाषण, मार्च ३, १९२१) मौलाना साहेब आणि अलीबंधू माझ्याबरोबर होते. हिंदू, मुसलमान, शीख असे कोणीही असो सर्वांमध्ये बंधुत्वाची भावना होती. जालियनवाला बागमध्ये काय घडले? घसा फोडूनफोडून लोक सांगत होते की इथे सर्व समुदायांचे रक्त एक झाले आहे. त्यांना कोण वेगळे करील? मग आज ते कसे वेगळे झाले? मी खरोखरच गोंधळलो आहे. या तिन्ही समुदायांचे रक्त एक आहे असा विश्वास असल्यामुळेच मी आज इथे अजून जिवंत आहे. हे सिद्ध करण्याकरिता शक्य ते सर्व करण्याचा मी प्रयत्न करीन. हे व्हावे म्हणून मी ईश्वरासमोर आक्रंदन करीन व त्याच्यासमोर अश्रू ढाळेन. मी माणसासमोर अश्रू ढाळत नसतो परंतु ईश्वरासमोर मी असे करू शकतो. मी त्याला विनवू शकतो कारण मी त्याचा गुलाम आहे. असे झाले की माणसाला इतर कोणाचाही गुलाम होण्याची गरज

राहत नाही. मला जर हे करता येणार असेल तरच मला जिवंत राहण्याची इच्छा आहे. असे नसेल तर ईश्वराने मला घेऊन जावे.

हिंदू, शीख, आणि मुसलमान, जे आताआतापर्यंत परस्परांकडे भाऊभाऊ म्हणून पाहत होते, ते आता शत्रू झाले यामुळे माझी मान लाजेने खाली होते, मला लाज वाटते. निदान काही लोकांनी पुढे यावे आणि सांगावे की आम्ही शत्रू असू शकत नाही. माझ्याकडे आलेल्या चार की पाच लोकांनी मला सांगितले की वेळ आली की साडेचार कोटी मुसलमान देशद्रोही होतील कारण काहीही झाले तरी ते मुसलमान आहेत आणि पाकिस्तानमध्येही मुसलमान आहेत. कल्पना करा की भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झाले व अशीच काही परिस्थिती निर्माण झाली तर अशा परिस्थितीत ते पाकिस्तानला मदत करणार नाहीत काय? मी या लोकांना सांगितले की काही मुसलमान पाकिस्तानला निश्चितच मदत करू शकतात परंतु सर्व असे करणार नाहीत. मी या लोकांना सांगितले की तुम्ही जर चांगले राहिला तर तेही चांगले राहतील. इथे उपस्थित असलेले मोठ्या संख्येतील सर्व हिंदू आणि सर्व शीख चांगले राहिले व एकाही मुसलमानाला तुम्ही शत्रू मानले नाही तर मी मोठ्या आवाजात ठणकावून सांगेन की या साडेचार कोटी मुसलमानांमधील कोणीही विश्वासघात करणार नाही. आपण शूर असलो पाहिजे. बहुसंख्य असताना आपण भ्याड असू नये. भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत परंतु देशाची एकूण लोकसंख्या ४० कोटी आहे. आपण इतके भ्याड असायला पाहिजे काय की साडेचार कोटी मुसलमानांना आपण घाबरावे? मी म्हणेन की ते साडेचार कोटी मुसलमान देशाचा विश्वासघात करतील तर ते इस्लामचा विश्वासघात करतील व इस्लामचा विनाश करतील. परंतु आपणही तसेच वर्तन करू लागलो आणि भित्रे व विश्वासघातकी झालो व त्यांच्यावर मुळीच विश्वास ठेवला नाही आणि एकाही मुसलमानाला इथे राहू दिले नाही तर

एकट्या हिंदू समाजाला इथे एक घासही खाता येणार नाही हे मी तुम्हाला सांगून ठेवतो. अन्न विषमय होऊन जाईल.

भारतावर जर भारताबाहेरील मुसलमानांनी वा एखाद्या सत्तेने वा पाकिस्तानने आक्रमण केले तर मी म्हणेन की भारतातील या साडेचार कोटी मुसलमानांना भारताशी निष्ठा ठेवावीच लागेल. कायदा सांगतो की त्यांच्यात जर राष्ट्रनिष्ठा नसेल तर त्यांना फासावर चढवले जाईल. असे असले तरी माझा कायदा मात्र वेगळा आहे हे मी तुम्हांला स्पष्ट करून सांगितले आहे. परंतु तो कोण मान्य करणार आहे? जगाच्या नियमाप्रमाणे देशद्रोही, पंचमस्तंभी, देशातील अधिकृत शासन उलथून पाडण्याचा प्रयत्न करणारे यांच्याकरिता मृत्यूदंडाचीच शिक्षा आहे. आपल्या देशासारख्या विशाल देशात सर्व साडेचार कोटी मुसलमान देशद्रोही असू शकत नाहीत. या सर्वच्या सर्व साडेचार कोटी मुसलमानांना कोणी पाहिले आहे? ते आपल्या ७ लाख खेड्यात आहेत. फार थोडे शहरात आहेत. ते उत्तर प्रदेश, बिहारमधील खेड्यांमध्ये विखुरलेले आहेत. मी खेड्यात राहिलेलो आहे आणि मी त्या सर्वांना ओळखतो. ते कधीही देशद्रोही असू शकत नाहीत. सेवाग्राममध्येसुद्धा मुसलमान आहेत. ते तिथे काम करतात. ते सेवाग्रामशी निष्ठावंत असतील. त्याच्याकरिता ते आपला जीव देतील. इतर ठिकाणचे मुसलमान काय करताहेत हे त्यांना कसे कळणार आहे? आणि देशद्रोह्यांना आपण का घाबरावे? मला त्यांची भीती वाटत नाही. भारतात राहूनही ते जर देशद्रोही होणार असतील तर मी म्हणेन की त्यांना मरण्याची आणि इस्लामचा नाश करण्याची उत्कंठा लागली आहे.

खरे काफिर ते असतात जे आपली भाकरी खातात, आपल्या घरात काम करतात परंतु शत्रूप्रमाणे वागून आपलेच गळे कापतात. असे हिंदूसुद्धा आहेत आणि शीख व मुसलमानसुद्धा आहेत. या जगात सर्व प्रकारचे लोक असतात. परंतु इथे राहणारे सर्व साडेचार कोटी मुसलमान देशद्रोही होतील असे मानणे हा भ्याडपणा आहे. यावरून असे

दिसते की आपण खरे हिंदूही नाही आणि खरे शीखही नाही. मुसलमानांनी जाऊ नये असे सांगण्यात आपला चांगुलपणा असेल, आपल्या सर्व अधिकाऱ्यांचा चांगुलपणा असेल, हिंदू आणि शिखांचा चांगुलपणा आणि साहस असेल. तुमच्या केसालासुद्धा कोणी धक्का लावणार नाही असे आपण त्यांना समजावून सांगून त्यांची खात्री पटवली पाहिजे. आमचे गैरवर्तन विसरा आणि यापुढे अशा गैरवर्तनाची पुनरावृत्ती होणार नाही असे आपण त्यांना सांगितले पाहिजे. तुम्ही का जाऊ इच्छिता आणि पाकिस्तानमध्ये काय होईल हे आपल्याला माहीत आहे काय असे आपण त्यांना विचारले पाहिजे. तुमचे घर आणि सर्व काही इथे आहे याची आपण त्यांना आठण करून दिली पाहिजे. अशा प्रकारच्या जिव्हाळ्याने आपण जर त्यांना इथे ठेवून घेऊ शकलो तर सरहद्द प्रांतातील आणि डेरा इस्माईल खान येथील आफ्रिदी मुसलमान आपल्या लोकांना सांगतील की तुम्ही येथून पळून जाऊ नका. चांगुलपणाच्या वर्तनाचा हा असा परिणाम असतो. तुम्ही जर दिल्लीत शांतता टिकवली, आणि असे तुम्ही भीतीमुळे नाही वा गांधी म्हणतो म्हणून नाही तर तुम्हांला असे अंतःकरणापासून करावेसे वाटले तर मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो की एकही मुसलमान तुम्हाला इजा पोहोचवणार नाही. आणि जर तो असे करील तर आपणा सर्वांवर ईश्वर आहे. तो सर्व शक्तिमान आहे व प्रत्येकजण त्याला उत्तरदायी आहे. तो आपले रक्षण करील याबद्दल माझ्या मनात मुळीच संशय नाही.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन -१, पृष्ठ ३२७-३१

-----------------------

# ३०. जेठालाल यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर २१, १९४७

चि. जेठालाल,

तुझा लेख मी आजच पाहिला. मी तो वाचला. परंतु त्यातून मला फारसे मिळू शकले नाही. तो छापण्याची आवश्यकता नाही. तुला सुचलेली ही योजना तू कुठे तरी जर राबवली व ती यशस्वी केली तर मला त्या योजनेतून काही तरी मिळू शकेल आणि इतरांनाही. बिजोलियात तू जिथे होतास तिथेच आहेस. तुला किती यश मिळाले? तू काही नवीन शिकला आहेस की तुझ्या जुन्याच कल्पना तुझ्या मनात अजून घट्ट रुजल्या आहेत यावर विचार कर आणि मला संक्षिप्त उत्तर पाठव. मध्यंतरीच्या काळात मी तुझा लेख जपून ठेवत आहे. खादी, गाय, कागद तयार करणे आणि इतर ग्रामोद्योगांसंबंधी लिही. तुमच्यापैकी तिथे किती जण आहेत.

लक्षात ठेव की इतकेसुद्धा लिहिण्याकरिता मला वेळ नाही. ठरलेल्या इतर कामातून मी हा वेळ चोरून काढला आहे.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल.

------------------

# ३१. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र

सप्टेंबर २१, १९४७

चि. सतीशबाबू,

मला तुमची तार मिळाली. हेमप्रभादेवी जेव्हा मला बोलावतील तेव्हा मला कलकत्त्याला जावे लागेल. त्यानी बिसेनला लिहिले आहे. त्यांच्या पत्रावरून मला कळले की बबुआ अजून बरा नाही आणि क्षितिश बाबूही (सतीश चंद्र दास गुप्ता यांचे भाऊ) आजारी आहेत. अशा परिस्थितीत सोदेपूरकडे कोण पाहील? आपल्याला या सर्व गोष्टींचा विचार करावा लागेल. तुमची प्रकृती कशी आहे?

आशीर्वाद

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ९२८७

--------------------------

# ३२. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

हिंदू, शीख आणि मुसलमान ज्या पद्धतीने सध्या राहत आहेत त्या पद्धतीने राहू शकत नाहीत. या गोष्टीमुळे मला अतिशय वेदना होतात आणि ही परिस्थिती बदलवण्याकरिता मानवी प्रयत्नांनी जे काही करता येणे शक्य असेल ते मी करीन. मला अंतःकरणापासून जे करावेसे वाटते ते मी जर करू शकलो नाही तर मला जिवंत राहण्यात कोणताही आनंद वाटणार नाही. (एका माणसाने प्रार्थनेत अल फतेहा म्हणण्यावर आक्षेप घेतल्यामुळे बिर्लाभवनच्या हिरवळीवर प्रार्थना करता आली नाही. असे असले तरी गांधीजी श्रोत्यांना संबोधत म्हणाले की आक्षेप घेणाराशी मी चर्चा करणार आहे. सप्टेंबर २२, १९४७च्या 'हिंदुस्तान टाईम्स'प्रमाणे सभेनंतर गांधीजींनी आपल्या खोलीत प्रार्थना केली.) ईश्वराने माझ्या हातून हे काम काढून घेतले तर फारच चांगले होईल. परंतु जर असे घडणार नसेल तर माझे काम संपले असे मी समजेन. याचा अर्थ असा नाही की मी आत्महत्या करून मरणार आहे. हे खरे आहे की जे इतरांची सेवा करण्यात आपले जीवन व्यतीत करू इच्छितात त्यांच्याकरिता इतर कोणतीही कसोटी नसते. आपल्या प्रयत्नांना फळ येत नसेल तर आपण अस्वस्थ होऊ नये. परंतु आपल्या प्रयत्नांना फळ येत नसतील तर एखाद्या वृक्षाला फळ येणे बंद झाले की ते जसे वाळून जाते तसे माणसाने वाळून जायला पाहिजे. हा निसर्गनियम आहे. हिंदू तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मा अमर असतो. तो मरत नाही. ज्या शरीराचे कार्य संपलेले असते त्याचा काही उपयोग नसतो आणि त्याने नष्ट झाले पाहिजे. त्याची जागा नवीन देह घेतो. परंतु आत्मा अमर असतो आणि सेवेद्वारा मुक्ती मिळवण्याकरिता तो सतत जड रूप धारण करत असतो.

आज मी अशा ठिकाणी गेलो होतो की जिथे एका बाजूला मोठ्या संख्येत हिंदू राहत होते आणि दुसऱ्या बाजूला मोठ्या संख्येत मुसलमान. त्यांनी "महात्मा गांधी जिंदाबाद" अशा घोषणा दिल्या. त्याला काय अर्थ आहे? हिंदू आणि मुसलमान मनाने एक नसतील व शांततेत एकत्र राहू शकत नसतील तर त्याचा काय उपयोग आहे? यामुळे मला त्या घोषणा काहीशा कठोर वाटल्या. तुम्ही इतके घाबरण्याचे कारण काय असे मी त्या मुसलमानांना विचारले. अखेरीस आपल्याला मरायचे आहे आणि आपण मरणारही आहो. आपल्याला जर मारून टाकण्यात आले तर तसे इतर कोणी केलेले नसेल, आपल्या स्वतःच्याच भावाने केलेले असेल. तुम्ही हिंदूंबद्दल मनात राग ठेवू नये आणि त्यांना मारण्याचा प्रयत्न करू नये असे मी मुसलमानांना आवाहन केले. मी म्हणालो की तुम्ही कदाचित मराल परंतु घाबरून तुम्ही तुमच्या ठिकणावरून पळून जाऊ नये. परंतु महात्मा वाईट माणूस आहे आणि ज्या घरांमधून मुसलमानांना घालवण्यात आले होते त्या घरांत तो त्यांना परत आणू पाहतो असेही ते म्हणत होते. हे खरे आहे की मी त्यांना परत आणू इच्छितो. परंतु मी त्यांना कशा प्रकारे परत आणू इच्छितो? ज्यांना स्वतःहोऊन पाकिस्तानमध्ये जायचे असेल त्यांना कोणत्याही प्रकारे अडवण्यात येऊ नये. परंतु ते जर घाबरल्यामुळे जाणार असतील, सरकार आपले रक्षण करू शकत नाही असे वाटल्यामुळे जाणार असतील वा काहीही झाले तरी हिंदू आणि शीख आपल्याला वाचवणार नाहीत असे वाटल्यामुळे ते गेले तर मला वेदना होतील. जे लोक पाकिस्तानमध्ये जाऊ इच्छित नाहीत व ज्याना इथेच राहायचे आहे त्यांना मी म्हणेन की त्यांनी येथून जाऊ नये. मी त्यांना सांगितले की जे लोक येथून गेलेले आहेत त्यांनी तेव्हाच परत यावे जेव्हा हिंदू आणि शीख त्यांना तसे करण्याकरिता आनंदाने परवानगी देतील. पोलीस आणि सैन्य यांच्या मदतीने त्यांना परत आणण्याची कल्पना मला सहन होत नाही. मी त्यांना सांगतो की पोलीस आणि सैन्याच्या मदतीची कल्पना मनातून कढून टाका. आपल्याला जे करावेसे वाटते ते आपण स्वतः करू. आपल्या

नशिबी मरण असेल  तर आपण मरू. परंतु एखाद्या माणसाने समंजसपणा टाकून दिला आणि तो लोकांना मारण्याच्या हट्टाला पेटला तर मीसुद्धा माझी शुद्धबुद्ध का हरवावी? मी त्याच्या हाताने मरणे पसंत करेन. मी सरकारतर्फे बोलत नाही आहे. सरकार माझ्या हातात नाही. माझी घडण कशा प्रकारे झाली हे तुम्हांला माहीत आहे. जर कोणी वेडाच्या भरात अपकृत्यातून आनंद मिळवू लागला तरी मी तसे करू शकत नाही. चांगले कसे व्हावे हे नंतर तो माणूस माझ्याकडून शिकेल. भारतात हिंदू आणि मुसलमान मिळून ४० कोटी लोक आहेत. काही लाख मुसलमान पाकिस्तानमध्ये गेले आहेत. परंतु अजूनही भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत. बाकीचे सर्व हिंदू आहेत. पारसी, ख्रिश्चन आणि तुरळक संख्येत ज्यू आहेत. परंतु त्यांची संख्या मुश्किलीने लक्षात घेण्याइतकी आहे. अशा प्रकारे आपसात भांडून त्यांना नष्ट व्हायचे असेल तर होऊ द्या. परंतु पोलीस आणि सैन्याच्या मदतीने जर कुणाला जगावे लागणार असेल तर ते जीवन जगण्यायोग्य नक्कीच नसते. हिंदू आणि मुसलमान अशा प्रकारे आपसात भांडणार असतील तर सरकार काय करू शकेल? आम्ही अशाच प्रकारे शासन करू शकतो वा ते नको असेल तर आमची राजीनामा देण्याची तयारी आहे असे सरकारला घोषित करू द्या. पाकिस्तानमध्ये केवळ मुसलमान आहेत म्हणून भारतात केवळ हिंदू राहावे असे ज्यांना वाटते त्यांना सरकार स्थापित करू द्या. पाकिस्तानमधील लोक वेडाच्या भरात काम करत आहेत म्हणून आपणही तसेच व्हावे काय? आपली इच्छा असेल तर आपण असे करू शकतो. समजा की एक मित्र आहे आणि त्याला मी शिव्या देतो. प्रत्युत्तर म्हणून तो मला त्याहून जास्त शिव्या देतो. हे ठीक आहे. परंतु मी त्याच्या शिव्या शांतपणे ऐकून घेतल्या तर तो किती वेळ मला शिव्या देत राहील? त्याने मला जर मारले तर तेही मी सहन करीन. त्याने उगारलेल्या हाताच्या विरोधात मी हात उगारणार नाही. अशा परिस्थितीत काय होईल हे तुम्हाला माहीत आहे काय? मी पाहिले आहे की माणसाने हवेत आपला हात उगारला तर त्याच्या स्वतःच्याच हाताला इजा

होते. इतकेच नाही तर मुष्टियोद्धासुद्धा चोथा भरलेल्या मोठ्या उशीवर प्रहार करून आपला सराव करतो. परंतु तो मुष्टियोद्धा आपल्यासमोर एखादी मूर्त गोष्ट ठेवणार नसेल तर तो असहाय होतो व काहीही करू शकत नाही. मी जे तुम्हाला सांगितले ते त्रिवार सत्य आहे. परंतु मीच एकटा खंबीरपणे त्याला चिकटून आहे. आजकाल लोक या मार्गाचे अनुसरण करत नाहीत. या सत्यावर खंबीरपणे उभे राहण्याची माझ्यात क्षमता असेल की नाही हे केवळ ईश्वरालाच माहीत. आज मी अगदी साधा मुद्दा मांडत आहे. जे मुसलमान घर सोडून गेले ते आता जिथे असतील तिथेच त्यांनी राहावे, परंतु त्यांना खाऊ घालावे लागेल. त्यांची उपासमार करून आता तुम्ही पाकिस्तानमध्ये जा असे आपण त्यांना म्हणू शकत नाही. असे करून आपण युद्धाकरिता पार्श्वभूमी तयार करतो. कॉंग्रेस सरकार खरोखरी देशाच्या सेवेकरिता आहे, पैशाकरिता नाही आणि सत्तेकरिताही नाही. ते एका वा दोन समुदायांकरिता नाही तर सर्व समुदायांकरिता आहे. लोक जर संतापलेले असतील व या सरकारच्या सेवेने त्यांचे समाधान होत नसल्यामुळे या सरकारला आपली सेवा करू देत नसतील तर या सरकारने राजीनामा दिला पाहिजे आणि मग ज्यांना भारतात केवळ हिंदूच पाहिजे त्यांचे सरकार स्थापन होऊ दिले पाहिजे. परंतु यामुळे हिंदू धर्म आणि हिंदुस्तान या दोघांचाही विनाश होईल. आपण पाकिस्तानला विसरू या. त्याला जे करायचे असेल ते करू द्या. भारताबद्दल आपण विचार करू या. असे झाले तर संपूर्ण जग आपले कौतुक करील व आपली साथ देईल. असे झाले नाही तर आजपर्यंत जे जग आपल्याकडे आशेने पाहत होते ते दुर्लक्ष करू लागेल. जगातील देश भारताला असा महान देश समजत होते की जिथे भ्रष्टाचार न करणारे सुसंस्कृत लोक राहतात. ती श्रद्धा आता नाहीशी होईल. तुम्हांला हवे तसे तुम्ही वागू शकता. परंतु अशा वर्तनामुळे कोणाचेही भले होणार नाही असे मी जिवंत असेपर्यंत तुम्हांला सांगत राहीन आणि तुम्हांला सावध करत राहीन.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन -१, पृष्ठ ३३१-४

-------------------

## ३३. मौनवारी लिहिलेली चिठ्ठी

(सप्टेंबर २१. १९४७ला वा त्यापूर्वी)

(बहुधा हे मीराबेन याना लिहिले असावे. हे सप्टेंबर २१, १९४७ला लिहिलेल्या गुजराती पत्राच्या मागील भागावर आहे.)

हे काही पूर्वीचे दिवस नाहीत. आता इथे चक्रात चक्र आहेत. हसतमुख चेहऱ्याने तुझे स्वागत करणाऱ्या सैनिकांचे मैत्रीपूर्ण चेहरे पाहण्याशिवाय विशेष काहीही नसलेल्या परिस्थितीत तू काही विशेष सेवा करू शकणार नाही. ही माझी प्रतिक्रिया आहे. ही गोष्ट माझ्या मार्गापेक्षा वेगळी आहे आणि आज माझा मार्ग कोणालाही आवडणारा नाही.

मूळ इंग्रजीवरून, सी. डब्ल्यू. ५४८३, सौजन्य मिराबेन. शिवाय जी. एन. ९४८२

--------------------

# ३४. माझे कर्तव्य

(याचे मूळ गुजराती सप्टेंबर, २८, १९४७च्या हरिजनबंधूच्या अंकात प्रकाशित झाले होते.)

'हरिजन' वृत्तपत्रे चालवण्यासंबंधीच्या माझ्या कर्तव्याविषयी हे शीर्षक आहे. माझ्या चौकशीला बऱ्यापैकी लोकांनी उत्तर पाठवले. (पाहा हरिजन, सप्टेंबर २८, १९४७) काही अपवाद वगळता बहुतेक वाचकांना 'हरिजन' वृत्तपत्रे सुरू राहावी असे वाटते. वाचकांना आजच्या विषयांवर माझी मते हवी आहेत, हा प्रामुख्याने त्यांचा आशय होता. याचा अर्थ माझ्या मृत्यूनंतर यांची आवश्यकता उरणार नाही.

माझा मृत्यू तीन प्रकारे होऊ शकतो.

१. नेहमीप्रमाणे शरीर झिजणे.

२. केवळ डोळ्यांची हालचाल होते परंतु बुद्धी काम करत नाही.

३. शरीर आणि बुद्धी काम करतात परंतु मी सार्वजनिक जीवनातून निवृत्त होतो.

पहिल्या प्रकाराने प्रत्येकाचा मृत्यू होतो - काही आज मरतात, काही उद्या. त्याचा विचार करण्याची गरज नाही.

दुसऱ्या प्रकाराची इच्छा कोणीही करत नाही व करू नये. मला तरी अशा जड अवस्थेची इच्छा नाही. हे पृथ्वीवर ओझे होईल.

तिसऱ्या प्रकाराचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. माझ्या सक्रिय जीवनाचा काळ आता संपला आहे असे काही लोक सुचवतात. गेल्या १५ ऑगस्टला भारताचे नवजीवन सुरू झाले. या युगात मला कोणतेही स्थान नाही. हे सांगताना ज्या प्रकारे शब्दरचना करण्यात आली त्यात मला राग दिसतो. त्यामुळे तिला माझ्या दृष्टीने कमी महत्त्व आहे. या निष्कर्षावर मी स्वतंत्रपणे पोहोचलो आहे. 'हरिजन' पत्रे नवजीवन ट्रस्टतर्फे

चालवली जातात व प्रकाशित होतात. विश्वस्तांना जेव्हा इच्छा असेल तेव्हा ते ती बंद करू शकतात. त्यांना तो पूर्ण अधिकार आहे. अशा प्रकारे बंद करण्याचा त्यांचा कोणताही विचार नाही. माझी जीवनरेषा सक्रिय राजकारणातच घडली आहे. मी अजून "कर्मात अकर्मा"च्या अवस्थेत पोहोचलो नाही. (पाहा "कर्मात अकर्म", ऑक्टोबर १६, १९४७) यामुळे असे दिसते की माझे जे काम सुरू ते सध्या तरी तसेच शेवटच्या श्वासापर्यंत सुरू राहील. आणि ते परस्परांशी संबंध नसलेल्या वेगवेगळ्या विभागात त्याचे विभाजन करता येईल असेही वाटत नाही. त्याचे मूळ सत्यात आहे ज्याला अहिंसेच्या रूपात ओळखतो. यामुळे ही वृत्तपत्रे जशा स्वरूपात आहेत तशीच सुरू ठेवली पाहिजे. "माझ्याकरिता एक पाऊल पुरे".

हरिजन, सप्टेंबर २८, १९४७.

------------------

# ३५. प्रार्थनाप्रवचन

(गांधीजींचा मौनवार असल्यामुळे त्यांचे हिंदुस्तानीतील लेखी भाषण सभेत वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर २२, १९४७

एका माणसाच्या आक्षेपासमोर शरणागती पत्करून सार्वजनिक प्रार्थना करणे मी थांबवले हे मी योग्यच केले असे मला वाटत होते. (मागील दिवशी घडलेल्या घटनेविषयी गांधीजी बोलत होते. पाहा प्रार्थानाप्रवचन, सप्टेंबर २१, १९४७ ची पहिली टीप - एका माणसाने प्रार्थनेत अल फतेहा म्हणण्यावर आक्षेप घेतल्यामुळे बिर्लाभवनच्या हिरवळीवर प्रार्थना करता आली नाही. असे असले तरी श्रोत्यांना संबोधत गांधीजी म्हणाले की आक्षेप घेणाऱ्याशी मी बोलणार आहे. सप्टेंबर २२, १९४७च्या हिंदुस्तान टाईम्सप्रमाणे सभेनंतर गांधीजींनी आपल्या खोलीत प्रार्थना केली.) या प्रसंगाचे या ठिकाणी थोडे अधिक विश्लेषण करणे चूक ठरणार नाही. ही प्रार्थना सार्वजनिक होती याचा अर्थ या प्रार्थनेत येण्याकरिता कोणालाही मनाई नव्हती. ती खाजगी जागेत होती. त्या प्रार्थनेला त्याच लोकांनी येणे उचित होते ज्यांचा कुराणमधील आयतींसह केल्या जाणाऱ्या प्रार्थनेवर अंतःकरणापासून विश्वास होता. खरे म्हणजे सार्वजनिक ठिकाणी घेतलेल्या प्रार्थनेला उपस्थित राहणारांकरितासुद्धा हा नियम लागू होतो. प्रार्थनासभा म्हणजे काही वादविवाद मंडळ नाही. एकाच जागेवर विविध धर्मांचे लोक प्रार्थना करत आहेत अशी कल्पना करता येऊ शकते. ज्याला एखादी प्रार्थना पसंत नसेल त्याने तेथून निघून जावे यात सौजन्य आहे. असे केले नाही तर कोणतीही सभा व्यत्ययाशिवाय घेणे कठीण होऊन जाईल. व्यत्यय ही दैनंदिन बाब झाली तर आराधनास्वातंत्र्य, इतकेच नाही तर जाहीर भाषण या गोष्टी थट्टेचा विषय होऊन जातील. सुसंस्कृत समाजात मुलभूत अधिकाराच्या रक्षणाकरिता बंदुकीच्या संरक्षणाची गरज पडू नये. ही गोष्ट सर्वांनी मान्य केली पाहिजे.

काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात प्रदर्शनाकरिता जे मैदान तयार करण्यात येत असते तिथे विविध धर्माचे आणि राजकीय पक्षांचे लोक आपापल्या सभा घेत असतात व त्यांत वेगवेगळी आणि काही वेळा तर विरोधी मते व्यक्त करत असतात. परंतु असे होत असतानाही कोणत्याही प्रकारचा उपद्रव न होता व पोलिसांच्या संरक्षणाची आवश्यकता न पडता त्या सभा होत असताना पाहून मी अतिशय आनंदित होत असे. ती निरोगी सहनशीलता आता कुठे गेली?  की आपल्याला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपण त्याची परीक्षा शिवीगाळ करून पाहतो आहो? त्यांनी मूलभूत नियम तोडले आहेत व लोकांना निषेध करण्याकरिता उत्तेजित केले आहे. राष्ट्राच्या जीवनात ही तात्कालिक अवस्था आहे अशी आशा आपण करू या. हे सर्व मुस्लिम लीगच्या गैरवर्तनामुळे आहे असे जे मला अनेकदा सांगितले जाते तसे सांगू नका.

हे म्हणणे खरे आहे असे गृहीत धरले तरी आपली सहनशीलता इतक्या कच्च्या पायावर उभी आहे काय की तिला थोडीशीही वेगळी गोष्ट सहन होऊ नये? शालीनता आणि सहनशीलता यांना जर काही किंमत असेल तर त्यांना कठिणात कठीण कसोटीतून पार पडता आले पाहिजे. असे शक्य नसेल तर भारताकरिता तो दुर्दैवी दिवस असेल. आपण स्वातंत्र्याकरिता पात्र नाही असे आपल्या टीकाकारांना, आणि ते कमी नाहीत, म्हणण्याची संधी देऊ नका. अशा प्रकारच्या टीकारांना उत्तर देण्याकरिता माझ्या मनात अनेक युक्तिवाद आले. परंतु त्यामुळे माझे क्वचितच समाधान झाले असेल. त्यामुळे भारतावर प्रेम करणारा म्हणून माझ्या अहंकाराला धक्का लागला, आमच्या लक्षावधी सहनशील लोकांच्या एकीकृत संस्कृतीला धक्का लागला हे आपोआपच सिद्ध होते.

जर भारताला अपयश आले तर आशिया मरेल. विविध संस्कृतीच्या संमिश्रणाची तो रोपवाटिका आहे असे जे आशियाला अनुलक्षून म्हणतात ते सार्थच आहे. जगातील

पिळवणूक होणाऱ्या सर्व राष्ट्रांच्या आशेचे, मग ते आशिया, आफ्रिका वा जगातील कोणत्याही भागातील असो, भारत केंद्रस्थान असायला पाहिजे.

याच गोष्टीमुळे लपवलेल्या विनापरवाना हत्यारांची समस्या मला भेडसावू लागते. काहींचा निश्चितपणे शोध लागला आहे. काही थेंबाथेंबाप्रमाणे मला सोपवली जात आहेत. सर्व प्रकारच्या साधनांनी आपण ती शोधून काढू या. जोपर्यंत मला माहीत आहे आतापर्यंत बाहेर आलेली शस्त्रे दिल्लीच्या मानाने काहीही नाहीत. ब्रिटिशांच्या राज्यात लोक लपवलेली शस्त्रे ठेवत होते. तेव्हा त्यांची कोणीही काळजी करत नव्हता. एखाद्या विशेष ठिकाणी शस्त्रसाठा वा दारुगोळा लपवलेला आहे अशी तुमची खात्री झालेली असेल तर त्याचा सर्व साधनांनिशी शोध घेण्यात यावा. अशा वेळी कोणी कितीही ओरड केली तरी त्याची काळजी करण्याचे कारण नाही. आपण जर राजकीय दृष्टीने स्वतंत्र असू तर आपण ब्रिटिशांकरिता एक नियम आणि आपल्याकरिता वेगळा नियम लावू नये. कुत्र्याला मारायचे आहे म्हणून त्याला वेड लागले असे म्हणू नये. हे सर्व सांगितल्यानंतर मी म्हणेन की साठ वर्षांच्या मेहनतीनंतर आपण जे स्वातंत्र्य मिळवले त्याला पात्र होण्याकरिता आपण आपल्यासमोर कितीही कठीण अडचणी असल्या तरी त्यांना शौर्याने तोंड देऊ या. त्यांना धैर्याने तोंड दिल्यामुळे आपण अधिक पात्र आणि उदात्त ठरू या. अल्पसंख्याक देशद्रोही होतील या भीतीने बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांना मारणे वा त्यांना नष्ट करणे हा भ्याडपणा आहे. अल्पसंख्याकांच्या हक्काबद्दल बहुसंख्याकांनी काटेकोरपणे लक्ष ठेवणे हे त्यांना शोभते. आणि त्याकडे दुर्लक्ष केले तर बहुसंख्य समाज हास्यास्पद होतो. स्वतःबद्दल कणखर श्रद्धा व विरोधकांवर शौर्याने तथाकथित वा खरा विश्वास टाकणे हे सर्वोत्तम संरक्षण आहे. यामुळे मी विनंती करतो की दिल्लीतील सर्व हिंदू, शीख, आणि मुसलमानांनी एकत्र येऊन मैत्रीपूर्ण वातावरणात भेटावे आणि असे करून त्यांनी उर्वरित भारतासमोर वा जगासमोर एक आदर्श ठेवावा असे मी म्हणू शकेन काय? भारतातील इतर

भागांनी काय केले वा ते काय करताहेत हे दिल्लीने विसरावे. असे झाले तरच खाजगी बदला आणि सूड यांचे दुष्टचक्र तोडण्याचा दावा दिल्ली अभिमानाने करू शकेल. जर त्यांचा कुणाशी संबंध असेल तर तो राज्याशी आहे, एक व्यक्ती म्हणून त्यांचा नागरीकांशी संबंध नाही.

हरिजन, ऑक्टोबर ५, १९४७

-------------------

# ३६. एक पत्र

दिल्ली,

सप्टेंबर २३, १९४७

प्रिय भगिनी,

काल रात्री तुमचे पत्र मिळाले. त्या वेळी सरदार माझ्याबोबर असल्यामुळे मी ते त्यांना दाखवले. नंतर जवाहरलाल नेहरू आले. सरदार म्हणाले की मी काहीही करू शकत नाही. नेहरू म्हणाले की तिथे काम आहे हे खरे परंतु तुम्ही काय करू शकाल हे मला कळत नाही. अंतिम निर्णय घेणारे डॉ. गोपिचंद आहेत. मी त्यांच्या संपर्कात नाही. यामुळे जे काही करायचे असेल ते तुम्हीच सरळ सरळ करा.

प्रेम

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

--------------------

# ३७. नाराणदास गांधी यांना पत्र

सप्टेंबर २३, १९४७

चि. नाराणदास,

हे वक्तव्य ठीक वाटते. तुझी इच्छा पूर्ण होवो. ते काहीही असले तरी एक गोष्ट लक्षात ठेव की हा यज्ञ कोणीही मेहनतमजुरी करून करण्यासारखी गोष्ट वाटायला नको. (चरखा यज्ञ वा चरखा द्वादशी. विक्रम पंचांगाप्रमाणे भाद्रपद वद्य द्वादशीला निरंतर सूतकताई करून हा दिवस साजरा केला जात असे.) याचे महत्त्व जास्तीत जास्त लोकांनी यात सहभागी होण्यावर अवलंबून आहे. परंतु ती वेळ येईपर्यंत जे लोक यात सहभागी होतात त्यांनी आपली सर्व शक्ती यात लावली पाहिजे. परंतु कोणीही इतकी शक्ती लावू नये की यामुळे तो वा ती अगदी थकून जाईल.

आशीर्वाद

बापू

मुळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ८६४५ सौजन्य नाराणदास गांधी

---------------------

# ३८. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

असे म्हणतात की प्रार्थना ही काही साधी गोष्ट नाही. ती काही तरी उदात्त गोष्ट आहे. आपल्या आयुष्यात आपण किती तरी गोष्टी बोलत असतो, २४ तासात आपण बरेच काही बोलत असतो. आपण अपराध करतो व वेड्याप्रमाणे पैशामागे धावत असतो. यामुळे आपण काही तरी प्रार्थना करू या. आपण सर्व जर एकत्रितपणे प्रार्थना करू शकलो तर ती महान गोष्ट होईल. ईश्वर एक आहे या भावनेने ४० कोटी लोकांनी त्यांच्या स्वतःच्या भाषेत जर प्रार्थना केली तर ती फार मोठी गोष्ट होईल. आणि मग त्या प्रार्थनेत काही कडवे कुराणातील आहेत की काय याची आपण फिकीर करणार नाही. जे लोक कुराणमधील आयती म्हणण्यावर आक्षेप घेतात ते तसे रागात करतात. (सप्टेंबर २४, १९४७च्या हिंदुस्तान टाईम्सप्रमाणे प्रार्थना सुरू करण्यापूर्वी कुणाचा कुराणातील आयती म्हणण्यावर आक्षेप आहे काय असे गांधीजींनी श्रोत्यांना विचारले. कोणाचाही आक्षेप नव्हता.) परंतु मुसलमान हिंदूंना आणि शिखांना त्रास देत असल्यामुळे व त्यांची हत्या करत असल्यामुळे आपण कुराणवर राग काढावा काय? मुसलमानांनी जे केले ते चांगले नाही परंतु कुराणने आपले काय बिघडवले? ईश्वराचा एक भक्त पाप करत असेल तर आपण त्याचा जप करणे बंद करावे काय? ईश्वर एक आहे. हिंदू वाईट आहेत असे जर जर ईश्वरभक्त म्हणत असतील तर त्याचा अर्थ गीता वाईट आहे असा होतो काय? शिखांनी जर काही वाईट गोष्ट केली असेल तर आपण ग्रंथ साहेब वाचणे बंद करणार काय? शिखांना जर वेड लागले तर हिंदू, मुसलमान आणि पारसीही वेड्याप्रमाणे करणार काय? धर्म व धर्माच्या नावावर केलेले सर्व प्रकारचे बलिदान हे चिरंतन राहतील. रावळपिंडीहून माझ्याकडे आलेले काही लोक मजबूत, धडधाकट आणि शूर होते व ते फार मोठे

व्यावसायिक होते. रावळपिंडीची उभारणी शीखांनी आणि हिंदूंनी केली आहे. हीच गोष्ट लाहोरसंबंधीही आहे. आणि संपूर्ण पाकिस्तान मुसलमानांनी उभारले आहे काय? आज जो काही पाकिस्तान आहे तो सर्वांनी मिळून उभारला आहे, कोणा एका समुदायाने नाही. भारत हिंदूंनी उभारला आहे कारण इथे इतक्या मोठ्या संख्येत हिंदू राहतात असे म्हणणे योग्य होणार नाही. त्याची उभारणी हिंदू, मुसलमान, शीख, पारसी आणि ख्रिश्चन या सर्वांनी केली आहे. आज जो भारत आहे त्याच्या उभारणीत या सर्वांचा हातभार लागला आहे. मी या मित्रांना सांगितले की तुम्ही शांत राहा आणि अखेरीस प्रत्येक गोष्टीची काळजी घेण्याकरिता ईश्वर आहेच. असे एकही ठिकाण नाही की जिथे ईश्वर नाही. ईश्वराची प्रार्थना करा, त्याच्या नावाचा जप करा आणि मग सर्व काही ठीक होईल. पाकिस्तानमध्ये जे आहेत त्यांचे आम्ही काय करावे असे ते मला विचारतात. उलट मी त्यांना विचारतो की तिथे जिव देण्याऐवजी तुम्ही इथे का आला. कितीही अत्याचार झाले तरी आपण जिथे आहो तिथेच राहिलो पाहिजे आणि मेलो पाहिजे. लोक जर आपल्याला मारण्याकरिता येत असतील तर आपण मरू या. परंतु आपण धैर्याने ईश्वराचे नाव घेत मरू. हीच गोष्ट मी मुलींना शिकवली आहे. ईश्वराचे नाव ओठांवर ठेवून मरण्याची कला तुम्ही शिका. एखादा असा दुष्ट माणूस असू शकेल की ज्याला वास्तव काय आहे हे जाणून घेण्याची इच्छा नसेल. तो हिंदू , शीख, वा अजूनही कोणी असू शकेल - परंतु कमीत कमी तुम्ही त्याला घाबरण्याचे नाकारू शकता. त्याने जर पैसे देऊ केले तर तुम्ही त्याला म्हणू शकता की पाच मिनिटांनी मारण्याऐवजी तू आम्हाला आताच मारून टाक परंतु आम्ही तुला शरण जाणार नाही. तुम्ही त्याला पैशाकरिता आत घेता कामा नये. जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मी मुलींना हाच सल्ला देत राहीन. मी त्यांना इतर कोणताही सल्ला देऊच शकत नाही. मी ईश्वराला विसरू इच्छित नाही. यामुळेच मरण्याच्या कलेतच सर्वात मोठे धैर्य असते असे मी म्हणत असतो. तुम्ही जर मरण्याची कला शिकणार नसाल तर तुम्ही मरणाच्या आधीच मराल. कोणीही आपल्या

वेळेच्या आधी मरावे अशी माझी इच्छा नाही. मुसलमानांनासुद्धा मी सांगत असतो की तुम्ही तुमची घरे सोडू नका. यापेक्षा जिथे तुम्ही आहा तिथे मरण पत्करा. रावळपिंडीच्या लोकांना मी हीच गोष्ट सांगितली. तुम्हांला शक्य असेल ते सर्व तुम्ही करा अशी विनंती मी सरकारला करीन. मी त्यांना सांगितले की तुम्ही आता इथे आलेले आहात तर तुम्ही शिबिरात जा आणि तिथे काम करा. मी त्यांना म्हणालो की तुम्ही धडधाकट माणसे आहा आणि तुम्ही धीर सोडायला नको. तुम्ही स्वतःला असहाय समजू नये व राहण्याकरिता जागा नाही म्हणून दुःख करू नये. मी त्यांना सांगितले की तुम्हांला राहण्याकरिता आधीच जागा मिळालेली आहे. धरतीमाता आपले घर आहे आणि डोक्यावरील आकाश आपले छप्पर. जे मुसलमान घाबरून गेलेले आहेत त्यांनी त्यांची घरे आणि जमीन माघारी सोडली आहे. तुम्ही मुसलमानांच्या घरात राहा असे मी त्या निर्वासितांना सांगायला पाहिजे काय? अशा प्रकारचे मी काहीही सांगू शकत नाही. पूर्वीप्रमाणेच आजही ती घरे मुसलमान घरमालकांचीच आहेत. ते घाबरून पळाले आहेत. ते जर स्वतःहून गेले असते व आम्ही पाकिस्तानमध्ये सुखासमाधानात राहू असे त्यांना वाटत असेल तर त्यांना तिथे सुखात राहू द्या. त्यांना दुखवू नका. त्यांना शांततेत जाऊ द्या. त्यांनी त्यांची संपत्ती आणि दागदागिने सोबत न्यावे. त्यांनी सोडलेली घरे सरकारच्या ताब्यात असतील तर सरकारला त्यांचे जे काही करायचे असेल ते ते करील. आपले शरणार्थी तिथे जाऊन त्या घरात राहू लागतील तर ते उचित होणार नाही. एक गोष्ट मला स्पष्टपणे माहीत आहे. मला जर तुम्हाला इथून जाऊ द्यायचे असेल तर तुम्ही मजबूत आणि धैर्यशाली असायला पाहिजे आणि मी सांगतो तसे करायला पाहिजे. मला पंजाबला जायचे आहे. मला लाहोरला जायचे आहे. मला पोलिसांच्या वा सैनिकांच्या संरक्षणाखाली जायचे नाही. केवळ ईश्वरावर विसंबून मला एकट्याला जायचे आहे. तेथील मुलमानांवरील विश्वास आणि श्रद्धेच्या भावनेने मला तिथे जायचे आहे. त्यांची इच्छा असेल तर त्यांना मला मारू द्या. ईश्वराने त्यांच्यावर कृपा करावी

अशी शांतपणे प्रार्थना करत मी हसतहसत मरेन. आणि ईश्वर त्यांच्यावर कृपा कसा करील? त्यांना चांगले करून. त्यांना चांगले करण्याचा ईश्वराजवळ एकमेव उपाय आहे त्यांची अंतःकरणे शुद्ध करण्याचा. मला शत्रू समजणाऱ्या एकाही माणसाबद्दल माझ्यात जर शत्रुत्वाची भावना नसेल तर आणि तरच ईश्वर माझे ऐकेल. असे झाले की तो माणूसच विचारेल की या माणसाला मारून मी काय मिळवणार आहे. मी त्याचे काय नुकसान केले हा विचार तो करू लागेन. त्यांना जर मारायचे असेल तर तसे करण्याचा त्यांना अधिकार आहे. म्हणूच मला लाहोरला जायचे आहे, रावळपिंडीला जायचे आहे. सरकारला मला थांबवायचे असेल तर थांबवू द्या. परंतु सरकार मला कसे थांबवील? त्यांना जर मला थांबवायचे असेल तर त्यांना मला मारावे लागेल. त्यांनी जर मला मारले तर माझा मृत्यू तुमच्याकरिता एक उदाहरण होईल. त्यामुळे मला फार आनंद मिळेल. कोणता धडा तुम्हाला मिळेल? तो धडा असेल मी मरेन परंतु मी कोणाचेही अनहित चिंतणार नाही.

ध्रुव केवळ मुलगा होता. त्याने ईश्वराची प्रार्थना केली. प्रह्लादचे काय? तो कवळ बारा वर्षांचा मुलगा होता. त्यानेसुद्धा तेच केले. आणि आपण सर्व त्यांचे वंशज आहो. ज्यांना ग्रंथसाहेब माहीत असेल त्यांना माहीत असेलच की आपल्यामध्ये कुणाबद्दलही दुर्भावना असू नये, कोणाच्याही विरोधात आपण तलवार उपसू नये असे गुरू नानक साहेबांनी शिकवले आहे. सर्वात मोठे शौर्य धैर्याने मरण पत्करण्यात आहे. आपले लोक जर या पद्धतीने मरण पत्करतील तर आपण कुणावरही रागावू नये. मरणाबद्दल त्या लोकांचे आपण गुणगान केले पाहिजे व ईश्वराने आपणा सर्वांना अशी संधी द्यावी अशी प्रार्थना केली पाहिजे. आपली ही प्रार्थना अंतःकरणापासून असली पाहिजे. रावळपिंडीच्या लोकांना मी जे सांगितले होते तेच मी तुम्हाला सांगतो आहे. मी त्यांना सांगितले की तुम्ही शिबिरात जा आणि हिंदू आणि शीख शरणार्थ्यांना भेटा. तुम्ही स्वतःहोऊन परत जायला पाहिजे, पोलिसांच्या वा सैन्याच्या संरक्षणाखाली नाही. दिल्लीत तुम्ही भांडण थांबवले तर मी

समजेन की ईश्वराने माझी प्रार्थना ऐकली. मग परमेश्वराच्या कृपेने मी पंजाबमध्ये जाईन. एकदा का दिल्लीत शांतता प्रस्थापित झाली की मग मी इथे एक दिवसही थांबणार नाही. मी इथे मौजमजेकरिता थाबलेलो नाही. मी इथे थांबलो आहे सेवा करण्याकरिता. इथे पेटलेली आग विझवण्याकरिता माणूस जे काही करू शकतो ते सर्व करण्याकरिता मी इथे थांबलेलो आहे. यामुळे तुम्ही कसे जगावे व काय करावे म्हणजे तुमच्या जीवनाचा सुगंध संपूर्ण भारतात व जगात पसरेल हे मी तुम्हाला आणि रावळपिंडीहून आलेल्या मित्रांना सांगू इच्छितो.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३३७-४०

---------------

## ३९. एक पत्र

सप्टेंबर २४, १९४७

प्रिय भगिनी, (मायना वगैरे हिंदीत आहे.)

सकाळच्या प्रार्थनेनंतर ब्रिजकृष्णने लगेच मला तुमचे पत्र दिले.

मागे काय घडले ते मला आठवत नाही. मला संदर्भही कळत नही. मी एकटा जरी असलो तर मला वर्तमान कळू शकत नाही. ना तर वैशिष्ट्यपूर्ण हिंदू मानसिकतेत मी सहभागी व्हायला पाहिजे ना मी कुणाला मारले पाहिजा वा नष्ट केले पाहिजे. बेशिस्त सहजप्रेरणा माणसाला दानवीपणाकडे नेऊ शकते. वाट पाहा, निरीक्षण करा आणि प्रार्थना करा

(पुढील हिंदीत आहे.)

आशीर्वाद

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

-----------------

## ४०. डॅनिअल थॉमस यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर २४, १९४७

प्रिय डॅनिअल,

तुम्ही अजून आठ जिल्ह्यांमध्ये दारुबंदी करत आहा ही निश्चितच चांगली गोष्ट आहे. जोपर्यंत संपूर्ण प्रांतात दारुबंदी होत नाही तोपर्यंत विश्रांतीकरिता वेळ नाही. (दारुंबदी) कायद्याबरोबरच मी हरिजनमध्ये एकदा सांगितलेले रचनात्मक आणि शैक्षिणिक कार्यक्रमही तुम्ही राबवता की नाही? (पाहा मादक पदार्थांची बंदी, सप्टेंबर ८, १९४७)

इंग्रजी प्रतीवरून. प्यरेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल. शिवाय द हिंदू, ऑक्टोबर ११, १९४७

------------------

# ४१. कमलनयन बजाज यांना पत्र

सप्टेंबर २४, १९४७

चि. कमलनयन,

धर्मानंद (कोसंबी) स्मृतीनिधीकरिता १००० रुपये दिले परंतु योग्य पद्धतीने ते चालवण्याकरिता २५,००० रुपये पाहिजे. तू तो पैसा गोळा कर. तू जर तसे करू शकशील तर मला लिही. वडिलांनी (जमनालालजी बजाज) हिंदुस्तानी प्रचार (सभा) चालवण्याची सर्व जबाबदारी घेतली आहे. तीसुद्धा तू घेतली पाहिजे. याबद्दल काकासाहेबांशी बोल आणि नंतर मला लिही.

हिंदी प्रतीवरून, प्यारेला ल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

------------------

# ४२. अमृतलाल टी. नानावटी यांना पत्र

(नानावटी यांना बिसेन यांनी लिहिलेल्या पत्रातील हा उतारा आहे. शिवाय पुढील विषय पाहा.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर २४, १९४७

आता मला एकूण रक्कम सांगा आणि मी त्याची व्यवस्था करेन. किती दिवसात हे मला माहीत नाही. माझ्या मृत्यूनंतर सर्व जबाबदारी तुम्हा लोकांवर राहील. व तुम्हांला ती योग्य रीतीने पार पाडावी लागेल.

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०८१५

-----------------

## ४३. द. बा. कालेलकर यांना पत्र

सप्टेंबर २४, १९४७

चि. काका,

धर्मानंद (कोसंबी) स्मारकासंबंधीचे तुमचे काम सुरू ठेवा. मी २५,००० रुपये गोळा करीन. आताच मी त्यासंबंधी आणि हिंदुस्तानी प्रचारसंबंधीही (सभा) कमलनयनला लिहीत आहे. (पाहा याआधीचा विषय कमलनयन बजाज यांना पत्र, सप्टेंबर २४, १९४७) मला हिंदुस्तानी प्रचारासंबंधी अमृतलालकडूनही पत्र आले आहे व बिसेनला मी त्याचे उत्तर देण्याकरिता सांगितले आहे.

धर्मानंदजींसंबंधी गैरसमज झाल्याचे जे तुम्ही लिहिले आहे त्याचा अर्थ काय ते मला कळले नाही. या विषयाबद्दल मी आधी जे सांगितले त्यापेक्षा आता मी काही वेगळे सांगितले म्हणजे काय हे मला काहीही कळत नाही. माझे शब्द परत घेण्याचा माझा निश्चितच विचार नाही. पैसा गोळा करण्याची जबाबदारी मी तुमच्यावर टाकली नाही व ती टाकण्याचा माझा विचारही नाही. परंतु जर या योजनेत तुम्ही रस दाखवला नसता तर मी ही जबाबदारी घेतली नसती असे मला वाटते हे खरे आहे. परंतु यात मला विसंगती दिसत नाही. मला परत स्पष्ट करून सांगा. माझ्याकडून काही चूक असेल तर मी ती कबूल करेन. माझी स्मरणशक्ती जशी होती तशी आता नाही हे मी कबूल केलेच आहे. मी माझ्या मर्यादा मान्य केल्यानंतर परत त्यांची आठवण करून देण्याचे कारण नाही.

या योजनेअंतर्गत अध्यक्ष, सचिव, चपराशी अशा सर्व भूमिका तुम्ही एकट्याने कराव्या हे तुम्हाला शोभेसेच आहे. परंतु तुम्ही जर बाळासाहेब वा कझिन्सला (डॉ. जेम्स एच. कझिन्स) वा रुक्मिणीबेनला वा सोफिया वाडिया यांना यात घेऊ शकलास तर अधिक बरे होईल. तुला जे योग्य वाटेल ते कर.

हिंदुस्तानी प्रचार कार्याकरिता (पाहा हिंदुस्तानी, सप्टेंबर २७, १९४७) आपण केंद्र सरकारला कोणतेही अनुदान मागू नये याबद्दल मी ठाम आहे. सुंदरलाल वा उर्दू अंजुमनला ते घेऊ दे. आपण त्यांचे उदाहरण गिरवण्याची आवश्यकता नाही.

मुसलमानांबद्दल तू जे लिहिलेस त्याच्याशी मी सहमत आहे. शक्य झाले तर येत्या अंकातच मी या विषयावर लिहीन.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०९९१, प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल.

--------------------------

# ४४. रामेश्वरी नेहरू यांना पत्र

सप्टेंबर २४, १९४७

चि. रामेश्वरी,

तुम्ही इतक्यात पाठवलेली सर्व पत्रे मिळाली. त्यांतील सर्वात दीर्घ पत्रही मी वाचले आणि तेही काळजीपूर्वक. माझे अंतःकरण तुमच्याबरोबर आहे, परंतु येथील आग विझल्याशिवाय मी हे ठिकाण सोडू शकत नाही.

ब्रिजलालचीसुद्धा सर्व पत्रे मला मिळाली. मी ती जवाहरलाललाही दाखवली. तिथे तुमच्या सेवेची गरज नसेल तर तुम्ही तुमच्या आईची भेट घेतल्यानंतर नक्कीच इथे येऊ शकता. इथेसुद्धा भरपूर काम आहे. हरिजनमध्ये राहणे केव्हाही उत्तम होईल. जवळच निर्वासित शिबीर आहे.

हिंदी प्रतीवरून, प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

-----------------------

# ४५. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज तुम्ही जे भजन ऐकले ते आजच्या परिस्थितीला लागू आहे. आज आपण सर्व आपले वर्णन 'फुटलेली नाव' असे करू शकतो. आणि मग आपण ईश्वराला प्रार्थना करतो की हे देवा आम्हांला किनाऱ्यावर पोहोचव. म्हणजे त्याच्या कृपेशिवाय आपण किनाऱ्यापर्यंत पोहोचू शकत नाही. आपल्या देशाची आज हीच परिस्थिती आहे आणि मला तर ती रोजच असल्यासारखी दिसते. कसा का होईना आपल्या समाजामध्ये कमालीचा द्वेषभाव रुजला आहे. हिंदू आणि मुसलमान यांच्या अंतःकरणात इतका काही क्रोध भरलेला आहे की दिल्लीत मुसलमानांना राहू देण्याकरिता आमची तयारी नाही. पाकिस्तानमधून हिंदू आणि शीख यांना बाहेर काढण्यात आले. इतकेच नाही तर लहान मुलांच्या मनांतही विष भरवण्यात आले असल्याचे मी ऐकतो. हा सर्व मुस्लिम लीगच्या प्रचाराचा परिणाम आहे. बळाच्या जोरावर पाकिस्तान घेऊ, त्याकरिता आम्ही वाटाघाटी करणार नाही, हिंदूंना आणि इतर मुसलमानेतरांना आम्ही आमची बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करणार नाही असा सर्व प्रचार करताना मुस्लिम लीगला मी स्वतः पाहिले आहे हे खरे आहे. आम्ही बळजबरीने पाकिस्तान घेऊ अशी त्यांची आरडाओरड दुर्दैवाने वर्षांपासून सुरू आहे. परंतु असे चालणार नाही. ते बळजबरीने मिळवण्याला काय अर्थ आहे? एका अर्थाने आपण म्हणू शकतो की त्यांनी शक्तीच्या जोरावर पाकिस्तान घेतलेला नाही. उलटपक्षी आपण म्हणू शकतो की आम्ही त्यांना पाकिस्तान दिला, काँग्रेसने त्यांना पाकिस्तान दिला. ब्रिटिशांनी मान्य केले नसते तर पाकिस्तान होऊ शकला नसता. काँग्रेसने कितीही कबूल केले असते तरी अंतिम अधिकार ब्रिटिशाच्या हातात होते. त्यांना सत्ता सोडायची होती.

का? कारण ते इथे यापुढे राज्य करू शकत नव्हते. आम्ही त्यांच्याविरुद्ध तलवारीने भांडलो नाही. आमचे युद्ध शस्त्राशिवाय होते. आमचा संघर्ष अहिंसक संघर्ष होता असे आम्ही म्हणतो. अशा प्रकारे भारताने स्वातंत्र्य मिळवले. भारताची फाळणी झाली. काँग्रेसने फाळणीला मान्यता दिली. भावाभावांनी भांडत राहणे योग्य नाही असे काँग्रेसला वाटले. त्यांना जे हवे ते त्यांना देऊन टाकावे असे काँग्रेसला वाटले. परंतु त्यांच्यातील काहींना वाटते की आम्हाला पूर्ण पाकिस्तान मिळाला नाही. परंतु त्यांना जे काही देऊ करण्यात आले ते त्यांनी मान्य केले व राहिलेल्या पाकिस्तानकरिता भविष्यावर अवलंबून राहिले. अशा प्रकारे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले खरे परंतु त्यात सर्वत्र पसरलेल्या विषामुळे आपण ते पचवू शकलो नाही. आणि आपल्यातील वाद संपला नाही. मुस्लिम लीगच्या पाठीराख्यांनी विषारी भाषणे दिली.पाकिस्तानमध्ये राहणारे सर्व मुसलमान आहेत काय? पाकिस्तानमध्येसुद्धा हिंदू, पारसी, शीख, ख्रिश्चन राहतात. त्या देशात राहणाऱ्या या सर्वांना त्याने सुखी करावे. या सर्वांना समान हक्क आहेत हे त्याने सिद्ध करावे. सरकार त्यांचे राहील यात काही संशय नाही कारण तिथे त्यांचे बहुमत आहे. ते ठीक आहे परंतु सरकारने न्ययभावनेने काम करायचे असते. असे ते म्हणतात परंतु त्यावर कार्यवाही होऊ शकली नाही. तसे का होऊ शकले नाही याच्या खोलात मी का जावे? तिथे काय झाले हे सर्व मला माहीत आहे. मुसलमानांचा संताप अनावर झालेला होता. त्यांना वाटले की आता आपण स्वतंत्र असल्यामुळे कोणालाही मारू शकतो आणि कोणाचीही कत्तल करू शकतो. येथून सर्व सुरुवात झाली. आणि एकदा ही सुरुवात झाल्यानंतर तिथे शीखही राहत होते आणि तेसुद्धा लढवैय्ये होते. ते हे सर्व चुपचाप कसे सहन करू शकत होते? त्यांनीसुद्धा मारण्याला आणि कत्तलीला सुरुवात केली.  हीच ती गोष्ट आहे की जी अजून संपलेली नाही.

हजारो लोक माझ्याकडे आले आणि त्यांनी मला सांगितले की यापुढे आम्ही तिथे राहू शकत नाही. ते म्हणतात की आमच्यावर इस्लामचा स्वीकार करण्याकरिता बळजबरी करण्यात येत आहे आणि आम्ही तसे केले नाही तर आम्हाला गुलामाप्रमाणे ठेवण्यात येईल अशी आम्हाला धमकी देण्यात येत आहे. अशा प्रकारच्या अटी आम्ही कशा ऐकू शकतो? आम्ही इथे नाईलाजाने आलो आहो. इस्लामचा स्वीकार आमची इच्छा असेल तर आम्ही करू. परंतु दडपणामुळे इस्लामचा स्वीकार करणे ही वेगळी गोष्ट आहे. आपली आजिविका मिळवण्याकरिता माणूस आपला धर्म सोडू शकत नाही. दडपणामुळे धर्म सोडणे हा धर्म नसून अधर्म आहे. ज्या माणसाने वा स्त्रीने आपला स्वाभीमान गमावला त्या माणसाच्या वा स्त्रीच्या केवळ जगण्याला काय अर्थ आहे? आणि धर्मात स्वाभिमानाचाही सहभाग असतो. जे लोक पैसे, दागदागिने, वा नोकरी यांच्याकरिता आपला धर्म सोडतात ते धर्माचे अनुसरण करू शकत नाही. हिंदू म्हणवण्याला ते पात्र नाहीत आणि दडपणाखाली कलमा म्हणाल्यामळे ते चांगले मुसलमानही होऊ शकत नाहीत. मी इथे कलमा म्हणत नसतो तर फतेहा म्हणत असतो. ईश्वर एक आहे व हजरत महंम्मद त्याचे दूत आहेत असे कलमा घेताना सांगितले जाते. ते पूर्वी झालेल्या दूतांची गणना करायला तयार नाहीत. परंतु फतेहामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की ईश्वर आपला मालक आहे. तो प्रत्येकाचे रक्षण करू शकतो. आपण त्याला आपलेही रक्षण करू देऊ या. परंतु फतेहा फार सुंदर असला तरी तो म्हणण्याची कुणावर बळजबरी कशी करता येऊ शकते? आपण जर तो म्हणू तर तसे आपण केवळ आपल्या इच्छेने करू. परंतु कोणी मला जर बंदुकीच्या धाकावर ते म्हणायला लावणार असेल तर तसे करणे मला मुळीच आवडणार नाही. माझ्या शरीरात केवळ मूठभऱ हाडे आहेत. परंतु माझे हृदय माझे स्वतःचे आहे. तर तुमचे हृदय तुमचे आहे काय आणि या मुलींचे हृदय त्यांचे आहे काय? या मुली घोषित करू शकतात की आम्ही कधीही आमचा धर्म सोडणार नाही. परंतु आज आपणा सर्वांना आव्हानाला तोंड

द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत भारताने काय करावे? आपण कसे वागावे ही फार मोठी समस्या आपल्यासमोर आहे. आजकाल पाकिस्तानमधून येणाऱ्या गाड्यांमध्ये मुसलमान येत नाहीत. त्या गाड्या केवळ हिंदू आणि शिखांना आणतात. काही गाड्यांमध्येच मारले जातात. आणि येथून जाणारे लोक मुसलमान असतात आणि रस्त्यात ते मारले जातात. मला गणना करण्याकरिता सांगण्यात येते. मी कशाची गणना करू? माझ्याजवळ कोणतेही आकडे नाहीत. आणि आकडे जाणून आपण काय करणार आहो? मी म्हणेन की एक माणूस एक बाटली दारू पिऊ शकतो व त्यामुळे त्याला नशा येऊ शकतो. दुसरा कोणी दोन बाटल्या प्यालानंतर त्याला नशा येईल. दोघेही नशा करतात. परंतु दुसरा एक काही तरी पितो आणि प्याल्यानंतरही त्याला नशा चढत नाही. जणू काय तो नदीचे स्वच्छ पाणी प्याला. तुम्ही त्याला दारू म्हणू शकाल परंतु ज्यामुळे कोणालाही नशा चढत नाही. त्या पाण्याला दारू कोण म्हणेल? कारण दारू ही अशी गोष्ट आहे जिच्यामुळे माणूस भानावर राहत नाही, वेड लागल्याप्रमाणे त्याची अवस्था होते. सांगायची गोष्ट ही की या वेळी आपणापैकी कोणीही भानावर नाही. आता कल्पना करा की मुस्लीम लीग झपाटल्याप्रमाणे काही तरी करते कारण तिच्या डोक्यात काही तरी शिरले आहे. आणि मग आपल्याला वाटू लागते की आपणही असेच वागायला पाहिजे. तुम्हाला संपूर्ण भारतावर राज्य करण्याची आणि पाकिस्तानचा नाश करण्याची इच्छा होऊ शकेल. परंतु मी तुम्हांला सांगतो की पाकिस्तान होण्याला आपण मंजुरी दिली आहे. मग त्याला नष्ट करण्याचा प्रश्न कुठे येतो? आपण त्याचा विध्वंस करू शकत नाही. शारीरिक शक्तीने वा तलवारीच्या मदतीने आपण त्याचा विध्वंस करू शकत नाही. आपण जर पाकिस्तानचा विध्वंस करण्याचा प्रयत्न करू तर दोन्ही देश बुडतील. आपली बोट फुटलेली आहे. आपण आज बुडत आहो. आपण लढू आणि जिंकू अशी जर तुम्ही कल्पना करत असाल तर मी तुम्हाला सांगतो की तुम्ही जिंकण्यापूर्वीच कोणती ना कोणती जागतिक शक्ती तुम्हांला

गिळल्याशिवाय राहणार नाही. ती दोन्ही देशांना गिळून टाकील. जर माझे सगळे मित्र, जे सुज्ञ आहेत, आणि ज्यांनी अशा कामात अनेक वर्षे घालवली आहेत त्यांना आपण सुरक्षित आहो हे कळू शकेल. परंतु जर दोघेही दारूच्या बाटल्यांच्या बाटल्या रिचवत असतील व तसे करताना त्यांना मजा वाटत असेल तर असे कसे होऊ शकेल? मी त्यांना विनंती करीन की दारूच्या बाटल्यांचा त्याग करा आणि त्या समुद्रात फेकून द्या कारण त्यांच्यात विष भरलेले आहे. आपण मुसलमानांना यापुढे दुखापत करणार नाही. त्यांना जर स्वतःहोऊन जाण्याची इच्छा असेल तर आपण त्यांना जाऊ देऊ. परंतु जाण्याकरिता आपण त्यांना भाग पाडणार नाही. ते त्यांच्या घरांत राहतात. ते बहुसंख्य नाहीत. आपण भ्याड बनून त्यांचा छळ का करावा? आपण स्वतंत्र आहो. संपूर्ण देश स्वतंत्र आहे. आपण संपूर्ण देश फस्त करून टाकू अशा संभ्रमात त्यांनी का राहावे? मुसलमान असे प्राणी आहेत काय की हिंदूंच्या मनात आल्याबरोबर ते त्यांना फस्त करून टाकण्याकरिता उपलब्ध असतील? काँग्रेसने किती तरी बलिदान केले आहे. वर्षानुवर्षे ती सर्वोच्च बलिदान करते आहे व त्यात मोठ्या संख्येत हिंदू आणि मुसलमान दोन्ही आहेत. आता स्वातंत्र्य मिळाल्यानंततर ते कशाने तरी झपाटून गेले आहेत काय? किती तरी बलिदान करून मिळालेले स्वातंत्र्य या वेडाच्या भरात आपण फेकून द्यावे काय? ही किती लाजिरवाणी गोष्ट होईल! वृत्तपत्रांमधील बातम्या वाचल्यानंतर तुम्ही जर उद्दिपत झाला असाल व ते आपले असे कधीच होणार नाहीत असा विचार तुम्ही करत असाल तर या गोष्टी मी तुम्हाला सांगणार नाही. मी काल तुम्हांला सांगितले की संपूर्ण दंगली थांबवता येऊ शकतात. हे कसे करता येईल? आपण स्वतःला शुद्ध केले पाहिजे. स्वतःला शुद्ध करणे म्हणजे निर्भय होणे. जो माणूस निर्भय असतो तो अशा प्रकारचे घाणेरडे कृत्य करणार नाही. तुम्हाला तुमच्या सरकारचा पाठिंबा आहे. सरकार देशाचे प्रशासन पाहते. ब्रिटिश सरकारचे ते दिवस आता गेले जेव्हा आपल्या समस्या आपण त्यांना सांगू शकत नव्हतो. आज तुमचे स्वतःचे सरकार आहे. सर्व गोष्टी

सुरळीत कशा कराव्या हे आपण सरकारला सांगू शकतो. अखेरीस देशात केवळ साडेचार कोटी मुसलमान आहे. आपण त्यांना का घाबरावे? कल्पना करा की तुम्ही साडेचार कोटी मुसलमान मारले. त्यानंतर तुम्ही काय कराल? आणि पाकिस्तानमध्ये किती तरी मुसलमान आहेत.तिथे तुम्ही कोणाला माराल? इथे जे साडेचार कोटी मुसलमान आहेत त्यांचा हिशेब चुकता करण्याची पाकिस्तानची इच्छा असेल. ते आव्हान स्वीकारण्याची तुमची क्षमता नसेल कारण त्यांना संपूर्ण जगाचा पाठिंबा असेल. यामुळेच मी म्हणतो की आपण शुद्ध राहिलो पाहिजे. आपण आपला हिशेब स्वच्छ ठेवू या. आपण ऋणकोच्या परिस्थितीत येऊ नये. आपण जर धनकोच्या परिस्थितीत असू तर सरकार पाकिस्तानला निर्वाणीचा इशारा देऊ शकेल हे मी तुम्हांला सांगून ठेवतो. तेथून जे हिंदू आणि मुसलमान आले आहेत त्यांनी परत जायला पाहिजे आणि पाकिस्तानने त्यांची काळजी घेतली पाहिजे. पाकिस्तानमधील सर्व अल्पसंख्य समुदायांना तेच अधिकार असतील जे तेथील मुसलमानांना आहेत इथपर्यंत पाकिस्तानने म्हटलेले आहे. त्यांना अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि पूजाअर्चा करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे मंदिरात वा गुरुद्वारात जाण्याचे स्वातंत्र्य असेल, त्यांना अर्थातच राजकीय अधिकार नसतील. आपला परस्परांवरील विश्वासाला धक्का बसला आहे ही गोष्ट मी समजू शकतो. परंतु याचा उपाय इथे घरेदारे, मुलेबाळे आणि संपत्ती असलेल्या मुसलमानांना घालवून लावणे हा आहे काय? असे व्हायला नको. तो फार मोठा भ्याडपणा होईल. मला तुम्हांला केवळ इतकेच सांगायचे आहे की मुसलमानांवर बदला घेण्याची कल्पना आपण सोडून दिली पाहिजे. आणि आपण आपली हृदये इतकी मजबूत केली पाहिजे की संपूर्ण हिंदूस्तानची जरी खात्री पटली तरी दिल्लीमध्ये काहीही व्हायला नको. मुसलमानांना घालवण्यात आले आहे. जे गेले आहेत त्यांना परत आणायला पाहिजे असे मला म्हणायचे नाही. परंतु जे मागे राहिले त्यांना शांततेत राहू दिले पाहिजे. जे लोक गेले त्यांचा विचार आपण नंतर करू. मुसलमान जर

गैरवर्तन करतील तर सरकारकडे तक्रार करा. त्या मुसलमानांनी सरकारचा अधिकार मान्य केलाच पाहिजे. आमच्याजवळ सैन्य नाही म्हणून तुम्ही त्यांना मारा अशी जर सरकार परवानगी देत असेल तर त्या सरकारचा अंत झालाच पाहिजे. याचा अर्थ गुंडगिरीचे राज्य असा होईल. सरकारचे हे काम नाही. मी तुम्हाला सांगतो की तुम्हाला हवे तितके तुम्ही सरकारला प्रभावित करू शकता परंतु कायदा आपल्या हातात घेऊ नका, बंदुकांचा उपयोग करू नका आणि कोणालाही मारू नका. तुम्ही जर इतके केले तर विजय आपला आहे आणि आपले जे जहाज बुडू लागले आहे ते वाचेल. ईश्वर नेहमी सत्याच्या बाजूने असतो. तो आपल्याला कधीही टाकून देत नाही परंतु आपण जर ईश्वराला टाकून दिले, आपण जर त्याला विसरलो व सुमार्ग टाकून दिला तर ईश्वर काय करू शकतो?

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३४०-४५

-----------------

# ४६. उपवासाचे परिणाम

एक मित्र लिहितो - **तुमच्याजवळ जीव धोक्यात घालण्याचा एकमेव उपाय राहिला आहे असे दिसते. ते जसे आहे ते ठीक आहे. हा उपाय रुग्णाला ऑक्सिजन वा इंजेक्शन देऊन जिवंत ठेवण्यासारखे आहे असे वाटल्याशिवाय राहत नाही.**

जिव्हाळ्यातून निर्माण झालेल्या वेदनेतून वरील विचार मांडण्यात आले आहेत. ते काहीही असले तरी लेखकाने टीका करताना पुरेसा विचार केलेला नाही हे मी सांगायलाच पाहिजे. अनेक शुभचिंतक घाईघाईत बहुधा असाच विचार करतात. यामुळे ही जाहीर चर्चा.

टीकाकाराची उपमा इथे लागू होत नाही. ऑक्सिजन वा इंजेक्शन देणे हे बाह्य उपचार आहेत व देहाचे अस्तित्व लांबवण्याकरिता ते योजिले जातात. यामुळे त्यांचे वर्णन आर्थिक मूल्य असे जे करतात ते योग्यच आहे. ही उपाययोजना केली नाही तर माणूस काहीही गमावणार नाही. जड देह अमर करता येत नाही. सर्व प्रकारचे वैद्यकीय कौशल्य या देहाचे काही काळ अस्तित्व लांबवण्यापेक्षा अजून काही करू शकत नाही. तात्पुरते अस्तित्व लांबवल्यामुळे कोणताही चिरंतन लाभ होत नाही.

उलटपक्षी उपवास दुसऱ्याच्या शरीरावर परिणाम व्हावा म्हणून कधीही केला जात नसतो. त्याने त्याचे हृदय प्रभावित झाले पाहिजे. यामुळे ते आत्म्याशी संबंधित आहे. व यामुळे त्यापासून होणारे परिणाम तात्कालिक स्वरूपाचे आहेत असे म्हणता येऊ शकत नाही. ते चिरंतन स्वरूपाचे असतात.

उपवास करणारी व्यक्ती ज्याकरिता उपवास करते त्या कामाकरिता ती आध्यात्मिक दृष्टीने पात्र आहे की नाही व तिने या उपाययोजनेचा योग्य पद्धतीने उपयोग

केला की नाही ही वेगळी गोष्ट आहे आणि सध्याच्या चर्चेच्या दृष्टिकोनातून असंबद्ध गोष्ट आहे.

मला आठवत असलेल्या सर्व उपवासात एका उपवासाबद्दल (मार्च ३ ते ६, १९३९) असे म्हणता येईल की त्याच्या संकल्पनेत जरी दोष नव्हता तरी त्याचा संबंध बाह्य उपचाराशी होता व त्यामुळे त्या वेळी मी तो उपचार करायला नको होता असे दिसते. ही चूक जर झाली नसती तर इतर उपवासांप्रमाणेच त्यापासून स्वाभाविकपणे होणारे लाभ मिळाले असते याबद्दल मला शंका नाही. राजकोटमध्ये स्व. ठाकोर साहेबांच्या विरोधात केलेल्या उपवासाचा मी येथे उल्लेख करत आहे. मला माझी चूक लक्षात आली. मी माझे पाऊल मागे घेतले व जो गंभीर धोका होऊ शकला असता तो मी टाळला. शेवटचा उपवास कलकत्त्यातील होता व तो सप्टेंबर महिन्यात सुरू करण्यात आला होता. (सप्टेंबर १ ते ४) त्याचा जसा परिणाम अपेक्षित होता तसाच झाला. भावनेचा संदर्भ लक्षात घेतला तर मला तो टिकाऊ वाटतो. त्याचा परिणाम कायम राहील की नाही हे केवळ काळच सांगू शकेल. हा परिणाम उपवास करणाराच्या पावित्र्यावर व त्याच्या दृष्टिकोनाच्या अचूकतेवर अवलंबून असेल. ती चौकशी इथे संदर्भविरहित ठरते. शिवाय उपवास करणाऱ्या माणसाला ही चौकशी करण्याचा अधिकारही नसतो. ही गोष्ट योग्य साधन असलेला तटस्थ माणूसच करू शकतो आणि तीही माझ्या मृत्यूनंतर.

नवी दिल्ली, सप्टेंबर २५, १९४७,

हरिजन ऑक्टोबर ५, १९४७

-------------------------

# ४७. शांतिकुमार मोरारजी यांना पत्र

नवी दिल्ली,

२५ सप्टेंबर १९४७

चि. शांतिकुमार,

सिंधमध्ये बरेच हरिजन आहेत. ते अतिशय दुःखात आहेत आणि त्यांना उपासमारीला तोंड द्यावे लागत आहे. त्यांना काठेवाडमध्ये हलवण्यात यावे. यामुळे तुमची कंपनी पैसे न घेता त्यांना जर काठेवाडच्या कोणत्या तरी बंदरापर्यंत आणण्याकरिता एक वा दोन जहाज पाठवू शकत असेल तर ते सुरक्षित पोहोचू शकतील. त्यांना आपला धर्म वाचवता येऊ शकेल काय आणि आपल्या स्त्रियांची अब्रू ते वाचवू शकतील काय हे सांगता येत नाही. या पत्रासह बापा तुम्हाला भेटतील. कृपाकरून हे ताबडतोब करा. हे पत्र तुम्ही वालचंदभाईंना (वालचंद हिराचंद) वा तुमच्या कंपनीतील अजून कोणाला दाखवले पाहिजे असे वाटत असेल तर दाखवू शकता. असेच पत्र मी शूरजीभाईंनाही पाठवत आहे. (पाहा यानंतरचा विषय.)

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून, सी. डब्ल्यू. ४८१०. सौजन्य शांतिकुमार मोरारजी

--------------------

# ४८. शूरजीभाई वल्लभदास यांना पत्र

(मागील विषय पाहा.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर २५, १९४७

भाई शूरजीभाई,

सिंधमध्ये अनेक हरिजन आहेत. ते संपूर्ण विपन्नावस्थेत गेले आहेत त्यांच्याजवळ खाण्याकरितासुद्धा काहीही नाही. त्यांना काठेवाडमध्ये पाठवण्यात यावे. यामुळे तिकिटाचे पैसे न घेता काठेवाडच्या बंदरापर्यंत त्यांना परत आणण्याकरिता तुमची कंपनी जर एक दोन आगबोटी पाठवू शकत असेल तर ते सुरक्षितपणे परत येऊ शकतील. या क्षणी त्यांना आपला धर्म राखून ठेवता येईल की नाही व त्यांच्या स्त्रियांची अब्रू वाचू शकेल की नाही हे सांगता येऊ शकत नाही.

बापा हे पत्र घेऊन तुमच्याकडे येतील. शक्य असेल तर हे ताबडतोब करा. असेच पत्र मी शांतिकुमार यांनाही लिहिले आहे.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून, जी. एन. ४०९८

--------------

# ४९. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आपण एकाएकी संकटात सापडलो आहो. आपले स्वातंत्र्य अजून दीड महिन्याचेसुद्धा झाले नाही. एक महिना दहा दिवसांचे मूल काय करू शकते? परंतु आपण शक्तिमान आहो आणि आजपर्यंत ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध आपण संघर्ष करत होतो. अडचणींसमोर आपण शरण जाणार आहो काय? आपण केवळ स्वातंत्र्योत्तर काळाविषयी बोलू या. असे नाही की आपण त्याकरिता तयार नाही. आपण स्वतंत्र झालो आहो. परंतु आपल्या लोकांना वाटते की आपल्याला हवे ते करता येणे म्हणजे स्वातंत्र्य. या वृत्तीमुळे आपण सरकारचे काम अवघड केले आहे. माणूस जर आपले हात स्वच्छ ठेवू शकत नसेल तर तो स्वच्छ गोष्टी कसा पाहू शकेल? आपल्यामध्येच जेव्हा बदमाश माणसे असतील तर बदमाशीकरिता कोण कुणाला कसा दोष देईल? प्रत्येकावर जर बदमाशीचा ठप्पा लागलेला असेल तर प्रश्न अजूनच क्लिष्ट होतो. हे खरे स्वातंत्र्य नाही. आणि ते मिळवण्याचा हा मार्गही नाही. यामुळेच मी म्हणतो की आपण हे सरकारला सांगावे आणि आपल्याला शक्य असेल ती मदत सरकारला करावी. कल्पना करा की सरकारला अशी मदत मिळत नाही तर मग पाकिस्तानने जसे केले व तिथे जसे करणे सुरू आहे तसे आपण करावे काय? यामुळे ते धडा शिकतील काय? मी तुम्हांला सांगतो की त्यांना धडा शिकवण्याचा हा मार्ग नाही. जगात या मार्गाने गोष्टी होत नाहीत. लोक जर आपसात भांडत असतील तर सरकार त्यांना भांडण थांबवण्याकरिता सांगेल. त्यांना पालिसांची मदत घेण्याकरिता सांगण्यात येईल. पोलीस जर त्यांचे ऐकणार नसेल तर ते न्यायाधीशाच्या घरी जाऊ शकतात व तिथे आपले प्रकरण मांडू शकतात. जे काही करणे शक्य असेल ते

तिथे केले जाईल. भांडणाची काही तुरळक प्रकरणे असतील तर न्यायाधीश ती सोडवू शकेल. परंतु या प्रकरणी दोन मोठ्या समुदायांमध्ये झगडा आहे. सरकार काय करू शकते? हे काही ब्रिटिश सरकार नाही की ज्याला इंग्लंडमधून आदेश मिळतात. आता तुमचे सरकार आहे. याचा अर्थ एखादी विशिष्ट गोष्ट न करण्याचा तुम्ही सरकारला आदेश देऊ शकता. तुम्ही सरकारला फेकून देऊ शकता. तुमची ताकद ही अशी आहे. तुम्ही जर त्या शक्तीचा योग्य प्रकारे उपयोग करणार नाही तर तुम्ही स्वतः फार मोठ्या अडचणीत सापडला असल्याचे तुम्हाला आढळेल. आणि मी तुम्हाला सांगून ठेवतो की आपण आज फार मोठ्या संकटात आहो. पाकिस्तानही संकटात आहे यात काही संशय नाही. परंतु आपणही तशाच परिस्थितीत आहो.

याचे (प्रार्थना सुरू होण्यापूर्वी कोणी तरी गांधींना एक चिठ्ठी दिली होती. पाकिस्तान सरकार हिंदू आणि शिखांना बाहेर काढत आहे आणि भारत सरकार मुसलमानांना समान नागरिक म्हणून संघराज्यात ठेवत आहे. अशा प्रकारे संघराज्य दोघांचेही ओझे कसे सहन करू शकेल?) उत्तर देताना गांधीजी म्हणाले की मी इतकेच सांगेन की हे आपले सरकार आहे आणि जे करणे आवश्यक आहे ते ते करत आहे. जर काही करायचे राहिले असेल तर तेसुद्धा केले जाईल. तुमचे कर्तव्य कुठे आहे हे मी तुम्हांला सांगितले आहे. मी तुम्हांला अजून काही सांगू इच्छित नाही. तुमचे कर्तव्य काय आहे? एकोप्याने राहणे आणि मुसलमानांना शत्रू न समजणे हे तुमचे कर्तव्य आहे. गैरवर्तन करणारांचा आपोआपच शेवट होईल. परंतु आपण कोणा एका व्यक्तीला आपला शत्रू समजत असू व त्याला मारहाण करू, त्याला मारून टाकू तर तो आपला भित्रेपणा होईल व त्यामुळे आपल्यामध्ये दुबळेपणा येईल. ज्यांच्यांत धैर्य आणि शक्ती असते त्यांनी इतरांशी भांडू नये. कारण ज्यांच्यावर आपला विश्वास नसतो त्यांच्याशीच आपण भांडत असतो. हे सर्व व्यर्थ आहे. भांडण्यात काय अर्थ आहे? त्यांच्यांतील आणि आपल्यामधील ईश्वर एकच आहे. मी तुम्हाला सांगितले आहे की आपण आपल्या नियतीचे न्यायाधीश नाही. ईश्वराच्या

हातातील आपण केवळ प्राणी आहो. ईश्वराने आपल्याला मदत केली तरच आपण आपली अब्रू वाचवू शकतो. नाही तर नाही. त्याला विनवणी करा, माणसाला नाही. त्याला विनवणी करा जो पतिताला पावन करतो. तो अगदी आपल्यामध्ये आहे. तो जेव्हा आपले रक्षण करण्याकरिता असतो तेव्हा आपण कोणावर रागावण्याचे वा कोणाला भिण्याचे काय कारण? मुसलमानांना जे करायचे असेल ते करू द्या. त्यांना कितीही शस्त्रे ठेवू द्या. एखाद्या बदमाष माणसाप्रमाणे त्यांना वागू द्या वा त्यांना विश्वासघातकी होऊ द्या. जर ते देशद्रोही असतील तर सरकार त्यांना पाहून घेईल. नियम म्हणून जगात सर्वत्र देशद्रोह्यांना गोळी घालून मारून टाकले जाते. जर कोणी देशद्रोही होत असेल तर तो शासनाच्या विरोधात फार मोठा अपराध करतो. हा अपराध खुनापेक्षाही मोठा आहे. म्हणूनच देशद्रोह्यांना गोळी घातली जाते. ते देशद्रोही होऊ शकतात हे मी समजू शकतो. परंतु देशद्रोहाच्या संशयावरून त्यांना मारणे हा पुरुषार्थ नाही. हे भ्याडाचे काम आहे.

काल तुम्हांला मी सांगितले की (पाहा प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २४, १९४७) आणि आजही तुम्हांला सांगतो की आपली बोट फुटलेली आहे. केवळ ईश्वरच तिला काठावर आणू शकतो हे अगदी खरे आहे. परंतु आपणही प्रयत्न केले पाहिजे. बोटीला जर कुठे छिद्र असेल तर जी काही साधने आपल्याजवळ असतील त्यांनी पाणी आत येण्यापासून आपण अडवले पाहिजे. परंतु जर बोटीत वेगात पाणी येत असेल तर ते तितक्याच वेगाने बाहेर फेकण्याचा प्रयत्न करत असताना मी पाहिले आहे. असे केले तर पाणी आत येत असूनही बोट पुढे जात राहते. परंतु ईश्वराने मदत केली तरच हे घडू शकते. ईश्वराची कृपा झाली तर ती पुढे जाते आणि किनाऱ्यावर पोहोचते. परंतु ईश्वराने मदत केली नाही तर ती बुडते. म्हणूनच मी म्हणतो की माणसाने प्रयत्न केला पाहिजे व ईश्वराची मदत मागितली पाहिजे. दिल्लीत आग लागलेली आहे. इतर ठिकाणीही आग लागलेली आहे. प्रत्येक ठिकाण पेटलेले आहे. ती आग विझवणे आपले कर्तव्य आहे. तिच्यावर पाणी टाका. त्याशिवाय ती विझू शकत नाही.

आपले पहिले काम (परिस्थिती कशी आहे ते) लोकांना समजावून सांगणे आहे. मी त्यांना तसेच तुम्हालाही एकाच पद्धतीने समजून सांगण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत मी या गोष्टीचा पुनरुच्चार करत राहीन. भारत, जो वैभवशाली होता, तो आज स्मशानभूमी झाला आहे. तो दानवी झाला आहे.

माझ्या अनुभवाने मी सांगतो आहे की आपल्या पोलिसांनी आणि सैन्याने जनतेच्या सेवकाप्रमाणे वर्तन केले पाहिजे, मालकाप्रमाणे नाही. अधिकार गाजवण्याचे दिवस गेले. प्रेमाने काम करून घेण्याचा माझा मार्ग आहे. आमच्याजवळ हिंदू सैन्य, पंजाबी सैन्य आणि हिंदू पोलीस मुसलमानांना छाटून टाकतील असे ऐकताना मला वेदना होतात. मला गंमतसुद्धा वाटते. असे झाले तर पोलीस आणि सैन्य मिळून भारताला चिरडून टाकतील व भारताचे जहाज बुडून जाईल असे मला वाटते. आज आपल्याजवळ आपले सैन्य आहे. सर्व ब्रिटिश निरर्थक आहेत असे मला वाटत नाही. ते काहीही असले तरी बहुतांश ब्रिटिश सोडून गेलेले आहेत. केवळ काही अधिकारी मागे राहिलेले आहेत. ते सर्व निरर्थक आहेत हे मान्य केले तरी यावर माझा विश्वास नाही. आणि जरी ते निरर्थक असले तरी त्यांना जावे लागेल. कल्पना करा की पाकिस्तानमधील सैन्य काही चुकीचे करते तर भारतातील सैन्यानेही तसेच केले पाहिजे काय? पाकिस्तानमधील पोलिसांनी काही चुकीची गोष्ट केली तर आपल्या पोलिसांनीही तसेच करावे काय? मला तुम्हांला हे सांगायचे आहे आणि त्याचे काय परिणाम होतील हे दाखवायचे आहे. सर्वांनी जर अशा प्रकारे वागायला सुरुवात केली तर भारताचा विनाश होईल आणि आपले स्वातंत्र्य, जे केवळ एक महिना दहा दिवसांचे आहे, ते दोन महिनेही पूर्ण करणार नाही. अशी परिस्थिती आपण निर्माण करू नये. हे टाळण्याकरिता आपण काय केले पाहिजे? आपल्यात धैर्य असले पाहिजे. आपल्याला कोणाचीही भीती वाटायला नको. आपण केवळ ईश्वराला भ्यालो पाहिजे. आपली नाव त्याने किनाऱ्यावर पोहोचवावी म्हणून आपण त्याची प्रार्थना करू या. याकरिता

आपल्याला पुढील अटीचे पालन करावे लागेल - पाकिस्तानमध्ये काहीही घडले तरी आपण आपली अंतःकरणे स्वच्छ ठेवू या. आपण जर असे केले नाही तर आपण राक्षस होऊ हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपल्याला आपला भारत शुद्ध आणि स्वच्छ ठेवायचा आहे व आपण सहनशील असलो पाहिजे. मुसलमानांना भारताबद्दल निष्ठा ठेवावीच लागेल. त्यांनी जर निष्ठा ठेवली नाही तर त्यांना फासावर चढवले पाहिजे. हे आपण स्वतः करू शकतो काय? हे आपले काम नाही. मुसलमान आपले बांधव आहेत. त्यांची घरे आणि सर्व काही इथे आहे. यामुळे आपण लक्षात ठेवले पाहिजे की जे इथे राहत आहेत त्यांनी इथे सर्वार्थाने राहावे. परस्परांना एकमेकांबद्दल भीती वाटायला नको. माझी तुम्हांला विनवणी आहे की तुमच्यात विश्वास असायला पाहिजे कारण विश्वासाने विश्वास निर्माण होतो व संशयाने संशय बळावतो. तुमचा विश्वास दृढ होऊ द्या.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३४५-९

----------------

# ५०. मुन्नालाल जी. शाह यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर २६, १९४७

चि. मुन्नालाल,

मला तुझे पत्र मिळाले. तुझा कांचनबरोबर अधःपात झालेला नाही. तुम्हा दोघांचेही उन्नयन झाले आहे आणि अधःपातही झाला आहे. जर कोणाला दोष द्यायचाच असेल तर मी माझ्यावर दोष घेण्याकरिता तयार आहे. तुझी मनोवृत्ती मी समजू शकतो. ती जशी होती तशीच आहे. तुला अजून मुले झाली तरी त्याचा विचार करू नकोस, परंतु शांत राहा.

आधी दुर्गाबेन (महादेव देसाईंची पत्नी) राहत होत्या त्या घरात तू राहू शकत नाही याबद्दल मला शंका नाही. नायकम आणि आशादेवी कशाही प्रकारच्या व्यक्ती असल्या तरी त्यांना जे मिळते त्याची आश्रमाच्या सदस्यांनी अपेक्षा करू नये.

तुला जे पटते तेच कर. माझ्याबद्दल काहीही निश्चित नाही. मला खुष करण्याकरिता काहीही करू नकोस.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. ७२२२, सौजन्य मुन्नालाल जी. शाह

-------------------

# ५१. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

जे काही सुरू आहे ते ना तर शीखधर्मानुसार आहे, ना इस्लामप्रमाणे आहे ना हिंदू धर्माप्रमाणे आहे. आपल्याला या सर्वांची थोडीबहूत माहिती आहे. जर एखादा धर्म अशोभनीय गोष्टी करत असेल तर तो टिकू शकेल काय? शीख धर्माची सुरुवात गुरू नानकांपासून झाली. गुरू नानकांनी काय शिकवले? ते म्हणाले की अल्ला, रहीम, खुदा अशा अनेक नावांनी ईश्वर ओळखला जातो. एकूण हे असे सर्व धर्मात आहे. नानक साहेबांनी सर्व धर्मांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. कबीर साहेबांनी हेच केले. असे म्हणतात की तो काळ आता गेला.

आज एक गृहस्थ - गुरू दत्त (लाहोरचे पंडित ठाकुर दत्त) - माझ्याकडे आले. ते फार मोठे वैद्य आहेत. आपली कहाणी सांगत असताना त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. त्यांनी कबूल केले की तुमच्याकडून मिळालेल्या प्रशिक्षणाच्या प्रकाशानुसार मी वागलो असतो तर मी तिथे प्राण द्यायला पाहिजे होते. परंतु त्यांच्यात असे धैर्य नसल्याचे त्यांनी कबूल केले. ते मला म्हणाले की माझ्याबद्दल त्यांना नेहमीच आदर वाटत आला आहे व मी जे काही म्हणतो तीच गोष्ट अगदी योग्य आहे. परंतु सत्याचरण करणे ही वेगळी गोष्ट आहे. मी जर म्हणालो तर त्यांची परत जाण्याची तयारी होती. मी त्यांना म्हणालो की पाकिस्तान सरकारकडून न्याय मिळण्याची कधीही अपेक्षा करता येणार नसेल व ते आपली चूक कबूल करणार नसेल तर आपले स्वतःचे मंत्रिमंडळ आहे व त्यात जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल आणि अजून किती तरी चांगली माणसे आहेत. अशी माणसेसुद्धा पाकिस्तान सरकारला अशा

कृत्यांपासून अडवू शकत नसतील तर अखेरीस त्यांना युद्धाचा आधार घ्यावा लागेल. आपण परस्परांत मैत्रीपूर्ण तडजोड करू या. आपण असे का करू शकत नाही? आपण परस्परांवर विश्वास ठेवू शकत नाही काय? आपण हिंदू आणि मुसलमान कालपर्यंत मित्र होतो. आज आपण असे असे शत्रू झालो आहो काय की आपण परस्परांवर विश्वासही ठेवू शकत नाही? तुम्ही जर म्हणाल की आम्ही त्यांच्यावर कधीही विश्वास ठेवणार नाही तर मग दोन पक्षांना युद्ध करावे लागेल. तार्किक भाषेत बोलायचे तर लोकांजवळ जेव्हा सैन्य आणि पोलिस असतात व त्यावर विसंबून राहणे त्यांना भाग पडते तेव्हा दुसरे काय घडू शकते? पाकिस्तानमध्ये मारल्या गेलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या बदल्यात दोन माणसे मारायचे तुम्ही ठरवले तर कोण कोणाची फिकीर करील? आपल्याला जर न्याय हवा असेल तर हे प्रकरण तुमच्या वा माझ्यापर्यंत थांबत नाही. हे सरकारचे काम आहे. सरकारला सांगा. आपल्याला मदत करण्याकरिता ते आहे. आपण आक्षेपार्ह वर्तन करू नये. परंतु आपण लढायला तयार असलो पाहिजे कारण जेव्हा युद्ध येते तेव्हा ते पूर्वसूचना देऊन येत नाही. युद्धाकरिता आपण पुढाकार घेऊ नये, परंतु समोरची बाजू पुढाकार घेत असेल तर मग कोणताही पर्याय शिल्लक राहत नाही. अशा प्रसंगी जर सर्व हिंदूंना लढत लढत मरावे लागले तर मला दुःख होणार नाही. परंतु आपण न्यायाचा मार्ग निवडला पाहिजे. तो मार्ग अनुसरत असताना सर्व हिंदू आणि सर्व मुसलमान जरी मरण पावले तरी मी चिंता करणार नाही.आणि नंतर जर असे सिद्ध झाले की ते साडेचार कोटी मुसलमान पंचमस्तंभी आहेत तर त्यांना गोळ्या घालाव्या लागतील वा फासावर चढवावे लागेल याबद्दल मला काहीही शंका नाही. आणि या मुसलमानांप्रमाणेच पाकिस्तानमध्ये राहणारे हिंदू, शीख यांनी जर त्या देशाशी विश्वासघात केला तर त्यांनाही अशीच वागणूक देण्यात यावी. आपण त्यांच्याबाबतीतही पक्षपात करू शकत नाही. आपण जर प्रत्येक मुसलमानाला पंचमस्तंभी समजत असू तर पाकिस्तानमधील सर्व हिंदू आणि शिखांना पंचमस्तंभी समजण्यात येणार

नाही काय? असे चालणार नाही. पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या हिंदू आणि शिखांना तिथे राहायचे नसेल तर ते सर्वार्थाने निघून येऊ शकतात, अशा वेळी भारत सरकारचे कर्तव्य त्यांना काम देणे आणि त्यांचे जीवन सुखावह होईल हे पाहणे असेल. परंतु ते तिथे राहतील व आपल्याकरिता हेरगिरीचे क्षुद्र काम करतील, पाकिस्तानकरिता नाही, तर हे चालू शकणार नाही व आपण त्यात सहभागी होऊ नये. माझ्याजवळ काही जादूचा ताईत नाही. आणि मी तलवारही बाळगत नाही. माझ्याजवळ केवळ एक गोष्ट आहे आणि ती म्हणजे देवाच्या नावाचा जप करणे आणि त्याच्या नावाने काम करणे. त्याचे अनुसरण केल्याने सर्व काही प्राप्त होते. असे काही नाही की त्या मार्गाचे अनुसरण करणारा मी एकटाच आहे. तुम्ही सर्व, आणि त्या तिकडे उभी असलेली लहान मुलगी  तिलाही तो उपलब्ध आहे. चमत्कार करण्याचे सामर्थ्य केवळ ईश्वरामध्ये आहे. ईश्वराच्या कृपेशिवाय मी काय करू शकेन असे तुम्हाला वाटते? परंतु इतके मात्र मला कळले आहे. मी अनेक वर्षांपासून, ६०पेक्षा अधिक वर्षांपासून संघर्षशील माणूस आहे. परंतु मी तलवारीने झगडत नसतो तर सत्य आणि अहिंसेच्या शस्त्राने झगडत असतो. ही शस्त्रे अजूनही आपल्याजवळ आहेत. परंतु त्यांचा उपयोग करणे माझ्या एकट्याच्या आवाक्यात नाही. तुमच्या पाठिंब्याशिवाय मी काहीही करू शकत नाही.

ज्या शक्तीने आपण स्वातंत्र्य मिळवले त्याच शक्तीने आपण त्याचे जतन करणार आहो. त्या शक्तीने आपण ब्रिटिशांना पराभूत केले. आपण त्यांना शस्त्रांनी पराभूत केले नाही. आपली निःशस्त्र शक्ती होती व तिने आपण त्यांना पराभूत केले. ज्या कोणाला भारतात राहायचे असेल, मग तो हिंदू, शीख, पारसी, ख्रिश्चन कोणीही असो त्याला भारताकरिता लढावे लागेल आणि मरावे लागेल. जर सर्व भारतीयांनी देशाकरिता प्राणोत्क्रमण केले तर आपल्याजवळ शस्त्र असो वा नसो कोणतीही सत्ता आपल्याला पराभूत करू शकत नाही वा माघार घ्यायला लावू शकत नाही. मुसलमानांनी सांगितले

आहे की आम्ही भारताशी निष्ठावंत राहू. आपण त्यांच्यावर अंतःकरणापासून विश्वास टाकू या. अखेरला सत्याचाच विजय होतो असत्याचा नाही हे आपण लक्षात ठेवू या - सत्यमेव जयते. नारितम. (मंडुकोपनिषद ३. १. ६) हा फार मोठा वाक्प्रचार आहे. यात आपल्या धर्माचे सार आलेले आहे. आपण त्याचा अंतःकरणापासून अभ्यास करू या व त्याची आठवण ठेवू या. आणि मग मी माझ्या सर्व शक्तिनिशी म्हणेन की सर्व जग जरी आपल्या विरोधात गेले तरी आपण आपल्या जागेवर ठामपणे उभे राहू. आपल्याला कोणीही मारू शकत नाही. कोणीही हिंदू धर्माचा विनाश करू शकत नाही. त्याचा जर विनाश होणार असेल तर तो आपल्याच हाताने होईल. याचप्रमाणे भारतात जर इस्लामचा नाश होणार असेल तर मुसलमानांच्या हातूनच होणार आहे. हिंदू त्याचा विनाश घडवून आणू शकत नाहीत.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ ३४९-५२

--------------------

# ५२. रघुनाथ प्रधान यांना पत्र

(सप्टेंबर २६, १९४७नंतर)

(हे पत्र नरसिंगपूर दरबारचे रघुनाथ प्रधान यांनी सप्टेंबर २६, १९४७ला लिहिलेल्या पत्राचे उत्तर आहे.)

उपदिवाण साहेब,

नवजीवन कार्यालयाकडून काल २६ सप्टेंबरला तुमचे पत्र इथे आले. लाठी प्रशिक्षणाबद्दल मत देण्याच्या अवस्थेत मी नाही. तुम्ही सरदार पटेल यांचा सल्ला घेऊ शकता. संस्थानिक आणि त्यांची प्रजा यांच्या प्रश्नाचा निर्णय घेणारे खाते त्यांच्याकडे आहे.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य बेलादेवी नाय्यर आणिडॉ. सुशीला नाय्यर

-----------------------

# ५३. हिंदुस्तानी

श्री काकासाहेब कालेलकर लिहितात,

भारतीय संघराज्यातील मुसलमान जर संघराज्याशी निष्ठावंत असतील तर ते हिंदुस्तानीचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार करतील काय आणि उर्दू व नागरी लिपी शिकतील काय? यासंबंधी तुम्ही तुमचे स्पष्ट मत दिले नाही तर हिंदुस्तानी प्रचारसभेचे काम अतिशय कठीण होणार आहे. या विषयावर मौलाना आझाद आपले स्पष्ट मत देऊ शकत नाही काय?

काकासाहेबांनी आपल्या पत्रात नवीन काहीही सांगितले नाही. परंतु सध्याच्या परिस्थितीत या विषयाला अतिरिक्त महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतातील मुसलमानांनी जर भारताला निष्ठा वाहिलेली असेल व स्वतःहोऊन त्यांनी भारताला आपले घर मानले असेल तर या दोन लिप्या शिकणे त्यांचे कर्तव्य असेल. असे म्हणतात की पाकिस्तानमध्ये हिंदूंना कोणतेही स्थान नसल्यामुळे त्यांनी भारतात स्थलांतर केले आहे. हे खरे आहे की संघराज्य आणि पाकिस्तानमध्ये युद्ध होण्याच्या परिस्थितीत भारतीय संघराज्यातील मुसलमानांची पाकिस्तानविरुद्ध लढण्याची तयारी असली पाहिजे. या दोन उपनिवेशांमध्ये युद्ध व्हायला नको. त्यांनी मित्रांप्रमाणे राहिले पाहिजे आणि मित्र म्हणूनच मरायला पाहिजे. अखेरीस दोन्ही सरकारांनी मिळूनमिसळून काम करायला पाहिजे. दोन्ही सरकार वेगवेगळे असले तरी त्यांच्यांत अनेक गोष्टी सामान्य आहेत. त्यांच्यात जर शत्रुत्व असेल तर काहीही सामान्य नसेल आणि जर त्यांच्यात खरी मैत्री असेल तर दोन्ही देशातील लोक दोन्ही देशांशी निष्ठावंत असतील. ते परस्परांचे शत्रू कसे होऊ शकतील? परंतु इथे ही चर्चा अनावश्यक आहे.

संघराज्यात सर्व प्रांतांकरिता एकच संपर्क भाषा असली पाहिजे. यापुढे जाऊन मी असे म्हणेन की हे दोन देश जर मित्र असतील तर या दोघांची हिंदुस्तानी ही संपर्क भाषा असली पाहिजे. याचा अर्थ असा नाही की हिंदी आणि उर्दू भाषांचे अस्तित्वच राहणार नाही. त्यांचे अस्तित्व कायम राहिले पाहिजे आणि त्या प्रगतीपथावर असल्या पाहिजे. परंतु भारतातील हिंदू आणि मुसलमान वा असे म्हणा की भारतातीत सर्व धर्माचे लोक जर मित्र असतील तर त्यांना हिंदी आणि उर्दूपासून तयार झालेली भाषा संपर्क भाषा म्हणून मान्य करणे भाग आहे. त्यांनी दोन्ही लिप्या शिकायला पाहिजे. संघराज्यातील मुसलमान आणि हिंदू यांची ही परीक्षा असेल.

संघराज्यातील मुसलमान जर नागरी लिपी शिकणार नाहीत तर हिंदुस्तानी राष्ट्रभाषा होऊ शकत नाही असे म्हणणे चूक होईल. मुसलमान नागरी लिपी शिको वा न शिको हिंदू आणि इतर सर्व धर्मांच्या लोकांनी या दोन लिप्या शिकायला पाहिजे. शक्य आहे की सध्याच्या विषाक्त वातावरणात लोकांना ही साधी गोष्ट आवडणार नाही. हिंदूंची इच्छा असेल तर ते उर्दू लिपी आणि उर्दू शब्दांवर बहिष्कार टाकू शकतात. परंतु असे केल्याने त्यांचेच नुकसान होईल. यामुळे हिंदुस्तानीच्या प्रचारात गुंतलेल्या लोकांनी आपल्या श्रद्धेत वा प्रयत्नात उणीव निर्माण होऊ देऊ नये. मौलाना आझादसारखे लोक आणि संघराज्यातील इतर प्रमुख मुसलमान यांनी आधी हिंदुस्तानी भाषा आणि या दोन लिप्या स्वीकारायला पाहिजे हे मला मान्य आहे. तेच जर पुढाकार घेणार नसतील तर दुसरा कोण पुढाकार घेईल? आपल्यासमोर कठीण काळ आहे. ईश्वराने आपल्याला योग्य मार्ग दाखवावा.

नवी दिल्ली, सप्टेंबर २७, १९४७

हरिजन, ऑक्टोबर ५, १९४७

-----------------

# ५४. प्रेमा कंटक यांना पत्र

सप्टेंबर २७, १९४७

चि. प्रेमा,

तू तुझे वडील गमावले आहे, परंतु तू शांतपणे विचार करशील तर तुला एकाच्या ठिकणी अनेक वडील मिळाले आहेत. आपल्यापेक्षा वडीलधारी असलेली सर्व मंडळी वा आपल्यापेक्षा ज्ञानी असलेले लोक हे सर्व आपल्या वडिलाप्रमाणे असतात, आणि असे लोक जर स्त्रिया असतील तर त्या आपल्या आईप्रमाणे असतात. जे लोक वयाने बरोबरीचे असतात ते भाऊ अथवा बहीण असतात आणि आपल्याहून लहान मुलामुलीप्रमाणे असतात. असे झाले की आपल्याकरिता या जगात कोणीही मरणार नाही. असे असताना वडिलांच्या मृत्यूवर तू शोक का करतेस? याशिवाय मृत्यू हा माणसाचा खरा मित्र आहे. यामुळे जेव्हा आपले प्रियजन त्यांच्या जवळच्या मित्राला भेटतात तेव्हा आपण शोक का करावा? आपले जवळचे लोक जातात तेव्हा आपण अजूनच भक्तिभावाने आणि जोमात सेवाकार्याला लागावे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०४५५. शिवाय सी. डब्ल्यू. ६८९५. सौजन्य - प्रेमा कंटक

-----------------

# ५५. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझा खास वैद्य कोण आहे सांगू? तो माझ्याकरिताही चांगला आहे आणि तुमच्याकरिताही. माझा वैद्य मन, वचन आणि कर्मात राम आहे, ईश्वर आहे, रहीम आहे. तो आपला वैद्य कसा होऊ शकतो? तुम्ही एक भजन ऐकले आहे. ते रामाला उद्देशून आहे. तो शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक दुःखांचे हरण करतो - 'दीनन दुखहरन नाथ'. दुःखात सर्व दुःख येतात, शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक. एक माणूस जितके दुःख भोगू शकतो तितके सर्व. जितके काही शारीरिक दुःख आहेत ते दूर करणारा राम आहे. तोच रामबाण उपाय आहे. माझ्याकडे येणाऱ्या लोकांना मी अजून कोणताही उपचार सांगू शकत नाही. याशिवाय माती आणि पाण्याचे काही उपचार करा. मला माहीत आहे की ज्याच्या अंतःकरणात रामनाम कोरलेले आहे त्याला माती आणि पाण्याच्या उपचाराचीसुद्धा गरज नसते. जगणे आपल्या नशिबात असेल तर आपण जगू. आपण जर मरणार असू तर मरू. एकाच वेळी कोणीही दोन घोड्यांवर बसू शकत नाही. माझी जर रामावर श्रद्धा असेल तर मी तिच्यावर दृढ राहिलो पाहिजे. जो असे करत नाही त्याचा नाश होईल. राम हाच वाचवणारा आहे. ज्या माणसाने आपल्या अंतःकरणात रामाला अधिष्ठित केले आहे तो कधी तरी मरू शकतो काय? हे शरीर क्षणिक आहे. या क्षणी ते जिवंत असू शकेल आणि पुढील क्षणी मृत. मग मी त्याचा अभिमान कशाला बाळगू? मृत्यूचा क्षण आला असताना शरीर जिवंत ठेवण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. गुरू नानक फार मोठे धर्मोपदेशक होते. त्यांच्यानंतर आलेल्या गुरूंनी भक्तिभावाचे भजन लिहिले परंतु अखेरीस त्यांनी त्याला गुरू नानकचे नाव दिले. ही भारताची संस्कृती आहे. बहुधा अशीच गोष्ट इतरही अनेक देशांमध्ये

घडत असेल. ते काहीही असले तरी मी केवळ भारतीय संस्कृतीबद्दल बोलू शकतो. मीराबाई फार मोठी भक्त होती. अगणित भजनांच्या शेवटी मीराचे नाव सापडते. तिने आपले नाव वापरले नव्हते. परंतु मीराच्या अनुयायांना आपल्या निर्मितीला मीराचे नाव देण्यात फार मोठे समाधान मिळत होते. ही फार चांगली गोष्ट आहे. असे म्हणतात की अर्जुन देव (शिखांचे पाचवे गुरू) महान गुरू होते आणि महान कवीही होते. ते म्हणाले - "कोणी रामनाम म्हणतो, कोणी खुदाई, कोई सेवे गोसाईया कोई अल्ला.". ग्रंथसाहेबमध्ये ही गोष्ट आहे. ही स्पृहणीय गोष्ट आहे. शीख ग्रंथसाहेबमधील शिकवणुकीप्रमाणे वागत नाहीत असा आज त्यांच्या विरोधात आरोप करण्यात येतो. हा आरोप खरा आहे की नाही हे मला माहीत नाही. आणि असे केल्यामुळे ग्रंथसाहेबांची महत्ताही वाढू शकत नाही. असे करून शिखांची प्रगतीही होऊ शकत नाही. काही शिख मित्रांशी माझी स्पष्ट चर्चा झाली. त्यांनी मला सांगितले की गुरू अर्जुन देव यांना राम आणि रहीममध्ये वा कृष्ण आणि करीममध्ये अंतर वाटत नव्हते. त्यानंतर ते म्हणाले की माणूस हजला गेला की तीर्थयात्रेला गेला तरी ती एकच गोष्ट आहे. माणूस पूजा करतो वा आपली मान वाकवतो, कोणी देवळात पूजा करू शकतो आणि कोणी देवाच्या नावावर नतमस्तक होतो, कोणी वेद वाचतो आणि कोणी ग्रंथ. ग्रंथ म्हणजे कुराण. कोणी निळे कपडे घालू शकतो आणि कोणी पांढरे. मुसलमान निळे कपडे घालतात आणि सनातनी हिंदू पांढरे. एखाद्याला आपण हिंदू म्हणतो तर दुसऱ्याला तूर्क. तूर्क म्हणजे मुसलमान. (नानक) म्हणतात की जो माणूस खरोखर ईश्वरी मार्गाचे अनुसरण करतो त्यालाच ईश्वराचे रहस्य माहीत असते.

मला जर वेळ असता तर हिंदूंच्या भजनातील आणि कीर्तनातील किती तरी गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या असत्या. त्या ऐकून या गोष्टी हिंदू धर्मातील आहेत की शीख धर्मातील असा प्रश्न पडून मी आश्चर्यचकित झालो. मुसलमानांनी हा देश सोडला पाहिजे असे आपण का म्हणतो? मुसलमानांना हिंदूंबरोबर वसवण्याची योजना हीच मुळात

कॉंग्रेसची चौथी मोठी चूक होती असे का म्हणतात? कॉंग्रेस या योजनेची अंमलबजावणी करते की नाही हा प्रश्न वेगळा आहे. परंतु ही माझी योजना आहे आणि जर ही चूक असेल तर ही माझी चूक आहे. इतर काही लोक माझ्याकडे आले आणि माझ्या महात्मेपणाला आव्हान देऊ लागले व हिंदू धर्माच्या विनाशाकरिता मला दूषण देऊ लागले. परंतु मी त्यांना सांगितले की तुम्ही जी माझी चूक आहे असे समजता ती चूक नाही. खरी गोष्ट ही आहे की आपणा सर्वांची आज वेड लागल्यागत अवस्था झाली आहे आणि आपण काहीबाही बडबडू लागलो आहो. आपले वेड जेव्हा दूर होईल तेव्हा आपण जे योग्य असेल ते बोलू लागू. यामुळेच मी म्हणतो की तुम्ही जिला चूक समजता ती चूक असू शकत नाही. ज्या लोकांना मी चुकतो आहे असे वाटते तेच चुकताहेत. तुम्ही जर साडेचार कोटी मुसलमानांना बाहेर काढले तर सगळे जग तुम्हांला दोष देईल. तेव्हा पाकिस्तानमध्ये काय सुरू आहे ते तुम्ही दाखवाल काय? पाकिस्तान आपला धर्म पाळत नाही म्हणून तुम्हीसुद्धा तुमचा धर्म टाकून द्यावा असे मी हिंदूंना शिकवू काय? अशी गोष्ट मी कधीही शिकलो नाही. आपण जर आपल्या मुसलमान भावांचे रक्षण केले व आपण पवित्र राहिलो तर त्याचाच पाकिस्तानवर परिणाम होईल. त्यांना माझे हे उत्तर आहे. ख्रिश्चन भगिनी राजकुमारी अमृत कौर, ज्यांना तुम्ही ओळखता, काय म्हणतात याचा तुम्ही विचार करा. त्या आरोग्यमंत्री आहेत. निर्वासितांच्या छावणीतील प्रत्येकाला, मग ते हिंदू असो की मुसलमान, मदत करण्याची त्यांची इच्छा आहे. परंतु इतरांचा पाठिंबा मिळाल्याशिवाय त्या काय करू शकतात. त्या पक्षपात करू शकत नाहीत. आपल्याकडून जे जास्तीत जास्त शक्य होईल ते करण्याची त्यांची इच्छा आहे. त्या काही अंशी ख्रिश्चन, काही अंशी मुसलमान आणि काही अंशी हिंदू आहेत. यांमुळे त्यांच्याकरिता सर्व धर्म समान आहेत. त्या तिथे काही मुलींबरोबर गेल्या. त्या सर्व तिथे सेवा करण्याच्या उद्देशाने गेल्या. त्या जर सेवा करण्याकरिता तिथे गेल्या असतील तर त्यांना घाबरण्याचे कारण काय? परंतु त्यांनी मला सांगितले की तिथे जे हिंदू

आणि शीख आहेत त्यांनी मला मुसलमानांची सेवा करण्याच्या विरोधात खबरदारीची सूचना दिली व सांगितले की तुमचा हेतू जर मुसलमानांची सेवा करण्याचा असेल तर येथून परत जा. मी जेव्हा हे ऐकले तेव्हा मी हसलो. खरोखरी ते काहीही करणार नव्हते. अखेरीस ते थोडेसे मुसलमान आणि ख्रिश्चन दंगल करणार होते काय? ते तसे कसे करणार होते? त्यांच्याजवळ काय होते? आज तर तेच दुर्दशेत आहेत. त्यांना धमकावण्यात काय अर्थ आहे. यामुळे अशा प्रकारची वायफळ बडबड आपण करू नये आणि सावधगिरी म्हणून या गोष्टीचा तुमच्याजवळ उल्लेख करावा असे मला वाटले.

अखेरीस मी तुम्हांला सांगतो की मी हेतुपुरस्सर युद्धाचा उल्लेख केला आहे. परंतु आपल्या पत्रकारांना नेहमी अतिशयोक्ती करणे आवडते. मला युद्ध हवे आहे असे त्यांनी शीर्षकात छापले होते. गांधीसुद्धा युद्धाबद्दल बोलतात अशा तारा कलकत्त्याहून आल्या आहेत. मग युद्ध होणार आहे काय? स्वप्नातसुद्धा मी युद्धाची कल्पना करू शकत नाही असे मी म्हणालो होतो. अशा अडचणीच्या वेळी मी माझ्या धर्माचा त्याग करीन काय? माझा धर्म अहिंसा आहे. मी कधीही युद्ध पुकारले नाही आणि इतर कोणीही तसे करू नये. आपल्याला जे काम करायचे आहे ते लढाई करून कसे होणार आहे? भारत आणि पाकिस्तानचे स्वतंत्र सरकार असताना पाकिस्तान जर चुका करत असेल वा भारत चुका करत असेल तर एका देशाच्या सरकारला दुसऱ्या देशाच्या सरकारकडून न्याय मिळवण्याचा कोणता मार्ग आहे? जर हे दोन सरकार सहकार्याने काम करत असतील तर गोष्ट वेगळी आहे. ते जर एक होऊन काम करू शकत नसतील तर त्यांनी लवाद नेमावा. जर तेही शक्य नसेल तर निरुपायाने आपण युद्धाकडे ढकलले जाऊ. याचा अर्थ मी युद्धाचा पुरस्कार केला असा होतो काय? भारत आणि पाकिस्तान या दोघांनाही मला सांगायचे आहे की एक तर त्यांनी परस्परात तडजोड केली पाहिजे वा लवाद मान्य केला पाहिजे. परंतु पाकिस्तान भारताला शक्तीच्या बळावर घेऊ पाहील तर मी काल म्हणालो

होतो त्याप्रमाणे भारतासमोर लढण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसेल. मला जरी सरकारची जबाबदारी देण्यात आली तरी ना तर माझ्या हाताखाली सैन्य आहे ना पोलीस आहेत. माझा मार्ग तर वेगळा आहे. मला कोण पाठिंबा देईल? वेळ आली की जे करायला पाहिजे ते तुमचे सरकार करील. मी तर एकच गोष्ट सांगत राहीन. लोकांना जर अहिंसा कळू शकत नसेल तर मी कोणासमोर तिचे वर्णन करू?

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ३५२-६

-------------------

# ५६. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कुराणमधील पाठ म्हणायला विरोध आहे असा कोणी या सभेत आहे काय? (दोन लोकांनी आपले हात वर केले.)

प्रार्थना झाली नाही तर बाकीच्या लोकांची निराशा होईल हे मला माहीत असूनही मी तुमच्या भावनांचा आदर करीन. (सप्टेंबर २९, १९४७च्या 'हिंदुस्तान टाईम्स'चे वृत्त आहे की भाषणानंतर गांधीजींनी खोलीत त्यांच्या सहकाऱ्यांसोबत प्रार्थना घेतली.) अहिंसेवरील माझ्या अढळ श्रद्धेमुळे मी दुसरे काहीही करू शकत नाही. असे असले तरीही मी म्हणेन की तुमच्या मताच्या विरोधात असलेल्या इतक्या मोठ्या लोकांच्या मताचा तुम्ही अनादर करत नाही. या दृष्टिकोनातून तुमचे वागणे योग्य नाही. मी नंतर जे काही सांगणार आहे त्यावरून तुमच्या लक्षात येईल की कुणाच्या तरी चिथावणीमुळे तुम्ही दाखवत असलेली असहिष्णुता ही देशातील चिडचिड आणि क्रोध यांनी भरलेल्या वातावरणाचा पुरावा आहे. आणि यामुळेच श्रीयुत चर्चिलना देशाबद्दल अनेक कटू गोष्टी बोलण्याची संधी मिळाली. चर्चिलच्या भाषणाचा रुटरने पाठवलेला सारांश आजच्या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाला आहे तो मी तुम्हांला हिंदुस्तानीत समजावून सांगेन. (चर्चिलच्या २७ सेप्टेंबरच्या भाषणातील परिच्छेद 'महात्मा'मधून घेतला आहे.)

**चर्चिल म्हणतात की भारतामध्ये ज्या भयावह कत्तली सुरू आहेत त्याचे मला आश्चर्य वाटत नाही. परस्परांच्या या ज्या क्रूर आणि भयावह कत्तली सुरू आहेत ती तर केवळ सुरूवात आहे. नरमांसभक्षकांच्या क्रूरपणाने या कत्तली व रक्तपात त्या जमाती करत आहेत ज्यांच्यामध्ये सर्वोच्च संस्कृतीला जन्म देण्याची क्षमता आहे. ब्रिटिश राजमुकुट आणि संसद यांच्या सहिष्णू आणि निःपक्षपाती राज्यात या जमाती पिढ्यांपिढ्या जवळजवळ संपूर्ण शांततेत राहत होत्या. जगाचा हा**

**भाग गत साठ वा सत्तर वर्षांपासून सर्वाधिक शांत होता. परंतु मला भीती आहे की भविष्यात त्याची लोकसंख्या सर्व ठिकाणी कमी होणार आहे. आणि लोकसंख्या कमी होण्याबरोबरच या विशाल देशाच्या संस्कृतीचा होणारा ऱ्हास ही आशीयातील सर्वात दुःखद आणि नैराश्यपूर्ण घटना होईल.**

तुम्हा सर्वांना माहीतच आहे की चर्चिल महापुरुष आहेत. ते इंग्लंडच्या राजघराण्याच्या रक्ताचे आहेत. ब्रिटिशांच्या इतिहासात मार्लबरो कुटुंब फार प्रसिद्ध आहे. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटिश साम्राज्य जेव्हा संकटात सापडले तेव्हा त्यांनी सत्तेची धुरा सांभाळली होती. त्या वेळी ब्रिटिश साम्राज्यावर आलेल्या संकटातून चर्चिलनीच त्याला वाचवले होते यात काही संशय नाही. संयुक्त राज्य अमेरिका आणि मित्र राष्ट्रांच्या मदतीशिवाय इंग्लड जिंकू शकला नसता असे म्हणणे चूक आहे. चर्चिलच्या तीक्ष्ण राजकीय मुत्सद्देगिरीशिवाय या सर्व राष्ट्रांना एकत्रित कोणी आणले असते? त्या काळात ब्रिटनची प्रतिष्ठा जपणाऱ्या चर्चिलच्या सेवेचा ग्रेट ब्रिटनने गौरव केला होता. परंतु युद्धाच्या दरम्यान इंग्लंडमध्ये जी प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली तिच्यातून बाहेर पडण्याकरिता इंग्लंडने मजूर पक्षाला निःसंकोचपणे सत्ता सोपवली. ब्रिटिशांनी काळाची पावले ओळखली आणि स्वतःहोऊन साम्राज्य तोडण्याचा व बाहेरून न दिसणारी मनोमिलनाची अभेद्य शासनव्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेतला. हिंदुस्थानचे विभाजन झाले आणि दोन्ही देशांनी स्वतःहोऊन ब्रिटिश राष्ट्रकुलात सामील होण्याचा निर्णय घेतला. हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याचा निर्णय ब्रिटनमधील सर्व पक्षांनी मिळून घेतला आणि या कामात चर्चिल आणि त्यांच्या पक्षाचे लोकही सहभागी झाले होते. ब्रिटिशांनी उचललेले हे पाऊल भविष्यात योग्य ठरते की नाही ही गोष्ट वेगळी. श्रीयुत चर्चिल हे सत्तेच्या हस्तांतरणाच्या कामात सहभागी असल्यामुळे या सत्तांतराच्या मूल्याला धक्का लागेल असे काहीही न करणे श्रीयुत चर्चिलकडून अपेक्षित आहे असा जो सल्ला मी दिला होता त्याच्याशी याचे काहीही देणेघेणे नाही. ब्रिटिशांनी केलेल्या सत्तेच्या

हस्तांतरणाशी तुलना करता येईल असे आधुनिक इतिहासात एकही उदाहरण नाही यात काहीही संशय नाही. प्रियदर्शी अशोकने केलेल्या त्यागाची अशा वेळी मला आठवण येते. परंतु अशोकाची कृती अतुल्य आहे आणि हे उदाहरणही आधुनिक इतिहासातील नाही. यामुळेच चर्चिलच्या भाषणाचा रुटरने पाठवलेला सार वाचून मी दुखावलो. रुटर ही ख्यातनाम वृत्तसंस्था चर्चिलच्या भाषणाचा चुकीचा वत्तांत देणार नाही असे मी गृहीत धरले आहे. चर्चिलनी आपल्या देशाची महान सेवा केली होती परंतु या भाषणाने त्यांनी आपल्या देशाची हानी केली आहे. ब्रिटिश राज्यातून भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताची जर अशी भयानक दुर्दशा होईल तर याची संपूर्ण जबाबदारी ब्रिटिश साम्राज्याची बांधणी करणारांची असेल व त्या “जमातींची” नाही ज्यांच्यात “महानतम संस्कृतीला जन्म देण्याची क्षमता आहे” हे चर्चिलना माहीत नाही काय? माझ्या मते सरसकट विधान करण्यात चर्चिलनी फार घाई केली आहे. भारताची लोकसंख्या किती तरी करोड आहे. त्यांतील काही लाख लोकांनी पाशवी मार्ग अवलंबिला आहे. ही संख्या नगण्य आहे. मी चर्चिलना भारतात येण्याचे आणि येथील परिस्थितीचा अभ्यास करण्याचे खात्रीपूर्वक निमंत्रण देतो. परंतु त्यांनी काही खास पूर्वग्रह बाळगून आणि आपल्या पक्षाचे प्रतिनिधी म्हणून इथे यायला नको तर असे निःपक्षपाती इंग्रज गृहस्थ म्हणून यायला पाहिजे की ज्याच्याकरिता देशाची प्रतिष्ठा पक्षप्रतिष्ठेपेक्षा अधिक मोलाची असेल आणि ब्रिटिश सरकारला त्यांच्या या कामात देदिप्यमान यश मिळवून देण्याकरिता मदत करण्याची इच्छा असेल. ग्रेटब्रिटनच्या या विशेष पावलाची परीक्षा त्याच्या परिणामावरून होईल. हिंदुस्थानच्या विभाजनाने या दोन भागांना परस्परांशी भांडण्याकरिता अपरिहार्यपणे निमंत्रण्यात आले आहे. दोन भागांना स्वतंत्रपणे स्वराज्य देणे ही गोष्ट स्वातंत्र्याच्या उदात्त देणगीला लागलेल्या कलंकासारखी वाटते. दोनपैकी कोणताही भाग राष्ट्रकुलातून बाहेर पडण्याला स्वतंत्र आहे या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. असे म्हणणे सोपे आहे परंतु करणे कठीण आहे. या विषयावर मी

अधिक बोलणार नाही. श्रीयुत चर्चिलनी या विषयावर बोलताना आपली वक्तव्ये अधिक काळजीपूर्वक केली पाहिजे हे मी जे काही म्हणालो त्यावरून स्पष्ट झालेच असेल. परिस्थिती काय आहे याची चौकशी करण्याआधीच त्यांनी आपल्या सहकाऱ्यांची निंदा केली आहे.

तुमच्यापैकी अनेकांनी चर्चिलना असे वक्तव्य देण्याची संधी दिली आहे. श्रीयुत चर्चिल यांचे भविष्यकथन खोटे ठरवण्याकरिता आपल्या मार्गात सुधारणा करण्याकरिता तुमच्याजवळ अजूनही भरपूर वेळ आहे. मला माहीत आहे की आजकाल माझे कोणीही ऐकत नाही. असे नसते आणि स्वातंत्र्याकरिता वाटाघाटी सुरू होण्यापूर्वी लोक जसे माझे जसे ऐकत होते तसे ऐकत राहिले असते तर श्रीयुत चर्चिलनी रस घेऊन ज्या पाशवीपणाचे अतिरंजित वर्णन केले आहे तो पाशवीपणा कधीही घडला नसता. आणि तुम्हीसुद्धा आर्थिक आणि घरगुती समस्या सोडवण्याच्या मार्गाला लागला असता.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ३५६-९

-----------------

# ५७. मणिबेन पटेल यांना पत्र

सप्टेंबर २९, १९४७

चि. मणी,

सोबत नाराणदास गांधींचे पत्र आहे. मी काही कळवेपर्यंत कृती करू नये म्हणून मी त्यांना लिहिले आहे. (पाहा याआधीचा विषय आणि नाराणदास गांधींना पत्र, ऑक्टोबर १, १९४७) परंतु काय केले पाहिजे हे सरदारांना विचार व मला कळव. सोबत मी पट्टणींची (अनंतराय पी. पट्टणी, भावनगरचे दिवाण) तारही जोडली आहे. तुम्हालासुद्धा अशीच तार मिळाली असेल. तिचे काय करायचे? शामलदासने जे काही केले ते सरदारच्या संमतीने केले असे मला वाटते. (शामलदास गांधींच्या नेतृत्वाखाली अंतरिम शासन स्थापन करण्याचा संदर्भ आहे.) मी काय उत्तर पाठवले पाहिजे हे सरदारना विचार आणि तसे मला कळव. सोबत जोडलेले दोन्ही परत पाठव.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - ४: मणिबेन पटेलने', पृष्ठ १४४

----------------

# ५८. हरिसिंह गौड यांना पत्र

सप्टेंबर २९, १९४७

प्रिय सर हरिसिंह (अर्थशास्त्रज्ञ, सागर विद्यापिठाचे संस्थापक),

तुमच्या पत्राकरिता अनेकानेक आभार. तुम्ही तुमच्या विचारात वाहून जाऊ शकता असे मला आढळले आहे. परंतु वस्तुस्थितीकडे तुम्ही दुर्लक्ष का करावे हे मला कळत नाही. आंतरराष्ट्रीय संपर्क भाषेच्या स्थानावरून कोणीही इंग्रजीला पदच्यूत केलेले नाही. माझ्या माहितीप्रमाणे असा कोणताही भारतीय नाही की ज्याने अभ्यासाची दुसरी भाषा म्हणून इंग्रजीला भारतातून बाहेर काढण्याची इच्छा केलेली असेल. परंतु तिने जे स्थान बळकावले आहे त्यावरून तिला पदच्यूत करण्याची काहींची इच्छा आहे यात काही संशय नाही.

याशिवाय तुमच्या चिठ्ठीत ज्याची नक्कल पाठवण्याची तुम्ही कृपा केली आहे ती चुकीच्या माहितीने भरलेली आहे. मला तुमच्याशी वाद करण्याकरिता ना तर वेळ आहे ना इच्छा. या वादाचा निर्णय काळच करील.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

श्री हरिशंकर गौड,

सागर

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

# ५९. किशोरिलाल घ. मश्रूवाला यांना पत्र

सप्टेंबर २९, १९४७

चि. किशोरीलाल,

तुला माझे पत्र मिळाले नाही हे पाहून आश्चर्य वाटते. मी तुझ्या उत्तराची सारखा वाट पाहत होतो आणि तुला पत्रच मिळाले नाही. मला वाटते की भीमसिंगला मी त्याची नक्कल करून ठेवायला सांगितले होते व तीच तुला पाठवण्याकरिता त्याला सांगितले आहे.

परवा भाषेसंबंधीचे तुझे पत्र मिळाले. माझ्या लेखात तुला हिंसा दिसली यामुळे मला वाईट वाटले. (पाहा "काळजी घ्या", सप्तेबर ११, १९४७) ज्या लोकांना सर्वोत्तमातूनही वाईट घ्यायचे असते त्यांना त्यात निश्चितच दोष आढळतील. थोडक्यात सध्याच्या आगडोंबाकरिता माझी अहिंसेची शिकवण जबाबदार आहे याची मला जाणीव नाही काय? याशिवाय मी सर्व गोष्टींचा साधकबाधक विचार केला आहे. तुला माझ्या भाषेत जे दोष दिसतात त्यांचे मूळ त्यातच आहे. आपण दोघांना वेगळे करण्याचा प्रयत्न केला तर आपली चूक झाल्याशिवाय राहणार नाही. मी या निष्कर्षावर पोहोचलो आहे की आपले काही पुढारी म्हणतात त्याप्रमाणे एक तर समाजाकरिता अहिंसा योग्य नाही वा तिच्यासंबंधीच्या माझ्या शिकवणुकीत दोष असला पाहिजे. मला पूर्ण खात्री आहे की तिच्यात पहिला दोष नाही. तिच्यात दुसरा दोष असण्याची शक्यता आहे. माझ्या (अहिंसेच्या शिकवणुकीत) काही दोष असल्यास त्याचा शोध घेण्याचा मी आटोकाट प्रयत्न करतो आहे, परंतु अजून तरी मला तो दिसू शकला नाही. यामुळे मी इथे धडपड करतो आहे. तू म्हणतोस त्याप्रमाणे यातून काही अतिशय दुःखद परिणाम निघू शकतील. ते पाहण्याकरिता मी जिवंत राहणार नाही अशी आशा आहे.

तुझ्या नावाचा उल्लेख न करता तू उपस्थित केलेल्या काही मुद्द्यांची हरिजनमध्ये चर्चा करण्याचा माझा विचार आहे.

तुम्ही दोघेही कमीअधिक प्रामाणात चांगले आहा हे ऐकून मला आनंद झाला. तू सेवाग्रामचे घर नेहमीकरिता सोडले असे चिमणलालने लिहिले आहे. असे असले तरी तुझे जर मन बदलले तर परत ये. याबद्दल मी आर्यनायकमशी बोललो. ते घर तुझ्याकरिता तू योजिल्याप्रमाणे बांधले होते.

हरिशंकर गौडचे पत्र सोबत जोडले आहे. ते जे लिहितात ते मला पटले नाही. त्यांनी दिलेले उदाहरण भयानक आहे. (पाहा या आधीचा विषय)

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून : सी. डब्ल्यू. १०७३१. सौजन्य - गोमतीबेन मश्रूवाला

-----------------

## ६०. कांता रा. व्यास यांना पत्र

सप्टेंबर २९, १९४७

चि. कांता,

मला आजच तुझे पत्र मिळाले आणि त्याचे ताबडतोब उत्तर देत आहे. माझी घनश्यामदासशी चर्चा झाली. ते तुम्हा दोघांनाही पिलाणीत समावून घेऊ शकतात, अजून कुठेही नाही. नाशिकचे प्रशासन गोपाळरावच्या हाती आहे व त्यांच्या कामात ते हस्तक्षेप करणार नाही. स्वयंसेवकाने स्थळाची निवड करत फिरत राहिले पाहिजे काय? जिथे कुठे सेवेची संधी मिळेल तिथे त्याने सेवा केली पाहिजे. परंतु रामप्रसादला (कांता व्यास यांचे पती) आवडेल असेच ठिकाण पाहिजे. आश्रमातसुद्धा असेच होते. अशा परिस्थितीत मी असहाय होतो. रामप्रसाद कार्यक्षम आहे. त्याने त्याचा मार्ग शोधला पाहिजे. मी इतका श्रीमंत माणूस नाही की हवा तितका पैसा निर्माण करू शकतो. इतकेच नाही तर मला माझ्या खर्चाचाही विचार करावा लागतो. तो जसा असायला पाहिजे तसेच आहे आणि माझ्या गरजेइतके मला मिळते. माझ्याकरिता आवडीनिवडीचा प्रश्न नाही. माझा स्वच्छतेचा आग्रह असतो व ती मी ठेवतो.

आईवडिलांना मुलांचे ओझे वाहावेच लागत असते. या मर्यादेपर्यंत मी जाऊ शकतो.

ईश्वर तुम्हा सर्वांना सुखात आणि शांततेत ठेवो. तुम्ही जितक्या लवकर आश्रम सोडाल तितकीच तुमची प्रगती होईल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------------

# ६१. डॉ. सैय्यद मिन्हाजुल हसन यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर २९, १९४७

भाई डॉ. हसन (आरोग्यमंत्री, मध्यप्रांत),

तुमचे इंग्रजीतील पत्र मिळाले. मला ते आवडले नाही. इतके काम आहे की मी सर्व पत्रांपर्यंत पोहोचू शकत नाही. तुमच्या पत्रातून काही राग दिसतो. खरी गोष्ट ही आहे की शुक्लाजींचा (रवि शंकर शुक्ला, मुख्यमंत्री, मध्यप्रांत) विश्वास तुमच्यावर राहिलेला नाही. हे जर बरोबर असेल तर तुम्ही मंत्रिमंडळात राहण्याला काही अर्थ नाही. तुम्ही पाकिस्तानला जाण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. परंतु ईश्वराची काही वेगळी इच्छा असेल तर गोष्ट वेगळी. वेळ फार नाजूक आहे. वृत्तपत्रांवर विसंबून राहू नका. न्यायाकरिता केवळ ईश्वराची आराधाना करा आणि तुमचे कर्तव्य करत राहा. जी कोणती सेवा तुमच्या वाट्याला आली असेल ती करा. दादा धर्माधिकारी आणि इतर काय म्हणतात?

आशीर्वाद,

बापू

डॉ. हसन,

नागपूर

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------------

# ६२. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर, २९, १९४७

भावाभावासारख्या दोन उपनिवेशमध्ये युद्ध होऊ शकण्यासंबंधी मी जी चर्चा केली आहे तिच्यामुळे पाश्चात्त्य राष्ट्रांत भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे मला सांगण्यात आले आहे. वृत्तपत्रांच्या प्रतिनीधींनी कोणते वृत्त पाठवले ते मला माहीत नाही. बोलणाराचा आशय जर योग्य प्रकारे व्यक्त केला जात नसेल तर भाषणांचा सांराश छापणे धोक्याची गोष्ट असते. १८९६ साली मी दक्षिण आफ्रिकेसंबंधी एक पुस्तिका लिहिली होती (ग्रीन पॅम्फ्लेट वा हिरवी पुस्तिका) . तिच्या चुकीच्या सारांशामुळे माझ्यावर जवळपास जीव गमावण्याची वेळ आली होती. तो आशय इतका चुकीचा होता की २४ तासाच्या आतच दक्षिण आफ्रिकेतील युरोपीयांचा राग शांत झाला व मी न केलेल्या अपराधाकरिता मला त्रास सहन करावा लागला याचा त्यांना पश्चात्ताप होऊ लागला. यावरून आपण हा धडा घेतला पाहिजे की एखादी व्यक्ती जे बोललीच नाही वा जे काम तिने केलेच नाही त्याकरिता त्या व्यक्तीला जबाबदार धरण्यात येऊ नये. (हिरवी पुस्तिका; पाहा ग्रिव्हान्सेस ऑफ द ब्रिटिश इंडियन्स इन साऊथ आफ्रिका: ऍन अपील टू द इंडियन पब्लिक, ऑगस्ट १४, १८९६)

माझ्या व्याख्यानात लढाईसंबंधी मी जी चर्चा केली तिच्या कोणत्याही भागाचा असा अर्थ लावला जाऊ शकत नाही की पाकिस्तान आणि भारत यांना यद्धाकरिता  मी चिथावणी दिली आहे वा त्याचे समर्थन केले आहे. हं, युद्धाचे नाव घेण्याचीच जर मनाई असेल तर मात्र गोष्ट वेगळी. आपल्या लोकांमध्ये एक अंधश्रद्धा आहे की एखाद्या घरातील मुलाने जरी सापाचे नाव घेतले तरी तो तिथे प्रगट होतो. मला आशा आहे की भारतात युद्धासंबंधी कोणाच्याही मनात अशी अंधश्रद्धा नाही.

माझा दावा आहे की सध्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करून आणि या दोन राष्ट्रांमध्ये युद्धाची परिस्थिती निश्चितपणे केव्हा निर्माण होऊ शकते हे सांगून मी दोन्ही देशांची सेवाच केली आहे. युद्धाला चिथावणी देण्याकरिता नाही तर ते टाळण्याकरिता असे करण्यात आले आहे. लोकांनी हत्या, जाळपोळ आणि लूटपाट करणे सुरू ठेवले तर ते आपापल्या सरकारला युद्धाकरिता बाध्य करतील असेसुद्धा मी दाखवले आहे. एकानंतर एक होणाऱ्या घटनाक्रमाच्या परिणामाची लोकांना जाणीव करून देणे ही चूक असते काय?

हिंदुस्थानला माहीत आहे आणि जगानेही लक्षात ठेवले पाहिजे की मी माझी सर्व शक्ती भावाभावांचा आपसातील रक्तपात थांबवण्याकरिता व त्यांच्यात युद्ध होऊ नये याकरिता लावली आहे. अहिंसेकरिता शपथबद्ध असलेला माणूस जेव्हा युद्धाचे नाव घेण्याचे साहस करतो तेव्हा तो असे युद्ध टाळण्याकरिताच करत असतो. माझी मूलभूत भूमिका हीच आहे आणि त्या भूमिकेपासून मी माझ्या अंतापर्यंत ढळणार नाही अशी आशा आहे.

हरिजन, ऑक्टोबर १२, १९४७

-------------

# ६३. जवाहरलाल नेहरू यांना चिठ्ठी

[सप्टेंबर २९, १९४७] (याचा संदर्भ गांधीजींच्या लेखी भाषणाशी आहे. या भाषणात गांधीजींनी आपली युद्धाविषयीची भूमिका स्पष्ट केली होती.)

जोपर्यंत युद्धाचा संबंध आहे माझे भाषण अतिशय स्पष्ट आहे. मी जे काही म्हणालो असेन त्यांच्या अगदी विरुद्ध वृत्त थोडक्यात अमेरिकेत आणि अन्यत्र पाठवण्यात आले असावे. आजच्या माझ्या लेखी भाषणात या प्रश्नाविषयी मी अधिक सविस्तर चर्चा करेन. ढासळत्या परिस्थितीबद्दल बोलताना मी तुला दृढपणे सांगितले होते की एक तर तू सरदारना दूर कर वा सरदारनी तुला दूर केले पाहिजे. तुझ्याशिवाय ते जबाबदारीचे ओझे वाहू शकणार नाहीत यामुळे तूच जबाबदारी घेऊन मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेचे काम केले पाहिजे. राजेन बाबूंनी अन्नधान्य खाते सोडून दिले पाहिजे. तसे ते आनंदाने करतील.

सर्व संस्थानांचे एकदम सामिलीकरण करण्याकडे मी नेहमीच संशयित दृष्टीने पाहिले आहे. त्यांचा फायदा कमी आणि जबाबदारी जास्त असे होण्याची शक्यता आहे. थोडक्यात माझी प्रतिक्रिया अशी आहे. मी जेव्हा बोलू शकेन तेव्हा आपण सविस्तर बोलू.

जवाहरलाल नेहरू पेपर्स (तारीख नसलेले). सौजन्य : नेहरू मेमोरिलम्युझिअम ऍन्ड लायब्ररी

---------------

# ६४. सुधीर घोष यांना तार

सप्टेंबर ३०, १९४७

सुधीर घोष,

द्वारा भारतीय उच्चायुक्त,

लंडन

पक्षपातपूर्ण सारांश धोक्याचा असतो. (पाहा मागील विषय.) अहिंसेबद्दल मी पूर्णपणे दृढ आहे. शांतीला (सुधीर घोष यांची पत्नी. लंडनमध्ये त्या औषधीविज्ञानात पदव्यूत्तर अभ्यासक्रम करत होत्या.) यश मिळाले याचा आनंद होतो.

स्नेह,

बापू

सुधीर गोष पेपर्स. सौजन्य - नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

-----------------

## ६५. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

सप्टेंबर ३०, १९४७

मला वाटते की आपण सर्व दानव झालो आहो. आज हिंदू आणि मुसलमान दोघेही दानव झाले आहेत. कोणी कमी केले आणि कोणी जास्त असे कोणी कोणाला म्हणावे? कोणी कमी मारले आणि कोणी जास्त. यात आम्ही जाऊ शकत नाही. सरकारने पाकिस्तानमधून निर्वासितांना आणले पाहिजे आणि असे ते दुसऱ्या सरकारशी वाटाघाटी करूनच करू शकते. या सर्व अडचणी आहेत. परंतु सरकार बनले आहे तेच मुळी अडचणी सोडवण्याकरिता. शासनांतर्गत जे लोक राहतात त्यांचे रक्षण करणे शासनाचा धर्म असतो आणि सरकार जर असे करू शकत नसेल तर त्याने राजीनामा दिला पाहिजे याबाबत मला किंचितही शंका नाही. आज आपले सरकार असे आहे की ज्याला आपण मजबूत करू शकतो वा पदच्यूत करू शकतो. यालाच लोकशाही म्हणतात. जनतेने स्वतःच संयमाने वागायला पाहिजे आणि नियंत्रणात राहायला पाहिजे. त्यांना शिस्तीचा अर्थ कळला पाहिजे व त्यांनी तिचे पालन केले पाहिजे. ते जर असे करणार नाही तर त्यांना काहीही किंमत राहणार नाही. आपल्याला आपले कर्तव्य पार पाडायचे असेल तर आपण हे शिकलो पाहिजे. मुलांना थोडेफार समजू लागल्यापासूनच आपण ही गोष्ट आपल्या मुलांमध्येही रुजवली पाहिजे. तुम्ही तुमच्या मुलांना सांगितले पाहिजे की धर्माचे स्थान तुमच्या हृदयात आहे व मी त्याचे रक्षण करू शकत नाही. तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे की मी तुमचा वडील आहे आणि आपल्या मुलांना, मुलींना प्रशिक्षण देणे वडिलांचे काम असते. तुमच्या धर्माचे रक्षण तुम्ही स्वतःच केले पाहिजे असे मी माझ्या मुलांना शिकवले होते. माझा एक मुलगा दक्षिण आफ्रिकेत आहे (मणिलाल गांधी). दुसरा (हरिलाल गांधी) दूर कुठे तरी पीत असेल. तो कुठे आहे हेसुद्धा मला माहीत नाही. एक मुलगा नागपूरला आहे (रामदास गांधी) . तो बिचारा मोठ्या

मुश्किलीने आपले पोट भरतो. एक मुलगा इथे आहे (देवदास गांधी). तो मुश्किलीने आजिविका कमावतो असे मी म्हणू शकत नाही. त्या प्रत्येकाच्या धर्माची मी काळजी करत बसलो पाहिजे काय? मी काळजी करत नाही. आणि मी काळजी का करावी? ते सर्व मोठे झालेले आहेत. ते जर लहान असते तर त्यांच्या धर्माचे रक्षण मी करू शकलो असतो. आणि तेसुद्धा कोणत्या पद्धतीने? मी त्यांना सांगितले असते की तुम्ही जर खरे हिंदू असाल तर तुमच्या धर्माकरिता मरण्याचे साहस तुमच्यात असले पाहिजे, तुम्ही हत्या करून त्याचे रक्षण करू शकत नाही. आता कल्पना करा की एका मुलाजवळ लाठी आहे आणि दुसऱ्याजवळ बंदूक. बंदूक असलेला मुलगा लाठी असलेल्या मुलाला मारू शकेल. परंतु धर्माचे रक्षण करण्याचा हा मार्ग नाही. का? लाठीवाला मुलगा मारला गेल्याबरोबर त्याचे नातलग येतात. रिव्हॉल्व्हरवाला मुलगा एकटा असल्यामुळे तो ब्रेनगन वा स्टेनगन आणतो. आणि विरुद्ध पक्षाचे लोक दहा स्टेनगन आणतील. ते त्याला इस्लामचा वा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करण्याकरिता बळजबरी करतील आणि आपल्या संख्याबळावर त्याला धाक दाखवतील व म्हणतील की तुझी रिव्हाल्व्हर तुला वाचवू शकणार नाही. आणि त्यानंतर तो घाबरलेला मुलगा रडत रडत म्हणेल की तुम्ही जरी माझ्यावर बळजबरी करत आहा तरी माझ्या जिवापेक्षाही मला माझा धर्म प्रिय आहे. एखाद्या धर्माचे अनुसरण करणे म्हणजे आपण ईश्वराचे होणे. हीच गोष्ट प्रह्लादच्या बाबतीत घडली होती. तो रामनामाचा जप करत होता. त्याचे वडील तो थांबण्याकरिता सांगत होते. परंतु प्रह्लाद म्हणाला की मी दुसरे कोणतेही नाव घेऊ शकत नाही. याबद्दल एक भजन आहे, किती सुंदर आहे ते! - प्रह्लादला त्याचे गुरू पाटीवर दुसरे नाव लिहायला सांगत असताना प्रह्लाद मात्र रामनामच लिहितो. तो म्हणतो की मी दुसरे कोणतेही नाव लिहू शकत नाही. माझ्या लेखणीला दुसरे नाव लिहिताच येत नाही. आणि मला दुसरे नाव येत नाही. असे म्हणतात की प्रह्लाद त्या वेळी केवळ बारा वर्षांचा होता. तर त्या बारा वर्षाच्या मुलाने आपला धर्म वाचवला आणि

आपल्या वडिलांना विरोध केला. त्याने आपल्या धर्माचे कसे रक्षण केले हे वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाही. सर्व हिंदूंना ही गोष्ट माहीत आहे. परंतु महत्त्वाची गोष्ट ही आहे की प्रह्लादने आपल्या धर्माचे रक्षण स्वतःच्या बळावर केले. अशा प्रकारची अगणित उदाहरणे प्रत्येक धर्मात सापडू शकतात. आता आमच्या मुलामुलींना घ्या. काही म्हणतात की स्त्रिया अबला आहेत. पण माझे म्हणणे की जगात कोणीही अबला नाही, सर्व सबला आहेत. ज्यांच्या अंतःकरणात आपल्या धर्माविषयी दृढ निष्ठा असेल ते सर्व सबळ आहेत, ते दुर्बल नाहीत. यामुळे आपल्या मुलामुलींना आपण तुम्ही दुर्बल नाही, सबळ आहो हे सर्वात आधी शिकवले पाहिजे. मुलांचा धर्म मुलांजवळ आहे. लोक जेव्हा माझ्याकडे येतात तेव्हा मी त्यांना सांगतो की सरकार जर काही करणार नाही तर सर्वच्या सर्व इस्लाममध्ये जातील असे म्हणणे चूक आहे. आज भारतात करोडो मुसलमान राहत आहेत. ते कोण आहेत याचा आपण सूक्ष्म अभ्यास केला पाहिजे. त्यांच्यातील अनेक अरबस्तानमधून आलेले नाहीत. जे अरबस्तानमधून आले त्यांची संख्या काही लाखातच असेल. बाकी जे करोडो मुसलमान आहेत ते सर्व हिंदू होते. वा असे म्हणा की ते बौद्ध धर्मीय होते. बौद्ध धर्मीय आणि हिंदू यांच्यात काय फरक आहे? माझ्या दृष्टिकोनातून कोणतेही अंतर नाही. अफगाणीस्तानमध्ये तर याची सगळ्याना कल्पना असायला पाहिजे की नाही? बादशाह खानने मला सांगितले की आम्ही तर आधी बौद्ध होतो, नंतर इस्लाममध्ये आलो. यामुळे आमची जी जुनी संस्कृती होती तिचा आम्हांला थोडाच विसर पडू शकतो. त्यांनी मला सांगितले की त्यांच्या गावांच्या नावांचे मूळसुद्धा संस्कृतमधील आहे. त्यांनी त्यांची नावे, त्यांचा पोषाख आणि इतर सर्व काही बदलले परंतु आत जे खोलवर रुजलेले आहे ते ते बदलवू शकले नाही. हे ते कसे विसरू शकतात? आणि मद्रास म्हणा की बंगाल म्हणा वा इतरत्र कुठेही म्हणा ते सर्व हिंदू होते. मी जसा मला स्वतःला विचारतो तसे तुम्ही त्यांना विचारा की तुम्ही इस्लामचा स्वीकार का केला. त्यांनी धर्मांतर करून इस्लामचा स्वीकार

केला याकरिता मी स्वतःलाच दोष दिला पाहिजे. याकरिता मला स्वतःला प्रायश्चित्त घ्यावे लागेल, तुम्हालासुद्धा घ्यावे लागेल. त्यांनी जर योग्य ते केले असेल आणि हिंदू धर्मापेक्षा उदात्त धर्म स्वीकारला असेल तर आपणही त्यांच्या पावलावर पाऊल टाकायला पाहिजे होते, कलमा म्हणायला पाहिजे होता, इस्लामच्या नावाने शपथ घेतली पाहिजे होती आणि इस्लामचा जयघोष करायला पाहिजे होता! परंतु असे काहीही घडले नाही. यामुळे मी कोणाला मारपीट केली पाहिजे आणि कोणाला काढून टाकले पाहिजे? ते आपलेच लोक आहेत. आपल्या आजोबांच्या पणजोबांच्या काळात ते हिंदू होते. असे समजा की चार पिढ्यांपूर्वी त्यांनी इस्लाम धर्मात प्रवेश केला होता. सर्वत्र फिरून हिंदू धर्माच्या लोकांना मी सांगितले की लक्षात ठेवा अस्पृश्यतेला धर्माचा भाग समजणे हा तुमचा फार मोठा अधमपणा आहे. त्याचा काय परिणाम झाला? समाजाचा एक भाग पंचम वर्ण झाला. मुळात चार वर्ण होते. आपण त्याचे पाच वर्ण केले व पाचव्या वर्णाला अतिशुद्र नाव दिले. पाचव्या वर्णाला आपण आपल्यापासून वेगळे ठेवले. त्यांचे अन्न आपण वेगळे ठेवले व तुम्ही आमच्यामध्ये राहू शकत नाही असे घोषित केले. त्यांना गुलामाप्रमाणे वागवण्याचा आपण निर्णय घेतला. नंतर ते इस्लामकडे वळले. अशा प्रकारे त्यांच्यापैकी सर्व मूळचे मुसलमान नव्हते. त्यानंतर काही ब्राह्मणांनीही इस्लाम स्वीकारला. वैश्य आणि शुद्रांमधून फार कमी लोकांनी इस्लामचा स्वीकार केला. सध्याच्या करोडो मुसलमानांनी इस्लाम धर्माचा कसा स्वीकार केला हे मी तुम्हांला दाखवले आहे. अस्पृश्यतेने त्यांना इस्लामकडे ढकलले. मुसलमानांना मारहाण करून आणि सर्व प्रकारे त्रास देऊन त्यांना भारतातून घालवले पाहिजे असा आज आपण आक्रोश करत आहो. त्यांना कुठे हाकलले पाहिजे आणि कुठे ढकलले पहिजे याचा विचार करण्याची कोणाचीही तयार नाही. आपण लक्षात ठेवले पाहिजे की कोणावर तरी जेव्हा हल्ला होतो व इस्लाम स्वीकारण्याकरिता त्याला भाग पाडण्यात येते तेव्हा त्याचा कोणताही दोष नसताना त्याचा सर्वनाश होतो. परंतु मी

मुसलमानांमध्ये हिंडलोफिरलो आहे आणि माझे मुसलमान मित्र मला सांगतात की इस्लाम बळजबरीच्या धर्मांतराचा कधीही पुरस्कार करत नाही. लोकांना स्वतःहोऊन इस्लामचा स्वीकार करायचा असेल तर ते करू शकतात. इस्लामच्या महत्तेविषयी त्यांना जाणीव करून देण्यात आलेली असू शकेल. धोका देऊन वा फसवणूक करून वा पैसे देऊन लोकांना इस्लाममध्ये आणता येऊ शकत नाही. या देशातील सर्व मुसलमान आपले रक्ताचे भाऊबंद आहेत. म्हणूनच माझे म्हणणे आहे की आपण विचार करून कृती केली पाहिजे. ते लोक इस्लामकडे का ओढले गेले होते याचा आपण विचार केला पाहिजे. त्यांनी पैशाकरिता इस्लाम कबूल केला काय? तुम्हांला जर पैसा मिळवायचा असेल वा इतर काही करायचे असेल तर जगात इतरत्र कुठेही जा आणि तुमच्यासोबत तुमचा धर्म न्या. जर तुम्ही तो धर्म सोडला तर तुम्ही सर्व काही सोडले. मला तुम्हाला एकच गोष्ट सांगायची आहे आणि ती म्हणजे तुम्ही एकाही मुसलमानाला मारण्याचा प्रयत्न करू नये. त्यांना जर मारायचे असेल तर मारू द्या. ते जर मारतील तर ती वाईट गोष्ट असेल. आपण ते वाईट आहेत असे म्हणू. परंतु ते जर वाईट असतील तर त्याचे उत्तर म्हणून आपणही वाईट झालो पाहिजे काय? आपण त्यांच्या अधमपणाचे उत्तर चांगुलपणाने दिले पाहिजे. ते दारू पीत असतील तर आपणही दारू प्यावी? ते बाहेरख्याली असतील तर आपणही बाहेरख्याली व्हावे? ते जुगार खेळत असतील तर आपणही जुगारी व्हावे? एक माणूस तलवार काढत असेल तर आपणही तलवार काढावी? आणि तो मुलांना मारत असेल तर आपणही मुलांना मारावे? तो मुलींना पळवत असेल तर आपणही त्याच्या मुलींना पळवावे? असे झाले तर त्यांच्यात आणि आपल्यात अंतर काय राहिले? मला तर काही अंतर दिसत नाही. मी तर म्हणतो की "अरे मुसलमानांनो, हिंदूंनो आणि शिखांनो धर्म काय शिकवतो ते काही तर समजून घ्या." इकबाल म्हणाले आहेत की "मजहब नही सिखाता आपस में बैर करना" धर्म आपसात वैर करणे शिकवत नाही. इकबाल असे म्हणाले होते तेव्हा मी लंडनमध्ये

राहत होतो. ते फार मोठे कवी होते. त्या वेळी ते गोलमेज परिषदेत आलेले होते. तिथे त्यांच्याकरिता मेजवानी ठेवण्यात आली होती व त्यात मलाही बोलावण्यात आले होते. ते म्हणाले की मी ब्राह्मण आहे. ते ब्राह्मण का होते? कारण त्यांचे पूर्वज ब्राह्मण होते. ते कुठे राहत होते? काश्मीरमध्ये. ते म्हणाले की मी काश्मीरी आहे आणि ब्राह्मण आहे व त्यांनी इस्लाममध्ये धर्मांतर केले होते. त्या सर्वांनी धर्मांतर केले होते पण ते इतक्यातच नाही तर किती तरी वर्षांपूर्वी. परंतु त्यांच्यात ब्राह्मण रक्त आणि इस्लामी संस्कृती आहे. यामुळे इकबाल म्हणाले की धर्म आपल्याला शत्रुत्व करणे शिकवत नाही. त्यानंतर त्यांनी किती तरी गोष्टी लिहिल्या. परंतु ती वेगळी गोष्ट आहे. आता इकबाल नाहीत. परंतु आपला धर्म शत्रुत्व करणे शिकवत नाही कमीतकमी आपण इतके शिकू या. म्हणूनच म्हणतो की आपण माणूस झालो पाहिजे. आपण माणूस झालो तर भारताला उंच नेऊ. आज तर आम्ही हिंदुस्थानचे अधःपतन करत आहो. हिंदुस्थानचा आमच्या हातून कधीही अधःपात होऊ नये अशी ईश्वराने कृपा करावी.

'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ३६०-६५

-------------------

# ६६. कांती गांधी यांना पत्र

सकाळी ४.४५वाजता, ऑक्टोबर १, १९४७

चि. कांती,

तू केलेले वर्णन मनोवेधक आहे. ते चांगले केले. सरूला (सरस्वती, कांतिलाल गांधींची पत्नी. स्वराज्याच्या आंदोलनात त्यांना एक महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती.) तुरुंगाचा अनुभव मिळू दे. तिला हे समजून सांग. बहुधा तू आधीच असे केले असशील. तुरुंगात जाणे हा काही एकमेव धर्म नाही. सत्याग्रहाचा उद्देश योग्य असेल व सत्याग्रह करण्याचा संबंधित व्यक्तीला अधिकार असेल तर त्या व्यक्तीने सत्याग्रहात उडी घ्यायला हरकत नाही. सुरूला हा अधिकार आहे हे मला माहीत आहे. तुझ्या कृतीत मला नम्रता आणि सुज्ञपणा दोन्ही दिसतात.

तुझा पहिला युक्तिवाद सामान्यपणे बरोबर आहे. माणूस अशा परिस्थितीची कल्पना करू शकतो की जिच्यात रचनात्मक कार्य न करतानाही सत्याग्रह करणे माणसाचे कर्तव्य असू शकते. सध्याच्या प्रकरणी असे आहे की नाही याचा निर्णय स्थानिक परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर घेता येईल.

दुसरा युक्तिवाद अगदी बरोबर आहे.

तिसरासुद्धा बरोबर आहे. खरे सांगायचे तर तिसऱ्यामध्ये तू जी तथ्ये सांगितली आहे ती जर बरोबर असतील तर ती भयावह आहेत.

या मतांना प्रसिद्धी देऊ नको. लोकांची मनःस्थिती द्विधा करण्यात अर्थ नाही.

खादी कार्यकर्त्यांमध्ये शुद्ध चारित्र्यही दिसत नाहीआणि बुद्धीही दिसत नाही असे माझे मत आहे.

तुझे प्रश्न काय होते हे कदाचित तुला आठवत नसेल म्हणून मी तुझे प्रश्न परत करत आहे.

आशीर्वाद,

बापू

ता.क. सोबत सरूकरिता पत्र (पाहा पुढील विषय) आणि तुझे प्रश्न आहेत.

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डबल्यू. ७३८६. सौजन्य - कांती गांधी

----------------

# ६७. सरस्वती गांधींना पत्र

ऑक्टोबर १, १९४७

चि. सरू,

मी हे मोठ्या पहाटे लिहीत आहे. तू तुरुंगात गेलीस हे चांगले झाले. कांतीने मला सविस्तर सांगितले. मला आनंद झाला. तुरुंगात असतानासुद्धा तू तुझा वेळ चांगल्या पद्धतीने घालवत आहेस असे दिसते. तुम्ही तिघेही प्रगती करत आहा.

तू जर तुरुंगातून पत्र लिहिले असशील तर मला ते मिळाले नाही.

तुरुंगात गेलेली व्यक्ती जर बाहेरचा जगाचा विचार करणे बंद करणार असेल तरच तिला तुरुंगात जाण्याचा अधिकार असतो.

याहून अधिक लिहिण्याकरिता मला वेळ कुठे आहे?

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------------

# ६८. रामदास गांधींना पत्र

ऑक्टोबर १, १९४७

चि. रामदास,

तू सरळसरळ लिहिलेले पत्र मला मिळाले. तुझ्याबद्दल तू लिहिले हे बरे केले. तुझ्यात आत्मविश्वास विकसित झाला हे मला आवडले. तू तुझ्या प्रकृतीत सुधारणा घडवून आणलीस तर ते माझ्याकरिता पुरेसे होईल. आपल्या प्रकृतीची काळजी घेणे हे पहिले सुख आहे. परंतु आपण या शब्दांचा व्यापक अर्थ घेतला तरच हे विधान बरोबर आहे. त्याचा जर संकुचित अर्थ घेण्यात आला तर त्यामुळे अधोगतीच होईल.

प्रातःप्रार्थनेनंतर मी हे लिहीत आहे.

माझ्या उपवासाच्या वेळी जसे तू मला लिहिलेस तसे तुला लिहिण्याचा पूर्ण अधिकार आहे, परंतु त्यासंबंधी तू सखोल विचार केला नाही. तुला माझ्या आधीच्या उपोषणाबद्दलही शंका असू शकेल, परंतु अगदी अलीकडच्या उपवासाबद्दल तुला मुळीच शंका असायला नको. इतकेच नाही तर माझ्या विरोधकांनीही त्याचे स्वागत केले आहे. माझ्या मृत्यूच्या भीतीच्या दडपणामुळे कोणावरही काही करण्याची सक्ती करण्यात आली नव्हती. उपवासामुळे त्यांच्यातील चांगुलपणा जागृत झाला. पशुत्वाशी पशुत्वाने वागण्यात कोणता धर्म आहे? आज जे काही घडते आहे त्यामुळे देशाची आणि धर्माची अधोगती होते आहे. यावर विचार कर आणि तुला असेच वाटत असेल तर मला लिही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ६९. मणिलाल गांधी यांना पत्र

ऑक्टोबर १, १९४७

चि. मणिलाल,

मला तुझे पत्र मिळाले आणि मला ते फार आवडले. तुझी प्रगती होत आहे.

तुझे खाण्यापिण्यासंबंधीचे प्रयोग मला आवडले. हे प्रयोग तुला कितपत पुढे नेतील हे सध्याच सांगणे कठीण आहे.

तू सीतेसंबंधी जे म्हणतोस ते मला बरोबर वाटते. परंतु त्याबद्दल काळजी करून काही लाभ नाही. आणि राग धरून तर नाहीच नाही. मुले जेव्हा मोठी होतात तेव्हा त्यांना आवडते ते ते करतात. एक दिवस सीताला जाग येईल व तिला तिचा दोष कळेल अशी आशा आपण का करू नये? (पाहा “सीता गांधी यांना पत्र”, जुलै २३, १९४७ आणि “सीता गांधी यांना पत्र”, जुलै २८, १९४७)

परंतु आता सुशीला तिथे पोहोचली असेल. ती तुला सर्व काही सांगेल आणि त्यामुळे तुझा राग शांत होईल. माझ्यापासून तर सीता दूर गेल्यासारखी झाली आहे. पत्रसुद्धा मुळीच लिहीत नाही.

सुशीला तिथे आल्यामुळे तुझे ओझे कमी झाले असेल अशी मला आशा आहे. सुशीला पै वा अजून कोणी तुला उरलेल्या बातम्या देतील.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ५०१४

-------------

# ७०. नाराणदास गांधी यांना पत्र

ऑक्टोबर १, १९४७

चि. नाराणदास,

मला तुझे पत्र मिळाले व मी लगेच तारेने त्याचे उत्तर पाठवले. (पाहा, "नाराणदास गांधी यांना तार", सप्टेंबर २९, १९४७) नंतर तुझे पत्र सरदारकडे पाठवले. संबंधित विभाग त्यांच्याकडे आहे आणि सध्याच तू तिथे गेल्यामुळे काहीही लाभ होणार नाही असे त्यांचे मत आहे. यामुळे सध्या तू परिस्थितीचे निरीक्षण केले पाहिजे आणि जे काही होईल त्यात सक्रिय भाग घेऊ नये. माझ्या एकट्यानेच निर्णय घेण्याची गोष्ट असती तर तू जे पाऊल उचलण्याचा विचार करतो आहेस ते मला आवडले असते. परंतु आता करणारेसवरणारे आपले सरकार असल्यामुळे त्याच्या विरोधात जाऊन काहीही करता येऊ शकत नाही.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ७१. अनंतराय पी. पट्टणी यांना पत्र

[ऑक्टोबर १, १९४७]

(गांधीजींच्या लेखसंग्रहात हे पत्र या तारखेच्या पत्रात ठेवलेले आहे)

चि. अनंतराय,

मला तुमची तार मिळाली. तुम्ही अशीच तार सरदारांनासुद्धा पाठवली आहे. आणि ते तुम्ही अगदी बरोबर केले. आता संपूर्ण प्रशासन भारताच्या हाती आले आहे आपण संबंधित विभागाच्या व्यक्तीला सावध केले पाहिजे. इतके पुरेसे व्हावे. सरदारांच्या सल्ल्याप्रमाणे वागा.

आशीर्वाद,

बापू

अनंतराय पट्टणी,

भावनगर

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# ७२. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका भगिनीने मला काल पत्र लिहिले की मी काही सेवा करू इच्छिते आणि माझ्या पतीचीसुद्धा काही सेवा करण्याची इच्छा आहे. परंतु काय सेवा करावी हे कोणीही सांगत नाही. असे अनेक लोक आहेत की जे असे प्रश्न विचारतात. मी सर्वांना एकच उत्तर देत असतो आणि ते म्हणजे सरकारी नोकऱ्या फार मर्यादित आहेत आणि जनसेवेच्या कामाचा व्याप विशाल आहे. यामुळे काय पाहिजे हे कोणालाही विचारण्याची गरज नाही. ज्या कोणाची सेवा करण्याची इच्छा असेल तो सेवा करू शकतो. परंतु आपण इतके परावलंबी झालो आहो की या बाबतीतही आपल्याला इतरांना विचारावे लागते. असे असल्यामुळे काय केले पाहिजे हे मी त्यांना सांगितले पाहिजे काय? एक अस्वच्छ शहर म्हणून दिल्लीला अखेरीस कितपत प्रतिष्ठा आहे? इथे किती तरी छावण्या आहेत आणि त्या किती अस्वच्छ आहेत हे मला माहीत आहे. तिथे असताना लोक आजारी पडतात. रक्तपात आणि संपत्तीची नासधूस करण्यात आलेल्या ठिकाणीसुद्धा तशीच घाण आहे. स्वच्छतेकरिता दिल्ली नगरपालिका कधीही प्रसिद्ध नव्हती. दिल्ली जर स्वच्छ शहर असते तर दिल्लीच्या लोकांची मनेसुद्धा स्वच्छ असती. आपण कुठेही असलो तरी आपण आपले ठिकाण स्वच्छ ठेवले तर त्याचा प्रभाव संपूर्ण शहरावर पडल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक माणसाने आपले स्वतःचे घर, स्वतःचे अंतःकरण स्वच्छ ठेवले पाहिजे. मी त्या बाईंना म्हणेन की तुम्ही केवळ नावाकरिता नाही तर खरोखरच भक्तिभावाने सेवा करण्याकरिता उत्सुक असाल तर दिल्लीत सेवा करण्याकरिता भरपूर संधी आहे. आणि तुम्हाला तुमच्या कामाबद्दल मला कळवण्याचीसुद्धा आवश्यकता नाही. त्या जर दिल्लीतील लोकांची अंतःकरणे शुद्ध

करण्याकरिता काम करू शकल्या, इथल्या निर्वासितांची अतःकरणे शुद्ध करू शकल्या तर त्यांनी फार मोठे काम केले असे म्हणावे लागेल. आणि असे झाले तर त्यांची आणि त्यांच्या नवऱ्याची जोडी आदर्श होईल. इतर लोक त्यांचे उदाहरण गिरवू लागतील.

मला नुकताच दोन तारा मिळाल्या. त्यातील एक तार मुसलमान मित्राची आहे. ते म्हणतात की असे वाटते की हिंदुस्थानातील हिंदू-मुसलमान अतिशय समंजस लोक आहेत आणि हिंदू आणि मुसलमान गुण्यागोविंदाप्रमाणे राहतात असे समजले जाते. परंतु आता असे काय घडले आहे की हिंदू मुसलमान सोबत बसू शकत नाहीत व ते परस्परांशी भांडत आहेत, परस्परांची हत्त्या करत आहेत व रानटीपणाचे वर्तन करत आहेत? आपण दिल्लीचेच उदाहरण घेऊ या. मुसलमानांनी भारतीय संघराज्याशी निष्ठा जाहीर केली तर दिल्लीतील हिंदू आणि शीख मुसलमानांना जवळ करण्याकरिता तयार आहेत. ज्यांची संघराज्यात राहण्याची तयारी आहे, मग तो मी असो वा तुम्ही असो वा अजून कोणी असो त्याने या गोष्टीचे पालन केलेच पाहिजे. ही अट केवळ मुसलमानांनाच लागू होत नाही तर सर्वांना लागू होते. शिवाय मुसलमानांजवळ भरपूर शस्त्र आहेत. त्यांतील बराच साठा हस्तगत करण्यात आला आहे. परंतु सर्व शस्त्रे सुपूर्द करण्यात आलेली नाहीत. पोलिसांच्या मदतीने शोध सुरू आहे. ते जर अंतःकरणापासून प्रामाणिक असतील व भारताविरुद्ध लढण्याची त्यांची इच्छा नसेल तर त्यांनी संघराज्याशी निष्ठावंत असायला पाहिजे. इतकेच नाही तर एखादी मुसलमान सत्ता भारतावर हल्ला करत असेल तर त्यांनी तिच्याविरुद्ध लढण्याचीसुद्धा तयारी ठेवली पाहिजे. आणि जर त्यांची भारताविरुद्ध लढण्याची इच्छा नसेल तर त्यांना शस्त्रांची गरज काय? इथे काही थोडे ख्रिश्चनही राहतात. जर्मनी वा दुसऱ्या कोणत्याही ख्रिश्चन देशाशी युद्ध झाले तर त्यांनासुद्धा संघराज्याच्या बाजूने लढावे लागेल आणि देशाला निष्ठा वाहावी लागेल. मुसलमानांनी जर देशाला निष्ठा वाहिलेली असेल तर त्यांना शस्त्रांची गरज काय? त्यांनी स्वतःहोऊन आपल्याजवळची

शस्त्रे सरकारला दिली पाहिजे. हे सर्व ठीक आहे. परंतु हे ज्या प्रकारे म्हणण्यात येते ते विषारी आहे. आज छावण्यामध्ये जवळपास ५०,००० मुसलमान आहेत. त्यांना आपण दिल्लीमधून घालवले आहे. काहींची हत्या झाली आहे. माणूस कितीही शूर असला तरी तो मृत्यूचे स्वागत करत नसतो. काहींना व्यवसाय वा अजून काही करण्याची इच्छा असू शकेल. निदान आपण जिवंत राहू यातच तो समाधान मानत असतो. इथून पळून गेल्यानंतर ते कुठे जातील? यामुळे त्यांनी पुराना किल्ल्यात आणि हुमायूनच्या थडग्याजवळील मैदानात आश्रय घेतला आहे. त्यांना पावसात भिजत राहावे लागते आणि इतर अनेक अडचणी सहन कराव्या लागतात. त्यांना योग्य औषधोपचारसुद्धा मिळू शकत नाही. डॉ. सुशीला नाय्यर मला त्यांच्या अवस्थेचा अहवाल देत असतात. त्या त्यांना दररोज ४ तास देतात. निर्वासितांमध्ये अनेक गरोदर स्त्रिया आहेत. त्या स्त्रियांचे बाळांतपण करावे लागते. याकरिता काही दायांची गरज आहे. याशिवाय काही औषधांची व इतर अनेक गोष्टींची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींची व्यवस्था करायला वेळ लागतो. या लोकांना अशा परिस्थितीत का राहावे लागते? हिंदू म्हणतात की आम्ही त्यांना बाहेर हाकलले आणि असे करण्यात आम्ही कोणतीही चूक केलेली नाही. ते जर देशाला निष्ठा वाहणार असतील तर त्यांना परत आणता येईल. मी म्हणतो की त्यांची अंतःकरणे जेव्हा शुद्ध होतील तेव्हाच त्यांना देशात आणता येईल. मान्य करू की मुसलमानांना देशाबद्दल निष्ठा वाटत नाही व ते शस्त्र सुपूर्द करण्याकरिता तयार नाहीत. याचा अर्थ असा आहे काय त्यांची कत्तल केली जावी? भारतात चार ते साडे चार कोटी मुसलमान आहेत. यापैकी कल्पना करा की एक लाख वा एक कोटी मुसलमानांनी आपली शस्त्रे लपवून ठेवलेली आहेत. त्यांच्या घरात लपवलेल्या शस्त्रांचा शोध घेता येईल इतकी शक्ती तुमच्या पोलिसांमध्ये, सैन्यामध्ये नाही काय? आता पोलिसांची ब्रिटिशांशी बांधिलकी नाही. मुसलमानांची कत्तल करण्याचा, त्यांच्या बायकामुलांना मारण्याचा काय परिणाम होईल हे तुम्हांला कळले पाहिजे. मी

तुम्हांला आधीच सांगितले आहे की आपला अधःपात होत आहे. १५ ऑगस्ट १९४७ला आपण जेव्हा स्वातंत्र्यदिन साजरा केला तेव्हा आपण स्वतंत्र राष्ट्र झालो. त्यानंतर काही दिवस आपण भावाभावांप्रमाणे राहिलो. त्या वेळी सर्व काही चांगले वाटत होते. परंतु आपण भाऊभाऊ आहो हे आपण विसरलो. ते जर आपली हत्या करत असतील तर तो मुस्लिम लीगचा दोष असेल. आपल्या मनात आधीच राग भरलेला होता. परंतु स्वातंत्र्याच्या झळाळीत ते आपले शत्रू आहेत हे आपण विसरलो. मला कलकत्त्यात हे दिसून आले. हीच परिस्थिती संपूर्ण देशात होती. परंतु ती भावना आपण लवकरच विसरून गेलो आणि मुसलमान शीख आणि हिंदूंची कत्तल करण्याच्या व त्यांना हाकलून देण्याच्या मनःस्थितीत आले.

मी आधीच सांगितले आहे की त्या दोन अटीत आपण अजून एका अटीची भर घातली तर आपण आपले काम शांततापूर्वक करू शकू. आपण कायदा हातात घेऊ नये ही ती अट आहे. त्यांना शिक्षा करण्याचे आपले काम नाही. आपण भानावर नव्हतो हे आपण मान्य केले पाहिजे. मुस्लिम लीगने आधी मूर्खपणा केला. परंतु एक स्वार काही कारणाने घोड्यावरून पडला तर दुसऱ्या स्वारानेही घोड्यावरून पडायला पाहिजे काय? असे केले तर दोघांचाही नाश होईल. अशा प्रकारे आपण त्यांच्याशी लढायला पाहिजे काय? कोणत्या बाबतीत आपण त्यांच्याशी स्पर्धा केली पाहिजे? मी आधीच म्हणालो त्याप्रमाणे त्यांच्यात जितका चांगुलपणा आहे त्यापेक्षा जास्त चांगुलपणा आपण आपल्यामध्ये बाणवला पाहिजे. परंतु जितका वाईटपणा त्यांच्यात आहे तितकेच वाईट आपण होऊ आणि वाईटपणाच्या बाबतीत आपण त्यांच्याशी स्पर्धा करू तर त्यामुळे त्यांच्याबरोबर आपलाही अधःपात होईल. जर ते चुकीच्या गोष्टी करत असतील तर आपले सरकार ते ठीक करील. आपले सरकार पाहील की आपला कोणी माणूस पाकिस्तानमध्ये पडला आहे, मग तो हिंदू, शीख, ख्रिश्चन वा अजून कोणी असो, तो तिथे अल्पसंख्य आहे व त्यांचे तिथे संपूर्ण संरक्षण

मिळत नसेल, त्यांना तिथे कापून टाकले जात असेल, त्यांच्या मुलींना पळवून नेले जात असेल, त्यांचा जमीनजुमला आणि संपत्ती हिरावून घेतली जात असेल आणि बळजबरीने त्यांच्यावर इस्लाम लादला जात असेल तर त्याचे उत्तर आपले सरकार देईल. उत्तर द्यायला सरकारला सांगा. ते तर आमच्या मदतीकरिता आहे. उत्तर देणारे आपण कोण? उत्तर देण्याचा प्रयत्न करून आपण स्वतःच दुष्ट होतो. आपण कधीही दुष्ट होणार नाही. स्वातंत्र्याची ही फार मोठी खूण आहे. त्यात आपण पूर्णपणे अनुत्तीर्ण झालो आहो. त्याचा काय परिणाम झाला? माझ्या मनात येते की आपल्यापैकी काही खरोखरच खुनी झाले आहेत, ते कोण आहेत हे तर मला माहीत नाही, परंतु ते तसे आहेत हे निश्चित, आणि ते योजनाबद्ध पद्धतीने खून करत आहेत, जाळपोळ करत आहेत व बळजबरीने इमारतींमध्ये घुसून त्या ताब्यात घेत आहेत. ते कुठे आहेत हे मला माहीत नाही परंतु ते हे काम करत आहेत. यामुळे आपला अधःपात होतो आहे. यामुळे आपल्याला कबूल करावे लागते की अशा प्रकारे (बदला घेण्याचा) प्रयत्न करणे हा मूर्खपणा आहे. या अविवेकीपणातून आपण मुक्त होऊ या व तिथे जे लोक राहिले आहेत त्यांना परत आणू या. सरकारने असा प्रयत्न केला पाहिजे की पाकिस्तानमध्ये ज्यांचा छळ झाला व ज्यांचा तिथे विनाश झाला त्यांना परतण्याकरिता पाकिस्तान विनंती करील. आणि ज्या कोणाची लाहोरमध्ये संपत्ती आहे ती त्यांना परत मिळाली पाहिजे. जी घरे सरकारने ताब्यात घेतली आहेत ती त्यांना परत केली पाहिजे. तिथे किती सुंदर इमारती मी पाहिल्या होत्या? आणि मुलींकरिता काढलेल्या शिक्षणसंस्थांचे काय? लाहोरपेक्षा जास्त चांगल्या शैक्षणिक सुविधा भारतात अजून कुठेही नाहीत. शिक्षणक्षेत्रात लाहोर सर्वात पुढे होते. ते लाहोर आज कुठे आहे? या सर्व शैक्षणिक संस्था घडवण्याकरिता सरकारची कोणतीही भूमिका नव्हती आणि त्या संस्थाना सरकारने कोणतीही आर्थिक मदत केली नव्हती. पंजाबचे लोक मजबूत आहेत. ते व्यावसायिक मनोवृत्तीचे आहेत आणि ते लक्ष्मी निर्माण करतात. तिथे मोठमोठे बँकवाले आहेत. पैसा

कसा खर्च करायचा आणि कसा मिळवायचा हे त्यांना माहीत आहे. हे सर्व मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. स्त्री-पुरुषांकरिता त्यांनी ती सर्व महाविद्यालये बांधली आहेत. आणि मोठमोठी रुग्णालयेही बांधली आहेत. ती त्यांना परत केली पाहिजे. पन्नास मैल लांब जथ्था येत आहे. त्या लोकांची फार वाईट अवस्था आहे. यावरील उपाययोजना करण्याची जबाबदारी जर आपण शासनावर सोडली तर आपण रानटी होणार नाही. हे मी तुम्हांला आधीच सांगितले आहे. विदेशात राहणाऱ्या मुसलमानांकडून मला तारा आल्या आहेत. (अम्मान आणि मध्यपूर्वेतील इतर देशांमधून.) ते विचारतात की लोकांनी विवेक का सोडला. ते म्हणतात की आपण सर्वांनी भावाभावाप्रमाणे राहिलो पाहिजे. ते म्हणतात की आम्ही जरी मुसलमान असलो तरी आपसात भांडावे असे आम्हांला वाटत नाही. इस्लाम असे शिकवत नाही. मी आधीच सांगितले आहे की तुम्ही जागे व्हा. तुम्ही मान्य करा वा करू नका परंतु मी तुम्हांला सांगेन की अशा गोष्टींचा साक्षीदार राहण्याची माझी इच्छा नाही. असा अधःपात पाहण्याची माझी इच्छा नाही. असे काही घडण्यापूर्वी ईश्वराने मला न्यावे अशी मी ईश्वराजवळ प्रार्थना करीन. परिस्थितीत जर सुधारणा होत नाही तर माझ्या अंतःकरणात भडकत असलेला ज्वालामुखी माझा बळी घेतल्याशिवाय राहणार नाही. माझे अंतःकरण मला सांगते की अशा गोष्टी पाहून तुझा कोणताही लाभ होणार नाही. भारताच्या स्वातंत्र्याकरिता तू तुझ्या जीवाचा बळी द्यायचा प्रयत्न केला. तुझा बळी तर गेला नाही पण स्वातंत्र्य मिळाले. परंतु स्वातंत्र्याच्या प्रभातीच हे सर्व घडलेले पाहण्यात काय अर्थ आहे? यामुळे मला घेऊन जा अशी मी ईश्वराजवळ रात्रंदिवस प्रार्थना करत असतो. आणि मला न्यायचे नसेल तर ईश्वराने हा आगडोंब विझवण्याची मला शक्ती तरी द्यावी.

दिल्लीमधील एका रुग्णालयात मोठ्या संख्येत जखमी मुसलमानांना ठेवण्यात आले आहे. रुग्णालयात सर्व मुसलमानच आहेत असे नाही. तिथे काही हिंदूही आहेत काहींनी त्या मुसलमानांना जखमी करून त्यांना मारण्याचा प्रयत्न केला. खेड्यातून आलेला

असा कोणता तरी घोळका आहे. त्या घोळक्यातील लोकांनी दारातून हल्ला करण्याचा प्रयत्न केला नाही तर लहान खिडक्यातून हल्ला केला आणि चारपाच रुग्णाना मारून ते पळून गेले. याहून जास्त पशुत्वाचे कृत्य मला माहीत नाही. युद्धातसुद्धा अशा घटना घडत नाहीत. युद्धात अनेकदा रुग्णालयांवर बॉम्बवर्षाव होतो परंतु अशी गोष्ट कधीही घडली नाही.

मी तुम्हांला अजून एक गोष्ट सांगेन. जेव्हा गाडी आली तेव्हा एखाद्या सामानाप्रमाणे पाच लोकांनी एका माणसाला गाडीच्या खिडकीतून फेकून दिले. तो मरणे अपरिहार्य होते. ही आजची गोष्ट आहे परंतु रुग्णालयासंबंधी मी जे म्हणालो ती कालची गोष्ट आहे. याकरिता कोणाची मान लाजेने खाली झुकली पाहिजे? मला मान्य आहे की मुसलमानांवरसुद्धा अशाच प्रकारच्या अपराधाचा आरोप आहे. पश्चिम पंजाबमध्ये जे काही घडत आहे त्याचे स्पष्टीकरण सरकारने मागायला पाहिजे.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ३६५-७०

---------------

# ७३. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एक शीख गृहस्थ आज मला भेटण्याकरिता आले होते. मी गुरू अर्जुन देव यांचे शब्द सांगितले हे योग्य केले असे मला कोणीतरी सांगितले असे ते म्हणाले. परंतु त्यांनी मला विचारले की गरू गोविंद सिंहनी त्या शब्दांत जो बदल केला त्यासंबंधी तुम्हाला काय म्हणायचे आहे? इतिहास सांगतो की गुरू गोविंद सिंह मुसलमानांचे जन्मजात शत्रू होते. परंतु अशा गोष्टीवर विश्वास ठेवण्याचे काहीही कारण नाही. दहाव्या गुरूंनी गुरू अर्जुन देव यांचे शब्द जवळपास जसेच्या तसे वापरले आहेत. आणि गुरू नानकबद्दल बोलायचे तर ते हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यांत कोणतेही अंतर मानत नव्हते. कोणी देवळात देवाची भक्ति करो की नमाझ पढो सर्व एकच आहे. ब्राह्मण जर पूजा करत असेल तर याचा अर्थ असा होत नाही की तो दुसऱ्या धर्माच्या ईश्वराला शिव्या देतो. खरे म्हणजे मुसलमान पूजेऐवजी नमाझ पढत असतात. पूजा आणि नमाझ एक आणि एकसारख्या आहेत. लोकांच्या भाषा वेगवेगळ्या असल्या तरी सर्व माणसे सारखी आहेत. गुरू गोविंद सिंह म्हणाले की सर्व माणसे मूलतः सारखी आहेत, केवळ त्यांची अभिव्यक्ती वेगवेगळी आहे. जर असे असेल तर आपण सर्व एक आहो आणि वेगवेगळेही आहो. करोडो माणसे आहेत परंतु मानवस्वभाव सारखा आहे. गुरू गोविंद सिंह म्हणाले, “एकै कान, एकै देह, एकै बैन”. पुढे ते म्हणतात की ईश्वर म्हणा की राक्षस, यक्ष म्हणा की गंधर्व की तुर्क हे सर्व वेगवेगळे आहेत. गुरू गोविंद सिंहजी म्हणतात, ‘देखतको अनेक भेष है’. त्यांचा प्रभाव एक आहे. त्यांचे नेमके शब्द आहेत - “आपल्याला विविध गोष्टी दिसत असतात परंतु त्यांचे मूळ स्वरूप एकच आहे.” बैन म्हणजे वाणी. वाणी तर एक आहे. भाषा एक आहे. शब्द म्हणजे

भाषा. आणि भाषा एकच असते. आणि सूर्य एक आहे. तुम्ही असे म्हणू शकता काय की मुसलमानांकरिता एक सूर्य आहे आणि दुसरा आमच्याकरिता? आपणा सर्वांकरिता एकच सूर्य आहे. ते म्हणतात की प्रत्येकाकरिता हवा आणि पाणीसुद्धा एकच आहे. गंगा वाहत असताना माझे पाणी घेऊ नको असे आपण तुर्काला म्हणत नाही. आणि पाऊस घेऊन येणारे ढग आम्ही मुसलमान पारशी लोकांकरिता पाऊस आणत नाही, केवळ हिंदूंकरिताच आणतो असे म्हणत नाहीत. संघराज्य केवळ हिंदूंकरिता आहे असे नाही. असे कधीही होऊ शकत नाही. तुम्ही कुराणाचा वा गीतेचा वा पुराणाचा उल्लेख केला तरी ते एकच आहे. केवळ त्यांचे स्वरूप वेगवेगळे आहेत. तुम्ही अरबी भाषेत लिहिले तर तुम्ही त्याला कुराण म्हणाल. आणि मग तुम्ही ते संस्कृत भाषेत वा देवनागरी लिपीत लिहिले व त्याचा अर्थ तुम्हांला कळला तर तुम्हांला दोन्ही एकच असल्याचे आढळेल. तर अशा प्रकारे आपण सर्व एक आहो असे म्हणून ते बोलणे संपवतात. गुरू गोविंद सिंह यांनी हे शिकवले आहे. मी त्या सज्जन गृहस्थाला सांगितले की गुरू गोविंद सिंह जर मुसलमानांचे शत्रू असतील तर ती चुकीची गोष्ट आहे. युद्ध झाले तेव्हा हिंदू आणि मुसलमान मेले होते व जखमी झाले होते. परंतु गुरू साहेबांचा एक समंजस शिष्य पाणी देण्याचे काम करत होता. त्याने मुसलमानांना पाणी दिले, हिंदूंना पाणी दिले आणि शिखांनाही पाणी दिले. तो म्हणाला की गुरू महाराजांनी मला असेच शिकवले आहे. ते म्हणाले की तुझ्याकरिता ना कोणी मुसलमान आहे, ना कोणी हिंदू आणि ना कोणी शीख, सर्व माणसे आहेत आणि ज्याला पाण्याची गरज आहे त्याला तू पाणी द्यायचे आहे. कोणी हिंदू जखमी होऊन पडला आहे तर त्याचा प्रथमोपचार कर आणि मुसलमान जखमी होऊन पडला असेल तर त्याला तसाच पडू दे असे ते थोडेच म्हणत होते. त्यांनी विचारले परंतु गुरुजी तर मुसलमानांच्या विरोधात लढले होते? हो लढले होते, परंतु ते त्या मुसलमानांविरुद्ध लढले होते ज्यांनी न्यायाचा मार्ग सोडला होता व ज्यांनी आपल्या धर्माचा त्याग केला होता. ते दानी पुरुष होते, अनासक्त

पुरुष होते, ईश्वरी अवतार होते. त्यांच्याकरिता माझेतुझे हा प्रश्न नव्हता. परंतु हो, ते आपले रक्षण करत होते, लढाई करत होते यात काही संशय नाही. शिखांचा दावा असो की नसो परंतु आपण तर अहिंसक आहो. ते किरपाण ठेवतात. परंतु गुरुजींची शिकवण होती की निष्पाप, निरागस लोकांच्या रक्षणाकरिता किरपाण असते. लोकांचा छळ करणाऱ्या जुलमी लोकांशी लढण्याकरिता ती आहे. म्हाताऱ्या बायांची हत्या करण्याकरिता किरपाण नाही. स्त्रिया, मुले आणि निरागस लोक इत्यादींना मारण्याकरिता ती नाही. किरपाणचे हे काम नाही. अपराध्याच्या पोटात खुपसण्याकरिता किरपाण आहे, मग तो अपराधी मुसलमान असो की अजून कोणी. शीख जरी असला तरी जर त्याचा अपराध सिद्ध झाला असेल तर त्याच्याही पोटात ती किरपाण खुपसली जाऊ शकेल. आजकाल लोक ज्या प्रकारे किरपाण काढतात तो रानटीपणाचा मार्ग आहे. अशा लोकांना किरपाण वापरायला बंदी करण्यात आली तर ती चूक होणार नाही कारण त्यांनी त्यांच्या धर्माचा त्याग केलेला आहे. शिखांनी किरपाणला बदनाम केले आहे.

आज माझा जन्मदिवस आहे. (पाहा परिशिष्ट "गांधीजींच्या अठ्ठ्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्त टिपण", सप्टेंबर २५, १९४७नंतर) मी माझा वाढदिवस पारंपरिक पद्धतीने साजरा करत नसतो. मी म्हणेन की आजच्या दिवशी आपण उपवास केला पाहिजे, सूतकताई केली पाहिजे आणि प्रार्थना केली पाहिजे. आपला वाढदिवस साजरा करण्याची माझ्या मते ही सर्वात जास्त योग्य पद्धत आहे. माझ्याकरिता आजचा दिवस शोकदिवस आहे. मी अजूनही जिवंत आहे याचे मला आश्चर्य वाटते आणि लाजही वाटते. मी तोच माणूस आहे की ज्याच्या शब्दाचा मान देशातील करोडो लोक ठेवत होते. परंतु आज माझे कोणीही ऐकत नाही. तुम्ही म्हणता की भारतात केवळ हिंदू राहिले पाहिजे आणि दुसरा कोणी राहता कामा नये. आज तुम्ही मुसलमानांना माराल, परंतु उद्या तुम्ही काय कराल? पारसी, ख्रिश्चन आणि इथे राहिलेल्या ब्रिटिशांचेही मग काय होईल? अखेरीस तेसुद्धा ख्रिश्चन आहेत. त्यांची ख्रिस्तावर श्रद्धा आहे

आणि ते थोडेच हिंदू आहेत. आज तर आमच्याकडे असे मुसलमान आहेत की जे आपलेच आहेत. आपण जर आज त्यांनासुद्धा मारायला तयार झालो तर मी म्हणेन की माझी तरी अशी घडण झालेली नाही. जेव्हापासून मी हिंदुस्थानात आलो तेव्हापासून हिंदू-मुसलमान ऐक्य हाच माझा पेशा राहिला आहे. धर्माने जरी एक नसलो तरी आपण सर्वांनी भावाभावासारखे राहिलो पाहिजे. परंतु आज आपण परस्परांना शत्रूच्या नजरेने पाहू लागलो आहो. मुसलमान कितीही सज्जन असला तरी मुसलमान हा सज्जन असूच शकत नाही असा समज आपण करून घेतो. मुसलमान तर नेहमी नालायकच असतात असे आपण समजतो. अशा परिस्थितीत भारतात माझे कोणते स्थान आहे आणि मी जिवंत राहून काय फायदा? आता मी १२५ वर्षे जगण्याचा विचार सोडून दिला आहे. आता शंभर वा नव्वद वर्षांचाही विचार करणे थांबवले आहे. आज मी एकोणऐंशीव्या वर्षात प्रवेश करतो आहे, परंतु त्याच्यासुद्धा मला वेदना होतात. आणि असे फार कमी लोक आहेत की जे मला समजू शकतात, त्यांना मी म्हणेन की आपण या पशुत्वाचा त्याग केला पाहिजे. पाकिस्तानमध्ये मुसलमान काय करत आहेत याची मला पर्वा नाही. तेथील हिंदूंना ते मारून टाकतील तर तेच त्यामुळे पशू होतील. परंतु याचा अर्थ असा आहे काय की मीही पशू झालो पाहिजे, रानटी झालो पाहिजे, संवेदनशून्य झालो पाहिजे? अशी कोणतीही गोष्ट करण्याकरिता मी खंबीरपणे नकार देईन आणि तुम्ही असे करू नये असे मी म्हणेन. तुम्हांला जर माझा वाढदिवस खरोखरच साजरा करायचा असेल तर आतापासून कोणालाही वेडाच्या भरात अपकृत्ये न करू देणे तुमचा धर्म होतो व तुमच्या अंतःकरणात काही राग साठलेला असेल तर तो तुम्ही बाहेर काढला पाहिजे. मी तर लोकांना म्हणेन की बाबांनो कायदा हातात घेऊ नका, सरकारला याचा निर्णय घेऊ द्या. इतके जर तुम्ही केले तर तुम्ही योग्य काम केले असे मी म्हणेन. मला तुम्हांला इतकेच सांगायचे आहे.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ३७१-७४

# ७४. निंद्य तुलना

एक गृहस्थ, ज्यांच्या नावावरून त्याची मातृभाषा हिंदी आहे असे वाटते, इंग्रजीतून लिहितात -

**मुसलमानांनी पाकिस्तानमध्ये जाऊ नये म्हणून तुम्ही त्यांना आपले भाऊ समजा आणि व त्यांच्या रक्षणाची ग्वाही द्या अशी विनंती तुम्ही सातत्याने करत असता. या बाबतीत मी एक दृष्टांत देऊ इच्छितो. थंडीच्या दिवसात एक माणूस कुठे तरी चालला होता. रस्त्यात त्याला एक साप पडलेला दिसला. तो थंडीने गारठलेला होता. त्या सरपटणाऱ्या प्राण्याची कीव येऊन त्याने त्याला उचलले आणि त्याला ऊब देण्याच्या दृष्टीने आपल्या खिशात ठेवले. ऊबेने तो साप परत सावध झाला आणि आपल्या रक्षकालाच चावा घेऊन त्याला मारून टाकण्याचे त्याने पहिले काम केले.**

या पत्रलेखकाने संतापाच्या भरात चुकीचा दृष्टांत दिला आहे. एक माणसाला, मग तो कितीही अधःपतीत झालेला असो, विषारी सापासारखा समजायचे आणि मग त्याच्याशी अमानूष व्यवहाराचे औचित्य सिद्ध करायचे ही गोष्ट खरे सांगायचे तर स्वतःला अधःपतीत करण्यासारखी आहे. कोणत्याही धर्माच्या काही थोड्या वा बऱ्याच लोकांच्या चुकीमुळे त्या धर्मातील करोडो लोकांना विषारी साप समजणे मला वेडेपणाची सीमा वाटते. पत्र लिहिणाऱ्या सज्जनांनी लक्षात ठेवले पाहिजे की असे कट्टर आणि पागल मुसलमान आहेत की तेसुद्धा हिंदूंबद्दल असेच उदाहरण देतात. कोणत्याही हिंदूला साप म्हणवून घेणे आवडेल असे मला वाटत नाही.

एकाद्या माणसाला भाऊ समजण्याचा अर्थ असा नाही की त्याने धोका दिल्यानंतरही त्याच्यावर विश्वास ठेवायचा. आणि तो धोकेबाजी करील अशा भीतीने त्या माणसाला आणि त्याच्या कुटुंबाला मारून टाकणे हे भ्याडपणाचे चिन्ह आहे. अशा समाजाचे चित्र तुमच्यासमोर उभे करा की ज्यात प्रत्येक माणूस आपल्या सोबतच्या

माणसाच्या गुणदोषाचा निर्णायक होतो. परंतु भारताच्या काही भागात आपली अशीच अवस्था झाली आहे.

अखेरची गोष्ट म्हणजे सर्पजातीबद्दल लोकांमध्ये जो भ्रम पसरला आहे तो मी दूर करू इच्छितो. ८० टक्के साप मुळीच विषारी नसतात आणि ते निसर्गात उपयोगी काम करत असतात.

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ३, १९४७

'हरिजन', ऑक्टोबर १२, १९४७

---------------

# ७५. काही सुभाषिते

एका मित्राने जॉर्ज मॅथेसन यांची काही सुभाषिते पाठवली आहेत -

आपल्यावरील बंधनांमुळेच आपण उडू शकतो.

माझ्या दुःखांच्या मदतीनेच मी गगनात विहार करू शकतो.

मला घ्याव्या लागलेल्या माघारीमुळेच मी पुढे पळू शकतो.

माझ्या अश्रूंबरोबरच मी प्रवास करू शकतो.

माझ्या सुळाला गळ्याशी लावूनच मी मानवतेच्या अंतःकरणात प्रवेश करू शकतो.

हे ईश्वरा मला माझा सूळ मोठा करू दे.

नवी दिल्ली, ऑक्टोबर ३, १९४७

हरिजन, ऑक्टोबर १२, १९४७

------------------

# ७६. रणछोडदास पटवारी यांना पत्र

ऑक्टोबर ३, १९४७

आदरणीय रणछोडभाई

(गांधीजींचे कौटुंबिक मित्र. शिकण्याकरिता इंग्लंडला जाण्याकरिता त्यांनी गांधीजींना मदत केली होती. पाहा रणछोडदास पटवारी यांना पत्र जानेवारी ११, १९३३)

सकाळच्या प्रार्थनेनंतर मी तुमचे पत्र वाचले. आता सकाळचे साडेचार वाजले आहेत.

तुम्ही दीर्घायुषी व्हा. माझ्याबद्दल बोलायचे तर मी ती इच्छा सोडून दिली आहे. हिंदूंनी हिंदू धर्माचा केलेला विनाश मी पाहू शकत नाही. आज तथाकथित महात्मा अल्पात्मा झाला आहे असे दिसते.

हिंदू गोवध करत आहेत आणि तुमच्यासारखे लोक इतरांनी गोवध करू नये म्हणून धर्म समजून कायद्याद्वारे गोवध थांबवण्याचा प्रयत्न करतात. किती हा अधर्म!

तुम्ही विहिरीसंबंधी जे म्हणाला ते मला आवडले.

प्रणाम,

मोहनदास

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ५०१५

-------------------

# ७७. श्यामलाल यांना पत्र

ऑक्टोबर ३, १९४७

चि. श्यामलाल,

सुशीला पै आज मुंबईकरिता निघाल्या. मुंबईला एक वा दोन दिवस थांबल्यानंतर त्या सेवाग्रामला भाद्रपद कृष्ण द्वादशीला पोहोचतील. माझी बापांशी (अमृतलाल वि. ठक्कर, सचिव कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मृती न्यास) चर्चा झाली. त्यांची मागणी आहे की एक वर्षाकरिता सुचेताबेनच्या ठिकाणी (सुचेता कृपलानी, संघटक सचिव, कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मृती न्यास) कार्यकारी म्हणून ...(मुळात इथे अक्षरे अस्पष्ट आहेत.) नी राहावे. मी त्यांच्याशी यासंबंधी चर्चा केली आणि त्यांनी एक वर्ष देण्याचे कबूल केले. आपल्याला त्यांच्या राहण्याची व्यवस्था करावी लागेल.

मी असे म्हणेन की सुचेताबेनला आपण जितके देत होतो तितके त्यांना दिले पाहिजे. मी या मुद्द्याची चर्चा करायला पाहिजे होते परंतु त्याचा उल्लेख करायला मी विसरलो. मी त्याचा ओझरता उल्लेख केला होता. मला ते आठवत नाही. आज सकाळीच आपण त्याबद्दल व्यवस्थित चर्चा करू शकलो परंतु तेव्हा आपण काही आध्यात्मिक बाबींसंबंधी बोलतो होतो. सुशीलाबेननी सुचिताबेनशी या विषयावर सविस्तर चर्चा केली. त्यांच्या निवासव्यवस्थेबद्दल त्यांचे कोणतेही मत नाही कारण त्यांना वर्ध्याची पुरेशी माहिती नाही. त्यांना बजाजवाडीत ठेवता येईल अशी जर पुरेशी जागा असेल, व त्यांना पुरेसा एकांत मिळू शकत असेल तर ते फार चांगले होईल असे मला वाटते. जर असे होऊ शकत नसेल तर त्यांची महिलाश्रमात वा काकावाडीत व्यवस्था करता येईल. मी कोणताही निश्चित सल्ला देऊ शकत नाही. तुम्हाला स्वतःला याबद्दल विचार करावा लागेल.

सुशीला पै आणि बापा यांना प्रती पाठवल्या आहेत.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल.

# ७८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

देशात अनेक ठिकाणी सत्याग्रह सुरू असल्याचे मला दिसते. लोक ज्याला सत्याग्रह असे म्हणतात तो सत्याग्रह आहे की दुराग्रह आहे हेच मला खरोखरी कळत नाही. या देशात लोक बोलतात एक आणि करतात त्याविरुद्ध असे सुरू आहे. आज प्रत्येक कर्मचारी, मग तो डाक विभागात असो की तार विभागात वा रेल्वेत वा भारतीय संस्थानात, जेव्हा सत्याग्रह करतो तेव्हा हा सत्याग्रह सत्याकरिता आहे की असत्याकरिता याचा आपण विचार केला पाहिजे. असत्याकरिता सत्याग्रह करण्याची काहीही आवश्यकता नाही आणि जर तो सत्याकरिता सत्याग्रह करत असेल तर कोणत्याही परिस्थितीत सत्याग्रह केलाच पाहिजे. स्वार्थी हेतूने जे केले जाते त्याला सत्याग्रह कधीही म्हणता येऊ शकत नाही. तसे करणे म्हणजे असत्याचा आग्रह धरणे. सत्याग्रहाकरिता मी फार कमी अटी सांगितल्या आहेत. सत्याग्रहाकरिता दोन गोष्टी आवश्यक आहेत असे मी म्हणालो होतो. पहिली गोष्ट ही की ज्या मुद्द्याकरिता आपण सत्याग्रह करतो तो सत्य असला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे सत्याचा आपला आग्रह निरपवादपणे अहिंसक असला पाहिजे.

आज जे लोक सत्याग्रह करत आहेत त्यांनी तसे पूर्ण विचारांती केले पाहिजे. मूळ गोष्ट जर सत्य नसेल आणि मागण्या मान्य करून घेण्याकरिता बळजबरी असेल तर तो सत्याग्रह मागे घेणेच योग्य. जर मूळ गोष्ट विषाक्त असेल तर तो दुराग्रह होईल आणि असत्यही होईल आणि जी गोष्ट आपल्याला मिळू शकत नाही तिची मागणी आपण रेटू लागलो तर अशी मागणी करत असताना आपण अहिंसक राहू शकत नाही हे मी तुम्हांला

सांगून ठेवतो. असा सत्याग्रह अहिंसक होऊ शकत नाही, तिथे केवळ हिंसा असेल. हे शक्य आहे की एखादा अन्याय्य मागणी करत असेल आणि त्याच वेळी तो अहिंसक राहत असेल.

मी जर निर्वासित शिबिराचा प्रभारी असतो तर तुम्ही तुमच्या जागा स्वच्छ केल्याच पाहिजे असे मी शिबिरार्थींना सागितले असते. त्यांनी केवळ पत्ते, फासे, जुगार खेळायला पाहिजे काय? की केवळ आळसात पडून राहिले पाहिजे? मला माहीत आहे की तिथे त्यांच्याकरिता पुरेसे अन्न आणि पाणी नाही. परंतु या कारणाकरिता ते काम करायला नकार देत असतील तर ते व्यसनांना बळी पडतील. आणि या शिबिरांमध्ये काही आठदहा लोकच नाहीत. या छावण्यांमध्ये हजारो लोक राहत आहेत. त्यांना आपल्या घरी कधी परतता येईल हे कोणीही सांगू शकत नाही. आपण त्यांना खचितच अन्न पुरवू परंतु त्यांनीही ते मिळवण्याकरिता काही तरी काम केले पाहिजे. आपली छावणी स्वच्छ करण्याच्या कामापासून ते कामाची सुरुवात करू शकतात आणि मग कताई, विणाई, सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम यासारखी इतर कामे करण्याचीही ते तयारी दाखवू शकतात. भारतात माणसाला करता येण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. काल हे लोक करोडपती असू शकतील, परंतु आज त्यांनी आपले करोड रुपये गमावले आहेत. जगात अशा गोष्टी अनेकदा घडत असतात. असे झाल्यानंतर परत नव्याने कामाला सुरुवात करावी लागत असते. जर कोणी म्हणत असेल की मी करोडपती होतो आणि मला कोणतेही काम येत नाही तर आपल्या सर्व योजना फसतील. आपण असे म्हणालो तर आपण कधीही यशस्वी होणार नाही. मी अतिशय नम्रपणे सांगतो की अशा प्रकारे आपले काम चालू शकत नाही. जे काही काम आपण करतो ते सर्व दृष्टींनी आदर्श असले पाहिजे. ते स्वच्छ असले पाहिजे आणि त्यात मुळीच घाण नसावी. इथे जे लोक पडले आहेत त्यांनी स्वतःचे काम स्वतः केले तर मी म्हणेन की आज आम्हांला जो त्रास सहन करावा लागत आहे तो सहन करावा

लागणार नाही. आणि ते जर कामात गुंतले तर आपला क्रोधसुद्धा शमेल. आपल्या अंतःकरणातील बदल्याची भावनासुद्धा मरेल. वाईटाला वाईट म्हणून ओळखण्यात आणि त्याला चांगुलपणाने उत्तर देण्यात माणसाचा चांगुलपणा असतो. यातच देशाचे कल्याण आहे. आपण कोणाला दुःखी करणार नाही, उलट स्वतः दुःख सहन करून इतरांना सुखी करण्याचा प्रयत्न करू. आपण जर असे केले तर केवळ भारताचेच हित होणार नाही तर जगाचेही हित होईल. भारत कसा वागतो याकडे आज जगाचे लक्ष लागलले आहे. आता आपल्या परीक्षेची खरी वेळ आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे. आता आपण काय करणार आहो?

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ३७४-६

-------------

# ७९. अवंतिकाबाई गोखले यांना पत्र

ऑक्टोबर ४, १९४७

चि. अवंतिकाबाई,

तुम्हाला कर्करोग व्हावा हे कसे? मला त्याबद्दल तुमच्या पत्रातूनच कळले. तो बरा होण्याची काही आशा आहे काय? कृपाकरून मला सविस्तर लिहा. अजूनही तुम्ही धोतरांची का आठवण करता? तुम्ही नियमांचे (अवंतिकाबाई गांधीजींच्या दर वाढदिवसाला धोतर पाठवत असत.) फार पूर्वीपासून पालन करताहात. बबन गोखले चांगले असतील अशी मला आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'आदर्श हिंद महिला', पृष्ठ १

----------------

# ८०. कैलास नाथ काटजू यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ४, १९४७

भाई कैलास नाथ काटजू

(ओरिसाचे राज्यपाल, १९४७; नंतर केंद्रात गृह आणि संरक्षण मंत्री; मुख्यमंत्री, मध्यप्रदेश),

मला तुमची दोन्ही पत्रे वाचून दाखवण्यात आली व ती मी काळजीपूर्वक ऐकली. परंतु त्या पत्रांचा मीच विषय असल्यामुळे मी ती हरिजनमध्ये कसा छापू शकतो? आजकाल कोणत्याही प्रकारची स्तुतीसुद्धा मला विषमय वाटते. आपली अवस्था पशूप्रमाणे झाली आहे.

तुमच्या रक्तदाबासंबंधी मी डॉ. जिवराज यांना विचारले. तुम्ही 'सर्पगंधा' घ्यावी असे त्यांनी सुचवले आहे. सर्पगंधाचा अर्क ट्रॉपिकल मेडिसीन स्कूल, कलकत्ता येथे उपलब्ध आहे. माझ्याजवळीत साठ्यातून मी तुम्हाला ती पाठवली तर तुम्हाला आवडेल काय? आपली प्रकृती चांगली ठेवणे हा सेवकाचा धर्म नाही काय?

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-------------------

# ८१. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आपण जर वेड लागल्यासारखे वागलो नसतो तर आज हे जे काही घडत आहे ते घडले नसते याची मी तुम्हांला कशी खात्री पटवून देऊ? याबद्दल मला काहीही शंका नाही. मुसलमान वेड लागल्याप्रमाणे वागले म्हणून हे निर्वासित पाकिस्तानमधून पळून येत आहेत. हिंदू जर तिथे सुखासमाधानात असते तर ते पळून का आले असते? त्यांनी पश्चिम पंजाबमधून का पळून यावे? पाकिस्तानच्या इतर भागातूनही लोक पळून येत आहेत ही खरोखरच दुःखद गोष्ट आहे. हिंदू का पळून येत आहेत याचा आपण विचार केला पाहिजे. कल्पना करा की तेथील मुसलमान जुलमी झाले आहेत तर त्यामुळे आपणही जुलमी झालो पाहिजे काय? तरुण आणि म्हातारे, स्त्रिया आणि मुले यांना मुसलमान मारत आहेत म्हणून कायदा हातात घेऊन आपणही त्यांना मारले पाहिजे काय? मी वारंवार सांगत आलो आहे की हा जंगलाचा कायदा आहे. जर असा कायदा टिकणार असेल तर मी जिवंत राहू शकत नाही. देशाची अजून सेवा करता यावी म्हणून हे देवा मला १२५ वर्ष जिवंत ठेव अशी मी आतापर्यंत ईश्वराला प्रार्थना करत होतो. आणि मी तेव्हाच विश्रांती घेऊ शकतो जेव्हा देशात ईश्वराचे राज्य म्हणजे रामराज्य स्थापित होईल. असे होईल तेव्हा खरोखर भारत स्वतंत्र झाला असे म्हणता येऊ शकेल. परंतु आज तर हे केवळ स्वप्न राहिले आहे. रामराज्य तर सोडाच परंतु आज देशात केणतेही शासन शिल्लक राहिलेले नाही. अशा परिस्थितीत माझ्यासारखा माणूस काय करू शकतो? या परिस्थितीत जर सुधारणा होऊ शकत नसेल तर माझे हृदय आक्रंदन करत 'हे देवा मला ताबडतोब घेऊन जा' अशी ईश्वराची प्रार्थना

करील. अशा गोष्टींचा साक्षीदार बनून मी का राहू? आणि त्याची इच्छा मी जिवंत राहावे अशीच असेल तर एके काळी माझ्यात जी शक्ती होती ती त्याने मला द्यावी अशी माझी त्याला विनंती आहे. लोकांची मी समजूत घालू शकतो असा मला अभिमान होता. पूर्वी मी जेव्हा लोकांकडे जात असे व काही करण्याविरुद्ध मी त्यांना सावधगिरीची सूचना देत असे तेव्हा ते माझे ऐकायचे. माझ्यावर त्यांचे असे प्रेम होते. माझे असे म्हणणे नाही की आज माझ्यावरील लोकांचे प्रेम कमी झाले आहे. परंतु ते कमी असो वा अधिक त्यामागे कृतीची जोड पाहिजे. आणि आज या कृतीचीच उणीव भासते. यामुळे मी म्हणतो की माझा प्रभाव कमी होत चालला आहे. आपण जेव्हा गुलामगिरीत होतो तेव्हा माझे काम चांगले सुरू होते. परंतु आज स्वतंत्र झाल्यानंतर माझ्यात काहीही करण्याची क्षमता उरलेली नाही. त्या वेळी लोकांना मी जे शिकवत होतो तेच मी आजही शिकवत आहे. तुम्ही जर माझा तो सल्ला ऐकाल तर आपण किती तरी पुढे जाऊ.

तुम्हांला मला सांगायचे आहे की आता थंडीचे दिवस येऊ लागले आहेत. मला थंडी वाजू नये म्हणून या मुलींनी ही शाल आणली आहे ती तुम्हांला दिसतेच आहे. मला थोडासा खोकलाही झाला आहे. परंतु आता बरीच सुधारणा झाली आहे आणि ही सुती चादर सध्या तरी माझ्याकरिता पुरेशी आहे. परंतु छावण्यांमधील आणि पुराना किल्ल्यामधील लोकांचे काय? मुसलमानांकरिता आम्ही ब्लॅन्केट का द्यावे असे तुम्ही विचारू शकता. परंतु मी तसा विचार करू शकत नाही. माझ्याकरिता मुसलमान, शीख, पारसी, ख्रिश्चन हे सर्व सारखे आहेत. मी कोणताही भेदभाव करू शकत नाही. त्या सर्व लोकांचे हिवाळ्यात काय होईल? त्यांना ब्लॅन्केट देणे सरकारचे काम आहे असे जर तुम्ही म्हणाल तर मी म्हणेन की सरकार ते करू शकत नाही. सरकार सर्व प्रयत्न करील परंतु साठा कुठे आहे? सरकार ब्लॅन्केट कुठून निर्माण करील? जादू करून तर ते निर्माण करता येत नाहीत. इतक्या सहजपणे ते ब्लॅन्केट निर्माण करू शकत नाही. आज युरोपमध्येसुद्धा या गोष्टी उपलब्ध नाहीत. तेथून

कोणीही काहीही पाठवू शकत नाही. कोणी जरी १०-२० हजार ब्लॅन्केट पाठवले तरी त्याने काय होणार आहे? आपल्याला लाखो लोकांना ब्लॅन्केट पुरवायचे आहेत. प्रत्येकाला ब्लॅन्केट कसे मिळतील? या सर्व लोकांना थंडीचा मारा सहन करावा लागणे योग्य नाही हे इथे हजर असलेल्या सर्व लोकांना मला सांगायचे आहे. परंतु मला माहीत आहे की अनेक लोकांकडे आवश्यकतेपेक्षा अधिक ब्लॅन्केट आहेत. दिल्लीत मोठ्या संख्येत असे लोक आहेत की ज्यांना ब्लॅन्केट घेणे परवडत नाही. देता येऊ शकतील असे जितके काही ब्लॅन्केट तुमच्याजवळ असतील तितके द्या. आजपासून अशा गोष्टी द्यायला तुम्ही सुरुवात करू शकता. सरकार सर्व काही करत आहे म्हणून आपण काहीही करण्याची गरज नाही असा विचार करून तुम्ही वाट पाहू नका. आता जरी थंडी सहन करण्यासारखी असली तरी ती पडायला सुरुवात झाली आहे. परंतु मी जेव्हा व्हाईसराय भवनात १७ तारखेला (सप्टेंबर) गेलो होतो तेव्हा तिथे शेकोटी पेटवण्यात आलेली मला दिसली होती. कारण थंडीची सुरुवात झालेली आहे आणि दिल्लीचा हिवाळा इतका कडक असतो की तो सहन करणे कठीण असते. ऑक्टोबरनंतर वेगात थंडी वाढू लागते आणि नंतर ती भयानक रूप धारण करू लागते. नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी हे सर्व सुंदर थंडीचे महिने आहेत. ज्यांच्याजवळ खाण्याचे साहित्य आहे, कपडे आहेत, व भरपूर कपडे घालून जे फिरू शकतात, बूट आणि मोजे घालू शकतात त्यांच्याकरिता हिवाळा प्रसन्न ऋतू आहे असे म्हणणे परवडू शकते. परंतु ज्यांच्याजवळ या गोष्टी नाहीत त्यांचे काय होते याचा मी साक्षीदार आहे. तुम्हीसुद्धा ते पाहिले असेल. यामुळे अशा जितक्या लोकांना आपल्याला वाचवता येईल तितक्या लोकांना आपण वाचवले पाहिजे. शक्य आहे की ज्यांच्याजवळ कपडे आहेत त्यांच्याजवळ लोकरीचे ब्लॅन्केट नसतील. परंतु त्यांच्याजवळ जरी लोकरीची कांबळी नसतील तरी दुलया असू शकतील. चांगल्या जाड चादरी असू शकतील. त्यांनीसुद्धा काम भागू शकते. जुन्या काळात त्यांनीच काम भागवले जात असे. त्या जर

चांगल्या अवस्थेत असतील तर त्यासुद्धा आणू शकता. लोकरी कांबळी, रजया, सुती चादर जे काही तुम्ही सहजपणे देऊ शकता ते मला हवे आहे. तुम्ही या गोष्टी स्वतःहोऊन दिल्या पाहिजे. तुम्ही जर या गोष्टी पाठवायला सुरुवात केली तर कोणाकडे तरी त्या गोळा करण्याची जबाबदारी सोपवता येईल. याची जबाबदारी मी स्वतः घेणार नाही. आणि या गोष्टी गोदामात सडत पडू दिल्या जाणार नाहीत व अयोग्य व्यक्तीच्या ताब्यात दिल्या जाणार नाहीत. तुम्ही जे काही पांघरूण वा कपडे द्याल ते गरजू माणसाकडेच जातील असे मी तुम्हांला आश्वासन देतो. या गोष्टी आम्ही तुम्हांला हिंदू वा शिखांकरिता देत आहो असे तुम्ही सांगू नका. मानव प्राणी एक आहे.या गोष्टी मुसलमानांना देऊ नका असे नंतर कोणी येऊन मला सांगू नका. इथे मोठ्या संख्येत मुसलमान मारले गेले आहेत आणि अनेक पळून गेले आहेत. आम्ही त्यांना हाकलून लावले आहे. जे मागे राहिले त्यांच्याजवळ किती संपत्ती पडली आहे ते मला माहीत नाही. भारतात राहिलेले मुसलमान जर माझ्याकडे ब्लॅन्केट पाठवतील आणि ती मुसलमानांनाच द्यावी असा आग्रह धरतील तर मी ते मुसलमानांना देईन. परंतु जे लोक माझे शब्द ऐकत आहेत व जे रेडिओवर ऐकतील त्यांनी मला संकोच वाटेल असे काही करू नये आणि म्हणावे की आम्ही या गोष्टी कृष्णार्पण केल्या आहेत आणि जो पात्र असेल त्याला त्या मिळतील असे आम्ही समजू. मला आशा आहे आणि विश्वास आहे की तुम्ही इतके निश्चितच कराल. तुम्ही जर इतके केले तर तुम्ही फार मोठी गोष्ट केली असे मी म्हणेन. परंतु घाणेरड्या आणि फाटक्या गोष्टी पाठवू नका. मला त्या धुण्याची आणि त्यांना रफू करण्याची आवश्यकता पडायला नको. इतका त्रास घ्या. ते धोब्याकडे पाठवण्याची गरज नसावी. तुम्ही ते साध्या पाण्यात धुऊ शकता आणि व्यवस्थित घडी करून ते माझ्याकडे आणू शकता. तुम्ही असे केले तर मला फार आनंद होईल.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ३७६-७०

# ८२. औदासिन्याचे कारण नाही

वाढदिवसानिमित्त अभिनंदन करणारे जे अनेक संदेश आले त्यांतील हा एक -

**सध्याच्या परिस्थितीत तुम्ही उदास होण्याचे कारण नाही असे मी सुचवू शकतो काय? माझ्या मते अहिंसेच्या माध्यमातून जगाचे दुःख दूर करण्याच्या कामात भारताच्या भूमिकेची जी ईश्वरी योजना आहे तिला विफल करण्याकरिता वाईटपणाच्या शक्तींचा हा शेवटचा प्रयत्न आहे. हे इश्वरी उद्दिष्ट पूर्ण करू शकणारे तुम्ही एकटे आहा.**

माझ्यावरील अतिरिक्त प्रेमामुळे ही तार पाठवण्यात आली आहे, ज्ञानामुळे नाही. आपण पाहू या -

माझ्या सध्याच्या मनःस्थितीचे वर्णन उदासीन असे करणे चूक आहे. मी केवळ वस्तुस्थिती सांगितली आहे. ईश्वरी इच्छा केवळ माझ्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकते असे समजण्याइतका खोटा अभिमान माझ्यात नाही. फार मोठी शक्यता आहे की ईश्वरी योजना पूर्ण करण्याकरिता माझ्यापेक्षाही चांगल्या साधनाचा उपयोग केला जाईल आणि दुर्बल राष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याकरिता कदाचित मी योग्य असेनही परंतु शक्तिशाली राष्ट्राकरिता नाही. असे होऊ शकत नाही काय की अंतिम उद्दिष्टाकरिता अधिक पवित्र, साहसी आणि जास्त दूरदर्शी अशा दुसऱ्या व्यक्तीची आवश्यकता असेल? हे सर्व अंदाज आहेत. ईश्वरासंबंधी निर्णय घेण्याचे सामर्थ्य कोणातही नाही. त्या दयेच्या सागरात आपण थेंबाइतकेही नाही.

यामुळे १२५ वर्ष जगण्याची वा आताच मरण्याची इच्छा करायची नाही हीच आदर्श गोष्ट आहे. ईश्वरी इच्छेला पूर्णपणे शरण जाणे हीच माझी मनःस्थिती असली पाहिजे. आदर्श जेव्हा वास्तवात येतो तेव्हा आदर्श आदर्श राहत नसतो. आपण केवळ शक्य तितके

त्याच्याजवळ जाऊ शकत असतो. माझ्यात जी काही शक्ती आहे तिच्या आधारे ही गोष्ट करण्याचा मी प्रयत्न करतो आहे.

मी जर १२५ वर्ष जगण्याची इच्छा उघडपणे व्यक्त करण्याचे धार्ष्ट्य केले होते तर आता त्या इच्छेचा मी त्याग केला आहे हे उघडपणे जाहीर करण्याची नम्रताही माझ्याजवळ असली पाहिजे. आणि याहून मी काहीही अधिक वा कमी केलेले नाही. असे उदासीनतेच्या भावनेमुळे करण्यात आलेले नाही. याकरिता अधिक योग्य शब्द असहायता असू शकेल. या लाचारीच्या अवस्थेत या दुःखी जगातून त्या सर्वव्यापीने मला घेऊन जावे व स्वतःला हिंदू वा मुसलमान वा अजून काही म्हणवणारा हा रानटी माणूस ज्या कत्तली करत आहे त्या असहायपणे पाहत राहण्याची माझ्यावर वेळ आणू नये अशी मी ईश्वराकडे करुणा भाकत असतो आणि तरीही मी प्रार्थत असतो की माझ्या नाही तर तुझ्या इच्छेप्रमाणे प्रमाणे होऊ दे. (ल्यूक १२.४२) त्याला जर मी हवा असेन तर तो मला या पृथ्वीवर अजून काही काळ ठेवील

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ५, १९४७

'हरिजन', ऑक्टोबर १२, १९४७

----------------

# ८३. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

सर्वात आधी मी माझ्या प्रकृतीबद्दल तुम्हांला सांगेन कारण आज वर्तमानपत्रांत माझ्या आजाराबद्दल लिहून आले आहे. ही माहिती कोणी पाठवली हे मला माहीत नाही. माझ्या सभोवती नेहमी असणाऱ्या डॉक्टरांकडून ही माहिती पाठवली जाऊ शकत नाही. मला भेटण्याकरिता असंख्य लोक येत असतात व ते माझा खोकला व अधूनमधून मला येणारा ताप पाहत असतात. त्यांनीच हा राईचा पर्वत केला असावा. का? ते माझ्या प्रकृतीबद्दल लिहितात कारण मी महात्मा असल्यामुळे ही बातमी जगभर पसरते. गांधी मेला तर काय होणार आहे? प्रत्येक जण जर मरणार आहे तर गांधीलासुद्धा मरावे लागेल. या जगात अमरपट्ट्याची देणगी घेऊन कोणीही आलेला नाही. मला थोडा खोकला आणि अशक्तपणा आहे. परंतु या गोष्टीला वृत्तपत्रांमधून प्रसिद्धी देण्याला काय अर्थ आहे? मी म्हणेन की ही माहिती देणारांनी ना तर माझे भले केले आहे ना अजून कोणाचे. तुम्ही पाहतच आहा की मी इथे आलो आहे आणि बोलतही आहे. माझ्या कामात कोणताही अडथळा आला नाही. लोकांनी अशा गोष्टी करू नये अशी माझी इच्छा आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे हिवाळा वेगात जवळ येत असल्यामुळे हिवाळ्यात उपयोगी पडतील अशा कांबळी, दुलया, चादरी वा इतर काही साहित्य जर तुमच्याजवळ देता येण्यासारखे असेल तर ते द्यावे अशी मी तुम्हांला विनंती केली होती (पाहा "प्रार्थना, प्रवचन', ऑक्टोबर ४, १९४७). तीन लोकांनी आज ब्लॅन्केट पाठवले. त्यांतील दोन जवळपासच्या भागातच राहणारे आहेत. परंतु मी त्यांचे नाव विसरलो. त्यांनी पाठवलेले ब्लॅन्केट बरेच

चांगले आहेत. अजून एका माणसाने ब्लॅन्केट दिले आहे परंतु त्यांचेही नाव मी वसरलो. त्यांनी दहा ब्लॅन्केट दिले आहेत व ते सर्व नवीन असले पाहिजे. मी काल सांगितल्याप्रमाणे हे सर्व ब्लॅन्केट सुरक्षित ठेवले आहेत. ते पात्र स्त्री-पुरुषांना देण्यात येतील. मी आज तुम्हांला जे सांगितले त्याबद्दल जर तुमची खात्री पटली असेल तर तुम्हांला जे काही देता येऊ शकत असेल ते तुम्ही मला द्याल अशी आशा आहे.

मला नुकताच अनेक लोकांनी मिळून पाठवलेली तार मिळाली. ती तार इथे माझ्यासमोर पडली आहे. त्या तारेत जे लिहिले आहे ते मला आवडले नाही. अशी तार पाठवण्याचा अर्थातच त्यांना अधिकार आहे. तार पाठवणारांचे म्हणणे आहे की ज्या प्रकारे हिंदू वागले त्या प्रकारे वागले नसते तर तुम्हीसुद्धा जिवंत राहिला नसता. ही फार गंभीर बाब आहे. मला जिवंत ठेवणारी ईश्वरी सत्ता सोडली तर इतर कोणतीही सत्ता मी मानत नाही. त्याची इच्छा असेल तोपर्यंत मी जिवंत राहीन व त्या क्षणापर्यंत कोणीही मला मारू शकत नाही. जे माझ्याकरिता खरे आहे ते प्रत्येकाकरिता खरे आहे. मग त्यांनी अशा प्रकारच्या गोष्टी का लिहाव्या? मला मान्य आहे की त्यांनी जे काही लिहिले ते माझ्याबद्दलच्या प्रेमापोटी लिहिले आहे. परंतु ईश्वरच मला वा अजून कोणाला जिवंत ठेवत असतो अशी माझी खात्री आहे.

ते लोक पुढे लिहितात की (त्यांनी काही नावे लिहिली आहेत परंतु मी ती नावे वगळू इच्छितो.) तुम्ही अतिशय साधेभोळे आहा म्हणून तुम्ही मुसलमानांवर विश्वास ठेवता. मुसलमान अखेरीस धोका दिल्याशिवाय राहणार नाहीत असे एकच माणूस नाही तर मोठ्या संख्येतील लोक मला असेच सांगतात. त्यांचे म्हणणे आहे की ते पाकिस्तानची बाजू घेतील व पाकिस्तानला मदत करण्याकरिता भारताविरुद्ध लढतील. त्यांचे म्हणणे आहे की १०० पैकी ९८ मुसलमान विश्वासघातकी आहेत. माझे हे मत नाही हे मी तुम्हांला सांगितले पाहिजे. या साडेचार कोटी मुसलमानांपैकी बहुतेक लोक खेड्यापाड्यात राहतात आणि फार कमी

शहरात राहतात व आपल्यामधील लोकच मुसलमान झाले आहेत आणि ते सर्व देशद्रोही होऊ शकत नाहीत. प्रत्येक मुसलमान देशद्रोही आहे असे गृहीत धरून आपण त्यांच्या घरात घुसून त्यांच्याजवळील शस्त्र हस्तगत केली पाहिजे काय? मुसलमानांना एक तर मारून टाकले पाहिजे वा त्यांना येथून बाहेर हुसकावून लावले पाहिजे अशी त्यांची सूचना आहे. या मित्रांना मी सांगेन की हा भ्याडपणा आहे. ते जर खरोखरी तसे असतील तर सरकारजवळ तसे सिद्ध करा व सरकारला प्रकरण निपटवण्याकरिता सांगा असे मी त्यांना आग्रहपूर्वक सांगेन. या मित्रांच्या सूचनेप्रमाणे आपण वागलो तर हे दोन समुदाय शत्रू होतील व त्याचा परिणाम युद्धात होईल. जर दोन्ही बाजू युद्धाचा आग्रह धरत असतील तर दोघांचाही विनाश होईल व आपण मिळवलेले स्वातंत्र्य आपण गमावू. दुसऱ्याचे लांगुलचालन करून कोणताही हिंदू आपल्या धर्माचे रक्षण करू शकत नाही. इंग्रज होते तेव्हा त्यांच्या गुलामगिरीमुळे आपला हिंदू धर्म टिकलेला आहे असे आपण समजत होतो. परंतु ती चूक होती.

मी जेव्हा मूल होतो तेव्हा मी फार मोठ्या कवीची एक कविता वाचली होती. तो कवी आंधळा होता. त्याने लिहिले होते, “ठीक आहे, आता वैर संपले, आता आपण आरामात राहू या. इंग्रज आले आहेत.“ एक काळ असा होता की जेव्हा इंग्रजांनी आपण मोहीत झालो होतो व त्यांच्या संरक्षणाखाली आपण सुरक्षित आहो असे आपल्याला वाटत होते. आपण ती चूक दुरुस्त करू या. घाबरून साडेचार कोटी मुसलमानांना पळवून लावले पाहिजे असे आपल्याला वाटू लागले असेल तर आपण दुर्बलमनस्क असल्याचे सिद्ध होईल. अशा पद्धतीने आपण आपल्या धर्माचे रक्षण करू शकणार नाही. हिंदू आणि मुसलमान यांच्यात मूलतःच वैरभावना असते यावर माझा विश्वास नाही. आपण जर शत्रू होऊ तर भारत कसा टिकून राहील? हिंदू आणि मुसलमान दोघेही परत गुलामगिरी

पत्करणार आहेत काय व ते आपला धर्म विसरणार आहेत काय? हे कसे शक्य आहे? सरकारला सर्व संबंधित माहिती पुरवणे आपले कर्तव्य आहे.

मंत्र्यांशी माझ्या भेटीगाठी होत असतात व मी जवळपास दररोज त्यांच्या संपर्कात असतो हे मी तुम्हांला सागितले पाहिजे. पंडितजी मला दररोज भेटतात. पंडितजींइतके वारंवार जरी नाही तरी सरदारसुद्धा मला जवळपास दररोज भेटतात. परंतु ते दोघेही येतात. ते दोघेही माझे मित्र आहेत व माझ्याबरोबर आहेत. दोघांचेही माझ्याशी प्रामाणिक मतभेद होत असतात. मी त्यांना काही गोष्टी सांगू शकत नाही असे मला म्हणायचे नाही. सरकारने सर्वांचे रक्षण केले पाहिजे - हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिश्चन इत्यादी सर्व. असे झाले तरच ते स्वतःला खरे कॉंग्रेसी म्हणवून घेऊ शकतील. हिंदूमहासभेचे काम हिंदूंचे रक्षण करणे आहे. शिखांच्या आणि हिंदूंच्या धर्माचे रक्षण करणे आणि वाईटाच्या शक्तीला पराभूत करणे त्यांचे काम आहे. हे काम दुसरा कोण करणार आहे? कोणाच्या कृपेने धर्माचे रक्षण करता येऊ शकते काय? आपण जेव्हा माझ्या धर्माच्या रक्षणाकरिता मदत करा असे म्हणतो तेव्हा तो खरे तर सौदा असतो. आपण हे सर्व म्हणतो कारण आपल्याला स्वतःला वाचवायचे असते. आपण एक पोषाख आज घालू शकतो आणि दुसरा उद्या. याचा अर्थ आपण कोणत्या तरी धर्माचे पालन करतो असा होतो काय? यामुळे मी म्हणतो की या मित्रांनी तार पाठवून योग्य काम केले नाही.

यानंतर मला तुमच्याशी दुसऱ्या विषयावर बोलायचे आहे. श्रीयुत चर्चिल यांनी जुनाच दृष्टिकोन (पाहा, “प्रार्थना प्रवचन”, सप्टेंबर २८, १९४७) अतिशयोक्त स्वरूपात परत मांडला आहे. यामुळे मला दुःख होते. मी ब्रिटिशांचा मित्र आहे म्हणून असे होते. कोणाहीबद्दल माझ्या मनात शत्रुत्वाची भावना नाही. ब्रिटिशांमधील अनेक लोक फार चांगले आहेत आणि भारताला स्वातंत्र्य देत असताना ते फार धैर्याने वागले. नंतर याचे काय परिणाम होतील याची मला फिकीर नाही. चर्चिल या कृत्याची निंदा करतात आणि आपल्या आधीच्या

भाषणामध्ये ते म्हणाले होते की भारतीय हे जसे आहेत तसेच आहेत. त्यांना जर हे आधीपासून माहीत होते तर या दृष्टिकोनाचे वारंवार चर्वितचर्वण करण्याचे कारण काय?

परंतु असे दिसते की केवळ आपल्या पक्षाच्या हिताकरिता ते मजूर पक्षावर टीका करण्याकरिताच हे बोलत आहेत. मजूर पक्षाचा पराभव व्हावा आणि आपला पक्ष परत सत्तेवर यावा म्हणूनच ते असे बोलत आहेत. आज ब्रिटनमध्ये मजूरवर्ग सत्तेवर आहे. ब्रिटन हे लहानसे बेट आहे. परंतु ब्रिटनची जी इतकी प्रगती झाली ती त्याच्या मजूर वर्गाच्या बळावर व त्याच्या जगप्रसिद्ध उद्योगाच्या आधारावर. देशातील सध्याच्या सरकारला घालवण्याची चर्चिलची आकांक्षा आहे. या सरकारला पदच्यूत करण्याकरिता मजूर सरकारने मूर्खपणा केला आहे व हा गोंधळ घालून साम्राज्याची हानी केली असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे म्हणणे आहे की ब्रिटनने भारत सोडला ही चूक केली आणि आता हीच गोष्ट ते ब्रह्मदेशात (म्यांमार) करू पाहत आहे. त्यांनी ब्रह्मदेशावर स्वामित्व कसे मिळवले व भारतात आपल्या सत्तेचे बस्तान कसे बसवले या ब्रिटनच्या इतिहासाशी आम्ही चांगले परिचित आहो. अशा इतिहासाचा कोणाला अभिमान वाटू शकेल असे मला वाटत नाही.

आज आपण जे काही करत आहो तो शुद्ध रानटीपणा आहे. आपण मिळवलेल्या स्वातंत्र्याचा आपणच विध्वंस करू पाहत आहो. तुमच्या नजरेत मी निरुपयोगी आहे हे मला कबूल आहे. तुमच्यावर माझा कोणताही प्रभाव नाही. याचबरोबर मी तुम्हांला सांगेन की ब्रिटिश जर चर्चिलचे ऐकतील आणि कंझर्व्हेटिव पक्ष मजूर पक्षाला पराभूत करील तर ती फार मोठी दुर्दैवी घटना ठरेल. संपूर्ण जग म्हणते की आपण कोणत्या तरी शक्तीच्या बळावर स्वातंत्र्य मिळवले. ही कोणती शक्ती आहे? ती कामगार शक्ती होती. त्या वेळी कामगारांचा समाजवादी पक्ष सत्तेवर होता आणि त्या सरकारने आपल्याला स्वातंत्र्य दिले. समाजवाद कोण नाहीसा करू शकतो? ना तर चर्चिल असे करू शकतात ना अजून कोणी. त्यांचे सरकार इतर कोणत्याही प्रकारे काम करू शकत नाही. कल्पना करा की ब्रिटिश

राष्ट्राने आपला गुणधर्म गमावला आणि मजूर पक्षाचा पराभव झाला व श्रीयुत चर्चिल परत सत्तेवर आले तर आम्ही तुम्हांला परत गुलाम करू अशी धमकी ते देणार आहेत काय व आपल्यावर हल्ला करणार आहेत काय? ते असे कसे करू शकतात हे मला कळू शकत नाही. आम्ही कसेही असलो, वाईट असलो, चांगले असलो, बदमाश, मूर्ख, कसेही झालो वा असलो तरी स्वातंत्र्य ही सर्वात मोठी गोष्ट आहे ही गोष्ट याच लोकांनी मला शिकवली आहे. अशा महान स्वातंत्र्याकरिता जर काही चुका होणार असतील तर त्या करण्याचा तुम्हांला अधिकार आहे. असे नाही की आपण चांगले असू तेव्हा आपल्याला स्वातंत्र्य देण्यात येईल आणि तसे नसू तेव्हा ते काढून घेण्यात येईल. कोणी असे कसे बोलू शकतो? ब्रिटिशांचा तर हा कायदा नाही. जगातील दुसऱ्या कोणत्याही देशाचा असा कायदा नाही. केवळ चांगल्या लोकांकरिता स्वातंत्र्य असेल तर, आणि जगात जे काही घडते आहे त्याकडे पाहिले तर जगात कुठेही आपल्याला स्वातंत्र्य कसे दिसेल? गुलामगिरीपेक्षा स्वातंत्र्य केव्हाही चांगले हे ब्रिटिशांनीच आम्हांला शिकवले आहे. एक ब्रिटिश लेखक म्हणतो की आम्ही दारू पिऊन झिंगून पडून राहिलो तरी आम्ही स्वतंत्र राहणे पसंत करू, गुलाम होऊन सुधारणे आम्हांला मान्य नाही. परंतु भारतात आपण त्यांचे दोष घेतो, गुण नाही.

भारतात सात लाख खेडी आहेत. सात लाख खेड्यातील लोकांना वेड लागलेले नाही. या सात लाख खेड्यातील लोक वेडे झाले तर भारताचा नकाशा पूर्णपणे बदलून जाईल. त्यांना जरी वेड लागले तरी ते जर स्वतंत्र राहिले तर मला खुषीच होईल. परंतु त्यांना वेड लागले आहे असे समजून भारतावर जर कोणी वाईट दृष्टी टाकली व त्याला गुलाम करण्याची इच्छा धरली तर ते चालणार नाही.

मी हे तुम्हांला आधीच सांगितले आहे आणि आता परत सांगतो की आपल्याला जरी वेड लागले तरी इंग्रज तर काही परत इथे येणार नाहीत. ते आता इथे येऊ शकत नाहीत.

एकदा त्यांनी एखादी गोष्ट थुंकून टाकली तर ते काय ती परत तोंडात घालणार आहेत? परंतु इथे काय घडते आहे त्याच्याकडे जगाची नजर आहे. इथे जे काही सुरू आहे ते पाहून जगाची काय प्रतिक्रिया होईल? भारतासंबंधी असे काही घडण्याला जग परवानगी देणार नाही. आणि भारतसुद्धा असे घडू देणार नाही. परंतु संयुक्त राष्ट्र परिषद जर इथे चौकशीकरिता आली तर आपण त्यांना अडवू शकणार नाही. त्यावेळी आपले वेड कायम राहिले आणि आपल्याला आपलेच भान राहिले नाही तर आपण आपले स्वातंत्र्य त्यांना देऊन टाकू.

मी जरी एकटा शिल्लक राहिलो तरी मी म्हणेन की खबरदार, सगळे जग जरी आले तरी आणि ते आमचे सर्व काही नष्ट करू पाहत असतील तर ते तसे करू शकतीलही. परंतु ते आम्हांला परत गुलामगिरीत टाकू शकणार नाही. परत कधीही गुलामगिरी पत्करायची नाही अशी मी शपथ घेतली आहे. ती शपथ खरी ठरण्याकरिता तुम्ही सर्वांनी ती पाळली पाहिजे. मी एकटा तर भारत वाचवू शकत नाही. माझे काय खरे आहे? मी किती दिवस जिवंत राहीन हे कोणाला माहीत? ईश्वराने जरी मला नेले तरी भारतावर त्याचा काय परिणाम होणार आहे?

मी एकटा भारताला कसा वाचवणार? ते सर्व ईश्वरावर अवलंबून आहे. तो जर माझ्या बाजूने असेल व त्याची माझ्यावर कृपा असेल तर भारताला वाचवता येईल. मला वाटते की जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत भारतातील अनागोंदीच्या परिस्थितीचा कोणीही फायदा घेऊ शकणार नाही व आपण भारताला गुलाम करून ताब्यात घेऊ या असे म्हणू शकणार नाही. तुमच्या माध्यमातून ईश्वराने माझी ही इच्छा पूर्ण करावी अशी माझी इच्छा आहे.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ३८०-८५

-----------------

# ८४. प्यारेलालना लिहिलेल्या पत्रातील उतारे

[ऑक्टोबर ६, १९४७]

(६ ऑक्टोबर १९४७चे पत्र उद्धृत करत असताना प्यारेलाल म्हणतात की मागील पत्रात गांधीजींनी मला नोआखालीतून मोकळे होता येईल काय असे विचारले होते. मी उत्तर दिले की हे सर्व तुलनात्मक गरजेवर अवलंबून आहे. तुम्हाला जर माझी दिल्लीत गरज असेल तर मी येऊ शकतो. त्याला गांधीजींनी दिलेले हे उत्तर.)

अर्थातच मला गरज आहे....(मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे) किती तरी कामे आहेत. याशिवाय 'हरिजन'च्या संपादनाच्या कामाची सक्रिय जबाबदारी मी स्वीकारली आहे.....(मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे) त्यामुळे इथे तुझी गरज अजूनच वाढलेली आहे. तरीही नोआखालीच्या कामाला मी प्राधान्य देतो. तुम्ही सर्व तिथे असताना मला इथे निश्चिंत वाटू शकते. कल्पना करा की तुम्ही सर्व इथे आला तर मला इथले काम सोडून नोआखालीला यावे लागेल. इतकेच नाही तर करा वा मराची जबाबदारीही मलाच घ्यावी लागेल.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड ४, पृष्ठ ११९

-----------------

# ८५. मगनभाई प्र. देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ६, १९४७

चि. मगनभाई,

मी आजच तुमचे पत्र वाचू शकलो. आता सकाळचे सव्वापाच वाजले आहेत. पत्र वाचण्याकरिता मला बराच वेळ लागला.

तुमचे उत्तर 'हरिजन'मध्ये प्रकाशित करता येऊ शकत नाही, ते प्रकाशित केले तर या विषयाची चर्चाही हरिजनमध्ये  करावी लागेल. ती करण्याची माझी तयारी नाही. याशिवाय माझा दृष्टिकोन अगदी वेगळा आहे. नवीन विद्यापीठाची योजना या वेळी मला योग्य वाटत नाही. याशिवाय जोपर्यंत वेगवेगळी राज्ये तयार होत नाहीत तोपर्यंत वेगळ्या विद्यापीठाचा प्रश्न का उपस्थित करावा? आपल्या वा असे म्हणा की केवळ माझ्या दृष्टिकोनातून शिक्षण सर्व पातळ्यांवर स्वावलंबी असले पाहिजे. आणि अखेरचे म्हणजे भारताच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झालेला असताना आणि लोकांच्या आपसात लढाया सुरू असताना अशा प्रकारच्या योजनांची चर्चा करणे कितपत उचित आहे?

या विषयावर मी अजून विचार करावा अशी तरीही तुमची इच्छा असेल तर मला लिहा.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ११००१

-------------------

# ८६. प्यारेलाल यांना पत्र

ऑक्टोबर ६, १९४७

पूर्व बंगालमधून परत नव्याने हिंदूंचे स्थलांतर सुरू झाले आहे. हे कशाचे सूचक आहे? ढाकाच्या भागात नोआखालीची पुनरावृत्ती होणार नाही असे मी गृहीत धरतो. मुसलमान लोक हिंदूंना आपले सण संगितासह साजरे करू देत नाहीत असे सांगतात. असे म्हणतात की मुसलमानांमध्ये दोन गट आहेत. एका गटाचे म्हणणे आहे की हिंदूंना आपले सण साजरे करण्याचा पूर्ण अधिकार आहे. दुसरा म्हणतो की आम्ही याकरिता परवानगी देणार नाही. परिणामी हिंदूंमध्ये घबराट पसरली आहे. पूर्ण चौकशी केल्यानंतर मला सविस्तर लिही.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड ४, पृष्ठ ११८-१९

---------------

# ८७. वल्लभभाई पटेल यांना पत्र

ऑक्टोबर ६, १९४७

चि. वल्लभभाई,

काल सायंकाळी मौलाना साहेब माझ्याकडे आले होते आणि माझ्याबरोबर ते थोडा वेळ होते. आपण तिघांनी एकत्र भेटावे अशी त्यांची इच्छा आहे. भेटायची वेळ तुम्ही ठरवायची आहे. मंगळवारी कोणत्याही वेळी त्यांना एक तास हवा आहे. कृपाकरून मला आणि त्यांनाही वेळ कळवा.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३७५

---------------

## ८८. अमतुस्सलाम यांना पत्र

ऑक्टोबर ६, १९४७

बेटी अमतुल सलाम,

बारी खान (अमतुस्सलाम यांचा भाऊ) येथे आहे. तो मला भेटत राहत असतो. पतियाळात तुझे नातलग आहेत त्यांच्याबद्दल तुझे सर्व भाऊ काळजी करत होते. मोठ्या मुश्किलीने जी काही माहिती मी मिळवू शकलो ती सोबत जोडली आहे. बारी खानला सर्व माहिती दिली आहे. आता ते सर्व पाकिस्तानमध्ये सुरक्षित पोहोचले आहेत. परंतु एवढ्याने समाधान होऊ शकत नाही. पतियाळात क्वचितच कोणी मुसलमान राहिला असेल. अनेकांचे खून झाले. काय पाशवीपणा सुरू आहे! पाकिस्तानमध्ये एकही हिंदू राहू नये आणि हिंदुस्तानमध्ये एकही मुसलमान राहू नये असा लोक प्रयत्न करत आहेत. मी इथे (धडपडतो) आहे. एक तर येथील परिस्थितीत सुधारणा होईल वा मला मरावे लागेल. ईश्वरालाच सर्व काही माहीत आहे.

तू तिथे शांततापूर्वक राहू शकत असशील तर राहा. माझ्या मते दुसरा कोणताही पर्याय नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून : जी. एन. ५८८

-------------

# ८९. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ६, १९४७

ज्या लोकांना आपल्या अन्नधान्याच्या गंभीर समस्येबद्दल माहिती असली पाहिजे ते लोक डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या निमंत्रणावरून अन्नधान्यविषयक माहिती देण्याकरिता इथे आले आहेत. या आवश्यक गोष्टीत जर काही चूक झाली तर तिचा अर्थ होईल टाळता येण्यासारखी उपासमार आणि करोडो लोकांचा मृत्यू. मानवी वा नैसर्गिक दुष्काळामुळे करोडो जरी नाही तरी लाखो लोकांचा मृत्यू होणे ही गोष्ट भारताकरिता काही नवीन नाही. माझा दावा आहे की कोणत्याही सुसंघटित समाजात पाऊस आला नाही अथवा पीक गेले तर अडचणीच्या काळात त्याला यशस्वीपणे तोंड देता यावे म्हणून आधीच योजना आखलेली असते. परंतु सुसंघटित समाज कसा असतो आणि अशा वेळी त्याने काय केले असते याचे वर्णन करण्याची ही वेळ नाही. आज तर अन्नधान्याच्या या बिकट समस्येला आपण शक्य तितक्या यशस्वीपणे तोंड देऊ शकतो की नाही हेच आपल्याला पाहायचे आहे.

मला वाटते की आपण हे करू शकतो. पहिला पाठ आपल्याला जो शिकायचा आहे तो स्वतः स्वतःला मदत करण्याचा आणि स्वावलंबनाचा. आपण जर हा धडा पचवला तर लवकरच आपण विदेशी मदतीवर विसंबून राहणे व त्यामुळे अखेरीस येणाऱ्या दिवाळखोरीपासून वाचू शकू. हे मी अहंकाराच्या भरात म्हणत नाही आहे, वस्तुस्थिती म्हणून मी हे सांगतो आहे. आपला देश इतका काही लहान नाही की आपल्याला अन्नधान्याकरिता इतरांच्या मदतीवर अवंलंबून राहावे लागावे. आपण उपखंड आहो. ४० कोटी लोकांचा आपला देश आहे. आपल्या देशात मोठमोठ्या नद्या वाहतात आणि विविध

प्रकारची सुपीक जमीन आपल्या देशात आहे. तसेच आपल्याकडे असंख्य पाळीव पशू आहेत. आपले पशू फार कमी दूध देतात हा आपला दोष आहे. आपल्याला जितके दूध लागते तितके देण्याची क्षमता आपल्या गायीम्हशींमध्ये आहे. गत काही शतकात आपल्या देशाने याकडे दुर्लक्ष केले नसते तर त्याने केवळ स्वतःपुरतेच अन्नधान्य निर्माण केले नसते तर दुसऱ्या महायुद्धानंतर जी अन्नधान्य समस्या संपूर्ण जगात निर्माण झाली ती दूर करण्यातही आपल्या देशाने महत्त्वाची भूमिका बजावली असती. भारतातसुद्धा हीच समस्या आहे. यामुळे निर्माण होणारे क्लेष कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. माझ्या सूचनेचा असा अर्थ नाही की विदेशातून कोणी स्वतःहोऊन काही मदत करत असेल तर ती आपण कृतघ्नपणे ठोकरून लावावी. मला केवळ इतकेच म्हणायचे आहे की आपण भीक मागत फिरू नये. यामुळे आपले मनोधैर्य खचते. यात अन्नधान्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याकरिता येत असलेल्या अडचणीची भर पडते. धान्याची जलद वाहतूक करता येईल अशा सोयी आपल्याजवळ नाहीत. विदेशातून येणारे धान्य खाण्यासारखे असेल की नाही याचीही या समस्येत भर पडते. मानवी स्वभाव लक्षात ठेवून आपल्याला काम करायचे आहे ही गोष्ट आपण विसरू शकत नाही. जगातील कोणत्याही भागात माणूस ना तर परिपूर्ण झाला आहे ना परिपूर्णतेच्या जवळपास पोहोचला आहे.

आता आपल्याला कोणती परकीय मदत मिळण्याची शक्यता आहे हे आपण पाहू या. मला असे सांगण्यात आले आहे की आपल्या सध्याच्या गरजेच्या ३ टक्केपेक्षा जास्त अशी मदत मिळू शकत नाही. ही माहिती जर बरोबर असेल, आणि ती बरोबर आहे की नाही हे मी अनेक तज्ज्ञांकडून तपासून घेतले आहे, तर विदेशी मदतीवर विसंबून राहण्यात काहीही अर्थ राहत नाही. किंचितशा बाह्य मदतीवर अवलंबून राहणे याचा अर्थ होईल आपल्या असीम अंतर्गत क्षमतांकडे दुर्लक्ष करणे. यामुळे पीक काढण्यायोग्य एकएक इंच भूमीकडे आपण जितके लक्ष दिले पाहिजे तितके देत नाही. त्या जमिनीतून रोखीचे पीक

काढण्याऐवजी आपण धान्य पिकवू शकतो. ज्या पडीत जमिनीतून पीक घेणे शक्य असेल ती आपण वहितीत आणली पाहिजे.

धान्याचे केंद्रीकरण विनाशक होईल अशी मला आशंका आहे. विकेंद्रीकरणामुळे सहजपणे काळ्याबाजाराला तोंड देता येऊ शकते. यामुळे धान्य नेण्याआणण्याकरिता लागणारा वेळ आणि पैसा वाचतो. याशिवाय जो ग्रामीण भारतात धान्य आणि डाळी पिकवतो त्याला उंदरांपासून आपल्या पीकाचे रक्षण कसे करावे हे माहीत असते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी धान्य नेत असताना त्याची नासाडी करण्याची उंदरांना संधी मिळते. यामुळे देशाचे अनेक कोटी रुपयांचे नुकसान होते व टनांनी धान्य वाया जाते. आणि तेही अशा वेळी की जेव्हा देशाला एकेक अंस धान्याची नितांत गरज आहे. जिथे कुठे धान्य पिकवता येईल तिथे ते पिकवले पाहिजे याची जाणीव जर प्रत्येक भारतीयाला झाली तर देशात अन्नधान्याचा तुटवडा आहे हे आपण विसरून जाऊ. अधिक धान्य पिकवण्याच्या सुंदर आणि आकर्षक विषयाचे पूर्ण विवेचन मी केलेले नसले तरी जे काही मी सांगितले त्यावरून प्रत्येक माणूस या शुभकार्यात कशा प्रकारे मदत करू शकेल याकडे विद्वान लोक लक्ष देतील.

जे तीन टक्के धान्य आपण कदाचित विदेशातून मिळवू शकतो त्याची तूट आपल्याच देशातून कशी भरून काढता येईल हे मी आता दाखवेन. हिंदू दर एकादशीला उपवास वा अर्ध-उपवास करत असतात. जेव्हा करोडो लोकांवर उपासमारीची वेळ आलेली असते तेव्हा मुसलमान आणि इतरांनीही जर अधूनमधून जेवण वर्ज्य केले तर त्याला मनाई नाही. या सुंदर अर्ध-उपोषणाची महती संपूर्ण राष्ट्राला कळली तर स्वतःहोऊन विदेशी धान्य नाकारल्यामुळे जी तूट निर्माण होऊ शकेल ती भारत आवश्यकतेपेक्षा जास्त भरून काढू शकेल.

माझे वैयक्तिक मत आहे की रेशनिंगचा जरी काही लाभ होत असेल तरी तो फार कमी असेल. शेतकऱ्यांना जर त्यांच्या मर्जीवर सोडले तर त्यांनी निर्माण केलेले पीक ते स्वतः बाजारात नेतील व प्रत्येकाला खाण्यालायक चांगले धान्य मिळेल.

अन्नधान्य समस्येचा घाईघाईत घेतलेल्या या आढाव्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन यांनी अमेरिकी जनतेला दिलेला सल्ला सांगून मी माझे हे भाषण संपवीन. ते म्हणाले की उपासमारीच्या संकटात सापडलेल्या युरोपमधील धान्याची तूट भरून काढण्याकरिता अमेरिकी जनतेने ब्रेड कमी खावी. ते पुढे म्हणाले की अशा प्रकारे स्वतःहोऊन थोडे अन्न वर्जित केल्यामुळे अमेरिकी लोकांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होणार नाही. अध्यक्ष ट्रुमन यांच्या या परोपकारी वक्तव्याकरिता मी त्यांचे अभिनंदन करतो. या परोपकारी वृत्तीमागे अमेरिकेचा काही आर्थिक लाभ मिळवण्याचा हेतू असावा असे जे सूचित करण्यात येते ते मला मान्य नाही. माणसाचे मूल्यन त्याच्या कृतीवरून करावे लागत असते, त्याच्या कृतीमागील हेतूवरून नाही. माणसाच्या अंतःकरणात काय आहे ते एका ईश्वरालाच माहीत असते. उपाशी युरोपकरिता अमेरिका जर काही त्याग करत असेल तर आपण आपल्या स्वतःच्या लोकांकरिता हा लहानसा स्वार्थत्याग का करू नये? अनेक लोक जर उपासमारीने मरणार असतील तर आमच्याकडून जितके करता येणे शक्य होते तितके केल्याचे श्रेय तरी आम्ही घेतले पाहिजे.

आपण आशा करू या की डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी तयार केलेली समिती देशाला भेडसावणाऱ्या अन्नधान्य समस्येवर जोपर्यंत काही निर्णायक उपाय सुचवत नाही तोपर्यंत ती आपले काम संपवणार नाही.

'हरिजन', ऑक्टोबर १९, १९४७

----------------

# १०. शाह नवाझ खान यांना पत्र

दिल्ली,

ऑक्टोबर ७, १९४७

प्रिय जनरल शाह नवाझ, (हे नाव देवनागरी लिपीत आहे.)

तुमचे पत्र. तुम्ही तिथे करत असलेल्या कामाचा (मसौरी, बिहार) तुमच्या अनुपस्थितीत नाश होणार नसेल तर तुम्ही ते सोडून पंजाब-पाकिस्तानमध्ये जाऊ शकता.

बापू

देव प्रकाश यांना प्रत.

हिंदी प्रतीवरून : प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

# ११. सुधीर घोष यांना पत्र

दिल्ली,

ऑक्टोबर ७, १९४७

प्रिय सुधीर,

तुझी चिठ्ठी. मला वाटते की तुला अनेक निरोप आणि माझी तारही मिळाली असेल. (पाहा सुधीर घोष यांना तार, सप्टेंबर ३०, १९४७) मी अगदी स्पष्ट आहे. तू ती जागा सोडली पाहिजे. (सुधीर घोष यांची लंडन येथील इंडिया हाऊसमध्ये जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांना व्ही. के. कृष्ण मेनन यांच्या हाताखाली काम करणे अतिशय कठीण जात होते. व्ही. के. कृष्ण मेनन यांची इंग्लंडचे उच्चायुक्त म्हणून ऑगस्ट १५, १९४७ला नियुक्ती झाली होती.) अधिक होरॅसकडून.

रुटरने केलेला सारांश बराच चांगला आहे. प्रत्येक गोष्टीत ज्यांना वाईट दिसते त्यांना तू मदत करू शकतोस. शांती एक परीक्षा उत्तीर्ण झाली हे वाचून आनंद झाला.

सस्नेह,

बापू

सुधीर घोष पेपर्स, सौजन्य - नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

---------------------

# १२. सरोजिनी नायडू यांना पत्र

(सरोजिनी नायडू उत्तर प्रदेशात राज्यपाल होत्या)

दिल्ली,

ऑक्टोबर ७, १९४७

मत्प्रिय गायिका,

तुझे पत्र. कोण म्हणतो की तू इतकी म्हातारी झाली आहेस? डॉ. बिधन येणार आहेत पण आले नाहीत. (ते) केव्हा येतात यामुळे काय फरक पडतो? तुझ्याकरिता सर्व सारखेच आहे.

संपूर्ण कुटुंबाला प्रेम.

तुमचा

कताई करणारा

(सरोजिनी नायडू गांधीजींना भवितव्याची कताई करणारे म्हणत असत.)

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १३. मनू गांधी यांच्याशी चर्चा

[ऑक्टोबर ७, १९४७]

(दिल्लीमां गांधीजी - १, पृष्ठ ८५)

गांधीजींनी उत्तर दिले (रामनामाने तुटलेले हाड जुळू शकते काय असा प्रश्न गांधीजींना विचारण्यात आला होता.) की ते त्यापेक्षाही अधिक करू शकते. ते ईश्वरी इच्छेशी पूर्णपणे सुसंगत असे माणसाचे जीवन घडवू शकते. मी अपंग असलो तरी सर्व इंद्रिये चांगली असलेल्या माणसापेक्षाही ईश्वरी इच्छेच्या पूर्तीचे अधिक चांगले साधन बनू शकतो हा विश्वास रामनाम त्यांच्यात निर्माण करील. आणि जीवनाचा हाच उद्देश असतो.

‘महात्मा गांधी - अखेरचं पर्व’, खंड ४, पृष्ठ ३३

-------------------

# १४. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कालच्या माझ्या भाषणात हिंदू आणि मुसलमान यांच्यात आजकाल काय सुरू आहे याचा काहीही उल्लेख नव्हता. परंतु आज काही तरी घडले आहे आणि मी त्याबद्दल मौन पाळू शकत नाही. ते इथे घडले नाही तर डेहराडून येथे घडले आहे. एका मुसलमान सद्गृस्थाचा खून झाला. जोपर्यंत माझी माहिती आहे त्यांनी कोणताही गुन्हा केला नव्हता. तसेच त्यांनी कायदासुद्धा आपल्या हातात घेतला नव्हता. परंतु तरीही त्यांचा खून झाला कारण ते मुसलमान होते. हे पाहून मला वेदनाही झाल्या आणि हे असेच सुरू राहिले तर कुठे थांबेल असा प्रश्नही मला पडला. माझ्याजवळ अनेक मुसलमान बंधूभगिनी असल्याचे मला आढळते. त्यांना इथून निघून जा असे सांगायचा मला संकोच होतो. ते कसे जाऊ शकतात? आजकाल आगगाड्यासुद्धा मुसलमानांकरिता सुरक्षित नसल्याचे दिसून आले आहे. ज्या कोणाच्या मनात येते तो त्यांना डब्याबाहेर फेकून देतो वा त्यांची कत्तल करतो. असेच पाकिस्तानमध्येही घडते आहे हे मला माहीत आहे. परंतु अशा प्रकारे वागून आपण काय साध्य करणार आहो? निदान आपण स्वतःची ओळख ठेवू या. निदान आपण आपल्या धर्माची जाणीव ठेवू या. प्रत्येकजण आपला धर्म पाळत असतो. आपला धर्म काय शिकवतो? वा आपल्या धर्माचा मुळीच विचार न करता आपण वागत असतो? काँग्रेसने काय आपली बुद्धी गहाण ठेवली आहे? अखेरीस काँग्रेसने गेली साठ वर्षे काय केले? काँग्रेस जर आतापर्यंत चूक करत असेल तर मी म्हणेन की ती देशाची शत्रू आहे आणि तिला हटवले पाहिजे. आज जे कॉंग्रेसी आहेत त्यांनीसुद्धा सांगून टाकावे की आम्ही काँग्रेस

सोडतो आहो आणि वेगळा पक्ष तयार करतो आहो. त्याबद्दल कोणतीही तक्रार असू शकत नाही. तुम्हांला हवे ते करा परंतु संपूर्ण जगासमोर आणि आपल्या लोकांसमोर स्पष्ट शब्दांत मी सांगतो की आपण कायदा हातात घेऊ नये. आपण जर असे केले तर आपण स्वतःलाच विनाशाकडे नेऊ आणि आपले स्वातंत्र्य गमावू आणि नंतर दुसरी कोणती सत्ता आली व तिने आपल्याला गुलामगिरीत टाकले तर मग आपण किती मोठी घोडचूक केली हे आपल्या लक्षात येईल. ही चांगली गोष्ट नाही. एक मुंगूस होता. त्याने मुलाला वाचवण्याकरिता साप मारला. सापाला चावल्यामुळे त्याचे तोंड रक्ताने माखलेले होते. मुलाची आई पाणी आणण्याकरिता विहिरीवर गेलेली होती. ती आली तेव्हा आपण मुलाला वाचवले हे सांगण्याकरिता जणू काय मुंगूस उड्या मारत तिच्याकडे गेले. परंतु तिला वाटले की मुंगसाने आपल्या मुलाला मारले आणि त्यामुळे तिने पाण्याने भरलेली ती घागर मुंगसावर आदळली. पाणी सांडले, भांडे फुटले आणि मुंगूस मेला. ती बाई जेव्हा घरात शिरली तेव्हा तिने पाळण्यात मुलाला खेळताना पाहिले आणि मेलेला साप त्याच्या जवळच पडलेला होता. तेव्हा कुठे तिच्या लक्षात आले की तो मुंगूस तिचा मित्र होता. तिला वाईट वाटले आणि पश्चात्ताप होऊ लागला. तर आपण असे काही करू नये. त्या स्त्रीप्रमाणे सरकारला सहकार्य न केल्याबद्दल आपल्याला पश्चात्ताप होईल. आपण आपले सरकार स्थापन केले आहे. आपणच ते नष्ट करणार आहो काय?

आज आपल्या हातात सत्ता आली आहे. आपल्याला आपले मंत्री मिळाले आहेत. जवाहरलाल नेहरू आपले प्रधानमंत्री आहेत. ते खऱ्या हिऱ्यासारखे आहेत आणि त्यांनी आपल्या लोकांची चांगली सेवा केली आहे. याशिवाय सरदार आहेत आणि इतरही अनेक आहेत. आपल्याला ते आवडत नाहीत असे काही आहे काय? आज असे म्हणतात की जवाहरलाल चांगले नाहीत. असे म्हणतात की जवाहरलाल चांगले हिंदू नाहीत. लोकांना आपण म्हणू तसे वागणारा माणूस पाहिजे. त्यांना असा माणूस पाहिजे की जो मुसलमानांना

पाठिंबा देणार नाही आणि त्यांना बाहेर काढेल. जवाहरलाल तसे करू शकत नाही हे मी मान्य केलेच पाहिजे. आणि मीसुद्धा तसे करू शकत नाही. मी स्वतःला सनातनी हिंदू समजतो. परंतु मी असा सनातनी नाही की जो भारतात हिंदूंशिवाय इतर कोणालाही राहू देणार नाही. माणूस कोणताही धर्म पाळत असला तरी तो जर आपल्या देशाशी प्रामाणिक असेल तर तो त्या देशाचा असतो, आणि मला जितका या देशात राहण्याचा अधिकार आहे तितकाच त्यालाही या देशात राहण्याचा अधिकार असेल. एखादा माणूस अल्पसंख्याक गटाचा असेल तर त्यामुळे काही फरक पडत नाही. मला धर्म हेच शिकवतो. अगदी लहानपणापासून मला शिकवण्यात आले होते की रामराज्यात म्हणजे देवाच्या राज्यात एखादा माणूस जर वेगळ्या धर्माचा असेल तर तेवढ्या कारणाकरिता तो कमअस्सल ठरत नसतो. मी हा असा हिंदू आहे हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. माझ्या हातात कोणतीही सत्ता नाही आणि मी मंत्रीही नाही. जवाहरलाल मंत्री आहेत आणि तुम्हांला हवे असेल तर तुम्ही त्यांना काढून टाकू शकता. त्यानंतर सरदार आहेत. तुम्हांला माहीत आहे ते कोण आहेत? ते बार्डोलीचे सरदार आहेत. तुम्ही त्यांचे ऐकत असता? त्यांचेसुद्धा अनेक मुसलमान मित्र आहेत. त्यांचे मित्र इमाम साहेब हे गुजरातमध्ये काँग्रेसचे पुढारी होते. ते वारलेले आहेत. त्यांचे जावाई (गुलाम रसूल कुरेशी) अहमदाबादला राहतात आणि ते जिल्हा काँग्रेसचे प्रमुख आहेत असे मला वाटते. ते फार चांगल्या अंतःकरणाचे गृहस्थ आहेत. मी त्यांना चांगला ओळखतो. त्यांनी इमाम साहेबांच्या मुलीशी (अमिना) लग्न केले. हे तेच इमाम साहेब आहेत की जे दक्षिण आफ्रिकेतील आपला व्यवसाय सोडून आपल्या पत्नीबरोबर इथे आले होते व माझ्याबरोबर राहिले होते. ते आता वारले आहेत आणि त्यांची मोठी झालेली मुलगी मागे आहे. तू मुसलमान आहे म्हणून माझे तुझ्याशी काहीही देणेघेणे नाही असे म्हणून मी तिला टाकून दिले पाहिजे काय? ती मुसलमान आहे यात काही संशय नाही परंतु ती अंतःकरणाने फार चांगली मुलगी आहे हे मी तुम्हांला सांगू शकतो. आपल्याला जावे लागेल याची तिला

कल्पनाही नाही. सरदार जर तिला जाऊ देतील तर ती कुठे राहील? आपण कायदा हातात घेऊ नये. कायदा सरदार तयार करो वा जवाहरलाल, परंतु आधी अध्यादेश काढायचा आणि मग जनतेच्या हाती सर्व काही सोडून द्यायचे असे ते करू शकत नाहीत. आज आपले मंत्री असे असू शकत नाहीत. मान्य की ब्रिटिशांच्या काळात असे केले जात होते. परंतु आताही आपण असेच करावे असा त्याचा अर्थ होतो काय? ब्रिटिशांची आपण ज्याकरिता टीका करत होतो तेच आपण आताही केले पाहिजे काय? आपण हे सहन करणार नाही. मला हेच सांगायचे होते.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ३८९-९१

-----------------

# ९५. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ८, १९४७

एक सद्गृहस्थ मला नेहमी भेटण्याकरिता येत असतात. ते चांगले गृहस्थ आहेत. ते डेहराडून येथून प्रवास करत आले. गाडीत खूप गर्दी होती. ते म्हणाले की एका स्टेशनवर (मी नाव विसरलो) एक माणूस आमच्या डब्यात शिरला. त्या डब्यात इतर सर्व हिंदू आणि शीख होते. काहींजवळ तलवारी होत्या आणि काहींजवळ चाकूसुरे. त्यांनी त्या नवागताकडे बारकाईने पाहिले. त्यांनी त्याला तू कोण म्हणून विचारले. तो गरीब माणूस एकटा होता. तो म्हणाला की मी चांभार आहे. परंतु त्या लोकांना संशय आला. त्यांनी जेव्हा त्याचा हात पाहिला तेव्हा त्याच्या हातावर त्याचे नाव गोंदलेले असल्याचे त्यांना आढळले. काही वेळा लोक आपल्या हातावर आपले नाव गोंदून घेत असतात. आणि अशा प्रकारे तो मुसलमान असल्याचे सिद्ध झाले. कोणी तरी त्याच्या शरीरात सुरा खुपसला आणि यमुनेजवळ जशी गाडी पोहोचली तसे त्याने त्याला उचलले आणि नदीत फेकून दिले. हे सर्व एका माणसाने केले होते परंतु तिथे असलेले सर्व लोक ते पाहत होते. ते सद्गृहस्थ हे सर्व पाहत होते. परंतु अखेरीस त्यांच्याकडून ते पाहवले गेले नाही व त्यांनी आपले तोंड दुसऱ्या बाजूला वळवले. मी त्यांना विचारले की तुमच्या अंतःकरणात इतकी करुणा होती आणि तो माणूस मारला गेलेला तुम्हांला जर आवडले नाही तर त्या माणसाला हे पाशवी कृत्य करण्यापासून तुम्ही का अडवले नाही? त्या डब्यात जवळपास ५०-६० हिंदू आणि शीख होते व त्यांच्यात तो एकटा बिचारा मुसलमान होता. अशा प्रकारच्या एकट्या माणसाच्या शरीरात सुरा भोसकून त्याला मारून टाकायचे आणि यमुनेत फेकून द्यायचे यात कोणती माणूसकी आहे? तो माणूस पूर्णपणे मेलासुद्धा नव्हता. त्याला भोसकण्यात आले, जखमी करण्यात आले आणि नदीत फेकून देण्यात आले. माझ्याकडे आलेल्या

सद्गृहस्थांमध्ये इतकी करुणा होती तर त्यांनी हस्तक्षेप का केला नाही आणि त्याला मृत्यूपासून का वाचवले नाही? ते म्हणाले की मला जरी वाईट वाटत होते तरी मी माझे कर्तव्य करू शकलो नाही. ते म्हणाले की दुसरे काही करण्याचा मी विचारच करू शकलो नाही. मी त्यांना सांगितले की ही काही चांगली गोष्ट नाही, ही काही माणुसकी नाही. आपण इतके लोक असू आणि एखादा मुसलमान आपल्यामध्ये येत असेल तर आपण त्याला मारून टाकतो आणि आणि त्याचा देह नदीत फेकून देतो. कोणीही जर असे करत असेल तर आपण त्याला अडवले पाहिजे आणि दया दाखवण्याकरिता प्रेमाने समजावले पाहिजे. त्याला सांगायला पाहिजे - 'हे तू काय करतो आहेस? तू कोणाला मारतो आहेस? त्याला मारू नकोस. त्याने काहीही केलेले नाही.' आणि याचा काहीही परिणाम होत नसेल आणि त्या मुसलमानाला वाचवण्यात तुमची जीव जरी गेला असता तरी मला आनंद झाला असता. पन्नाससाठ लोकांनी एकट्या माणसाला मारण्यात कोणता मोठेपणा आहे? परंतु तिथे किती तरी लोक होते आणि एका माणसाने त्या माणसाला मारून टाकायचे ठरवले व अक्षरशहा तसे केलेसुद्धा आणि त्या वेळी त्याच्याकडे इतर माणसे पाहत होती व बहुधा त्यांनाही त्याची ती कृती मान्य असावी. मी तुम्हांला सांगायलाच पाहिजे की जे लोक अशा प्रकारच्या विचारसरणीला शरण जातात ते चूक करतात. ज्या लोकांनी हत्या केली त्यांच्यामध्ये असेही काही लोक असतील की ज्यांच्या अंतःकरणात दयाभाव असेल व त्यांना ती हत्या पसंतही नसेल. परंतु त्यांना त्यांच्या स्वतःच्या जीवाची भीती वाटत असल्यामुळे ते गप्प बसले आणि अशा प्रसंगी आपले काय कर्तव्य असते हे ते विसरले. पण माणूस कसा काय विसरू शकतो? कोणी जर पाशवी वर्तन करत असेल तर तुम्ही त्याला थांबवलेच पाहिजे. असे पाशवी कृत्य पसंत नसणारेसुद्धा केवळ त्या गोष्टीकडे पाहत राहिले ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे? मी तुम्हांला हे सांगतो आहे कारण ज्या लोकांना हे पाशवी कृत्य आवडत नव्हते त्यांच्यातसुद्धा त्याला विरोध करून हस्तक्षेप करण्याचे

साहस नव्हते. अशा प्रकारचे कृत्य होत असताना एक माणूस जरी उभा राहिला आणि त्याने हल्ला करू पाहणाऱ्या अपराध्याचा हात धरून हल्ला करण्यापासून त्याला अडवण्याचा प्रयत्न केला व म्हणाला की मी याला मारू देणार नाही व तरीही त्याने जर ऐकले नाही तर स्वतःचा जीव द्यायलाही त्याने मागेपुढे पाहिले नसते तर मला आनंद झाला असता. तो जर माझ्यासारखा माणूस असेल तर तो अहिंसेवर अढळ राहील. त्याला जरी मरावे लागले तरी तो मारणार नाही. उलट तो स्वतःचा जीव देऊन मरणाऱ्या व्यक्तीचा जीव वाचवील. असे धैर्य जर कोणी दाखवले असते तर तो माणूस वाचला असता याबद्दल मला किंचितही संशय नाही. आणि वाचवण्याच्या प्रयत्नात तो माणूस जर मरण पावला तर तो खरोखरी शूर असल्याचे सिद्ध होईल. ही खरी अहिंसा आहे. सबळांसमोर गप्प राहणे आणि दुबळ्यांच्या विरोधात जोर दाखवणे म्हणजे खरी अहिंसा नाही.

आपण ब्रिटिशांच्या विरोधात अहिंसक होतो परंतु आता मात्र हिंसेचा वापर करतो आहोत. आपण कोणाच्या विरोधात हिंसेचा वापर करतो आहो? आपल्याच देशबांधवांच्या विरोधात. ब्रिटिशांच्या विरोधात आपण जो अहिंसेचा वापर केला ती शूरांची अहिंसा नव्हती. त्याचे परिणाम आज देशाला भोगावे लागत आहेत. मी त्याचे परिणाम भोगतो आहे. तीच अवस्था तुमचीही आहे. मी तुम्हांला खरी अहिंसा शिकवू शकलो नाही हे मी मान्य करतो. शूरांची अहिसा कशी असते ते मी तुम्हांला दाखवतो आहे. आज इथे मुसलमान राहत आहेत. आणि तिथे पाकिस्तानमध्ये मुसलमान हिंदूंशी दुर्वर्तन करत आहेत. परंतु त्याचा बदला म्हणून आपणही मुसलमानांशी गैरवर्तन केले पाहिजे काय? ते काय शूरपणाचे काम करत आहेत? मी तुम्हांला सांगतो की पाकिस्तानमध्ये जे काही घडते आहे ते निंदनीय आहे आणि आपल्या संघराज्याने जर त्याचेच अनुकरण केले तर ते तितकेच निंदनीय असेल. आणि कोणत्या बाजूने पहिल्यांदा आक्षेपार्ह वर्तन केले आणि कोणी जास्त अतिरेक केला असे म्हणणे हा काही मैत्री करण्याचा खरा मार्ग नाही. मैत्रीचा खरा मार्ग आपण नेहमी

न्यायाच्या बाजूने असणे व चांगले वागणे हा आहे. आपण जर हा मार्ग अनुसरला तर रानटी माणसाची वा विवेकाचे भान सुटलेल्या लोकांची विवेकबुद्धीसुद्धा जागृत होऊ शकते. कोणाचा अपराध मोठा आणि कोणाचा लहान वा कोणी सुरुवात केली यांत पडण्याची आपल्याला गरज नाही. असे करणे शुद्ध अडाणीपणा आहे असे मला वाटते. मैत्री करण्याचा हा मार्ग नाही. कालकालपर्यंत जे शत्रू होते आणि आज जर त्यांना मित्र व्हायचे असेल तर त्यांनी भूतकाळातील शत्रुत्व विसरून मित्राप्रमाणे वागायला सुरुवात केली पाहिजे. वैरभावनेची आठवण ठेवून काय लाभ? जमत असेल तर मैत्री करू आणि आवश्यकता पडली तर भांडण्याचीही आमची तयारी आहे असे म्हणणारे मित्र होऊ शकत नाहीत. मैत्रीची वाढ अशी होत नसते.

आता मी थोडासा वेगळ्या मुद्द्यावर बोलेन. आज वृत्तपत्रे जगातील फार प्रभावी माध्यम झाले आहेत. देश जेव्हा स्वतंत्र होतो तेव्हा तर वृत्तपत्रांची शक्ती अजूनच वाढते. जेव्हा स्वातंत्र्य असते तेव्हा वर्तमानपत्रांच्या बातम्या आणि वृत्त छापण्याच्या अधिकारावर कोणतेही बंधन नसते. हे छापू शकता आणि ते नाही असे स्वातंत्र्यात म्हणता येऊ शकत नाही. अशा वेळी लोकमताला फार महत्त्व येत असते. वृत्तपत्रे जेव्हा घाणेरडा प्रचार करतात वा निराधार वृत्त प्रकाशित करतात वा लोकांना चिथावणी देतात तेव्हा अशा गोष्टींना आळा घालण्याकरिता सरकार त्यांच्याविरुद्ध कठोर पाऊल उचलून कायदेशीर कारवाई करण्याकरिता न्यायालयात जाऊ शकते. परंतु असे केल्यामुळे दंगलीची परिस्थिती अजूनच चिघळते व गोंधळ वाढतो. सरकार असेही करू शकत नाही. इंग्रजांचा काळ वेगळा होता. त्यांना कशाची फिकीर? उचलले टिळक महाराजांना आणि टाकले तुरुंगात. (बाळ गंगाधर टिळक, त्यांना केसरीतील दोन लेखांबद्दल मंडाले येथील तुरुंगात टाकण्यात आले होते. पाहा महान टिळकांना शिक्षा, ऑगस्ट १, १९४७) वृत्तपत्रात त्यांनी लिहिले होते. असे काही खूपही लिहिले नव्हते. तरीही त्यांना सहा वर्षांकरिता हद्दपार करण्यात आले व त्यांना शिक्षेचा संपूर्ण काळ तुरुंगात राहावे

लागले. त्यांच्याप्रमाणेच अनेकांना तुरुगांत जावे लागले. मलासुद्धा सहा वर्षांकरिता तुरुंगात पाठवण्यात आले होते. (गांधीजींना मार्च १८, १९२२ला सहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती, परंतु प्रकृतीच्या कारणाकरिता त्यांना फेब्रुवारी ५, १९२४ला सोडण्यात आले.) ही वेगळी गोष्ट आहे की मी सहा वर्षे तुरुंगात राहिलो नाही. परंतु 'यंग इंडिया'त मी लिहिलेल्या लेखाकरिता मला सहा वर्षांकरिता तुरुंगात पाठवण्यात आले होते. मी वाईट काहीही लिहिले नव्हते परंतु मला शिक्षा झाली. आता आपण स्वतंत्र झालेलो असल्यामुळे असे काहीही घडू शकत नाही. आज जे वार्ताहर आहेत, संपादक आहेत, वर्तमानपत्रांचे मालक आहेत, त्या सर्वांनी सत्याचा मार्ग धरला पाहिजे व लोकांची सेवा केली पाहिजे. वृत्तपत्रांमध्ये कोणतीही खोटी माहिती प्रकाशित होऊ नये तसेच लोकांना भडकवण्यात येईल असे काहीही वर्तमानपत्रातून प्रकाशित करण्यात येऊ नये. आज आपण स्वतंत्र झालेलो असल्यामुळे घाणेरडी वृत्तपत्रे न वाचता ती फेकून देणे आपले कर्तव्य आहे. जर अशी वृत्तपत्रे कोणीही विकत घेतली नाही तर ती आपोआपच सरळ मार्गावर येतील. लोकांना घाणेरड्या आणि नको त्या गोष्टी वाचण्याचे व्यसन लागले आहे याची मला लाज वाटते. अशा वर्तमानपत्रांचा चांगला खप होतो. मी रेवाडी येथील एका प्रसंगाबद्दल वाचले. एका वृत्तपत्राने बातमी प्रकाशित केली की मिओ समुदायाच्या लोकांनी तिथे सर्व हिंदूंना मारून टाकले, त्यांच्या घरांना आगी लावल्या व त्यांची संपत्ती आणि पशुधन लुटून नेले. मिओंनी अशा प्रकारचे भयानक जंगलीपणाचे कृत्य केले हे वाचून मला धक्काच बसला. दुसऱ्या दिवशी रेवाडीबद्दलची बातमी वर्तमानपत्रांमधून आली. ती सर्व बनावट हकिगत होती. रेवाडीसंबंधीची ती बातमी वर्तमानपत्रांमधून प्रकाशितच कशी होऊ शकली याचे मला आश्चर्य वाटले. ज्या माणसाने रेवाडीसंबंधीचा वृत्तांत लिहिला होता त्याने स्पष्टीकरण दिले पाहिजे. चुकीच्या माहितीमुळे ते वृत्त लिहिण्यात आले होते की जाणीवपूर्वक करण्यात आलेला तो खोडसाळपणा होता हे त्याने स्पष्ट केले पाहिजे. त्याने ईश्वरासमोर फार मोठा

अपराध केला आहे. असे काही घडायला नको होते. कोणी जर अशा प्रकारचे वर्तन करील तर आपल्या देशाची कधीही प्रगती होणार नाही. सरकार आज वृत्तपत्रांवर नजर ठेवू शकत नाही. तुम्हीआम्ही वृत्तपत्रांवर नजर ठेवली पाहिजे. आपण आपले अंतःकरण शुद्ध करू या आणि घाणेरड्या गोष्टींचा स्वीकार करण्याकडे आपला कधीही कल असू नये. घाणेरड्या गोष्टी वाचणे आपण वर्ज्य समजू या. आपण जर असे केले तर वृत्तपत्रे आपले कर्तव्य योग्य पद्धतीने बजावतील. अजून एका मुद्द्याची चर्चा केल्यानंतर मी संपवीन.

वृत्तपत्रांसारखीच आपल्या सैन्याची आणि पोलिसांची स्थिती आहे. फाळणीच्या वेळी सैन्य आणि पोलीस यांचेही विभाजन झाले. मला मान्य आहे की असे त्यांच्यामुळे झाले नाही, परंतु झाले. इथल्या सैन्यात हिंदू आणि शीख आहेत. मुसलमान सैनिक पाकिस्तानमध्ये गेले. हिंदू आणि शीख शिपाई जर असा विचार करू लागतील की आम्ही स्वतः हिंदू आणि शीख असल्यामुळे आमच्यावर केवळ हिंदूंना आणि शिखांना वाचवण्याची जबाबदारी आहे आणि त्यांनी केलेल्या अपराधाकडे आम्ही दुर्लक्ष केले पाहिजे आणि मुसलमानांचे रक्षण करण्याची जबाबदारी आमच्यावर नाही तर आपण कुठलेच राहणार नाही. तसेच तुम्हांला वाचवणे आमचे काम नाही असे मुसलमान सैन्य आणि पोलीस हिंदूंना म्हणू लागले व त्यांना मारू लागले तर तेसुद्धा योग्य होणार नाही. सरकारजवळ सैन्य आणि पोलीस आहेत. परंतु मला ना तर सैन्याची गरज आहे ना पोलिसांची. तुम्हीच आपले पोलीस आणि सैनिक व्हा असे मी लोकांना सांगेन. इथे हिंदू जर मुसलमानांना मारत असतील तर त्यांना वाचवले पाहिजे. आपण त्यांना तसेच सोडून देऊ नये. मला जरी माझा जीव द्यावा लागला तरी मी एक पाऊलही बाजूला सरकणार नाही. माझे सरकार असे असेल. मी हवेत बोलत नाही. काय बरोबर आहे ते मी तुम्हांला सांगतो आहे. सरकारच्या सैन्याला आणि पोलिसांनाही मी असेच सांगेन. इथे राहणाऱ्या थोड्याशा मुसलमानांचे रक्षण करणे त्यांचे काम आहे. वेळप्रसंगी आपले प्राण देऊनही त्यांनी त्यांचे रक्षण केले

पाहिजे. असे झाले तरच ते स्वतःला खरे पोलीस आणि सैनिक म्हणवू शकतील. भारताने मिळवलेले स्वातंत्र्य खरोखरच वेगळे आहे. सर्व जग असे म्हणते आणि माझेही म्हणणे आहे की कोणत्याही सरकारने कधीही दुसऱ्या देशातील जनतेला अशा प्रकारे सत्ता सोपवली नाही. कोणत्याही प्रकारे भांडणतंटा न करता आणि रक्त न सांडवता आपण स्वातंत्र्य मिळवले आहे. यामुळे आपले खिसे भरण्याकरिता सैन्याने आणि पोलिसांनी तिथे असू नये. जे मिळते त्यावर त्यांनी समाधान मानले पाहिजे. गोडधोड पदार्थांनी पुरेपूर महागड्या जेवणाचा त्यांनी विचार करू नये. जे कोणते जाडेभरडे अन्न मिळते त्यावर समाधान मानून सैनिकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. लोकांच्या मुलांना शाळाकॉलेजमध्ये जाताना पाहून, त्यांच्या मोटारगाड्या आणि सायकली पाहून अशाच गोष्टी मिळाव्या म्हणून तो जर भ्रष्टाचाराकडे वळत असेल तर तो खरा सेवक राहणार नाही. म्हणूनच मी म्हणतो की खरा सैनिक आणि खरा पोलीस तोच असतो जो जे काही खायला मिळते त्यावर समाधान मानेल व धार्मिक पक्षपात न करता आपले कर्तव्य पार पाडेल. तो जर हिंदू असेल तर मुसलमानांना हानी पोहोचवण्याचा विचार त्याने करायला नको. मुसलमानाने जर गुन्हा केला असेल तर त्याला पकडून शिक्षा करणे ही वेगळी गोष्ट आहे. परंतु इतर ठिकाणच्या मुसलमानांनी जघन्य अपराध केले आहेत म्हणून इथल्या निष्पाप मुसलमानाला शिक्षा केली पाहिजे काय? हिंदू जर मुसलमानाला इजा पोहोचवत असेल तर हिंदूला पकडणे पोलिसांचे कर्तव्य असेल. आपल्या दैशाचे सैन्य आणि पोलीस जर असे वागत नसतील तर ते आपल्या देशाच्या मिठाला जागले नाहीत असे म्हणावे लागेल.

पाकिस्तानमधील सैन्य आणि पोलीस यांच्याकरिताही मी हेच सांगेन. परंतु तेथील परिस्थितीबद्दल मी काहीही करू शकत नाही. मी कोणाला उद्देशून हे बोलू? परंतु मी सांगतो त्याप्रमाणे इथे घडले तर तिथेसुद्धा असेच घडल्याशिवाय राहणार नाही याबद्दल मला शंका नाही. आज लोकांचा तोल गेलेला आहे. ते म्हणतात की आमच्याच भाऊबंदांशी

पाकिस्तानमध्ये दुर्व्यवहार केला जात असताना इथे आम्ही त्याचा बदला का घेऊ नये? परंतु असे बोलणे हे माणुसकीचे नाही. यामुळे जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मी शक्य तितक्या जोरात म्हणत राहीन की आपण स्वतःला शुद्ध ठेवले पाहिजे, आपण चांगले राहिलो पाहिजे, आपली वृत्तपत्रे, आपले सैन्य, आपले पोलीस या सर्वांनी चांगले राहिले पाहिजे. याशिवाय आपले सरकार काम करू शकणार नाही आणि आपला विनाश होईल. पाकिस्तानमध्ये काहीही घडले तरी आपण सुसंस्कृत राहिलो पाहिजे. कमीतकमी इतके तरी करा. तुम्ही जर माझे ऐकणार नाही तर आपल्या सर्वांचा विनाश होईल हे मी तुम्हांला सांगून ठेवतो.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ३९१-९८

----------------

# १६. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दररोज मी एकाच गोष्टीसंबंधी या वा त्या स्वरूपात बोलत असतो. लाचार झालो आहे. याच कामाकरिता तर इथे पडलो आहे. तुम्ही चांगले आहा, सज्जन आहा म्हणून तर शांतपणे माझे म्हणणे ऐकून घेता. याकरिता मी तुमचा आभारी आहे. आभारच मानू शकतो. परंतु मी सांगितले आणि लोकांनी शांतपणे ऐकले. आता माझे काम आटोपले असे समजणारा माणूस मी नाही. एवढ्याने माझे पोट भरत नाही. आपले इतके सगळे लोक त्रस्त होऊन पडले आहेत. भारतात भरपूर जागा पडली आहे. त्यांच्याकरिता काय केले पाहिजे? त्यांचे काय कर्तव्य आहे? सरकारचे काय कर्तव्य आहे? जे लोक एक प्रकारचे वाईट वातावरण निर्माण करतात त्यांना समजून घ्यायचे आहे, त्यांची समजूत घालायची आहे. असे होईल तेव्हाच तर जे लोक इतर ठिकाणी पडले आहेत त्यांच्यापर्यंत माझा आवाज पोहोचेल.

माझ्याकडे काही असे लोक आले की जे त्रस्त आहेत. ते सर्व चांगले लोक आहेत. ते पश्चिम पाकिस्तानमधील आहेत. ते माझ्याकडे दहाबारा दिवसांपूर्वी आले होते. सर्वात आधी मी त्यांना जे काही घडले ते सर्व लिहून देण्याकरिता सांगितले. त्यांच्या समस्येसंबंधी मला काही करता यावे म्हणून त्यांनी मला लेखी वक्तव्य दिले. त्यांचे म्हणणे आहे की पाकिस्तानमधील हिंदूंना इकडे येता येईल अशी काही व्यवस्था केली नाही तर त्यांना इकडे येता येणार नाही. ते म्हणतात की मार्गात धोका आहे. त्यांच्याजवळ धान्य आहे परंतु धान्याचा तो साठा ते आपल्याबरोबर कसे आणू शकतील? धान्य घेऊन येण्याची त्यांना कोण परवानगी देईल? सध्या तरी त्यांना विमानाने वा मोटारीनेच आणता येऊ शकते.

आजकाल रेल्वेचा प्रवास फार कठीण झाला आहे. आधी जशा आगगाड्या सुरू राहायच्या तशा आता राहत नाहीत. ज्या लोकांना येणे शक्य झालेले नसेल त्यांचे तिथे काय झाले असेल हे कोणालाही सांगता येऊ शकत नाही. अशा परिस्थितीत ते येऊ शकले तर बरे होईल. माझ्याबद्दल सांगायचे तर आम्ही कुठे आहो आणि कुठे चाललो आहो याचा विचार मला पडतो.

आता मी बंगालकडे वळतो. तिथेसुद्धा मी भरपूर काम केले आहे. मी पूर्व बंगालमध्ये काम केले आहे तसेच पश्चिम बंगालमध्येही. मी पूर्व बंगालमध्ये, नोआखालीला गेलो आहे. (नोव्हेंबर ६, १९४६ला) ते आता पाकिस्तानमध्ये गेले आहे. मी तिथे दूरदूर पायी फिरलो आहे. दररोज मी तिथे वेगवेगळ्या ठिकाणी जात असे. मी तिथल्या स्थानिक लोकांशी बोलत असे. हिंदू स्त्री-पुरुषांच्या मनातील भीती दूर करण्याचा मी प्रयत्न केला. केवळ रामनामाच्या मदतीने मी असे करू शकलो. रामनाम घेत असताना कोणी आपल्याला मारले तर आपल्याला मारू द्या. जीवनाची इतकी जास्त आसक्ती आपल्याला का वाटली पाहिजे? जिवंत राहण्याकरिता आपण रामनाम टाकून दिले पाहिजे काय? घाबरून आपण ईश्वराचे नाव टाकून दिले पाहिजे काय? ज्या स्त्रियांना कुंकू लावण्याची सवय आहे त्यांनी ती टाकून द्यावी काय? त्या भागातील विधवा नसलेल्या स्त्रिया शंखाच्या बांगड्या घालतात. त्यांच्या विवाहित असण्याचे ते प्रतीक आहे. विधवा बांगड्या घालत नाहीत. विधवा नसतानाही भीतीमुळे त्यांनी बांगड्या घालणे बंद केले पाहिजे काय? सौभाग्य चिन्ह म्हणून शंखाच्या बांगड्या घालण्यात त्या स्त्रिया मागेपुढे पाहत असल्याचे मला जेव्हा आढळले तेव्हा बांगड्या घालणे बंद न करण्याकरिता मी त्यांना समजावले. त्यांची समजूत पटली आणि यापुढे आम्ही परत बांगड्या घालणे सुरू करू असे आश्वासन त्यांनी मला दिले. परंतु आता मी ऐकतो की लोक हळूहळू निघून येत आहेत. मला त्याबद्दल माहिती नाही. तिथे तर माझे लोकही आहेत. बहुधा मी तुम्हांला सांगितलेच असेल की माझे सर्व चांगले कार्यकर्ते तिथे

आहेत. प्यारेलाल, खादी प्रतिष्ठानमधील लोक, कनू गांधी - सर्व तिथे आहेत. सतीश चंद्र दास गुप्तांसह अनेक कार्यक्षम लोक तिथे आहेत. ते सर्व त्या लोकांचे मनोधैर्य वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. असे असूनही लोक तिथून पळत आहेत. त्यांना तिथे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असेल यात काही संशय नाही. परंतु तिथून पळ काढण्यात काय अर्थ आहे? ते पळून कुठे जातील आणि काय करतील? त्यांनी या गोष्टीचा विचार केला पाहिजे. इथे कुरुक्षेत्रात आपल्याकडे २५,००० स्त्री-पुरुष निर्वासित आहेत. काही स्त्रिया गरोदर आहेत. त्यांना औषधोपचार करण्याकरिता आणि काळजी घेण्याकरिता कोण आहे? यामुळे त्यांतील काही मेल्या तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तिथे राहण्याकरिता जागा नाही आणि पंजाबमधून पळून येणे भाग पडल्यामुळे लोक निराश झाले आहेत. या लोकांना कोणता सल्ला द्यावा याचा यामुळे मी विचार करतो आहे. इथे जितके निर्वासित आले आहेत त्यापेक्षा तिथे राहिलेले निर्वासित किती तरी जास्त आहेत. दहावीस लोक असले, इतकेच नाही तर काही लाख जरी असले तरी आपण त्यांची समजूत घालू शकू. परंतु ते करोडोच्या संख्येत आहेत आणि ते या विशाल देशात सर्वत्र पसरलेले आहेत. या सगळ्या लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे ही काही लहान गोष्ट नाही. यांत त्यांना इतका काही त्रास सहन करावा लागतो की त्यांना मरायची वेळ येण्यापूर्वीच मरावे लागते वा उपासमारीने मरावे लागते. सरकारने कितीही प्रयत्न केला तरी ते प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट पुरवू शकत नाही. सरकारजवळ त्याचे सैन्य आणि पोलीस आहेत. परंतु ब्रिटिशांच्या काळात यांचा जसा उपयोग केला जायचा तसा आता करता येऊ शकत नाही. आणि तसा उपयोग करण्यात येऊसुद्धा नये. सैन्य जनतेच्या मदतीनेच आपले काम करू शकते. लोकांची इच्छा असेल तर ते सरकारचे हातपाय होऊ शकतात. लोकांचे सहकार्य असल्याशिवाय सरकार काहीही करू शकत नाही. मी हे मंत्र्यांनासुद्धा सांगतो आहे. सरकारला आपली जबाबदारी पार पाडू इच्छित नाही असे नाही. जवळपास दररोज माझी

मंत्र्यांशी भेट होत असते. मी तुम्हांला सांगतो की तेसुद्धा अस्वस्थ आहेत. परंतु ते काय करू शकतात? अखेरीस सरकार चालवण्याचा त्यांना अनुभव तर नाही. त्यांनी काँग्रेसची संघटना चालवली आहे. परंतु ती संघटना काही मोजक्या लोकांची होती. काँग्रेसच्या रजिस्टरवर नाव असलेले सर्व लोक कधीच एकत्र आले नव्हते. आणि कार्यालयात काम करणारांची संख्या फार कमी होती. त्यांना फार कमी संसाधनांसह काम करावे लागत होते. आज त्यांना करोडो लोकांकरिता काम करावे लागत आहे. करोडो रुपये तिथे पडलेले आहेत आणि थोड्याशा अधिकाऱ्यांना हजारो लोकांकडे पाहावे लागते.

हे काम कसे होऊ शकते? २५,००० लोकांना वेळेवर अन्न कसे मिळावे याचा विचार केला पाहिजे. देशात दररोज हजारो लोक येत आहेत व ते उपाशी राहतात. त्यांच्याजवळ घालायला पुरेसे कपडे नाहीत आणि हिवाळा उंबरठ्यावर उभा आहे. पाकिस्तामधील परिस्थितीही इथल्यासारखीच आहे. असे काही नाही की पाकिस्तानमधील लोकांकरिता स्वर्ग आहे आणि इथल्या लोकांकरिता नरक. वा असेही म्हणता येईल की इथे जणू काही स्वर्ग आहे. हे सर्व मी माझ्या डोळ्यांनी पाहतो आहे. आणि पाकिस्तानमध्ये केवळ नरक आहे असेही म्हणता येऊ शकत नाही. अखेरीस दोन्ही देशांमध्ये माणसेच राहतात. त्यातील काही चांगले असतात आणि काही वाईट. परंतु इथे आणि तिथे किती चांगुलपणा आहे आणि किती वाईटपणा आहे हे कोण ठरवू शकतो? आणि असे मोजून आपण काय मिळवणार आहो? जे लोक इथे आलेले आहेत त्यांना व जे येऊ इच्छितात त्यांना संरक्षण कसे द्यावे हा माझ्यासमोर सर्वात मोठा प्रश्न आहे व तसा तो तुमच्यासमोरही असला पाहिजे. परंतु जे आलेले आहेत त्यांना परत आपल्या घरी कसे जाता येईल हे आपण पाहिले पाहिजे. मी तुम्हांला सांगतो की त्यांनी आपल्या घरी परत जायलाच पाहिजे. मला माहीत आहे की जे लोक खेड्यांमध्ये राहत होते त्यांना आपले ठिकाण सोडावेसे वाटणार नाही. खेड्यातील माणसाजवळ एक एकर जरी शेती असली तरी ती राखून ठेवण्याकरिता तो वाटेल तो

त्याग करील. जर लोक हजारो, लाखोंच्या संख्येने स्थलांतर करत असतील तर त्यांना कुठे सामावून घेता येईल आणि ते कसे राहू शकतील? ते रस्त्यातच मरत आहेत. यामुळेच मी म्हणतो की आपल्याला जरी मरावे लागले तरी आपण जिथे आहो तिथेच राहिलो पाहिजे. नंतर काय घडते ते आपण पाहू या. आपण पाकिस्तानमध्ये राहिलो तर ईश्वर आपले रक्षण करणार नाही असे काही नाही. आपली काळजी घेण्याकरिता तिथेही ईश्वर सदैव राहतोच. आणि शिवाय अजून कोणी नाही तर आपली काळजी घेण्याकरिता तिथे सरकारही आहे.

मी आताच सांगितले होते की माझे सर्व सहकारी बंगालमध्ये आहेत. तर पश्चिम बंगालमधील सरकारने पूर्व बंगालच्या सरकारला तेथिल परिस्थिती काय आहे हे ते लिहावे. परंतु तिथेसुद्धा खरे म्हणजे लोक आपल्या सरकारच्या सूचनांचे पालन करत नाही. इतकेच नाही तर अधिकारीसुद्धा आपल्या सरकारच्या सूचना पाळत नाहीत. ते इतके उद्धट झाले आहेत की स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपल्याला कोणीही विचारणारे नाही असे त्यांना वाटू लागले आहे. ज्या ब्रिटिशांच्या साध्या भृकुटीभंगाला ते घाबरायचे ते ब्रिटिश आता निघून गेलेले आहेत. आता काय झाले? ब्रिटिशांना ते कसे घाबरायचे याचा मी साक्षीदार आहे. परंतु आता प्रत्येकाला असे वाटते की आपल्याला विचारणारा कोणीही नाही, मीच स्वतःचा सैनापती आणि पोलीस आहे, आता मी स्वतंत्र झालो आहे आणि आता मी हवे ते करू शकतो. मी इतकेच सांगू इच्छितो की असे चालू शकत नाही.

दोन्ही सरकार जर न्याय करण्याकरिता उत्सुक असतील तर (लोकांनासुद्धा) काही तरी करण्याकरिता प्रोत्साहन मिळेल. परंतु सरकारचीच न्याय करण्याची इच्छा नसेल तर काय होईल? अखेरीस त्याचा काय परिणाम होईल? भांडण्याची हौस असलेला मी माणूस नाही. मी भांडणापासून दूर पळणारा माणूस आहे. परंतु ज्यांच्याजवळ शस्त्रे आहेत, पोलीस आहेत आणि सैन्य आहे त्यांना स्वाभाविकपणे लढाई करणे आवडेल. ते दुसरे काय करू शकतात? मी काहीही करू शकत नाही. परंतु जे काही तरी करू शकतात त्यांची जे

करण्याची इच्छा असेल ते ते करतीलच. तेव्हा युद्ध होणे अपरिहार्य होईल. माझ्या धर्माचे जे लोक आहेत ते तसेच नैराश्याच्या अवस्थेत पडून राहू शकत नाहीत. आपण काही तरी केलेच पाहिजे. हे मी दोन्ही सरकारांकरिता सांगत आहे. दोन्ही सरकारांनी काही तरी करावे म्हणून हे आहे. जो माणूस स्वतः जुलमी असतो त्याला दुसऱ्या माणसाला शिक्षा करण्याचा अधिकार नसतो. जे सरकार आपल्या लोकांचे रक्षण करू शकत नाही ते दुसऱ्या सरकारला त्याच कारणाकरिता बोल कसा लावू शकते? कोणी असे कसे करू शकतो? न्यायाकरिता संघर्ष करताना आपण मेलो व तसे करताना आपले सरकारही गेले तर ती गोष्ट मी समजू शकतो. परंतु घाबरून तिथून पळणे आणि पळतापळता मरणे असेच आपण केले पाहिजे काय? अर्धे लोक वाटेतच मरतात आणि उरलेले इथे पोहोचतात. परंतु त्यांना कुठे ठेवायचे? आपण त्यांना कसे खाऊ घालणार आहो? त्यांनी इथे काहीही काम न करता राहिले पाहिजे काय? तसे नसेल तर त्यांना काम द्यावे लागेल. जेव्हा आपल्याच देशातील करोडो लोकांची उपासमार होते आहे आणि करोडो लोक बेकार आहेत आणि त्यांच्याकरिता काहीही करणे आपल्याला शक्य झालेले नाही तेव्हा या बाहेरून येणाऱ्या लोकांकरिता, बाहेरून म्हणजे दुसऱ्या देशातून नाही तर वेगळ्या प्रांतातून, आपण कुठून काम पाहणार आहो? ते इथे स्वतःचा काही कामधंदा कसा सुरू करतील? ते काय करतील आणि कसे? ही मोठीच समस्या आहे आणि तिच्यामुळे दुर्भावना निर्माण होत आहे. माझी सूचना मान्य करण्यात आली तर ही दुर्भावना निर्माण होणार नाही. लोकांमध्ये धैर्य येईल. ते मरण्याची कला शिकतील. ते जर मरण्याची कला शिकले तर ते आपले आणि जगाचे कल्याण करतील. मी सुचवलेल्या मार्गाबद्दल भारताची आपण खात्री पटवून देऊ शकलो तर ते सर्वांकरिता हितकारक होईल. आपण जर शूर झालो तर संपूर्ण जग आपले कौतुक करील.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ३९८-४०२

-----------------

# १७. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १०, १९४७

आजसुद्धा मला बरीच कांबळी मिळाली. काही लोकांनी पैसेसुद्धा दिले. आम्ही काही कांबळी पाठवतो असे सांगणारी बडोद्याहूनसुद्धा तार आली आहे. काही ८०० कांबळी तयार आहेत असे ते म्हणाले असे मला वाटते. परंतु त्यांचे म्हणणे आहे की रेल्वेचे लोक इतक्या मोठ्या गठ्ठ्याचे पार्सल घेण्याच्या परिस्थितीत नाहीत. हे खरे आहे की आज रेल्वेवर कामाचा फार मोठा ताण आहे आणि ते प्रत्येक गोष्ट घेऊ शकत नाहीत. ती कांबळी आणता यावी म्हणून शक्य असेल तर सरकारकडून मी सूचना द्यायला लावीन. असे झाले की गरम पांघरुणांचा आपल्याजवळ भरपूर साठा असेल. आता आपल्याजवळ लोकरीचे पुरेसे कपडे नाहीत. परंतु मला आशा आहे की ईश्वराची इच्छा असली तर कसे तरी करून काम भागवता येईल इतके कपडे आपल्याला मिळतील व कोणालाही थंडीत कुडकुडावे लागणार नाही.

थोड्या वेळेपूर्वी एका स्त्रीने सोन्याची अंगठी पाठवली. सध्या तरी दुलया आणि कांबळी विकत घेण्याकरिताच मी त्या अंगठीचा उपयोग करू शकतो.

आता आपल्यासमोर गंभीर समस्या आहे आणि मी तिच्याबद्दल भरपूर बोललो आहे. आपल्याला अन्नधान्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे व त्यामुळे आपल्याला भरपूर त्रास सहन करावा लागतो. आपण आपले स्वातंत्र्य मिळवले आहे यात काही संशय नाही. परंतु या स्वातंत्र्याच्या आगमनाबरोबरच आपल्या समस्या किती तरी पटीने वाढत असलेल्या दिसत आहेत. मला असे वाटते की आपण जर खरोखरच स्वातंत्र्य पचवू शकलो तर आपल्याला असा त्रास सहन करावा लागणार नाही. स्वतंत्र लोकांनी खरोखरी कसे

वागायला पाहिजे? आपले स्वातंत्र्य असे काही आगळेवेगळे स्वातंत्र्य आहे की त्याच्या रक्षणाकरिता सैनिकाप्रमाणे लढावे लागले नाही. आपल्याला लढावे लागले होते परंतु ती लढाई वेगळ्या प्रकारची होती आणि सर्व जगाला तिचे कौतुक वाटले होते. अशा प्रकारच्या संघर्षाने आपण जर स्वातंत्र्य मिळवले आहे तर त्याचे आपल्याला विशेष महत्त्व वाटले पाहिजे. परंतु आपल्याला त्याची फारशी किंमत वाटत नाही. हा आपला दुबळेपणा आहे. धान्याची आयात करू नये म्हणून मी अतिशय साधी आणि व्यावहारिक सूचना केली होती (पाहा, "प्रार्थना प्रवचन", ऑक्टोबर ६, १९४७). परंतु या व्यावहारिक सूचनेनेही लोकांना धक्का बसल्याचे मला आढळले. का? ते म्हणाले की धान्याच्या आयातीची आम्हाला सवय आहे. परंतु ही काही पुरातन काळापासूनची सवय नाही. कोणी आम्हाला खाऊ घालेल तेव्हा खाण्याची आम्हाला सवय आहे असे म्हणणे योग्य नाही. जितके काही अन्नधान्य पुरवता येईल तितक्याचे परवाने देत जाणे योग्य नाही. परंतु माझी सूचना अगदी व्यावहारिक आहे. आणि तिच्यामुळे इतके अस्वस्थ होण्याचे काय कारण? भारत हा विशाल देश आहे आणि त्यात करोडो लोक राहतात. आपल्याजवळ पुरेशी जमीन आहे आणि ईश्वर कृपेने पाणीही पुरेसे आहे. मला माहीत आहे की देशात असा काही वाळवंटी भाग आहे की जिथे पाणी उपलब्ध नाही. परंतु भारतात कुठेही पाणी उपलब्ध नाही असे म्हणता येऊ शकत नाही. आपल्याजवळ जर इतके पाणी, जमीन आणि करोडो लोक आहेत तर घाबरण्याचे आपल्याकरिता कोणतेही कारण नाही.

भूक भागवण्याकरिता आपण आपल्या श्रमाने अन्नधान्य पिकवले पाहिजे याची लोकांना जाणीव झाली पाहिजे इतकेच मला सांगायचे आहे. त्यामुळे वातावरणात विद्युतसंचार होईल व लोकांच्या उत्साहामुळेच निम्मे समस्या सुटतील. असे म्हणतात की खऱ्या मृत्यूने मरण्यापेक्षा मरणाच्या भीतीने लोक जास्त मरतात आणि ते खरेच आहे. एक माणूस होता की ज्याला मी लवकरच मरणार आहे असे वाटत होते. दुसऱ्याबद्दलच काय

बोलायचे - माझेच उदाहरण घ्या. मला खोकला आहे म्हणून मी लवकर मरणार आहे असा मी विचार केला तर काय होईल? मी तेव्हाच मरेन जेव्हा माझी वेळ येईल. ती ईश्वराच्या हातात आहे. परंतु मी त्याबद्दल आतापासून काळजी करू लागलो व मी मृत्यूपंथाला लागलो आहे असा मी विचार करू लागलो तर तसे करणे हे प्रत्यक्ष मरण्यापेक्षाही मरणे होईल. आणि अशा प्रकारे मृत्यूच्या भीतीत वावरत असल्यामुळे माझ्या आजूबाजूच्या लोकांकरिता आणि माझ्या स्वतःकरिताही मी त्रासदायक परिस्थिती निर्माण करीन. येऊ घातलेल्या मृत्यूबद्दल मी सदैव शोक करत राहीन. चांगली गोष्ट ही आहे की मृत्यू येईपर्यंत निश्चल राहणे आणि ईश्वराशिवाय आपल्याला कोणीही मारू शकत नाही याबद्दल आपल्या मनाची खात्री पटवणे. मरणाची भीती जर आपण सोडली तर काळज्याही आपल्याला सोडून जातात आणि आपण आपल्या काळज्यांमधून मुक्त होतो. कोणीही असा विचार करू नये की इतर कोणाच्या कृपेने आपल्याला अन्न मिळावे, उलट आपल्या मेहनतीन ते आपण निर्माण केले पाहिजे. म्हणूनच माझे म्हणणे आहे की मरण आल्याशिवाय आपण मरू नये. आज ज्या वस्तू मिळतात, छीटचे कापड मिळते ते त्या रेशनच्या दुकानातून मिळत असतात आणि अशा प्रकारच्या ज्या गोष्टी आपला अपमृत्यू घडवून आणतात त्या सर्वांचा आपण त्याग केला पाहिजे. अन्नधान्यसमस्येविषयी इतके पुरे.

अशीच गोष्ट कपड्यांची आहे. मी तर सांगितलेच आहे की सध्या जितके कापड उपलब्ध आहे त्याच्या चौपट कापड मिळू शकते. आपल्या देशात कापडाची कमतरता का असावी? भारतात एखाद्या वेळी अन्नधान्याची तूट निर्माण होऊ शकते परंतु कापडाची तूट कधीही निर्माण होऊ शकत नाही याबद्दल माझी खात्री आहे. का? कारण भारतात स्वतःच्या गरजेपेक्षा जास्त कापड निर्माण होऊ शकते. देशात असे किती तरी लोक आहेत की जे स्वतःकरिता सूत कातून त्यापासून कापड तयार करू शकतात व स्वतः तयार केलेले कपडे सहजपणे वापरू शकतात. आणि अशा प्रकारे अन्नवस्त्राच्या बाबतीत खऱ्या अर्थाने आपण

स्वतंत्र होऊ शकतो व आपल्याला गिरण्यांवरही अवलंबून राहावे लागणार नाही. आज या अर्थाने आपण स्वतंत्र नाही, आणि जर असे होत असेल तर ते आपल्या अज्ञानामुळे होते. अशा प्रकारे आपण आत्मनिर्भर होऊ अशी मला आशा होती. देशभर फिरत मी जेव्हा खादीचा प्रचार करत होतो ते दिवस आता गेले. स्त्रियांना जास्तीत जास्त सूतकताई करण्याकरिता मी सांगत असे. आणि त्या कताई करायच्या, परंतु त्याचे परिणाम न समजून घेता त्या तसे करायच्या. त्यांना मजुरीची पर्वा नव्हती. त्या कातत आणि कापड तयार करत. परंतु आता चित्र वेगळे झाले आहे. आज तुमच्याजवळ कापड नाही. माझे म्हणणे आहे की आपल्या कपड्यांकरिता आपण कापड तयार केले पाहिजे, त्याकरिता कताई केली पाहिजे व ते विणून घेतले पाहिजे. आपल्या स्वतःच्या गरजेकरिता कापड विणण्यात फार काही त्रास होत नाही. परंतु लोक इतकेसुद्धा करू शकत नसतील तर ते दुकानातून कापड विकत घेऊ शकतात. सरकार गिरण्यापासून कापड विकत घेऊ शकते व नंतर ते लोकांना वाटू शकते. याशिवाय ज्या लोकांना शक्य असेल त्यांनी एक दोन महिने कपडे विकत घ्यायचे नाही अशी शपथ घ्यावी. त्यांनी आपल्या उपयोगाकरिता खादी विकत घ्यावी आणि छीट वा इतर तलम कपडे घेण्याचे टाळावे. काही काळाकरिता आपण जर कापड विकत घेणार नाही तर त्यामुळे आपल्याला नागडे फिरावे लागेल असा अर्थ होत नाही. मध्यंतरीच्या काळात आपण भरपूर खादी तयार केली तर हिवाळ्याच्या थंडीपासून वाचण्याची समस्या आपण सोडवू शकू. इथे प्रश्न कांबळी आणि इतर गोष्टी तयार करण्याचा नाही. आपल्या स्वतःच्या उपयोगाकरिता खादीचे कापड तयार करणे व बाजारातून कापड विकत न घेणे इतकाच प्रश्न आहे. आपण जर इतके केले तर किंमती आपोआप उतरतील. आज कापडाच्या किंमतीसुद्धा वाढलेल्या आहेत. वस्तूंचे भाव वाढत आहेत. परंतु आपल्याला सदरा, कुर्ता, आणि इतर कपडे तयार करण्याकरिता केवळ काही यार्ड कापड हवे असते. त्याकरिता खादी घ्या. आणि मी आधीच सांगितल्याप्रमाणे आपण

वागलो तर आपण स्वतः तितके कापड तयार करू शकतो. दुकानात जायचे नाही असे आपण ठरवू या. केवळ काही महिने आपण कापड विकत घेतले नाही तर मी तुम्हाला सांगतो की हा त्रास संपेल आणि अन्नवस्त्राच्याबाबतीत आपण आत्मनिर्भर होऊ. यामुळे लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल व ते स्वावलंबी होतील व कापडाच्या चणचणीची ते काळजी करणार नाहीत हा माझ्या दृष्टीने याचा दुसरा लाभ असेल. आपल्या गरजेचे कापड आणि धान्य आपण निर्माण करू शकतो असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण होईल. आपण जर हे सर्व केले तर त्याचे फार चांगले परिणाम होतील. आपण स्वतंत्र झालो आहो परंतु केवळ राजकीय दृष्टीने. आपल्या करोडो लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली नाही. परंतु आपल्याला त्याची जाणीव नाही. आपल्याला हे तेव्हा कळेल जेव्हा आपले अन्न आपण पिकवू आणि आपल्याला योग्य वाटेल त्या किंमतीची त्याकरिता आपण मागणी करू. याची आपल्याला तेव्हा जाणीव होईल जेव्हा आपण आपली गरज पूर्ण करण्याकरिता भरपूर कापड निर्माण करू. आपल्याजवळ भरपूर कापूस आहे. आपण ते गिरण्याकडूनही घेऊ शकतो. आपल्याला कळले पाहिजे की आपल्याला हवे असलेले सर्व कापड गिरण्या निर्माण करू शकत नाहीत. परंतु निदान आपल्याला इतके तरी कळले पाहिजे की आपल्याला कोणत्याही कठीण प्रसंगाला तोंड द्यावे लागणार नाही. मग आपण आर्थिक दृष्टीने स्वतंत्र होऊ. आपण इतके करू या आणि त्याचे परिणाम आपल्याला आपोआप दिसून पडतील.

आज आपण आपसातील भांडणांत गुतलेलो आहो. परंतु आपल्याला वेळ असेल तरच आपण भांडू शकू. परंतु जेव्हा आपण कामात गुंतलेलो असू, आणि आपण सर्व कामगार होतो, तेव्हा भांडण आणि झगड्यांकरिता आपल्याजवळ वेळच नसेल. अन्न आपल्याजवळ आहे, कपड्यांचीही आपण सोय केली आहे. आपण जुगार आणि मद्यपानाची सवयही सोडू या. अशा प्रकारे योग्य दिशेने एकेक पाऊल आपण पुढे टाकू तर

आपल्यामध्ये कोणताही दोष राहणार नाही. मग आम्हाला स्वतःलाच भांडण करण्याची गरज वाटणार नाही. मग हिंदू आणि मुसलमान हा प्रश्नच निर्माण होणार नाही. कोणी जर गोंधळ निर्माण करत असेल तर त्याला आपण धैर्याने तोंड देऊ. आपल्याला वाटेल तर आपण त्याच्याशी लढू. परंतु अनैसर्गिक परिस्थितीत आपण आजच का मरावे?

यामुळेच मी म्हणेन की जी गोष्ट मी तुम्हाला शिकवली आहे आणि सांगण्याचा प्रयत्न केला आहे ती जर तुमच्या मनात चांगल्या प्रकारे ठसली असेल व त्यानुसार वागण्याचा तुम्ही प्रयत्न केला तर आपण फार उंचावर पोहोचू. मग आपल्याला मदतीकरिता कोणाच्या तोंडाकडे पाहत बसावे लागणार नाही. आपल्याला मदत कोणाची पाहिजे? आपल्याला मदत करणारा तर ईश्वर आहे. आणि ईश्वर कोणाला मदत करतो? जो माणूस स्वतः स्वतःला मदत करण्याला तयार असतो त्यालाच ईश्वर मदत करत असतो.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४०२-७

-------------------

# १८. द. बा. कालेलकर यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १०/११, १९४७

चि. काका,

मी तुमचे ८ तारखेचे पत्र कमलनयनला दिले. त्याच्याशी चर्चा करण्याकरिता स्वाभाविकपणेच वेळ नाही. मला जवाहरलाल आणि शहीद साहेब यांच्याशीही चर्चा करायची आहे. मी संपूर्ण पत्र आज सकाळीच वाचू शकलो. धर्मानंदांच्या (स्मारका) करिता तुम्हाला २५,००० रुपये गोळा करावे लागतील. तुम्हाला त्रास दिल्याशिवाय ही रक्कम कमलनयन गोळा करू शकत असेल तर करील नाही तर हे ओझे मी उचलेन. यामुळे तुम्ही मुळीच काळजी करू नका. संपूर्ण पैसे एका रकमेने मिळाले पाहिजे.

हेही लक्षात ठेवा की हीच गोष्ट हिंदुस्तानी प्रचार (सभेलाही) लागू होते. तुम्हाला त्रास दिल्याशिवाय कमलनयन ही गोष्ट करू शकत असेल तर ते चांगले होईल. नाही तर ५०,००० रुपयांपर्यंत हे ओझे मी घेऊ शकेन. त्यापूर्वी माझ डोळे मिटले तर त्याची काळजी तुम्हांला घ्यावी लागेल.

हिंदुस्तानी प्रचार (सभेचे) मुख्य कार्यालय दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी हालवता येऊ शकत नाही या निष्कर्षावर तुम्ही आला याबद्दल मी आभारी आहे. जमनालालने जिथे कामाला सुरुवात केली तिथेच ते सुरू ठेवले पाहिजे. जर तसे होऊ शकत नसेल आणि कोणत्याही अडचणीशिवाय इतर कुठे ते नेता येऊ शकत असेल तर तसे केल्याने कोणतीही गैरसोय निर्माण होणार नाही. दिल्लीत जर मला कोणी माणूस भेटला तर त्याला घेण्याचा मी प्रयत्न करीन.

भाषावार प्रांतरचना करण्याकरिता आपण घाई केली पाहिजे असा माझा विश्वास आहे. परंतु इथले वातावरण इतके गढूळ झालेले आहे की कोणतेही काम वेगात करता येत नाही. तरीही याबद्दल मी जागृत आहे. वेगवेगळ्या भाषा वेगवेगळ्या संस्कृतीच्या द्योतक आहेत असा भ्रम असू शकतो. परंतु भाषावार प्रांतरचना झाली की हे भ्रम दूर होतील. मला वेळ मिळाला तर (त्याबद्दल) मी लिहीन. परंतु यात घाई करण्याने काही फायदा होणार नाही असेही मला वाटते. मला माहीत आहे की भाषावार प्रांतरचना योग्य नाही असे म्हणणारा एक वर्ग आहे. माझ्या मताप्रमाणे अडथळे निर्माण करण्यात या वर्गाला आनंद वाटतो. बंगाली भाषिक लोकांच्या संस्कृतीविषयी मी केव्हा, काय आणि कोणत्या संदर्भात बोललो हे मला आठवत नाही. आठवत बसण्यात काय अर्थ आहे? इतकेच नाही तर माझ्यासारख्या ज्या माणसाचा देशाची एकच संस्कृती आहे यावर विश्वास आहे तो इतर कोणत्याही संदर्भात असे विधान कसे करील. हा वरवरचा विरोधाभास आहे. संस्कृतीचेही पोटविभाग असतात ही गोष्ट आपल्याला मान्य करावीच लागेल.

गंगाधरराव देशपांडे यांच्याबद्दल तुम्ही जे म्हणाला ते मला आवडले नाही. लोकांनी त्यांची प्रशंसा केली वा त्यांना विसरले यामुळे आपल्याकरिता काय फरक पडतो? समाधान वा असमाधान ही मनाची निर्मिती आहे. गंगाधररावांना सांगा की जागे व्हा आणि स्वतःला ओळखा. हे नवीन युग आहे आणि यात नवीन लोक पदधारण करतील व जुन्यांना बाहेर पडावे लागेल. यात सुखी वा दुःखी होण्याचे काहीही कारण नाही.

रचनात्मक कार्यक्रमाशी राजकारणाचे शुद्ध संबंध राहतील. सत्य हे आहे की लोकांना वा काँग्रेसला तो कार्यक्रम पचवता येऊ शकलेला नाही. त्यांना जर तसे करता येऊ शकले असते तर (त्यांच्या लक्षात आले असते की) त्यात राजकारणाचाही समावेश आहे. रचनात्मक कार्यक्रम इतर कशावरही अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही. आणि जर तो अवलंबून राहील तर तो टिकणार नाही.

नवजीवन ट्रस्टबद्दल तुम्ही जे म्हणता ते बरोबर आहे, परंतु त्याबद्दल आपण काहीही करू शकत नाही. विश्वस्त संस्थेत जर बदल करायचे असतील तर ते केवळ विश्वस्तसंस्थेच्या घटनेप्रमाणेच करता येतील.

हिंदुस्तानी प्रचार सभेजवळ उत्पन्नाचा काही स्रोत असता तर ती संस्था बंद पडली असती. सार्वजनिक संस्थेचा लोकांना एक तर उपयोग असतो वा नसतो. जर तसा उपयोग असेल तर लोकांनी तिला पाठिंबा दिला पाहिजे. अशा संस्थांजवळ जेव्हा स्वतःचा निधी असतो तेव्हा त्या संस्था आपले उद्दिष्टच हरवतात अशी किती तरी उदाहरणे दाखवता येऊ शकतात. आनंदजी कल्याणजीचे प्रकरण प्रसिद्ध आहे. (आता) ते काय करतात?

सुशीला पैकरिता जे काही करता येईल ते करा. तिला लाजिरवाणे होणार नाही हे पाहा. नोआखालीतील माझ्या अनुभवावरून मी सांगू शकतो की ती किती तरी काम करू शकते. आता मी तुमच्या पत्राचे पूर्ण उत्तर दिले आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------------

# १९. महमद अली जिना यांना पत्र

(मूळ पत्राचा मसुदा शहीद सुऱ्हावर्दींनी तयार केला होता व त्यात गांधीजींनी पेन्सिलने दुरुस्त्या केल्या होत्या.)

[ऑक्टोबर ११, १९४७]

(ह. श. सुऱ्हावर्दींशी गांधीजींची चर्चा झाल्यानंतर दोन दिवसांनी गांधीजींनी हे लिहिले होते. पाहा,"सुऱ्हावर्दींशी चर्चा, ऑक्टोबर ९, १९४७)

प्रिय कायदे आझम,

शहीद साहेबांनी तयार केलेल्या मसुद्याला मी दिलेल्या मान्यतेवरील तुमची प्रतिक्रिया त्यांनी मला कळवली. ते ऐकून मला वाईट वाटले. (या आणि पुढील दोन वाक्यांच्या ठिकाणी मूळ मसुद्यात पुढील वाक्य होते - मी जर तुम्हाला दुखवले असेल तर मला खेद होतो, तो माझा हेतू नव्हता; सूचनेप्रमाणे कार्यवाही व्हावी इतकीच माझी अपेक्षा होती. कराचीला जाण्यापूर्वी शहीद साहेबांनी तुम्हाला पाठवलेले पत्र आणि त्याला जोडलेले वक्तव्यसुद्धा मला दाखवले होते. त्यांनी केलेल्या पुढील सहा सूचनांशी मी सहमत आहे.) साधेपणाने मी सांगितलेल्या गोष्टींचा तुम्ही कुत्सित अर्थ लावला असे ते जे सांगतात त्याची तर मी कल्पनाही करू शकत नाही. ते काहीही असले तरी शहीद साहेबांनी दिलेला प्रस्ताव मला पुढील अटींसह मान्य आहे.

त्यांनी तुम्हाला लिहिलेल्या पत्रातील परिच्छेद २(४) मध्ये (त्यांनी लिहिलेल्या पत्रातील हे शब्ध गांधीजींनी जोडलेले आहेत.) मी हे जोडू इच्छितो :"आणि अशा कोणत्याही निर्णय देणाऱ्या स्थायी पंचाचा  वा न्यायालयाचा निर्णय आम्ही मान्य करू ज्याचे सदस्य केवळ हिंदुस्तानातील (अर्थात दोन्ही राष्ट्रातील) निवडले जातील." परिच्छेद २(८) मध्ये वा इतर कोणत्याही योग्य ठिकाणी पुढील कल्पनेचा समावेश झालेला मला आवडेल. : "प्रत्येक राज्य पळून गेलेल्या निर्वासितांना परतण्याकरिता व आपापल्या घरांत राहण्याकरिता प्रोत्साहित करील."

घोषणेतील परिच्छेद ३मध्ये हा विचार काही प्रमाणात आला असल्याचे मला दिसते. त्यावर भर देण्यात यावा व तो कार्यवाहीत आणण्याकरिता पावले उचलली जावी.

माझ्या मते शहीद साहेबांनी सुचवल्याप्रमाणे दोन राष्ट्रांत असा काही करार होण्याच्या वा दोन राष्ट्रांत हार्दिक सहकार्य होण्याच्या दृष्टीने समान विचार, समान शब्द व त्यानुसार कृती या गोष्टींची सर्वप्रथम गरज आहे. (मूळ मसुद्यात हा परिच्छेद असा होता - "कृपापूर्वक तुम्ही शहीद साहेबांना म्हणाला होता की मला नेमकी कोणत्या गोष्टीवर तुमची सहमती पाहिजे ते मी तुम्हाला सांगावे. शहीद साहेबांनी लिहिलेले पत्र व त्याबरोबर जोडलेल्या घोषणा माझी मते आहेत व त्यांच्याशी तुम्ही सहमत व्हावे अशी तुम्हाला विनंती आहे. किंवा निदान त्यांसंबंधी तुम्ही तुमचे मत कळवावे. माझी सूचना आहे की उच्चतम पातळीवर एक परिषद बोलावण्यात यावी आणि शक्य असेल तर तिच्यात तुम्ही सहभागी व्हावे. तिच्यात या मुद्द्यांची चर्चा व्हावी आणि बव्हंशाने यावर सहमती व्हावी. माझ्या मताप्रमाणे अशा प्रकारच्या करारामुळे ताबडतोब तणाव कमी होईल व दोन्ही देशांना ते लाभदायक होईल अशा सहकार्यच्या नवीन युगाची सुरुवात होईल.)

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड ४, पृष्ठ ६१

--------------------

# १००. गोपीनाथ बारडोलाई यांना पत्र

ऑक्टोबर ११, १९४७

प्रिय बारडोलाई (आसामचे मुख्यमंत्री),

तथ्यांसंबंधी काही चूक नसेल तर तुमचे तिन्ही मुद्दे योग्य आहेत (प्रकृती आणि इतर कारणांकरिता गोपीनाथ बारडोली यांची मुख्यमंत्री म्हणून विश्रांती घेण्याची इच्छा होती.). तुम्हाला अतिशय आवश्यक असलेली विश्रांती तुम्ही घेतलीच पाहिजे. परिस्थितीची काहीही कल्पना नसताना मी हे म्हणतो आहे. एका आंधळ्याने दुसऱ्या आंधळ्याला मार्ग दाखवावा तसे मला वाटते. यामुळे मी बहुधा निरुपयोगी मार्गदर्शक असू शकेन. आज काकासाहेब तुमचे मार्गदर्शक असू शकत नाहीत काय? तुमच्याकरिता उत्तम गोष्ट म्हणजे प्रार्थना करणे आणि चांगल्यात चांगले करणे आहे, मग प्रकृती बरी असो वा नसो.

हे तर निरर्थक पत्र आहे. परंतु जे लिहिले ते लिहिले.

तुमचा,

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५

--------------------

# १०१. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ११, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज भाद्रपद महिन्याच्या दुसऱ्या पक्षाची द्वादशी आहे. गुजरातमध्ये म्हणजे काठेवाड आणि कच्छमध्ये हा दिवस 'रेंटियाबारस' म्हणजे 'चरखा बारस' म्हणून ओळखला जातो. या प्रसंगी लोकांचे लक्ष चरखा आणि त्याच्याशी संबंधित गोष्टींकडे वेधले जाते. लोक जेव्हा एखादी गोष्ट सुरू करतात तेव्हा ती गोष्ट एकाकी सोडत नाहीत. परंतु आज चरखा बारस हा दिवस साजरा करण्याचा उत्साह लोकांमध्ये नाही असे मला वाटते. मी चरख्याला व्यापक अर्थ दिला होता व भारताने तो अहिंसेचे प्रतीक म्हणून मान्य केला होता. आज तो प्रतिकात्मक अर्थ आपण गमावला आहे. तो अर्थ जर कायम टिकला असता तर आज आपण जे पाहत आहो ते आपण पाहिले नसते. असे असेल तर मी तो अर्थ तुम्हांला परत सांगू इच्छितो. माझा वाढदिवस २ ऑक्टोबरला साजरा केला जात असे इतके पुरेसे होते. परंतु गत अनेक वर्षांपासून माझा वाढदिवस हिंदू पंचांगाप्रमाणेसुद्धा साजरा केला जाऊ लागला आहे व या दोन दिवसांमधील दिवसांत चरखा फिरवण्याचे काम मोठ्या उत्साहात केले जाते. परंतु आज मला त्याकरिता वातावरण दिसत नाही. असे असले तरी ईश्वरकृपेने त्यांना चरखा अहिंसेचे प्रतीक वाटते. ही गोष्ट निश्चितपणे चांगली आहे. जर पाच लोक जरी अशा प्रकारे चरख्याकडे पाहून काम करतील तर ती गोष्ट समाधानकारक होईल आणि करोडो लोकांनी केली तर ती अजूनच समाधानकारक होईल. यामुळे मी तुमचे लक्ष चरख्याकडे वेधतो आहे.

कराचीत एक मंडल साहेब आहेत. ते पाकिस्तानच्या मंत्रिमंडळात आहेत. असे म्हणतात की ते बंगालमधील हरिजन आहेत आणि तरीही कायदेआझमनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिले आहे. त्यांच्या सूचनेनुसार कोणती तरी एक गोष्ट मान्य करण्यात आली आहे. इतरही दोनतीन लोक, त्यांची नावे मी विसरलो, त्यांच्या दृष्टिकोनाचे समर्थन करतात. सर्वच्या सर्व लोकांना बरोबर घेणे तर शक्य होत नसते. परंतु एक दोन लोक जरी त्यांना पाठिंबा देतात तरी त्याने काय फरक पडतो? सिंधमधील हरिजनांना कोणीही त्रास देऊ नये व त्यांना काढून टाकू नये म्हणून प्रत्येक हरिजनाने आपल्या दंडावर एक पट्टी बांधली पाहिजे व तिच्यावर तो हरिजन म्हणजे, अस्पृश्य असल्याचा उल्लेख असला पाहिजे असे एक परिपत्रक निघाले आहे. हा केवळ माझा संशय असेल तर फार चांगले, परंतु अशी शंका आल्याशिवाय राहू शकत नाही की सध्याच्या सर्व हरिजननांना आज तर नोकरी मिळेल आणि असेही समजू या की हे हरिजन तिथेच राहिले तरी, सर्वच्या सर्व तर राहणार नाहीत, काही आधीच निघून गेलेले आहेत आणि काही निघून जाणार आहेत असे मी ऐकतो. आणि जे तिथे राहतील त्यांना अखेरीस इस्लाम कबूल करावा लागेल. जर हा परिणाम होणार असेल तर तो भयानक परिणाम असेल. कोणत्याही माणसाला जर आपला धर्म सोडण्याची आणि दुसरा कोणता धर्म स्वीकारण्याची इच्छा असेल आणि आपण योग्य करतो आहो असे त्याला वाटत असेल तर त्याला तसे करण्याचा अधिकार आहे. आज मी स्वतःला सनातनी हिंदू समजतो. उद्या जर मला सनातन धर्म चांगला वाटला नाही तर मला तो सोडण्याचा अधिकार असेल. परंतु ही फार गंभीर गोष्ट आहे. माझा धर्म मी मान्य करत नसेन तर मला कोण अडवू शकतो? माझी आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता वा इतर कोणता लाभ होण्याकरिता मला कोणी ख्रिश्चन धर्माचा मोह दाखवला नाही. मी ईश्वराजवळ माझा हिशोब चुकता करीन आणि सर्व जगाने जरी विरोध केला तरी मी माझ्या विवेकबुद्धीप्रमाणे वागेन. माझा विश्वास आहे की आज एकाही हरिजनाची अशी परिस्थिती

नाही. मी असे अधिकारवाणीने सांगू शकतो कारण मी स्वतः हरिजन झालो आहे, अस्पृश्य झालो आहे व मी त्यांच्या धर्माचा स्वीकार केला आहे. पाकिस्तानमधील हरिजन आणि इतरांचा जोपर्यंत संबंध आहे ते सुरक्षित आहेत असे घोषित केले जावे अशी माझी अपेक्षा आहे. असे झाले तर कोणालाही आपल्या दंडावर पट्टी बांधावी लागणार नाही. मी माझ्या इच्छेने धर्म बदलला असे जर कोणी आज म्हणतही असेल तरी ते वैध आहे असे मान्य केले जाणार नाही अशी घोषणा सर्वांकरिता करण्यात यावी. धर्माचा संबंध हृदयाशी असतो. तो माणूस आणि ईश्वराशी संबंधित असतो. परंतु पाकिस्तानच्या सध्याच्या शासनांतर्गत कोणीही आपला धर्म स्वेच्छेने सोडला असे म्हणता येऊ शकत नाही. ज्याने कोणी असे केले असेल त्याने ते भीतीमुळे व बळजबरीमुळे केले असेल. यामुळे इथे धर्मांतर करता येणार नाही असे पाकिस्तान सरकारने घोषित केले पाहिजे.

याशिवाय अजून एक गोष्ट आहे. या महिन्यात दोन सण येणार आहेत. एक दसरा. फार मोठा सण आहे तो. भारतातील सर्व हिंदू तो साजरा करतात व त्याला फार महत्त्व देतात. परंतु बंगालमध्ये त्याला फारच महत्त्व आहे. मी बंगालमध्ये राहिलो होतो तेव्हापासून मला हे माहीत आहे. यांनंतर दोनच दिवसांनी बकरी-ईद येते. पूर्वी हिंदू आणि मुसलमानांमध्ये इतकी दुर्भावना नव्हती. अधूनमधून जरी त्यांच्या कटकटी व्हायच्या तरी आजप्रमाणे ते भांडत नव्हते. या दिवशी हिंदू-मुसलमानांमध्ये काही विपरीत घडू नये म्हणून ब्रिटिश सरकारलासुद्धा तयारी ठेवावी लागत असे. गोहत्त्या, वा हिंदूंना डिवचण्याकरिता गायीला सजवून तिची मिरवणूक काढणे अशी कोणतीही चिथावणी पुरेशी असायची. दसऱ्याच्या दिवशी प्रत्येक गोष्ट सुशोभित केलेली असते, संगीत सुरू असते आणि स्त्रीपुरुष सजून काही बैलगाडीत जातील तर काही घोड्यावर बसून जातील. परंतु यामुळे मुसलमान डिवचले जाऊ शकतात व दंगलीकरिता निमित्त पुरवू शकतात. तसेच बकरी ईदच्या दिवशी हिंदू डिवचले जाऊ शकतात. ज्या हिंदू-मुसलमानांना मित्राप्रमाणे एकत्र राहण्याची

इच्छा आहे त्यांनी हे सण साजरे करताना संयमाने वागायला पाहजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. त्यांनी असे काहीही करू नये की ज्यामुळे दुसरा डिवचला जाईल. आणि असे नसतानासुद्धा सध्या आपल्या अंतःकरणात क्रोध भरलेला आहे व आपल्या प्रतिक्रिया अतिरंजित असतात. अशा परिस्थितीत आपण कोणतीही डिवचणारी गोष्ट करू नये.

ब्रिटिश सरकारने जात असताना एक गोष्ट चुकीची केली आहे. त्यांनी देशाची वाटणी केली आणि आता दोन सरकार आहेत. आज ते शत्रूप्रमाणे आहेत. शक्य आहे की त्यांच्यात कधीही युद्ध होणार नाही. परंतु घटनाक्रम असा काही घडत आहे की भविष्याबद्दल कोणीही काहीही सांगू शकत नाही. परंतु दोन्ही पक्ष समंजसपणा धारण करतील अशी आपण आशा करू या. परंतु जर असे घडले नाही तर आपण आपले स्वातंत्र्य गमावू. आपला देश गुलामगिरीत जाऊ देणे म्हणजे आपल्या स्वतःच्या धर्माशी प्रतारणा. आपण आपले स्वातंत्र्य गमावले तर ती फार मोठी चूक होईल. ईश्वराने आपल्या सगळ्यांना सद्बुद्धी द्यावी व आपण सर्वांनी शुद्ध व्हावे अशी ईश्वराकडे माझी प्रार्थना आहे. हीच चांगली गोष्ट असेल. अजून एक गोष्ट मला सांगायची आहे ती ही की दक्षिण आफ्रिकेतील आपल्या देशबांधवांनी आपल्या योजनेप्रमाणे काम करत असताना काळजीपूर्वक वागावे. (१३ ऑक्टोबरपासून परत सत्याग्रह सुरू करावा असा प्रस्ताव असल्याचे वृत्त ऑक्टोबर, १९, १९४७च्या 'हरिजन'मध्ये होते.) तिथे जे लोक आहेत त्यांना या दोन सरकारांनी पाठिंबा द्यावा व त्यांच्या संघर्षात त्यांना प्रोत्साहन द्यावे.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ४०७-१०

--------------------

# १०२. एका विद्यार्थ्याची समस्या

(याचे मूळ ऑक्टोबर १९, १९४७च्या 'हरिजनबंधू'मध्ये प्रकाशित झाले होते.)

एका विद्यार्थ्याने शिक्षकाला पत्र लिहिले होते. माझे मत जाणून घेण्याकरिता त्या पत्रातील खालील भाग त्या शिक्षकाने माझ्याकडे पाठवला. विद्यार्थ्याचे पत्र इंग्रजीत आहे. त्याची मातृभाषा काय आहे हे मला माहीत नाही.

**तो विद्यार्थी लिहितो - दोन गोष्टींनी माझ्या मनात पूर्णपणे घर केलेले आहे. एकीकडून देशप्रेमाने आणि दुसरीकडून पराकाष्ठेच्या विषयवासनेने. यांमुळे माझ्या मनात विरोधी भावना निर्माण होतात व माझ्या निर्णयात सुसूत्रता नसते. मला माझ्या देशाचा पहिल्या नंबरचा सेवक बनण्याची इच्छा आहे परंतु त्याचबरोबर जगातील भौतिक सुखांचाही मला उपभोग घ्यायचा आहे. किती तरी वेळा मला ईश्वराची भीती वाटत असली तरी मी मान्य केले पाहिजे की ईश्वरावर माझी श्रद्धा नाही. खरे सांगायचे तर माझे जीवनच माझ्याकरिता एक समस्या आहे. अखेरीस काय होईल हे मला माहीत नाही. मी मृत शरीर जळताना पाहिले आहेत - शेवटची चिता माझ्या आईची होती. पेटलेल्या चितांनी माझ्या मनावर भयंकर परिणाम केला. माझीही अशीच अवस्था होईल काय हा विचार मला सहन होत नाही. कोणा जखमीला पाहिले की मला भणभणू लागते. नंतर मी कल्पनाविश्वात जातो आणि सांगतो की तुझ्या शरीराचीही हीच अवस्था होणार आहे. मला माहीत आहे की यातून सुटका नाही. त्याचबरोबर मला असेही वाटते की मृत्यूनंतर जीवन नाही. यामुळेच मी घाबरलेलो आहे.**

**माझ्याकरिता दोनच मार्ग उपलब्ध आहेत - एक तर समस्येचा विचार करत मी जळत राहिलो पाहिजे अथवा जगातील भौतिक सुखात रममाण होऊन इतर कशाचा विचारसुद्धा न करणे. इतर कोणासमोर मी ही गोष्ट कबूल केलेली नाही परंतु तुमच्यासमोर कबूल करतो की मी तर जगाचे सुख उपभोगण्याच्या मार्गाचीच निवड केली आहे.**

**हे जगच सत्य आहे व कोणतेही मूल्य देऊन त्याचा आनंद उपभोगला पाहिजे. माझी पत्नी नुकताच वारली आहे. मला असे आढळते की तिच्याविषयीच्या प्रेमाच्या मुळाशी तिचे मरण नव्हते.**

**मी आता एकटा राहिलो ही स्वार्थी भावना होती. मेल्यानंतर तर कोणतीच समस्या शिल्लक राहत नसते आणि जिवंत माणसाकरिता तर संपूर्ण जीवनच एक समस्या आहे. शुद्ध प्रेमावर माझी श्रद्धा नाही. ज्याला प्रेम म्हणून आपण ओळखतो तो केवळ विषयोपभोग असतो. शुद्ध प्रेम म्हणून काही गोष्ट असती तर मला माझ्या पत्नीपेक्षा माझ्या आईवडिलांबद्दल अधिक प्रेम वाटले असते. परंतु याबाबतीत सत्य उलट होते. मी प्रामाणिक पती होतो परंतु पत्नीच्या मृत्यूनंतरही मी तिच्यावर प्रेम करत राहीन असे आश्वासन मी तिला देऊ शकत नव्हतो. ती नसल्यामुळे मला होणारे दुःख तिच्या अनुपस्थितीमुळे जी गैरसोय होईल त्याचेच असेल. याला तुम्ही दौषैकदृष्टी म्हणू शकाल, परंतु ती आहे... कृपाकरून मला लिहा आणि मार्गदर्शन करा.**

या उद्धृतांमध्ये तीन गोष्टी येतात. (१) विषयवासना आणि देशप्रेम यांच्यात निर्माण होणारा विरोध (२) ईश्वर आणि मृत्यूनंतरचे जीवन याबद्दल अश्रद्धा (३) शुद्ध प्रेम आणि विषयवासना यांतील द्वंद्व.

पहिल्या समस्येची मांडणी नीट करण्यात आली असल्याचे आढळते. तिचा सार असा आहे की विषयोपभोगाची इच्छा खरी आहे आणि देशप्रेम वाहत्या प्रवाहात ओढल्या जाण्यासारखे आहे. इथे देशप्रेमाचा अर्थ होईल सत्ताप्राप्तीच्या राजकारणात पडणे. म्हणजे त्याबरोबरच विषयवासनेच्या परिपूर्तीचाही मेळ बसू शकतो. अशा प्रकारची किती तरी उदाहरणे आढळू शकतील. देशप्रेमाचा माझा अर्थ आहे देशातील गरीब लोकांबद्दलच्या प्रेमाचा अग्नी आमच्या अंतःकरणात पेटत राहिला पाहिजे. हा अग्नी विषयवासनेसारख्या मोहाला नेहमीच भस्मसात करून टाकतो. यामुळे मला देशप्रेम आणि विषयवासना यांच्यांत कोणताही संघर्ष दिसत नाही. हे प्रेम नेहमीच विषयवासनेवर विजय मिळवते. अशा सर्वव्यापी देशप्रेमामुळे इतर कोणत्याही गोष्टीकरिता क्षणाचासुद्धा अवधी शिल्लक राहत नाही. याउलट ज्या माणसावर विषयवासनेने विजय मिळवलेला असतो त्याचा तर सर्वनाशच होतो.

ईश्वर आणि मृत्यूनंतरचे जीवन यांसंबंधीच्या जीवनासंबंधीच्या अश्रद्धेचा स्रोतसुद्धा जीवनासंबंधीच्या वासनांमध्येच आहे. आणि ही वासना स्त्री-पुरुषांना मुळापासून हादरवते. अनिश्चिततेची अवस्था त्यांना खाऊन टाकते. विषयवासना जेव्हा मृत होतात तेव्हा ईश्वरावरील श्रद्धा जिवंत होते. दोन्ही गोष्टी एकाच वेळी अस्तित्वात असू शकत नाही.

तिसऱ्या समस्येत पहिलीच समस्या पुनरावृत्त झाली आहे असे वाटते. पती आणि पत्नीमध्ये शुद्ध प्रेम असेल तर इतर कोणत्याही प्रेमापेक्षा ते माणसाला ईश्वराच्या अधिक जवळ नेते. परंतु पतिपत्नीच्या प्रेमात जेव्हा विषयवासना मिसळते तेव्हा ती त्यांना ईश्वरापासून दूर नेते. यातून एक प्रश्न निर्माण होतो - जर स्त्रीपुरुष हा भेद निर्माण झाला नाही, विषयवासनाच राहिली नाही तर विवाहाची आवश्यकताच राहणार नाही.

विद्यार्थ्याचे म्हणणे खरे आहे की त्याला पत्नीबद्दल वाटणारे प्रेम निस्वार्थ नव्हते. ते जर निस्वार्थ असते तर जीवनसंगिनीच्या मृत्यूमुळे त्याचे जीवन अधिक संपन्न झाले असते कारण पत्नीच्या मृत्यूनंतर पददलित मावतेवरील त्याचे प्रेम अधिक वाढले असते.

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १२, १९४७

'हरिजन', ऑक्टोबर १९, १९४७

-------------

## १०३. प्रेमा कंटक यांना पत्र

ऑक्टोबर १२, १९४७

चि. प्रेमा.

मला तुझे पत्र मिळाले. मला मुळीच वेळ नाही.

मी जे लिहिले ते मला जे वाटले त्याप्रमाणे लिहिले. दुसऱ्या कोणाच्याही सूचनेप्रमाणे मी कधीही लिहीत नसतो.

तुझ्या पत्रातील टोमणा मला कळतो. मी काय म्हणू? तुला वेदना होतील असे मी काहीही कधीही लिहिणार नाही.

शंकररावांनी धोतर अगदी काळजीपूर्वक आणले होते परंतु नजरचुकीने ते धुण्याकरिता पाठवण्यात आले. ते जसेच्या तसे वापरण्याची माझी इच्छा होती. मी जेव्हा त्याबद्दल विचारले तेव्हा काय झाले ते कळले. परंतु त्यामुळे काय फरक पडतो? तुम्ही सर्वांनी घेतलेल्या काळजीमुळे मला ते ११ तारखेला तरी मिळाले.

अधिक तू आल्यानंतर.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. : जी. एन. १०४५७. सौजन्य - प्रेमा कंटक

--------------

## १०४. सामंत नानजी मारवाडी आणि इतरांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १२, १९४७

(विषय - रामजी गोपालजी साबरमतीवाला प्रकरणासंबंधी)

भाई सामंत नानजी मारवाडी, भाई मूलदास भूधरदासजी वैश्य आणि भाई माधवजी पी. परमार,

मला तुमचे पत्र मिळाले. मला आश्चर्य वाटले. भाई रामजींकरिता शक्य ते सर्व करण्यात आले आहे. भाई रामजींनीही आम्हाला त्रास देण्यात काहीही कसूर ठेवला नाही.

लक्ष्मीदासभाई, नरहरीभाई आणि परिक्षितभाई सारख्या चांगल्या माणसांबद्दल त्यांनी मनात संशय बाळगणे योग्य नाही.

मी जे म्हणालो, जे लिहिले त्याचा कोणीही प्रतिवाद केला नाही. मी जे लिहिले त्याचा मीच अर्थ लावू शकत नाही. जो अर्थ लावण्यात स्वार्थ असतो तो अर्थ स्वीकारार्ह नसतो. यामुळेच माझा सल्ला आहे की दादासाहेब मावळणकरसारखे समंजस व्यक्ती जो अर्थ लावतील त्यानुसार तुम्ही वागायला पाहिजे. आणि अखेरचा उपाय तर आहेच. तात्पर्य न्यायालयाने याचा अर्थ लावावा. यांतून जे योग्य असेल तो सल्ला रामजींना द्या.

माझे पत्र का मिळाले नाही हे कोण सांगू शकतो? आजकाल डाकविभागात ही गोष्ट सर्वसाधारण झाली आहे. खरे म्हणजे माझी तार पुरेशी होती.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

## १०५. दिलखुश दिवाणजी यांना पत्र

दिल्ली,

ऑक्टोबर १२, १९४७

चि. दिलखुश दिवाणजी,

आई जे सूत ठेवून गेल्या होत्या त्यापासून विणलेली खादी मिळाली. मी ती प्रेमाने वापरेन. तिचे आशीर्वाद सदैव माझ्याबरोबर आहेत असा माझा विश्वास आहे. तिचे पार्थीव शरीर आपल्याबरोबर नाही त्याचे काय? अधिक लिहिण्याकरिता मला वेळ नाही..

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-----------------

# १०६. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आजसुद्धा बरीच कांबळी आली. दुलयाही आल्या. दुलयांबद्दल मी सांगू इच्छितो की गिरण्यांमध्येसुद्धा तयार होत असलेल्या दुलयासुद्धा येत आहेत. ज्या गतीने दुलया आणि कांबळी येत आहेत त्यावरून माझ्या मनात विश्वास निर्माण झाला आहे की दिल्लीत आणि आजूबाजूला जे निर्वासित वेगात गोळा होत आहेत त्यांना त्रास होणार नाही. दुलया, कांबळी आणि गरम कपडे इत्यादी येत आहेत ते सर्व केवळ गरजवंतांनाच मिळावे असाही प्रयत्नही करण्यात येत आहे. एका गोष्टीची मात्र आठवण ठेवली पाहिजे की ही जी पांघरुणे येत आहेत ती अखेरीस फाटतील, परंतु सध्या तरी ते पाऊस आणि दव यांच्यापासून आपले रक्षण करू शकतील. ईश्वराची इच्छा असेल तर हिवाळ्यात पाऊस येणार नाही, परंतु दव अपरिहार्य आहे. प्रत्येकाला कांबळे मिळू शकत नाही. सर्व सामावू शकतील इतके तंबू मिळू शकतील की नाही याबद्दलही मला शंका आहे. काही लोकांशी बोलताना मी एका गोष्टीचा उल्लेख केला होता आणि त्याच गोष्टीचा मी इथेही उल्लेख करू इच्छितो. ज्यांना दुलया मिळतील त्यांनी जर आपल्या दुलईवर वर्तमानपत्र टाकले तर दुलईतून दव खाली झिरपणार नाही. दुलयांबद्दलची दुसरी गोष्ट ही आहे की त्या तयार करण्याकरिता वापरलेल्या कापसाच्या प्रमाणामुळे पुरेशी ऊब मिळते. परंतु कापसाचे जेव्हा वेगवेगळे गोळे तयार होतात तेव्हा दुलई परत उघडता येते, तिची खोळ धुवायची व धुनाई करून तिच्यातील कापूस परत वापरता येतो. असे केल्याने ती दुलई परत नवीन होते. जे लोक ती काळजीपूर्वक वापरतील त्यांच्याकरिता ही फार उपयोगी गोष्ट आहे.

आपल्यावर फार मोठे संकट आले आहे. परंतु जे लोक ईश्वराचा विचार करतात आणि ईश्वराच्या नावावर काम करतात त्यांना अशा संकटातसुद्धा काही तरी शिकायला मिळते. दोन गोष्टींची शक्यता आहे. संकट आले की एक तर माणूस घाबरतो वा संतापतो व स्वतःची परिस्थिती अधिकच दयनीय करून घेतो. परंतु आपत्तीत असतानाही तो जर विचार करील की माझा कोणताही दोष नसताना मला या आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे आणि तरीही जो ईश्वराला सोडत नाही व सतत तो त्याच्या मदतीकरिता काकुळती करत असतो तो माणूस अशा आपत्तीतही स्वतःकरिता आनंद निर्माण करू शकतो. इथे आलेले अनेक निर्वासित सुखवस्तू लोक होते. त्यांच्याजवळ भरपूर पैसा आणि मालमत्ता होती. त्यांच्याजवळ मोठे इमले होते. आता त्यांनी सर्व गमावले आहे. मी आधीच सांगितले आहे की जोपर्यंत लोक परत आपापल्या घरी परत जात नाहीत आणि सुरक्षितपणे राहू शकत नाहीत तोपर्यंत ते दोन्ही सरकारांवर फार मोठे ओझे असतील. आपल्याला जर जिवंत राहायचे असेल, आपल्याला जर स्वतंत्र राहायचे असेल तर आपल्याला लोकसंख्येच्या या अदलाबदलीच्या पापाचे प्रायश्चित्त घ्यावे लागेल. प्रायश्चित्त म्हणजे आपल्या चुकांची दुरुस्ती. मगच ते खरे प्रायश्चित्त होईल. दुसऱ्या कोणत्याही मार्गाने ते होऊ शकत नाही. जेव्हा कोणी खरोखरच आपली चूक दुरुस्त करतो तेव्हा त्याने पुरेसे प्रायश्चित्त घेतलेले असते. आपली चूक दुरुस्त करण्याचा जर आपला हेतू असेल तर जे लोक आपला जीव वाचवण्याकरिता इथे आले आहेत त्यांना परत आपल्या ठिकाणी जाण्यासारखी परिस्थिती असली पाहिजे. वेळ येईल तेव्हा हे होईलही, परंतु मधल्या काळात आपण काय करायचे? मी असे सुचवू इच्छितो की जर चांगले डॉक्टर उपलब्ध असतील - निर्वासितांमध्ये डॉक्टर, वकील आणि इतर अनेक आहेत - तर त्यांनी मध्यंतरीच्या काळात आपली वैद्यकीय सेवा द्यावी आणि असे करून या दुःखद परिस्थितीतही आपण नवीन धडा शिकू शकतो.

मी जेव्हा निर्वासितांना भेटण्याकरिता गेलो तेव्हा त्यांच्यातील पंचाहत्तर टक्के लोक व्यवसायी असल्याचे मला सांगण्यात आले. तो माझ्याकरिता धक्का होता आणि इतके सगळे लोक इथे व्यवसाय कसा करू शकतील असा मला प्रश्न पडला. इथे लाखो लोक आले आहेत आणि एकाच वेळी ते सर्व व्यवसाय करू लागले तर सर्वत्र गोंधळ होईल. ते जर काही प्रयत्न करतील, काही नवीन शिकतील तर काही तरी चांगले होईल. जे व्यापारी व्यवसायात गुंतलेले होते त्यांनी आपला भूतकाळ विसरावा. जेव्हा आपल्याला एखादी विशिष्ट गोष्ट मिळू शकत नाही तेव्हा आपण दुसऱ्या गोष्टीचा शोध घ्यावा हा जगाचा नियमच आहे. आपण आळसात बसू नये. तसेच जुगार आणि दारूत वेळ वाया घालवू नये. आपण काही तरी काम केलेच पाहिजे. आपण कठोर परिश्रम करू या. जे व्यापारी आहेत परंतु ज्यांचे शरीर मजबूत आहे व जे आपल्या हातापायाचा उपयोग करू शकतात त्यांनी काही तरी काम करावे. फार थोडे काम असे आहे की ज्याकरिता प्रशिक्षणाची मुळीच आवश्यकता नाही. त्यांनी अशा प्रकारच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे व परस्परांशी सहकार्य करावे. याचबरोबर त्यांनी एकत्रित काम करण्याची वृत्ती विकसित करावी. असे झाले तरच आपल्याकरिता जी नरकासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे तिच्यातून स्वर्ग निर्माण होईल.

या सर्व गोष्टींबद्दल आज तुम्हांला सांगायचे असे मी ठरवले होते आणि तुमच्या माध्यमातून ही गोष्ट प्रत्येकाला सविस्तर कळावी म्हणून मी दिवसभर विचार करत होतो. यामुळे निर्वासितांचा आणि देशाचाही फार मोठा लाभ होईल. आणि आज आपल्यावर जी आपत्ती आली आहे ती दूर करून आपण आनंद निर्माण करू.

विविध ठिकाणाहून ज्या दुलया अजून आलेल्या नाहीत परंतु यायच्या आहेत त्यांचे काय करायचे या संबंधात मला तुम्हांला काही सांगायचे आहे. आपण त्यांचे काय करायचे? दुलयांचे कापड घाणरडे झालेले असेल तर ते वेगळे करून धुवावे. दुलईमधील

कापूस राखून ठेवता येऊ शकतो. कापूस मुळीच खराब होत नसतो. तो वाळवून हाताने स्वच्छ करता येतो. त्याकरिता धनुकलीचीसुद्धा गरज नसते. तो कापूस कताईकरिता उपयोगात आणण्याची आपली इच्छा असेल तर मात्र गोष्ट वेगळी. नवीन सतरंज्या, तडव, दुलया इत्यादी तयार करण्याकरिता त्या कापसाचा सहज उपयोग करता येतो. मला वाटते की या गोष्टी जर आपण स्वतः तयार केल्या तर त्या स्वस्त आणि लवकर तयार होतील. गिरण्यांजवळ भरपूर कापड पडलेले आहे. या वेळी खाण्यापिण्याच्या गोष्टीची चर्चा करण्याची माझी इच्छा नाही. आपल्याजवळ भरपूर कापूस आहे आणि फार कमी वेळात आपण त्यांच्यापासून रजया बनवू शकतो. या दुलया जर आपण दिल्या तर त्यांच्यामुळे लोकांचे हिवाळ्यात रक्षण होऊ शकेल. यामुळे या गोष्टी कशा तयार कराव्या हे आपण या लोकांना शिकवले पाहिजे आणि त्यांच्या सभोवती निराशेचे जे वातावरण पसरले आहे ते दूर करून त्यात आनंद आणला पाहिजे. एका भजनात सांगितले आहे की 'घोर अंधारातून आशेचा किरण दिसत असतो'. हे खरे आहे. ही काव्यात्मक अभिव्यक्ती आहे. खोलवर रुजलेल्या निराशेतूनही आपल्याला आशेचा किरण दिसावा अशी आपली इच्छा असते. तो किरण दिसण्याकरिता आपण काय केले पाहिजे? जे लोक रस्त्यावर फेकले गेले आहेत त्यांनी सर्वप्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे की ते भारताचे आहेत, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत वा सिंधचे नाहीत. हे सर्व प्रांत भारतात आहेत. यामुळे या भागात राहणारे लोकसुद्धा भारताचे आहेत. इतरांवर भार न होण्याच्या अटीवरच ते भारतीय राहू शकतात आणि भारताचे होऊ शकतात. ज्याप्रमाणे दुधात साखर घोळली की ते गोड होते आणि नंतर दूध आणि साखर वेगळी करता येत नाही व दूध जसेच्या तसेच राहते त्याचप्रमाणे ते जिथे कुठे जातील तिथे त्यांनी तेथील लोकांमध्ये दुधात साखर मिसळते त्याप्रमाणे भांडणतंटा न करता व एकमेकांबद्दल द्वेषभावना न ठेवता मिसळायला पाहिजे. त्यांनी परस्परांना मदत केली पाहिजे, सहकार्य केले पाहिजे आणि कठोर परिश्रम केले पाहिजे. असे केले तर ज्या

प्रांतात ते जातील त्या प्रांतात ते सुधारणा घडवून आणतील आणि असे कितीही निर्वासित आले तरी त्यांना सामावून घेण्याची आमची तयारी आहे असे तेथील लोक म्हणतील.

निर्वासितांमधील जे लोक काम करू शकतात आणि ज्यांच्यापर्यंत माझा आवाज पोहोचू शकतो ते इतरांनाही चांगले होण्याकरिता प्रेरित करतील अशी मला आहे. त्यांनी कुठेही ओझ्याप्रमाणे होऊ नये तर मी सांगितल्याप्रमाणे एकोप्याने एकमेकांशी जुळवून घेऊन राहावे. त्यांनी कोणाचीही फसवणूक करू नये. आपण आपला वेळ वाया घालवू नये. आपल्या वेळेचा क्षण न क्षण आपण ईश्वराला, कामाला आणि सेवेला वाहू या. आपला जन्म सेवेकरिता झाला आहे. आपण जर असे राहिलो तर एके काही काळी आपण दुःखी होतो आणि शोकसागरात बुडालेलो होतो हे विसरून जाऊ. आपल्याजवळ आजूबाजूला करोडो लोक आहेत. त्यांनी स्वतःला सेवेत बुडवून घ्यावे. आपल्या देशाचे नाव आपण उंच करू, खाली पाहायला लावणार नाही आपण असा निर्धार करू या. असे जेव्हा होईल तेव्हा तो भाग्याचा क्षण असेल व मग आपल्याकरिता काळजी करण्यासारखे काहीही राहणार नाही असे मला वाटते. चूक करणे मानवी स्वभाव आहे, परंतु चूक दुरुस्त करणे हासुद्धा माणसाचा गुण आहे. आपण जेव्हा आपली चूक दुरुस्त करतो तेव्हा आपण खरे माणूस होतो.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४११-४

----------------

# १०७. कटुत्वाने भरलेले एक पत्र

एक मुसलमान मित्र लिहितो -

**राष्ट्रवादी दृष्टिकोन असलेला मी मुसलमान आहे. माझ्या संपूर्ण जीवनात, जर माझ्या २१ वर्षांच्या अस्तित्वाला हे शब्द लावता येऊ शकत असतील तर, मी स्वतःबद्दल मुसलमान म्हणून विचार करावा म्हणून माझा मोठा भाऊ, वडील आणि इतर नातेवाईक कितीही जरी सांगत होते तरीही मी स्वतःबद्दल हिंदू वा मुसलमान म्हणून कधीही विचार करू शकलो नाही. स्वाभाविकपणेच इस्लामिया कॉलेज, जालंदरमध्ये मला प्रवेश मिळू शकत नव्हता कारण माझी गणना समाजातील फितुरांमध्ये होत होती.**

**माझ्या वडिलांनी माझ्या इतर नातेवाईकांसह एप्रिल महिन्यात जालंदर सोडले परंतु मी त्यांच्याबरोबर पूर्व पंजाबमध्ये गेलो नाही, आणि याशिवाय माझ्या इतर धर्माच्या मित्रांचा जितका भारत देश होता तितकाच तो माझ्याकरिताही होता. परंतु ऑगस्टमधील क्रूर घटनांनी शब्दांत वर्णन करता येणार नाही इतकी माझी निराशा झाली. इतकेच नाही तर आझाद हिंद सेनेतील लोकांवर खटला सुरू असताना ज्या मुलांनी माझ्याबरोबर जानेवारी १९४६मध्ये मिरवणुका काढल्या होत्या तेसुद्धा माझ्या जिवावर उठले. त्यांच्याकरिता अखेरीस मी मुसलमान होतो आणि मला मारल्यामुळे त्यांना त्यांच्या समाजाकडून प्रशंसा मिळाली असती. यामुळे जीव वाचवण्याकरिता मला दिल्लीला पळून यावे लागले. मला विश्वास होता की पाकिस्तानऐवजी अखंड भारतावर विश्वास ठेवणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला तेथील लोकांकडून अशी वागणूक मिळणार नाही. परंतु इथे तर अजूनच भयंकर होते. इतकेच नाही तर ज्या मित्रांबरोबर मी राहतो तेसुद्धा माझ्याकडे संशयाने पाहत आहेत.**

**समता आणि स्वातंत्र्याच्या माझ्या प्रिय प्रेषिता आता मला सांगा की माझ्या सदसद्विवेकबुद्धीच्या विपरीत वागून मी आता पश्चिम पाकिस्तानमध्ये माझ्या आईवडिलांजवळ राहण्याकरिता परत जाऊ की माझ्या धर्मबांधवांच्या पापाचा बदला घेण्याकरिता अमानवी वर्तन करून माझा जीव घेऊ पाहणाऱ्या लोकांमध्ये बंधक म्हणून भारतात राहू?**

मी वरील पत्र थोडे संक्षिप्त केले आहे, परंतु फार नाही. त्यातील कटूत्वाला स्पर्श करण्यात आलेला नाही. पत्रातील मजकूर बरोबर आहे असे गृहीत धरले तर कटूत्वाकरिता भरपूर कारण आहे. माणसाची पारख अतिशय विपरीत परिस्थितीतच होत असते. मजेच्या दिवसात अनेक मित्र असतात. त्यांना काहीही अर्थ नसतो. "अडिअडचणीत धावून येतो तो खरा मित्र." हिंदू मुसलमान जसे भांडत आहेत तसेच एकाच धर्मात राहणारे लोक परस्परांशी भांडत नसतात काय? जेव्हा साध्यासुध्या लोकांना इतक्या सगळ्या वर्षांपासून घृणेचे पाठ शिकवण्यात येत आहेत तेव्हा अजून कशाची अपेक्षा करता येऊ शकते? पत्र लिहिणाऱ्या बंधूला जर आपले राष्ट्रीयत्व सार्थक आहे असे सिद्ध करण्याची इच्छा असेल तर या नाजूक प्रसंगी त्याने स्वतःला त्या राष्ट्रीयत्वापासून वंचित करू नये. आपण जुडासचे (येशू ख्रिस्ताच्या बारा अनुयायांपैकी एक. त्याने धर्मगुरू होण्याकरिता येशूशी प्रतारणा केली होती.) अनुकरण करू नये. यामुळे पत्रलेखकाने जालंदरमधील आपल्या घरी परतावे असे सांगताना मला मुळीच संकोच वाटत नाही. तिथे त्याच्या पूर्व मित्रानी जरी त्याचे तुकडे केले तरी त्याने त्याची फिकीर करू नये. अशा प्रकारचे हुतात्मेच हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचे रक्षक होऊ शकतात. तो जर त्याच्या शब्दांइतकाच खरा असेल तर त्याचे आईवडील अंतःकरणपूर्वक त्याचे स्वागत करतील. पापी लोकांच्या पापाचे फळ निर्दोष लोकांना भोगावे लागावे हीच गोष्ट आम्हा मानवाच्या नशिबी लिहिलेली नाही काय? हेच योग्य आहे. निर्दोष लोक संकट सहन करत असल्यामुळेच जग संपन्न आणि चांगले झाले आहे. हे साधे सत्य सांगण्याकरिता मी "स्वातंत्र्य आणि समतेचा प्रेषित" असण्याची आवश्यकता नाही.

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १३, १९४७

'हरिजन', ऑक्टोबर १९, १९४७

---------------

# १०८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १३, १९४७

काल मी निर्वासित शिबिरांबद्दल काही उद्गार काढले होते. इंग्रजीत संक्षेप करताना ते सुटले होते. मी त्यांना फार महत्त्व देत असल्यामुळे मी त्याबद्दल थोडे विस्ताराने सांगेन. आपल्याकडे जरी धार्मिक वा इतर यात्रा भरत असल्या आणि काँग्रेसचे अधिवेशन व परिषदा होत असल्या तरीही एक राष्ट्र म्हणून आपल्याला छावणीतील जीवन जगण्याची सवय नाही. काँग्रेसची अधिवेशने, परिषदा आणि इतर मेळाव्यांमध्ये मी हजर राहिलो आहे. १९१५ सालच्या हरिद्वार येथील कुंभमेळ्यातही मी गेलो होतो. दक्षिण आफ्रिकेतून परतलेल्या माझ्या सहकाऱ्यांसह मला तिथे भारत सेवक समाजाच्या छावण्यांमध्ये सेवा करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले होते. तिथे माझी आणि माझ्या सहकाऱ्यांची अतिशय प्रेमाने काळजी घेण्यात आली. याशिवाय त्याबद्दल अधिक काहीही माझ्याजवळ सांगण्यासारखे नाही. शिबिरात राहण्याची पद्धत पाहून आपल्या लोकांve कोणताही आनंद होऊ शकत नाही. आपल्यामध्ये सामाजिक आरोग्याची भावना नाही. परिणामी छावण्यांमध्ये घाण आणि कचरा गोळा होतो. त्यामुळे संसर्गजन्य व साथीचे रोग पसरण्याची भीती असते. आपले संडास वर्णन करण्याच्या लायकीचे नसतात. लोकांना वाटते की आपण कुठेही मलमूत्रविसर्जन करू शकतो. इथपर्यंत की ते पवित्र नद्यांच्या काठांचीही पर्वा करत नाहीत. शेजाऱ्यापाजाऱ्यांची किंचितही फिकीर न करता कुठेही थुंकण्याचा आपला हक्क जवळपास मान्य करण्यात आला आहे. आपली स्वयंपाकाची व्यवस्थासुद्धा याहून फारशी चांगली नाही. कुठेही गेलो तरी माशा आपले स्वागत करण्याकरिता सज्ज असतात. क्षणापूर्वी त्या कोणत्याही प्रकारच्या घाणीवर बसलेल्या असू शकतात व यामुळे त्या सांसर्गिक रोगजंतूंच्या चांगल्या वाहक असतात ही गोष्ट आपण विसरतो. राहण्याच्या

व्यवस्थेची नीट योजना आखण्यात आलेली नसते. हे अतिशयोक्त चित्र नाही. आणि या छावण्यांमध्ये जो गोंगाट सहन करावा लागतो तोही दुर्लक्षिण्यासारखा नसतो.

व्यवस्था, योजना आणि संपूर्ण स्वच्छता याबाबतीत मी सैनिकी छावण्यांना आदर्श मानतो. मला सैन्याची आवश्यकता कधीही वाटली नाही. परंतु माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की त्यातून काहीही चांगले बाहेर पडत नाही. त्यातून आपल्याला अनुशासन, सामूहिक जीवन, साफसफाई आणि प्रत्येक उपयोगी कामाला स्थान असेल अशा प्रकारे वेळेचे नियोजन करण्यात आलेले असते. अशा छावण्यांमध्ये मुळीच आवाज नसतो. ताडपत्र्यांखाली ते शहर वसवलेले असते व काही तासात ते उभारण्यात आलेले असते. आपल्या निर्वासित छावण्या त्या आदर्शापर्यंत पोहोचाव्या असे मला वाटते. मग पाऊस येवो अथवा न येवो तिथे गैरसोय होणार नाही.

जर या छावण्यांमध्ये तंबू लावण्यापासून सर्व काम लोकांनी स्वतः केले, त्यांनी जर स्वतः संडास साफ केले, झाडझूड केली, रस्ते तयार केले, नाल्या खोदल्या, स्वयंपाक केला, कपडे धुतले तर छावण्यांवरील खर्च अगदी कमी होईल. छावणीत वा शिबिरात राहणारांनी कोणतेही काम कमी प्रतीचे समजू नये. छावणीशी संबंधित कोणतेही काम सारख्याच प्रतिष्ठेचे असते. हे काम कंटाळवाणेपणाने नाही तर जबाबदारीचे भान ठेवून सुज्ञ मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली त्वरित कृती करून केले जाते.

कांबळी आणि दुलया येणे सुरू आहे. येत्या हिवाळ्यात थंडीपासून संरक्षण करण्याकरिता आमच्याजवळ पुरेसे साहित्य आहे असे थोड्याच दिवसात म्हणता येईल अशी मला आशा आहे.

'हरिजन', ऑक्टोबर २६, १९४७

----------------

# १०९. विजया म. पंचोली

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १४, १९४७

चि. विजया,

मला तुझे पत्र मिळाले. धगधगत्या आगीवर एक बादली पाणी ओतायचीसुद्धा आपल्यामध्ये शक्ती नसेल तर आपण १२५ वर्षे जगण्याची आकांक्षा कशी ठेवू शकतो? माझ्याकरिता ही गोष्ट पुरेशी स्पष्ट आहे. तू का घाबरतेस? देव तारी त्याला कोण मारी.

तुम्ही सर्व चांगले असाल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

चि. विजयाबेन,

ग्राम दक्षिणामूर्ती, अंबाला

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ४६४४. सौजन्य - विजया म. पंचोली

--------------------

# ११०. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर, १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आजसुद्धा अनेक कांबळी आली. इथे आर्य कन्या विद्यालय नावाची एक संस्था आहे. त्या संस्थेतून दोन शिक्षक आणि काही विद्यार्थींनी आल्या होत्या. कांबळे विकत घेण्याकरिता त्यांनी पैसे गोळा केले होते. त्या बिचाऱ्या किती पैसा गोळा करू शकतील? थोडी कांबळी आणली होती. परंतु त्यांनी एक मोठी गोष्ट मला सुचवली. मला ती चांगली वाटली. आणि जेव्हा त्या उपवासाचे व्रत घेण्यासंबंधी बोलू लागल्या तेव्हा मला आनंद झाला. मी त्यांना सांगितले की प्रत्येक चांद्रमासात दोन पक्ष असतात. शुक्ल पक्ष आणि वद्य पक्ष. जर तुम्ही प्रत्येक पंधरवाड्यात एक दिवस ठरवला व त्या दिवशी उपवास केला तर बाहेरून आपल्याला जे अन्न मागवावे लागते तितके सर्व अन्न आपण वाचवू. बाहेरून अन्न आणण्याकरिता पैसा खर्च करणे ही मला फार मोठी चूक वाटते. अशा प्रकारचे उपवास करून आपण अशी चूक करण्यापासून वाचतो. माझी सूचना ऐकल्यानंतर विद्यालयाच्या शिक्षकांनी मुलींशी विचारविनिमय केला. त्यांनी कोणावरही बळजबरी केली नाही. त्यांनी दर गुरुवारी उपवास करायचा ठरवले व त्यापासून जो काही पैसा वाचेल तो दान देण्याचा निर्णय घेतला. जे काही त्या वाचवू शकणार होत्या त्याचे पैसे देण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. आमच्याजवळ जी थोडीशी जमीन आहे तिच्यावर आम्ही काही धान्य पिकवण्याचा प्रयत्न करू असेही त्या म्हणाल्या. त्यांनी स्वतःवर दोन जबाबदाऱ्या घेतल्या - कमी खायचे आणि अधिक पिकवायचे. त्यांनी आणलेल्या कांबळ्यांपेक्षाही ही गोष्ट मला जास्त आवडली. त्यांच्यानंतर इराणचे राजदूत आणि त्यांची पत्नी हे दोघे आले. ते थोडा वेळ बसले परंतु त्यांनी कांबळ्यांचा मोठा गठ्ठा ठेवला. शक्य असल्यास मी ती कांबळी वाटावी अशी

त्यांची इच्छा होती. मी त्यांना सांगितले की मी भिकारी आहे आणि जे काही मिळते ते मी स्वीकारतो आणि ते गरजूंना देतो.

अनेक शीख सद्गृहस्थ माझ्याकडे आले. ते दोन वा तीन गटात आले. मी त्यांच्याशी अनेक गोष्टींबद्दल चर्चा केली. त्यांच्याशी कशाबद्दल चर्चा झाली हे तुम्हांला सांगत बसण्यात काहीही अर्थ नाही. त्यात लपवण्यासारखे काहीही नाही. चर्चेचा जो सार मी काढला तो असा होता की अशा प्रकारे परस्परातील भांडणांनी आपण काहीही साध्य करू शकणार नाही हे त्यांनी आणि इतर सर्वांनी समजून घ्यावे. न्याय देणे, शिक्षा देणे, बदला घेणे इत्यादी कामे करायची असतील तर ती सरकारने करावी.आपल्याला जे काही करायचे असेल ते सरकारच्या माध्यमातून करावे. मला वाटते त्या सर्वांना माझा हा युक्तिवाद पटला. बाकीची चर्चा मी सोडून देईन.

त्यानंतर मी दुसरी गोष्ट ऐकली. काही लोकांना अटक झाली होती. आपले स्वतःचे सरकार आहे आणि त्याला जर काही लोकांना अटक करायची असेल तर ते तसे करण्याकरिता स्वतंत्र आहे. अनेकदा निरपराध लोकांना अटक होते. आपल्या सरकारने जाणूनबुजून निरपराध लोकांना अटक करण्याची चूक करू नये. याचबरोबर वाटेल त्याला अटक करण्याची चूकही सरकारने करायला नको. परंतु आपण जरी काहीही करत असलो तरी अखेरीस माणूस हा माणूस असतो. त्याच्याकडून चूक होतच असते. तो देवदूत नाही. आणि तो ईश्वर तर नाहीच नाही. यामुळे त्याच्याकडून चूक होणे अपरिहार्य आहे. जर चुकून काही निरपराध लोकांना अटक झाली तर तेवढ्याकरिता आंदोलन छेडण्याची काय आवश्यकता? परंतु मी असे ऐकले आहे की काही निरपराध लोकांना अटक केली जाण्याच्या विरोधात आंदोलन सुरू आहे. हे लोक अपराधी आहेत की नाही हे ठरवणे सरकारचे काम आहे. अटक करण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीच्या निरपराधित्वाबद्दलचे काही पुरावे सरकारसमोर ठेवले तर ती गोष्ट मी समजू शकतो. परंतु सरकारला अशा प्रकारे

त्रास देणे, आंदोलन करून एखाद्या व्यक्तीची सुटका करून घेणे हे काही योग्य वर्तन असू शकत नाही. आपण जेव्हा ब्रिटिश साम्राज्यशाहीशी झगडलो व तुरुंगात गेलो तेव्हा काही कैदी निरपराध आहेत व त्यांना सोडा अशी मागणी आम्ही करत होतो. हे अगदी खरे आहे. परंतु सरकारच्या नजरेत ते अपराधी होते, आमच्या नाही. आपच्या पुढाऱ्यांना अटक केली म्हणून त्या दिवसांत आम्ही ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन करत होतो. परंतु आता आपण कोणाच्या विरोधात आंदोलन करायचे? आपले सरकार अखेरीस पंचायत राज आहे. पुढारी पंचायतीचे प्रतिनिधित्व करतात. आपणच त्यांना पुढारी केले आहे. यामुळेच मी सांगतो की आंदोलन करून सरकारच्या कामात अडथळा आणण्याची ही वेळ नाही. पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे आपले सरकार आहे. या सरकारमागे अशी सैनिकी शक्ती नाही की जी ब्रिटिश हिंदुस्थानात असताना वापरत होते. ब्रिटिशांच्या आदेशानुसार वागणारे संपूर्ण नौदल होते. हे नौदल अजेय आहे, अतुलनीय आहे असे सांगण्यात येत असे. आज त्या नौदलाबद्दल असा दावा करता येऊ शकत नाही ही गोष्ट वेगळी. ते काहीही असले तरी त्यांच्याजवळ सर्व काही होते. त्याच्या बळावर ते आपल्यावर राज्य करत होते. आता आपणच आपले शासक आहो. आपल्यावर इतर कोणीही राज्य करत नाही आणि जे आपल्यावर राज्य करत आहेत त्यांना आपणच निवडून दिलेले आहे व त्यांना आपण काढून टाकू शकतो. यामुळे माझे म्हणणे आहे की आपण हे आंदोलनाचे धोरण अवलंबू नये.

एक चौथी गोष्ट तुम्हांला सांगण्याची मला इच्छा आहे. भारतात संपूर्ण शांतता कशी प्रस्थापित करता येऊ शकते हे तर मी तुम्हांला किती तरी वेळा सांगितले आहे. हा कठीण प्रश्न आहे. आज दिल्लीत काहीही गडबड सुरू नाही हे पाहूनही मी खुष होत नाही. कुठे एखाद्या माणसाला मारून टाकले असे चालतही असेल परंतु आधी ज्याप्रमाणे सतत सुरू असायचे तसे आता नाही. ही चांगली गोष्ट आहे. यामुळे सरकार खुष होऊ शकते परंतु मी होऊ शकत नाही. कारण मी सरकार चालवण्याकरिता आलेलो नाही. योगायोगाने इथे

राहिलो आहे. दोघांच्या मनांत जी फूट पडली आहे ती सांधायची आहे व या कामात मदत होऊ शकेल या आशेने मी तर इथे राहिलो होतो. हे समुदाय मागेही भांडत होते. परंतु एकदा भांडण मिटले की ते एकत्र यायचे. परंतु जणू काय शेकडो वर्षांचे शत्रू असल्याप्रमाणे आज आपल्या अंतःकरणात विष भरलेले आहे. हे अकल्पनीय आहे. आपण भेकड होऊ नये, मुसलमानांनी होऊ नये, शिखांनी होऊ नये आणि हिंदूनीही होऊ नये. मग आपण कोणालाही घाबरणार नाही. मुसलमानांनी शिखांना घाबरणे थांबवावे व घाबरून पळू नये. आपल्याला जर महान सैनिकीसत्ता व्हायचे असेल तर हिंदू आणि शिखांनी मुसलमानांची भीती टाकून द्यावी. यापुढे हिंदू, शीख आणि मुसलमान यांनी परस्परांना घाबरू नये. आणि आमची इच्छा असेल तर भारताला आपण अजिंक्य अशी अहिंसक सैन्यशक्ति बनवू शकतो. आपल्यासमोर दोन विकल्प आहेत आणि तिसरा कोणताही पर्याय नाही. जो मार्ग आपण अनुसरत आहो तो मुळात मार्गच नाही. तो रानटीपणाचा मार्ग आहे. या मार्गात पुढे जाण्यासारखे काहीही नाही. एकमेकांच्या आपण कसे जवळ येऊ शकू हे तुम्हाला दाखवण्याची माझी इच्छा आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट ही आहे की आज ज्याप्रमाणे हिंदू, मुसलमान आणि शीख एकमेकांना दोष देत आहेत तसा दोष देणे त्यांनी बंद करावे. त्यांनी आपापले दोष पाहावे आणि दुर्बिणीतून लहानशी गोष्ट जशी पर्वतासारखी दिसते तसे त्या दोषांकडे पाहावे. आम्ही जरी आधी चुका केलेल्या असल्या तरी हिंदू आणि शीख ज्या चुका करत आहेत त्यासमोर आमच्या चुका काहीच नाहीत असे मुसलमानांनी म्हणू नये. त्याचप्रमाणे आम्ही जरी चुका केल्या असल्या तरी मुसलमानांनी केलेल्या चुकांच्या तुलनेत आमच्या चुका काहीच नाहीत असे हिंदूंनीही म्हणू नये. चुकीला चुकीने उत्तर देण्यात इतका कोणता मोठेपणा आहे? जगात नेहमी असेच घडत राहिले आहे असे म्हणून आपण हिंदू आणि शीख जर आपले समाधान करून घेणार असू तर मी म्हणेन की हा योग्य मार्ग नाही. या मार्गाने शुद्ध विवेकबुद्धी कायम ठेवून कधीही सोबत बसू शकणार नाही.

आज गोष्टी या थरावर गेल्या आहेत की पाकिस्तान सरकार इतक्या मोठ्या संख्येत मुसलमानांना आत घेण्याकरिता तयार नाही. आणि मग यातही कुठे दगाफटका तर नाही ना अशी आपल्याला शंका येते. यात कोणता दगाफटका असू शकतो? परंतु यात दगाफटका असेल वा आपल्याला कल्पना नसलेला त्यांचा काही वाईट उद्देश असेल तरी त्यामुळे आपल्याला काय फरक पडतो? केवळ शंकेच्या आधारावर काहीही न करण्याइतके जर आपण शूरवीर नसू तर आपला विनाश होईल. परंतु ही गोष्ट आपण सोडून देऊ या. मुसलमान, हिंदू आणि शीख या सर्वांना मला इतकेच सांगायचे आहे की तुम्ही इतरांच्या दोषांचा सूचकतेनेसुद्धा उल्लेख करू नका. तुम्ही केवळ स्वतःचे दोष कबूल करा. आपण चूक केली आहे हे जर आपल्याला माहीत असेल तर आपण आपली चूक कबूल केली पाहिजे. काल मी म्हणालो होतो की एखादा हिंदू असेल तर तो आमचा शत्रूच असला पाहिजे असे मुसलमानांनी मानणे हा विषारी विचार आहे. आपण जर असे शत्रू होऊ तर परिणाम केवळ दुर्दैवीच होईल. पाकिस्तान तर अस्तित्वात आला, आता त्याचे काय? आपण वेडेपणाला वाट करून देऊ नये. कालपर्यंत आपण शत्रू होतो. आता यापुढे आपण मित्र होऊ या. आपण जेव्हा मित्र होऊ तेव्हा आपण म्हणू या की एके काळी आम्ही शत्रू होतो परंतु आता आम्ही मित्र झालो आहो आणि आमचे शत्रुत्व विसरलो आहो. हिंदू, शीख आणि देशात राहणाऱ्या इतर सर्वांना सरकारनेसुद्धा सांगितले पाहिजे की आमच्याकडून इतकी चूक तर झाली आहे आणि तुमच्या चुकीचा तुम्ही विचार करा. परंतु आपण एखादी चूक करावीच का? नाही करणार आम्ही चूक. अशी जर आपण दोघांनी स्पर्धा केली - एक स्पर्धा तर ती आहे की कोणी येऊन आपल्याला एक बुक्की मारली तर आपण त्याला दोन बुक्क्या मारायच्या - परंतु त्याऐवजी आपण अशी स्पर्धा केली पाहिजे की त्याने काहीही केले तरी आम्ही चांगलेच राहू आणि निरपराध राहू. स्पर्धा करू चांगुलपणात, चांगले होण्यात. तेव्हा मी म्हणेन की आमच्याकरिता सर्व ठीकठाक आहे.

मग मी आरामात दिल्ली सोडू शकतो. माझ्या नशिबात दिल्लीतच पडून राहणे आणि मरणे असेल तर मी मरेनही. ते कसे करावे हे मला माहीत आहे. दुसरे काही मी शिकलोच नाही. नाही तरी एक ना एक दिवस आपल्याला मरायचेच आहे. आपण जर इतर काही करू शकत नसू तर निदान मरू तरी. परंतु आपण कोणाला मारणार नाही. मी तर सर्वांना हेच सांगत असतो की अरे इतके तर शिका. आपण करू अथवा मरू. तिसरा पर्याय नाही. आता पळ काढण्यात अर्थ नाही. आपण नशीब बदलवू शकत नाही. आमच्या मनात कोणाबद्दलही वैरभावना नाही. मनात वैरभाव बाळगणे हा काही भारतात शांतता निर्माण करण्याचा मार्ग नाही. आपण जेव्हा कोणाशीही भांडणार नाही व सर्व प्रकारची भीती टाकून देऊ तेव्हाच भारत शांततेकडे पाऊल टाकू शकेल. मुसलमान इथे राहणार असतील तर राहू द्या. ते काय आपल्याला मारून टाकतील? की मारतील? त्या सर्वांनी येथून निघून जायला पाहिजे काय? त्यांनी का जायला पाहिजे आणि कुठे जायला पाहिजे? पाकिस्तानचे लोक म्हणतात की इतक्या सगळ्या मुसलमानांना सामावून घेणे आम्हाला शक्य नाही. भारतात सर्वत्र मुसलमान पसरलेले आहेत. पाकिस्तान लहानसा देश आहे. त्यात हे सर्व मुसलमान कसे मावतील? पाकिस्तान जर म्हणत असेल की याहून जास्त मुसलमानांना आम्ही सामावून घेऊ शकत नाही तर आपण ऐकले पाहिजे. त्यात कोणता दुटप्पीपणा असू शकतो? आणि ते काहीही असले तरी त्याचा आपल्यावर कसा प्रभाव पडतो? परंतु आपण इतके तर समजून घेऊ या की आपल्याजवळ आपली भावंडेही राहत आहेत. मुसलमान जर बदमाश असतील तर त्यांना समज द्या, कायद्याप्रमाणे शिक्षा करा. कोणी जर देशद्रोह करत असेल, भारताशी प्रामाणिक नाही असे आढळत असेल तर त्याला गोळी घाला वा तुम्हांला हवे ते करा. पाच, पन्नास वा पाच करोड लोकांना गोळ्या घाला. मला त्याची फिकीर नाही. निदान मी ते समजू शकतो. परंतु जेव्हा एक माणूस येतो आणि काहीही कारण नसताना दुसऱ्याला मारतो तर आपण ते कसे सहन करू शकतो? आपण ते सहन

करू नये. आणि आपण स्वतःही असे वेड लागल्यासारखे का वागावे? आपण इतके भित्रे का झालो पाहिजे? यामुळे मी म्हणतो की दोन्ही सरकारांना जर शांतपणे आपले काम करायचे असेल तर आपण परस्परांशी चांगुलपणात स्पर्धा केली पाहिजे. त्यांच्या चुका मोठ्या आहेत असे केवळ म्हणाल्याने आपला विजय होणार नाही. परंतु आपण जर चुका केल्या असतील तर त्यावरील उपाययोजनाही आपण केली पाहिजे. जेव्हा आपण सर्व काही धुवून काढू. तेव्हा सर्व ठीक होईल. मी अजूनही बरेच बोलू शकतो परंतु आज मी जे म्हणालो तितके तुम्ही पचवले तरी पुरे आहे.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ४१६-२१

-----------------

## १११. अमृतलाल तो. नानावटी यांना पत्र

ऑक्टोबर १५, १९४७

माझा ५०,००० हजारचा अंदाज होता आणि तो जवळपास बरोबर आहे. याप्रमाणेच मी काम करीन. याकरिता मी लोकांना लिहीन व अजून जे काही आवश्यक असेल ते करीन.

मी जेव्हा लिहिले (पाहा, “अमृतलाल तो. नानावटी यांना पत्र”, सप्टेंबर २४, १९४७) की मी किती वर्ष जगेन हे मला माहीत नाही तेव्हा ती बोलण्याची केवळ शैली होती. तुला माहीत आहे की मी कुठेही जात नाही. कामाचा इतका मोठा गठ्ठा साठला आहे की लिहिण्यालासुद्धा वेळ नाही. मी इथे करण्या वा मरण्याकरिता आलो आहे आणि कामात आकंठ बुडालेलो आहे.

बडोद्याचे किसनसिंग यांच्याशी माझी आधीच चर्चा झालेली आहे. ते कबूल झाले आणि आपल्या कामाला प्राधान्य देण्याचे त्यांनी मान्य केले. याबाबतीत ते सोयीचा वा गैरसयीचा विचार करणार नाहीत. यामुळे काही अडचणी येणार असल्या तरी आपल्याला फारसा त्रास होणार नाही.

काकासाहेब आणि तू मुद्रणालय आणि वाचनालयासंबंधी विचार करा.

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी.एन. १०८१६

----------------

# ११२. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दररोज मला भेटायला अनेक लोक येत असतात. त्यांतील काही निर्वासितांकरिता कांबळी आणि पैसे माझ्याजवळ सोडून जातात. एका बाईने मला आज दोन हजार रुपयांचा चेक दिला. मुसलमानांच्या वतीनेही दोन लोक मला भेटण्याकरिता आले. त्यांनी कांबळी आणि काही पैसे गोळा केले होते. ते त्यांनी मला दिले. ते कारागीर होते. त्यांनी आपली नावेसुद्धा दिली नाही. मी त्यांना म्हणालो की तुम्ही तुमच्याच पीडित धर्मबांधवांमध्ये या गोष्टी वाटा. परंतु त्यांचे म्हणणे होते की या गोष्टी आम्हांला गांधीच्या हातीच द्यायच्या आहेत कारण पंश्चिम पंजाबमध्ये ज्या हिंदूंना आणि शिखांना दुःख आणि यातना सहन कराव्या लागल्या त्यांना देण्याकरिता या वस्तू आहेत. त्यांच्या या वृत्तीने मी भारावून गेलो. सध्याच्या वातावरणात जर थोडेसे मुसलमान वा हिंदू वा शीख असे असे काम करतील तर त्यांच्या या कामाची नोंद सुवर्णाक्षरात केली पाहिजे. ते म्हणाले की एके काळी आम्ही तुम्हांला मुसलमानांचा शत्रू समजत होतो, परंतु तुम्ही सर्वांचे मित्र असल्याची आता आमची खात्री पटली आहे. आणि मी असाच आहे वा माझा असाच दावाही आहे. याकरिता मला कोणाच्या दाखल्याची गरज नाही. या भावनेने मी केवळ पाचसात वर्षे जगलो असे नसून गत साठ वर्षे मी हेच करतो आहे.

सामान्यपणे असे म्हणतात की प्रत्येक शीख हा मुसलमानांना शत्रू समजतो आणि मुसलमान प्रत्येक शिखाला. परंतु हे पूर्णपणे चूक आहे. हे खरे आहे की ज्याप्रमाणे मोठ्या संख्येत हिंदू आणि मुसलमान अनिर्बंध झाले होते तसेच बरेच शीख अनिर्बंध झाले होते.

परंतु तेवढ्याकरिता संपूर्ण शीख समुदाय तसा होता वा सर्व मुसलमान तसेच असतात असे म्हणणे हे पूर्णपणे अन्याय्य असते. मला अशी अगणित उदाहरणे माहीत आहेत की ज्यात शीखांनी आणि हिंदूंनी मुसलमानांना वाचवलेले आहे आणि मुसलमानांनी शिखांना व हिंदूंना आपल्या स्वतःच्या घरात ठेवून वाचवले आहे. केवळ पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतातूनच नाही तर प्रत्येक ठिकाणाहून अशा घटनांची माहिती आलेली आहे. वृत्तपत्रांनी अशा गोष्टींना योग्य प्रसिद्धी दिली पाहिजे. हिंदू आणि मुसलमान परस्परांना मारत असल्याच्या बातम्या प्रकाशित करणे त्यांनी बंद करावे. यामुळे काहीही फायदा न होता हानीच होते. आजच्या जगात वृत्तपत्र ही महान शक्ती झाली आहे. त्यांनी जर अशा प्रकारे निवड केली तर ती फार मोठी सेवा होईल.

मुसलमानांच्या एकूण लोकसंख्येपैकी संयुक्त प्रांतात एकचतुर्थांश मुसलमान राहतात. ते उर्दू बोलतात. त्यांनी तिथे राहावे असे आपल्याला वाटत असेल तर देवनागरी लिपी त्यांच्यावर लादण्यात येऊ नये. मालवीयजींनीसुद्धा हिंदीच्या हिताकरिता भरपूर काम केले होते. परंतु उर्दू भाषा संपवली पाहिजे असे ते म्हणत असल्याचे मी कधीच ऐकले नाही. आज संयुक्त प्रांतात जे सत्तेवर आहेत ते मोठे लोक आहेत आणि चांगले कार्यकर्ते आहेत. मुसलमानांना ते सोबत ठेवतात. परंतु एकीकडे मुसलमानांनी येथून जाऊ नये असे जर आपण म्हणत असू आणि दुसरीकडे जर आपण त्यांना अपमानित करू व त्यांना गुलामाप्रमाणे वागवू तर त्यांना स्वतःहोऊन येथून जाणे भाग पडेल. आपल्याला इतरांची उपस्थितीही सहन होऊ नये इतके आपण आपल्या बहुसंख्यत्वामुळे उद्धट झालो पाहिजे काय? आपण असे वर्तन कधीही करू नये. प्रत्येकाने हिंदी आणि उर्दू लिपी शिकायला पाहिजे. मुसलमानांना जर स्वतःहोऊन पाकिस्तानमध्ये जायचे असेल तर त्यांना तसे करू द्या. परंतु आपण आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. अखेरीस मुसलमानांचा संपूर्ण संयुक्त प्रांतावर ठसा उमटलेला आहे आणि आग्रा, लखनौ, देवबंद, आझमगढ आणि इतर

ठिकाणी मुसलमानांनी उभारलेली सुंदर स्थापत्ये आहेत. त्या ठिकाणी अनेक राष्ट्रावादी मुसलमान आहेत. याशिवाय तिथे अनेक असे हिंदू आहेत की ज्यांना केवळ उर्दू येते. तेज बहाद्दूर सप्रू उर्दू भाषेचे विद्वान आहेत. देवनागरी लिपीत लिहा अशी बळजबरी आपण त्यांच्यावर केली पाहिजे काय? त्यांना उर्दू विसरा असे सांगितले पाहिजे काय? आपण स्वतःच आपले हात कापणार आहो काय? आपण जर असे काही करू तर आपल्या अत्याचाराची परिसीमा होईल. अशा प्रकारे हिंदू धर्माचे आपण रक्षण करू शकत नाही याबद्दल मला किंचितही शंका नाही. आपण पाकिस्तानच्या उदाहरणाचे अनुकरण करू नये. यामुळे संयुक्त प्रांताच्या सरकारला, जरी ते माझ्या हातात नसले तरी अतिशय प्रेमपूर्वक आवाहन करतो की त्यांनी आपले परिपत्रक परत घ्यावे.

(संयुक्त प्रांताची अधिकृत भाषा देवनागरी लिपीतील हिंदी असावी असे ठरवले असल्याचे वृत्त वर्तमानपत्रांमध्ये आले होते.)

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ४२२-२४

-------------

# ११३. अकर्मात कर्म

(याचे मूळ नोंदी या शीर्षकाखाली 'हरिजन सेवक'मध्ये ऑक्टोबर २६, १९४७ला प्रकाशित झाले होते.)

एक पत्रलेखक लिहितो -

**तुमच्या "माझे कर्तव्य" (मूळ स्रोतात अकर्मात कर्म आहे जी स्पष्टपणे चूक आहे.) या लेखात तुम्ही म्हणता की तुम्ही त्या अवस्थेत पोहोचलेला नाही. हे वाक्य साधे दिसते परंतु त्याचा थोडा अधिक सविस्तर अर्थ स्पष्ट करावा अशी माझी विनंती आहे.**

जीवनात अशी एक अवस्था येत असते की जेव्हा माणसाला आपले विचार व्यक्त करण्याचीसुद्धा आवश्यकता राहत नाही, मग ते बाह्य कृतीतून दाखवण्याची गोष्ट तर दूरच, त्याचे केवळ विचारच कृती करत असतात. त्यांच्यामध्ये ती शक्ती येते. असे झाले की वरवरच्या त्याच्या अकर्मातही कर्म आहे असे म्हणता येते. मी त्या अवस्थेत नाही हे मी कबूल केले पाहिजे. माझी धडपड त्या दृष्टीने सुरू आहे इतकेच मी त्यासंबंधी म्हणू शकतो.

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १६, १९४७

'हरिजन', ऑक्टोबर २६, १९४७

----------------

# ११४. अमतुस्सलाम यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १६, १९४७

प्रिय बेटी अमतुल सलाम.

तू आभाला पाठवलेले पत्र मी वाचले. असे समज की सतीश बाबूंना (सतीश चंद्र दास गुप्ता, त्यांच्या हाताखाली अमतुल सलाम काम करत होत्या) खुष करणे तुझे कर्तव्य आहे. मला तुझ्या भावांकरिता जे काही करता येणे शक्य होते ते सर्व मी केले. बारी खान इथे आहे. मी त्याला तुला लिहिण्याकरिता सांगितले आहे. सर्व सुरक्षित आहेत परंतु त्यांना नेहमीकरता पतियाळा सोडावा लागेल!

तिथे शांतपणे राहा आणि तुझे काम कर. मला लिहिण्यात संकोच करू नकोस.

आभा अशक्त आहे यात काही संशय नाही. मला काय करता येऊ शकते ते मी पाहीन.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५८९.

-----------------

# ११५. सुंदरलाल यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १६, १९४७

चि. सुंदरलाल,

मला तुमची दोन पत्रे मिळाली. तुम्ही केलेले वर्णन (सुंदरलाल यांनी पाकिस्तानचा दौरा केला होता व आपल्या अनुभवाचा संक्षिप्त अहवाल त्यांनी पाठवला होता.) दुसऱ्यांशी जुळत नाही.

मिर्झा साहेबांचे (पाकिस्तान विधानसभेचे अध्यक्ष) वक्तव्य मी बारकाईने वाचले. काल मी ते जवाहरलालला वाचण्याकरिता दिले. त्यांनी ते वाचण्याकरिता स्वतःबरोबर नेले. मिर्झा साहेबांना सांगा की मला त्यांच्या तारा मिळाल्या व जे करता येणे शक्य होते ते केले. परंतु मी काय करू शकतो? दोन्ही बाजूची वक्तव्ये अशी आहेत की मला गप्प बसावे लागते. मला फार कमी अधिकार आहे हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. सरकार माझ्या हातात नाही आणि सरकारच्या कामात हस्तक्षेप करण्याची माझी इच्छा नाही. आणि मी तसे करूही शकत नाही. माझ्या सीमा मला कळतात.

आशीर्वाद,

बापू

श्री पंडित सुंदरलालजी द्वारा लाला अचिंतराम,

ब्रॅडलॉ हॉल

हिंदी प्रतीवरून. सी.डब्ल्यू. १०२६६. सौजन्य पुरुषोत्तम प्रसाद

--------------------

## ११६. आनंद आणि गंगी हिंगोराणी यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १६, १९४७

चि. आनंद आणि गंगी,

मला तुमचे पत्र मिळाले. सिंधची परिस्थिती निराशाजनक आहे. वडिलांच्या अवस्थेचे मला दुःख होते. काय करावे हे मला काहीच कळत नाही. तुम्हा दोघाना जे कर्तव्य वाटत असेल ते करा. तुम्हांला जर माझा मुद्दा कळला असेल आणि पटला असेल तर तुम्ही अमेरिकेत कशाला जायला पाहिजे? परंतु ऐकू येत नसल्यामुळे तुला सदैव निराशा वाटत असेल तर जगातील कोणत्याही ठिकाणी जा आणि दुरुस्त हो.

आशीर्वाद,

बापू

हिंदी मायक्रोफिल्मवरून. राष्ट्रीय अभिलेखागार आणि आनंद तो. हिंगोराणी

---------------

# ११७. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

म्हैसूरबद्दल बोलण्याचे आतापर्यंत मी विसरूनच जात होतो. तिथे काय घडले याची तुम्हांला कल्पना असेलच. सर रामस्वामी मुदलीयार हे म्हैसूरचे दिवाण आहेत. म्हैसूर भारतीय संघराज्यात दाखल झाला आहे. त्या संस्थानातील लोक चांगले शिकलेले आहेत. त्यांनी अनेकदा सत्याग्रहात भाग घेतला आहे. या वेळीसुद्धा काही लोकांनी सत्याग्रह केला. त्यांना प्रशासनात पुरेसा सहभाग हवा होता. राजा राहील आणि लोक राजाशी निष्ठावंत राहतील. परंतु राजाने प्रशासनापासून वेगळे राहावे असे त्यांचे म्हणणे आहे. असे आधीच घडायला पाहिजे होते, परंतु घडले नव्हते. यामुळे सत्याग्रह. काळजी करण्याचे काहीही कारण नाही असे त्यांनी मला कळवले होते. त्यांनी मला सांगितले की भरपूर विचार केल्यानंतर आम्ही सत्याग्रहाचा निर्णय घेतला आहे आणि आम्ही सत्याग्रहाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करू. आपल्या उद्दिष्टाच्या सिद्धीकरिता कितीही हालअपेष्टा सहन करण्याची त्यांची तयारी होती. परंतु दिवाण, सर रामस्वामी मुदलीयार, फार मोठे माणूस आहेत. त्यांनी जगभर प्रवास केलेला आहे. लोकांशी फार दिवस दुर्व्यवहार करता येत नाही हे त्यांच्या लक्षात आले. अशा प्रकारे किती दिवस चालणार होते? परिणाम हा झाला की ज्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते त्या सर्वांना मुक्त करण्यात आले आणि म्हैसूर संस्थान आणि तेथील जनता यांनी हा प्रश्न सोडवला. जनतेच्या सर्व न्याय्य मागण्या संस्थानाने मान्य केल्या. संस्थानिक, दिवाण आणि जनता या सर्वांचे या तडजोडीकरिता अभिनंदन केले पाहिजे. संस्थानिकाने जनतेच्या संमतीने राज्य करण्याचे मान्य केले आहे. असे इतरही अनेक संस्थानिक आहेत. त्यांनीसुद्धा हे उदाहरण गिरवावे आणि इंग्लंडच्या राजाप्रमाणे

जनतेच्या संमतीने राज्य चालवावे. त्यांनी जर जनतेची इच्छा शिरोधार्य मानली आणि कधीही सीमोल्लंघन केले नाही तर किती चांगले होईल !

मला तुम्हांला दुसरी गोष्ट सागायची आहे. मी जिथे राहतो ती जागा बिर्ला बंधूंची आहे. ते प्रत्येकाला आत येऊ देतात. आपण त्यांच्या या सौजन्यपूर्ण वागणुकीचे कौतुक केले पाहिजे. अनेकदा लाखो लोक प्रार्थनासभेला येत असतात. परंतु इथे सभा लहान होत असतात. खरे म्हणजे इतक्या लोकांचीसुद्धा मी अपेक्षा करत नसतो. या प्रार्थनासभांना उपस्थित राहणारांमध्ये पंजाबमधून आलेल्या लोकांचासुद्धा सहभाग आहे. काही लोकांनी आजूबाजूच्या झाडाची फळे तोडली हे ऐकून मला फार दुःख झाले. झाडाच्या एकाही फळाला कोणीसुद्धा स्पर्श करू नये. केवळ फळाबद्दल काय बोलायचे, पानालासुद्धा स्पर्श करू नये. अशा प्रकारे फळे तोडलेली माळ्याला मुळीच आवडणार नाही. फळे केव्हा तोडायची याचीसुद्धा वेळ असते. त्या वेळेआधी फळे तोडू नये. इथे जे लोक येतात ते भक्तीकरिता येतात. निदान प्रार्थना सभेच्या वेळी तरी आपली अंतःकरणे शुद्ध असली पाहिजे. त्या काळात आपण ईश्वराशिवाय अजून कशाचाही विचार करायला नको. मग आपण चोरी कशी करू शकतो? शक्य आहे की आपण सर्व कठीण काळातून जात असू. परंतु आपण आपल्या चांगल्या सवयी टाकून देऊ नये.

मला अजून एक तक्रार मिळाली आहे. मला पाहण्याकरिता दिवसभर लोक येत असतात. त्यांच्यापैकी काही लोक म्हणतात की सरकारी अधिकारी, पोलीस आणि सैन्य यांची स्तुती करून मी त्यांना कार्यक्षमतेचे प्रशस्तीपत्र दिले आहे. मी असे काहीही म्हणालो नाही. आणि मी जरी असे काही म्हणालो असेन तर ती माझी चूक असेल वा त्यावेळी मी पुरेसा सावध नसेन. परंतु मी तसे मुळीच म्हणालो नाही. त्यांनी कसे असावे इतकेच मी सांगितले होते. ते तसे आहेत असे मी म्हणालो नव्हतो. माणसात असे आणि असे गुण असले पाहिजे असे म्हणणे वेगळे आणि त्याच्यात असे गुण आहेत असे म्हणणे वेगळे. ते

काहीही असले तरी मी त्यांच्यातील कोणालाही ओळखत नसल्यामुळे मी त्यांना असे प्रशस्तीपत्र कसे देऊ शकतो? ते सर्व कायद्याप्रमाणे वागत आहेत हे मला कसे कळू शकेल? पोलीस आणि सैन्याला काही अधिकार देण्यात आलेले असल्यामुळे त्यांच्या सूचनांचे पालन करणे आपले कर्तव्य आहे.

आपल्याला जर पंचायत राज पाहिजे असे वाटत असेल तर आपण त्याच्या आदेशाचे पालन केले पाहिजे. पंचायत राजचे अजून सर्व लाभ आपल्याला मिळायचे आहेत. आपण जर खरोखर अहिंसक असतो तर असे काही घडले नसते. असे असूनही ब्रिटिशांचे राज्य संपले. महाराज्यपाल, ते जरी ब्रिटिश असले, नौदलात उच्चाधिकारी असले व राजघराण्याशी संबंधित असले तरी ते इथे आपले नोकर म्हणून राहिलेले आहेत. त्यांना आपल्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणे वागावे लागेल. ते आपले मालक नाहीत. उलट आपणच त्यांचे मालक आहो. अशा प्रकारे आपले लोकशाही सरकार आहे आणि त्याने केलेल्या कायद्यांचे आपण पालन केले पाहिजे. कोणाची जर सरकारी अधिकाऱ्याच्या विरोधात तक्रार असेल तर सरकारकडे जाणे वा वृत्तपत्रांमधून आपली तक्रार प्रकाशित करणे हा त्यावरील उपाय आहे. एखाद्या अधिकाऱ्याने जर लाच घेतली असेल वा तो अकार्यक्षम असेल तर त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली पाहिजे. जर एखादा अधिकारी लाच घेत असेल तर तो स्वतःविरुद्ध आणि देशाविरुद्धही अपराध करतो. काही सैनिकी अधिकारी रेल्वे स्टेशनवर लोकांना फटके मारत असताना इतक्यातच आढळले होते. कोणत्याही अधिकाऱ्याला कोणालाही फटके मारण्याचा अधिकार नाही. परंतु त्याचा बदला म्हणून आपणसुद्धा फटके मारू लागलो तर आपण तोच अपराध करतो. स्वातंत्र्याआधी सरकारी अधिकारी आपल्या मालकाप्रमाणे वागत होते, सेवकाप्रमाणे नाही. त्यांची निष्ठा ब्रिटिश सरकारकडे होती, आणि त्या काळात जर त्यांनी लाच घेतली तर

तो ब्रिटिश सरकारच्या विरोधातील अपराध होत असे. परंतु आता जर अधिकारी लाच घेत असतील तर ते भारताविरुद्ध अपराध करतात. यात किती तरी अंतर आहे.

नोआखालीचे काही लोकसुद्धा माझ्याकडे आले. अखेरीस पूर्व पाकिस्तान काही लहान देश नाही. पूर्व पाकिस्तानमध्ये ढाका आणि त्रिपुरासारखी ठिकाणे आहेत. ते लोक सांगत होते की पूर्व पाकिस्तानमधील हिंदू पळ काढत आहेत. त्यांना तिथे काही अत्याचार होण्याची भीती वाटते. त्या बंगाली मित्रांनी मला काही तरी सांगण्याची विनंती केली. मी आतापर्यंत जे सांगत आलो तेच मी सांगू शकतो. अशा पद्धतीने कोणीही आपला देश वा घर सोडू नये. शूर माणसाकरिता भिण्यासारखे काहीही नसते. ते जर कुणाला घाबरतच असतील तर केवळ ईश्वराला. घाबरगुंडी उडून त्यांनी पळू नये. त्यांच्यात मरण्याचे धैर्य असले पाहिजे. त्यांनी पाकिस्तान सरकारला सांगितले पाहिजे की आम्ही पाकिस्तानशी प्रामाणिक राहू आणि तिथेच राहिले पाहिजे. आम्ही प्रतारणा करणार नाही आणि पाकिस्तानच्या मुळांना धक्का लावणार नाही अशा प्रकारे त्यांनी आश्वस्त करायला पाहिजे. त्यांनी सांगायला पाहिजे की सरकार आम्हांला मारू शकते परंतु आम्ही आमच्या मुलींचे अपहरण होऊ देणार नाही. सरकार जर त्यांना रामनाम घेण्याकरिता बंदी करत असेल तर त्यांनी ते नाव घेण्याचा आग्रह धरला पाहिजे. दसऱ्याच्या दिवशी वाद्य वाजवू नये असे ते सरकार सांगत असेल तर त्यांनी त्याकरिता आग्रह धरला पाहिजे आणि हा आमच्या धर्माचा भाग आहे असे समजावून सांगितले पाहिजे. परंतु आपला जीव वाचवण्याकरिता प्रभावी लोकांनी तेथून पळून जावे वा असहाय लोकांनी तिथेच राहावे हे अगदी चूक आहे. तिथे शुद्र लोक मोठ्या संख्येत राहतात. आवश्यक शौर्य दाखवण्याची त्यांच्याकडून कशी अपेक्षा करता येईल? भरपूर पैसा असलेला मी व्यापारी असेन तर मी काय पळून जायला पाहिजे? माझा धर्म हा नाही. वकील, डॉक्टर, व्यापारी इत्यादींना जर आपली जागा सोडावी असे वाटत असेल तर गरिबांनाही सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याची त्यांनी आधी काळजी

घेतली पाहिजे. गरिबांना मागे ठेवून पळून जाणे यात माणुसकी नाही. अशा वर्तनाने हिंदूधर्म, ख्रिश्चनधर्म वा इस्लाम या कोणाचेही नाव मोठे होणार नाही. तुम्ही जिथे कुठे जाल तिथे गरिबांना तुमच्याबरोबर ठेवले पाहिजे. दुर्दैवाने आज मी पूर्व पाकिस्तानमध्ये नाही. ईश्वराने मला सर्वत्र हजर राहण्याची शक्ती दिलेली नाही. मी केवळ एक साधा मानव प्राणी आहे व असहाय आहे. परंतु मी माझा आवाज त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करू शकतो आणि तेच मी करतो आहे.

ते बंगाली मित्र मला म्हणाले की याबाबतीत काही करण्याकरिता तुम्ही डॉ. आंबेडकरांना सांगा. त्यांनी दलित समाजामध्ये भरपूर काम केले आहे. या प्रसंगी त्यांनीसुद्धा तेथील लोकांना काही सांगितले पाहिजे. माणसाने आपल्या धर्माचे मूल्य देऊन जिवंत राहणे पाप आहे हे त्यांनी सांगितले पाहिजे. आशा आहे की या शब्दांनी त्यांच्यात काही मनोबल निर्माण होईल.

सुऱ्हावर्दीसाहेबांना तिथे पाठवा अशीसुद्धा मला विनंती करण्यात आली आहे. ते तिथे गेले तर योग्यच होईल. परंतु सुऱ्हावर्दीसाहेब इथे नाहीत. ते इथे एकदोन दिवसात येतील. परंतु ख्वाजा निझामुद्दीन आधीच इथे आहेत. पाकिस्तानमध्ये एकही हिंदू अथवा मुसलमान मारला जाऊ नये असे तेसुद्धा म्हणतात. सुऱ्हावर्दीसाहेबसुद्धा त्यांना मदत करण्याकरिता तिथे जातील. ते तिथे जाणे कसे टाळू शकतील? हिंदू, मुसलमान आणि शीख यांनी एकोप्याने राहावे हे प्रत्येकाच्या हिताचे आहे. जर असे होणार नाही तर भारत आणि पाकिस्तान या दोघांचाही विनाश होईल.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ४२४-८

----------------

# ११८. सुंदरलाल यांना चिठ्ठी

[अंदाजे ऑक्टोबर १६, १९४७] (सुंदरलाल यांच्या सांगण्यानुसार ऑक्टोबर १६, १९४७ला पाठवलेल्या पत्राच्या वेळीच ही चिठ्ठी लिहिली होती.)

माझा पहिला आक्षेप भाषेसंबंधी आहे. असे दिसते की तुम्ही उर्दू विसरला. तसे असेल तर मी पत्र लिहीन. मला खात्री आहे की राजेसाहेबांना (गझनफरअली खान, पाकिस्तानच्या मदत आणि पुनर्वसन खात्याचे मंत्री) त्यांची भाषा माहीत असेल. मला आश्चर्य वाटले. का कुणास माहीत तुमचे पत्र मला पटले नाही.

माझी सर्दी त्रासदायक झाली आहे.

आता मी ते पत्र दुरुस्त करू शकत नाही. इतर गोष्टींकडेही लक्ष द्यावे लागते. यामुळे मी ते आता जरी दुरुस्त करू शकणार नाही तरी कदाचित उद्या करीन.

मूळ हिंदीवरून. सौजन्य - पुरुषोत्तम प्रसाद

-----------------

# ११९. ज्युलिअन हक्सले यांना पत्र

(गांधीजींचे हे पत्र त्या ६० उत्तरांमधील एक आहे जे यनोस्कोच्या विनंतीनुसार जगातील विचारवंतांनी आणि तत्त्वज्ञांनी पाठवले होते. या उत्तरांच्या आधारे डिसेंबर महिन्यात एक अहवाल संयुक्त राष्ट्र मानव अधिकार आयोग, जिनेवा यांना सादर करायचा होता.)

[ऑक्टोबर १७, १९४७पूर्वी]

(रुटरच्या अहवालानुसार लेक सक्सेस, ऑक्टोबर १७ या तारखेखाली संयुक्त राष्ट्र साप्ताहिक बुलेटिनमध्ये हे प्रकाशित झाले होते.)

माझ्या अशिक्षित परंतु सुज्ञ आईकडून मी शकलो की कोणत्याही योग्य आणि जपण्यासारख्या अधिकाराची प्राप्ती चांगल्या प्रकारे पार पाडलेल्या कर्तव्यातूनच होऊ शकते.

जगण्याचा अधिकारसुद्धा आपल्याला तेव्हाच मिळतो जेव्हा आपण जागतिक नागरिकाचे कर्तव्य पार पाडतो. या एका मूलभूत तत्त्वाच्या आधारे आपण कोणत्याही स्त्री पुरुषाच्या कोणत्याही कर्तव्यांची व्याख्या सहजपणे करू शकतो आणि प्रत्येक अधिकाराचा संबंध तो मिळवण्याआधीच्या कोणत्या ना कर्तव्याशी जुळवू शकतो. इतर सर्व अधिकार अनधिकृत आहेत असे सिद्ध करता येऊ शकते व त्यांच्याकरिता संघर्ष करण्याच्या पात्रतेचे ते नसतात.

हिंदुस्तान टाईम्स, ऑक्टोबर १९, १९४७

-------------------

# १२०. एक समस्या

(याचे मूळ गुजराती ऑक्टोबर २६, १९४७च्या हरिजनबंधूमध्ये प्रकाशित झाले होते.)

एक मित्र लिहितात -

**आपल्या दोन राष्ट्रांतील युद्धाच्या शक्यतेसंबंधीची विनोदातसुद्धा चर्चा न करणे योग्य होईल. परंतु यासंबंधीची चर्चा करताना या दोन राष्ट्रांत युद्ध झाले तर संघराज्यातील मुसलमानांना पाकिस्तानच्या विरोधातसुद्धा लढण्याची तयारी ठेवावी लागेल असेसुद्धा तुम्ही म्हणाला.** (पाहा, "प्रार्थना प्रवचन", सप्टेंबर १९४७ आणि 'हिंदुस्तानी' सप्टेंबर २७, १९४७.) **यावरून असा निष्कर्ष निघत नाही काय की हिंदू आणि इतर मुसलमानेतरांचेसुद्धा (पाकिस्तानमधील) आपल्या देशाबद्दल असेच कर्तव्य असेल? आता सांप्रदायिक प्रश्नावरून जर असे युद्ध झाले तर मुसलमानांना त्यांचे कर्तव्य समजावून सांगण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्यांची निष्ठा संघराज्याप्रती टिकणे अशक्य आहे आणि हीच गोष्ट पाकिस्तामधील हिंदू आणि शिखांची असेल. परंतु सांप्रदायिक प्रश्न सोडून इतर कारणाकरिता जर या दोन राष्ट्रांत युद्ध झाले तर पाकिस्तानमधील हिंदूंनी आणि संघराज्यातील मुसलमानांनी पाकिस्तानचा विरोध केला पाहिजे असे म्हणता येणार नाही.**

निःसंशयपणे हे खरे आहे की या दोन राष्ट्रातील युद्धाची चर्चा विनोदातसुद्धा करता येऊ शकत नाही. 'सुद्धा' हा प्रत्ययसुद्धा इथे योग्य नाही. कारण शक्यता जर वास्तवात बदलली तर त्याची चर्चा करणे आवश्यक होते. असे न करणे चूक होईल.

माझे ठाम मत आहे की संघराज्यातील मुसलमानांना जो नियम लागू होतो तोच नियम पाकिस्तानमधील हिंदूंना आणि मुसलमानेतरांना लागू झाला पाहिजे. मी हा दृष्टीकोन प्रार्थना प्रवचनांमध्ये आणि मित्रांजवळ मांडलेला आहे.

या मतामागे अर्थातच एक विचारसरणी आहे. निष्ठा हुकुमाप्रमाणे निर्माण करता येत नसते. परिस्थिती जर त्याकरिता योग्य नसेल तर ती निर्माण करणे अशक्य असते. मोठ्या संख्येत असे लोक आहेत की ज्यांच्यात अशी प्रकारची खरी निष्ठा असूच शकत नाही असे

वाटत असते व यामुळे ते मला हसत असतात. माझ्या मते यात हसण्यासारखे काहीही नाही. भारताचे मुसलमान पाकिस्तानच्या मुसलमानांविरुद्ध तेव्हाच लढू शकतील जेव्हा असे करणे आपले कर्तव्य आहे असे त्यांना वाटेल. याचाच अर्थ भारतात आपल्याशी न्याय्य आणि समतेचा व्यवहार होतो असे आणि पाकिस्तानमध्ये मुसलमानेतरांशी असा न्याय्य व्यवहार होत नाही असे त्यांना वाटेल. या गोष्टीची  कल्पना अशक्य आहे असे मला वाटत नाही.

याचप्रमाणे जर पाकिस्तानमधील मुसलमानेतरांना जेव्हा स्पष्टपणे जाणवेल की आपल्याला पाकिस्तानमध्ये न्याय्य वागणूक मिळते आणि आपण इथे सुरक्षितपणे राहू शकतो आणि तरीही संघराज्यातील हिंदू अल्पसंख्याकांशी दुर्व्यवहार करतात तर पाकिस्तानमधील अल्पसंख्याक स्वाभाविकपणेच संघराज्यातील बहुसंख्याकांशी लढतील. मग अल्पसंख्याकांनी आपले कर्तव्य पार पाडावे म्हणून त्यांच्याशी कोणताही युक्तिवाद करण्याची आवश्यकता पडणार नाही.

आपले दुर्दैव हे आहे की देशाचे दोन भागांत विभाजन झाले आहे व त्याकरिता धर्माचा आधार घेण्यात आला आहे. त्यामागे कदाचित आर्थिक आणि इतर कारणेही असू शकतील. परंतु त्यामुळे ही फाळणी झालेली नाही. वातावरणात जे विष पसरलेले आहे ते याच सांप्रदायिक कारणामुळे पसरलेले आहे. धर्माच्या नावावर लूटमार होते आहे, अधर्म होतो आहे. सांप्रदायिक प्रश्न उपस्थितच झाला नसता तर बरे झाले असते असे म्हणणे चांगले वाटते, परंतु वास्तव कसे बदलता येऊ शकते?

या दोन देशांत युद्ध झाले तर संघराज्यातील मुसलमान पाकिस्तानमधील मुसलमानांच्या विरोधात लढतील काय आणि हिंदू एकमेकांविरुद्ध लढतील काय असा प्रश्न वारंवार विचारला जातो. सध्या ही गोष्ट घडण्याची शक्यता कितीही कमी वाटत असली तरी या कल्पनेत अशक्यप्राय असे काहीही नाही. माझ्या मते ते निश्चित लढतील. निष्ठेच्या

वचनावर विश्वास ठेवण्यात जितका धोका आहे त्यापेक्षा त्यावर विश्वास न ठेवण्यात अधिक धोका आहे. हा प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे असा मांडता येतो - सत्य आणि न्यायाकरिता हिंदू हिंदूंशी आणि मुसलमान आपल्या धर्मबांधवांशी कधी तरी लढण्याकरिता तयार होतील काय? याचे उत्तर प्रतिप्रश्न विचारून देता येईल. इतिहासात अशी उदाहरणे नाहीत काय?

सांप्रदायिक प्रश्न वगळता इतर प्रश्नावरही दोन राज्यांत युद्ध होऊ शकते, याबद्दल इथे विचार करणे व्यर्थ आहे. हिंदुस्थानचे मुसलमान आणि पाकिस्तानचे मुसलमानेतर हे पाकिस्तानच्या विरोधाल लढतील ही गोष्ट माझ्या कल्पनेबाहेर आहे.

ही समस्या सोडवण्यात सर्वात मोठी अडचण ही आहे की दोन्ही राज्यांत सत्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. सत्य जणू काही निरर्थक आहे. अशा वादळी वातावरणातही आपल्या श्रद्धेवर अढळ असणारे काही लोक निश्चितच असतील.

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १७, १९४७

'हरिजन', ऑक्टोबर २६, १९४७

--------------

# १२१. चमन कवी यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १७, १९४७

भाई चमन कवी,

तुम्ही माझ्या मागे लागला आहा असे दिसते. तुमचे पत्र प्यारेलालकडे गेले. ते नोआखालीत आहेत. मी इकडेतिकडे फिरत असतो. यामुळे इकडेतिकडे बरेच भटकल्यानंतर तुमचे पत्र काल माझ्याजवळ पोहोचले. तुम्ही फार दूर आहा. तुम्हाला येथील परिस्थिती माहीत नाही. आश्रमापासून मी बऱ्याच काळापासून दूर आहे. प्यारेलालला नोआखालीत ठेवून मी बिहारमध्ये निघून गेलो होतो. तुम्हाला हे सर्व माहीत नाही आणि तुमच्या मनात येईल त्याप्रमाणे तुमचे अंदाज करणे सुरू आहे. प्यारेलालनी आधीच तुम्हाला लिहिले आहे. महादेवच्या मृत्यूनंतर मी कुठे होतो, प्यारेलाल कुठे होते हे तुम्हाला माहीत आहे काय? तुम्हाला माहीत आहे काय की तुरुंगातून मी कोणालाही पत्र लिहिले नव्हते? तुरुंगातून माझी सुटका झाल्यानंतर (मे ६, १९४४ला) मी काही दिवस आजारी होतो आणि थोडासा बरा झाल्याबरोबर मी परत माझ्या दौऱ्यांची सुरुवात केली होती. यामुळे मी तुमच्या काही पत्रांकडे लक्ष देऊ शकलो नसेन तर तो कोणाचाही दोष नाही. तुमच्या अगदी शेवटच्या पत्रावरून मला कळले की तुम्ही मुसलमान आहा. ते काहीही असले तरी मला तर ही आठवण क्षणकाळ राहील. अजून मी काय लिहू शकतो? लिहिण्यासारखे अजून काही हवे ना? या विषाक्त वातावरणाबद्दल मी अजून काय सांगू?

आपण सर्व प्रार्थना करू या. हे सर्व पाहण्याकरिता आपला मालक ईश्वर आहे. त्याच्या इच्छेच्या विपरीत कोणीही काहीही करू शकत नाही. आता तरी तुम्ही पोटभर हसणार नाही काय?

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

# १२२. वृत्तपत्रांना मुलाखत

(ही मुलाखत 'इंडियन ओव्हरसीज' या वृत्तपत्रात प्रकाशित झाली होती. मुलाखत गुजरातीत झाली होती.)

ऑक्टोबर १७, १९४७

(हे 'हिंदुस्तान टाईम्स', ऑक्टोबर १८, १९४७ला प्रकाशित झाले होते.)

**प्रश्न - दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना जर संयुक्त राष्ट्रसंघ न्याय देऊ शकला नाही तर त्यांनी कोणती कार्यवाही करावी असा सल्ला तुम्ही द्याल?**

उत्तर - सत्याग्रहाच्या अपयशाची मी कल्पनाही करू शकत नाही. तो कधीही अपयशी होत नाही. हा माझा दृढविश्वास आहे.

**संयुक्त राष्टसंघाला दक्षिण आफ्रिका आणि भारतीयांच्या विवादात न्याय्य तडजोड घडवून आणता आली नाही तर त्या संघटनेवर त्याचा काय परिणाम होईल?**

संयुक्त राष्ट्रसंघाला जर दक्षिण आफ्रिका आणि भारतीय यांच्या विवादात न्याय्य भूमिका घेता आली नाही तर संयुक्त राष्ट्र संघ आपली प्रतिष्ठा गमावेल. संयत्कु राष्ट्रसंघ जर न्यायावर चालेल तरच त्याची प्रगती होऊ शकेल याबद्दल मला मुळीच शंका नाही.

**आणि या अपयशाचा जगावर काय परिणाम होईल?**

जगावर काय परिणाम होईल हे कोणालाही माहीत नाही. निदान मला तरी माहीत नाही.

**जगात जर शांतता हवी असेल तर वांशिक विषमता दूर करण्यात आली पाहिजे. जे लोक या विचाराशी सहमत आहेत परंतु या विषमतेशी संघर्ष करण्याकरिता काहीही करत नाहीत त्यांच्याकरिता तुमचा काय सल्ला आहे?**

विषमता दूर केलीच पाहिजे या मताशी जे सहमत आहेत आणि तरीही तो वाईटपणा दूर करण्याकरिता जे काहीही करत नाहीत ते षंढ आहेत. अशा लोकांकरिता माझ्याजवळ

सांगण्यासारखे काहीही नाही. अखेरीस उपेक्षितांना स्वतःच आपली मुक्ती करुन घ्यावी लागेल.

**मानवी व्यवहारातून वांशिक पूर्वग्रह दूर होण्याकरिता तुम्ही कोणती उपाययोजना सुचवाल?**

ही उपाययोजना बहुतांशी भारताच्या हातात आहे. भारतात जर अंतर्गत दृष्टीने सर्व काही चांगले असेल तर बाहेरील प्रकरण सोडवण्याच्या बाबतीत तो चांगली भूमिका घेऊ शकेल.

**विदेशातील विचलित करणाऱ्या वातावरणात राहणाऱ्या आपल्या देशबांधवांकरिता तुमचा काय संदेश आहे?**

विदेशात राहणाऱ्या प्रत्येक भारतीयाच्या व्यक्तिमत्वातून भारताच्या सर्वोत्कृष्ट आत्म्याचे दर्शन घडले पाहिजे. आपले दोष आपण भारतातच गाडून टाकले पाहिजे.

'हरिजन', ऑक्टोबर २६, १९४७

-----------------

# १२३. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अजून माझा खोकला का दुरुस्त झाला नाही असे मला लोक लिहून वा प्रत्यक्ष भेटून विचारत असतात. प्रार्थनेनंतर मी थोडा जरी बोललो तरी मला खोकला सुरू होतो. मी डॉक्टर किंवा वैद्याकडून उपचार करवून घेत नाही. डॉक्टर मला सांगतात की पेनिसिलीन घेऊन जिथे खोकला तीन दिवसांत बरा होऊ शकतो तिथे मी तो तीन आठवडे राहू दिला आहे. परंतु माझ्या मताप्रमाणे रामनाम सर्वात मोठे औषध आहे. ते अचूक आहे. रामाचा बाण ज्याप्रमाणे लक्ष्याचा वेध घेतल्याशिवाय राहत नाही त्याचप्रमाणे हे औषधसुद्धा कधीही अपयशी होत नाही. परंतु माणसाने धीर धरला पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत मला याशिवाय दुसऱ्या कोणत्याही पर्यायाची कल्पना करता येत नाही आणि दिल्लीत व संपूर्ण देशात जे काही घडत आहे त्याच्या संदर्भात ईश्वर सोडून इतर कोणाचीही मदत होऊ शकत नाही. एक मानव प्राणी म्हणून मी जे काही प्रयत्न करू शकलो त्यांना अपयशच आले आहे. एक काळ असा होता की माझ्या शब्दांना बरेच वजन होते. आज त्यांचा काहीच प्रभाव पडत नाही. मी काही चूक केली आहे काय? की पूर्वी माझे शब्द जसे अगदी अंतःकरणातून बाहेर पडायचे तसे आता पडत नाहीत? परंतु मी तर अगदी अंतःकरणपूर्वकच बोलतो आणि तुम्ही ऐकतासुद्धा. परंतु काळ बदलला आहे. प्रत्येक युगाचे एक वैशिष्ट्य असते. ते तसेच असायला पाहिजे आणि तसेच आहेसुद्धा. परंतु त्याचा माझ्यावर कोणताही परिणाम होणार नाही. मी तसे घडू देणार नाही. मी तसाच आहे जसा मी नेहमी होतो. मला माहीत आहे की आता मी जे काही सांगतो आहे तेच मी आधीपासून सांगत आलो आहे. सत्य आणि अहिंसेवर जशी माझी श्रद्धा होती तशीच आताही आहे. शक्य आहे की माझी श्रद्धा अजून

सखोल झाली असेल. काळ बदलला आहे परंतु मी बदललेलो नाही. प्रार्थनेचा त्यांच्यावर परिणाम होतो जे सश्रद्ध होऊन ती ऐकतात. माणूस केवळ आपल्या स्वभावाप्रमाणे वागू शकतो, यात ढोंगीपणाला कोणतेही स्थान नसते.

आज मी जे काही करतो ते ईश्वराच्या नावावर करतो. माझी त्याच्यावर श्रद्धा आहे. किरकोळ आजाराकरिता मी त्याचे नाव का टाकून द्यावे? एक तर हा आजार गेला पाहिजे आणि नाही तर या आजारावर मी विजय मिळवला पाहिजे. माणूस मेला तर ती काय मोठी गोष्ट आहे? जन्मापासूनच प्रत्येकाचा मृत्यूही ठरलेला असतो. ईश्वराला माझ्याकडून काही करवून घ्यायचे असेल तर तो मला जिवंत ठेवील, आणि नाही तर तो मला खोकल्यानेही मारून टाकील. या मुलीने थोड्या वेळेपूर्वी गायीलेल्या भजनात म्हटले की तू कामना विसर, क्रोध विसर, मोह विसर, लोभ विसर परंतु रामनाम विसरू नकोस. तोच तुझा आधार आहे. भजन म्हणणे आणि चिंतन करणे तुझे काम आहे. परंतु अशा वेळी खोकला येतो तेव्हा डॉक्टर आणि वैद्य सांगतात की तू पेनिसिलीन घे. इथे रामनाम कुठून आले? माझी जर या लहानसहान बाबतीतही रामनामावर श्रद्धा नसेल तर मोठ्या कामात त्याच्या आधारावर मी कसा यशस्वी होईन? यात मी जर स्वतःच्या प्रयत्नाने यशस्वी झालो नाही तर माझे स्खलन होईल व मी कुचकामाचा होईन. हा साधा खोकला दूर व्हावा म्हणून मी रामनाम का विसरू?

नेहमीप्रमाणे आजही काही कांबळी आली आहेत. काही धनादेशसुद्धा आले आहेत. एक मुसलमान सद्गृहस्थ मोठ्या उत्साहात आले आणि अडीच शेर कापूस भरलेली दुलई सोडून गेले. कोणतेही पांघरूण नसलेल्या माणसाला ती द्यावी अशी त्यांची इच्छा होती. हे करण्याकरिता व्यवस्था करण्यात येत आहे. असे म्हणतात की ज्या वेगात लोक देतील अशी अपेक्षा होती त्या वेगात लोक देत नाहीत. माझ्याबद्दल सांगायचे तर लोक इतक्या जलद आणि उत्साहाने कांबळी व पैसा पाठवत असल्याबद्दल मी तर त्यांना धन्यवादच

देईन. काही लोक पैसा पाठवत आहेत कारण त्यांना इतकी स्वस्त कांबळी मिळू शकली नाही. त्यांच्यातर्फे आपण ती कांबळी स्वस्त दराने विकत घ्यावी अशी त्यांची इच्छा आहे.

अन्नसमस्येचा विचार करण्याकरिता राजेंद्र बाबूंनी समितीची सभा बोलावली आहे. समितीने कपड्यांच्या चणचणीबद्दल चर्चा केली नाही. अन्नधान्य आणि कापड यांच्यासंबंधी गत काही महिन्यांपासून जो दृष्टिकोन होता तोच आताही आहे. मी मान्य करतो की गरीब लोकांना जास्त त्रास होतो आणि त्यांना अधिकच त्रास होणार आहे. काही लोक मला लिहितात आणि जे लोक शेतकऱ्यांमध्ये काम करतात ते मला सांगतात की मी जे काही म्हणालो त्यामुळे शेतकरी फार खुष आहेत. यामुळे त्यांच्यावर लादण्यात आलेल्या कंट्रोलपासून त्यांची सुटका होईल असे त्यांना वाटते. त्यांना निदान काही संधी मिळेल. त्यांचे धान्याचे कोठार भरलेले आहेत. तेच ते संपूर्ण धान्य खाणार आहेत काय? त्यांना पैसाही मिळवायचा आहे, ते काय काळ्याबाजारात आपले धान्य विकतील? शेतकरी साधेभोळे लोक असतात. त्यांनी काळ्याबाजारात का जावे? थोडे दहावीस रुपये मिळाले तर तेवढ्यावरच ते खुष होतात. त्यांना काळ्या बाजाराच्या कारभाराशी काय करायचे आहे? यामुळे मी परत सांगतो आणि तुमच्या माध्यमातून शासनालाही सांगू इच्छितो की लोकांवर किमान इतका विश्वास तरी ठेवा. रेशनपद्धती बंद करण्याचे साहस ते का करू शकत नाहीत? त्याचे परिणाम कधीही वाईट होऊ शकत नाहीत. लोक बदमाष झाले आहेत आणि धान्य लपवून ठेवत आहेत असे आपण का गृहीत धरावे? अखेर तुम्ही स्वतःच तर सरकार आहा. परिस्थिती जास्त बिघडली तर तुम्ही परत कंट्रोल सुरू करू शकता. तुमच्यात पुरेसे धैर्य नसल्यामुळे लोकांना त्रास सहन करावा लागत असेल तर ते न्याय्य नाही.पंचायत राजच्या परंपरेप्रमाणे गोष्टी झाल्या पाहिजे.

गिरणी मालक म्हणतात की त्यांच्याजवळ कापडाच्या गाठी पडलेल्या आहेत. परंतु त्यांच्यावर नियंत्रण असल्यामुळे ते त्या कसे विकू शकतील? ते स्वतःच्या नफ्याबद्दल

बोलत नाहीत असा माझा विश्वास आहे. ते केवळ जनतेच्या हिताच्या दृष्टीने बोलत आहेत. त्यांना जर मोकळीक दिली गेली तर ते आपला साठा बाहेर काढू शकतील व कापड लोकांपर्यंत पोहोचू शकेल. लोकांजवळ धान्याचा भरपूर साठा असूनही तो ज्या गरजू लोकांपर्यंत पोहोचायला पाहिजे त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही हे किती नवल आहे? असे दिसते की या बाबतीत मुळातूनच कुठे तरी चुकत आहे. आपल्या नोकरशाहीची इच्छा आपल्या खुर्चीवर बसून काम करण्याची असते. त्यांच्यासमोर त्यांचा टेबल, लाल फीत आणि मेण (वॅक्स) या गोष्टी असतात. ते लाल फीत लावतात आणि नस्ती (फाईल) तयार करतात. ते कधी शेतकऱ्यांमध्ये राहिले आहेत काय? त्यांनी कधी शेतकऱ्याशी ओळख करून घेतली आहे काय? अतिशय आदरपूर्वक मी त्यांना सांगू इच्छितो की लोक मरून जातील असे तुम्ही का समजता. तुमच्या नियंत्रणामुळे लोक मरत आहेत हे तर आम्हाला उघड्या डोळ्यांनी दिसत आहे. बदमाशी आणि वेडेपणाचे कृत्य करणारे जे लोक आहेत ते तसे आताही करत आहेत, परंतु त्यांच्या चांगल्या गोष्टी लपतात. मी तर म्हणेन की शक्य असेल तितक्या लवकर हे दोन्ही कंट्रोल दूर करण्यात आले पाहिजे. जर काही साठा शिल्लक असेल तर लोक जागृत होतील. कापड, खाद्यपदार्थ आणि इतर गोष्टींच्या वाढत्या किंमती त्यामुळे कमी होतील. आता युद्ध सुरू नाही आणि आपल्या देशाबाहेर काहीही जात नाही, आणि तरीही किमती वाढतच आहेत. ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. आपली मान खाली होते. माझे मत आहे की सरकारने जनतेवर विश्वास ठेवला पाहिजे आणि धीर ठेवला पाहिजे. धीर धरून शक्य तितक्या लवकर कट्रोल बंद केले पाहिजे आणि याबाबतीत दिवसेंदिवस माझी खात्री वाढत चालली आहे.

आज आपण अस्वस्थ आहो. मुसलमान वा हिंदू वा शिख यांच्या हातून आपण मारले जाऊ अशी आपल्याला भीती वाटत असते. आपल्याला हेच काम असते आणि दुसरे कोणतेही काम आपल्याला सुचत नाही. शत्रुत्व तर आहेच परंतु त्याचाच विचार करत

बसल्याने आपण ते विसरणार नाही. जो ज्याचा विचार करतो तो तसाच होतो असे आपले शास्त्रसुद्धा सांगते. त्याचे विष आपल्या प्रकृतीत भिनते. त्याची झिंग आपल्या डोक्यात चढते आणि हिंदूंना वाटते की मुसलमानांना कापावे आणि मुसलमानांना वाटू लागते की हिंदूंना आणि शिखांना कापावे. आपण जर अशा प्रकारे विचार करत राहू तर हाच आपला स्वभाव बनून जाईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपली अशी अवस्था झाली पाहिजे काय? याला मी पंचायत राज कधीही म्हणू शकत नाही.

मला दक्षिण आफ्रिकेतून तार आली आहे. तारेत लिहिले आहे की तुम्ही आमच्यावर फार उपकार केले आहेत. मी कोणते उपकार केले? मला जे चांगले वाटले ते मी केले. मला काय योग्य वाटते इतकेच मी सांगितले होते (पाहा, "प्रार्थना प्रवचन", ऑक्टोबर ११, १९४७). सत्याग्रहाचे हे फार मोठे वैशिष्ट्य आहे. पंजाब जेव्हा सैनिकी शासनाखाली होता तेव्हा तिथे अत्याचाराचे राज्य सुरू झाले होते. शेकडो, हजारो लोकांना आपल्या पोटावर रांगावे लागले होते. ते पोटावर रांगले कारण त्यांना आपला जीव प्रिय होता. अमृतसरमधील त्या अरुंद गल्लीचे नाव मी विसरलो. केवळ जिवंत राहण्याकरिता ते पोटावर रांगले होते. तुम्ही रांगला नाही तर तुम्हांला मारून टाकू अशी धमकी त्यांना देण्यात आली होती. परंतु केवळ जगण्याकरिता कोणी असे का करावे? न रांगता उभे राहून "गड्यारे, जीव गेला तरी बेहत्तर पण मी कधीही पराभव पत्करणार नाही" असे ते म्हणू शकले असते. (पजाबमधील सैनिक शासनाच्या वेळी पंडित रामभुज चौधरी यांनी रचलेल्या कवितेच्या पहिल्या ओळीचा मथितार्थ.) आम्हाला मरावे लागले आणि सर्व काही गमावावे लागले तरी आम्ही कधीही पराभव पत्करणार नाही ही गोष्ट सत्याग्रहाच्या सुराशी अगदी जुळणारी आहे. यात सत्याचा समावेश आहे. चुकीचे काम केले तर त्यात असत्य येते. दक्षिण आफ्रिकेत जरी मूठभर लोक असले तरी त्यामुळे काय होते - असे करणारे करोडो लोक होऊ शकतात. ते काहीही असले तरी तिथे लाखांच्या संख्येतच लोक आहेत. केवळ काही शेकड्यातच नाही तर काही दशकांच्या संख्येतही

लोक जर पुढे आले तर ते भारताच्या प्रतिष्ठेत भर घालतील. ते मला विचारतात की तुम्ही इथल्या लोकांना पैसा पाठवण्याकरिता का सांगत नाही. यामुळे मला वेदना होतात. ते गरीब लोक नाहीत. ते तिथे आम्हाला उपकृत करण्याकरिता गेलेले नाहीत. जे लोक तिथे संघर्षाची धुरा वाहत आहेत त्यांच्याजवळ जास्त पैसा नाही आणि पैसेवाले लोक त्यांना काहीही देत नाहीत. ज्यांच्याजवळ पैसा आहे ते केवळ पैशावर प्रेम करत आहेत. त्यांना त्यांची प्रतिष्ठा आणि मानसन्मान केवळ पैशातच दिसतो. दक्षिण आफ्रिकेतील आपले लोक म्हणतात की आम्ही लढणारे लोक आहो, परंतु आमच्याजवळ पैसा नाही. परंतु पैसा नाही तर आतापर्यंत कसे चालत होते?

पूर्व आफ्रिकेल फार मोठ्या संख्येत लोक आहेत. संपूर्ण पूर्व किनारा आपल्या लोकांनी भरलेला आहे. त्यांनी पैसा पाठवावा असे मी म्हणेन. आपला भारत देश आज अतिशय गरीब झाला आहे. इथे मी कोणाला आणि कोणत्या तोंडाने पैसे पाठवण्याकरिता म्हणू? आपल्या देशात करोडपती लोक आहेत आणि ते करोडो कमावतातही. परंतु त्यांच्यावरील कराच्या ओझ्यामुळे त्यांच्याजवळसुद्धा पैसा कमी राहिला आहे. आणि आपल्या दुर्दैवाने लोक आपसात भांडत आहेत व त्यामुळेसुद्धा करोडो रुपयांचे नुकसान होत आहे. या लोकांना दक्षिण आफ्रिकेकरिता पैसा पाठवा असे मी कसे म्हणू? मी जेव्हा दक्षिण आफ्रिकेत होतो तेव्हा इथले लोक पैसा पाठवत असत, गोखले (गोपाळ कृष्ण गोखले) पैसे पाठवत असत. पंजाब आणि संपूर्ण भारताने मला काही पाच ते सात लाख रुपये पाठवले होते. आज असे काही करण्याकरिता मी लोकांना सांगू शकत नाही. मॉरिशसमध्ये अनेक भारतीय आहेत. ते तिथे कुली आहेत. तिथे हिंदू-मुसलमान समस्या नाही. मोंबासामध्येसुद्धा मोठ्या संख्येत भारतीय आहेत. ते चांगलेच श्रीमंत आहेत. ते मद्यपान वा वेश्यागमनही करत नाहीत. त्यांना केवळ आपल्या खाण्यापिण्याकरिता पैसा हवा असतो. केवळ अन्नाकरिता माणसाला किती पैसा पाहिजे? दक्षिण आफ्रिकेतील आपले लोक म्हणू

शकतात की आम्ही स्वतःकरिता नाही तर भारताकरिता लढत आहो. लोकांना अर्थातच पैसा पाठवण्यापासून मी अडवू शकत नाही, परंतु मी त्यांना तसे करण्याकरिता सांगूही शकत नाही.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४२८-३३

-----------------

# १२४. नोंदी

------------------

## खरे प्रौढ शिक्षण

चरखाजयंतीच्या निमित्ताने मला अनेक पत्रे आणि तारा मिळाल्या. त्यांतील इंदोरहून प्रोढ शिक्षासंघाकडून हिंदुस्तानीत लिहिलेल्या एका पत्राकडे माझे सर्वात जास्त लक्ष वेधले गेले. त्यात लिहिले आहे की काही भडक कार्यक्रम करून त्यात वेळ वाया घालवण्याऐवजी एक आवश्यक आणि लाभदायक कार्य करून त्यांनी जयंती सप्ताह साजरा केला. मुले आणि म्हातारे, श्रीमंत आणि गरीब, सरकारी अधिकारी आणि इतर लोक या सर्वांनी मिळून माणूस आणि पशूंना अपायकारक असलेले एक तण समूळ उपटून काढले. कोणत्याही भागातील लोक अशा प्रकारे सहकार्याने काम करू लागतील तर लहानथोरांना यातून उत्तम धडा शिकायला मिळेल व ज्या समाजात असे काम केले जाईल त्या समाजाचा चेहरामोहरा त्यामुळे बदलून जाईल.

## प्रसंगोचित अवतरण

गत सप्टेंबर महिन्यात कलकत्त्यात मी केलेल्या उपोषणाच्या दरम्यान मला जी पत्रे आणि तारा आल्या होत्या त्यांतील हे पत्र मी 'हरिजन'मध्ये प्रकाशित करण्याकरिता जपून ठेवले होते. ते प्रा. होरेस अलेक्झॅन्डरनी पाठवले होते.

"आज सकाळी कलकत्त्याहून जी बातमी आली तीने आम्हा सर्वांनाच दुःख झाले; परंतु आम्ही निराश व्हायला नको. ईश्वरावर ज्यांची निष्ठा असते त्यांच्याबाबतीत काय घडू शकते हे या पंधरा दिवसात ईश्वराने आम्हाला दाखवून दिले आहे. दानव आम्हांला वारंवार

चुकीच्या मार्गाने नेतो परंतु तुम्ही तुमच्या उपवासाच्या बळावर परत आम्हांला योग्य मार्गावर आणता. मला खालील दोन सुभाषित आठवतात -

ब्राऊनिंग म्हणतो -

"पडल्यानंतरही पुसून अश्रू हसायचे
आणि वारंवार अपयश आल्यानंतरही
प्रयत्न करत राहायचे.
हाच जीवनाचा प्रवास आहे.

आणि जुन्या करारातून -

ईश्वर माझी हत्त्या जरी करत असेल तरी
मी त्याच्यावर विश्वास ठेवीन."

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १८, १९४७

'हरिजन', ऑक्टोबर २६, १९४७

----------------------

# १२५. गोमती कि. मश्रूवाला यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १८, १९४७

तुझे पत्र. मला कळते. तुझ्या वेदना अज्ञानामुळे आहेत. तुझा उल्लेख न करता कालच्या प्रार्थना प्रवचनमध्ये (पाहा, "प्रार्थना प्रवचन", ऑक्टोबर १७, १९४७) मी (तुझ्या पत्राची) चर्चाही केली. माझा खोकला जवळपास गेला आहे. आता मला त्याचा त्रास होत नाही परंतु बोलत असताना मी थोडासा खोकलतो. अथांग पाण्यात सूर मारणाराला तसे करताना मजा वाटत असते परंतु ते पाहणाराचा मात्र जीव घाबराघुबरा होतो तसेच हे. असे काही नाही की याबद्दल मी काळजी घेत नाही, परंतु दिवसेंदिवस मी रामावर जास्त विसंबून राहू लागलो आहे. जो माणूस रामावर विसंबून असतो तो निष्काळजी असू शकत नाही. तो बाह्य उपचारांबद्दल अधिकाधिक तटस्थ होत जातो. त्यांच्या अंतःकरणात रामनाम शिरले की नाही याची परीक्षाही त्यातूनच होत जाते. तू माझी मुळीच काळजी करू नकोस. ईश्वर जर मला शक्ती आणि बुद्धी देईल तर मी इथेच करेन वा मरेन. आता तुला सर्व काही कळले असेल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून : सी. डब्ल्यू. १०७३२. सौजन्य - गोमती कि. मशरूवाला

--------------------

# १२६. देव प्रकाश नाय्यर यांना पत्र

ऑक्टोबर १८, १९४७

चि. देव,

हुनरकरिता सोबत चेक जोडला आहे. चांदच्या आजाराबद्दल (पाहा चांदराणी यांना पत्र, ऑक्टोबर २०, १९४७) मलासुद्धा पत्र आले आहे. चांद बहुधा इथे लवकरच येईल. सुशीलाने तुला लिहिलेच असेल असे मला वाटत होते. आज ती कुरुक्षेत्रला गेली. चांदबद्दल काळजी करण्याचे कारण नाही. तू सेवाग्रामला जाण्याची मला मुळीच आवश्यकता वाटत नाही. चांदची अजून बातमी मिळाल्यानंतर मी तुला लिहीन.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदी मायक्रोफिल्मवरून. सौजन्य - राष्ट्रीय अभिलेखागार भारत सरकार.

----------------

## १२७. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अजूनही कांबळी आणि धनादेश (चेक) येत आहेत परंतु समाधानकारक वेगाने नाही.

सरदार पटेल यांनी काढलेले एक वक्तव्यही मी पाहिले आहे. त्यात त्यांनीही लोकांसमोर हात पसरले आहेत. याचा अर्थ आपण जर सरकारवर विसंबून राहिलो तर कोणतेही काम होणार नाही. सरकार तोपर्यंत पोहोचू शकत नाही. बरे झाले त्यांनीही निवेदन काढले. जे लोक आज थंडी सहन करू शकत नाही त्यांच्यापर्यंत थंडीपासून बचाव करण्याकरिता काही ना काही पोहोचवता आले तर बरे होईल.

डॉ. सुशीला नाय्यरही हेच काम करत आहेत. त्या नेहमी पुराना किल्ल्यातही जातात आणि इकडेतिकडेही जातात. आज त्या कुरुक्षेत्रला गेल्या कारण तिथे नवीन शिबिर सुरू करण्यात आले आहे. तिथे सर्व लोक व्यवस्था करतच आहेत परंतु त्या मोठ्या डॉक्टर आहेत. त्यांच्याबरोबर दुसऱ्या स्त्री-डॉक्टरही गेल्या आहेत. इतर लोकही गेले आहेत. डॉ. जॉन मथाई गेले आहेत. या लोकांपर्यंत जितकी मदत पोहोचवता येईल तितके चांगले होईल.

काल मी हिंदुस्तानीबद्दल बोललो होतो. तुम्ही किती विचित्र काम करत आहा असे त्याबद्दल अनेक लोकांनी मला आज लिहून कळवले. मला वाटते की मी हिंदुस्तानी आणि संघराज्याकरिता फार चांगले काम करतो आहे. असे करून मी त्यांची सेवा करतो आहे. ते लिहितात की अखेरीस हिंदुस्तानीकडील हा कल ज्या काळात सुरू झाला तो असा काळ

होता की जेव्हा आम्ही खाली घसरणीला लागलेलो होतो, गुलामगिरीत होतो. आम्ही हे विसरतो की जे लोक आले होते ते आक्रमण करण्याकरिता आले होते परंतु ते याच देशात राहून गेले. या देशात कशा प्रकारे वास्तव्य करता येईल याचा ते विचार करू लागले. खरी गोष्ट ही आहे की उर्दूचा जन्म त्यातूनच झाला व कालांतराने तिने वेगळा आकार घेतला. त्यांनी तिच्यात खच्चून फारसी आणि अरबी शब्द भरले. इतकेच नाही तर त्यांनी तिला नवीन परिवेषही दिला. तिचे व्याकरणसुद्धा त्याच भाषांमधून आले आहे. परंतु हिंदुस्तानीची ही गोष्ट नाही. तिचे व्याकरण या मातीशी निगडित आहे. उर्दूत जे काही फारसी शब्द असतील ते किती तरी काळापासून आहेत. ते शब्द वेचून त्या भाषेतून बाहेर काढणे हे आपले काम नाही. जे लोक आक्रमक म्हणून आले होते ते इथेच राहिले व येथील सामाजिक रीतीरिवाज त्यांनी अवलंबिले. मला वाटते की आता आपण त्यांचा तिरस्कार करू लागलो तर तो आपला स्वतःचा तिरस्कार करण्यासारखे होईल. परंतु याचा उल्लेख आज मी वेगळ्या कारणाकरिता करत आहे. याबद्दल मी भरपूर लिहिले आहे. जोपर्यंत इंग्रजी भाषेचा संबंध आहे ती वेगळी भाषा आहे. ब्रिटिश येथे साम्राज्य स्थापण्याकरिता आले होते. इथे वास्तव्य करण्याचा त्यांचा विचार नव्हता. ते भारताचे होण्याकरिता कधीही आले नव्हते. इथे ते स्वतःला परकीय समजायचे आणि तसेच राहण्याची त्यांची इच्छा होती. त्यांना त्यांच्या मुलाबाळांना भारताबाहेर वाढवण्याची इच्छा होती. नंतर त्यांनीसुद्धा येथे इंग्रजी भाषा आणली. हळूहळू त्यांनी तिला विशेष आकार दिला. परंतु उर्दूच्या बाबतीत जसे घडले तसे इंग्रजीच्या बाबतीत काहीही घडले नाही. अवधी वा त्या वेळी बोलल्या जाणाऱ्या इतर भाषांपासून उर्दू अस्तित्वात आली होती. परंतु इंग्रजीच्या बाबतीत मात्र अशी गोष्ट नाही. आता भारतातील ब्रिटिशांचे राज्य संपलेले आहे. परंतु इंग्रजी भाषेचे आपल्यावर वर्चस्व गाजवणे सुरू राहिले आणि आपण आपले प्रशासन त्या भाषेशिवाय करू शकत नसू तर आपली काय अवस्था होईल? मग देशातील करोडो लोक इंग्रजी शिकू शकतील

काय? इंग्रजी आपली राष्ट्रभाषा होणार आहे काय? मी स्पष्टपणे तुम्हाला सांगतो की हे शक्य नाही. असे काही करण्याचे धाष्टर्यसुद्धा आपण करू नये. आपण असे काही करण्याचा प्रयत्न केला तर आपण आपला विनाश करून घेणे अपरिहार्य आहे.

एका बंधूंनी मला लिहिले आहे की मी चूक करतो आहे. ते म्हणतात की भारतात जे लोक काम करणारे आहेत त्या सर्वांना इंग्रजी येते. इंग्रजी लिहिणेवाचणे शिकलेले मूठभर होते व ते कोर्टकचेऱ्यात जायचे आणि तिथे इंग्रजीत काम करायचे कारण त्यांचे म्हणणे ऐकले जायचे. जो गुलामीत राहतो त्याला राजभाषा आवडू लागत असते. हे तर ठीक आहे परंतु ज्यांची मातृभाषा हिंदी अथवा हिंदुस्तानी आहे ते जर कोर्टकचेऱ्यात गेले आणि तिथे इंग्रजीत काम चालत असेल तर त्यांना त्यातील काहीच कळणार नाही. असे करणे म्हणजे आपल्या अकलेचे दिवाळे काढण्यासारखे होईल. आपला स्वार्थ कशात आहे हेसुद्धा समजून घेण्याची आपली तयारी नाही. आता इंग्रजी राज्य तर गेले, आता त्याबरोबरच इंग्रजी भाषेला जे स्थान आपण दिले, आणि खरे म्हणजे ते स्थान तिचे होऊच शकत नव्हते, त्या स्थानावरून तिला दूर व्हावे लागेल. एक बंधू मला लिहितात की तुम्ही जे काही सांगता त्याचा लोक अगदी वेगळा अर्थ लावतील. कारण सांगणाराचा हेतू लोकांना कधीच कळत नसतो.

आज आम्ही सर्व बुद्धिभ्रष्ट झाल्यासारखे झालो आहो. हिंदू मुसलमानांशी भांडतील, त्यांच्याबरोबर बसणार नाहीत, त्यांचा गळा कापतील इतकेच राहिले आहे. राजकुमारी अमृत कौर, ज्या कालपरवाच सिमल्याहून परतल्या, मला सांगत होत्या की सिमल्यात जे गरीब लोक पडलेले आहेत ते मुसलमान आहेत व त्यामुळे त्यांना हटवावे लागणार आहे. आपण इतके दुष्ट झालो आहो. तिथून त्याना हलवण्यात येत असताना त्यांना किती त्रास सहन करावा लागला ! पाकिस्तानमध्ये मोठ्या संख्येत हिंदू आहेत. त्यांचीसुद्धा हीच तक्रार आहे. अशा गोष्टी एकामागून एक सुरू आहेत.

काही लोक म्हणतात की संस्कृतप्रचूर हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे. इंग्रजी आता जाण्याच्या मार्गावर आहे आणि लोक प्रांताच्या भाषेतून आपले काम चालवतील. तिथे भांडणे होतील अशी भीती आहे आणि ती बरोबर आहे. यामुळे आपसात घृणा निर्माण होईल. इंग्रजी तर राहू शकत नाही कारण इंग्रज तर आता मूठभर शिल्लक आहेत. ते शासन तर चालवू शकत नाहीत.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४३३-३५

-------------------

## १२८. विक्रम वालजी देसाई यांना पत्र

ऑक्टोबर १९, १९४७

चि. विक्रम (वालजी गो. देसाई यांचा मुलगा),

मला तुझे पोस्टकार्ड मिळाले. तू मोठ्या अक्षरात लिहिले पाहिजे. कागदावर लिहिण्याकरिता तू काढलेल्या रेषांमधील मोकळी जागा सारखी आणि मोठी अक्षरे मावतील अशी असली पाहिजे. अक्षरे नीटनेटकी मोत्यासारखी असली पाहिजे. तुला कोणी विसरू शकतो काय?

आशीर्वाद,

बापू

चि. विक्रमादित्य द्वारा वालजी देसाई,

१४ गणेशवाडी पुणे - ४

गुजराती पोस्टकार्डवरून : सी. डब्ल्यू. ३१७३. सौजन्य - वालजी गो देसाई

--------------

# १२९. वालजी गो देसाई यांना पत्र

ऑक्टोबर १९, १९४७

चि. वालजी,

मला तुझे जितके लेख वाचणे शक्य झाले तितके मी पाठवले आहेत. तू जर इंग्रजी लेखांचे गुजरातीत भाषांतर करू शकलास तर फार चांगले होईल.

सर्वांना आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून : सी. डब्ल्यू. ३१७३. सौजन्य - वालजी गो. देसाई

----------------

# १३०. लॉर्ड आणि लेडी हेंड्स यांच्याशी चर्चा

ऑक्टोबर १९, १९४७

**लेडी हेंड्स - तुम्ही जेव्हा मौन ठेवता तेव्हा तुमच्या मनात प्रामुख्याने कोणते विचार येतात? किवा मौन पाळत असताना तुम्ही कोणता विचार करता?**

गांधीजी - मी ईश्वराचा विचार करतो.

**लेडी हेंड्स - तुम्ही ईश्वराजवळ तुमच्या देशवासीयांकरिता कोणती प्रार्थना करता?**

त्यांनी चांगले आणि सदाचारी व्हावे इतकीच. ही मनू माझी नात आहे. ही एकमेव अशी व्यक्ति आहे की जी नोआखालीच्या संपूर्ण दौऱ्यात माझ्याबरोबर होती. त्या यात्रेच्या दरम्यान तिने एक सुंदर धून शोधून काढली. अर्थातच तिने ती धून स्वतः बसवली नव्हती. ईश्वरानेच तिला ती म्हणायला लावली असे म्हणणे अधिक उचित होईल. “ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मती दे भगवान.” परंतु मी ईश्वराची प्रार्थना काही मागण्याकरिता करत नसतो. ईश्वर सर्वशक्तीमान आहे, सर्वव्यापी आहे, सर्वज्ञ आहे. तो प्रत्येकाच्या अंतःकरणात राहतो. त्याचे मार्ग अपूर्ण माणसाच्या मार्गाप्रमाणे नसतात. असे काही नाही की आपण मागतो तेव्हाच तो आपल्याला काही देतो. आपल्याला कशाची गरज आहे आणि आपल्याकरिता काय चांगले आहे हे त्यालाच जास्त चांगले माहीत असते.

आपण न मागताही आपल्याकरिता जे चांगले असेल ते तो आपल्याला देतो. तो इतका उदार आणि कृपाळू आहे की गरिबांकरिता त्याचे हृदय विरघळते. त्याला काही मागण्याची गरजच कुठे असते?

**लेडी हेंड्स - केवळ सोमवारीच नाही तर तुम्ही अनेकदा मौन पाळता. या दररोजच्या मौनामागील उद्देश काय?**

शरीराला विश्रांती देणे. सोमवारचे मौन ही अगदी वेगळी गोष्ट आहे. त्याचे आध्यात्मिक महत्त्व आहे. ज्या माणसाला मौनाची कला कळते त्याच्याकरिता ते अंतर्मुख होण्याचे साधन होते. मौनपालन हा माझ्या जीवनाचा भाग झाला आहे. त्याकरिता मला प्रयत्न करावे लागत नाहीत.

**लेडी हेंड्स - तुमचा कार्यक्रम काय आहे आणि दिल्लीत तुमचा मुक्काम कुठे असेल असे शेवटी लेडी हेंड्सनी गांधीजींना विचारले.**

गांधीजी म्हणाले - मला इथेच करायचे वा मरायचे आहे. यामुळे तोपर्यंत मी इथेच आहे. एक तर मी चिरनिद्रा घेईन आणि नाही तर इथे चिरशांती प्रस्थापित करीन. सध्या हेच माझ्यासमोरील काम आहे.

गुजरातीवरून. 'दिल्लीमां गांधीजी - १', पृष्ठ १२१-२

----------------

# १३१. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दिवस दररोज लहान होत चाललेला असल्यामुळे सहा वाजता जी प्रार्थना सुरू होते तिची सुरुवात करण्याकरिता फार उशीर होतो असे तुम्हांला वाटते. दिवस दररोज २ ते ३ मिनीटांनी लहान होतो आणि २३ डिसेंबरला तो अगदी लहान होतो. या दिवसात लवकरच अंधार पडू लागत असल्यामुळे उद्यापासून आपण सायंकाळी ५.३० वाजता प्रार्थना सुरू करत जाऊ.

तुम्ही आधीच भजन ऐकलेले आहे. (आश्रम भजनावली, भजन क्रमांक १५१) मला वाटते की या भजनातील हृदयस्पर्शी गोष्ट मी तुम्हांला सांगितली नाही. आश्रम भजनावलीत जे भजन आहेत त्यांच्यातील प्रत्येक भजनामागे एक इतिहास आहे. त्यातील सर्व भजन काही मी निवडलेले नाहीत. काही निवडक आहेत परंतु तो संपूर्ण संग्रह आश्रमात तयार करण्यात आला आहे. आश्रमात एक मोठे भक्त होते. ते संगीतशास्त्रीही होते. त्यांचे नाव पंडित खरे (नारायण मोरेश्वर खरे) होते. त्यांनी भजन निवडले. त्यांनी अर्थातच काकासाहेब आणि इतरांची मदत घेतली. या भजनांचाही संग्रहात समावेश करण्यात आला. माझा पुतण्या मगनलाल गांधी हा भजन म्हणत असे. दक्षिण आफ्रिकेतील आश्रमात तो माझ्याबरोबर दीर्घ काळ राहिला होता. असे काही नाही की पंडित खरेंनीच अशा प्रकारचे संग्रह तयार केले. इतर अनेकांनीही असे संग्रह तयार केले आहेत. कारण ते दिवस स्वातंत्र्याकरिता सुरू असलेल्या आपल्या अहिंसक संघर्षाचे होते. काही वर्षांनंतरही स्वातंत्र्य न मिळाल्यामुळे अनेक लोकांमध्ये वैफल्यग्रस्ततेची भावना निर्माण झाली होती. यावरून इतकाच निष्कर्ष

काढता येऊ शकतो की आपले कुठे तरी चुकत होते. जेव्हा काही तरी चुकते तेव्हा चांगले लोक त्याच्या कारणाचा बाहेर कुठे तरी शोध घेत नसतात. अशा गोष्टीकरिता आपले शेजारी वा आपले भाऊबंद दोषी आहेत आणि आपण नाही असा विचार करणे बरोबर नसते. हा काही बरोबर मार्ग नाही. हा चुकीचा मार्ग आहे. जेव्हा गोष्टी बिघडतात तेव्हा आपला दोष नाही आणि इतरांचा आहे असा विचार करणे चूक असते. सर्व ईश्वरभक्त हेच सांगतात. तुलसीदास हेच म्हणाले. सूरदासही “मो सम कौन कुटिल खल कामी” - माझ्यासारखा कुटिल कोण आहे, खल कोण आहे, कामुक कोण आहे असेच म्हणतात. (आश्रम भजनावली भजन क्रमांक १०६) तुलसीदास काय वा सूरदास काय आपल्या दृष्टीतून असे नव्हते, परंतु ते स्वतःला असे समजत होते. भाऊ, बहिणी, मुले, मित्र आणि इतर सर्व गोतावळा जरी आजूबाजूला असला तरी ते जर ईश्वरापासून दूर असले तर त्यांना तितकेच दुःख व्हायचे आणि मग ते दुःखाने म्हणतात की माझ्यासारखा कुटिल, खल कामी कोणी नसेल. ते असे म्हणाले आणि त्यांनी स्वतःमध्येच दोष शोधायचा प्रयत्न केला ही चांगली गोष्ट आहे. असेच “अजहू न निकले प्राण कठोर” हेही भजन आहे. ते भजन म्हणते की अजून ईश्वराचे दर्शन झालेले नाही आणि करीही अजूनपर्यंत प्राण का निघून गेले नाही? गणेश शास्त्री नेहमी हे भजन गात असत. परंतु एखाद वेळी ते हजर नसले, आजारी पडले तर मगललाल ते गायचे. मगललाल संगीतज्ज्ञ नव्हते परंतु त्यांचा गळा गोड होता. ते ज्या पद्धतीने भजन म्हणायचे ते अजून माझ्या कानात आहे. ते आश्रमाचे आधारस्तंभ होते. आश्रमाच्या संचालनात ते एखाद्या शिळेसारखे होते. ते फार काटक होते. कुदळीने खोदण्याच्या कामात ते सर्वांच्या पुढे असायचे. ते जेव्हा दक्षिण आफ्रिकेत होते तेव्हा ते शरीराने फार धष्टपुष्ट होते. परंतु इथे आल्यानंतर ते जरी आजारी नव्हते तरी त्यांचे वजन कमी झाले होते. तिथे जरी त्यांना संपूर्ण जबाबदारी सांभाळावी लागायची तरी इथे त्यांना करोडो लोकांसोबत काम करावे लागायचे. ही वेगळीच जबाबदारी होती. त्यांनी रचनात्मक

कामाची भरपूर जबाबदारी घेतली होती. आपण रचनात्मक कार्य कसे सोडून देऊ शकतो? रचनात्मक कार्याशिवाय स्वराज्याला काय अर्थ राहील? आपण स्वातंत्र्य मिळवले परंतु त्याचे किती मूल्य आहे? आपण जरी स्वातंत्र्य मिळवले असले तरी त्याचे काय? आज आपल्या लक्षात येते की त्या काळात आपण पुरेसे रचनात्मक कार्य केले असते तर आज आपल्याला जी दृश्ये पाहावी लागतात ती पाहावी लागली नसती. आपल्या मनात असे स्वराज्य होते काय? त्या दिवसात आपण भरपूर काम केले असते तर आज भारताचा इतिहास वेगळा असता. याबद्दल मला मुळीच संशय नाही. मगनलालचा देव स्वराज्य होता. त्याचे स्वराज्य रामराज्य होते.

ईश्वराचे दर्शन केवळ स्वराज्यातच होऊ शकते. अखेरीस ईश्वर काही जड देह थोडाच आहे. काही लोक सांगतात की त्याला चार हात आहेत, एका हातात शंख, दुसऱ्या हातात गदा, तिसऱ्यात चक्र आणि चौथ्यात पद्म आहे. ही सगळी आपली कल्पना आहे. ईश्वर आपल्या हातात शंख, चक्र, गदा आणि कमळ कसा धारण करू शकेल? तो निरंजन म्हणजे म्हणजे निष्कलंक आणि निराकार आहे. तो जर भौतिक अस्तित्वाच्या पलीकडे असेल तर तो भौतिक आकार कसा धारण करू शकेल? आपण ईश्वराची प्रतिमा आपल्या मनात निर्माण करतो आणि मग तिच्यावर विश्वास ठेवतो. मग आपण आपल्या ईश्वराकरिता कुणाकडे पाहावे? त्याला आपण आपल्या कृतीतून पाहू या. आपण जेव्हा यज्ञ समजून एखादी गोष्ट करतो तेव्हा आपण आपल्या अंतःकरणात ईश्वराची स्थापना करतो. उदाहरणार्थ जेव्हा एखादा माणूस चरखा फिरवतो तेव्हा त्याने कातलेल्या धाग्यात त्याला ईश्वर दिसतो. त्याच्या मनात सर्व जग आपले आहे आणि आपले जग तर भारत आहे, आणि भारतात असे गरीब आहेत की ज्यांना खाण्याकरिता मिळत नाही. असे असल्यामुळे जो दरिद्रनारायणाकरिता कताई करतो, सुताचा जो एकेक धागा कातततो त्या धाग्यात मग तो देवाचे दर्शन घेतो. त्या दिवसात स्वराज फार दूर होते. परंतु जेव्हा आश्रम फार चांगला

नव्हता तेव्हा मगनलालच्या अंतःकरणातून शब्द निघायचे "अजहू न निकले प्राण कठोर". त्यानंतर भजनात चार प्रहर चार युगांप्रमाणे गेले असे वाटत असे. याचा अर्थ संपूर्ण रात्र निघून गेलेली असली तरी हा जीव काही अजून गेला नाही. अजूनही देह कायम आहे. त्याला चार प्रहर चार युगांप्रमाणे वाटतात. मलासुद्धा या रात्री तितक्याच मोठ्या वाटतात. आपण तेव्हा आपले स्वातंत्र्य मिळवलेले नव्हते. आत मी मान्य करतो की १५ ऑगस्टला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. परंतु हे खरे स्वराज्य आहे असे मी समजत नाही. माझ्या कल्पनेतील स्वराज्य हे नाही. या स्वराज्याला रामराज्यही म्हणता येऊ शकत नाही. आज आपण परस्परांना शत्रू समजू लागलो आहो. मुसलमान हिंदूंचे शत्रू आहेत आणि हिंदू आणि शीख मुसलमानांचे शत्रू आहेत. परंतु स्वराज्याच्या माझ्या संकल्पनेत आपण कोणालाही आपला शत्रू समजत नाही आणि आपल्याला कोणाचाही शत्रू होण्याची इच्छासुद्धा नसते. ते स्वराज्य अजून आलेले नाही. भारतातील हिंदूंनी आणि मुसलमानांनी परस्परांना शत्रू समजायला पाहिजे काय? आपली भावंडे एकमेकांशी शत्रूत्व पत्करून राहतील काय? मी असे का म्हणतो? मी हे एकदा थोडक्यात सांगितले आहे, परंतु आपल्याला जर उंचावर जायचे असेल तर आपण सर्वांनी भावाभावाप्रमाणे राहिले पाहिजे ही गोष्ट मी परतपरत सांगेन. या क्षणी आपण पतीत झालो आहो आणि अजून आपले अधःपतन होण्याची शक्यता आहे. आपल्या अंतःकरणात द्वेष भरलेला आहे, रक्तपात भरलेला आहे. मुसलमान पाहताच आपण भडकतो. मशिदीत मुसलमानाला ईश्वराची भक्ती करताना पाहिले की आपण त्याला मारून टाकतो. त्याला आपण आपला शत्रू समजतो आणि त्याला केव्हा आपण हाकलून लावू शकू याचा विचार करू लागतो. त्याच्या मशिदीचे मंदिर बनवण्याचा विचार आपण करू लागतो. परंतु मशिदीत प्रार्थना करत असताना त्याने कोणती चूक केलेली असते याचा विचार करा. देऊळ आणि मशीद सारखेच आहेत. मग मुसलमानांनी देवळांचा विध्वंस करावा आणि हिंदूंनी मशीदींचा असे का? ईश्वराच्या नजरेत दोघांचाही

सारखाच दोष आहे. आपण हिंदू जे करतो त्यामुळे मुसलमान दुखावत असतील आणि मुसलमान जे करतात त्यामुळे हिंदू दुखावत असतील तर आपल्याला स्वराज्य मिळाले असे आपण कसे म्हणू शकतो? आपण स्वतःला या परिस्थितीत आणले आहे परंतु आपल्याला या आगीतून बाहेर पडायचे आहे.

मी आधीच सांगितले आहे की मला दिल्लीत करायचे वा मरायचे आहे. मी इथे त्याच हेतूने आलो आहे. अजून मी काहीही केले नाही. हे खरे आहे की आजकाल आपण सांप्रदायिक भांडणांबद्दल फारसे ऐकत नाही, वरवर पाहता आपण भावाभावासारखे राहत आहो. परंतु हे स्वतःला फसवण्यासारखे आहे. इथे पोलीस आणि सैन्य ठेवण्यात आले आहे ते इथे काही धोका आहे म्हणूनच. इथे असणारे मुसलमान भीतीमुक्त झाले आहेत काय? मी यापासून मोकळा झालो काय? मला असे वाटत नाही. इथे माझ्याबरोबर काही मुसलमानसुद्धा आहेत. तुम्ही इथेच त्यांचा अपमान करणार आहात काय? माझ्या डोळ्यासमोर तुम्ही त्यांचा खून करणार आहा काय? त्यांना मारण्याआधी तुम्हांला मला मारावे लागेल. काल माझ्यामागे शेख अब्दुल्ला बसलेले होते. त्यांच्याबरोबर काही काश्मिरी पंडितही होते. शेख आपले मित्र आहेत. कोणी तरी आपल्या रफी साहेबांच्या (रफी अहमद किडवाई) भावाचा मसुरीत खून केला. त्यांनी काहीही केलेले नव्हते. ते आपले सेवक होते. त्यांची विधवा अगदी इथेच बसलेली आहे. लोकांच्या मनांत घृणा निर्माण होऊ नये म्हणून मी ती दुःखद गोष्ट इथे सागत नाही. माझ्या अंतःकरणात अनेक गोष्टी आहेत. मी तुम्हांला सार सांगेन. मला फार थोड्या गोष्टी माहीत आहेत. परंतु मला चर्चा फार लांबवायची नाही. ते काही असले तरी भजनात म्हटल्याप्रमाणे आपल्याला ईश्वरदर्शन झाले नाही म्हणून आपल्याला मरण्याची इच्छा असेल तर आपले दोष पर्वताप्रमाणे पाहणे व इतरांच्या दोषाकडे दुर्लक्ष करणे हे त्याकरिता उचलायचे पहिले पाऊल असेल. सर्व जगासमोर आपण घोषित केले की सर्व दोष आमचा आहे व इतर सर्व चांगले लोक आहेत

तर असे करणे भ्याडपणाचे होणार नाही. असे केल्यामुळे आपले अधःपतन होणार नाही, उलट आपण नवीन उंची गाठू आणि धैर्यशाली होऊ.

आपल्याला देशात देवाचे राज्य वा रामराज्य निर्माण करायचे असेल तर आपण आपले दोष मोठे करून पाहावे आणि मुसलमानांचे दोष न पाहणे हे आपले पहिले काम आहे असे मी म्हणेन. मुसलमानांमध्ये काहीच दोष नाहीत असे मला म्हणायचे नाही. त्यांनी बरीच दुखापत केली आहे. त्यांनी केलेल्या चुका लपवण्यात वा त्यांच्याबद्दलचे अज्ञान दाखवण्यात काहीही अर्थ नाही. परंतु हे माहीत असूनही मी त्याकडे पाहणार नाही. मी जर त्या चुकांचा विचार करू लागलो तर मला वेड लागेल आणि मी भारताची सेवा करू शकणार नाही. मला कोणीही शत्रू नाही असा विचार करून मी सुरुवात केली व जगासमोर मी माझे सर्व दोष उघड केले आणि इतरांच्या दोषांकडे डोळेझाक केली तर काय होईल? त्यांना पाहण्याकरिता ईश्वर आहे. कोणी मला थापड मारली वा कान कापले वा गळा कापला तर त्याचे काय? माणसाला केव्हा ना केव्हा मरावेच लागते. न्याय करण्याकरिता ईश्वर आहे. मी काहीही करत असलो तरी त्याला विसरता कामा नये. यामुळेच मी वारंवार सांगत असतो की तुम्ही तुमची अंतःकरणे इतकी शुद्ध ठेवली पाहिजे की जगाने तुमच्याविरुद्ध तक्रार करायला नको. आज मी जेव्हा तिथे गेलो (लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याकडे) तेव्हा दिल्लीतील परिस्थितीबद्दल मला विचारण्यात आले. आतासुद्धा हिंदू आणि मुसलमान अंतःकरणापासून एक नसल्यामुळे मला लाजेने मान खाली घालावी लागली. सरदार आणि जवाहरलाल यांनी पोलीस आणि सैन्य ठेवल्यामुळे ते एकमेकांचे गळे कापत नाहीत ही चांगली गोष्ट आहे. परंतु त्याचे काय? ब्रिटिशसुद्धा अशी व्यवस्था करत होते. दिल्लीमध्ये जे घडत आहे ते पाहण्याची आपली इच्छा नाही. आज माझे पंख कापलेले आहेत. मी जर परत माझे पंख वाढवू शकलो तर मी पाकिस्तानमध्ये उडत जाईन आणि तिथे हिंदूंनी आणि शिखांनी कोणते अपराध केले ते पाहीन. परंतु त्यांनी जर काही केले असेल तर? त्यांनी

तिथे आपल्याच घरात का राहू नये? परंतु आज हे सांगण्याकरिता मला तोंड आहे काय? मी केवळ लोकांना समजावून सांगू शकतो आणि तुम्हांला ईश्वराचे दर्शन घ्यायचे असेल व खऱ्या स्वराज्याची स्थापना करायची असेल तर आपण सर्वांनी एक व्हायला पाहिजे आणि भारत अधःपतीत देश नाही असे घोषित करायला पाहिजे. यामुळे आपली प्रतिष्ठा वाढेल आणि आपल्या देशातील भूक आणि तहान दूर करण्याकरिताही आपल्याला वेळ मिळेल.

आज संपूर्ण जग आपल्याकडे पाहत आहे कारण आशियाला जर वर जायचे असेल आणि आफ्रिकेतील हब्शींची प्रगती व्हायची असेल तर भारताला उंच उठायला पाहिजे. भारत नेहमीच आशियाचाच नाही तर युरोपचासुद्धा केंद्र राहिला आहे. भारत जर काही साध्य करू शकला तर संपूर्ण जगाला त्यापासून प्रेरणा मिळू शकेल.

जग थंडीत कुडकुडत आहे. जगाला जर ऊब मिळायची असेल तर ती केवळ भारताकडूनच मिळू शकेल. माझी ईश्वराला आणि तुम्हांलाही प्रार्थना आहे की सर्वांना ऊब मिळू शकेल अशा प्रकारे आपण वागलो पाहिजे आणि आपल्या माध्यमातून सगळ्या जगाला ऊब मिळाली पाहिजे. संपूर्ण आशिया आणि आफ्रिकेतील लोक आपल्याकडे पाहत आहेत. इथे काही तरी घडत आहे अशी जर त्यांची खात्री पटली तर संपूर्ण जग आपल्या उदाहरणाचे अनुसरण करील.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४३६-१

------------------

## १३२. शारदा गो. चोखावाला यांना पत्र

ऑक्टोबर २०, १९४७

चि. बबुडी,

मला तुझ्या दोन पत्रांचे उत्तर द्यायचे आहे. माझ्या शब्दाचा चोखावाला जो अर्थ करतात आणि तू जो अर्थ करते ते दोन्ही बरोबर आहे. लावण्यात आलेले दोन्ही अर्थ विरोधी नाहीत. यावर विचार कर.

माणसाने प्रयत्न सोडू नये. प्रयत्न चांगला वा वाईट असू शकतो, पवित्र वा अपवित्रही असू शकतो. ज्या प्रयत्नाला सीमा माहीत नसते तो वाईट असतो तर जो प्रयत्न काही सीमांचा मान ठेवतो तो चांगला असतो. बरेच काही या सीमांच्या स्वरूपावर अवलंबून असते. तुला थोडासा ताप यावा हे मला आवडत नाही. मी माती आणि पाण्याच्या उपचाराची सीमा ठेवीन. परंतु मी सांगितलेली सीमा मान्य करणे हा तुझा वा अजून कोणाचा धर्म असू शकत नाही. माणसाला अंतःकरणापासून जे वाटते तो त्याचा धर्म असतो.

आनंदचीसुद्धा आसक्ती सोड. तो तुझा मुलगा असल्यामुळे त्याची काळजी घेणे तुला तुझा धर्म वाटत असेल तर तू तुझ्या धर्माचे पालन कर.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १००७९. सौजन्य - शारदा गो. चोखावाला

-------------------

# १३३. प्रार्थनाप्रवचन

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २०, १९४७

एका मुसलमान आरोग्याधिकाऱ्याचा कामावर जात असताना खून करण्यात आला असे राजकुमारी अमृत कौरने काल रात्री प्रार्थनेनंतर मला सांगितले. त्यांनी मला सांगितले की तो चांगला अधिकारी होता, आपले कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडत होता. त्याच्यामागे विधवा आणि मुले आहेत. ती विधवा आक्रोश करताना म्हणत होती की त्या खुन्याने माझ्या मुलांचा आणि माझाही खून करायला पाहिजे होता. तिचा नवराच तिचे सर्व काही होता, भाकरीही तोच कमावत होता. आता जगण्यात काय उरले आहे असे ती म्हणत होती. (हे वाक्य आकाशवाणीवरील भाषणातून घेतले आहे.)

मी कालच तुम्हांला सांगत होतो की दिल्लीत जरी शांतता दिसून पडते आहे तरी तसे नाही. जोपर्यंत अशा एखाददुसरी घटना घडत राहल तोपर्यंत दिल्लीतील वरवरची शांतता पाहून आपण समाधान मानू शकत नाही. ही तर स्मशानशांतता आहे. जेव्हा लॉर्ड इर्विन, जे आता लॉर्ड हेलीफॉक्स आहेत, दिल्लीचे व्हाईसराय होते तेव्हा त्यांनी हिंदुस्थानातील वरवरच्या शांततेला स्मशानशांतता म्हणून संबोधले होते.

राजकुमारीने मला असेही सांगितले की कुराण शरीफप्रमाणे शवयात्रा काढण्याकरिता पुरेसे मुसलमानसुद्धा गोळा करणे कठीण झाले होते.

ही हकिगत ऐकून माझ्यासारख्या संवेदनशील माणसाचा जसा थरकाप होतो तसाच थरकाप कोणाचाही झाल्याशिवाय राहणार नाही. दिल्लीची ही अवस्था! बहुमत कितीही शक्तिशाली असले तरी बहुमताला अल्पमताने घाबरावे हे भ्याडपणाचे चिन्ह आहे.

मला आशा आहे की सत्ताधारी गुन्हेगारांचा शोध घेतील आणि त्यांना शिक्षा करवतील.

हा जर अखेरचा अपराध असेल तर मला काही म्हणायचे नाही. परंतु अशा प्रकारचे अपराध नेहमीच लाजिरवाणे असतात. परंतु मला भीती आहे की हा तर केवळ एक नमुना आहे. यामुळे दिल्लीच्या अंतरात्म्याने जागे झाले पाहिजे.

कांबळ्यांकरिता पैसे येणे सुरू आहेत. सर्व देणगीदारांचे मी आभार मानतो. माझे दान केवळ हिंदूकरिता वा केवळ मुसलमानाकरिता आहे असे एकही देणगीदार म्हणाला नाही याचा मला आनंद होतो.

अजून एका धोक्याच्या गोष्टीकडे दुःखाने मला तुमचे लक्ष वेधणे भाग पडत आहे. जर तो तसा असेल तर. हा धोका खरोखरीचा आहे की नाही हे मला माहीत नाही. (हे वाक्य 'प्रार्थना प्रवचन -१', पृष्ठ ४४२वरून घेतले आहे.) एक इंग्रज गृहस्थ आपल्या अनावृत पत्रात लिहितात - "ज्या कोणाशी याचा संबंध असेल त्याला -

**आपल्यापैकी अनेक लोक दंगलग्रस्त भागातील एकाकी ठिकाणी राहतात. आपण ब्रिटिश आहो आणि वर्षोगणती वैयक्तिक त्याग करून या देशातील लोकांच्या कल्याणाकरिता आपण झटत आहो...**(मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे.) **भारतात जितके इंग्रज राहिलेले आहेत त्यांना मारून टाकण्यात यावे असा गुप्त संदेश देण्यात आला आहे असे आता मला कळते. देशाशी निष्ठावंत असलेल्या सर्व नागरिकांच्या प्राणाचे आणि संपत्तीचे रक्षण केले जाईल असे पंडित नेहरूंनी आश्वासन दिले असल्याचे मी वृत्तपत्रांमधून वाचले. परंतु ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांकरिता संरक्षणाची फार कमी व्यवस्था आहे वा नाहीच असे म्हटले तरी चालेल. आमच्याकरिता तर मुळीच नाही. असे करणेही अशक्य आहे.**

या अनावृत पत्रातील अजूनही बराच भाग इथे दिला जाऊ शकतो. धोक्याची जाणीव व्हावी म्हणून आवश्यक तितका भाग मी दिला आहे. शक्य आहे की ही भीती खोटी

असावी. परंतु अशा गोष्टींकडे दुर्लक्ष न करणे हाच शहाणपणा आहे. मला आशा आहे की पत्र लिहिणाराच्या भीतीला काहीही कारण नाही. सैन्य आणि पोलिसांची यंत्रणा कितीही कार्यक्षम असली तरी दूरदूर ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या रक्षणाकरिता सरकारजवळ कोणतेच साधन नाही, सध्या तरी नाही या पत्रलेखकाच्या मताशी मी सहमत आहे. संरक्षण आधी आतून म्हणजे ईश्वरावरील अढळ श्रद्धेतून यायला पाहिजे आणि दुसरे म्हणजे आजूबाजूला राहणाऱ्या लोकांच्या सद्भावनेतून. जर या दोन्ही गोष्टी नसतील तर भारताचe आतिथ्याविरोधी किनारा सोडून जाणे हाच उत्तम मार्ग ठरतो. परंतु गोष्टी अशा थराला आलेल्या नाहीत.

भारताचे प्रामाणिक सेवक बनून भारतात राहू इच्छिणाऱ्या इंग्रजांकडे विशेष लक्ष देणे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. त्यांचा कोणत्याही प्रकारे अपमान व्हायला नको. त्यांच्याकडे किंचितही दुर्लक्ष व्हायला नको. स्वतंत्र आणि स्वाभिमानी राष्ट्र म्हणून आपल्याला आपले नाव टिकवायचे असेल तर वृत्तपत्रांनी आणि सार्वजनिक संस्थांनीही इतर गोष्टींप्रमाणेच या बाबतीत काळजी घेतली पाहिजे. आपण जर आपल्या शेजाऱ्यांचा मान ठेवू शकणार नाही, मग ते कितीही अल्पसंख्य असो, तर आपलाही सन्मान कायम राहू शकणार नाही.

'हरिजन', नोव्हेंबर २, १९४७

---------------

# १३४. डी. जी. तेंडुलकर यांना पत्र

ऑक्टोबर २१, १९४७

प्रिय तेंडुलकर,

मी तुमच्या ११ ऑगस्टच्या पत्रावर याआधी लक्ष देऊ शकलो नाही याबद्दल खेद होतो.

'यंग इंडिया'करिताकरिता गुजराती लेखाचे भाषांतर का करण्यात आले नाही ते मला आठवत नाही. त्या वेळी कदाचित ही सर्व तथ्ये इंग्रजीच्या वाचकांना सांगण्याची आवश्यकता वाटली नसावी. ते काहीही असले तरी इंग्रजी अनुवाद प्रकाशित होणाऱ्या ग्रंथात तुम्ही हे सामील केले तर त्याबद्दल माझा कोणताही आक्षेप असणार नाही. (महात्मा : लाईफ ऑफ मोहनदास करमचंद गांधी, आठ खंडात) अनुवाद तपासून त्याची तपासलेली प्रत सोबत जोडली आहे. माझ्यासमोर गुजराती लेख नाही हे माझे दुर्दैव आहे. तुमच्या अनुवादकांना माझ्या दुरुस्त्यात काही चुका दिसत असतील तर त्याकडे माझे लक्ष वेधण्यात संकोच करू नका.

ऑगस्ट १९४२च्या व्याख्यानाबद्दल मी प्यारेलाल यांना लिहीत आहे. (पाहा अ.भा. कॉ.क.च्या सभेतील भाषण ऑगस्ट ८, १९४२) ते नोआखालीत अशा ठिकाणी आहेत की जिथे संपर्क होऊ शकत नाही.

डायरीबद्दल (महादेव देसाई यांची) बोलायचे तर ती पाहण्याकरिता माझा कोणताही आक्षेप नाही. मी नरहरीला लिहीत आहे. (पाहा पुढील विषय) १०० रुपयांच्या चेकबद्दल आभार.

तुमचा,

बापू

सहपत्र एक.

'महात्मा', खंड १, पृष्ठ ६-७वरील चित्राच्यामध्ये

# १३५. नरहरी पारीख यांना पत्र

ऑक्टोबर २१, १९४७

चि. नरहरी,

डी. जी. तेंडुलकर यांनी गेल्या ऑगस्ट महिन्यात लिहिलेले जुने पत्र माझ्याजवळ पडून होते. ते मी पूर्णपणे कालच वाचू शकलो.

ते मोठा ग्रंथ लिहीत आहेत वा कदाचित त्यांनी तो लिहून पूर्णही केला असेल. अतिशय मेहनती माणूस असल्याचा ठसा त्यांनी माझ्या मनावर उमटवला आहे. त्यांना महादेवच्या डायऱ्या पाहायच्या आहेत. मला त्यांनी लिहिले आहे की बबलो (महादेव देसाई यांचा मुलगा नारायण देसाई) आणि परमानंद (परमानंद कापडिया) यांची त्याकरिता सहमती आहे. तुझा जर काही आक्षेप नसेल तर त्यांना त्या पाहू देण्याला हरकत घेण्याचे काही कारण नाही असे मला वाटते. यावर विचार कर आणि मला कळव.

मला वाटते की सर्व काही ठीक असेल.

गुजराती फोटो प्रतीवरून. एस. एन. ९१४६

------------------

# १३६. सीता गांधी यांना पत्र

ऑक्टोबर २१, १९४७

चि. सीता,

मला तुझी चिठ्ठी मिळाली. आज मला सुशीलाचे पहिले पत्र मिळाले आणि ती फिनिक्सला पोहोचली आहे. ज्याअर्थी मला पत्र मिळाले त्याअर्थी तुलाही मिळाले असावे असे मी समजतो.

तू तन, मन आणि कर्म यांनी स्वस्थ असली तर तितके पुरे. माणसाने वचन देण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार केला पाहिजे, आणि एकदा वचन दिल्यानंतर ते पाळले पाहिजे.

आता तू डॉक्टर होण्याचा विचार सोडला आहे असे समजायचे ना? आता तुझा काय करायचा विचार आहे? तू काय करशील? तुला मोकळा वेळ मिळाल्यानंतर सर्व काही लिहायचे असेल तर लिही.

विजयाबेन चांगली असेल अशी मला आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ५०१६

----------------

# १३७. ओम प्रकाश यांना पत्र

ऑक्टोबर २१, १९४७

भाई ओम प्रकाश,

आक्रमकावर परत हल्ला न करता प्रेमभावना मनात ठेवून त्याचा हल्ला सहन करणे आणि त्या प्रक्रियेत मरण जरी आले तरी ते पत्करणे हा अहिंसेचा नियम आहे. माणूस जेव्हा प्रेमभाव मनात ठेवून मरण पत्करतो तेव्हा आक्रमकाच्या हृदयपरिवर्तनाला सुरुवात होते. प्रेमाची भावना खरी होती की नाही वा आक्रमकाच्या हृदयपरिवर्तनाला केव्हा सुरुवात होईल हे सांगता येणे कठीण आहे. परंतु अहिंसेनुसार वर्तन करत असताना अहिसेचा नियम आणि तो कशा प्रकारे काम करतो हे लक्षात ठेवले तर तितके पुरेसे असते.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# १३८. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आजसुद्धा एक प्रकरण माझ्या कानावर आले. यात मुसलमानाचा खून करण्यात आलेला नाही तर खून झालेला माणूस बहुधा हिंदू होता आणि तो सरकारी नोकरीत होता. त्याला जिथे पाठवण्यात आले होते तिथे तो आपले काम करत होता. तिथे असा कोणी असेल की ज्याच्या हातात बंदूक होती आणि त्याने बंदुकीने त्याला मारून टाकले. त्याने काही गुन्हा केला असे काही माझ्या ऐकिवात नाही. बस त्याच्या मनात आले की आपण म्हणतो तसे हा माणूस करत नाही आणि म्हणून त्याला मारून टाकले. मला यातून इतकेच सांगायचे आहे की आम्हांला ही सवयच झाली आहे, आणि आता तर स्वातंत्र्याची केवळ सुरुवात आहे, आणि स्वातंत्र्य मिळताच आमच्या मनात आले की आमच्याजवळ बंदूक आहे म्हणून त्याला मारून टाका. एखादा माणूस उडत्या पक्ष्याला मारून टाकतो, त्याचा वेध घेतो. उडत्या पक्ष्याचा वेध घेणारा मोठा शिकारी होतो. असेच एक गृहस्थ आहेत. त्या अंमलदाराचाही वेध घेण्याची त्याला इच्छा झाली. त्यांचाही तो वेध घेतो. त्याला तर तिथे काम करण्याचा हुकूम देण्यात आला होता. बस मनात आले की मारा तर मारून टाकायचे. अशाने तर भारतात आपली भयानक परिस्थिती होणार आहे. कोणी माणूस आरामात राहू शकणार नाही. असे म्हणतात की अनेक जंगली भाग असे आहेत की जिथे कोणीही सुरक्षित राहू शकत नाही. एखाद्याजवळ बंदूक असेल व त्याला खून करायचा असेल तर त्याच्या मनात असा प्रश्न येत नाही की माणसाचा खून कसा करायचा. जो खून करतो तो मृताला जिवंत तर करू शकत नाही. हेच सत्य आहे. जो जिवन देऊ शकतो तोच जीव घेऊ शकतो हासुद्धा नियम आहे. परंतु हे केवळ ईश्वर करू शकतो. माणूस जर जीव निर्माण

करू शकत नसेल तर त्याला जीव घेण्याचा काय अधिकार? जीव निर्माण करणे माणसाच्या हातात आहे काय? परंतु हिंदूंच्या मनात मुसलमानांची शिकार करणे असते आणि मुसलमानाच्या मनात शिखाची शिकार करणे असते आणि शिखाच्या मनात मुसलमानाची शिकार करणे असते. आज तर ते तसे करतील. पण ज्यांची शिकार करायची ते सर्व निघून गेले की मग आपसात शिकार करणे सुरू होईल. हा जागाचा नियम आहे. आपण त्याच नियमाप्रमाणे वागायला सुरुवात केली आहे. यामुळे ही घटना तुम्हाला सांगावी असा मी विचार केला.

दुसरी गोष्ट ही की अधिकाऱ्यांनी अनेक लोकांना अटक केली आहे. भूतकाळात आपण स्वतंत्र नव्हतो. आजसुद्धा आपण स्वतंत्र नाही असे गृहीत धरले पाहिजे. त्या काळातसुद्धा लोकांना अटक होत असे. फार झाले तर व्हाईसरायकडे अर्ज करा. त्यांनी म्हटले की सोडा तर सुटका. परंतु व्हाईसराय साहेब स्वतः सोडू शकत नव्हते. ते नियमाप्रमाणे काम करायचे. सैनिकी कायदा जरी असला तरी कायद्याप्रमाणे काम. कायद्याप्रमाणे त्यांचे स्वतःचे अधिकारी असायचे व ते कायद्याप्रमाणे काम करायचे. त्यांनी जर मान्य केले की कोणाला तरी सोडण्यात यावे तर तो सोडला जायचा. इतरांच्या बाबतीत व्हाईसराय म्हणायचे की मी तुला चोकशी केल्यानंतरच सोडू शकतो. ही अगदी परिपूर्ण कायदेशीर भूमिका आहे. ज्यांना कायद्याप्रमाणे अटक झाली ते जर दोषी आढळले तर त्यांना कायद्याप्रमाणे शिक्षा होईल. परंतु आता सरकार आपल्या हातात आहे. अजून आपण सरकार चालवलेले नाही. जर कोणी मंत्री असेल आणि त्याला वाटत असेल की आपण म्हणू त्याची सुटका करू शकतो तर मग आपण संपलोच. असे व्हायला नको की खुनी लोकांना अटक करायची आणि नंतर सोडून द्यायचे. गुन्हेगारांना अटक करून नंतर सोडून देण्याची परंपरा आपल्याला सुरू करायची नाही. अशा परिस्थितीत मी म्हणेन की एकदा एखाद्याला कायद्याप्रमाणे पोलिसांनी अटक केली की नंतर त्याबद्दल काही तक्रार आहे

म्हणून वा अटक झालेल्या व्यक्तीने अर्ज केला म्हणूनही सरकारसुद्धा त्या व्यक्तीला सोडू शकत नाही. कोणत्या आधारावर सरकार त्याला सोडू शकेल? आपल्याकडे पोलीस, न्यायालये, वकील विनाकारण आहेत काय? माझा कोणी नातलग वा मित्र आहे म्हणून वा कोणी तरी त्याची शिफारस केली म्हणून मी त्याला कसा सोडू शकतो? तो कसा दोषमुक्त होऊ शकतो? माझ्या मते तो दोषमुक्त होऊ शकत नाही. तो जर गुन्हेगार नसेल तर त्याला शिक्षा होऊच शकत नाही. अशा प्रकारे आपण आपली संपूर्ण न्यायप्रणाली स्वच्छ ठेवली पाहिजे. आपले न्यायाधीश त्या प्रतीचे असले पाहिजे. पोलीस आणि वकील यांनी केवळ खटला चालवायाचा म्हणून चालवू नये आणि अमुक एका संख्येत न्यायालयातून शिक्षा झालीच पाहिजे असा विचार तर त्यांनी मुळीच करू नये. ज्यांना शिक्षा झाली पाहिजे त्यांनाच झाली पाहिजे. परंतु हे सर्व कायद्याचे काम आहे, न्यायालयाचे आहे. समजा एका माणसाने तक्रार केली की त्याने माझ्यावर हल्ला केला, त्याला पकडा. पकडले. त्याला सोडवण्याकरिता मी काय प्रमुखाकडे जाऊ? प्रमुख म्हणेल की न्यायालयात जा. तक्रार करणारा नंतर जर म्हणेल की पकडून काय करायचे, आमचे वैर वाढेल. त्याला सोडून द्या. तर न्यायालय त्याला सोडून देईल. वकीलसुद्धा ती गोष्ट कबूल करील. परंतु समजा की खरोखर खून झाल्याचा खटला आहे. अशा परिस्थितीत तक्रारकर्त्याची इच्छा जरी असली तरी तो सुटू शकत नाही. जर अपराधी माणूस सुटला तर आपले काम पुढे जाऊ शकत नाही. मी वकिली केली आहे आणि अनेकांना सोडवले आहे. कसे? खुनी व्यक्तीने आपण खून केल्याचे कबूल केले पाहिजे आणि न्यायालयाला आश्वासन दिले पाहिजे की आता माझे मन शुद्ध झाले आहे व त्याने दयेची विनवणी केली पाहिजे. तक्रारकर्तासुद्धा म्हणू शकतो की आता आम्ही मित्र झालो आहो व आरोपीला माफ करण्यात यावे व आरोपीला शिक्षा करण्यात येऊ नये. त्याने रागाच्या भरात खून केला, आता त्याला फासावर लटकवून काय फायदा? आता आरोपी माझा मित्र झाला आहे, त्याची मला मदत होऊ

शकते व तो आपले मन ईश्वरभक्तीकडे वळवू शकतो. तो ईश्वराची प्रार्थना करायला सुरुवात करू शकतो आणि तसे असेल तर आपण त्याला तसे करण्यापासून का अडवावे? नंतर आरोपी म्हणेल की मी खून तर केला आहे, अपराध केला आहे, पण या वेळी माफ करा. तक्रार करणाराने मला माफ केले आहे. शक्य आहे की यानंतर मी चांगले काम करीन आणि समाजाची सेवा करीन. यामुळे मला सोडून द्या. खुनी माणसाला सोडवण्याचा हा मार्ग आहे. असे कायदेशीरपणे करता येऊ शकते. परंतु आपल्याला आता मिळालेल्या सत्तेचा आपण दुरुपयोग करू नये. आपण जर असे केले तर लोक किती तरी अपराध्यांना सोडण्याचा आग्रह धरतील. मग तो गरीब बिचारा मंत्री तरी काय करील? कल्पना करा की त्याने चुकीने कोणाच्या तरी सुटकेचा आदेश दिला. त्या व्यक्तीला सोडण्याचा त्याला अधिकार आहे असेही समजा. परंतु तरीही त्याने असे करू नये. त्याच्या भावाने, मित्राने वा पत्नीने जरी अपराध केलेला असेल तरीही त्याने असे करू नये. न्यायालयात अर्ज करा वा वकिलाकडे वा फिर्यादीकडे जा, परंतु याबाबतीत मी काही करू शकत नाही  असे त्याने सांगायला पाहिजे. पवित्र अंतःकरणाचे मंत्री असल्याशिवाय आपण हे काम करू शकत नाही.

मला एक सूचना मिळाली आहे की मी १५ मिनिटांपेक्षा जास्त बोलायला नको. माझी जास्त बोलण्याची इच्छासुद्धा नाही. मी भरपूर बोललो आहे. मला फार लांबलचक बोलण्याची हौससुद्धा नाही. जेव्हा बोलण्याची गरज असते तेव्हाच मी बोलतो. परंतु मला सांगण्यात आले आहे की मी जर पंधरा मिनिटापेक्षा जास्त बोललो नाही तर लोकांचा जास्त फायदा होईल. लोक माझे बोलणे जास्त काळजीपूर्वक ऐकतील कारण माझे शब्द ऐकण्याकरिता ते उत्सुक असतील. मग तशी सवय पडेल आणि मी १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ बोलणार नाही.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४४४-७

-----------------

# १३९. फ्रॅन्सिस्का स्टॅन्डेनेथ यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २२, १९४७

चि. सावित्री,

(गांधीजींनी हे नाव फ्रॅन्सिस्का स्टन्डेनेथ यांना दिले होते. मायना देवनागरीत आहे.)

मला तुझी संक्षिप्त चिठ्ठी मिळाली. मी तुझ्या सर्व पत्रांचे उत्तर पाठवले आहे. ते सर्व तुला मिळाले असतील अशी मला आशा आहे.

इथे आम्ही अतिशय चिंताजनक परिस्थितीला तोंड देत आहो. अखेरीस काय होईल हे ईश्वरालाच माहीत. सध्या तरी मी इथे बांधला गेलो आहे.

तू आजारातून मुक्त झालीस याचा मला आनंद होतो.

तुला तिथे अन्नवस्त्राची अडचण जाते आहे. लोक त्याला कसे तोंड देत असतील.

स्नेह,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १४०. डोरोथी हॉग यांना पत्र

(यातील केवळ एक वाक्य खंड क्र. ८९, पृष्ठ ३८३वर आहे.)

बिर्ला भवन, नवी दिल्ली,

ऑक्टोबर २२, १९४७

प्रिय डोरोथी,

मला तुझे सांत्वनपर पत्र मिळाले. “मला मुळीच शंका नाही की आज भारत जो इतका रसातळाला गेला आहे तो परत अत्युच्च शिखर गाठण्याकरिताच गेला आहे हे तुझे स्वप्न” याच पिढीत वास्तवात आले तर किती चांगले होईल? ज्या क्रॉसबद्दल महादेवने जिवंत असताना तुला लिहिले होते. (१९४१साली महादेव देसाई यांनी डोरोथी हॉग यांना लिहिले होते - “तुम्हाला क्रॉसचे भयानक ओझे वाहावे लागत आहे. बॉम्बवर्षाव, गृहहीन आणि उपासमार होणारे लोक यांचेच ओझे नाही तर हिंदुस्थानातील आम्ही लोक त्यांचे मित्र आहो, शत्रू नाही हे तेथील अडाणी लोकांना समजावण्याचेसुद्धा. हे काम अतिशय कठीण आहे हे तर मला माहीत आहे. परंतु तुम्ही बापूजींना चागल्या प्रकारे ओळखत असल्यामुळे हे कार्य पूर्ण करू शकाल.” ) त्या ओझ्यासमोर आज मला जे ओझे वहावे लागत आहे ते काहीही नाही. तू उल्लेखिलेले तिन्ही मुद्दे चांगले आहेत. किती कमी लोक त्याप्रमाणे वागतील? तुझे बरोबर आहे. प्रेम आणि प्रार्थना ही आजची गरज आहे. प्रार्थनेला मी उपवासाचीही जोड देईन. हे लिहीत असताना होरेस इथे नाही. तो लाहोरला आहे. जात असताना त्याने मला सांगितले होते की तो एका पंधरवाड्यात परतेल. तो निःस्वार्थ सेवेचे जीवन जगत आहे.

सर्वांना स्नेह,

बापू

कुमारी डोरोथी हॉग,

१४४, ओक ट्री लेन सेली ओक, बर्मिंगहॅम २९

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू मेमोरिअल म्युझिअम ॲन्ड लायब्ररी. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# १४१. सौरेंद्र यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २२, १९४७

चि. सौरेंद्र,

तुझे पत्र. भ्याडपणा पत्करून कोणीही राहायला नको इतके तर मी म्हणू शकतोच. काम अवघड आहे. सतीश बाबूंना विचार आणि ते सांगतील तसे कर. दिल्लीतून तर सुटू शकत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलालपेपर्स. सोजन्य - प्यारेलाल

--------------------

# १४२. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

सर्वात आधी मी तुम्हांला सांगू इच्छितो की कांबळी येणे सुरूच आहे. नुकताच मला कळले की आज दोनशे कांबळी आली. कांबळी आणि पैसेसुद्धा दररोज येत आहेत. मला आशा आहे की इथे शिबिरात असलेल्या लोकांकरिता पांघरुणांची अडचण जाणार नाही. अजूनही कांबळी उपलब्ध होतील. आपल्या लोकांत इतका उदारपणा कायम आहे ही चांगली गोष्ट आहे.

एक सद्गृहस्थ माझ्याकडे आले. मी उर्दू वृत्तपत्र क्वचितच वाचत असतो, मग दररोज वाचण्याची गोष्ट तर दूरच. मी उर्दू वाचू शकतो परंतु मला तसे करणे कठीण जाते. मूल जेव्हा अक्षर वाचणे शिकते तेव्हा ते ते हळूहळू अक्षर वाचते. मी त्याच अवस्थेत आहे. मुलापेक्षा थोडे जास्त येते परंतु वेगात वाचायचे असेल तर वाचू शकत नाही. तर त्या सद्गृहस्थांनी एका उर्दू वृत्तपत्रात ज्या गोष्टी आल्या होत्या त्या वाचून दाखवल्या. ते ऐकले आणि मला दुःख झाले. सर्व गोष्टी तर मी इथे सांगत बसू शकत नाही. त्यात लिहिले आहे की आता आम्ही ठरवले आहे की - ते जे वृत्तपत्रवाले आहेत, संपादक साहेब आहेत त्यांनी ठरवले असेल परंतु आशा आहे की संपूर्ण भारताने ठरवले नसेल - सर्व मुसलमानांनी पाकिस्तानमध्ये निघून जावे आणि जे मागे राहतील त्यांची एक तर कत्तल होईल वा त्यांना पाकिस्तानमध्ये पाठवून दिले जाईल. या वृत्तपत्राने वा संपादक साहेबांनी जे लिहिले आहे ते खरे असेल तर ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. संपादकाच्या लेखणीतून अशी गोष्ट बाहर पडायलाच नको. अशी वर्तमानपत्रे तर निघायलाच नको. त्यांचे जर खरोखर असे मत

असेल तर ते ते लोकांना सांगू शकतात. परंतु ते तर दवंडी पिटून म्हणत आहेत की मुसलमानांनी एक तर पाकिस्तानमध्ये गेले पाहिजे नाही तर त्या सगळ्यांची कत्तल केली जाईल. मी काल सांगितल्याप्रमाणे ते जर पाकिस्तानमध्ये निघून गेले तर नंतर काय कराल? आपसात भांडाल? एका सज्जन गृहस्थांनी तर मला सांगून टाकले की आपसात लढाई सुरूसुद्धा झालेली आहे. ही आपसातील लढाई तर होणारच होती. एकदा का रक्ताची चट लागली की मग ती सुटणे कठीण जात असते. आपलीसुद्धा अशीच परिस्थिती होणार आहे. परंतु वर्तमानपत्रवाले गृहस्थ असे म्हणाले आणि त्यांनी असे छापले हे ठीक आहे, परंतु आपलेही लोक तर अशा वृत्तपत्रांमागे वेडे झाले आहेत. गीता सोडा, बायबल सोडा, कुराण शरीफ सोडा आणि ही वृत्तपत्रेच आमची गीता झाले आहेत. त्यात जे येते त्याला आम्ही ब्रह्मवाक्य समजतो. लोक अशा प्रकारे वेडे झाले आहेत आणि वर्तमानपत्रे त्याचा फायदा घेऊन असे छापत असतील तर ती वाईट गोष्ट आहे. याबद्दल माझी अधिक बोलण्याची इच्छा नाही.

दुसरी गोष्ट ही आहे की प्रत्येक ठिकाणावरून तक्रारी येत आहेत. हे ठीक आहे की इंग्रजांच्या काळात जी देशी संस्थाने होती ती आपल्या मनाप्रमाणे वागत होती. ब्रिटिश सरकार थोडासा लगाम तर ठेवायचे. त्यांना लगाम ठेवणे भाग होते कारण त्यांना सरकार चालवायचे होते. आज ते सरकार निघून गेले आहे. हं, पण सरदार पटेल आहेत, त्यांच्याजवळ फार मोठे खाते आहे. यामुळे त्यांनी तरी काही करावे. परंतु या परिस्थितीत गरीब बिचारे सरदार तरी काय करू शकतात? त्यांची तर स्वतःची भाषा आहे, हिंदुस्थानची सेवा केली आहे, म्हणूनच ते सरदार झाले आहेत. परंतु त्यांच्याजवळ तलवार नाही, बंदूक नाही, लष्कर नाही. ते सैन्याचे माणूसही नाहीत. ते सेनापतीही नाहीत की ज्यांच्या आदेशाचे आपोआप पालन होते. आपण यांचे मीठ खातो व ते आपले मालक आहेत असे जोपर्यंत

सैनिक समजतात म्हणजेच त्यांना ते जनतेचे महान सेवक समजतात तोपर्यंत सर्व काही ठाकठीक असेल.

आता संस्थानिकांचे म्हणणे आहे की आम्ही सामिलीकरणावर सही तर केली, परंतु त्यामुळे काय होते? यामुळे आमचे काही हिसकावून तर घेण्यात आलेले नाही. आमच्याजवळही शिपाई आहेत. जेव्हा इंग्रजांचे सरकार होते तेव्हा ते खेळण्यासारखे होते. परंतु आता ते तसे थोडेच आहे? देशातील संस्थानिकांना जे करायचे असेल ते ते करू शकतात. मी स्वतःही तर देशी संस्थानातील आहे. यामुळे मला माहीत आहे की ते काय करू शकतात, किती भले करू शकतात. देशी संस्थानिकांना मी अतिशय आदरपूर्वक सांगेन की तुम्ही जर इतके अहंकारी असाल की ही जी इतकी प्रजा आहे तिला तुम्ही मारून टाकू शकता, कापून टाकू शकता तर तुम्ही राहू शकणार नाही. मी तर सांगितले आहे की जे राजे लोक आहेत ते जर जनतेचे विश्वस्त झाले तरच त्यांना स्थान आहे. ते जर जनतेचे मालक बनू पाहतील, तिचे शोषण करू पाहतील, तिला दाबून ठेवू पाहतील तर त्यांचे कोणतेही स्थान असू शकत नाही. याबद्दल मला शंका नाही. भारतात कोणती परिस्थिती असेल हे तर देवालाच माहीत. संस्थानिक आहेत खरे परंतु त्यांच्याजवळ कोणताही पर्याय नाही. ते कधीही भारताचे राज्य चालवू शकणार नाहीत. त्यानंतर आपण गुलाम जरी झालो तरी होऊ. तर काय हे संस्थानिकही गुलाम होतील? तो काळ गेला. ते एक युग होते. इंग्रजांचे शासन होते. त्यांनी विचार केला की इथे राजे लोक आहेत. बरे आहे, असू द्या. त्यांच्याद्वारेच राज्य करू. असे तर त्यांनी आपल्या स्वार्थामुळेच केले. मग यात त्यांना काय दोष द्यायचा? परंतु आज आपण इतके दुर्दैवी झालो आहो की आम्ही दोघेही वेड लागल्यासारखे आपसात भांडत आहो, त्यातून आपल्यापेकी कोणी एक जिंकेल वा दुसरी अथवा तिसरी शक्ती अथवा दोन चार सत्ता मिळून भारताला खाऊन टाकतील. तर त्याबरोबर ते या संस्थानिकांनाही खाऊन टाकतील. जर ते भारताशी प्रामाणिक राहतील

व जनतेचे सेवक बनून राहतील तर ठीक आहे. मी तर प्रजेलाही म्हणेन की त्यांनी भित्रेपणा का करावा? राजांजवळ शस्त्र आहेत आणि प्रजा निःशस्त्र आहे म्हणून काय झाले? आपणही साम्राज्याशी लढत होतो, आपणही निःशस्त्र होतो. आपण काही लपवून शस्त्र ठेवले होते अशी गोष्ट नव्हती. जर असे असते तर मला याची काही तरी माहिती असती. परंतु असे नव्हते. करोडो लोकांनी त्यांचा अंतःकरणाच्या बळावर सामना केला. आपण विचार केला की मारतील, एक लाख मारतील, दोन लाख मारतील, कदाचित तीन लाखही मारतील. परंतु अखेरीस ते किती लोकांना मारणार होते? ४० कोटी लोकांचा तो प्रश्न होता. आपणा सर्वांना कापता कापता त्यांच्या हाताचा थरकाप उडाला असता. अशाच प्रकारे ही जी जनता आहे तिला स्वातंत्र्य तर मिळायलाच पाहिजे होते आणि ते मिळालेही. त्या स्वातंत्र्याचे आम्ही काय करतो ही वेगळी गोष्ट आहे. मी तर म्हणेन की राजे लोकांनी वेड्याप्रमाणे वागू नये. आपण स्वेच्छाचारी होऊ शकत नाही, व्यभिचारी होऊ शकत नाही हे त्यांनी समजून घ्यायला पाहिजे. दारू पिऊन ते दिवसभर पडून राहतील असे होऊ शकत नाही. हे तर मी तुम्हांला आणि तुमच्याद्वारे राजे लोकांना सांगितले.

एकदा मी तुम्हांला सांगितले होते की आता दसरा येत आहे आणि त्यानंतर लगेच एक दिवसानंतर बकरी ईद येत आहे. या दिवसांत हिंदू आणि मुसलमान हे दोघेही घाबरलेले असतात. आज तर ते अजूनच भयभीत आहेत कारण अत्याचार एका बाजूनेच होऊ शकतो. जर हिंंदूंना वेड लागले आणि ते म्हणू लागले की बकरी ईद आहे तर मुसलमानांना कापा. आपला दसराही झाला आहे. दसरा काय आहे? रामाचा विजय साजरा करण्याकरिताच दसरा आहे. त्यानंतर एकादशी आहे. त्या दिवशी तर रामभरत मिलाप आहे. त्यावरून तर आपण संयम शिकायला पाहिजे, माणुसकी शिकायला पाहिजे. धर्म काय आहे ते शिकायला पाहिजे. जर आपण हे शिकलो तर आपण खऱ्या अर्थाने दसरा साजरा करू. दसऱ्याच्याच दिवशी दुर्गापूजाही होते. दुर्गाचा अर्थ हा आहे की ती एक मोठी

शक्ती आहे व तिची उपासना करून आपण उंचावर जाऊ शकतो. याचबरोबर दसऱ्याचा अर्थ असा काही नाही की आपण दिवसभर राग, रंग, रूप यांच्यातच मग्न असावे. याला गुजरातमध्ये नवरात्र म्हणतात. आम्ही लहान होतो तेव्हा आई सांगायची की नवरात्रीत जेवण करू नये. जर खायचेच असेल तर फळ खा, जमलेच नाही तर दूध प्या. जर खरोखर पूर्ण उपवास करू शकलात तर फारच चांगले. माझी आई तर खूप उपवास करणारी होती. तिची मी बरोबरी करू शकत नाही. माझे मोठे भाऊ तर मुळीच बरोबरी करू शकत नव्हते. मी थोडीशी बरोबरी करू शकत असे परंतु तिच्यात उपवास करण्याची जी शक्ती होती त्यासमोर मी एखाद्या खेळण्याप्रमाणे आहे, मुलाप्रमाणे आहे. अशा प्रकारे आपण दसरा साजरा करत असतो. आमच्याकरिता दसऱ्याचे महत्त्व हे असे होते. हं, त्यानंतर जी दिवाळी येते तिच्यात आपण थोडी मौजमजा करू शकतो, परंतु दसऱ्याला मुळीच नाही. नवरात्रीचा हा जो अर्थ आहे तो सोडून काय आपण कापाकापी करणार आहो? दसऱ्यानंतर बकरी ईद आहे. जे मुसलमान बांधव आहेत त्यांना आपण घाबरवले आहे. त्यांच्यांशी आमचे चांगले बांधव आहेत. जे राष्ट्रवादी मुसलमान आहेत तेही आज त्रस्त आहेत. तेही पळत आहेत, परंतु कुठे जातील? आम्ही इतके निर्दय झालो आहो की आम्ही त्यांनाही हाकलण्याच्या मागे लागलो आहो. मग शांतता कशी असेल? शांतता असू तरी कशी शकते?

तुम्ही चार वा साडेतीन कोटी मुसलमानांना मारू शकाल काय, पळवून लावू शकाल काय वा हिंदू बनवू शकाल काय? असे करणेसुद्धा नाश करणेच आहे. तुमच्यावरही अशी जबरदस्ती झाली तर काय तुम्ही सर्व मुसलमान व्हाल? तुम्हांला सांगण्यात आले की कलमा वाचा आणि नाही वाचला तर तुम्हांला मारून टाकू तर तुम्ही कलमा वाचाल? मी तर पहिला असा माणूस असेन की जो म्हणेल की आधी तुम्ही आम्हा सर्वांचे गळे कापा आणि नंतर बोला. इतकी तर आपल्यामध्ये हिंमत असली पाहिजे. अशा प्रकारे मुसलमानांना हिंदू होण्याकरिता सांगणे चांगली गोष्ट नाही. मला तरी असा हिंदू नको. अशा

हिंदूंनी काय मी हिंदू धर्म वाचवू शकतो? मला तर असा हिंदू पाहिजे की जो संयमाने राहील. मी असा उद्धट आणि निर्दय का होऊ? उद्धट आणि निर्दय होणे आणि धर्माचे पालन करणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी होऊ शकत नाहीत. तर हे जे दोन दिवस आहेत त्यांत आम्ही घाबरायला नको. शात राहायचे. आणि आमच्याकडून जो अपराध झाला आहे त्याचे प्रायश्चित्त घेतले पाहिजे वा पश्चात्ताप केला पाहिजे व भाऊभाऊ म्हणून परस्परांना भेटायला पाहिजे. जर तुम्ही इतके करू शकला तर ईदनंतर तुम्हांला मी इथे दिसणार नाही.

मी पंजाबमध्ये जाणार आहे काय असे एका हिंदू सद्गृहस्थांनी मला विचारले. मी त्यांना विचारले तुम्हांला मला पंजाबला पाठवायचे आहे काय? मी म्हणालो हो, गेलो तर त्यांच्याशीही भांडेन. माझे भांडण कसे असते हे तर तुम्हांला माहीतच आहे. त्यांच्याशी पोट भरून गोष्टी करेन. तिथून जे लाखो लोक येत आहेत, हिंदू आणि शीख, ते आपल्या जागेवर का बसू शकत नाहीत? जोपर्यंत असे होणार नाही तोपर्यंत मी शांततेत बसू शकणार नाही. त्यानंतर मुसलमानांना आणायचे आहे. मग तुम्ही म्हणाल की असे तर होऊ शकणार नाही. मी म्हणेन की असे होऊ शकते परंतु त्याची किल्ली दिल्लीत पडलेली आहे. हे जे दोन दिवस येणार आहेत त्यात आपण दाखवून दिले पाहिजे की हिंदू आणि मुसलमान सज्जन लोक आहेत आणि दोघेही एकोप्याने राहणार आहेत.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४४७-५२

--------------------

# १४३. लॉर्ड माऊंटबॅटन यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २३, १९४७

प्रिय मित्र,

मी पंडित नेहरूंशी बोललो. परंतु त्यांचे ठाम मत आहे की जोपर्यंत परिस्थितीत सुधारणा होत नाही तोपर्यंत कोणताच बदल करण्यात येऊ नये. (लॉर्ड माऊंटबॅटन यांनी भारताच्या महाराज्यपालपदावरून निवृत्त होण्याची इच्छा व्यक्त केली होती.) जर परिस्थितीत सुधारणा झाली तर त्याकरिता २-३ महिन्यांचा कालावधी लागेल. या अंदाजाबद्दल मी त्यांच्याशी सहमत आहे.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

महामहीम लॉर्ड माऊंटबॅटन ऑफ बर्मा,

गव्हर्नमेंट हाऊस,

नवी दिल्ली.

'गांधीजीज कॉरस्पॉन्डन्स विथ द गव्हर्नमेंट, १९४४-४७', पृष्ठ २८०-१

---------------------

# १४४. सीता गांधी यांना पत्र

ऑक्टोबर २३, १९४७

चि. सीता,

मला तुझे पोस्टकार्ड मिळाले. मी तुला लिहिलेले पत्र मिळालेच असेल. (पाहा सीता गांधी यांना पत्र, ऑक्टोबर २१, १९४७) तुला दीर्घायुष्य मिळो आणि तू प्रामाणिक सेविका हो. वसंतने (कांती मश्रूवाला यांची पत्नी. सीता गांधींचे मामा.) मुलाला जन्म दिला आणि बाळ व आई सुखरूप आहेत याचा आनंद होतो.

आशीर्वाद,

बापू

चि. सीता गांधी,

मश्रूवाला भवन, अकोला

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ५०१७

------------------

## १४५. जीवनजी देसाई यांना पत्र

ऑक्टोबर २३, १९४७

चि. जीवनजी,

दोन हस्तलिखित लेख सोबत आहेत. त्यांचे टंकलेखन करून घेण्याकरिता वेळ नाही. हस्ताक्षर स्पष्ट आहे. तिसऱ्या लेखाचे भाषांतर करून पाठवणे शक्य नाही. ते पत्र एका मुसलमानाचे आहे. तू त्याचे तिथे शक्य तितके चांगले भाषांतर करून घे. मी रचनात्मक कामाबद्दल पाहीन.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटो प्रतीवरून. जी. एन. ९९८५. शिवाय सी. डब्ल्यू. ६९५९. सौजन्य - जीवणजी डा. देसाई

-------------------

# १४६. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दोन बंधू लिहितात “आम्ही निर्वासित आहो. आमच्या मित्राच्या संरक्षणाखाली आम्ही राहत आहो. थंडीमुळे आम्ही फार दुःखी आहो. कांबळी आणि दुलया कुठून मिळू शकतील ते कृपाकरून आम्हांला कळवा. अशा निर्वासितांकरिता काही तरतूद आहे काय?” ते रावळपिंडीचे असल्याचे त्यांनी लिहिले आहे. आता अशा प्रकारचे तर बरेच लोक असतील. ज्या दुलया आणि कांबळी गोळा केल्या जात आहेत त्या शिबिरातील लोकांकरिता आहेत आणि त्यांच्याजवळ पांघरुणाकरिता काहीही नाही हे स्पष्ट आहे. त्यांच्याकरिताच ही व्यवस्था होत आहे. बरीचशी कांबळी वाटली गेली आहेत आणि अजून वाटली जातील. हजारोंच्या संख्येत लोक पडलेले आहेत. काही थोडे असते तर गोष्ट वेगळी होती. शक्य आहे की असे लाखो लोकसुद्धा असतील की ज्यांना या गोष्टी मिळाल्या पाहिजे. कुरुक्षेत्र येथील एका शिबिराची व्यवस्था केंद्र सरकारने आपल्या हाती घेतली आहे. तिथे मोठ्या संख्येत लोक पडलेले आहेत आणि अनेक येण्याची शक्यता आहे.

दिल्ली शहरातसुद्धा अशा अनेक छावण्या आहेत. कमीतकमी तीन आणि कदाचित चार छावण्या पूर्व पंजाबमध्ये आहेत. येथील छावण्यांमध्ये ज्या गोष्टी पुरवण्यात येतात त्या तेथील छावण्यांमध्येसुद्धा पुरवल्या गेल्या पाहिजे. तेसुद्धा तर निर्वासितच आहेत. परंतु जे निर्वासित मित्रांच्या घरी राहतात त्यांना काही पांघरूण देणे मित्रांचे काम असते असे मला वाटते. परंतु शक्य आहे की जे लोक निर्वासितांना आपल्या घरी ठेवतात ते स्वतःकरितासुद्धा दुलई, कांबळे यांची व्यवस्था मोठ्या मुश्किलीने करू शकत असतील

तर मग ज्यांना ते आश्रय देतात त्यांची व्यवस्था ते कुठून करतील? असे अशक्य आहे असे मला म्हणायचे नाही. परंतु मला असे वाटते की ज्या कोणाला दुलईची आवश्यकता आहे त्या सर्वांना दुलया पुरवण्यात येतील. याशिवाय जे लोक या गोष्टींची मागणी करतात ते सर्व प्रामाणिकच असतात असे नाही. लोकांना गरज असते म्हणून ते या गोष्टी मागतात असे नाही. मी अनेक शिबिर पाहिले आहेत. अशा प्रकारचे काम मी नेहमीच करत आलो आहे. मी दक्षिण आफ्रिकेत होतो तेव्हापासून मी हे काम करत आलो आहे. त्यामुळे अशा कामातील अडचणी मला माहीत आहेत. मला ज्या दोघांनी लिहिले त्यांच्याविरुद्ध मी कोणतीही तक्रार ऐकलेली नाही. परंतु या गोष्टींची ज्यांना खरोखर गरज आहे त्यांच्यापर्यंत या गोष्टी पोहोचल्या पाहिजे यात काही संशय नाही. परंतु या लोकांबद्दल मला माहिती कशी असेल? मी ती शोधून काढण्याचा प्रयत्न करत असतो. असे काही नाही की माहिती काढण्याचा मी मुळीच प्रयत्न करत नाही. आणि मला कोणीच फसवणार नाही असेही मी गृहीत धरत नाही. यामुळे जो मागेल त्याने कांबळी घ्यावी असेही नाही. हे बंधू असे काही उदाहरण दाखवू शकतील काय? मी तर पाठवू शकत नाही, परंतु मला वाटते की त्यांना कुठून तरी मिळून जातील. माझ्याजवळ कांबळी आहेत खरे. नाहीत अशी गोष्ट नाही. परंतु ही सर्व कांबळी कुरुक्षेत्राला पाठवण्याकरिता आहेत. इतर लोकही तर गोळा करत आहेत ते या लोकांना पाठवू शकतात.

इथे रोज लोक येत आहेत. ते बिर्ला मंदिरात जातात आणि ती जागाही भरली आहे. यामुळे अजून जास्त लोकांकरिता जागा नाही. देवळातील लोकांनी शक्य तितक्या लोकांना सामावून घेतले आहे. ते इतरांच्या दुःखात नेहमीच सहभागी झाले आहेत. ते दिवसरात्र काम करत आहेत. ते लोकांना भेटायला जातात आणि त्यांच्याकरिता कांबळी व अन्नधान्य गोळा करतात व गरजवंतांना ते वाटतात. परंतु दिवसेनुदिवस अजूनअजून माणसांचा प्रवाह येत असल्यामुळे तेहीथकले आहेत. किती दिवस त्यांना ते अशा प्रकारे देत राहणार आहेत?

हीच समस्या आपल्याकरिताही आहे. मी या लोकांना म्हणेन की त्यांनी स्वतःकरिता काही तरी केले पाहिजे. हे खरे आहे की जेव्हा या गोष्टी प्रत्येकाकरिता केल्या जात आहेत तेव्हा त्यांच्याकरिताही केल्या गेल्या पाहिजे. सर्वांसाठी एकच नियम असला पाहिजे. एका माणसाकरिता एक नियम असेल आणि दुसऱ्याकरिता वेगळा तर आपण मोठ्या प्रमाणात काम करू शकत नाही. यामुळेच सर्व गोष्टी समजावून सांगण्याकरिता मी इतका वेळ घेतला. दररोज वाढत चाललेल्या या थंडीला आपण कसे तोंड देणार? एक दिवससुद्धा कोणालाही या थंडीचा त्रास व्हावा अशी माझी इच्छा नाही. तर ही एक गोष्ट मी तुम्हांला सांगितली.

आज मी अजून एक गोष्ट ऐकली. आज अनेक दुकाने उघडी असल्यामुळे एका गरीब मुसलमानाच्या मनात आले की आपणही आपले दुकान उघडावे. आज तो आपले दुकान उघडण्याकरिता गेला होता. तो चष्म्याचे काम करायचा. असा माणूस मुश्किलीने दिवसाला दोनचार रुपये कमावत असेल. मला माहीत नाही तो कोण होता. त्याचे नावही मला माहीत नाही. तो दुकान उघडण्याकरिता जात होता तेव्हा त्याला कापून टाकले. ही संपूर्ण दिल्लीकरिता लाजिरवाणी गोष्ट आहे. कोणी तरी कापले असेल. एकाने वा दोघांनी. परंतु दोन माणसे कशी? तेव्हा रात्रही नव्हती. दुकान तर लपूनछपून उघडले जाऊ शकत नाही. सर्व माणसे येतजात असतात. यातून कोणीही अडवण्याचासुद्धा प्रयत्न केला नाही. त्यांच्यात कापण्याचे धैर्य कुठून आले? लोक अशा गोष्टीत बेफिकीर असतात. म्हणतात एका मुसलमानाला कापले आहे ना, बरे झाले. ते जर हिंदूंना मारतात, शिखांना मारतात तर आपणही त्यांना मारावे. बदला घेण्याचा असा विचार मनात निर्माण होतो. याला अडवले पाहिजे. जर अडवले नाही तर दिल्ली आपले चारित्र्य गमावेल. दिल्लीत केवळ हिंदू आणि शिखांनी राहावे असे तुम्हांला वाटते काय? असे असेल तर दिल्ली नष्ट होईल. जग तिला

सहन करणार नाही. दिल्लीच्यामागे एक फार मोठा इतिहास पडलेला आहे. तो इतिहास पुसून टाकण्याचा प्रयत्न केला तर तो वेडेपणा होईल.

आज मला तुम्हांला महारोगाने पीडित लोकांविषयी सांगायचे आहे. भारतातही असे अनेक लोक आहेत. ते रस्त्यात दिसत नाही कारण त्यांना पाहिल्याने घृणा निर्माण होते. ज्यांना महारोग आहे ते रोगी पापी आहेत आणि इतर पापी नाहीत असे नाही. हे ठीक आहे की ज्याला रोग आहे त्याने काही ना काही चूक तर केलीच असावी. मला जेव्हा खोकला झाला तेव्हा मी समजत होतो की मी काही ना काही चूक केली असावी. चूक म्हणजे पाप असेच मी समजतो. खोकला प्रत्येकालाच होत असतो, तो होण्यात काही दोष नाही असे समजणारातील मी नाही. तर माझ्यासाठी जो नियम मी मानतो तो सर्व जगाकरिताही असतो. महारोग हा कातडीचा रोग आहे. तो कसा होतो याबद्दल अनेक कथा आहेत. माझी तर मान्यता आहे की हा शरीराचा रोग आहे आणि या रोगात व खोकल्यात काहीही अंतर नाही. ज्याला महारोग होतो त्याला जास्त त्रास होतो. त्याची बोटे झिजतात, नाक झिजते, हात झिजतात. असा माणूस विद्रूप होतो. परंतु तो विद्रूप आहे म्हणून त्याला जास्त वेदना आहेत अशी गोष्ट नाही. मी तर म्हणेन की ज्याचे मन मलीन आहे त्याच्याबद्दल जास्त घृणा वाटायला पाहिजे. ज्याचे शरीर मलीन आहे, कारण तेसुद्धा मन मलीन असल्यामुळेच होते, आणि त्याचबरोबर ज्याची दृष्टी वाईट असते, जो ईश्वराचे भजन न ऐकता जगातील दुष्ट लोकांच्या इतिहासात रस घेतो तो खरा महारोगी आहे. असा आजार असलेले तर अनेक पडलेले आहेत कारण आपण सर्व असे आहो आणि याची कोणीही पर्वा करत नाही. परंतु प्रत्येकाला महारोग होत नसल्यामुळे ज्यांना महारोग आहे त्यांचा आपल्याला तिरस्कार वाटतो. आपल्यामध्ये अनेक ख्रिश्चन होते. भारतात जितकी महारोग्यांची रुग्णालये आहेत ती त्यांची होती आणि आजही आहेत. ते लोक परोपकाराच्या भावनेने त्यांची सेवा करतात. आज भारतातही असे लोक झाले आहेत की जे परोपकाराच्या दृष्टीने त्यांचे काम करत

आहेत. एक परोपकारी पुरुष, मी तर त्यांना महात्माच म्हणेन, मनोहर दिवाण आहेत. ते वर्धेत राहतात आणि विनोबा भावेंचे ते मोठे शिष्य आहेत. विनोबाजी तर फार मोठे माणूस आहेत. तर मनोहरच्या मनात आले की चला काही ना काही करू या. तर त्यांनी महारोग्यांची सेवा करण्याचे काम पसंत केले. विनोबांनीसुद्धा त्यांना तसे करण्याकरिता प्रेरीत केले होते. ते अनासक्त आहेत. पैशाची त्यांना चिंता नाही. ते डॉक्टर नाहीत. परंतु त्यांनी या रोगाचा भरपूर अभ्यास केला आहे. अनेक लोक त्यांची मदत घेतात. आता वर्धेत एका समितीतर्फे लहान प्रमाणात एक परिषद होणार आहे. जे लोक या कामात लागलेले आहेत ते तिथे भेटतील. डॉ. सुशीला नाय्यरसुद्धा त्याच कामाकरिता जाणार आहेत. खरे म्हणजे डॉ. जिवराज (डॉ. जिवराज मेहता, महानिदेशक, आरोग्य सेवा, भारत सरकार) आणि राजकुमारी त्या कामाकरिता जाणार होत्या. राजकुमारीला तर या कामाची जास्त माहिती आहे कारण त्या माझ्याबरोबर सेवाग्रामला राहिलेल्या आहेत. परंतु इथल्या कामात त्या अतिशय जास्त गुंतलेल्या असल्यामुळे जाऊ शकत नाहीत. त्यांनी तिथे जावे म्हणून कोणतीही बळजबरी तर करता येऊ शकत नाही. आणि आग्रह करणार कोण? सेवेचे काम आहे, ज्याला जायचे असेल तो जाईल. परंतु त्यांना सवड नाही म्हणून त्या जाणार नाहीत. एक अजून बंधू आहेत. त्यांचे नाव जगदीशन (टी. एन. जगदीशन, कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टतर्फे महारोग्यांच्या सेवाकार्याचे काम पाहत होते.) आहे. त्यांना स्वतःलाही महारोग झाला आहे. ते मद्रासचे आहेत. ते फार चांगले माणूस आहेत आणि विद्वान आहेत. ते श्रीनिवास शास्त्रींचे भक्त आहेत. त्यांनी स्वतःला या कामाला वाहून घेतले आहे. इतर अनेक लोकांबरोबर ते या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. ही करुण कथा आहे आणि लक्ष वेधून घेणारीही आहे. अनेक लोक या कामात गुंतलेले आहेत. कलकत्त्यात फार मोठे महारोग्यांचे रुग्णालय आहे. ते मोठ्या प्रमाणावर काम करते. हे सर्व काम परोपकाराच्या भावनेने करण्यात येते आणि ते दिवसेंदिवस वाढत आहे. मी जेव्हा कलकत्त्यात होतो तेव्हा मला तिथे नेले होते आणि मी काही तरी लिहावे अशी विनंतीही

मला करण्यात आली होती. परंतु मी इथे येण्याची तयारी करत होतो. देशाच्या वेगवेगळ्या भागात अनेक महारोगी रुग्णालये आहेत. परंतु जितक्या मोठ्या प्रमाणात हे काम केले जायला पाहिजे तितक्या प्रमाणात केले जात नाही. मला असे म्हणायचे नाही की प्रत्येकाने याच कामात रस घेतला पाहिजे. परंतु आपल्याला जेव्हा सवडीचा मोकळा वेळ असतो तेव्हा आपण अशा प्रकारच्या कामात रस घेऊ शकतो हे आपल्याला माहीत असायला पाहिजे. आपण केवळ एकमेकांचा नाश करण्यातच गुंतलेलो असलो पाहिजे काय? मी तर म्हणेन की हा सर्वात वाईट रोग आहे, सर्वात वाईट प्रकारचा महारोग आहे. आपण चांगल्या कामाकडे दुर्लक्ष करतो आणि आपसात भांडून आपला स्वतःचा नाश करून घेतो. हिंदू मुसलमानांना मारतात आणि मुसलमान हिंदू आणि शिखांना मारतात. आपण किती काळ परस्परांना मारत राहणार आहो? आपल्याजवळ जो वेळ आहे त्याचा सदुपयोग करायचा व ज्यामुळे प्रेमभाव निर्माण होईल अशा कामात तो लावला तर चांगले होणार नाही काय!

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १;, ४५२-५६

---------------

## १४७. वायव्य सरहद्द प्रांतातील हिंदू आणि शीख निर्वासितांना सल्ला

[ऑक्टोबर २४, १९४७च्यापूर्वी](हा संदेश पेशावर, ऑक्टोबर २४ या तारखेखाली प्रकाशित झाला होता.)

माझा संदेश अपरिवर्तनशील आहे. तुम्ही जर मृत्यू पत्करण्याइतके शूर असाल आणि मृत्यू पत्करत असतानाही तुमच्या शत्रूला क्षमा करू शकत असाल तर तिथेच राहा. हे सत्य जर तुम्ही आत्मसात केले नसेल तर लवकरात लवकर परत या.

'द हिंदू', ऑक्टोबर २६, १९४७

--------------------

# १४८. कुठे अहिंसा, कुठे खादी?

काठेवाडहून एक गृहस्थ लिहितात -

**इतर जिल्हे आणि प्रांत यांच्याप्रमाणेच काठेवाडच्या लोकांचीही खादी आणि अहिंसेवरील श्रद्धा कमी होत चालली आहे. राजकीय विषयात अहिंसा कशी काय काम करू शकते असे काँग्रेसचे अनेक लोक आणि गांधीवादी विचारत आहेत.**

पत्रलेखकाने उदाहरणासहित अनेक युक्तिवाद केले आहेत. परंतु मी मात्र पत्रातील महत्त्वाचा भाग उद्धृत करण्यावरच समाधान मानले आहे. त्यात तीन दोष आहेत.

इतक्यात मी स्पष्ट करून सांगत असतो की काठेवाड काय आणि देशातील इतर भाग काय कोणाचीच अहिंसा आणि खादीवर खरी श्रद्धा राहिलेली नाही. लोक अहिंसेचे पालन करतात आणि त्याचे चिन्ह म्हणून खादीचा वापर करतात असे समजून मी स्वतःचीच फसवणूक करून घेतली होती. वस्तुस्थिती ही आहे की अहिंसेच्या नावावर लोकांनी वरवरची शंढांची शांतता ठेवली होती. त्यांच्या अंतःकरणात तर हिंसाच भरलेली होती. त्यांनी आपल्या अंतःकरणातील हिंसा काढून टाकण्याचा प्रयत्नसुद्धा कधीही केला नाही. या गोष्टीचा पडताळा तर आता आपल्याला चांगल्या प्रकारे येऊ शकतो. राजकोट प्रकरणी मी काठेवाडमध्ये गेलो होतो तेव्हाच काठेवाडमध्ये राम नाही याचा अनुभव आला होता. यामुळे आज काठेवाडमध्ये श्रद्धा कमी होत चालली आहे असे म्हणण्यात काहीही अर्थ नाही.

राजकारणात अहिंसा चालत नाही असे म्हणण्यातही अर्थ नाही. विदेशी सत्तेशी लोक जेव्हा झुंजत होते तेव्हा ते राजकारण नव्हते तर अजून काय होते? उलटपक्षी आज भावाभावांची जी लाजिरवाणी भांडणे सुरू असलेली आपण पाहतो त्याचा राजकारणाशी संबंध कमी आहे काय? आज धर्माच्या नावावर देशात अधर्म पसरतो आहे. इतकेच नाही

विदेशी सत्तेविरुद्ध आपण जी बाह्य शांतता पाळत होतो तीसुद्धा आज स्पष्टपणे अनुपस्थित आहे.

काँग्रेसचे लोक आणि गांधीवादी यांत अंतर दाखवताना पत्रलेखकाने तिसरी चूक केली आहे. हे अंतर निराधार आहे. जर कोणी गांधीवादी असेल तर तो केवळ मी आहे. भक्त केवळ ईश्वराचे असतात. ईश्वर असल्याचा दावा मी कधीही केलेला नाही. मग माझे अनुयायी कसे असू शकतात? आणि जे स्वतःला गांधीवादी म्हणवतात ते काँग्रेसचे लोक नाहीत असे कसे म्हणता येऊ शकते? काँग्रेसच्या नोंदणी पुस्तकात चार आणे भरून लोकांनी जरी नाव नोदवलेले नसेल तरी काँग्रेसचे अगणित सेवक आहेत. मीसुद्धा याच श्रेणीत मोडतो हे वाचकांनी लक्षात ठेवावे. यामुळे हा जो भेद करण्यात आलेला आहे तो खोटा आहे.

मी वारंवार सागितले आहे की देशात आज जे काही सुरू आहे त्यात माझा कोणताही सहभाग नाही आणि माझे कोणी ऐकतही नाही. काँग्रेसने जेव्हा सत्ता स्वीकारली तेव्हा तिने स्वतःहोऊन अहिंसेला निरोप दिला हे काही गुपित नाही. याशिवाय अन्नधान्य आणि कापड यांच्या विक्रीवरील नियंत्रण (रेशनिंग) देशाकरिता घातक आहे असा माझा विश्वास आहे. माझे जर चालले तर धान्याचा एक दाणासुद्धा मी विदेशातून आयात केला नसता. आजसुद्धा भारतात पुरेसे अन्नधान्य आहे असा माझा ठाम विश्वास आहे. नियंत्रणामुळे तो साठा लपवून ठेवण्यात आला आहे. याशिवाय लोक जर माझे अनुसरण करतील तर देशात हिंदू, शीख, मुसलमान यांची भांडणे होणार नाहीत. स्पष्ट आहे की आज माझ्या बोलण्याला किंमत राहिलेली नाही. माझा आवाज अरण्यरुदनासारखा झाला आहे.

खादीबद्दल बोलायचे तर तिला जरी आपण अहिंसेपासून वेगळी केली तरी तिला काही स्थान आहे. परंतु अहिंसेचे प्रतीक म्हणून जेव्हा तिच्याकडे पाहिले जात असे तेव्हा तिला जशी प्रतिष्ठा होती तशी आता नाही. जे राजकीय क्षेत्रात आहेत ते पद्धत म्हणून खादी

वापरतात. गिरण्यांमध्ये कापड तयार झाले नसते तर करोडो लोकांना कपड्याशिवाय नागडेउघडे राहावे लागले असते असे गृहीत धरल्यामुळे आज आपल्याला खादीचा विजय होताना दिसत नाही तर गिरणीतील कापडाचा विजय होताना दिसत आहे. याहून अधिक भ्रामक गोष्ट कोणती असू शकते? आपण देशात भरपूर कापूस पिकवतो. आपल्याजवळ किती तरी हातमाग आणि चरखे आहेत. भारताला हातकताई आणि हातविणाई नवीन नाही. परंतु का कुणास माहीत आपल्या मनात अशा भीतीने घर केले आहे की आपल्या गरजेकरितासुद्धा करोडो लोक हातकताई आणि हातविणाई करणार नाहीत. भीतीने पछाडलेल्या माणसाला भीतीचे कोणतेही कारण नसलेल्या ठिकाणीसुद्धा भीती वाटत असते. आणि प्रत्यक्ष रोगाने मरणारांपेक्षा घाबरून मरणारे किती तरी अधिक असतात.

नवी दिल्ली, ऑक्टोबर २४, १९४७

गुजरातीवरून. हरिजनबंधू, नोव्हेंबर २, १९४७

--------------

# १४९. वेंकटराम शास्त्री यांना पत्र

दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४७

प्रिय शास्त्रीजी, (१८७४-१९५३. मद्रास येथे अधिवक्ता. श्रीनिवास शास्त्री यांचे विद्यार्थी आणि मित्र)

तुम्ही ज्या काळजीने आणि तत्परतेने महाभारतातील श्लोकांची नक्कल करून पाठवली आणि त्यावर तुमची टिप्पणी जोडली (पाहा शस्त्रांचे वैय्यर्थ, जानेवारी ९, १९४७) त्याचे आभार मी कसे मानू?

माझी तक्रार ही आहे की या महान काव्याच्या लेखकाने सांगितलेले सद्गुण केवळ संन्यासी लोकांकरिता दाखवले आहेत. गीतेची रचना करणारानेच उर्वरित ग्रंथाची रचना केली असेल काय?

जे.सारखे जे लोक भ्रमात पडून काम करतात. त्यांच्यात परिवर्तन होईल अशी आशा कशी करता येऊ शकते?

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

मुळावरून. टी. आर. वेंकटराम शास्त्री पेपर्स. सौजन्य - नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

-------------------

# १५०. जाल पावरी यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४७

भाई जाल पावरी,

मला तुमचे पत्र मिळाले. मला किती ओझे वाहावे लागत आहे याची तुम्हाला कल्पना नाही. मला तुमच्या वडिलांच्या (खुरशेदजी एरकजी पावरी, १८६६-१९४७, भारतीय पारशी लोकांचे उच्च धर्मगुरू) मृत्यूची माहिती नव्हती. तुम्ही मला कळवले हे चांगले केले. ते जरी नसले तरी ते जिवंत आहेत. मग शोक कशाकरिता? आपण जे लोक त्यांच्या मागे राहिलो आहो ते त्यांचे सेवाकार्य पुढे सुरू ठेवू या.

तुमचा,

मो. क. गांधी

डॉ. जाल पावरी, एम. ए. पीएच. डी.,

ताजमहाल हॉटेल,

मुंबई

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०८२६. सौजन्य - बाप्सीबानू पावरी

----------------

## १५१. नाराणदास गांधी यांना पत्र

ऑक्टोबर २४, १९४७

चि. नाराणदास,

हे पत्र वाच. (नरसिंहदास गोर्धनदास यांचे. गांधीजींच्या उत्तराकरिता पाहा पुढील विषय आणि 'कुठे अहिसा, कुठे खादी', ऑक्टोबर २४, १९४७). तो नानाभाईंना (नरसिंहप्रसाद कालिदास भट) पाठव. ते वाचल्यानंतर तुला काय वाटते ते सांग. नानाभाईंना काय वाटते तेसुद्धा त्यांना विचार. याबद्दल मी काही तरी 'हरिजन'मध्ये लिहिले आहे. ते तू प्रसंगोपात वाचशीलच.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ८६४६. सौजन्य - नाराणदास गांधी

----------------

## १५२. नरसिंहदास गोर्धनदास यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४७

भाई नरसिंहदास,

मला तुमचे पत्र मिळाले. हरिजनमधून मी त्याचे संक्षिप्त उत्तर दिले आहे. त्यापलीकडे जाण्याचा माझा विचार नाही. जे लोक माझे अनुसरण करतात तेच माझे नातेवाईक आहेत. मी तुमचे पत्र नाराणदासकडे पाठवले आहे. (पाहा याआधीचा विषय) व त्याला ते नानाभाई भट यांना दाखवण्याकरिता सांगितले.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

---------------

# १५३. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

इथे जी श्रमपरिषद भरणार आहे तिच्यात आशियातील अनेक देशाचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत ही बातमी बहुधा ४-५ दिवसांपूर्वी वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाली होती. ही परिषद या महिन्याच्या सत्तावीस तारखेला भरणार आहे. मी त्या परिषदेचे उद्घाटन करणार आहे असेही वृत्तपत्रांनी सांगितले आहे. मला याबद्दल काहीही माहिती नाही. तसेच मी तिचा कोणाजवळ उल्लेख केल्याचेही मला आठवत नाही. तुम्हांला हे कसे कळले असे मी एका वार्ताहराला विचारले. हे वृत्त बरोबर नसल्याचे प्रकाशित करण्याकरिता मी त्याला सांगितले. आपले मजूर मंत्री श्री जगजिवन राम मला भेटायला आले होते. मी त्यांना हेच सांगितले. ते म्हणाले की तुम्हांला तर परिषदेला उपस्थित राहावेच लागेल. त्या दिवशी सोमवार आहे आणि तुम्ही दिल्लीतच असल्यामुळे विचारण्याची काही गरजसुद्धा नव्हती. आपली वृत्तपत्रे अशी आहेत. मी जवाहरलालजींनाही सांगितले की मी कदाचित चुकून हो म्हणालो असेन. तर त्यांनाही आश्चर्य वाटले. मला तिथे जाण्याची काही आवश्यक्ता नाही कारण मी आता कोणत्याही कामाचा माणूस तर राहिलोच नाही. आज माझे एकच काम आहे आणि तेच किती तरी जास्त आहे. त्या कामात मी यशस्वी झालो तर माझे जिवनभराचे काम पूर्ण होईल. आपण सर्व एका देशाचे आहो आणि सर्वांनी एक होऊन राहिले पाहिजे. इथे जे हिंदू, मुसलमान, शीख, पारसी, ख्रिश्चन वगैरे आहेत ते सर्व एक होऊन राहिले तर मला इतर कशाचीही फिकीर वाटणार नाही. ते सर्व भारताचे आहेत, त्यांना इथेच राहायचे आहे मग त्यांनी का भांडावे?

जो माणूस बालपणापासून हे स्वप्न पाहत आला आहे त्याच्याकरिता हा फार मोठा आघात आहे. त्याने स्वातंत्र्याकरिता मेहनत केली आणि स्वातंत्र्य मिळालेसुद्धा. परंतु त्याबरोबरच हे विष पसरले. हे मला चांगले वाटत नाही. याहून अधिक वाईट काय असू शकते? मला ही वाईट गोष्ट थांबवायची आहे. प्रयत्न करणे माझे काम आहे. तसे व्हायचे असेल तर होईल, नाही तर नाही होणार. भजनात आहे "कोणी निंदा, कोणी वंदा" (आश्रम भजनावली, भजन क्रमांक १५९.) सर्व एक आहे. कारण मला तर केवळ रामाचे भजन करायचे आहे आणि त्याला मी सर्व काही अर्पण केले आहे. परंतु प्रयत्न तर करावेच लागतील. त्यातच सर्व जीवन व्यतीत करायचे आहे.

नेहमीप्रमाणे आजसुद्धा कांबळी येणे सुरू आहे. ज्यांना ती पाठवायला पाहिजे त्यांना ती पाठवण्यात येत आहेत. फार मोठी गरज आहे. किती तरी कांबळी हवी आहेत. आपण सर्वांचे समाधान करू शकत नाही. देव सगळ्यांना पोहोचवील. जे निराधार आहेत आणि करोडपतीचे भिकारी झाले आहेत त्यांना निर्वस्त्र उपाशीतापाशी राहावे लागेल आणि भिकारी व्हावे लागेल? आपण जर खरे असू तर ईश्वर आपल्याला खायला देईल आणि नालायक झालो तर नागडेउघडे आणि उपाशीतापाशी राहावे लागेल.

काल मी कुष्टरोगाला बळी पडलेल्या लोकांचा उल्लेख केला होता. त्या संदर्भात मी जगदीशनचा उल्लेख केला होता. ते महान विद्वान आहेत. त्यांना हा रोग झाला होता. त्यांचा हा रोग पूर्णपणे दुरुस्त झालेला नसला तरी तो बराच नियंत्रणात आहे. ते कुष्टरोग्यांमध्ये बरेच काम करतात व त्यात बराच रस घेतात. ते त्यांच्यात मोकळेपणाने मिसळतात. ते अर्थातच कठोर परिश्रम करणारे गृहस्थ आहेत. ते मद्रासला राहतात, वर्धेला नाही. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून ते तिथे आहेत. या विषयावर त्यांनी माझ्याशी पत्रव्यवहार केला आहे. काही दिवसांपूर्वी मला त्यांचे पत्र मिळाले होते परंतु मी ते आजच वाचले. त्यात मला एक सूचना आढळली जी तुम्हांला स्पष्ट करून सांगण्याची माझी इच्छा आहे. त्यांचे म्हणणे

आहे की महारोग्यांना महारोगी म्हणू नये. लोक त्याचा वाईट अर्थ घेतात आणि त्यांना अस्पृश्यांपेक्षाही वाईट समजतात. निदान अस्पृश्य कोणाचे नुकसान तरी करत नाहीत. अस्पृश्यांशी शारीरिक संबंध आल्यामुळे हा रोग होतो असा आपला समज आहे. मी आधीच सांगितले आहे की खरा महारोग अपवित्र मनाची अवस्था आहे. आपल्याच बांधवांचा द्वेष आणि काही जमातीच्या वा वर्गाच्या लोकांबद्दल वाईट बोलणे हे मानसिक विकृतीचे लक्षण आहे, आणि ते महारोगापेक्षाही वाईट आहे. असे लोक जर महारोग्यांपेक्षाही वाईट असतील तर मग महारोग झालेल्यांना महारोगी का म्हणावे? या लोकांचे वर्णन आपण महारोगाचे बळी असे करू या, 'महारोगी' असे नाही. वाईट नावामुळे जर लोक वाईट आहेत असा समज होत असेल तर त्यांना तशा नावाने संबोधू नये. तुम्ही गुलाब फुलाला कोणतेही नाव दिले तरी, अगदी वाईटाहून वाईट नाव दिले तरी गुलाब आपला सुगंध गमावणार नाही. जगदीशनला जर हेच म्हणायचे असेल तर ते बरोबर आहे आणि महारोग हा काही असा एकच रोग नाही की जो शारीरिक संसर्गामुळे दुसऱ्याला होऊ शकतो. खरूज झालेला माणूस जर दुसऱ्याला स्पर्श करील तर त्याचा रोग दुसऱ्याला होण्याची शक्यता असते. महारोग हा तसाच रोग आहे आणि सर्दी, कॉलरा, प्लेग इत्यादी रोगांसारखाच तोही एक रोग आहे. मग त्या रोगाने ग्रस्त असलेल्या माणसाकडे लोकांनी घृणेने का पाहावे? माणूस जेव्हा खरोखरच महारोगाने ग्रस्त होतो तेव्हा लोक त्याच्याकडे घृणेने पाहायला सुरुवात करतात. ते त्याला कमी प्रतीचा प्राणी समजू लागतात. परंतु खरे कमी प्रतीचे लोक ते असतात जे घृणा करतात. यामुळे या विषयावर आज मी परत बोलायचे ठरवले.

राजकुमारी वर्धा येथील परिषदेला ३० तारखेला उपस्थित राहणार होत्या. त्यांनी जायला पाहिजे होते. डॉ. जिवराजसुद्धा जाणार होते. त्यांनीसुद्धा जायला पाहिजे होते. परंतु ते कसे जाऊ शकतात? ते त्यांच्या कामाशी बांधले गेलेले आहेत. ते केवळ एक दिवस

आपल्या कामापासून दूर जाऊ शकतात. परंतु त्याकरिता दोन दिवस लागले असते कारण ते त्याच दिवशी परतू शकत नव्हते. वर्धेला कोणतेही विमान जात नाही. ते केवळ नागपूरला जाते. ते दोन दिवसांनंतरच परतू शकतात.

मला एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करायचा आहे. ब्रजकिशनने तुम्हांला सांगितलेच आहे की मी उद्या तुरुंगात जाऊन प्रार्थना करणार आहे. मी तिथे जाऊन प्रार्थना करावी अशी तुरुंगात राहणाऱ्या कैद्यांची इच्छा आहे. यामुळे मला आनंद होईल आणि तुम्हांलाही आनंद होईल, परंतु तुम्हांला माझ्याबरोबर प्रार्थना करता येणार नाही. तो तुरुंग आहे आणि केवळ कैदीच तिथे जाऊ शकतात. मी तिथे जात आहे कारण त्यांनी मला निमंत्रित केले आहे. आपण परवा परत इथेच भेटू.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - १', पृष्ठ ४५७-९

--------------

# १५४. नवीन विद्यापीठे

प्रांतांमध्ये नवीन विद्यापीठे काढण्याचे जणू वेड लागले आहे. गुजरातला गुजरातींसाठी एक पाहिजे, महाराष्ट्राला मराठींसाठी, कर्नाटकला कन्नडांसाठी, ओरिसाला ओरियांकरिता, आसामला आसामींकरिता आणि असेच अजून काही काही. मला वाटते की प्रांतांतील या संपन्न भाषा आणि त्या बोलणाऱ्या लोकांचा पूर्णपणे विकास करायचा असेल तर अशी विद्यापीठे असणे आवश्यक आहे. परंतु असे वाटते की हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता आवश्यकतेपेक्षा जास्त घाई केली जात आहे. याकरिता आधी भाषावार प्रांतरचना केली पाहिजे. त्यांचे वेगवेगळे प्रशासन असल्यामुळे जिथे विद्यापीठे नाहीत तिथे निघतील. मुंबई प्रांतात मराठी, गुजराती आणि कन्नड या तीन भाषा बोलल्या जातात आणि यामुळे त्याच्या विकासात अडथळा येतो. मद्रास प्रांतात तमिळ, तेलगू, मल्याळम आणि कन्नड या चार भाषा बोलल्या जातात. अशा प्रकारे काही प्रांतात एकापेक्षा अधिक भाषा आढळतात. आंध्र देशाला आपले वेगळे आंध्र विद्यापीठ आहे हे खरे. ते स्थापित होऊन थोडा काळ लोटला आहे. परंतु त्याने चांगली प्रगती केली आहे असे म्हणता येऊ शकत नाही. दोन महिन्यापूर्वीच भारत स्वतंत्र झाला. अन्नामलै विद्यापीठ तमिळ भाषेकरिता आहे असे मानता येऊ शकते. परंतु कोण म्हणेल की त्यात तमिळ भाषेला योग्य स्थान मिळाले आहे?

नवीन विद्यापीठाकरिता योग्य वातावरण असले पाहिजे. ते स्थिरस्थावर होण्याकरिता अशा शाळा आणि महाविद्यालये असली पाहिजे की जे आपापल्या प्रांताच्या भाषांच्या माध्यमातून शिक्षण देतील. असे झाले तरच विद्यापीठाकरिता वातावरण तयार झाले असे म्हणता येईल. विद्यापीठ सर्वोच्च शिक्षण देणारी संस्था आहे. परंतु पाया मजबूत नसेल तर त्याच्यावर उभारण्यात आलेली इमारत मजबूत असेल अशी आशा करता येऊ शकत नाही.

आपण राजकीय दृष्टीने जरी स्वतंत्र असलो तरी पश्चिमेच्या सुप्त प्रभावापासून आपण मुक्त झालो असे क्वचितच म्हणता येईल. जे लोक असे समजतात की पश्चिमेकडून सर्व प्रकारचे ज्ञान मिळू शकते त्यांना मला काहीही म्हणायचे नाही. आणि माझे असेही मत नाही की पश्चिमेकडून कोणतीच चांगली गोष्ट मिळू शकत नाही. तिथे काय चांगले आहे, काय वाईट आहे हे समजण्याइतकी प्रगती अजून आम्ही केलेली नाही. आम्ही विदेशी सत्तेच्या जोखडातून स्वतंत्र झालो याचा अर्थ आम्ही विदेशी भाषा आणि विदेशी विचारांच्या प्रभावापासूनही मुक्त झालो असे आताच म्हणता येऊ शकत नाही. नवीन विद्यापीठे निर्माण करण्याआधी आपण थोडे थांबावे आणि नवजीवन देणाऱ्या स्वातंत्र्याच्या या वातावरणात थोडा विचार करावा. असे करणे हा समंजसपणा होणार नाही काय? असे करणे आपले कर्तव्य नाही काय? विद्यापीठ केवळ पैशांनी अथवा मोठमोठ्या इमारतींनी तयार होत नाही. विद्यापीठामागे जागृत जनतेचा विचार असला पाहिजे. त्यांच्यामागे चांगले शिकवणाऱ्या योग्य शिक्षकांची गरज असते. त्याच्या संस्थापकांत दूरदर्शिता असली पाहिजे.

माझ्या मते विद्यापीठ स्थापन करण्याकरिता पैशाची व्यवस्था करण्याचे काम लोकशाहीतील सरकारचे नसते. लोकांना जर विद्यापीठ स्थापन करण्याची इच्छा असेल तर त्याकरिता ते पैसेही देतील. लोकांच्या पैशांनी स्थापित झालेली विद्यापीठे देशाची शोभा वाढवतील. ज्या देशाचा राज्यकारभार विदेशी लोकांच्या हातात असतो तिथे सर्व गोष्टी वरून खाली टपकत असतात. जिथे जनतेचे शासन असते तिथे सर्व गोष्टी खालून वर येतात आणि त्यामुळेच त्या टिकत असतात, त्यांना सन्मान मिळतो, प्रतिष्ठा मिळते आणि त्या लोकांची शक्ती वाढवतात. ज्याप्रमाणे चांगल्या जमीनीत पेरलेले बी १० पट पीक देते त्याप्रमाणेच विद्याविकासाकरिता खर्च करण्यात आलेला पैसा किती तरी पटीने लाभदायक होत असतो. विदेशी शासनांतर्गत स्थापित झालेल्या विद्यापीठांनी उलटे काम

केले आहे. त्यांचा वेगळा काही परिणाम होऊ शकतही नाही. यामुळे भारत जोपर्यंत नवीनच मिळालेले स्वातंत्र्य चांगल्या प्रकारे पचवत नाही तोपर्यंत नवीन विद्यापीठ निर्माण करताना आपण सावधगिरी बाळगली पाहिजे.

याशिवाय हिंदू मुसलमान संघर्षाने असे भयानक रूप धारण केले आहे की ते कुठे जाऊन थांबेल हे आज सांगणे कठीण झाले आहे. कल्पना करा की काही अकल्पित घडले आणि एकही मुसलमान संघराज्यात सुरक्षित व प्रतिष्ठेने राहू शकणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आणि पाकिस्तानमधील हिंदूंची आणि शिखांचीही तशीच परिस्थिती झाली तर आपले शिक्षण विषारी रूप धारण करील. उलटपक्षी हिंदू, मुसलमान आणि वेगवेगळ्या इतर धर्माचे सर्व लोक भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये संपूर्णपणे सुरक्षित वातावरणात प्रतिष्ठितपणे भाऊभाऊ म्हणून राहिले तर स्वाभिविकपणे आपले शिक्षण सुंदर रूप धारण करील. आपल्या देशात वेगवेगळ्या धर्माचे लोक एकत्र राहिल्यामुळे जी एक सुंदर संस्कृती निर्माण झाली आहे तिला आपण एक तर मजबूत बनवू आणि अधिक सुंदर रूप देऊ आणि नाही तर आपण अशा काळाचा शोध घेत बसू की जेव्हा भारतात केवळ हिंदू धर्माचे लोकच राहत होते. इतिहासात कदाचित असा काळ सापडणारच नाही. परंतु जरी असा काळ सापडला आणि आपण त्याच्या मागे गेलो तरी आपण किती तरी शतक मागे ढकलले जाऊन त्या काळ्या कालखंडात जाऊ आणि जग त्याकरिता आपली घृणा करील व आपल्याला नावे ठेवील. उदाहरणार्थ इतिहासातील मोगल काळ आपण विसरण्याचा व्यर्थ प्रयत्न केला तर जगातील सर्वात सुंदर जामा मशिदीला आपल्याला विसरावे लागेल, वा अलिगढच्या मुस्लिम विद्यापीठाला विसरावे लागेल अथवा जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेल्या ताजमहालला विसरावे लागेल वा मोगल काळात दिल्ली आणि आग्रा येथे बांधण्यात आलेल्या मोठमोठ्या किल्ल्यांना विसरावे लागेल. मग आपल्याला त्या दृष्टिकोनातूनच आपला इतिहास लिहावा लागेल. आजचे वातावरण

खरोखरच असे नाही की आपण योग्य निर्णायापर्यंत पोहोचू शकू. आपले दोन महिन्याचे स्वातंत्र्य रंगरूप धारण करण्याचा प्रयत्न करत आहे. अखेरीस ते कोणते रूप धारण करील हे आम्हांला माहीत नाही. जोपर्यंत आपल्याला हे नीटपणे कळत नाही तोपर्यंत आपण सध्याच्या विद्यापीठांमध्येच योग्य फेरफार करून त्यात संजीवन भरण्याचा प्रयत्न केला तर तेच पुरे होईल. यातून आपल्याला जो अनुभव येईल तो नवीन विद्यापीठ स्थापन करत असताना उपयोगात येईल.

आता राहिली गोष्ट बुनियादी शिक्षणाची. हे शिक्षण सुरू होऊन अजून ८-१० वर्षच झाले आहेत. त्यापासून आलेला अनुभव आपल्याला मॅट्रिकच्या पुढे नेत नाही. तरीही जे लोक या प्रयोगात लागले आहेत त्यांच्या मनात बुनियादी शिक्षणाचा विकास होतच असतो. ज्या संस्थेमागे आठदहा वर्षांचा ठोस अनुभव असेल त्या संस्थेच्या शिफारशी कोणताही शिक्षणतज्ज्ञ फेटाळून लावू शकत नाही. हे बुनियादी शिक्षण देशाच्या वातावरणात तयार झाले आहे व ते देशाच्या गरजा पूर्ण करते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. हे वातावरण हिंदुस्थानच्या सात लाख खेड्यांत आणि त्यांच्यांत राहणाऱ्या करोडो लोकांमध्ये पसरलेले आहे. त्यांना विसरू तर आपण भारतालाही विसरू. खरा भारत शहरात नाही तर या लाखो खेड्यांत वसलेला आहे. विदेशांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता शहरांची निर्मिती झाली होती. दोन महिन्यांपूर्वी विदेशी सत्ता गेलेली असली तरी ते जसे होते तसेच आहेत. विदेशी सत्तेचा प्रभाव अजूनही कायम आहे. इतक्या लवकर तो जाऊही शकत नाही.

हा लेख मी दिल्लीत बसून लिहीत आहे. मला जर भारताबद्दल काहीही माहीत नसेल तर मी इथे बसल्याबसल्या गावांचे बरोबर चित्र कसे रेखाटू शकतो? जी गोष्ट मला लागू होते तीच आमच्या मंत्र्यांनाही लागू होते. अंतर इतकेच की त्यांना ही गोष्ट विशेषत्वाने लागू होते.

आता आपण बुनियादी शिक्षणाच्या मूलभूत गोष्टींकडे दृष्टी टाकू या -

१. संपूर्ण शिक्षण स्वावलंबी झाले पाहिजे. म्हणजे त्याच्या उभारणीकरिता लागलेले भांडवल वगळता, जे तसेच कायम राहील, अखेरीस त्याने स्वतःचा खर्च स्वतः भरून काढला पाहिजे.

२. यात शेवटच्या पातळीपर्यंत हाताचा उपयोग केला जाईल. म्हणजे विद्यार्थी आपल्या हातांनी कोणता ना कोणता व्यवसाय करील.

३. संपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांच्या प्रांतीय भाषेत दिले पाहिजे.

४. यात सांप्रदायिक - धार्मिक शिक्षणाकरिता कोणतेही स्थान नसेल. परंतु मूलभूत नैतिक शिक्षणाकरिता भरपूर वाव असेल.

५. हे शिक्षण, मग ते मुले घेवो की प्रौढ, स्त्रिया घेवो की पुरुष, विद्यार्थ्यांच्या घरातही पोहोचेल.

६. हे शिक्षण घेणारे लाखो करोडो विद्यार्थी स्वतःला संपूर्ण भारताचे नागरीक समजणार असल्यामुळे त्यांना एक आंतरप्रांतीय भाषा शिकावी लागेल. नागरी वा उर्दू लिपीत लिहिली जाणारी हिंदुस्तानीच संपूर्ण देशाची एक भाषा होऊ शकते. यामुळे विद्यार्थ्यांना या दोन लिप्या अवश्य शिकाव्या लागतील.

या मूलभूत विचाराशिवाय वा त्याला बाजूला सारून जी विद्यापीठे स्थापन केली जातील ते देशाचे कोणतेही हित करणार नाही, उलट हानीच करतील. यामुळे आशा आहे की नवीन विद्यापीठ उघडण्याआधी थोडा विचारविनिमय केला पाहिजे या विचाराशी सर्व शिक्षणतज्ज्ञ सहमत होतील.

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २५, १९४७

हरिजन नोव्हेंबर २, १९४७

# १५५. बलवंतसिंह यांना पत्र

**नवी दिल्ली,**

**ऑक्टोबर २५, १९४७**

**श्री बलंवंतसिंह,**

**तुम्ही मनूला पाठवलेले पत्र बापूंना वाचून दाखवण्यात आले. ते म्हणतात - तुम्ही अशा प्रकारे निराश का होता? खरे म्हणजे गोशाळा बंद कुठे झाली, तिचा विस्तार झाला आहे. गावातील जनावरांच्या अवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करा, दुग्धोत्पादन वाढवा, गोवंशात सुधारणा करा. दुधात पाणी मिसळले असेल तर ते शोधून काढण्याची वैज्ञानिक पद्धत शोधून काढा व अशाच इतर गोष्टी. हे सर्व तुम्ही करू शकता आणि केले पाहिजे. गायीची ही खरी सेवा असेल.**

**सुशीला**

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. १९८९

---------------

## १५६. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

या तुरुंगातील कैद्यांसमोर प्रार्थना करण्याचे आणि नेहमीच्या पद्धतीप्रमाणे भाषण देण्याचे जेव्हा मला निमंत्रण मिळाले तेव्हा मला फार आनंद झाला. सर्व कैद्यांना कदाचित माहीत नसेल की अगदी दक्षिण आफ्रिकेतील दिवसांपासून मी फार जुना कैदी होतो आणि मी सांगू शकतो की माझ्या दृष्टीतून मी अपराधी नव्हतो, परंतु शासनाच्या दृष्टिकोनातून मात्र मी निरपराधी होतो असे म्हणता येऊ शकत नव्हते. किती तरी प्रकारच्या तुरुंगात मी गेलो आहे आणि किती तरी प्रकारचे तुरुंग मी पाहिले आहेत. दक्षिण आफ्रिकेतील तुरुंग फार कडक असायचे आणि तिथे हिंदी लोकांना तर काहीच किंमत नव्हती. तिथे कोणी बॅरिस्टर असला तरी त्यांच्याकरिता कोणताच फरक पडत नसे. सर्व भारतीय कुली आहेत असे ते समजत असत. तिथे एकीकडे भारतीय होते, दुसरीकडे हब्शी होते आणि ब्रिटिशसुद्धा होते. ते सर्व आपापल्या जगात राहत असत. जेव्हा सत्याग्रह सुरू झाला (जुलै १९०७साली) तेव्हा त्यात हजारो सत्याग्रही सामील झाले कारण सत्याग्रहात काही दोनचार माणसेच असू शकत नव्हती. माझ्या पहिल्या तुरुंगवासाच्या वेळी (जानेवारी १०, १९०८; पाहा जोहानीसबर्ग खटला, जानेवारी १०, १९०८) आमच्यापैकी १५० लोकांना तुरुंगात टाकण्यात आले. सुरुवातीला तिथे फार लोक नव्हते. मी तिथे होतो आणि माझ्याबरोबर ४ वा ५ लोक अजून होते. परंतु हळूहळू आमची संख्या १५०पर्यंत पोहोचली. आम्हा सर्वांना एका वार्डात ठेवण्यात आले होते व आमच्याबरोबर हब्शी कैदीसुद्धा होते. अशा प्रकारच्या गर्दीमुळे आम्ही अगदी कंटाळलो होतो. तिथल्या तुरुंगाचे नियम किती कठोर होते आणि त्यांची अमलबजावणी किती निर्दयपणे करून घेतली जात असे हे मी तुम्हांला सांगू इच्छितो. आम्ही राजकीय

कैदी आहो आणि इतर गुन्हेगार कैदी असे म्हणून इथे भेदभाव केला जात नाही. भारतात तर आपण गोंधळ घालतो. दक्षिण आफ्रिकेत असा कोणताही फरक केला जात नाही. तिथे सर्वांना गुन्हेगार कैदीच समजतात. मी तर असे समजत नाही की जे राजकीय कैदी आहेत ते चांगले आहेत आणि जे अपराध करून आले आहेत ते वाईट आहेत. ज्यांनी कायदा मोडला ते तर सर्व कायद्यासमोर सारखेच असतात. मग या अपराध्यांमध्ये काय फरक करायचा? परंतु इथे तर आम्ही राजकीय कैदी झालो आणि त्यातही अ, ब, क वर्गाचे कैदी झालो. असे झाले कारण आमचे एक फार मोठे आंदोलन होते. करोडोच्या संख्येत आपण आहो आणि त्यात मोठमोठे लोकही होते. परंतु त्या बिचाऱ्यांमध्ये कोण मोठे लोक असणार? त्यात हिंदू, मुसलमान, पारशी सर्व होते. हा हिंदू आहे, हा मुलमान, हा पारशी असा कोणी तिथे भेदसुद्धा करत नसे. सर्व कुली होते वा असे म्हणाना की सर्व हिंदुस्नी होते. यामुळे आम्ही मोठे आहो, आम्हांला अ वर्ग द्या, आमच्यापेक्षा लहान त्यांना ब वर्ग द्या आणि त्याहून लहान त्यांना क वर्ग द्या असा मोठेपणाही आम्ही तिथे दाखवू शकत नव्हतो. मी तर असे काही मानत नाही, परंतु इथे आम्ही हे सर्व केले. मी तर असे समजतो जो कैदेत गेला तो कैदी. मी असे समजत नाही की केवळ तुरुंगात गेलेले लोकच अपराध करत असतात आणि बाहेर पांढरेशुभ्र कपडे घालून बसलेल्या लोकांनी कोणताही अपराध केलेला नसतो. मला दहा वेळा तुरुंगात टाकण्यात आले होते. (ते असे - १. जानेवारी १०ते ३०, १९०८, जोहान्सबर्ग. २. ऑक्टोबर ७ ते डिसेंबर १२, १९०८ -व्होल्करस्ट, ३. फेब्रुवारी २५ ते मे २४, १९०९ - व्होल्करस्ट, ४. नोव्हेंबर ११ ते डिसेंबर १८, १९१३ - डंडी, ५. एप्रिल ९ ते ११, १९१९, कोसीहून मुंबईला जात असताना, ६. मार्च १०, १९२२ ते फेब्रुवारी ५, १९२४ - साबरमती, येरवडा, ७. मे ५, १९३० ते जानेवारी २६, १९३१ -येरवडा, ८. जानेवारी ४, १९३२ ते मे ८ १९३३ - येरवडा, ९. ऑगस्ट १ ते २३, १९३३ - साबरमती, येरवडा, १०. ऑगस्ट ९, १९४२ ते मे ६, १९४४, येरवडा आणि आगाखान पॅलेस, पुणे) मला पूर्णपणे तर आठवत नाही, परंतु तुरुंगात मी अनेक वर्षे घालवली असल्यामुळे हे सर्व मला माहीत आहे. तिथे जे तुरुंगाधिकारी होते ते तर माझे मित्र झाले होते. तिथे तुरुंगाचे एक अधीक्षक (सुपरीटेंडंट) होते. ते फार चांगले माणूस होते

आणि मोठे अधिकारी होते. ते एकदा माझ्याजवळ म्हणाले होते की मी या तुरुंगाचा अधिकारी आहे खरा परंतु जगाला माहीत नाही की मी कोणकोणते अपराध केले आहेत. ते म्हणाले की इथे कैदी चार वा पाच वर्षांच्या तुरुंगवासाकरिता येतात वा असे कैदी येतात की ज्यांना मृत्यूदंडाची शिक्षा झालेली असते व नंतर ज्यांना मृत्यूदंडापासून माफी देण्यात आलेली असते. परंतु मी केलेल्या अपराधाची किती लोकांना कल्पना असेल? ते म्हणाले की कदाचित ईश्वरालाच माझ्या अपराधांची कल्पना असेल. यामुळे त्यांना एकाने तुरुंगाधिकारी असणे आणि इतरांनी कैदी ही कल्पना आवडत नव्हती. माझेही असेच मत आहे. यामुळे मी तुमच्यासमोर कशा प्रकारे आलो पाहिजे याचा विचार केला. आता इंग्रजांचे शासन तर गेले. ते स्वतःहोऊन गेले आहेत. चांगले केले. परंतु आता आपण आपल्या तुरुंगात काय करावे? ज्या वेळी इंग्रजांची सत्ता होती त्या वेळी तुरुंगात किती चांगले वा वाईट होते याचा मी साक्षी आहे. परंतु आता सरकार आपल्या हातात आहे. आपल्या तुरुंगांनी तुरुंग न राहता रुग्णालये व्हायला पाहिजे. जर कोणी खून केला असेल वा चोरी केली असेल वा डाकू झाला असेल वा कायद्याच्या पुस्तकात ज्याला अपराध म्हणतात तो केल्यामुळे अपराधी झाला असेल तर हे सर्व प्रकारचे रोग आहेत असे मी समजतो. तो विकार आहे. अपराधाकरिता अपराध कोणीही करत नाही. जर कोणी मद्याच्या प्रभावाखाली व्यभिचार वा इतर कोणता अपराध करत असेल तर तो खुषी मिळवण्याकरिता तसे करत नसतो. आता मी म्हातारा झालो आहे आणि मला अनुभवही आला आहे. माणसाचे वर्तन त्याच्या स्वभावातून प्रेरित होत असते याची मला जाणीव झाली आहे. कसे राहावे हे कैद्यांना शिकवले पाहिजे. अधीक्षक वा उपायुक्त कैद्यांची काळजी घेत असतात आणि कोणत्या कैद्याला फटके मारावे वा कोणत्या कैद्याने शिक्षा म्हणून कोणते काम केले पाहिजे हे ते ठरवत असतात. परंतु तुरुंगाधिकारी वा उपायुक्त हे रुग्णालयातील शल्यचिकित्सकासारखे असावे व डॉक्टर ज्याप्रमाणे मद्यपीला

व्यसनापासून मुक्त करण्याचा प्रयत्न करतो त्याप्रमाणे त्यांनी त्या कैद्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करावा असे मी सुचवीन. मद्याचे व्यसन लागलेल्या माणसाला मद्यापासून होणारे दुष्परिणाम सांगावे लागत असतात. आणि कल्पना करा की एखाद्याने एखाद्या मुलीचे अपहरण केले आहे - हा अर्थातच गंभीर गुन्हा आहे - परंतु त्यानेसुद्धा जे काही केले आहे तो एक प्रकारचा रोग आहे याची जाणीव करून देण्यात यावी. आपल्या तुरुंगामध्ये जर अशी सुधारणा करण्यात आली तर ती महान गोष्ट होईल आणि सर्व कैदीसुद्धा खुष होतील. खुष झाल्यामुळे आपण नेहमीकरिता तुरुंगातच राहिलो पाहिजे असे त्यांना थोडेच वाटणार आहे? याशिवाय रुग्णालयाच्या इमारती तर सुंदर असतात, इथे आपल्या तुरुंगांचे असे थोडेच असते. आपण अशा इमारती तयार तरी कशा करणार? आपला तर गरीब देश आहे. रुग्णालयासारखे जर आपण तुरुंग बनवू लागलो तर आपले दिवाळे निघेल. असे तुरुंग तर सुवर्णभूमी असलेल्या दक्षिण आफ्रिकेतही नाहीत. तिथे इंग्रज कैद्यांकरिता ज्या खोल्या वा बराकी बनतात त्या महालासारख्या थोड्याच असतात. इंग्लंडजवळ इतका पैसा आहे की तो असे तुरुंग बनवू शकतो, कारण तिथले तुरुंग मी पाहिले आहेत. हे खरे आहे की अमेरिकेतील तुरुंग मी पाहिलेले नाहीत, परंतु आपले तुरुंग रुग्णालयासारखे व्हायला पाहिजे. रुग्णालयात डॉक्टर असतो आणि तो रुग्णांचा उपचार करतो तसे असले पाहिजे. जेव्हा एखादा रोगी दुरुस्त होऊन रुग्णालयाबाहेर जातो तेव्हा तो कायमचा ऋणी होतो. तसेच तुरुंगांचेही झाले पाहिजे. तुरुंगात कठोर वागणूक दिली जाते आणि अतिरेक केला जातो वा तुरुंगाधिकारी दुष्ट आहेत असे म्हणण्याचे कैद्यांकरिता कारण नसले पाहिजे. तिथे सर्व वाईटच वाईट आहे असे म्हणण्याची त्यांना संधी नसावी. त्यांनी म्हणायला पाहिजे की रुग्णालयाप्रमाणे आमची इथे फार काळजी घेतली जात होती, आम्हांला खायला देत होते व कसे जगावे हे आम्हांला शिकवत होते. तुरुंगाचा कारभार जे चालवतात त्यांनी काय केले पाहिजे हे तर मी सांगितले. परंतु त्याचे काय, हे सर्व करणे

तर त्यांच्याही हातात नाही. याचा निर्णय सरकारला घ्यायचा आहे. अथवा ही गोष्ट पंडितजी, सरदार वा असे म्हणा की संपूर्ण मंत्रिमंडळावर अवलंबून आहे. याचा अर्थ सरकारने हे केले पाहिजे. परंतु तुरुंगाधिकाऱ्यांनी कसे वागले पाहिजे हे सरकारने त्यांना सांगितले पाहिजे. नंतर जर त्यांनी नियमांचे पालन केले नाही तर व जुलमी पद्धतीचा अवलंब केला तर ती वेगळी गोष्ट होईल. आजकाल कोणताही तुरुंगाधिकारी वा अधीक्षक वा आयुक्त अपराधी नसला पाहिजे. आपण हे शिकलो आहो आणि ते सर्व सरकारच्या अंतर्गत काम करत असतात. सरकारजवळ मोठे सैन्य नाही आणि या अधिकाऱ्यांना शिस्त लावण्याकरिता ते बाहेरून मदतही मागू शकत नाही. ते स्वेच्छेने सरकारच्या आदेशाचे पालन करत असतात. त्यांनी जर स्वतःहोऊन आदेशांचे पालन केले नाही तर आपली प्रशासनव्यवस्था कोसळून जाईल व देशात गोंधळ निर्माण होईल. याप्रमाणे अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करू नये असे मी त्यांच्याबद्दल सांगितले आहे. आणि अशा काही लहानसहान गोष्टी आहेत की त्या ते सरकारच्या आदेशाशिवायही करू शकतात. उदाहरणार्थ त्यांनी कैद्यांशी प्रेमाने वागावे. यात शिकण्यासारखे काय आहे? त्यांनी तुरुगाला रुग्णालय समजायला पाहिजे व कैद्यांना रुग्ण. त्यांनी जर इतके केले तर निदान एक गोष्ट साध्य होईल.

आता मी कैद्यांशी कैद्याच्या भूमिकेतून बोलू इच्छितो. सत्याग्रही म्हणून मलासुद्धा तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. सत्याग्रही कैदी जाणूनबुजून कोणताही अपराध करू शकत नाही. त्याने कधीही तुरुंगाच्या अधीक्षकाला वा तुरुंगाधिकाऱ्याला त्रास द्यायला नको वा त्यांचा अपमान करायला नको. त्याने तर आदर्श कैदी होऊन राहायला पाहिजे. असे केले तरच तो आपला सत्याग्रह चांगल्या प्रकारे सुरू ठेवू शकतो. इतकेच नाही तर अपराध करून इथे आलेल्या कैद्यांनीसुद्धा सत्याग्रही व्हायला पाहिजे. त्यांनी तुरुंगाच्या नियमांचा कधीही भंग करू नये. त्यांनी तुरुंगाचे निर्बंध मान्य केले पाहिजे आणि जे मिळेल त्यावर समाधान मानले पाहिजे. कैद्यांना दिल्या जाणारे अन्न पुरेसे नसेल, वा ते पुरेसे

शिजवलेले नसेल वा त्यात खडे वा जंतू असतील तर त्याबद्दल त्यांनी अधीक्षकाकडे वा तुरुंगाधिकाऱ्याकडे तक्रार करावी. असे घडत असते. मी असे माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे कारण मी तुरुंगात राहिलो आहे. परंतु अशा गोष्टींकरितासुद्धा तुरुंगाधिकाऱ्याकडे का जायला पाहिजे? तुरुंगात काही स्वयंपाकी तर नसतात. जे कैदी असतात तेच स्वयंपाक करत असतात. सरकार जर स्वयंपाकी ठेवू लागेल तर ते तुरुंग चालवू शकणार नाही. कैदीच आपला स्वयंपाक बनवत असल्यामुळे त्यांनी मन लावून स्वयंपाक करावा. तांदूळ निवडून मगच त्यांनी भात शिजवावा, पोळ्या अर्ध्या कच्च्या ठेवू नये. हे सर्व तुमच्या हातातच आहे. तुम्ही जसे स्वतःच्या घरी काम करता तसे हे काम इथे केले पाहिजे. तुम्ही काही अपराध केल्यानंतर इथे आला आहा. कोणीही अपराध करू शकतो. परंतु काही पकडले जातात आणि काहीनी अपराध केला नसतानाही त्यांच्यावर अपराधी म्हणून शिक्का मारला जातो. असे होत असते. मला वाटते की तुम्ही जर इतके केले तर तुम्ही आदर्श कैदी व्हाल.

तुम्ही एक गोष्ट करू शकता. तुमच्यात हिंदू, मुसलमान, शीख असले पाहिजे. मुसलमानांमध्येसुद्धा वेगवेगळ्या पंथाचे लोक असले पाहिजे. परंतु तुम्ही सर्व इथे भावाभावाप्रमाणे राहू शकता. आज आपल्या देशात एक प्रकारचे विष पसरले आहे. निदान तुरुंगात तरी ते पसरणार नाही अशी मला आशा आहे. तुरुंगातून तुम्ही आदर्श नागरिक म्हणून बाहेर पडला पाहिजे. असे झाले तर मी चांगले काम केले असे उपायुक्त आणि तुरुंगाचे अधीक्षक म्हणतील. ते मला सांगतील की आता आमचे काम सोपे झाले आहे, आम्हाला कोणी त्रास देत नाही व तुरुंगाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते व दिवसेंदिवस कैदी आपल्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत. तुम्ही आदर्श कैदी व्हावे आणि येथून बाहेर पडताना आदर्श नागरिक व्हावे व बाहेरील लोकांना गैरवर्तन करण्यापासून परावृत्त करावे इतकीच प्रार्थना मी ईश्वराजवळ करीन. हिंदू

मुसलमानांचे शत्रू आहेत आणि मुसलमान हिंदूंचे शत्रू आहेत हे तुम्ही विसरा असे तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे. कोणीही चूक करू शकतो.

उद्या ईद आहे. माझ्या मुसलमान बांधवाना मी ईद मुबारक देतो. जे काही मुसलमान कैदी इथे आहेत त्या सर्वांना सर्व हिंदू आणि शीख कैद्यांनी ईदच्या शुभेच्छा द्याव्या अशी माझी इच्छा आहे.अखेरीस तुम्ही सर्वांनी बंधुभावाने राहावे इतकेच मी म्हणेन.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४५९-६४

---------------

# १५७. इ. हेविट यांना पत्र

बिर्ला भवन, नवी दिल्ली,

ऑक्टोबर २६, १९४७

प्रिय कॅप्टन हेविट,

तुमच्याजवळ परत उपयोग करता येईल व संरक्षण करण्याच्या दृष्टीने निरुपयोगी नसलेली जी कांबळी आहेत ती विनामूल्य देऊ करणाऱ्या २३ तारखेच्या प्रस्तावाबद्दलच्या तुमच्या पत्राबद्दल मी तुमचा आभारी आहे. तुम्ही दिलेल्या अधिकारपत्राचा उपयोग करण्याकरिता मी ते मुंबई येथील मित्राला पाठवत आहे.

कॅप्टन ई. हेविट,

डिव्हिजनल सी ट्रान्सपोर्ट हेडक्वार्टर्स,

नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू मेमोरिअल म्युझियम ॲन्ड लायब्ररी. सोजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------------

# १५८. मुसलमानांना सल्ला

(बकरी ईद असल्यामुळे सकाळपासून गांधींजींकडे भेटण्याकरिता मुसलमान येऊ लागले होते. त्यांत त्यांचे अनेक जुने मित्रही होते. त्यांना पाहून गांधीजी हळूच बोलले - मी यांना कोणत्या तोंडाने ईद मुबारक म्हणू. यापुढील विषयसुद्धा पाहा.)

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २६, १९४७

अहिंसेची हिंसेत, दयाळूपणाची क्रौर्यात, प्रेमाची द्वेषात, सत्याची असत्यात नेहमीच परीक्षा होत असते. हा चिरंतन नियम आहे. या पवित्र दिवशी आपण जर पवित्र निर्धार केला की रक्ताकरिता रक्त सांडवायचे नाही, उलट आपले स्वतःचे रक्त सांडण्याची आपण तयारी ठेवली तर आपण इतिहास घडवू. येशू ख्रिस्ताला ज्यांनी सुळावर चढवले होते त्यांना क्षमा करण्याकरिता येशू ख्रिस्ताने सुळावरून ईश्वराला प्रार्थना केली होती. मी सतत ईश्वराला प्रार्थना करत असतो की त्याने माझा खून करणाराकरिताही दयेची प्रार्थना करण्याची शक्ती मला द्यावी. आणि तुमच्या या निष्ठावान सेवकाला क्षमा करण्याची शक्ती प्राप्त व्हावी अशी प्रार्थना तुम्हीसुद्धा करावी.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड ४, पृष्ठ ९९

-----------------

# १५९. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आधी तर एका गृहस्थांनी मला जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर देतो. ते विचारतात - "तुम्ही म्हणता की बदल्याची भावना चांगली नसते परंतु तुमचे राम-भक्त तर दरवर्षी रावणाचा पुतळा जाळून बदल्याची भावना चेतवत असतात?" यात दोन चुका आहेत. एक माझे राम-भक्त कोण आहेत हेच मला माहीत नाही. माझा राम-भक्त जर मी असेन तर ठीक आहे. परंतु त्याचीही मला माहिती नाही. राम-भक्त होणे ही काही साधी गोष्ट नाही. यामुळे "तुमचे राम-भक्त" म्हणणे ही मोठी चूक आहे. माझे राम-भक्त तर कोणीच नाहीत. परंतु असे होऊ शकते की लोक रावणाचा पुतळा तयार करतात आणि मग राम त्याला पराभूत करतो. आता तरी राम रावणाला पराभूत करतो. परंतु आपल्यापैकी कोण राम आहे आणि कोण रावण? जर प्रत्येक माणूस राम बनू शकत असेल तर रावण कोण बनेल? ही एक कथा आहे आणि कथेत राम देव आहे आणि रावण त्याचा शत्रू. यामुळेच त्याला अशुभ समजतात, राक्षस समजतात, निशाचर समजतात. याचे कारण त्याचे कामच रामाला न मानणे आणि ईश्वराला न मानता मरून जाणे होते. नंतर ईश्वराच्या हातूनच त्याला मरण आले. ही एक कथा आहे. याचा अर्थ असा नाही की रामाचा पुतळा बदला घेण्याच्या भावनेने तयार करण्यात आला होता. माणसाने बदला घेऊ नये हा धडा मी यापासून शिकलो आहे. मी जर अशी कल्पना केली की मी राम आहे आणि इथे माझ्या आजूबाजूला बसलेले लोक रावण आहेत तर माझ्यासारखा अहंकारी आणि मूर्ख कोण असेल? मी राम आहे हे मला कसे कळणार? माझ्यात किती दुष्टपणा भरलेला आहे हे कोणाला माहीत आहे? ईश्वराच्या नजरेत मी महात्मा आहे की दुष्ट माणूस आहे हे कोणालाही माहीत नाही. मी स्वतः किती

दुष्ट वा चांगला आहे हे माझे मलाही माहीत नाही. ते केवळ ईश्वरालाच माहीत. तो वर बसला आहे, सर्वांना पाहतो आहे. त्याच्यापासून कोणतीही गोष्ट लपलेली नाही. माणूस कोणाचाच बदला घेऊ शकत नाही. कोणाकडून काही वाईटही घडले तरी बदला काय घ्यायचा? जर एखादा माणूस परिपूर्ण असेल - तसे कोणताही माणूस परिपूर्ण असू शकत नाही, केवळ ईश्वरच परिपूर्ण असू शकतो - तरीही जर आपण गृहीत धरले की एक माणूस परिपूर्ण आहे आणि इतर अपूर्ण आहेत तर काय त्याने इतराना शिक्षा केली पाहिजे? इतरांचा संहार केला पाहिजे? हा जो विजयादशमीला पुतळा बनवतात त्याचा माझ्या दृष्टीतून असाच अर्थ आहे. बदला जरी म्हणालो नाही तरी संहार वा शिक्षा वगैरे जी काही करायची आहे ती केवळ ईश्वरच करू शकतो. तर काय ईश्वरातच हा गुण आहे की हिंसाही तोच करू शकतो आणि अहिंसाही? तो निर्गुण आहे आणि गुणातीत आहे. त्याच्यासाठी या सर्व गोष्टी काहीही नाहीत. परंतु हा दृष्टांत तर असा आहे की जितके रावण या जगात आहेत, त्या सर्वांचा संहार करणारा एकटा ईश्वर आहे. काही लोक असे मानतात की आपण पूर्ण आहो आणि इतर अपूर्ण असे विजयादशमी शिकवते. यामुळेच कायदा हातात घेऊन ते स्वतःच बादशहा बनतात व कोणाला मारायचे, कोणाचा खून करायचा हे सर्व ठरवतात.

असे भारतात घडतही आहे कारण आम्ही पागल झालो आहो. जे उत्तर मी दिले आहे त्यावरून तुम्ही आणि ज्या बंधूंनी प्रश्न विचारला त्यांना कळले असेल की राम-रावणाचा दृष्टांत घेऊन आम्ही पापी होऊ नये. आम्ही पुण्यावान झालो पाहिजे. एकीकडे रामाचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे दुराचार करायचा म्हणजे ईश्वराची निंदा करणे आहे.

आता तुमच्यापैकी काही मला विचारू शकतात की तुम्ही इतक्या मोठ्यामोठ्या गप्पा तर मारता परंतु काश्मीरमध्ये जे सुरू आहे त्याचीही काही माहिती आहे? (२३ ऑक्टोबरला जवळपास २००० आफ्रिडी आणि टोळीवाले काश्मीरमध्ये घुसले आणि मोठ्या प्रमाणात लूट, जाळपोळ आणि खून करू लागले.) हो, मला त्याची पूर्ण कल्पना आहे. परंतु मला तितकेच माहीत आहे जितके वृत्तपत्रांमध्ये

आले आहे. हे जर सर्व खरे असेल तर फार वाईट गोष्ट आहे. अशा प्रकारे ना धर्माचे रक्षण होऊ शकते ना कर्माचे. इतकेच मी सांगू शकतो. काश्मीरने पाकिस्तानमध्ये सामील व्हावे म्हणून पाकिस्तान काश्मीरवर दडपण आणण्याचा प्रयत्न करत आहे असा दोष तर पाकिस्तानलाच देण्यात आला आहे ना? असे व्हायला नको होते. कोणाजवळील कोणती तरी वस्तू घ्यावी म्हणून जर कोणी कोणावर दडपण आणत असेल तर तसे व्हायला नको याबद्दल मला किंचितही संशय नाही. आज तर काश्मीर आहे, नंतर ते हैद्राबादवर दडपण आणतील, मग जुनागढवर दडपण आणा, मग अजून संस्थाने आहेत. माझी काही न्यायाची तुलना करण्याची इच्छा नाही. परंतु मी एक तत्त्व मानून चालतो की कोणीही कुणावरही बळजबरी करू शकत नाही.

नंतर काहीही होवो मला त्याची पर्वा नाही. काश्मीर असो, हैद्राबाद असो वा जुनागढ असो, कोणी कुणावर बळजबरी करू नये. परंतु मी अतिशय आदरपूर्वक सांगतो की आज जे काश्मीरचे महाराज आहेत ते तेथील राजे नाहीत. दुसऱ्याही संस्थानांचे जे राजे आहेत असे आपल्याला वाटते तसे ते नाहीत. त्यांना तर बनवणारे इंग्रज लोक होते. आता इंग्रज गेले आहेत. त्यांनी त्यांना सत्ताधारी बनवले होते कारण त्यांच्या माध्यमातून ते राज्य करू शकत होते. काश्मीरमध्ये अजून जनतेचे सरकार स्थापित व्हायचे आहे. अशीच परिस्थिती इतर संस्थानांचीही म्हणजे हैद्राबाद, जुनागढ इत्यादींचीही आहे. माझ्या मते त्यांच्यात काही अंतर नाही. संस्थानांचे खरे सत्ताधारी तेथील लोक असतात. काश्मीरचे लोक जर पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता अनुकूल असतील तर जगातील कोणतीही शक्ती त्यांना अडवू शकत नाही. परंतु निर्णय घेण्याकरिता त्यांना मोकळीक असली पाहिजे. लोकांवर हल्ला करून आणि गावच्या गाव जाळून लोकांना निर्णय घेण्याकरिता बाध्य करता येत नाही. काश्मीरमध्ये मुसलमान बहुसंख्य असूनही तेथील लोकांना जर भारतात सामील होण्याची इच्छा असेल तर त्यांना कोणीही अडवू शकत नाही.

काश्मीरच्या लोकांवर दडपण आणण्याकरिता जर पाकिस्तानचे लोक जात असतील तर पाकिस्तान सरकारने त्यांना थांबवले पाहिजे. जर तसे करण्यात त्याला अपयश आले तर दोषाचे सर्व खापर पाकिस्तानवर फोडले जाईल. काश्मीरच्या जनतेवर बळजबरी करण्याकरिता जर भारतातील लोक जात असतील तर त्यांनासुद्धा थांबवले पाहिजे आणि त्यांनी स्वतःहोऊन थांबले पाहिजे. याबद्दल मला काहीही संशय नाही.

मी काश्मीरच्या समस्येची तुमच्याशी चर्चा केली. आता मला वेगळ्या मुद्द्याकडे वळण्याची परवानगी द्या. मला कलकत्त्याहून तार आली आहे. कलकत्त्यात मी असताना ज्या शांतिसेनेची स्थापना करण्यात आली होती तिच्याबद्दल मी तुम्हांला सांगितले होते. ती खरोखर ईश्वराची कृपा होती. कलकत्त्यात शांतता स्थापन करणे फार कठीण वाटत होते. परंतु एकदा शांतिसेनेची स्थापना झाल्यानतर तसे सहजपणे करता आले आणि हिंदू अथवा मुलमानांना फारसा त्रास सहन करावा लागला नाही. त्याआधी मुसलमानांनी मोठ्या वस्त्यांवर नियंत्रण मिळवले होते व ते तेथून हिंदूंना हुसकावून लावत होते. नंतर हिंदूंनीसुद्धा मुसलमानांच्या झोपड्या व इतर जे काही सामानसुमान होते ते जाळले व त्यांच्यावर अत्याचारही केला. तसे घडायला नको होते. मला सर्व प्रकरणात जायचे नाही. परंतु मी जेव्हा तिथे गेलो तेव्हा ईश्वराच्या कृपेने शांतिसेनेची स्थापना करण्यात आली व विद्यार्थी आणि इतर लोक तिच्यात सामील झाले. आता ते लिहितात की दसरा आणि ईद हे दोन्ही सण मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले व हिंदू आणि मुसलमान भावाभावाप्रमाणे राहू लागले आहेत. कलकत्त्यात काल ईद साजरी करण्यात आली. परंतु दिल्लीत ती आज साजरी करण्यात आली. यामुळे दसरा आणि ईद या दोघांचाही उल्लेख असलेली तार मला पाठवण्यात आली. ते म्हणतात की शांतिसेना सर्वत्र पसरली आहे. कलकत्त्यात वा हावडात कुठेही नुकसान झालेले नाही. कोणीही कुणालाही त्रास देऊ

शकला नाही आणि दोन्ही दिवशी लोक कोणताही त्रास न होता मजेत राहिले. ते पूर्व बंगालमध्ये ढाकापर्यंतही गेले.

भारतात कुठेही हिंदू मुसलमान वैमनस्य दूर झाले व परस्परांचे जे शत्रू होते ते सर्व भाऊभाऊ होऊन राहिले तर मला आनंद होतो व म्हणून ही गोष्ट तुम्हाला सांगावी असे मला वाटले. आणि कलकत्ता काही लहानसहान शहर नाही. तिथे करोडोंचा व्यापार चालतो, मोठे मोठे जहाज येतात, तिथे हिंदू आणि मुसलमान दोघेही राहतात आणि व्यापार करतात. आपण एकमेकांना शत्रू म्हणून वागवू लागलो तर संपूर्ण व्यापार उध्वस्त होणार नाही काय? कलकत्त्याच्या शांतिसेनेने लोकांना जर शांततापूर्वक राहायला शिकवले असेल तर ती फार चंगली गोष्ट असेल. कलकत्त्यापासून आपण काही पाठ का शिकू नये? इथेसुद्धा शांतिसेना का स्थापन करण्यात येऊ नये? ईदच्या निमित्ताने माझ्याकडे आज काही मुसलमान आले होते.  त्यांना माहीत आहे की मी त्यांचा शत्रू नसून मित्र आहे. मी हिंदू आहे आणि तोही सनातनी हिंदू. यामुळे माझ्यात मुसलमानपणही तितकेच भरलेले आहे जितका हिंदूपणा. यामुळे मित्र समजून ते मला भेटायला आले होते. मी त्यांना ईद मुबारक म्हणालो. खरे परंतु तुम्हाला मी कोणत्या तोंडाने ईद मुबारक म्हणू असेही मी त्यांना म्हणालो. (पाहा मागील शीर्षक) ते बिचारे आजही घाबरलेले आहेत. हिंदू आपल्याला राहू देतील की नाही आणि मारून तर टाकणार नाहीत असा विचार ते करत आहेत. अर्थातच सर्वच हिंदू मारत नसतात. परंतु अनेकांचे खून झालेले असल्यामुळे ते भयभीत आहेत. ते अल्पसंख्य असले म्हणून काय? तर काय ज्या ठिकाणी जे लोक बहुसंख्य आहेत त्यांनी अल्पसंख्याकांवर अत्याचार करून त्यांना मारून टाकले पाहिजे? हे अत्याचार थांबले पाहिजे नाही तर आपण नष्ट होऊ.

जे कलकत्त्यात घडले तेच आपण इथे करू शकलो तर किती चांगले होईल? असे झाले तर माझे अंतःकरण आनंदाने नाचून उठेल. आज तर माझे हृदय रक्तबंबाळ झालेले

आहे. मी अश्रूही ढाळू शकत नाही कारण मी जर रडलो तर मला जे करायचे आहे ते मी करू शकणार नाही. पण माझे अंतःकरण दुःखी आहे. स्वतंत्र भारतात हिंदू आणि मुसलमान असेच राहणार आहेत काय? बहुसंख्याक अल्पसंख्याकांवर जर हल्ला करतील तर तो पाशवीपणा होईल. इतरांवर हल्ला करून कोणत्याही धर्माचे रक्षण करता येऊ शकत नाही. धर्माच्या शिकवणुकीचे जीवनात अनुसरण करूनच धर्म वाचवता येऊ शकत असतो. दुसरा कोणताही मार्ग नाही.

रतलाममध्ये जबाबदार सरकारची स्थापना केली जाईल अशी घोषणा तिथे जे महाराज आहेत त्यांनी केली असल्याची तार मला रतलामहून आली आहे. (ऑक्टोबर २४, १९४७; पाहा रतलाममध्ये हरिजन, नोव्हेंबर ९, १९४७) महाराज संस्थानाचे विश्वस्त असतील. हरिजन सेवक संघाच्या सचिवांनी मला लिहिले आहे की यापुढे तिथे हरिजन आणि इतरांमध्ये भेद केला जाणार नाही. उच्चवर्णियांबरोबर हरिजन आणि इतर लोकही महाराजांच्या मंदिरात गेले होते. यापुढे संस्थानाच्या कोणत्याही मंदिरात अस्पृश्यता पाळली जाणार नाही. त्याचप्रमाणे सार्वजनिक विहिरीवरून हरिजन पाणी भरू शकतील. हे सर्व ऐकून मला फार आनंद झाला. हिंदू धर्माला जर प्रगती करायची असेल तर द्वेषभावना आणि अस्पृश्यता यांना त्यात कसे काय स्थान असू शकते? ज्यांनी पाप केले ते अस्पृश्य असतात. संपूर्ण समाजाला अस्पृश्य करणे हा फार मोठा कलंक आहे. प्रत्येक हिंदूने आपल्या हृदयातून अस्पृश्यतेच्या सर्व खाणाखुणा पुसून टाकल्या पाहिजे. रतलाममध्ये ज्याप्रमाणे केले त्याप्रमाणे हिंदू राजाच्या प्रत्येक संस्थानांमध्ये अस्पृश्यता नाहीशी करण्यात आली पाहिजे. असे करून आपण हिंदू धर्माला फार उंचावर पोहोचवू. मी समजतो त्याप्रमाणे अस्पृश्यता गेली तर नंतर आपण काय मुसलमानांना वा इतर कोणाला अस्पृश्य ठरवणार आहो? आज आपण जे भोगतो आहो ते अस्पृश्यतेचेच परिणाम आहेत. यामुळे रतलाममधील या घडामोडीमुळे

मला आनंद झाला आणि यामुळे कलकत्ता आणि रतलाम येथील घटनांबद्दल मला तुमच्याशी बोलावेसे वाटले.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ ४६५-७०

---------------

## १६०. एक पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २७, १९४७

प्रिय मित्र,

तुम्ही मांडलेली समस्या माझ्या आवाक्याबाहेरची आहे. माझ्याकरिता ईश्वराजवळ पोहोचण्याचा मार्ग श्रद्धा आहे, विज्ञान नाही. ज्या वैज्ञानिकाला याची माहिती असेल त्याला तुम्ही विचारा.

तुमचा वश्वासू,

मो. क. गांधी

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------------

# १६१. एडिथ हंटर यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २७, १९४७

प्रिय श्रीमती हंटर,

डॉ. ताम्हनकर यांनी मला काल सांगितले की तुमच्या पतीने चिरविश्रांती घेतली. मृत्यूला मी मित्र समजतो. यामुळे जेव्हा केव्हा आपले प्रियजन आपल्याला सोडून जातात तेव्हा तेव्हा शोकाचे कारण नसते. ईश्वर करो आणि मृत्यूधर्माच्या या ज्ञानाने तुम्हाला सहन करण्याची शक्ती मिळो.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

श्रीमती एडिथ हंटर,

द्वारा कर्न,

हिल रोड लंडन दक्षिणपूर्व

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------------

# १६२. उमराव सिंह शेरगिल यांना पत्र

ऑक्टोबर २७, १९४७

प्रिय मित्र,

तुमची जरी माझ्याकडून कोणतीही अपेक्षा नाही तरी मी दोन शब्द सांगेन. तुम्हाला जे योग्य वाटते ते करण्याची ईश्वर तुम्हाला शक्ती देवो. उर्दू लिपी अर्थातच सोपी नाही व ती अपूर्णही आहे. तरीही दोन्ही लिप्या शिकाव्या असे तुम्हाला वाटते हे पाहून आनंद होतो.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

सरदार उमराव सिंह शेरगिल,

द कोने,

समर हिल, सिमला पश्चिम

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. ७९४१

--------------------

# १६३. सुऱ्हावर्दी यांना चिठ्ठी

(सुऱ्हावर्दी कराचीला गेल्यानंतर ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात हे लिहिण्यात आले होते. या आठवड्यात मौनवार या तारखेला येतो. पाहा पुढील विषय.)

ऑक्टोबर २७, १९४७ (सुऱ्हावर्दी कराचीला गेल्यानंतर हे ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लिहिण्यात आले होते. या आठवड्यात मौनवार या तारखेला येतो. पाहा पुढील विषय.)

पाकिस्तानला खरोखर काय करायचे आहे हे मला कळतच नाही - त्यांना हिंदूंना तिथे राहू द्यायचे आहे की नाही... अल्पसंख्याकांकरिता हा जीवन-मरणाचा प्रश्न आहे हे लक्षात ठेवा. सुंदर शब्दरचना वा भरघोस कागदी घोषणा यांची काहीही मदत होणार नाही. जर तुम्ही पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या घोषणा अमलात आणायला लावू शकलात तर तुम्ही भारतीय मुसलमानांची फार मोठी सेवा कराल. भारतीय संघराज्यात जरी किती तरी घृणित गोष्टी घडलेल्या असल्या तरी माझा दावा आहे की संघराज्य सरकारने मुसलमानांना संपूर्ण संरक्षण देण्याच्या प्रयत्नात कोणताही कसूर ठेवलेला नाही.... अराजक थांबण्याकरिता सरदार पटेल आणि पंडित नेहरू स्वतःला झिजवत आहेत.... सरदार किती आजारी आहेत हे तुम्हाला माहीत नाही. तरीही ते आपल्या पोलादी इच्छाशक्तीने काम करत आहेत. पाकिस्तान सरकारचे काय धोरण आहे हे मला माहीत नाही परंतु पाकिस्तानमध्ये - पंजाब, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांत - अल्पसंख्याकांकरिता काय होत आहे हे मला माहीत आहे. परंतु माझी श्रद्धा कायम आहे. मी स्वतःला संपूर्णपणे ईश्वराला सोपवले आहे, यामुळे मी शांत आहे.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड ४, पृष्ठ ६५

--------------------

# १६४. सुऱ्हावर्दींना पत्र

ऑक्टोबर २७, १९४७

मत्प्रिय शहीद,

मी तुम्हाला स्पष्टपणे लिहीत आहे. तुम्हाला शक्य असेल तर तुम्ही तुमचा वाकडेपणा दूर करावा. तुमच्यात तसे काहीही नाही असे तुम्हाला वाटत असेल तर मी माझे शब्द परत घेतो.

हिंदू आणि मुसलमान दोन राष्ट्र नाहीत. मुसलमान कधीही हिंदूंचे गुलाम होणार नाहीत आणि हिंदू मुसलमानांचे. यामुळे हिंदू-मुसलमानांनी मित्राप्रमाणे आणि भावा-भावाप्रमाणे राहावे असा प्रयत्न करण्यात तुम्ही आणि मी मरण पत्करण्याचीही तयारी ठेवली पाहिजे कारण वास्तवात ते तसेच आहेत. इतर काहीही म्हणत असले तरी शीख हे भारताचे भाग आहेत हे तुम्ही आणि मी मान्य केले पाहिजे. जर यापैकी कोणीही हे नाकारत असेल तर तो त्यांचा प्रश्न आहे.

या गोंधळाची सुरुवात कायदे आझमनीच केली आणि अजूनही ती सुरू आहे या निष्कर्षावर पोहोचल्याशिवाय मी राहू शकत नाही. माझे विचार तुम्हाला स्पष्टपणे कळावे म्हणून हे मी तुम्हाला सांगतो आहे, तुम्हाला दुरुस्त करण्याकरिता नाही. माझ्यासमोर केवळ एकच मार्ग आहे - या दोघांना एक करण्याचा प्रयत्न करणे अथवा मरणे.

तुमचा,

बापू

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ ६५ शिवाया प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# १६५. जे. सी. कुमारप्पा यांना पत्र

ऑक्टोबर २७, १९४७

प्रिय कु.

ही टिप्पणी (सप्टेंबर २८, १९४७ला हरिजनमध्ये 'ॲन ॲबॉर्टिव्ह कॉन्फरन्स' हा कुमारप्पा यांचा लेख प्रकाशित झाला होता. त्यावर शांतिकुमार मोरारजी यांनी केलेली टिप्पणी) वाच आणि परत कर. ती प्रकाशनाच्या हेतूने करण्यात आली आहे परंतु जोपर्यंत यासंबंधी तुझी टिप्पणी येत नाही तोपर्यंत माझा तसे करण्याचा विचार नाही.

आशा आहे की तुझी सर्व प्रकारे प्रगती होत असेल. तुला योग्य मदत मिळत आहे की नाही?

तुझा,

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून, जी. एन. १०१९८

-------------

## १६६. द. बा. कालेलकर यांना पत्र

ऑक्टोबर २७, १९४७

चि. काका,

मला तुमचे पत्र मिळाले. परंतु मी फार लिहिणार नाही. तुम्ही केलेली विभागणी मला आवडली. परंतु मुद्रणालयाबद्दल तुम्ही जे म्हणता ते मी पचवू शकलो नाही. ही वेळ अशी आहे की अशा गोष्टीत आपण गुंतू नये. आपण करोडपती नाही, याचक आहो हे आपण विसरू शकत नाही. या कठीण काळात आपल्याला जे काही चांगल्यात चांगले करता येईल त केले पाहिजे. कृपाकरून एक गोष्ट लक्षात ठेवा की दान मागण्याकरिता मला एकच ठिकाण आहे. यामुळे कोणतीही जबाबदारी घेण्यापूर्वी मला विचार करावा लागतो. तुमचे विचार गगनात विहार करतात परंतु तुमचे शरीर त्याला साथ देऊ शकणार नाही. पुढे जाण्याआधी ही गोष्ट लक्षात ठेवा.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------------

# १६७. सुशीला पै यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २७, १९४७

चि. सुशीला,

तुझे पत्र सुंदर आहे. तू जर पूर्णपणे एका ठिकाणी स्थिरावली तर एक काम पूर्ण झाले असे मी समजेन. तिथे तुला जे काही मिळेल ते या महालापेक्षा केव्हाही चांगले असेल. परंतु मला माहीत आहे की या हवामानात तू राहू शकत नाही. सध्या आहे त्याप्रमाणेच अजून काही महिने हे चांगले राहील.

तुला मासिक पगाराची आवश्यकता आहे काय? सुचेता कोणतेही पारिश्रमिक घेत नाही हे मला माहीत नव्हते. परंतु याचा असा अर्थ मुळीच होत नाही की तूसुद्धा काहीही घेऊ नये. तुझी काय गरज आहे ते मला लिही. तुझ्या आर्थिक परिस्थितीबद्दल मी तुला कधीच विचारले नाही असे मला वाटते. इतर बाबींकरिता सुशीला नाय्यर काय म्हणते यावर आणि आभा आणि मनू काय लिहितात यावर तू विसंबून राहिले पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# १६८. प्रभाकर यांना पत्र

ऑक्टोबर २७, १९४७

चि. प्रभाकर,

सोबत चि. चांदकरिता पत्र आहे. सांत्वन करण्याचा माझा मार्ग लोकांना सुरुवातीला बहुधा कठोर वाटतो. परंतु ते काहीही असले तरी तू हे समजून घेऊ शकशील. असे केले नाही तर आपण केवळ भावूक होऊ आणि कोणत्याही उपयोगाचे राहणार नाही.

बॅरिस्टर रेड्डी यांच्याकरिताही सोबत पत्र जोडले आहे (पाहा मागील विषय). ते पाठव. तू अर्जुनरावचे लग्न एप्रिलमध्ये ठरवू शकतो. त्या वेळी मी कुठे असेन हे ईश्वरालाच माहीत. तुला जर ते माझ्या उपस्थितीत करायचे असेल तर मी जिथे असेन तिथे ते होऊ शकते. मी सेवाग्रामला येण्याची फार कमी शक्यता आहे. आज जे विष पसरले आहे ते कुठे घेऊन जाते यावर हे सर्व अवलंबून आहे. मी चांदबद्दल तार पाठवलेली नाही. त्याचे एक कारण आपण गरीब आहो हे आहे. हे कोणीही विसरू नये.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ९०४०. शिवाय सी. डब्ल्यू. ९१६४. सौजन्य - प्रभाकर

-------------------

# १६९. चांदराणी यांना पत्र

ऑक्टोबर २७, १९४७

चि. चांद,

माझ्या पत्रामुळे तू इतकी घाबरलीस? तू माझ्याकडे ज्ञानी म्हणून आली होतीस आणि तेही सत्यवतीचे (स्वामी श्रद्धानंद यांची नात) प्रमाणपत्र घेऊन. कोणताही आजार तुला इतका अस्वस्थ करू शकतो यावर मी कसा विश्वास ठेवू? ऊठ आणि नाच. सुशीला तुला विश्रांती घेण्याकरिता सांगेल. बहुधा तू तिच्याबरोबर येऊ शकशील. परंतु तू जर येणार असशील तर सेवाग्राममधून परतण्याआधीच तू तुझ्या आजारातून मुक्त झाली पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. चांदराणी पेपर्स. सौजन्य - गांधी राष्ट्रीय संग्रहालय आणि ग्रंथालय

-------------------

# १७०. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे लिहिलेले व्याख्यान वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २७, १९४७

संघराज्यातील मुसलमानांना आपले वडिलोपार्जित घर सोडण्याकरिता आणि पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता बाध्य केले जात असल्याच्या तक्रारी माझ्याजवळ सतत येत आहेत. असे म्हणतात की त्यांना विविध प्रकारे त्रास देऊन घर सोडून छावणीत जाऊन राहण्याकरिता बळजबरीने पाठवण्यात येत आहे. तेथून त्यांना रेल्वेने वा पायी पाठवले जाते. माझ्या मते मंत्रिमंडळाचे हे धोरण नाही. परंतु मी तक्रार करणारांना जेव्हा असे सांगतो तेव्हा ते हसतात आणि म्हणतात की एक तर तुमची माहिती चुकीची असावी वा नोकरवर्ग त्या धोरणानुसार चालत नसेल. मला माहीत आहे की माझी माहिती बरोबर आहे. मग काय कर्मचारी वर्ग अप्रामाणिक आहे? तसे नसेल अशी मला आशा आहे. परंतु चोहोकडून अशा तक्रारी येत आहेत. या अप्रामाणिकपणाकरिता अनेक कारणे सांगितली जातात. सैन्य आणि पोलीस यांची सांप्रादियकतेच्या आधारवर वाटणी झाली असल्यामुळे त्यांचे सदस्य सध्याच्या पूर्वग्रहाच्या वातावरणात वाहून जात असावे हे याचे प्रमुख कारण असू शकते.

मी माझे मत सांगितले आहे की जर हे कर्मचारी, ज्यांच्यावर कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याची जबाबदारी आहे, सांप्रदायिकांच्या प्रभावाखाली आले तर सुसंघटित शासनाच्या ठिकाणी बेशिस्ती येणे अपरिहार्य आहे आणि हे जर कायम राहिले तर समाजाचा विनाश होईल. सांप्रदायिकतेवर उठणे व याच निरोगी भावनेने कनिष्ठ कर्मचाऱ्यांना प्रेरित करणे हे उच्च पदावरील कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे.

लोकांचे ठामपणे म्हणणे आहे की देशात जनतेतर्फे जे सरकार स्थापन करण्यात आले आहे त्याचा तसा प्रभाव नाही जसा प्रभाव विदेशी नोकरशाही तलवारीच्या बळावर आपल्या कर्मचाऱ्यांना धाकदपटशा दाखवून निर्माण करत होती. हे काही प्रमाणात खरेही आहे. पण जनतेच्या सरकारच्या हातात एक नैतिक शक्ति असते व ती विदेशी सत्तेच्या भौतिक शक्तिपेक्षा, जिचा ती आपल्या स्वतःच्या मदतीकरिता उपयोग करू शकते, निश्चितपणे उच्च असते. या नैतिक शक्तीकरिता जनमत सत्तेसोबत आहे असे आधीपासून मानले जात असते. आज याची उणीव असू शकते. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजीनाम्याशिवाय जनमत मंत्रिमंडळाबरोबर आहे की नाही हे कळण्याचा कोणताही मार्ग नाही.

केंद्र सरकारची काय स्थिती आहे हे आजच्या या सायंकाळी आपण तपासण्याचा प्रयत्न करत आहो. केंद्र सरकारने कधीही दुर्बल होऊ नये आणि ते दुर्बल आहे असे कधीही वाटायला नको. त्याला तरी आपल्या शक्तिची जाणीव असली पाहिजे. यामुळे केंद्रीय कर्मचारी आदेशांचे पूर्णपणे पालन करत नाहीत यात जर काही सत्य असेल तर आदेशाचे पालन न करणारे कर्मचारी गेले पाहिजे अथवा मंत्रिमंडळाने वा संबंधित मंत्र्याने राजीनामा द्यावा व जी व्यक्ति यशस्वीपणे शासकीय बेशिस्तीला आवर घालू शकेल अशा व्यक्तिला जागा करून द्यावी.

माझ्याकडे येणाऱ्या तक्रारी जेव्हा मी तुम्हांला निःसंकोचपणे सांगतो तेव्हा मला आशा असते की या तक्रारींमध्ये कोणतेही तथ्य नाही आणि जर काही तथ्य असेलही तर उच्च अधिकारी प्रयत्नपूर्वक यशस्वीपणे त्या ठीक करतील.

संघराज्यातील जे नागरीक या अराजकाच्या प्रभावात येतात त्यांचे काय कर्तव्य आहे? कोणत्याही नागरिकाला आपले राहते घर सोडण्याकरिता भाग पाडता येईल असा कोणताही कायदा नाही हे स्पष्ट आहे. एखाद्याला आपले घर सोडण्याचा आदेश

देण्याकरिता अधिकाऱ्यांना विशेष अधिकार मिळवावे लागतील. जोपर्यंत माझी माहिती आहे असा लेखी हुकूम कोणालाही देण्यात आलेला नाही. असे म्हणतात की या बाबतीत हजारो लोकांना तोंडी आदेश देण्यात आलेले आहेत. घाबरून कोणत्याही ऐऱ्यागैऱ्याच्या हुकुमासमोर मान झुकवणाऱ्या लोकांना मदत करण्याचा कोणताही उपाय नाही. अशा सर्व लोकांना मी ठामपणे सल्ला देतो की त्यांनी अशा लेखी आदेशाची मागणी करावी की ज्याचा संशय आल्यानंतर त्याची वैधता आणि खरेपणा न्यायालयात तपासता येईल.

या प्रकरणी बहुसंख्याक समुदायाच्या लोकांना माझे सांगणे आहे की त्यांनी आपल्या हातात कायदा घेण्याच्या प्रवृत्तीला कठोरपणे आळा घालावा. जर ते असे करणार नाहीत तर ज्या फांदीवर ते बसलेले आहेत तिलाच ते तोडतील. असे करून ते आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतील. हा असा अधःपात असेल की ज्यातून सावरणे कठीण होईल. वेळ असतानाच त्यांना सद्बुद्धी मिळो. घृणित कृत्यांचे वृत्त खरे जरी असले तरी त्यांनी त्यात वाहून जाऊ नये. आपले प्रतिनिधित्व करणारे मंत्री न्यायाकरिता जे काही आवश्यक असेल ते सर्व करतील यावर त्यांनी विश्वास ठेवला पाहिजे.

'द हिंदुस्तान टाईम्स', ऑक्टोबर २८, १९४७ आणि 'हरिजन' नोव्हेंबर ९, १९४७

-------------------

## १७१. जयसुखलाल गांधी यांना पत्र

ऑक्टोबर २८, १९४७

चि. जयसुखलाल,

मी तुझे पत्र अनंतरायकडे पाठवले आहे. कंट्रोल आणि रेशनच्या दुकानांमुळे भ्रष्टाचार फार जास्त पसरला आहे याबद्दल मला मुळीच शंका नाही. ईश्वराची इच्छा असेल तसे होईल. मला शक्य असेल ते मी करत आहे. मनू अगदी चांगली आहे. माझ्याबद्दल काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. खोकला गेला आहे. बाकीच्या बातम्या मनू देईल.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - माझ्या मते तू तुझ्या तारुण्याच्या ऐन भरात आहेस. तू १२५ वर्ष जगण्याची आकांक्षा ठेवून लोकांची सेवा केली पाहिजे.

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू./२४

----------------

# १७२. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दिल्लीचे एक गृहस्थ लिहितात - "निर्वासितांकरिता मी काही तंबू आणि कनात एका मुसलमान बंधूकडून घेतले होते. ते तर येथून निघून गेले. आता हे कुठे ठेवावे?" ते सद्गृहस्थ आहेत आणि यामुळे या वस्तू कुठे ठेवाव्या असे ते विचारत आहेत. आणि त्यांचे म्हणणेही योग्य आहे. ते जर येथून निघून गेले तर आम्ही काय त्यांच्या वस्तू पचवून टाकायच्या? परंतु या वस्तू ठेवण्याची माझ्याजवळ कोणतीही व्यवस्था नाही. ही गोष्ट गृहविभागाशी संबंधित आहे. सरदारांचा सल्ला घेतला पाहिजे. वा जो कोणी अशी प्रकरणे हाताळतो त्याला यासंबंधी विचारले पाहिजे. किवा अशा प्रकारच्या कामाकरिता ज्यांची नियुक्ती झाली आहे त्या नियोगी साहेबांना (के. सी. नियोगी, निर्वासित आणि पुनर्वास मंत्री) विचारले पाहिजे. त्यांना जर त्या मुसलमान सदगृहस्थांचा ठावठिकाणा सापडू शकत असेल तर या वस्तू अथवा त्यांची किंमत होईल इतका पैसा त्यांना पाठवला पाहिजे.

अलीगढमध्ये जे विद्यापीठ आहे तेथील एक मुलगा मला भेटायला आला होता. तिथे पश्चिम पंजाब आणि सरहद्द प्रांतातील काही मुलेही शिकतात. ते तिथून परत पोहोचू शकले नाही आणि जे इथे आहेत ते परतू शकत नाहीत. त्यांनी तिथे का जाऊयेऊ नये? अखेरीस जो पाकिस्तान व्हायचा होता तो तर झालेला आहे. मग हे आपापसात भांडण कशाला? इथल्या इतक्या सगळ्या मुसलमानांनी पाकिस्तानमध्ये का जावे आणि तेथील हिंदू आणि शिखांनी इथे का यावे? छावण्यांमध्ये राहून त्रास सहन करत असलेल्या हिंदूंना आणि शिखांना मुसलमानांकडून कांबळी वगैरे गोळा करून ती वाटावी अशी या विद्यार्थ्यांची

इच्छा आहे. चांगले आहे. त्यांचा हेतू चांगला आहे आणि निर्वासितांना या गोष्टींची गरज पण आहे. आणि निर्वासितांना या गोष्टी मिळल्या तर त्यातून मुसलमानांचे निर्वासितांबद्दलचे प्रेमसुद्धा प्रगट होईल. परंतु खरे सांगायचे तर त्यांनी पाकिस्तानमध्ये जायला पाहिजे आणि पाकिस्तानमधील हिंदू आणि शिखांनी आपली घरेदारे सोडून भारतात का जायला पाहिजे असे तेथील मुसलमानांना विचारले पाहिजे. माझ्याजवळ तक्रारींनी भरलेला कागदाचा गठ्ठा आहे. त्या तक्रारी निराधार नाहीत. अर्थातच त्यात काही अतिशयोक्ति असू शकते. परंतु त्यात जरी अतिशयोक्ती असेल तरी या तक्रारींकरिता भरपूर कारणे आहेत. हिंदूंनी आपल्या ठिकाणावरून का पळावे? त्यांना परत बोलावा. परत येऊन त्यांनी आपल्या स्वतःच्या घरी का राहू नये? विद्यार्थी जर हे करू शकतील तर आम्ही कधीही आपसात भांडत नव्हतो हे आपण जगाला दाखवून देऊ शकतो. तसे झाले तर आपल्या प्रतिष्ठेला जो डाग लागला होता तो पुसला जाईल. मी आज त्या मुलांना हेच सांगितले. मी जे म्हणालो त्याच्याशी ते सहमत झाले. यानंतर ते काय करतील हे ईश्वरालाच माहीत.

परंतु आज मी तुम्हांला सांगणार आहे ती फार मोठी गोष्ट आहे. मला वाटते की बिहारमध्ये मी जेव्हा ठाण मांडून बसलो होतो तेव्हा, आता तर स्वराज्य मिळाले आहे, रेल्वेत बसण्याकरिता तिकिट काढण्याची काय गरज असे लोकांनी ठरवून टाकले आहे असे वाटत होते. इतकेच नाही तर ते अतिरेक आणि बळजबरीही करतात. त्या दिवसात लोक आपसात भांडत नव्हते. परंतु आता त्यांना वाटते की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्याला अजून काहीही नको. मी या विषयावर बरेच लिहिलेले आहे व त्याचा काही परिणाम झाला व नंतर तिथे हे बंदही झाले. परंतु आता तर असे झाले आहे की संपूर्ण भारतात वा असे म्हणा की संघराज्यात लोक तिकिट न काढता रेल्वेतून प्रवास करतात. मोठमोठ्या लोकांनाही असे वाटते की चला आता रेल्वे तर आपली झाली आहे. हो, रल्वे आपली झाली

आहे यात काही शंका नाही परंतु आपण असे वागत असल्याच्या परिणामी आपले आठ कोटी रुपये वाया गेले आहेत. आठ करोड कशाला म्हणतात? एक करोड कशाला म्हणतात? जेव्हा काँग्रेसला एक कोटी रुपये गोळा करायचे होते तेव्हा किती त्रास झाला होता आणि किती लोकांना त्या कामाकरिता निघावे लागले होते? मीसुद्धा घरोघरी जाऊन पैसे गोळा करत असे आणि बरोबर लोकांनाही नेत असे. तेव्हा कुठे मोठ्या मुश्किलीने ती रक्कम गोळा झाली. या देशात आपण असे गरीब लोक आहो. आज तर आपण एक कोटी रुपये खर्च करून टाकतो आणि ते केव्हा खर्च झाले हे तर कळतसुद्धा नाही. अजूनही आपल्याला पैसे कसे खर्च करावे हे कळत नाही. आपण खर्च करतो कारण आपल्याला त्या कामाची जबाबदारी देण्यात आली आहे. लोक जर रेल्वेतून फुकट प्रवास करू लागले वा कामाकरिता जाताना जर ते तिकीट घेणार नसतील तर ती एक प्रकारची हिंसा आहे. माझ्या दृष्टिकोनातून असे करणे स्पष्टपणे दरोडा घालणे आहे. असे केले तर भारताचे दिवाळे निघेल आणि ना आमच्याजवळ रेल्वेगाड्या राहतील, ना अजून काही राहील. मग आपण रडू की आता कुठे कसे जायचे. आठ कोटी रुपये काही कमी रक्कम होत नाही. आधी रेल्वेकडून आपल्याला जे मिळायचे त्यातून रेल्वे कंपनीचे व्याजही निघायचे. करोडो लोक रेल्वेने प्रवास करत असतात. सर्व पैसा देतील तर चांगले उत्पन्न होऊ शकते. त्या काळातही लोक तिकिटाशिवाय जायचे परंतु आजप्रमाणे हजारोंच्या संख्येत जात नव्हते. गाडीत निरीक्षक (इन्सपेक्टर) असायचे व नीट हिशेब ठेवायचे. आज तर असे झाले आहे की गार्ड आला तर त्याला मारा, ड्रायव्हर आला तर त्याला मारा. दिवसेंदिवस खर्च वाढतच चालला आहे. कोणतीही रेल्वे फुकट चालत नसते. प्रवासी विनातिकिट प्रवास करतात तर पैसे घ्यायचे नाही असे त्यात जे नोकर काम करतात ते थोडेच म्हणणार आहेत. त्यांना जर पगार मिळाला नाही तर ते काय खातील? अशा प्रकारे रेल्वेचा करोडो रुपयात खर्च आहे आणि ती करोडो रुपये मिळवत असते. पुर्वी रेल्वेला कधीच तोटा येत नसे. तिसऱ्या

वर्गाच्या प्रवाशांकडून भरपूर पैसा मिळायचा व त्यांच्यावर किमान खर्च होत असे. यामुळे काही पैसे शिल्लक राहायचे. परंतु काल मी जेव्हा आठ कोटी रुपये घाटा ऐकला तेव्हा मला फार वेदना झाल्या. अशा प्रकारे चोहोकडे लूटच लूट सुरू राहिली तर आमचे भले होऊ शकणार नाही. याशिवाय आपण आपापसात भांडू, एकमेकांची कत्तल करू व लूट करू तर यांतही काही फायदा होत नाही उलट खर्चच होतो. लोकांना जेव्हा त्यांचे घर सोडून पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता सांगण्यात येते तेव्हा ते काही फुकट थोडेच जात असतात. त्याना खायला प्यायला आणि अंगावर घालायला कपडे द्यावे लागत असतात. तो सर्व खर्च आपल्याला विनाकारण करावा लागतो. भारत काही श्रीमंतांचा देश तर नाही की काहीही केले तरी निभून जाईल. हे तर होऊ शकत नाही. यामुळे एक माणूस जरी रेल्वेने प्रवास करत असेल तरी त्याने पैसे दिल्याशिवाय प्रवास करू नये. त्याने पैसे दिलेच पाहिजे. जेव्हा इंग्रजांची सत्ता होती तेव्हा पोलीस आणि इतर अधिकारी पुष्कळ पैसे खायचे. मी तिसऱ्या वर्गातून प्रवास करत असल्यामुळे मला या गोष्टी तर कळायच्याच. हरिद्वार कुंभमेळ्याच्या (एप्रिल १९१५मध्ये हृदयनाथ कुंझरू यांनी संघटित केलेल्या स्वयंसेवकाच्या कामाकरिता) वेळी जेव्हा मी गेलो होतो तेव्हा त्या काळातील त्या स्टेशनमास्तरला वरून पैसे दिल्याशिवाय वर जाऊ देत नसत. नंतर त्यांची बदली होत असे. अशा प्रकारे हजारो रुपये लाचलुचपतीत निघून जायचे. परंतु आता आपण सर्व सज्जन झालो आहो असे मला वाटते. स्टेशन मास्तर, सिग्नल देणारा, निरीक्षक वा गार्ड असे लोक आहेत त्या सर्वांना आपल्या हक्काचा जो पैसा मिळतो तोच खाऊन आपली आजिविका चालवली पाहिजे. लोकांचा पैसा त्यांनी हिरावून घेऊ नये. जे प्रवासी आहेत त्यांनी रेल्वे आपली आहे असे समजून तिचा उपयोग केला पाहिजे. त्यांनी रेल्वेत घाण करू नये, थुंकू नये, बिडी पिऊ नये, कारण नसताना साखळी ओढू नये आणि तिकिट काढल्याशिवाय एकाही प्रवाशाने प्रवास करू नये. असे झाले तर मी म्हणू शकेन की आम्हांला स्वातंत्र्य मिळाले. माझे म्हणणे ऐकायला इथे काही हजारो लोक तर नाहीत.

आणि रेल्वेत जे लाखो लोक प्रवास करतात त्यांना माझे म्हणणे कोण सांगेल? मी जर रेल्वेचा मंत्री असतो वा प्रबंधक असतो तर माझ्याखाली काम करणारे जितके लोक असतील त्यांना मी हुकूम दिला असता की जितके लोक रेल्वेतून प्रवास करतात त्यांना सांगा की हे पाहा, आम्ही मारपीट करणार नाही, रेल्वे तुमची आहे, आम्ही तुमचे नोकर आहो, परंतु पैसे दिल्याशिवाय आम्ही तुम्हांला नेऊ शकत नाही. रेल्वे जर जंगलातून जात असेल तर तिथेच ती थांबवावी. तरीही ते ऐकत नसतील तर एंजिन ड्रायव्हरने गाडीपासून एंजिन वेगळे करून ते घेऊन जावे. मग ना कोणाला शिव्या द्यायच्या आहेत ना कोणावर बळजबरी करायची आहे. केवळ गाडी तिथेच उभी राहू द्यायची. जोपर्यंत लोक फुकट प्रवास करतील तोपर्यंत असेच केले पाहिजे. अखेरीस हा चांगुलपणा नाही. तुम्ही फुकट गाडीत बसाल, मारपीट कराल आणि मनात येईल तिथे गाडी थांबवाल. ही तर मी तुम्हांला येथील गोष्ट सांगितली. परंतु मी ऐकले आहे की पाकिस्तानमध्येही लोक असेच रेल्वेत फुकटात फिरत असतात. तिथेही लोकांनी फुकट का फिरू नये? अखेरीस आपण एकाच हवेत जन्मलो आहो, एकच मीठ खातो मग जे इथे होते ते तिथे का होऊ नये? असेच जर सुरू राहिले तर दोघांचेही दिवाळे निघेल.अशा प्रकारे भाडे न देता रेल्वेतून प्रवास करणे, जिथे लाच घ्यायची असेल तिथे लाच घ्यायची, ज्याला मारायचे असेल त्याला मारायचे तर मग आपण लुटारू होऊन जाऊ. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपली जी किंमत वाढली होती ती परत घसरेल. यामुळे जितके लोक ऐकू शकत असतील त्यांनी ऐकावे, मंत्र्यानेही ऐकावे. एक माहितगार माणूस म्हणून मी सांगतो की जर हे सर्व थांबले नाही तर गाड्या बंद कराव्या लागतील. गाड्या चालणार नाहीत आणि ज्या चालतील त्यात कोणी फुकट प्रवास करू शकणार नाही.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - २', पृष्ठ ७-११

-------------------

## १७३. छगनलाल जोशी यांना पत्र

ऑक्टोबर २९, १९४७

चि. छगनलाल,

तुझे पत्र आणि वांकनेरच्या महाराजांचा चेक मिळाला. (वांकनेरचे राजा साहेब गांधी जयंतीला खादी, हरिजन सेवा, सौराष्ट्रातील रचनात्मक कार्य याकरिता १,००० रुपयांचा चेक देत असत.)

राजेसाहेबांनी सचिवांच्या नावाने चेक काढला असल्याचे तुझ्या लक्षात आले नाही. परंतु एक सचिव वारलेला आहे आणि दुसरा नोआखालीत आहे. परंतु माझ्याजवळ इथे तीन वा चार अशा व्यक्ती आहेत की ज्या सचिव म्हणून काम करत आहेत. त्यातील एक बिसन आहे. त्याला चारित्र्याचे प्रशस्तीपत्र देण्याची आवश्यकता नाही. तो ३ वाजता उठतो आणि ३.३०ला सर्वांना उठवतो. सकाळच्या प्रार्थनेनंतर या वेळी तो माझ्याजवळ आहे. त्याने सही केलेला चेक तुला पाठवत आहे. असे केल्यामुळे मी थोडेसे पैसे वाचवत आहे आणि तुझा हेतूही साध्य होत आहे. तू तो चेक हरिजन कार्याकरिता वटवू शकतो. मी राजेसाहेबांना लिहितो आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूना पत्रो - ७ : श्री छगनलाल जोशीने, पृष्ठ २७५

-------------------

# १७४. वांकनेरच्या राजांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २९, १९४७

महामहीम राजा साहेब,

हरिजन सेवक संघाच्या चि. छगनलाल जोशींनी आपण नेहमी पाठवता तसा १,००० रुपयांचा धनादेश न पाठवता हरिजन कल्याण कार्याकरिता २,००० रुपयांचा धनादेश पाठवला आहे आणि तुमच्या आजाराबद्दलही कळवले आहे. ईश्वर तुम्हाला दीर्घायुष्य देवो आणि तुम्हाला तुमच्या प्रजेची सेवा करण्याची प्रेरणा देवो.

काठेवाडमधील हरिजनांची सेवा करण्याकरिता मी जोशींकडे (पाहा मागील विषय) चेक परत पाठवला आहे.

आशीर्वाद,

मो. क. गांधी

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# १७५. नरेन बी. जोशी यांना पत्र

ऑक्टोबर २९, १९४७

भाई जोशीजी,

मला तुमचा अहवाल मिळाला. तो इंग्रजीत का आहे? हिंदुस्तानीत का नाही? कोणते ठोस काम करण्यात आले हे अहवालात सांगितलेले नाही. केवळ ठराव करून तुम्ही काहीही साध्य करू शकणार नाही.

तुमचा,

मो. क. गांधी

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ८९३९

-------------------

# १७६. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज तुम्ही एक फार गोड भजन ऐकले. हे सुंदर भजन जी व्यक्ती म्हणाली ती कोण हे तुम्हा सर्वांना माहीत नसेल. त्यांचे नाव दिलिप कुमार राय आहे. त्यांनी अनेक ठिकाणांना भेटी दिलेल्या आहेत. त्यांच्याइतका गोड आवाज भारतात फार कमी लोकांचा असेल. मी तर असेही म्हणेन की त्यांच्यासारखा आवाज जगातसुद्धा फार कमी लोकांचा असेल. ते माझ्याकडे दुपारी आले होते. त्या वेळी मी फार वेळ देऊ शकलो नाही. मी केवळ १० मिनिट देऊ शकलो. त्या वेळी ते 'वंदेमातरम' म्हणाले. त्यांनी ते गोड आवाजात बसवले होते. त्यांना हे गाणे माहीत असले पाहिजे कारण ते बंगाली आहेत. मी त्यांचे ऐकले कारण त्यांना माझ्याकरिता ते म्हणायची इच्छा होती. परंतु मी काही संगीतशास्त्री तर नाही. एकमेकांमध्ये निर्माण होत असते तसे त्यांना माझ्याबद्दल प्रेम वाटते. यानंतर त्यांनी इकबालचे 'सारे जहॉं से अच्छा' हे भजन ऐकवले. तेसुद्धा त्यांनी एका नवीन सुरात बसवले आहे. मला हे फार आवडले. ते ऋषी अरविंदाच्या आश्रमात, जे पांडेचरीत आहे, अनेक वर्षांपासून राहतात. तिथे त्यांनी कोणते प्रशिक्षण तर घेतले नाही. ते तिथे गेले तेव्हा ते संगीतकार होते. नंतर त्यांनी ही कला विकसित केली.

कबीर म्हणतात की तुमच्याजवळ हे हत्ती, घोडे आणि करोडोची संपत्ती पडलेली आहे परंतु माझ्याजवळ तर केवळ मुरारीचेच नाव आहे. मी त्यानेच श्रीमंत झालो आहे आणि तुमच्याजवळ जी करोडोची संपत्ती पडली आहे ती व्यर्थ आहे. ती आज आहे आणि उद्या निघून जाईल, परंतु माझ्याजवळ जी संपत्ती आहे ती कधीही निघून जाऊ शकत नाही. हे

या भजनाचे रहस्य आहे. रामनामाची काय महिमा आहे ते यात सांगितले आहे. आणि भजनात ज्या गोष्टी आहेत त्या तर तुम्ही ऐकल्याच आहेत परंतु अरविंद आश्रम काय गोष्ट आहे हेही तर तुम्हांला माहीत असले पहिजे. असा तर तिथे लोकांचा सतत प्रवाह सुरू असतो. लोक तिथे नेहमीच जात असतात. त्यांचे अनेक भक्त आहेत, हिंदू काय, मुसलमान काय, कोणाचीही तिथे घृणा नाही. सर अकबर हैदरी, आता तर ते वारले, दरवर्षी तिथे जायचे. याचा मी साक्षीदार आहे. श्री अरविंद तर नम्र भक्त आहेत. ते कोणालाही भेटत नाहीत. वरून त्यांचे दर्शन झाले तर झाले, नाही तर नाही. परंतु तरीही लोक जातात. त्यांच्या मनात कोणबद्दलही घृणा नसते. आपल्या मनात कोणाबद्दलही द्वेषभाव नसावा निदान इतके तरी आपण त्यांच्यापासून शिकू या.

परंतु काश्मीरमध्ये जे सुरू आहे त्यासंबंधी आज मी तुमच्याशी बोलू इच्छितो, आणि बोलायलाही पाहिजे. वर्तमानपत्रांमध्ये तर तुम्ही पाहतच आहा. ती तर एक विचित्र गोष्ट आहे. तीन दिवसांची गोष्ट आहे, कोणाला माहीत नव्हते. मलाही माहीत नव्हते की काय होणार आहे. परंतु एखादा म्हणू शकतो की जे घडून गेले ते गेले. आता तर असे म्हणतात की आफ्रीदी आणि इतर लोक बंदुका घेऊन घुसले आणि काही तर असेही म्हणतात की हे पाकिस्तानचे कारस्थान आहे. ते असेल, त्याच्याशी मला काहीही कर्तव्य नाही. मी तर तिथे जे होत आहे ते पाहतो आहे. एकीकडे ते पुंछपर्यंत पोहोचले आणि दुसरीकडून ते श्रीनगरपासून २२ मैल अंतरावर पोहोचले. तिथून तर सरळ सडक पडली आहे. कोणताही अडथळा नाही.

काश्मीरच्या महाराजांनी जेव्हा हे पाहिले तेव्हा ते म्हणाले की भारतीय संघराज्यात येतो. महाराजांनी लॉर्ड माऊंटबॅटन यांनी पत्र लिहिले आणि त्यांनी उत्तरात कळवले की तुम्ही येऊ शकता. (महाराजा हरिसिंह यांनी जम्मू आणि काश्मीरच्या सामिलीकरणावर ऑक्टोबर २७ला सही केली होती.) आता त्यांनी आश्रय घेतला आहे तर त्यांचे संरक्षण करावे लागेल. परंतु रक्षण

करावे कसे आणि कुठून? रस्त्याने तर जाता येत नाही. विमानानेच जाणे भाग होते. परंतु विमानाने किती लष्कर जाणार? काही मोजकेच सैनिक जाऊ शकणार होते. त्यांना आपले शस्त्र न्यायचे होते, खाद्यसामुग्री न्यायची होती, जाडजूड कपडेही न्यायचे होते. एक अंस वजन वाढले तर वजन वाढले. वर पक्षाप्रमाणे उडायचे असेल तर किती माणसे उडू शकतील? बहुधा आजही काही गेले आहेत. बहुधा हजार गेले असतील. जास्तीत जास्त १५०० गेले असतील. आणि दुसरीकडे टोळीवाल्यांच्या भागातून खूप लोक आले आहेत. तेही तर लढणारे आहेत. लढत आहेत. यात तुम्ही काय विचार करणार आणि मी काय विचार करणार? अखेर माझे जीवन तर अशाच कामात गेले आहे. मी तर शस्त्रसंघर्ष मान्य करत नाही. परंतु मी हेही तर समजून घ्यायला पाहिजे की हे काय सुरू आहे. एकीकडे ते १५०० लोक आहेत आणि दुसरीकडे इतके सगळे आफ्रिदी आणि इतर लोक. आणि तिथे शेख अब्दुल्ला साहेब आहेत. त्यांना शेरे काश्मीर म्हणतात. म्हणजे ते वाघ आहे, सिंह आहेत, फार ताकदवान आहेत. तुम्ही त्यांचा फोटो तर पाहिलाच असेल. मी तर त्यांना ओळखतोसुद्धा. बेगम तर इथे आहेत. एका माणसाकडून जितके होऊ शकते तितके ते करत आहेत. ते काही लढणारे नाहीत. तिकडे काश्मीरमध्ये तगडे मुसलमान आहेत, तगडे हिंदू आहेत, राजपूत आहेत, शीख आहेत. त्यांनी ठरवले आहे की जे होईल ते करीन. ते तर मुसलमान आहेत. काश्मीरमध्ये मोठ्या संख्येत मुसलमान राहतात. येथून तर पूर्णपणे शस्त्रसज्ज होऊन सैनिक गेले आहेत, परंतु स्थानिक मुसलमानांनी काय करावे? मान्य की आपण सर्व रानटी झालो आहो - इथे काय, पाकिस्तानमध्ये काय. वेडेपणाचे कोणतेही कृत्य करायचे आपण सोडलेले नाही. काश्मीरच्या लोकांनीही रानटी व्हायला पाहिजे काय आणि मुलाबाळांची अमानूष कत्तल करायला त्यांनी सुरुवात केली पाहिजे काय? काश्मीरही अशा भयानक अवस्थेत पोहोचले पाहिजे काय? पंडित नेहरू आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेतला की काही तरी केले पाहिजे आणि ते सैनिक पाठवण्यात आले.

त्यांनी काय करावे? त्यांनी अखेरपर्यंत लढायला पाहिजे आणि लढताना मरण आले तरी ते पत्करले पाहिजे. सशस्त्र सैनिकाचे काम आक्रमण करणाऱ्या शत्रूचा पाडाव करणे असते. ते लढत असताना मरण पत्करतात पण माघार घेत नाहीत. याचा परिणाम काय होईल हे ईश्वरालाच माहीत. भजनात सांगितल्याप्रमाणे आपले एकमेव धन मुरारी आहे. आपल्याजवळ करोडोच्या संख्येत गोळा केलेले पैसे नाहीत. इतकेच नाही तर शस्त्रसुद्धा आपली संपत्ती नाही. जे काही घडते ते केवळ ईश्वरच घडवतो. परंतु प्रयत्न करणे आपले काम आहे. आणि ते आपण केले पाहिजे. यामुळे या १५०० सैनिकांनी प्रयत्न केला आहे. परंतु श्रीनगरला वाचवण्यात ते १५०० लोकही जेव्हा मरण पत्करतील तेव्हाच त्यांचे कर्तव्य पूर्ण होईल. आणि श्रीनंगरबरोबरच संपूर्ण काश्मीरही वाचवला जाईल. त्यानंतर काय होईल?

असेच होईल की अखेरीस काश्मीर काश्मिरींचा होईल. काश्मीर काश्मिरी लोकांचा आहे आणि महाराजांचा नाही या शेख अब्दुल्लांच्या म्हणण्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. परंतु महाराजांनी शेख अब्दुल्लांना सर्वाधिकार दिले आहेत आणि काश्मीर वाचवण्याकरिता तुम्हांला जे काही करता येईल ते तुम्ही करा व काश्मीर वाचवा असे त्यांना सांगितले आहे. अखेरीस काश्मीरला महाराज वाचवू शकत नाहीत. काश्मीरला जर कोणी वाचवू शकत असेल तर ते मुसलमान, काश्मिरी पंडित, राजपूत, आणि शीखच वाचवू शकतात. शेख अब्दुल्ला यांचे या सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. हे शक्य आहे की काश्मीरला वाचवत असताना शेख अब्दुल्लांना प्राणत्यागही करावा लागेल. त्यांच्या बेगमला आणि मुलीला मरावे लागेल आणि काश्मीरमधील सर्व स्त्रियांनाही मरावे लागेल. आणि जर असे घडले तर माझ्या डोळ्यातून एक टिपूसही निघणार नाही. आपल्या नशिबात जर युद्ध लिहिलेले असेल तर युद्ध होईल. हे युद्ध या दोघांमध्येच होईल की इतरही त्यात गुंततील हे केवळ ईश्वरालाच माहीत आहे. आक्रमकांना पाकिस्तानचा कोणताही पाठिंबा

वा प्रोत्साहन मिळाले नाही तर ते कसे तग धरू शकतील हे मला कळत नाही. शक्य आहे की पाकिस्तान उत्तेजन देत नसेल. नसेलही देत. काश्मीरचे सर्व लोक जेव्हा लढता लढता मरून जातील तेव्हा काश्मीरमध्ये कोण राहील? शेख अब्दुल्लाही गेले, कारण त्यांचे सिंहपण, त्यांचे वाघपण लढतालढता मरण्यातच आहे आणि मरेपर्यंत काश्मीरला वाचवण्यात, तेथील मुसलमानांना वाचवण्यात, तेथील हिंदू आणि शिखांना वाचवण्यातच आहे. ते कट्टर मुसलमान आहेत. त्यांची बायकोही नमाझ पढते. तिने मला गोड आवाजात औझोबिलाही म्हणून दाखवले होते. मी त्यांच्या घरी गेलेलो आहे. ते हिंदू आणि शिखांना मुसलमानांच्या आधी मरू देणार नाहीत. हिंदू आणि शीख तिथे अल्पसंख्य आहेत म्हणून काय झाले? शेखची जर ही वृत्ती असेल व जर त्यांचा मुसलमानांवर प्रभाव असेल तर आम्ही सर्व ठीक आहो. आपल्यामध्ये जे विष पसरले आहे ते अजून जास्त पसरायला नको. काश्मीरमुळे आपल्यामधीलही ते विष कदाचित निघून जाऊ शकेल. ते विष निघून जावे म्हणून काश्मीरमध्ये ते जर असे बलिदान करतील तर आपले डोळेसुद्धा उघडतील. टोळीवाल्यांना केवळ मारण्यात रस आहे. यामुळे ते काश्मीरमध्ये घुसले आणि आपली ताकदसुद्धा दाखवली. त्यांच्याबरोबर कोणकोण आहेत हे सर्व मला माहीत आहे. परंतु काश्मीरमधील सर्व हिंदू मुसलमानांनी जर आपल्या जीवाचे बलिदान दिले तर आपले डोळे उघडल्याशिवाय राहणार नाहीत. मग आपल्याला कळेल की सर्व मुसलमान विश्वासघातकी आणि वाईट नाहीत, त्यांच्यातसुद्धा काही चांगले लोक आहेत. त्याचप्रमाणे सर्व हिंदू आणि शीख चांगले साधूपुरुष आहेत वा वाया गेलेले व काफीर आहेत हे विधानही बरोबर नाही. माझा विश्वास आहे की हिंदू, मुसलमान, शीख या सर्वांमध्ये चांगले लोक असतात आणि या चांगल्या लोकांमुळेच हे जग चालत असते - शस्त्र घेऊन फिरणाऱ्या लोकांमुळे नाही.

आज आपण जे भजन ऐकले त्याचा सार हा आहे. काश्मीरच्या भूमीचे रक्षण करण्याकरिता तेथील प्रत्येक माणूस मरण पावला तर मी आनंदाने नाचेन. माझ्या अंतःकरणात किंचितही दुःख नसेल. जग नेहमीप्रमाणे चालणार आहे. हा सर्व ईश्वराचा खेळ आहे. परंतु आपल्याला नेहमी प्रयत्नशील राहावे लागते आणि योग्य गोष्ट करण्याकरिता मरण्याची तयारी ठेवावी लागत असते.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १२-१६

------------------

# १७७. इवान प्रिवा यांना पत्र

ऑक्टोबर ३०, १९४७

प्रिय भक्ती, (इवान प्रिवा यांना गांधीजींनी हे नाव दिले होते.)

तुझे सांत्वनपर पत्र मी वाचले. मी तुझा दृष्टिकोन समजू शकतो आणि मला त्याचे कौतुकही वाटते. मला त्या महान अगोचर आणि अज्ञात शक्तीच्या भरवशावर सोडून दे. सर्व काही चांगले नसतानाही सर्व काही चांगले आहे असे म्हणून स्वतःचीच फसवणूक करण्याची माझी इच्छा नाही.

मनोविश्लेषणाचा ...(इथे दोन शब्द अस्पष्ट आहेत. खंड ९० पाहा) अभ्यास करण्याकरिता बहुधा मला कधीही वेळ मिळू शकला नाही. या नवीन विचारप्रणालीबद्दल मला काय वाटते याचा विचार न करता तू तुझ्या मार्गाने जा. "आधी ईश्वराचे राज्य मिळवा आणि मग तुम्हांला सर्व काही आपोआप मिळेल." (सेंट मॅथ्यूज, ६-३३.)

मला आनंद होतो की तुम्ही दोघांनीही एकाच खोलीत त्रास सहन केला आणि तिथेच बरे झाला. तुम्ही निरागस भाऊबहीण असल्यामुळे एकाच खोलीत तुम्ही आंघोळ कशी काय करत होता हे मला कळू शकेल काय?

तुम्हा दोघांनाही स्नेह.

बापू

मॅडम एडमंड प्रिवा,

ॲव्हेन्यू द ला गार,न्यू सातेल,

स्वित्झर्लंड.

फोटोप्रतीवरून. जी. एन. ८८०४

----------------

# १७८. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांच्याशी चर्चा

[ऑक्टोबर ३०, १९४७] ('दिल्लीमां गांधीजी'मधून)

गांधीजी सुऱ्हावर्दींना म्हणाले की तुमच्यासमोर तुमचा प्रामाणिकपणा सिद्ध करण्याचा एकच मार्ग आहे. तो मार्ग म्हणजे पाकिस्तानच्या चुकीच्या धोरणाचा आणि कृत्याचा निषेध करणे. (सुऱ्हावर्दींनी तक्रार केली होती की संघराज्यात कोणीही त्यांच्यावर विश्वास ठेवण्याकरिता तयार नाही.) ही गोष्ट तुम्हीसुद्धा नाकारत नाही. उदाहरणार्थ टोळीवाल्यांनी काश्मीरमध्ये घूसखोरी केली आहे. परिस्थितीजन्य सर्व पुरावे दाखवतात त्याप्रमाणे एक तर पाकिस्तान यामागे असला पाहिजे वा नसला पाहिजे. जर पाकिस्तान त्यामागे असेल तर तसे स्पष्टपणे घोषित करणे हे भारतीय नागरिकाचे कर्तव्य नाही काय? याउलट इतक्या मोठ्या सैन्याच्या तुकडीच्या उपस्थितीनंतरही तुमचे असे मत असेल की यामागे पाकिस्तानचा हात नाही तर मग याकरिता जबाबदार कोण आहे याचा शोध घेणे तुमचे कर्तव्य नाही काय?

मी तुम्हांला सांगतो की सत्य काय आहे हे शोधून काढणे तुमचे कर्तव्य आहे. मी चूक आहे आणि तुम्ही बरोबर आहा हे कळले तर मला सर्वात जास्त आनंद होईल.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड ४, पृष्ठ ६६

-----------------

# १७९. प्रार्थनाप्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ३०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

इथे काय सुरू होते ते मला कळत होते. त्याचे मला दुख होत होते. आज मी तुम्हांला सांगतो की हे एका खाजगी माणसाचे घर (बिर्लाभवन) आहे. इथे काहीही गोंधळ व्हायला नको. जे लोक इथे येऊ इच्छितात त्यांचे स्वागत आहे. परंतु इथे आल्यानंतर काही तक्रार करणे योग्य नाही. आज एक सद्गृहस्थ म्हणाले की मी इथे प्रार्थना होऊ देणार नाही. अशा परिस्थितीत प्रार्थना घ्यावी की नाही हा प्रश्न मला पडतो. आक्षेप घेणारा माणूस गेला कारण तुम्ही त्याला जाण्याकरिता सांगितले. तो परतला आणि परत गेला. माझ्याकरिता ही चांगली गोष्ट नाही. याचा अर्थ तो मनातून दुखावला आहे. मला असे वाटते की अशाच प्रकारे तुमच्यापैकीही अनेकजण दुखावलेले असतील कारण प्रार्थनेत कुराणमधील काही भागाचा समावेश करण्यात आला आहे. परंतु मी असहाय आहे कारण तो प्रार्थनेचा अविभाज्य घटक आहे. इथे प्रार्थना झाली नाही तर मी प्रार्थना करू नये असे तुम्हांला वाटते काय? मी इथे प्रार्थना घेतली नाही तर मी प्रार्थना करणार नाही असे नाही. जगात एकही माणूस माझ्या बाजूने उभा राहिला नाही तरी मी प्रार्थना करीन. माणूस मनातल्या मनातसुद्धा प्रार्थना करू शकतो. इथे मला अहिंसेच्या दृष्टीतून विचार करायचा आहे. माझे कर्तव्य काय हे त्या दृष्टीनेच मी ठरवले पाहिजे. मी प्रार्थना करीन म्हणून एखाद्या माणसाने निघून जावे अशी माझी इच्छा नाही. आज प्रार्थना करायची माझी इच्छा नाही आणि मला वादातही पडायचे नाही. परंतु तरीही मी प्रार्थना करीन कारण आपण कठीण काळातून जात आहो आणि लोकांना गांधी काय म्हणतो हे ऐकण्याची इच्छा आहे. मी बोलणारच

आहे कारण मला काय म्हणायचे ते निदान लोकांना कळेल. परंतु आज मी वादात पडणार नाही कारण मी असहाय आहे.

प्रार्थना बंद करून व केवळ चर्चा सुरू ठेवावी काय याबद्दलही मी निर्णय घेतला पाहिजे. हा मोठा प्रश्न आहे. मला याबदद्ल विचार करावा लागेल. आज याबद्दल माझी काही बोलण्याची वा वाद करण्याची इच्छा नाही. मी जर चर्चा सुरू ठेवली तर मला प्रार्थना राहू द्यावी लागेल. याबद्दल मी वृत्तपत्रांतून वक्तव्य देईन.

तुम्ही लोक आलेले आहा हे जेव्हा मी पाहिले तेव्हा मी इथे आलो. माझी संस्कृती आणि अहिंसा मला सांगते की मी माझे अंतःकरण तुमच्यासमोर उघड करून ठेवावे आणि मी कोण आहे ते दाखववे. माझ्याकरिता जगात सत्य आणि अहिंसेशिवाय काहीही नाही. तुम्हांला जर सत्य आणि अहिंसेचा अर्थ कळला तर या जगात तुम्ही महान गोष्टी करू शकता. मला काही मोठमोठ्या गप्पा हाणायच्या नाहीत. जगात मोठमोठ्या गोष्टी होत असतात परंतु ईश्वराचा जो नियम आहे तो कोणीही बदलवू शकत नाही आणि ईश्वरही या जगाचे नियम बदलवू शकत नाही. मला असे वाटते की आमच्यात अहंकार भरलेला आहे, अज्ञान भरलेले आहे. यामुळे सत्यासारखी मोठी गोष्ट व्यापारात कशी चालू शकेल, व्यवहारात कसे चालू शकेल असे आपल्याला वाटत असते. अहिंसा कशी काम करू शकेल असे आपल्याला वाटत असते. लोक जेव्हा मला शिव्या देतात तेव्हा लोक म्हणतात की ते तुम्हांला इतक्या शिव्या देतात तर तुम्ही एक तरी शिवी द्या. लोक शिव्या देतात तर एक थापड का मारत नाही. यामुळे होते काय की आम्ही पुढे जाऊ शकत नाही. परंतु आम्हांला तर पुढे जायचेच आहे आणि माझ्या मते जन्म घेण्याचे सार्थकत्व यातच आहे. मी एका स्थितीत राहू शकत नाही. ईश्वर स्थिर आहे. परंतु उपनिषदात सांगितले आहे की तो स्थिरही आहे आणि गतिमानही आहे. तो नेहमी गतीमान असतो - जो असा गतीमान असतो की तो स्थिर आहे असे वाटत असते. आपल्याला कुठे माहीत असते की सूर्य स्थिर आहे

आणि पृथ्वी अस्थिर. परंतु जेव्हा आपण शिकतो की जी गोष्ट गतिमान असल्यासारखी वाटते ती स्थिर आहे. ईश्वरी माया अशी आहे की जो स्थिर आहे आणि अस्थिरही आहे तो ईश्वर आहे. आपल्यामध्ये स्थैर्यासारखी कोणतीही गोष्ट नाही. गती आहे, गती आहे तर आम्हाला पुढे जावेच लागेल. आपण आईच्या पोटातून निघालो आणि पुढे निघालो. पुढे जाता जाता म्हातारपण येते. जगात असेच चालत असते. जो जन्मतो त्याला पुढे जावे लागते, त्याला पुढे जावे लागतच असते. काही लोक म्हातारपणाला घसरण म्हणतात. मी तसे समजत नाही. वार्धक्य पिकलेले फळ आहे. शरीर सुटते, आत्मा थोडाच सुटतो. तो ना तर मरतो ना पडतो. आत्म्याची गती अविरत सुरू असते आणि जगात सत्य आणि अहिंसेशिवाय काम चालू शकत नाही. माझा दावा आहे की लहान मुलांनीसुद्धा सत्य आणि अहिंसा शिकायला पाहिजे. आई जर हे शिकेल तर ती मुलालाही शिकवेल. आजच्या आज तर आई शिकू शकत नाही. परंतु असे म्हणतात की माणूस आदिकाळापासून, करोडो वर्षापासून आहे. तर आपण तो विकास पाहिला पाहिजे. याकरिता आपल्यामध्ये धैर्य तर असायलाच पाहिजे. माझी याबद्दल अधिक सांगण्याची तर इच्छा नाही, परंतु सत्य आणि अहिंसा यांच्याशिवाय काहीही होऊ शकत नाही. आम्ही विकास करू शकत नाही.

मला आज वाद तर करायचा नाही. तुम्ही उद्या याल. जर उद्यासुद्धा कोणी कुराणमधील आयत वाचण्यावर आक्षेप घेतला तर त्यावर वाद करायचा की नाही याचा मी त्या वेळी विचार करेन. जर कोणाची तक्रार असेल तर तो म्हणेल की माझी तक्रार आहे. नाही तर म्हणेल की आम्हांला प्रार्थनाही ऐकायची आहे आणि चर्चाही. परंतु आपण संतापायचे नाही हे लोकांना कळले पाहिजे. हं, पण नंतर कोणी आरडाओरड करू लागला आणि लोकांना ऐकू द्यायचे नाही असे त्याने ठरवले तर शक्य आहे की तुमच्या हिंसेला हुसकावले जाईल आणि माझ्या अहिंसेची परीक्षा होईल. हेही कळेल कीं तुम्ही माझ्यासोबत कुठवर जाऊ शकता. तुम्ही जर माझ्याबरोबर राहाल आणि अहिंसेची साथ

द्याल तर अहिंसेसमोर हिंसा टिकू शकत नाही असा माझा दावा आहे. परंतु मी म्हणेन त्याप्रमाणे तुम्ही वागला पाहिजे ही त्याकरिता अट आहे. तुम्ही संयमाने वागाल आणि रागाच्या भरात काहीही करणार नाही असे तुम्ही मला आश्वासन दिले पाहिजे. कुराणातील पाठ म्हणण्याला विरोध करणारे सज्जन गृहस्थ अडाणी आहेत. कुराण ए शरीफने काय नुकसान केले आहे? मुसलमान जर मार्गावरून भरकटले असतील तर तो कुराणचा दोष असू शकत नाही. अरबी भाषेत लिहिलेले कुराण तर उदात्त आहे, सनातन आहे. जो त्याची घृणा करतो त्याच्यापेक्षा जास्त अडाणी कोणी आहे असे मी समजत नाही. अशाच प्रकारे तक्रार करणाराला आपण समजावून सांगितले पाहिजे. हं, कोणी जर म्हणेल की मला प्रार्थना ऐकायचीच नाही तरी मी प्रार्थनाही करीन आणि चर्चाही करीन. परंतु मी प्रार्थना बंद केली म्हणून तुम्ही कोणाला मारले तर मी ते सहन करू शकणार नाही. जर मी एकटा असलो आणि पाच माणसे मला मारायला आली तर मी म्हणेन की हे माझे शीर तुमच्यासमोर आहे. मी म्हणेन पाचांनी मारायची काय आवश्यकता, एकच माणूस गळा कापण्याकरिता पुरे आहे. आणि तरीही मी प्रार्थना करेन. तुमचे अंतःकरण जेव्हा असे होईल तेव्हा ना तुम्ही कोणाला माराल ना कोणावर संतापाल. तक्रार करणारा ओरडून ओरडून जरी तक्रार करू लागला तरी आपण प्रार्थना करू. उद्या प्रार्थनाही होईल आणि चर्चाही. जर उद्या कोणाला तक्रार करायची असेल तर त्याने तक्रार करून निघून जावे. त्याच्याकरिता मी स्वतःचा विनाश करून घेऊ शकत नाही. मी क्रोधाला नियंत्रणात ठेवीन, धैर्य ठेवीन तेव्हाच माझी गाडी पुढे जाऊ शकते. मला इतकेच सांगायचे होते. आता तुम्ही शांतपणे घरी जा आणि वाद करू नका. घरी गेल्यानंतर यावर विचार करा.

हिंदीवरून. 'प्रार्थनाप्रवचन - २', पृष्ठ १६-२०

---------------------